अर्थदीप

मनुष्याणाम् वृत्तिरर्थः।

मराठी अर्थशास्त्र परिषदेचे
४५ वे वार्षिक राष्ट्रीय अधिवेशन
दिनांक ५, ६ आणि ७ नोव्हेंबर २०२२

जे. ई. एस. कॉलेज, जालना

मुख्यसंपादक
प्रोफेसर दिलीप अर्जुने

Online on https://jesjalna.org/economics/index.html

मराठी अर्थशास्त्र परिषदेचे ४५ वे वार्षिक राष्ट्रीय अधिवेशन
दिनांक ५, ६ आणि ७ नोव्हेंबर २०२२

अर्थदिप स्मरनिका

प्रमुख संपादक
प्रोफेसर दिलीप सोपान अर्जुने

संपादक
प्रा. एम जी. हिंगे
प्रा. बी. डी. तोटरे
डॉ. बी. पी. वाघ

मुख्य मार्गदर्शक
प्रोफेसर आर. एस. सोळुंके

आयोजक
जालना एज्युकेशन सोसायटीचे,
आर. जी. बगडिया कला, एस.बी. लखोटिया वाणिज्य व आर. बेझंजी विज्ञान महाविद्यालय, जालना

ऋत प्रकाशन जालना

अर्थदिप स्मरनिका

मुख्य पृष्ठ: बाबू तोटरे

अक्षर जुळवणी : प्रा. एम जी. हिंगे

ISBN: 978-93-84663-34-6
ऋत प्रकाशन जालना

किंमत: ००

ऋत प्रकाशन जालना

रावसाहेब पाटिल दानवे
Raosaheb Patil Danve

राज्य मंत्री
रेल, कोयला एवं खान मंत्रालय
भारत सरकार
Minister of State for Railways,
Coal & Mines
Government of India

सत्यमेव जयते

शुभेच्छा संदेश !

जालना एज्युकेशन सोसायटीचे, आर.जी.बगडिया कला, एस.बी. लखोटिया वाणिज्य व आर. बेझंजी विज्ञान महाविद्यालय, जालना या यजमान महाविद्यालयाने दिनांक ५, ६ व ७ नोव्हेंबर २०२२ रोजी वार्षिक अधिवेशन आयोजित केले आहे. जालना जिल्हयाचे शैक्षणिक मागासलेपण दूर करण्यासाठी दानशूर व्यक्तीनी एकत्र येऊन सर्वात श्रेष्ठ दान विद्यादान या सर्वसमावेशक विचारातून जालना एज्युकेशन सोसायटीची स्थापना केली. मराठवाड्यातील नावाजलेले हे महाविद्यालय गुणवत्तापूर्ण व दर्जेदार शिक्षण देण्यासाठी आणि जालन्याच्या शैक्षणिक विकासासाठी सदैव तत्पर आहे. ६४ वर्षाच्या उज्वल परंपरेची भूतकालीन शैक्षणिक, सामाजिक, सांस्कृतिक राजकीय वाटचाल करणाऱ्या या संस्थेच्या उभारणीत जालन्यातील व्यापारी, उद्योजक आणि सर्व क्षेत्रातील प्रेमीच्या अथक प्रयत्न व सहयोगातून हा वटवृक्ष उभा आहे.

संस्थेचे पदाधिकारी, महाविद्यालयाचे प्राचार्य, प्राध्यापक, शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचारी यांनी सदर अधिवेशनाचे आयोजन करून राष्ट्रीय अधिवेशनाचे उद्घघाटक म्हणून मला जो सन्मान दिला. त्याबद्दल आयोजकांचा मी मनापासून आभारी आहे. तसेच त्याबद्द्ल धन्यवाद व आभार व्यक्त करणे मी माझे परम कर्तव्य समजतो. आपल्या सर्वांचे सहयोगाने हे अधिवेशन सर्वांगाने यशस्वी व्हावे याकरीता मन: पूर्वक शुभेच्छा !

धन्यवाद !

(रावसाहेब पाटील दानवे)

शुभेच्छा............

मा. ना॰ भागवतजी कराड साहेब,
केंद्रीय अर्थ राज्य मंत्री, भारत सरकार,
नवी दिल्ली

जालना एज्युकेशन सोसायटीचे, आर. जी. बगडिया कला, एस.बी. लखोटिया वाणिज्य व आर. बेझंजी विज्ञान महाविद्यालय जालना या यजमान महाविद्यालयाने दिनांक ५, ६ व ७ नोव्हेंबर २०२२ रोजी वार्षिक अधिवेशन आयोजित केले आहे . मराठी अर्थशात्र परिषदेचे ४५ वे राष्ट्रीय अधिवेशन जे.ई.एस. महाविद्यालय येथे दि.५/११/२०२२ ते ०७/११/२०२२ पर्यंत होणार आहे तरी सबंधित परिषदेचे उद्घघाटन कार्यक्रम दि.५/११/२०२२ रोजी जे.ई.एस. महाविद्यालय जालना येथे होणार असून जालना जिल्हयाचे शैक्षणिक मागासलेपण दूर करण्यासाठी दानशूर व्यक्तीनी एकत्र येऊन सर्वात श्रेष्ठ दान विद्यादान या सर्वसमावेशक विचारातून जालना एज्युकेशन सोसायटीची स्थापना केली. मला आनंद आहे. सन १९५८ मध्ये भारताचे पहिले पंतप्रधान पंडित जवाहरलाल नेहरू यांच्या प्रेरणेतून स्थापन झालेल्या ऐतिहासिक अशा महाविद्यालयात संपन्न होणाऱ्या राष्ट्रीय अधिवेशनाचे मुख्य अतिथी पद भूषविण्याचा सन्मान प्राप्त झाला. संस्थेचे पदाधिकारी, महाविद्यालयाचे प्राचार्य, प्राध्यापक, शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचारी यांनी सदर अधिवेशनाचे आयोजन करून राष्ट्रीय अधिवेशनाचे मुख्य अतिथी म्हणून मला बोलवून जो सन्मान दिला. त्याबद्दल आयोजकांचा मी मनापासून आभारी आहे. तसेच त्याबाबत धन्यवाद व आभार व्यक्त करणे मी माझे परम कर्तव्य समजतो. आपले हे अधिवेशन सर्वांगाने यशस्वी व्हावे याकरीता मन: पूर्वक शुभेच्छा

मा. ना॰ भागवतजी कराड साहेब ,
केंद्रीय अर्थ राज्य मंत्री , भारत सरकार ,
नवी दिल्ली

अध्यक्षीय मनोगत --

मराठी अर्थशास्त्र परिषदेच्या ४५ व्या वार्षिक अधिवेशनाच्या अध्यक्षपदी माझी एकमताने अविरोध निवड केल्याबद्दल परिषदेच्या समस्त सन्माननीय सभासदांचे मनःपूर्वक आभार मानतो. तसेच आपल्या ऋणात राहण्याचा माझा सदैव प्रयत्न राहील अशी ग्वाही देतो. जालना एज्युकेशन सोसायटीचे, आर. जी. बगडिया कला, एस.बी. लखोटिया वाणिज्य व आर. बेझंजी विज्ञान महाविद्यालय जालना या यजमान महाविद्यालयाने दिनांक ५, ६ व ७ नोव्हेंबर २०२२ रोजी वार्षिक अधिवेशन आयोजित केले आहे . जालना जिल्हयाचे शैक्षणिक मागासलेपण दूर करण्यासाठी दानशूर व्यक्तींनी एकत्र येऊन सर्वात श्रेष्ठ दान विद्यादान या सर्वसमावेशक विचारातून जालना एज्युकेशन सोसायटीची स्थापना केली. मला आनंद आहे सन १९५८ मध्ये भारताचे पहिले पंतप्रधान पंडित जवाहरलाल नेहरू यांच्या प्रेरणेतून स्थापन झालेल्या ऐतिहासिक अशा महाविद्यालयात संपन्न होणाऱ्या राष्ट्रीय अधिवेशनाचे अध्यक्षपद भूषविण्याचा सन्मान प्राप्त झाला.

मराठवाड्यातील नावाजलेले हे महाविद्यालय गुणवत्तापूर्ण व दर्जेदार शिक्षण देण्यासाठी आणि जालन्याच्या शैक्षणिक विकासासाठी सदैव तत्पर आहे. ६३ वर्षाच्या उज्वल परंपरेची भूतकालीन शैक्षणिक, सामाजिक, सांस्कृतिक राजकीय वाटचाल करणाऱ्या या संस्थेच्या उभारणीत जालन्यातील व्यापारी, उद्योजक आणि सर्व क्षेत्रातील प्रेमीच्या अथक प्रयत्न व सहयोगातून हा वटवृक्ष उभा आहे. जालना शहर भारतातील महाराष्ट्र राज्याच्या मध्यभागी असून ते एक ऐतिहासिक, औद्योगिक आणि संशोधनात्मक स्तरावर जागतिक पातळीवर नावलौकिक असणारे शहर आहे. ते कुंडलिका नदीच्या किनाऱ्यावर वसलेले आहे. संत रामदास स्वामी यांची जन्मभूमी जांब समर्थ याच जिल्हयात आहे. जालना जिल्हा पूर्वी निजामाच्या राज्याचा भाग होता. हैद्राबाद मुक्तीसंग्रामानंतर तो औरंगाबाद जिल्हयामधील एक तालुका झाला. मराठवाडा विभागात उत्तर दिशेस तर औरंगाबादच्या पूर्वेकडील जालना तालुका दि. १ मे १९८१ रोजी जिल्हा झाला. एकूण पाच तालुके असणाऱ्या जालना जिल्हयाच्या पूर्वेस परभणी व बुलढाणा जिल्हा, पश्चिम दिशेला औरंगाबाद जिल्हा, उत्तरेला जळगांव जिल्हा असून दक्षिणेस बीड जिल्हा आहे. जालना शहर हे महाराष्ट्र राज्याच्या व भारताच्या राजधानीशी ब्रॉडगेज रेल्वे लाईनने जोडलेले आहे. जालना जिल्हा हा हायब्रीड सीड्ससाठी प्रसिद्ध असून स्टील रिरोलींग मिल, बिडी उद्योग, शेतीवर आधारीत उद्योगधंदे उदा. दालमील, बी-बियाणे तसेच मोसंबीसाठी देखील प्रसिद्ध आहे. महिको, महिंद्रा, बेंजो शीतल हे संकरीत बियाणे उद्योग या जिल्हयात आहे. मराठवाडा मुक्ती संग्रामात प्राणांची आहूती देणारे जनार्दन मामा नागापूरकर याच जिल्हयातील आहे. जिल्ह्याचे वार्षिक सरासरी पर्जन्यमान ६५०-७५० मिमी इतके असून राज्याच्या व देशाच्या सरासरीपेक्षा कमी असल्यामुळे जिल्हा अनेकवेळा दुष्काळ सदृश्य समजला जातो.

जालना शहरामध्ये आज मुर्ती दरवाजा व हैद्राबाद दरवाजा शिल्लक असून पूर्वी माती आणि विटांच्या भिंतीने हे शहर सुरक्षित होते. राजा अकबराच्या काळामध्ये एका अधिकाऱ्याला जहांगीर म्हणून देण्यात आलेले होते. शहराच्या पूर्वेला मस्तगड नावाचा किल्ला होता. जालना शहराच्या दक्षिणेला मत्स्योदरी देवीचे मंदिर आहे. जैन धर्मियासाठीचे हे एक पवित्र ठिकाण म्हणून गुरु गणेश तपोधाम याला कर्नाटक केसरी म्हणून देखीलओळखले जाते. जनगणना २०११ नुसार जिल्हयात एकूण ९७१ गावे असून त्यापैकी ९६३ गावे वस्ती असलेली व ०८ गावे ओसाड आहे. जालना शहर हे धनवान मुहमद्दन व्यापारांच्या इच्छेप्रमाणे ज्याला याठिकाणी खूप फायदा झाला तेंव्हापासून शहर जालना या नावाने ओळखण्यास सुरुवात झाली. याठिकाणी विणकामाचा (जुलाह) व्यवसाय होता . मलिक अंबरच्या काळात जमशेद खान याने शहराच्या पश्चिमेला 'मोती 'तलाव उभारला होता. तसेच पाच पाणीसाठे (तळे) तयार आलेले होते. आज या शहराला जायकवाडी आणि घाणेवाडी

धरणातून पाणी पुरवठा होतो. जिल्ह्याचा ९५ % भाग हा गोदावरी नदीच्या खोऱ्यात येतो . जालना जिल्ह्यातील जमीन सुपीक व काळी असून कापसाच्या पिकासाठी योग्य आहे. तर ज्वारी हे मुख्य पीक आहे. जिल्ह्यात केंद्र सरकारच्या वतीने ६०० हेक्टर क्षेत्रावर ड्रायपोर्ट उभारण्याची तयारी केले जात आहे अशा प्रकारच्या शहरात व जिल्ह्यात अधिवशेनाचे आयोजन केले जात आहे याचा मनस्वी आनंद होत आहे. संस्थेचे पदाधिकारी, महाविद्यालयाचे प्राचार्य, प्राध्यापक, शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचारी यांनी सदर अधिवेशनाचे आयोजन करून परिषदेला मोलाचे सहकार्य केले आहे. त्याबद्दल आयोजकांचा मी मनापासून आभारी आहे.

मराठी अर्थशास्त्र परिषदेने चार दशकांची उज्वल परंपरा राखून पाचव्या दशकात पदार्पण केले आहे. दि.९ जानेवारी १९७७ रोजी अवघ्या ६४ सदस्य संख्येवर स्थापन झालेल्या परिषदेचे आज १९९२ सदस्य आहेत. नव्हेतर विशिष्ट ध्येयाने मराठी भाषेतून अर्थशास्त्राचा अभ्यास करणारी ही राष्ट्रीय परिषद म्हणून सर्वपरिचित आहे. मराठी अर्थशास्त्र परिषदेला अर्थशास्त्र विषयाचे अभ्यासक आपली हक्काची, आपुलकीची आणि कौटुंबिक परिषद म्हणून बघत नव्हेतर हा एक मराठी अर्थशास्त्राचा परिवार आहे असे मी समजतो. परिषदेच्या उभारणीमध्ये संस्थापक अध्यक्ष प्रा. नी. वि. सोवनी यांचे मनातील महाविद्यालयीन विद्यापीठ स्तरावर मराठी भाषेचा वापर वाढविण्याचे धोरण अनुसरले पदवी व पदव्युत्तर वर्गासाठी अर्थशास्त्राची दर्जेदार पुस्तके निर्माण होण्यासाठी प्रयत्न करणे व प्रोत्साहन देणे, एकच एक अशी परिभाषा विकसित करणे, वेळेवेळी आर्थिक प्रश्नांची मराठीतून चर्चा करण्यासाठी विचारपीठ निर्माण करणे, मराठीतील अर्थशास्त्रीय लेखन प्रसिद्ध करण्याचे माध्यम उपलब्ध करून देणे अशा गरजा भागविण्यासाठी काळाची गरज आणि निकड ओळखून शिस्तबद्ध व विशिष्ट उद्देशाने प्रेरीत होऊन प्रयत्न जरुरीचे होते यातूनच मराठी अर्थशास्त्र व्यरिषदेचा उदय झाला. दिनांक ७ मार्च १९७६ रोजी आर्यभूषण छापखान्यात बैठक होऊन विचारमंथनातून 'मराठी अर्थशास्त्र परिषद' व मुखपत्र सुरू करण्याचा निर्णय घेण्यात आला. दिनांक १६ डिसेंबर १९७६ पर्यंत ६४ सदस्य असलेल्या संस्थापक सदस्यांची पुणे येथे गोखले अर्थशास्त्र संस्थेच्या ध. रा. गाडगीळ सभागृहात दि. ९ जानेवारी १९७७ रोजी पुणे विद्यापीठाचे तत्कालीन कुलगुरु मा. देवदत्त दाभोळकर यांच्या अध्यक्षतेखाली सभा संपन्न झाली. नियतकालिकाचे ' अर्थसंवाद ' हे नाव निश्चित झाले आणि पहिले प्रमुख संपादक डॉ. आनंद नाडकर्णी यांचेकडे जबाबदारी सोपविण्यात आली. तर परिषदेचे पहिले अधिवेशन मुंबई येथे प्रा० नी. वि. सोवनी यांचे अध्यक्षतेखाली संपन्न झाले . आणि आज सर्व माजी अध्यक्षांच्या व ख्यातनाम अर्थतज्ज्ञांच्या मार्गदर्शनात परिषदेची समर्थ वाटचाल सुरू आहे. यामध्ये आजपर्यंत पार पडलेल्या वार्षिक अधिवेशनाचे सर्व माजी अध्यक्ष, कार्याध्यक्ष, कार्यवाह खजिनदार, अर्थसंवादचे संपादक, विश्वस्त त्याचबरोबर आजीव सदस्यांचे फार मोठे योगदान परिषदेला मिळाले आहे. या सर्वांच्या प्रति मी अध्यक्ष या नात्याने कृतज्ञता पूर्वक ऋण व्यक्त करतो . सदर परिषदेचे करोना महामारीचा काळ वगळता दरवर्षी वार्षिक अधिवेशनाचे आयोजन करण्यात येते.

अर्थशास्त्र विषयातील नवनवीन प्रवाह, आधुनिक विचारांचे आणि समकालीन संदर्भाचे अध्ययन, जागतिकीकरणाची चर्चा, आर्थिक विकासाच्या संदर्भात चर्चा घडवून अर्थशास्त्राच्या अभ्यासकांना संशोधनाची आवड निर्माण होण्यासाठी एक सशक्त विचारपीठ मराठी अर्थशास्त्र परिषदेने उपलब्ध करून दिले आहेत. परिषदेच्या अनेक सभासदांनी कुलगुरू, प्र- कुलगुरु , रिझर्व्ह बँक ऑफ इंडियाचे सल्लागार, नियोजन आयोगाचे सदस्य , आमदार, खासदार, मंत्री, मराठी विश्वकोष मंडळाचे सदस्य, अर्थशास्त्र परिभाषा कोष निर्मिती मंडळाचे सदस्य, सिंचन आयोगाचे सदस्य,अनुशेष निर्मूलन समिती सदस्य इत्यादी समित्यावर प्रतिनिधित्व केले याचा आम्हाला सार्थ अभिमान आहे. दरवर्षी
अधिवेशन काळात तीन वेगवेगळ्या विषयावर चर्चा आयोजित केली जाते यावर्षी 'आर्थिक सिद्धांत आणि प्रायोगिकपद्धती" पंधरावा वित्त आयोग: केंद्र राज्य वित्तीय संबंधाची चिकित्सा' आणि 'डॉ. पंजाबराव देशमुख यांचे आर्थिक विचार' या तीन स्वतंत्र विषयावर चर्चा होणार आहे. परिषदेचे संस्थापक अध्यक्ष प्रा. नी. वि.सोवनी स्मृती व्याख्यानामध्ये. प्रा.डॉ. अजित अभ्यंकर ख्यातनाम अर्थविषयक अभ्यासक हे 'भारतातील बेरोजगारी निर्मूलन निश्चित दिशा आणि उपाय' याविषयावर पुष्प गुंफणार आहे. माजी अध्यक्ष प्रा. स. ह. देशपांडे स्मृती

व्याख्यानामध्ये दि. ७ नोव्हेंबर २०२२ रोजी डॉ. भालचंद्र मुणगेकर ख्यातनाम अर्थतज्ञ, माजी कुलगुरु तथा माजी राज्यसभा सदस्य हे ' भारतातील वाढत्या आर्थिक विषमतेचे आव्हानः स्वरुप, व्याप्ती , परिणाम आणि उपाय ' या विषयावर तर सुप्रसिद्ध अर्थतज्ञ व साहित्यीक डॉ. आशुतोष रारावीकर ' शास्त्र अर्थपूर्ण जीवनाचे ' या विषयावर पुष्प गुंफणार आहेत. मी आपणा सर्वासाठी ही मोठी उपलब्धी समजतो.

याशिवाय अधिवेशनाच्या काळातील उत्कृष्ट शोधनिबंध सादरीकरण यास. प्रा. ग. प्र. पिंपरकर पारितोषिक , प्रा. कांतीभाई ठक्कर ऋणमुक्ती प्रतिष्ठानचे डॉ. अमर्त्यसेन पारितोषिक , विद्यार्थ्यांकरीता डॉ. ज. फा . पाटील पारितोषिक, महिलाकरीता श्रीमती पद्मजा गंधे पारितोषिक देऊन गौरविण्यात येते. संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ अमरावती पदव्युत्तर अर्थशास्त्र विभागातून प्रथम येणाऱ्या विद्यार्थ्यांना दरवर्षी स्व. प्रा. भास्कर ढाले स्मृती पारितोषिक देण्यात येते. परिषदेच्या वतीने व विविध महाविद्यालयाच्या सहकार्याने संपूर्ण वर्षभर विविध उपक्रम राबविण्यात येतात यावर्षी २०२२-२३ मध्ये डॉ. शंकर मोडक पुरस्कृत व्याख्यान दि० १२ सप्टेंबर २०२२ रोजी मुळजी जेठा महाविद्यालय, जळगांव (खान्देश) येथे संपन्न झाले. यावेळी डॉ. बाळासाहेब पाटील, पनवेल यांचे 'भारतातील पाण्याची उपलब्धता आणि नियोजनाचे प्रश्न' या विषयावर व्याख्यान झाले. स्व. जमनालाल बजाज उपक्रम स्व. नारायणराव काळे स्मृती मॉडेल कॉलेज, कारंजा (घाडगे) जि. वर्धा येथे संपन्न होवून ' गांधी, आजचे वास्तव व मी '

या विषयावर प्राचार्य सुषमा शर्मा यांचे व्याख्यान दि. २० सप्टेंबर २०२२ रोजी संपन्न झाले.दि.२३सप्टेंबर २०२२ रोजी भाऊसाहेब ना. स. पाटील साहित्य व मु. फि. मु. अ.वाणिज्य महाविद्यालय, धुळे येथे धुळे व्याख्यानमाला संपन्न झाली. यावेळी ' सूक्ष्म व लघुउद्योगांच्या माध्यमातून उद्योजकतेची संधी' या विषयावर सीए .जी. बी. मोदी यांचे व्याख्यान झाले. तसेच पत्रपंडित पां. वा. गाडगीळ उपक्रम जीएस कॉलेज खामगाव जि. बुलढाणा आणि डॉ.सुधा मोकाशी उपक्रम स्व. बिंदू रामराव देशमुख कला, वाणिज्य महिला महाविद्यालय, नाशिक रोड येथे आयोजित करण्याचे निश्चित झाले आहे. भारतीयार्जीत नोबेल पुरस्कार स्मृती परिसंवाद सुद्धा प्रस्तावित असून जवळजवळ परिषदेचे सर्वच उपक्रम यशस्वीपणे संपन्न होत आहे याचा अध्यक्ष म्हणून मला मनस्वीः आनंद आहे.

परिषदेची स्वतंत्र वेबसाईट असावी ही आपणा सर्वांची अनेक वर्षापासूनची इच्छा दि. ५ सप्टेंबर २०२२ या ' शिक्षक दिनी' पूर्ण झाली असून तिचे आपणा सर्वांच्या सेवेत http://marathiarthshatraparishad.com या नावाने संकेतस्थळाचे लोकार्पण करण्यात येऊन 'अर्थसंवाद' हे त्रैमासिक उपलब्ध करून देण्यात आले. तसेच मराठी अर्थशास्त्र परिषदेच्या आजीव सदस्यांना आजीव सदस्य असल्याबाबतचे प्रमाणपत्र लिंकद्वारे उपलब्ध करून देण्याचा मानस आहे. परिषदेच्या कार्यालयाची स्वतंत्र इमारत व्हावी यादृष्टीने प्रयत्न सुरु आहे. त्यामध्ये यश येईलच. आपण मात्र परिवारातील सदस्य म्हणून इमारत निधी उभारणीस हातभार लावावा ही अपेक्षा आहे.

अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनाला शासनाकडून दरवर्षी आर्थिक मदत दिली जाते त्याच धरतीवर मराठी अर्थशास्त्र परिषदेला शासनाचे वतीने किमान पाच लाख रुपये अनुदान म्हणून मिळावी यासाठी पत्रव्यवहार करण्यात येईल असे आश्वासित करतो . तसेच महाराष्ट्र विधान मंडळाच्या अर्थसंकल्पीय अधिवेशनाचे कामकाज बघण्यासाठी व त्याचा अभ्यास करण्यासाठी अर्थशास्त्र पदव्युत्तर विद्यार्थ्यांना आणि प्रत्येक विद्यापीठातून एका प्रभारी प्राध्यापकाला उपस्थित राहता यावे याकरीता मी स्वतः बदलापूर येथील ३४ व्या अधिवेशनात ठराव मांडून शासनाकडे पाठपुरावा केला होता त्यानुसार शासनाने अशा उपक्रमास अनुमती दिली परंतु खर्चाची आर्थिक तरतूद केली नाही मी चंद्रपूर येथील ४२ व्या अधिवेशनात तत्कालीन अर्थमंत्री यांना निवेदन दिले होते त्यांनी सकारात्मकता दाखविली परंतु अद्यापपावेतो हा उपक्रम सुरू झाला नाही त्यासाठी सुध्दा प्रयत्न करून ते प्राप्त होईल अशी अपेक्षा आहे. ४५ व्या वार्षिक अधिवेशनाची जबाबदारी स्वीकारल्याबद्दल जालना एज्युकेशन सोसायटीचे व्यवस्थापन मंडळ, महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. शिवनारायण बजाज, प्रशासकीय अधिकारी डॉ. जे. डी.काबरा, स्थानिक कार्यवाह आणि माझे अतिशय प्रिय मित्र डॉ. दिलीपराव अर्जुने, अर्थशास्त्र विभाग प्रमुख, त्यांचे महाविद्यालयातील सर्व सहकारी प्राध्यापक, शिक्षकेत्तर कर्मचारी आणि विद्यार्थी मित्र -

मैत्रिणी असे सर्वच प्रत्यक्ष व अप्रत्यक्ष मदत करणारे घटक अभिनंदनास पात्र आहेत. परिषदेचा कार्यवाह - खजिनदार म्हणून मी २०१४ ते २०२० पर्यंत कार्य केले आहे त्याबद्दल मी समाधानी आहे. कारण आपणां सर्वांच्या प्रेमामुळेच मी मराठी अर्थशास्त्र परिषदेचा अविरोध अध्यक्ष होऊ शकलो. इंडियन इकॉनॉमिक असोसिएशनचा कार्यकारिणी सदस्य झालो. आपण दिलेले सहकार्य व सहयोग यातून मी मुक्त होऊ शकत नाही त्याबाबत धन्यवाद व आभार व्यक्त करणे मी माझे परम कर्तव्य समजतो. यापुढील काळातही आपला लोभ असाच राहू द्यावा आणि आपल्या सर्वांचे सहयोगाने हे अधिवेशन सर्वांगाने यशस्वी व्हावे याकरीता मनःपूर्वक शुभेच्छा !

आर. बी. भांडवलकर
अध्यक्ष
मराठी अर्थशास्त्र परिषद

शुभकामना संदेश

मा. श्री पुरुषोत्तम बगडिया
अध्यक्ष, जालना शिक्षण संस्था,
जालना।

जे.ई.एस. महाविद्यालय का अर्थशास्त्र विभाग मराठी अर्थशास्त्र परिषद का राष्ट्रीय अधिवेशन आयोजित कर रहा है यह सुनकर मुझे अत्यंत हर्ष हुआ। जालना जैसी उद्योग नगरी में इस प्रकार के आयोजनों की नितांत आवश्यकता है। आज उद्योग तथा व्यवसाय के क्षेत्र में जालना शहर देश के नक्शे पर अपनी एक विशेष, स्वतंत्र एवं विश्वसनीय छवि निर्माण कर रहा है। स्टील इंडस्ट्री तथा सीड इंडस्ट्री इस शहर की विशेष पहचान रही है। व्यवसाय के क्षेत्र में तो यह शहर आरंभ से ही इतिहास प्रसिद्ध है ही। देश की आर्थिक दिशा सुनिश्चित करने में अपना अल्प क्यों न हो योगदान यह शहर दे रहा है। वहीं उद्योग व्यवसायों के माध्यमों से देश की बेरोजगारी को भी कम करने में इस शहर की भूमिका को अधोरेखित किया जा सकता है। इस प्रकार के उद्योग व्यवसाय की दृष्टि से विकासशील इस शहर में इस प्रकार के आयोजनों की नितांत आवश्यकता को नकारा नहीं जा सकता। यह आयोजन हमारे ही महाविद्यालय के अर्थशास्त्र विभाग की ओर से राष्ट्रीय स्तर पर किया जा रहा है, निःसंदेह यह संस्था के लिए तथा महाविद्यालय के लिए गर्व एवं गौरव की बात है।

हमारे महाविद्यालय ने इस जिले के शैक्षिक पिछड़ेपन को दूर करने के लिए सबसे पहले उच्च शिक्षा के द्वार खोल दिए। इस महाविद्यालय की संस्थापना से ही ग्रामीण तथा शहरी क्षेत्रों के सभी विद्यार्थी उच्च शिक्षा का लाभ लेकर ऊँचे-ऊँचे पदों पर विराजित हुए हैं। यह महाविद्यालय जहाँ नियमित पाठ्यक्रमों की शिक्षा पूरी निष्ठा, समर्पण तथा निःस्वार्थ भाव से देता है वहीं विभिन्न विषयों पर मुक्त चर्चाओं का तथा वर्तमान विषयों पर गोष्ठी, संगोष्ठीयों का आयोजन भी निरंतर करता चला आ रहा है। इसलिए वैचारिक चिंतन-मंथन इस महाविद्यालय में होता रहा है। इसीलिए इस महाविद्यालय की छवि केवल शिक्षा प्रदान करने वाले संस्थान के रूप में ही नहीं अपितु वैचारिक धरोहरों संवृद्धि में भी अहम भूमिका निभाने वाले संस्थान के रूप में इस क्षेत्र में रही है।

आज अर्थशास्त्र के प्रासंगिक विषयों को लेकर हमारे महाविद्यालय में राष्ट्रीय परिषद का आयोजन किया जा रहा है। यह आयोजन अर्थशास्त्र विभाग की एक बहुत बड़ी उपलब्धि के रूप में निरंतर सम्मान से स्मरण किया जाने वाला आयोजन होगा। इस आयोजन में आने वाले सभी अतिथियों, प्रतिभागियों का मैं जालना शिक्षण संस्था तथा महाविद्यालय की ओर से हार्दिक स्वागत करता हूं तथा इस आयोजन के लिए मैं अपनी सहृदय शुभकामनाएं देता हूं।

धन्यवाद
तिथि : ६ नवंबर, २०२२

शुभकामना संदेश

मा. श्री श्रीनिवास जी भक्कड
सचिव, जालना शिक्षण संस्था,
जालना।

मराठी अर्थशास्त्र परिषद ने ४५ वें राष्ट्रीय अधिवेशन के आयोजन का सुअवसर हमारे महाविद्यालय के अर्थशास्त्र विभाग को प्रदान किया इसलिए मैं मराठी अर्थशास्त्र परिषद का आभार व्यक्त करता हूँ तथा अर्थशास्त्र विभाग का अभिनंदन करता हूँ। मैं आरंभ से ही अर्थ नियामक संस्था से संलग्न होने के कारण अर्थशास्त्र मेरी रुचि का विषय रहा है। किसी भी देश, संस्था, समाज तथा राष्ट्र के विकास में अर्थ अपनी अहम भूमिका निभाता है। भारतीय समाज व्यवस्था में धर्म, अर्थ, काम तथा मोक्ष इन चार पुरुषार्थों की कल्पना की गई है। क्रम की दृष्टि से देखा जाए तो मनुष्य के जीवन में इन चार पुरुषार्थों में धर्म के पश्चात दूसरा महत्वपूर्ण स्थान अर्थ को ही प्राप्त हुआ है। राष्ट्र के सम्यक विकास के लिए वर्तमान राष्ट्रीय तथा अंतरराष्ट्रीय आर्थिक स्थितियों, परिस्थितियों पर चिंतन, विचार, विमर्श, समीक्षा के लिए गोष्ठी-संगोष्ठीयों के आयोजनों की नितांत आवश्यकता होती है। इन आयोजनों के माध्यम से सुधि चिंतकों द्वारा की गई समीक्षा तथा चिंतन देश की आर्थिक नीतियों को निर्धारित करने में अपनी अहम भूमिका निभाता है तथा राष्ट्र के आर्थिक विकास को गति प्रदान कर सकता है। राष्ट्र के नीति निर्धारिक तत्वों की वैचारिक जमीन तैयार करनेवाले इन आयोजनों में से एक राष्ट्रीय स्तर का आयोजन हमारे महाविद्यालय के अर्थशास्त्र विभाग की ओर से किया जा रहा है यह हमारे लिए निश्चय ही गर्व एवं गौरव की बात है।

मराठी अर्थशास्त्र परिषद के राष्ट्रीय स्तर के इस आयोजन में अर्थशास्त्र के सैद्धांतिक विषयों के साथ – साथ प्रासंगिक विषयों पर भी चर्चा नियोजित एवं प्रस्तावित है। इस आयोजन में उपस्थित अर्थशास्त्र के सुधि अध्येता, चिंतक, अनुसंधाता तथा समीक्षक अपने विचार प्रस्तुत करने वाले हैं। निश्चय यहाँ प्रासंगिक विषयों पर की जानेवाली चर्चा, प्रस्तुत होनेवाले आर्थिक विचार तथा निष्कर्ष देश के विकास की नीति निर्धारण में सहायक साबित होंगे। जालना जैसी उद्योग, व्यवसाय के क्षेत्र में अपनी विशेष पहचान रखनेवाली नगरी में इस प्रकार के आयोजन से निश्चय ही यहाँ के उद्योग तथा व्यवसायीयों को निश्चय ही लाभ होगा इसमें कोई संदेह नहीं।

हमारे महाविद्यालय का अर्थशास्त्र विभाग अर्थशास्त्र के नियमित अध्यापन के साथ-साथ अनुसंधानात्मक गतिविधियों में भी सक्रिय है। आज के इस आयोजन का मूर्त रुप इसी सक्रियता का प्रमाण है। यह ज्ञानयज्ञ अविश्रांत जारी रहे इस प्रकार की मैं कामना करता हूँ। संस्था तथा महाविद्यालय की ओर से सभी अतिथियों तथा प्रतिभागियों का हार्दिक स्वागत करता हूँ तथा इस आयोजन को हार्दिक शुभकामनाएं प्रदान करता हूं।

धन्यवाद
तिथि : ६ नवंबर, २०२२

शुभेच्छा............

प्राचार्य डॉ. एस. बी. बजाज,
जे .ई एस. महाविद्यालय,
जालना,

जालना एज्युकेशन सोसायटीचे, आर. जी. बगडिया कला, एस.बी. लखोटिया वाणिज्य व आर. बेझंजी विज्ञान महाविद्यालय जालना मराठी अर्थशास्त्र परिषदेचे ४५ वे वार्षिक राष्ट्रीय अधिवेशन दिनांक ५, ६ आणि ७ नोव्हेंबर २०२२ रोजी आमच्या महाविद्यालयात आणि जालना या उद्योगनगरीत होत आहे. या निमित्ताने आपल्या सर्वांशी भेटण्याचा आणि संवाद साधण्याचा योग आला याचा मनस्वी आनंद होत आहे.

भारताचे पहिले पंतप्रधान स्व. पंडित जवाहरलाल नेहरू यांच्या प्रेरणेने १९५८ मध्ये सुरु झालेले हे महाविद्यालय. संत ज्ञानेश्वरांच्या ज्ञानेश्वरीतील 'ज्ञाने ज्ञेय गमिजे तो ज्ञान यजु' हे ब्रीदवाक्य घेऊन गेली ६४ वर्ष ज्ञानदाना बरोबर समाज प्रबोधनाचे कार्य करीत आहे. मराठवाड्यातील नावाजलेले हे महाविद्यालय गुणवत्तापूर्ण व दर्जेदार शिक्षण देण्यासाठी आणि जालन्याच्या शैक्षणिक विकासासाठी सदैव तत्पर आहे. ६४ वर्षाच्या उज्वल परंपरेची भूतकालीन शैक्षणिक, सामाजिक, सांस्कृतिक राजकीय वाटचाल करणाऱ्या या संस्थेच्या उभारणीत जालन्यातील व्यापारी, उद्योजक आणि सर्व क्षेत्रातील प्रेमीच्या अथक प्रयत्न व सहयोगातून हा वटवृक्ष उभा आहे. मला आनंद आहे सन १९५८ मध्ये भारताचे पहिले पंतप्रधान पंडित जवाहरलाल नेहरू यांच्या प्रेरणेतून स्थापन झालेल्या ऐतिहासिक अशा महाविद्यालयात संपन्न होणाऱ्या राष्ट्रीय अधिवेशनाचे यजमान पद भूषविण्याचा सन्मान आमच्या महाविद्यालयाला प्राप्त झाला.

आज कनिष्ठ महाविद्यालयात कला, वाणिज्य आणि विज्ञान या बरोबरच द्विलक्षी अभ्यासक्रम आणि किमान कौशल्यावर आधारित व्यावसायिक अभ्यासक्रम चालविले जात आहेत. वरिष्ठ महाविद्यालयात कला, वाणिज्य, विज्ञान, व्यवस्थापन आणि व्यावसायिक विद्याशाखेअंतर्गत अनुक्रमे बी.ए., बी.कॉम., बी.एस्सी., बीसीए, बी. व्होक., एम. ए. अर्थशास्त्र, एम. कॉम., एम.एस्सी. फिजिक्स, केमिस्ट्री, बॉटनी आणि इंडस्ट्रियल ऑटोमेशन इत्यादी अभ्यासक्रम या महाविद्यालयात चालवली जातात. तसेच डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठाच्या वतीने भौतिकशास्त्र, रसायनशास्त्र, वनस्पतीशास्त्र, प्राणीशास्त्र, वाणिज्य, अर्थशास्त्र व हिंदी विषयात संशोधन केंद्र व इतर विषयात संशोधन करण्यास संशोधन मार्गदर्शक या महाविद्यालयात उपलब्ध आहे. महाविद्यालयात संपन्न होणाऱ्या राष्ट्रीय अधिवेशनाचे यजमान पद भूषविण्याचा सन्मान आमच्या महाविद्यालयाला प्राप्त झाला प्राचार्य म्हणून मला त्याचा सार्थ अभिमान आहे. त्याबाबत मराठी अर्थशास्त्र परिषदेचे ४५ वे वार्षिक राष्ट्रीय अधिवेशनाचे सर्व पदाधिकारी यांचे धन्यवाद व आभार व्यक्त करणे मी माझे परम कर्तव्य समजतो. आपल्या सर्वांचे सहयोगाने हे अधिवेशन सर्वांगाने यशस्वी व्हावे याकरीता मनः पूर्वक शुभेच्छा!

धन्यवाद
तिथि : ५ नवंबर, २०२२

कार्यकारी मंडळ -२०२२-२३

प्रा.डॉ.आर.बी.भांडवलकर
अध्यक्ष

डॉ.अविनाश निकम
कार्याध्यक्ष

डॉ.मारोती तेगमपुरे
कार्यवाह-खजिनदार

डॉ.राहुल म्होपरे
संपादक-अर्थसंवाद

डॉ.बळवंत कोरे
सदस्य

डॉ.गणेश मांगडे
सदस्य

डॉ.माधव शिंदे
सदस्य

डॉ.राजाराम पाटील
सदस्य

डॉ.दयालू राठोड
सदस्य

डॉ.सुरेश ढाके
सदस्य

डॉ.मनिषकुमार कायरकर
सदस्य

प्राचार्य डॉ.संजय धनवटे
सदस्य

डॉ.विजय भोपाळे
सदस्य

डॉ.दिलीप अर्जुने
सदस्य

डॉ.वनिता चोरे
स्वीकृत सदस्य

डॉ.विलास खंदारे
स्वीकृत सदस्य

डॉ.दिलीप अर्जुने
स्थानिक कार्यवाह

प्राचार्य डॉ.रामकृष्ण टाले
विश्वस्त

डॉ.अजय दरेकर
विश्वस्त

डॉ.विकास सुकाळे
विश्वस्त


माजी अध्यक्ष व त्यांचा कार्यकाळ : मराठी अर्थशास्त्र परिषद
पहिले (१९७७-७८)
डॉ. नी.वि. सोवनी
दुसरे (१९७८-७९)
डॉ. वि.म. दांडेकर
तिसरे (१९७९-८०)
डॉ. श्री.आ. देशपांडे
चवथे (१९८०-८१)
डॉ. वि.वि. बोरकर
पाचवे (१९८१-८२)
डॉ. या.शि. महाजन
सहावे (१९८२-८३)
डॉ. आनंद नाडकर्णी
सातवे (१९८३-८४)
डॉ. स.ह. देशपांडे
आठवे (१९८४-८५)
डॉ. वि. बा. घुगे
नववे (१९८५-८६)
डॉ. ह.कृ. परांजपे
दहावे (१९८६-८७)
डॉ. रविन्द्र सबनीस
अकरावे (१९८७-८८)
डॉ. गि.सो. कल्याणकर
बारावे (१९८८-८९)
डॉ. नलिनी पंडित
तेरावे (१९८९-९०)
डॉ. रवीन्द्र दोशी
चौदावे (१९९०-९१)
डॉ. श्रीनिवास खांदेवाले
पंधरावे (१९९१-९२)
डॉ. ज.फा. पाटील
सोळावे (१९९२-९३)
डॉ. शशिकांत गंधे
सतरावे (१९९३-९४)
डॉ. व्यं.सु. पाटणकर
अठरावे (१९९४-९५)
डॉ. के. जी पठाण
एकोणवीसावे (१९९५-९६)
डॉ. शि.ना. माने
विसावे (१९९६-९७)
डॉ. भ.ग. बापट
एकविसावे (१९९७-९८)
डॉ. दि.व्यं. जहागीरदार
बाविसावे (१९९८-९९)
डॉ. र.पु. कुरुलकर
तेविसावे (१९९९-२०००)
डॉ. सु.दा. तुपे
चोविसावे (२०००-०१)
डॉ. भालचंद्र मुणगेकर
पंचविसावे (२००१-०२)
डॉ. अ.रा. पडोशी

माजी अध्यख व त्यांचा कार्यकाळ : मराठी अर्थशास्त्र परिषद

सव्विसावे (२००२-०३)

डॉ. संतोष दास्ताने

सत्ताविसावे (२००३-०४)

डॉ. सुर्यकांत जगदाळे

अठ्ठाविसावे (२००४-०५)

डॉ. मधुकर शिंदे

एकोणतिसावे (२००५-०६)

डॉ. सर्जेराव ठोंबरे

तिसावे (२००६-०७)

डॉ. दिलीप कदम

एकतित्तावे (२००७-०८)

डॉ. पी. बी. कुलकर्णी

बत्तिसावे (२००८-०९)



डॉ. व्ही.बी भिसे

तेहतिसावे (२००९-२०१०)

डॉ. विनायक देशपांडे

चौतसावे (२०१०-११)

डॉ. मुक्ता जहागीरदार

पस्तिसावे (२०११-१२)

डॉ. आ.गो. पुजारी

छतित्तावे (२०१२-१३)

डॉ. के. के. पाटील

सदतिसावे (२०१३-१४)

डॉ. जगन्नाथ पाटील

अडतिसावे (२०१४-१५)

डॉ. श्रीराम द. जोशी

एकोणचाळीसावे (२०१५-१६)

डॉ. सुहास आव्हाड

चाळीसावे (२०१६-१७)

डॉ. शिवाजीराव भोसले

एकचाळीसावे (२०१७-१८)

डॉ. रामचंद्र रसाळ

बेचाळीसावे (२०१८-१९)

प्रा. चारुदत्त गोखले

त्रेच्याळीसवे (२०१९-२०)

डॉ. रामदास माहोरे

चौरेच्याळीसवे(२०२० -२२)

डॉ. अनिल सूर्यवंशी

पंचेचाळीसवे (२०२२-२३)

डॉ.आर.डी.भांडवलकर

अनुक्रमणिका

अ. क्र	नाव	पृ. क्र
प्रथम सत्र		
1	प्रायोगिक पद्धती आणि 2021 चे अर्थशास्त्राचे नोबेले पारितोषिक डॉ. प्रशांत हरमकर	1-6
2	प्रायोगिक अर्थशास्त्र आणि खेळ सिद्धान्त: काही साक्षीपुरावे डॉ. विशाल चंद्रशेखर बेलुरे,	7-14
3	अर्थशास्त्रात प्रयोगात्मक पद्धतीची उपयुक्तता डॉ. समित माहोरे	15-23
4	अर्थशास्त्रीय प्रायोगिक पद्धती आणि उपभोक्त्याच्या वर्तनाचे विश्लेषणात्मक अध्ययन..... डॉ.विनोद आत्माराम नन्नवरे	24-34
द्वितीय सत्र		
5	पंधरावा वित्त आयोग : केंद्र राज्य वित्तीय संबंधांची चिकित्सा प्रा. डॉ. रमेश जानकिराम इंगोले	36-42
6	पंधराव्या वित्त आयोगाचा अहवाल आणि महाराष्ट्राच्या आर्थिक स्थितीचा आढावा डॉ. सुनिल अण्णा गोरडे	43-47
7	मराठवाड्यातील ग्रामीण स्थानिक स्वराज्य संस्थेच्या आर्थिक विकासात १५ व्या केंद्रीय वित्त आयोगाची भूमिका : एक अभ्यास डॉ. एस. एल. मेढे	48-54
8	पंधराव्या वित्त आयोगाच्या शिफारसींचे विश्लेषण डॉ. डी. एस. गुर्जर	55-59
9	पंधरावा वित्त आयोग ; एक चिकित्सक आभ्यास डॉ. सुरेखा भागुजी भिंगारदिवे	60-63
10	पंधराव्या वित्त आयोगातून परभणी जिल्हा परिषदेस प्राप्त झालेल्या निधीचे अध्ययन डॉ.नासिकेत जी.सूर्यवंशी	64-68
11	१५वा वित्त आयोग आणि केंद्र व राज्य वित्तीय संबंध डॉ.सचिन भास्कर कुंभार, डॉ.राजेन्द्रकुमार गव्हाळे	69-73
12	पंधरावा वित्त आयोग : केंद्र राज्य वित्तीय संबंधाची चिकित्सा डॉ.पांडुरंग एन. डापके,	74-80
13	केंद्र व राज्य सरकारेवित्तीय संबंध आणि वित्त आयोग प्रा. डॉ. सानप गोरक्षनाथ कचरू, प्रा. काळे निलम निवृत्ती	81-90
14	पंधरावा वित्त आयोग प्रा. डॉ. कृष्णा शंकर शहाणे	91-93
15	१५ वा वित्त आयोग अहवाल (२०२१-२०२६) - अनुदाने आणि शिफारशी यांचा विश्लेषणात्मक अभ्यास	94-101

	मार्गदर्शक - प्रा. डॉ. गोरक्षनाथ सानप	
16	पंधरावा वित्त आयोग प्रा. सुभाष रामचंद्र भोसले	102-106
17	१५ वा वित्त आयोगआणि स्थानिक स्वराज्य संस्थांना निधी वाटपाच्या निकषांची मिमांसा माधव शिंदे	107-114
18	सामाजिक योजनामध्ये 15 व्या वित्त आयोगाची भूमिका संशोधक विद्यार्थी	115-118
तृतीय सत्र		
19	डॉ. पंजाबराव देशमुख यांचे कृषी क्षेत्रातील आर्थिक विचारातील योगदान प्रा.डॉ. मनोजकुमार ज्योतिराम गायकवाड, निलेश रविंद्र कोळी	120-125
20	डॉ.पंजाबराव देशमुख यांचे शेती आणि शेतकर्यांच्या आर्थिक विकास विषयक विचार डॉ. कुमुदिनी भाऊराव जोगी	126-130
21	डॉ. पंजाबराव देशमुख यांचे आर्थिक विचार डॉ. भोकसे उमेश चिंधु, डॉ. मोहन किसनराव चौधरी	131-136
22	डॉ. पंजाबराव देशमुख यांचे कृषी विषयक कार्य डॉ. विठ्ठल घीन मिने	137-142
23	डॉ. पंजाबराव देशमुख यांचे आर्थिक विचार - विशेष संदर्भ विदेशी कर्ज डॉ. विष्णु ब. पवार	143-146
24	डॉ. पंजाबराव देशमुख यांचे कृषी विषयक आर्थिक विचार प्रा. डॉ. संजय व्ही. भामरे	147-151
25	डॉ. पंजाबराव देशमुख देशमुख यांचे आर्थिक विचार डॉ. समित माहोरे, डॉ. रामदास य. माहोरे	152-158
26	पंजाबराव देशमुख यांचे आर्थिक विचार डॉ.जे.एस.इंगळे	159-163
27	डॉ. पंजाबराव देशमुख यांचे कृषी विषयक आर्थिक विचार डॉ.प्रमोदिनी नवले (कदम)	164-168
28	डॉ.पंजाबराव देशमुख यांचे शेतीविषयक तत्वज्ञान प्रा. किशोर गजानन सुतार, प्रो. (डॉ.) अनिलकुमार कृष्णाराव वावरे	169-176
29	डॉ. पंजाबराव देशमुख यांचे आर्थिक विचार प्रा. डॉ. गादेकर पी. सी.	177-178
30	डॉ.पंजाबराव देशमुख यांचे आर्थिक विचार. प्रा. डॉ.ए जी सोनवणे	179-183
31	डॉ. पंजाबराव देशमुख यांचे आर्थिक विचार विशाल मोकाशे, प्रा. डॉ. दीपक शृंगारे	184-187
32	डॉ.पंजाबराव देशमुख यांचे कृषी व्यवसायातील योगदान प्रा.डॉ. एम. जी. हिंगे	188-191

33	डॉ. पंजाबराव देशमुखांचे आर्थिक विचार प्रा.डॉ.नागोराव के सोरे	192-195
34	बदलती भारतीय अर्थव्यवस्था आणि डॉ.पंजाबराव देशमुख यांचे आर्थिक विचार प्रा.संजय दादासाहेब ठिगळे	196-200
35	डॉ. पंजाबराव देशमुख यांचे कृषी विकासाबाबतचेविचार राहुल मोरेश्वर लभाने	201-206
36	अन्नधान्य उत्पादनात वाढ करून शेती - शेतकरी व राष्ट्र समृद्धीसाठी डॉ. पंजाबराव देशमुख यांचे कार्य व विचार डॉ. राहुल. शं. म्होपरे	207-214
37	<u>15 वा वित्त आयोग : केंद्र राज्य वित्तीय संबधाची चिकित्सा</u> जयदीप लिंबराज गायकवाड व डॉ.डी.व्ही. शिंदे	215-218
38	पंधरावा वित्त आयोग व केंद्र राज्य वित्तीय संबंधांचा चिकित्सात्मक अभ्यास प्रा.डॉ.एस.एम.भोसले, श्री. अर्जुन जगताप	219-227
39	पंधरावा वित्त आयोग केंद्र राज्य संबंधाची चिकित्सा प्रा .डॉ.दीपक एम. भारती, गोविंद रामराव काळे	228-231

प्रथम सत्र

प्रायोगिक पद्धती आणि 2021 चे अर्थशास्त्राचे नोबेले पारितोषिक

डॉ. प्रशांत हरमकर
विभाग प्रमुख, पदव्युत्तर अर्थशास्त्र विभाग,
या. द. व. देशमुख कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय, तिवसा, जि. अमरावती.
भ्रमणध्वनी : 9420633128
आजीवन सभासद क्रमांक (1379)

प्रस्तावना :-

श्रम बाजारामधील अनभवनिष्ठ योगदान व कार्यकारण संबंधाच्या विश्लेषणामध्ये संशोधकांनी विकसित केलेल्या कार्यपद्धतीच्या योगदानाकरिता 2021 चे अर्थशास्त्राचे नोबेल स्मृती पारितोषिक 11 ऑक्टोबर 2021 रोजी जाहीर करण्यात आले. अर्थशास्त्राचे 2021 चे नोबेल पारितोषिक डेव्हीड कार्ड, जोशुआ एयिस्ट आणि गाईडो इम्न्नेन्स, या तीन अर्थशास्त्रज्ञांना प्राप्त झाले आहे. रॉयल स्विडीश ॲकेडमी आफ सायन्स यांनी पारितोषिक जाहीर करताना म्हटले की, समाजासाठी महत्त्वाच्या प्रश्नांची उत्तरे शोधण्याकरिता नैसर्गिक प्रयोगाची (Natural Experiment) मदत झालेली आहे. नैसर्गिक प्रयोगाकडून कारण आणि परिणाम निष्कर्षासह स्पष्ट केले आहे. नोबेल पारितोषिक विजेत्यांनी दाखवून दिले की, समाजाच्या मध्यवर्ती प्रश्नासाठी नैसर्गिक प्रयोगाचा वापर केला जाऊ शकतो. किमान वेतन अणि स्थलांतरण श्रम बाजाराला प्रथावित करीत असतात. या संशोधनात्मक दृष्टीकोनाचा वापर करून कारणे व परिणामसह निष्कर्ष प्रस्तुत केले आहे. त्यांच्या अनुभवनिष्ठ संशोधनामुळे अर्थशास्त्रामध्ये क्रांतीकारक बदल घडून आले.

नैसर्गिक प्रयोग पद्धती :-

जर आपण चांगल्या प्रकारचा निर्णय तयार करीत असून तर आपल्या निवडीचा परिणाम समजवून घेणे आवश्यक आहे. याचे उपयोजन वैयक्तिक आणि सार्वजनिक पातळीवर धोरणकर्ते करीत असतात. तरूण वर्ग हा शैक्षणिक निवड करतो. त्याचा परिणाम त्यांच्या भविष्यातील वेतनावर होतो. आर्थिकसुधारणा घडवून आणण्याचा संबंध हा राज्यकर्त्यांशी असतो. आर्थिक सुधारणा, रोजगारा आणि वितरणाला प्रभावित करीत असतात. अशा प्रकारे विस्तृत प्रश्नाचा शोध घेत असताना कारण व परिणामाचे विश्लेषण केल्या जाते. पण प्रत्यक्षात असे विश्लेषण करणे सोपे नाही. कारण काय घडणार आहे याची माहिती आपणाला नसते.

यादृच्छिक प्रयोगाचा (Experiment Research) चा उपयोग करून कार्यकारण संबंध स्पष्ट केला जातो. नवीन औषधाच्या परिणामकारकतेचा शोध घेतला जातो. पण अनेक सामाजिक वाद प्रश्नाचा शोध घेण्याकरिता यादृच्छिक प्रयोग पद्धती पुरेशी नाही. याकरिता समाजातील अनेक वाद प्रश्नांची उत्तरे शोधण्याकरिता नैसर्गिक प्रयोगाचा (Natural Experiment) वापर केला आहे. संस्थाचे निरामन किंवा धोरणात्मक बदलाकरिता नैसर्गिक प्रयोगावर भर दिलेला आहे. डेव्हीड कार्ड यांनी श्रम अर्थशास्त्रातील मध्यवमर्ती प्रश्नांचे विश्लेषण नैसर्गिक प्रयोगाद्वारे केले आहे. जसे किमान वेतन, स्थलांतरण आणि शिक्षणाचा काय परिणाम घडून आला यामुळे पारंपरिक ज्ञानाला आव्हान आणि संशोधनामध्ये पुढाकार घेण्यात आला आहे.

नैसर्गिक प्रयोगाचा उपयोग विविध प्रकारे केला जातो. नोबेल विजेत्यांनी नैसर्गिक प्रयोगाचा वापर करून निष्कर्षासह कार्यकारण संबंध स्पष्ट केला आहे. ही आमुलाग्र बदल घडवून आणणारी चौकट आहे. याकरिता संशोधकांनी अनुभवनिष्ठ संशोधन पद्धतीचा उपयोग केला आहे. महत्त्वाचा प्रश्न समाज आणि तरूण

वर्गाच्या भविष्याच्या दृष्टिकोनातून असतो. जर दीर्घकाळ शिक्षण घेण्यामध्ये घातला तर त्या व्यक्तीला किती उत्पन्न मिळेल? या प्रश्नाच्या उत्तराचा शोध घेत असताना त्याच्या समंकाकडे (Data) पहावे लागते. उत्पन्नाचा संबंध हा शिक्षणाशी आहे. जर लोकांनी अधिक काळ शिक्षण घेण्याकरिता व्यतीत केलातर लोकांचे उच्चतम उत्पन्न राहील का? समजा एका व्यक्तीचा जन्म 1930 मध्ये अमेरिकेमध्ये झाला आहे. जर त्याने शिक्षणामध्ये अधिकचे एक वर्ष व्यतीत केले तर त्याचे उत्पन्न 7 प्रतिशतने वाढलेले दिसून आले. 12 वर्ष शिक्षण घेणाऱ्याचे उत्पन्न 11 वर्ष शिक्षण घेणाऱ्या लोकांपेक्षा 12 प्रतिशतने जास्त होते. 11 वर्ष शिक्षण घेणाऱ्यांपेक्षा 16 वर्ष शिक्षण घेणाऱ्यांचे उत्पन्न जास्त होते. याचा अर्थ शिक्षणामध्ये जास्त कालवधी व्यतीत केल्यास उत्पन्न वाढते का? अनेक बाबतीत दिसून आले की, जे लोक हुशार असतात ते काम करून आपले अध्ययन सुरू ठेवतात. म्हणजे त्यांना जास्त उत्पन्न मिळत नाही. ज्यांना भविष्याकडून जास्त उत्पन्न प्राप्तीची अपेक्षा असते. ते जास्त काळ शिक्षणामध्ये व्यतीत करतात.

किमान वेतन आणि रोजगार :-

जोशुआ एग्रिस्ट यांनी नैसर्गिक प्रयागाचा उपयोग सक्षम मानला आहे. त्यांनी अधिकाराने शिक्षण व उच्चतम उत्पन्न यामधील संबंध प्रस्थापित केला आहे. शिक्षणातील ज्यादा वर्ष घालविण्याचा परिणाम उत्पन्न वाढविण्यावर घडून येतो. यामुळे शिक्षण व उत्पन्न यामध्ये संघटन आहे. उच्च शिक्षण हे उच्च उत्पन्न प्राप्तीकरिता सबळ कार्यकारण संबंध प्रस्तुत करते. म्हणजेच शिक्षणामध्ये ज्यादा वर्ष व्यतीत करण्याचा धनात्मक परिणाम उत्पन्नावर होत असल्याचे स्पष्ट केल आहे.

जेव्हा किमान वेतन असते तेव्हा न्युनतम रोजगार असतो. कारण व्यावसायिकांसाठी वाढता वेतन खर्च असतो. अनेक अभ्यासामध्ये असे आढळू आले की, किमान वेतन आणि रोजगार यामध्ये ऋणात्मक सहसंबंध असतो. याचा वास्तविक अर्थ असा की, उच्चतम किमान वेतन हा उच्चतम बेरोजगारांमध्ये पुढाकार घेतात. यामध्ये उलट कार्यकाराण संबंध असतो हा वाद प्रश्न आहे. श्रमिकांकरिता न्यूनतम वेतन दर असतील तर बेरोजगारी वाढेल. म्हणून किमान वेतन दर वाढण्याची मागणी होतो.

किमान वेतन दर वाढण्याचा रोजगारावर कसा परिणाम घडून येतो. याचा शोध डेव्हीड कार्ड आणि त्याच्या सहकारी यांनी घेतला आहे. याकरिता नैसर्गिक प्रयोगाचा वापर त्यांनी केला आहे. 1990 च्या दशकांमध्ये किमन प्रतिताशी वेतन दर न्युजर्सी मध्ये 4.25 डॉलर वरून 5.05 डॉलर पर्यंत वाढविले होते. याचे अध्ययन केले असता वेतन वाढीनंतर न्युजर्सी मध्ये काय घडले? या प्रश्नाचे खात्रीलायक उत्तर देता येत नाही. डेव्हीड कार्ड म्हणतात की, शेजारील पेनसिलव्हिया राज्यामध्ये काय बदल झाले? या प्रश्नाचा वेध घेतला तर असे आढळून आले की, दोन्ही राज्यामध्ये भिन्नता आहे. मात्र श्रम बाजार समांतरपणे गुंतला आहे. अगदी सिमेजवळचा म्हणून न्युजर्सी आणि पेनसिल्व्हेनिया या दोन राज्याचे रोजगार परिणामाच्या दृष्टिकोनातून अध्ययन केले आहे. श्रम बाजार समांतर असताना सिमेच्या एका बाजूला (न्यूजर्सी) किमान वेतन दरामध्ये वाढ केली तर सिमेच्या दुसऱ्या बाजूला (पेनसिलव्हेनिया) वेतनामध्ये वाढ होते का? यामध्ये आर्थिक घटकाचे विश्वसनीय कारण दिसून येत नाही. याचाच भाग म्हणून जेव्हा किमान वेतन दर वाढतात तेव्हा सिमेच्या दुसऱ्या बाजूला असणाऱ्या क्षेत्रातील रोजगार भिन्न प्रकारे प्रभावित होतो. रोजगाराच्या संख्येमध्ये बदल घडून येतो. किमान वेतन दर पेनसिलव्हियामध्ये वाढण्याचा परिणाम घडून येतो.

तीस वर्षाच्या कालखंडाचा विचार केला तर डेव्हिड कार्डच्या नुसार किमान वेतन दर वाढण्याचे नकारात्मक परिणाम फार अल्प असतात. रोजगारावरील नकारात्मक परिणाम अनुपस्थित ठेवून विश्लेषण करता येते. किमान वेतन दर वाढले तर उत्पन्नाच्या वाढत्या व्ययाचे हस्तांतरण वस्तूच्या किंमतीकडे

केल्या जाते. मागणीमध्ये कपात होणार नाही अशा पद्धतीने वस्तूच्या किंमतीमध्ये वाढ होते. स्थानिक श्रम बाजाराचा भर हा न्यूनतम वेतन दर बाळगण्यावर असतो. जर किमान वेतन दर वाढले तर आधिक्याने लोकांना काम मिळाले असा त्याचा अर्थ होतो. रोजगार वाढण्यामध्ये पुढाकार घेतला जातो. जो किमान वेतन दराला प्रभावित करतो. डेव्हिड कार्डच्या संशोधनामुळे श्रम बाजाराच्या समजूतीमध्ये सुधारणा झाल्या आहे.

नोबेल पारितोषिक विजेत्यांनी 1990 च्या दशकामध्ये महत्त्वाच्या प्रश्नांची संभाव्य उत्तरे शोधून काढली आहे. नैसर्गिक प्रयोगामध्ये कारण आणि परिणामाचा उपयोग केला आहे. यामधून प्रोत्साहन आणि सामर्थ्य संशोधनाला प्राप्त झाले आहे. जोशुआ एग्रिस्ट आणि गुईडो इम्नेन्स यांनी नैसर्गिक प्रयोग पद्धतीचे अंतरंग स्पष्ट केले आहे. तर डेव्हीड कार्ड यांनी या दृष्टिकोनाचा वापर संशोधनामध्ये केला आहे. यामुळे महत्त्वपूर्ण प्रश्नामध्ये डेव्हीड कार्डला पुढाकार घेता आला आहे. यामुळे संशोधनाकरिता सुसंगत चौकट निर्माण झाली आहे. यामधून मिळालेल्या परिणामाचे निर्वचन करता येते. पारितोषिक विजेत्याच्या संशोधनामुळे सामाजिकशास्त्रे मधील अनुभवनिष्ठ संशोधन क्रांतीकारक ठरले आहे. महत्त्वपूर्ण प्रश्नाची उत्तरे शोधण्याकरिता संशोधकाची क्षमता सुधारली आहे.

डेव्हिड कार्ड यांचे योगदान :-

डेव्हिड कार्ड यांनी Industrial and Labour Relation Review या परिसंवादामध्ये (1992) New Minimum Wages Research हा संशोधन पेपर प्रसिद्ध केला. यामध्ये त्यांनी निष्कर्ष काढला की, किमान वेतनाचा रोजगारावर होणाऱ्या परिणामामध्ये तफावत आहे. याकरिता काल-श्रेणी संमकाचा (Time Series Data) उपयोग करण्यात आला. कॅलिफोर्नियामध्ये रोजगार आणि वेतन यांचे तुलनात्मक अध्ययन करीत असताना असे दिसून आले की, 1988 मध्ये किमान वेतन दर 27 प्रतिशतने वाढले होते. साम्य असणाऱ्या राज्याची तुलना केली असताना राज्याच्या किमान वेतन धोरणामध्ये बदल झाला नव्हता. इतर राज्याशी कॅलिफोर्नियाची तुलना केली असता कॅलिफोर्नियामध्ये 10 प्रतिशतने वेतन दरामध्ये वाढ झाली होती. यावरून कॅलिफोर्नियामध्ये वेतनात वाढ घडत असल्याचे स्पष्टपणे दिसून आले. किशोरावस्थेतील (teenagers) लोकांच्या रोजगारामध्ये घसरण घडून येत असल्याचा पुरावा नव्हता. कॅलिफोर्नियामध्ये आधिक्याने रोजगार-लोकसंख्या अनुपात इतर राज्याच्या तुलनेत 4 प्रतिशतने वाढला होता. भिन्नतेमधील वेगळेपणा (difference in differences - DID) संशोधन रचनेच्या नुसार श्रमिकाचा सहभाग दर वाढला होता.

कार्डने वास्तव परिस्थिती लक्षात घेऊन राष्ट्रीय पातळीवर किमान वेतनामध्ये झालेल्या बदलाचा परिणाम विविध राज्यावर कसा झाला याचे विश्लेषण केले आहे. राष्ट्रीय पातळीवर किमान वेतन दर ठरवण्याचा परिणाम प्रत्येक राज्यावर होत असतो. अमेरिकन संघराज्यामध्ये 1990 मध्ये किमान वेतन दर वाढलेले असताना काही दक्षिणेकडील राज्यांमध्ये 50 प्रतिशत किशोरावस्थेतील लोक प्रभावित झाले. केवळ 5 प्रतिशत लोक न्यू-इंग्लंडमधील प्रभावित झाले. कार्डने निष्कर्ष काढला की, राज्यामध्ये वेतन दर वाढत असताना किशोर वर्ग मोठ्या प्रमाणात प्रभावित होत असल्याचे दिसून आले. तरीसुद्धा रोजगार-लोकसंख्या अनुपातामध्ये बदल घडून आला नाही.

कार्डने वास्तव परिस्थिती प्रस्तुत करण्याकरिता पॅनल संमकाचा (Panel Data) उपयोग केला. पॅनल संमक नेहमीच स्पष्ट असतात असे नाही. का वर काही राज्य किमान वेतनामध्ये वाढ करतात तर काही राज्य किमान वेतनामध्ये वाढ करीत नाही. राज्य कडकपणे किमान वेतन धोरणाची अंमलबजावणी करून श्रम बाजार धक्क्याना प्रस्तुत करतो अथवा याउलट परिस्थिती असू शकते. आदर्शपणे रोजगार

संभाव्यता स्थिर ठेवायची आहे. केवळ किमान वेतनामध्ये बदल घडून येतो. याला स्पष्ट करण्यासाठी कार्ड आणि त्याच्या सहकार्याने दोन जवळच्या प्रदेशाची तुलना केली आहे. दोन राज्यामधील भिन्न किमान वेतन धोरणे प्रस्तुत केली आहे. या कल्पनेला लागू करताना दोन जवळच्या प्रदेशांना समांतर आर्थिक धक्के बसलेले आहे. एका क्षेत्राचा उपयोग हा इतरांसाठी प्रतिवास्तव आहे.

कार्ड आणि त्याच्या सहकाऱ्यांनी केलेल्या अध्ययनाचा परिणाम होऊन न्यूजर्सी मधील किमान वेतनामध्ये वाढ घडून आली होती. न्यूजर्सी मध्ये एप्रिल 1992 ला किमान वेतन दरामध्ये 4.25 डॉलर प्रति तास वरून 5.05 डॉलर प्रतितास वाढ घडून आली. न्यूजर्सीमधील हा उच्चतम किमान वेतनाचा दर होता. पूर्व पेनसिलव्हियाच्या तुलनेत न्यूजर्सीमध्ये किमान वेतनामध्ये वाढ घडून आली होती. किमान वेतन धोरणामध्ये बदल होण्यापूर्वी दोन्ही राज्यामध्ये वितरण समांतर पहायला मिळत होते. किमान वेतन धोरणामध्ये बदल झाल्यानंतर न्यूजर्सीच्या उपहारगृहामध्ये किमान वेतन देय ठरले. सरासरीने पेनसिलव्हियाच्या तुलनेत न्यूजर्सी मधील वेतनामध्ये वाढ 11 प्रतिशतने झाली होती. यामुळे रोजगार प्रभावित झाला. न्यूजर्सी आणि पेनसिलव्हियामध्ये रोजगारात बदल घडून आला. पेनसिलव्हियामध्ये रोजगारात घसरण आढळून आली तर न्यूजर्सीमध्ये रोजगारात किरकोळ वाढ घडून आली. किमान वेतन वाढण्याचा परिणाम म्हणजे रोजगारात कपात घडून येते असा पुरावा मिळाला नाही. न्यून वेतन दर असणाऱ्या उपहारगृहामधील रोजगार घसरणीचा संबंध उच्च वेतन दर असणाऱ्या उपहारगृहाशी आहे का? मात्र असा आकृतीबंध असल्याचे संमकावरून सिद्ध करता येत नाही.

स्थलांतरण आणि श्रम बाजार:-

स्थलांतरण घडून येण्याचा परिणाम श्रम बाजाराला पुर्नबळ देतो का? डेव्हिड कार्ड याच्या अध्ययनानुसार स्थलांतरणाचा परिणाम गोंधळून टाकणारा आहे. अमेरिकेच्या इतिहासामधील अद्वितीय प्रसंग म्हणजे मेरिल बोटलिफ्टचा आहे. एप्रिल 1980 मध्ये फिडेल कॅस्ट्रो यांनी घोषित केले की, क्युबा मधील काही लोकांची इच्छा आहे की, अमेरिकेमध्ये स्थलांतरण करून पोर्ट ऑफ मेरिलमध्ये राहण्याची आहे. मे ते सप्टेंबर 1980 दरम्यान एकूण 1,25,000 लोक क्यूबामधून निघून गेले. यापैकी 50 प्रतिशत लोक कायमस्वरूपी मियामीमध्ये स्थलांतरीत झाले. परिणामत: मियामीमधील श्रमिक संघ वाढून 7 प्रतिशतवर पोहोचला होता. कार्ड यांनी वेतन आणि रोजगाराचे अध्ययन मियामीमधील श्रमिक बाजाराचे केले. सोबतच मेरिल बोटलिफ्टचे तुलनात्मक अध्ययन केले. मेरिल मधील हा प्रसंग सर्वार्थाने नैसर्गिक प्रयोगाचा होता.

मीयामीमध्ये प्रचंड प्रमाणात नवीन आणि अकुशल श्रमिकांचे स्थलांतरण घडून आले. मात्र कार्डला पुरावा मिळाला नाही की, गैर क्युबा कामगाराच्या न्यून कौशल्यामुळे रोजगार आणि वेतनदर प्रभावित झाले. याचे स्पष्टीकरण कार्डने दोन प्रकारे दिलेले आहे. वेतन आणि रोजगार स्थलांतरणाला प्रतिक्रिया का देत नाही? पुराव्यावरून दिसून आले की, मीयामीमध्ये स्थानिक लोक आणि पूर्वी स्थलांतरित झालेले लोक आहेत. याचा परिणाम मीयामीमध्ये स्थलांतरणात कपात घडून आली होती. दुसरे मियामीला स्थलांतरणाचा इतिहास आहे. मियामी श्रम बाजार हा औद्योगिक संरचनेचा आहे. त्यामुळे कुशल स्थलांतरितांचा मोठा प्रवाह सामावून घेण्याची क्षमता या श्रम बाजारामध्ये आहे.

कार्डने नमूद केले आहे की, स्थलांतरित कायमस्वरूपी मियामीमध्ये वास्तव्यास आहे. यावरून डेव्हिड कार्ड यांनी स्पष्ट केले की, स्थलांतरणाची प्रवृत्ती ही पूर्वीच्या स्थलांतरणावर अवलंबून असून कायम वास्तव करण्याची आहे. पूर्वीच्या स्थलांतरणाच्या आकृतीबंधाचा उपयोग स्थलांतरण प्रवाहाचे साधन म्हणून झाला आहे. 1970 आणि 1980 च्या दशकाच्या दरम्यान स्थलांतरणांमध्ये बदल घडून आल्याचे अमेरिकेच्या

120 शहरांच्या अध्ययनावरून दिसून आले. या साधनात्मक चलाच्या अनुमानावरून स्पष्ट होते की, स्थलांतरणाचा पर्याप्त नकारात्मक प्रभाव हा स्थानिक वेतनावर होतो. मात्र रोजगार प्रभावहीन असतो.

कार्ड आणि त्याच्या सहकार्याच्या नुसार दोन प्रमुख तल स्थलांतरणाच्या अर्थशास्त्रामध्ये दिसून येतात. प्रथम संचाची मांडणी करून त्याचा उपयोग संकल्पनात्मक चौकटीमध्ये केला आहे. मूलभूतपणे हे प्रारूप मागणी बाजूचे आहे. जेव्हा स्थलांतरण घडून येते तेव्हा श्रम बाजाराला धक्के बसायला लागतात. यावरून स्थलांतरण वाढण्याच्या परिणामाचे विश्लेषण केल्या जाते. द्वितीय, स्थलांतरणाचा परिणाम अभ्यासण्यासाठी अभ्यासकांनी स्वतःचा दृष्टिकोन वापरला आहे. या स्थलांतरण सहभाग (Shift-Share) दृष्टिकोनाचे परिष्करण कार्ड यांनी केले आहे. प्रत्येक मानववंशीय गटाच्या पूर्वीच्या स्थलांतरणाच्या आकृतीबंधाचा उपयोग सामान्य अनुमान काढण्याकरिता केला जातो. शहरे आणि व्यवसायाकडे स्थलांतरणाचा प्रवाह असतो. या स्थलांतरण सहभाग दृष्टिकोनाचे उपयोजित व्यष्टी. अर्थशास्त्रामध्ये साधन म्हणून निर्मिती झाली आहे. या दृष्टिकोनाचा वापर स्थलांतरणाच्या अर्थशास्त्रामध्ये झाला आहे.

शिक्षणाची गुणवत्ता आणि रोजगार :-

कार्ड आणि त्याच्या सहकाऱ्यांनी 1990 च्या दशकामध्ये शाळेच्या गुणवत्तेचे परीक्षण केले. यावरून श्रम बाजारावरील परिणामाचे अध्ययन केले. शाळांच्या गुणवत्तेमध्ये बाह्य तफावती (Exogenous Variations) दिसून आल्या. येणाऱ्या काळात शाळांच्या संसाधनांमध्ये मोठ्या प्रमाणात गुंतवणूक करण्याची आवश्यकता कार्डने सुचविली आहे. विशेषतः दक्षिण अमेरिकेमधील शाळांमध्ये गुंतवणूक करण्याचे नमूद केले आहे.

कार्डच्यानुसार शाळेची गुणवत्ता श्रम बाजाराला प्रभावित करते. याचे चाचण्या घेऊन विश्लेषण करण्यात आले आहे. शाळेच्या गुणवत्तेमध्ये महत्त्वपूर्ण नवप्रवर्तने घडवून आणावी लागतात. त्याचा परिणाम व्यक्तीच्या सामर्थ्यावर अथवा कर्तृत्वावर घडून येतो. यामुळे व्यक्तिगत पातळीवर श्रम बाजाराचे यश अवलंबून असते. शाळेची गुणवत्ता उत्पन्न परताव्याला प्रभावित करीत असते. गुणवत्तापूर्ण शाळा श्रम बाजार परताव्याला सुधारत असतात. राज्याच्या पातळीवर शैक्षणिक गुणवत्ता आणि श्रम बाजार परताव्याचे मापन कार्डने केले आहे. राज्याराज्यादरम्यान संसाधनामधील तफावतीचे प्रतिबिंब लोकसंख्या आणि श्रम बाजाराच्या वैशिष्ट्यांवर दिसून येते. विविध राज्याची तुलना केली असता विविध राज्यांमधील संसाधन तफावती वाढताना दिसून येतात. व्यक्तिगत पातळीवर परीक्षण केले तर अलबामा आणि आयोवा मध्ये व्यक्तीच्या सामर्थ्य व कर्तृत्वामध्ये विविधता दिसून आली. त्याचा परिणाम व्यक्तीच्या परताव्यांवर होतो. शाळेच्या गुणवत्तेचा परिणाम हा परतावा वाढण्याला मदत करतो. असे अलबामा तसेच आयोवा मध्ये दिसून आले.

कार्ड आणि त्यांच्या सहकार्याच्या नुसार शाळेची गुणवत्ता तीन मापकावर अवलंबून असते. विद्यार्थी शिक्षक अनुपात, शिक्षकाचे वेतन आणि शाळेचे अंतर ही तीन मापके गुणवत्तेवर परिणाम करतात. अमेरिकेच्या दक्षिण भागामध्ये विद्यार्थी - शिक्षक अनुपात मोठ्या प्रमाणात घटत होता. काळ्या विद्यार्थ्यांसाठी शाळेची गुणवत्ता फार वेगळी होती. काळ्या विद्यार्थ्यांचे शैक्षणिक स्थिती सुधारत चालली होती. १९२० ते १९५० दरम्यान अमेरिकेतील दक्षिणेकडील राज्यांमधला शैक्षणिक सुधारणाचा संबंध हा गुणवत्तेशी होता का? याचा परिणाम काळ्या आणि गोऱ्या लोकांच्या परताव्यावर झाला का? शाळांच्या गुणवत्ता सुधारल्यामुळे परताव्यामध्ये वाढ झाली आहे. तर काळ्या आणि गोऱ्या माणसाच्या उत्पन्नामधील तफावत 1960 ते 1980 च्या दशकाच्या दरम्यान घटत गेलेली आहे.

समारोप :-

नोबेल विजेत्यांनी एकत्रितपणे कार्य करून पुढाकार अर्थशास्त्रीय संशोधनामध्ये घेतला आहे. याकरिता रचना आधारीत दृष्टिकोनाचा उपयोग केला आहे. यामुळे अत्यंत बदल घडून आले आहे. गेल्य तीस वर्षामध्ये अनुभवनिष्ठ संशोधन पद्धतीचे आचरण बदलले आहे. रचनात्मक आधारित दृष्टिकोनाचा उपयोग प्रामुख्याने प्रतिरूप अनुभवनिष्ठ संशोधनामध्ये होतो. मात्र हिताच्या प्रासंगिक परिणामांमध्ये तफावती असतात. प्रतिरूप अनुभवनिष्ठ तफावती या अनेक अनुभव तरतूदी कडून येऊ शकतात. यामध्ये निसर्ग, प्रशासकीय मर्यादा, संस्थात्मक निर्बंध आणि धोरणात्मक बदलाचा समावेश असतो. रचनात्मक आधारित दृष्टिकोनाची वैशिष्ट्ये गृहिताच्या उपयोगाबाबत स्पष्ट विधाने करतात. यामध्ये गृहिताची वैधता आणि प्रासंगिक परिणामाची ओळख पटविल्या जाते. अर्थशास्त्राचमध्ये या दृष्टिकोनाचे वर्चस्व आहे. इतर सामाजिक शास्त्रामध्ये देखील याचा विस्तार घडून आलेला आहे. परिणामत: नोबेल विजेत्यांनी प्रासंगिक प्रश्नाची उत्तरे शोधण्याची क्षमता वाढवलेली आहे. याला पर्याप्त स्वरूपात महत्त्व अर्थशास्त्र आणि सामाजिक धोरणांमध्ये प्राप्त झाले आहे. याचा लाभ समाजाला प्राप्त झाला आहे.

संदर्भ :-

1. हरमकर प्रशांत (2022) : अर्थशास्त्राचे 2021 चे नोबेल पारितोषिक : श्रम अर्थशास्त्र व कार्यकारण संबंधाच्या विश्लेषणाला बहाल, अर्थमिमांसा, खंड-14, अंक-1, जानेवारी-जून

2. हरमकर प्रशांत (2022) : अर्थशास्त्राचे 2021 चे नोबेल पारितोषिक, श्रम अर्थशास्त्र व कार्यकारण संबंधाच्या विश्लेषणाला, अर्थमीमांसा, जानेवारी-जून, खंड-14, अंक-१

3. Card D. (1990) : Impact of the MailBoatlift on the Miami Labour Market, Industrial and Labour Relations Review.

4. Card D (1995) : Earning, Schooling and Ability Revisited, Research in Labour Economics.

5. Card D. (2009) : Immigration and Integrity, American Economic Review.

6. www.nobelprize.com.

प्रायोगिक अर्थशास्त्र आणि खेळ सिद्धान्त: काही साक्षीपुरावे

(Experimental Economics and Game Theory : Some Evidences)

(डॉ. विशाल चंद्रशेखर बेलुरे, सहयोगी प्राध्यापक व अर्थशास्त्र विभागप्रमुख, शंकरराव चव्हाण महाविद्यालय, अर्धापूर, जि. नांदेड. आजीव सभासद क्र.: १२४७, भ्रमणध्वनी क्र.: ८३२९२६३८५४, ई-मेल: vcbelure@gmail.com)

प्रस्तावना :

प्रायोगिक अर्थशास्त्र ही उपयोजितअर्थशास्त्रीय संशोधनाची अगदी अलीकडे म्हणजे काही दशकांपूर्वी उदयास आलेली व सतत विकसित होत असलेली एक अत्यंत लोकप्रिय अशी संशोधन पद्धती आहे. प्रस्थापित अर्थशास्त्रीय सिद्धांतात प्रयोगशाळेतीलनियंत्रित प्रयोगांना क्वचितच महत्त्व दिले जात असे. त्यात वास्तव आर्थिक जगातील निरीक्षणांना अनन्यसाधारण महत्त्व दिले जात असे. सनातनी अर्थशास्त्रज्ञांनीप्रतिपादित केलेले आर्थिक सिद्धान्त हे शुद्ध स्वयंस्वार्थाने प्रेरित असलेल्या आणि असीम तर्कसंगत(Rational) निर्णय घेण्यास सक्षम असलेल्या(?) आर्थिक मानवाच्या(Homo Economicus) डोलाऱ्यावर उभे आहेत. अगदी सॅम्युअलसन आणि नॉर्डहॉस(१९८५) यासारख्या दिग्गज अर्थशास्त्रज्ञांनीदेखील आपल्या 'इकॉनॉमिक्स' या ग्रंथात, "अर्थशास्त्रज्ञ हे रसायनशास्त्रज्ञ किंवा जीवशास्त्रज्ञ यांच्याप्रमाणे नियंत्रित प्रयोग पार पाडू शकत नाहीत.कारण, ते त्यांच्यासारखे इतर महत्त्वाच्या घटकांना सहजपणे नियंत्रणात ठेवू शकत नाहीत."अशी नोंद केलेली होती.

शास्त्र म्हणून अर्थशास्त्राच्या सततच्या विकासात ही एक अडथळा ठरणारी बाब आहे, असे अनेकांना जाणवत होते. जोपर्यंत नियंत्रित प्रयोग केले जाऊ शकत नाहीत, तोपर्यंत आर्थिक सिद्धान्ताच्या चाचण्या मर्यादित राहतील. केवळ क्षेत्र आधारसामग्रीच्या (Field Data) आधारे एखाद्या सिद्धांन्ताचेपरीक्षण करून, त्यास स्वीकारणे किंवा नाकारने ही पद्धत संयुक्तिक ठरत नाही.प्रायोगिक अर्थशास्त्र या नावाने विकसित होणाऱ्या संशोधन पद्धतीच्या स्थापनेने या दृष्टिकोनाला अमूलाग्र आव्हान दिले आहे. नियंत्रितप्रयोगशाळेच्या परिस्थितीत संशोधक मानवी वर्तनाचा अभ्यास सुलभीकृत आणि शुद्ध स्वरूपातकरीत असतात.तसेच तेबाजार आणि आर्थिक आंतरक्रियाचे इतर प्रकार यांचे प्रतिरूपदेखील तयार करू शकतात. अशा प्रयोगांचे निष्कर्ष बाजार परिस्थितीमध्ये कितपत सामान्यीकृत केले जाऊ शकतात ते अद्याप वादात आहे. परंतु,सूक्ष्म आर्थिक वर्तनाशी संबंधित प्रयोगशाळेचे निष्कर्ष आर्थिक सिद्धान्तांच्या विकासाची महत्त्वपूर्ण माहिती देऊ शकतात ही धारणा मूलत: भौतिकशास्त्रातील लहान प्रमाणातील घटनांसंबंधी प्रयोगशाळेत प्रयोग करून काढलेल्या निष्कर्षांसारखीच (जसे मूल कण आणि उष्मागतीशास्त्रयांच्याशी संबंधित प्रयोगांवरून आपणास विश्व आणि पर्यावरणाच्यासंदर्भात महत्त्वपूर्ण माहिती मिळते) आहे. थोडक्यात, सनातनी अर्थशास्त्रीय विवेचनाच्या आधारस्थानी दीर्घकाळ साचलेला 'प्रयोगविरोधी' खेदपूर्ण विचार सुदैवाने आता भूतकाळात जमा झालेला असून सॅम्युअलसन आणि नॉर्डहॉस(१९९२) यांनी आपल्या उपरोक्त ग्रंथाच्या सुधारित आवृत्तीत नवीन व भिन्न मनोभूमिका स्वीकारून, "प्रायोगिक अर्थशास्त्र ही एक उत्तेजक नवी घडामोड आहे." अशी पुष्टी जोडलेली आहे. या दोन आवृत्त्यांमधील कालावधी हा दहा वर्षापेक्षा कमी असून या दरम्यानच्या काळात अर्थशास्त्रज्ञांनी नैसर्गिक शास्त्राप्रमाणे संशोधनाची प्रायोगिक चौकट उभी करण्यात यश मिळविले आहे. त्याहून अधिक महत्त्वाचे म्हणजे, अशा प्रयोगांद्वारे हाती लागलेल्या निष्कर्षांनाआधिकारिकस्वीकृती प्राप्त होत चालली आहे. आज उपयोजित अर्थशास्त्राच्या अनुभवाधिष्ठित संशोधन पद्धतीतील एक प्रामाणिक व महत्त्वाचे हत्यार संच(Tool Kit) म्हणून प्रायोगिक अर्थशास्त्रास मान्यता मिळालेली आहे.

प्रायोगिक अर्थशास्त्राची पार्श्वभूमी:

प्रायोगिक अर्थशास्त्राची व्याख्या व अर्थ हा प्रायोगिक संशोधन पद्धतीशी सुसंगतच असून, त्यात मानवाच्या वर्तनाचा अभ्यास केवळ गणितीय किंवा तार्किक प्रतिमानाच्या आधारे न करता, नियंत्रितप्रयोगशालेय चौकटीत केला जातो. अर्थशास्त्राच्या या अध्ययन पद्धतीतनियंत्रित अशा शास्त्रीय प्रयोगांद्वारे लोक विशिष्ट परिस्थितीत निवडी कशा करीत असतात यांची चाचणी केली जाते. थोडक्यात, प्रायोगिक अर्थशास्त्रात अर्थशास्त्रीयप्रश्नांचा अभ्यास करण्यासाठी प्रायोगिक संशोधन पद्धतीचे उपयोजन केले जाते.

प्रायोगिक अर्थशास्त्रीय संशोधन पद्धतीचे जनकत्व प्रसिद्ध अमेरिकन अर्थशास्त्रज्ञप्रोफेसरवर्नोनलोमॅक्स स्मिथ यांना दिले जाते. वास्तविकता अर्थशास्त्रात प्रायोगिक संशोधन पद्धतीचा अवलंब स्मिथयांच्याआधीही अनेकांनी केलेला आहे.उदा. चेंबरलिन यांनी १९४८ मध्ये 'पूर्ण स्पर्धे'च्या नवअभिजातसिद्धांन्ताची चाचणी प्रायोगिक पद्धतींद्वारे करण्याचा प्रयत्न केला होता. सन १९५९ मध्ये अर्थशास्त्रज्ञसोरमन आणि रेइनहार्टसेल्टन यांनी 'अल्पाधिकारी बाजारपेठे'त किंमत निर्धारण कशा पद्धतीने होते, यासंबंधी प्रायोगिक अध्ययन करणारे शोधनिबंध प्रकाशित केले होते. पुढे सेल्टन यांना सन १९८४ या वर्षी अर्थशास्त्रातील नोबेल पारितोषिकदेखील देण्यात आले. त्यांच्याच सोबत हे पारितोषिक विभागून देण्यात आलेले जॉन नॅश यांनी खेळ सिद्धांन्ताची भविष्यसूचक क्षमता प्रायोगिक आकृतिबंधाच्या चौकटीत अभ्यासण्याचा प्रयत्न केला. परंतु, या क्षेत्रातील मुख्य संशोधक म्हणून निःसंशयपणेप्रोफेसरवर्नोन स्मिथ यांचेच नाव घेतले पाहिजे. स्मिथ यांनी या क्षेत्रात अगदी तहह्यातपणे मोलाचे योगदान दिलेले असून त्यांनी या विषयावर अनेक शोधनिबंध व ग्रंथ प्रकाशित केलेले आहेत. तसेच अनेक व्याख्याने देत नवसंशोधकांना शिक्षित करून त्यांच्यासोबत संशोधनात सहयोगही नोंदविलाआहे. स्मिथ यांना त्यांच्या प्रायोगिक अर्थशास्त्रातील योगदानाबद्दल विशेषतः ''पर्यायी बाजार यंत्रणांच्या अध्ययनाचे साधन म्हणून प्रयोगशाळेतील प्रयोग प्रस्थापित केल्याबद्दल" सन २००२ चे नोबेल पारितोषिक बहाल करण्यात आले. पुढे सन २०१२ मध्ये अर्थशास्त्रज्ञ ॲल्विनरॉथ आणि लॉईडशॉप्ले यांना "स्थिर वाटपाच्या आणि बाजाररचनेच्याकार्यपद्धती संदर्भातील सिद्धान्त मांडणी केल्यामुळे", सन २०१९ मध्ये अभिजितबॅनर्जी, एस्थरडुफ्लो आणि मायकेलक्रेमर यांना "जागतिक दारिद्र्य निर्मूलनासाठी त्यांच्या प्रायोगिक दृष्टिकोनाच्या मांडणीबद्दल" तर, सन २०२० मध्ये रॉबर्ट विल्यम आणि पॉल मिलग्रोम यांना "लिलाव सिद्धांन्तातील सुधारणा आणि नवीन लिलाव रचनेविषयी" अर्थशास्त्रातील नोबेल पारितोषिकाने गौरविण्यात आले आहे. या सर्व संशोधनकर्त्यांच्या विवेचनात प्रायोगिक अर्थशास्त्र या हत्यार संचाचा वापर मोठ्या प्रमाणात करण्यात आलेला दिसून येतो.

खेळ सिद्धांन्ताचीपार्श्वभूमी:

'एखाद्या संघर्षपूर्ण किंवा स्पर्धात्मक परिस्थितीत सहभागी असलेल्या व्यक्ती किंवा संस्थांकडून आपल्या प्रतिस्पर्ध्यांवर वर्चस्व निर्माण करण्यासाठी व स्वतःचा जास्तीत जास्त लाभ किंवा कमीत कमी नुकसान करून घेण्यासाठी, कोणत्या प्रकारची तंत्रे वापरली जातील? कोणते डावपेच किंवा व्यूहरचना आखल्या जातील? यांचे गणितीय पद्धतीने विश्लेषण करणारे शास्त्र म्हणजे खेळाचे शास्त्र किंवा खेळ सिद्धान्त होय.' खेळ सिद्धान्ताचे रीतसर विवेचन प्रोफेसर जॉन फॉननॉयमन आणि ऑस्करमोर्गेन्स्टर्न यांनी 'थिअरी ऑफ गेम्स अँड इकॉनॉमिकबिहेवियर' या पुस्तकात सन १९४४ मध्ये केले. पुढे खेळ सिद्धांन्ताच्या विकासात जॉन नॅश, जॉन हरसानी, रेनहार्डसेल्टन, थॉमस शेलिंग, रॉबर्ट ऑमन, रॉजरमायर्सन, अल्विनरॉथ, लॉईडशॉप्ले, जीन टिरोलेइत्यादी अर्थशास्त्रज्ञांनी मोलाची भर घातली आहे.

खेळ सिद्धांन्तातप्रतिपादित करण्यात आलेल्या विविध खेळ प्रकारांचे परीक्षण करण्यासाठी प्रायोगिक अर्थशास्त्रीय संशोधन पद्धतीचा उपयोग केला असता अशा खेळांना प्रायोगिक खेळ (Experimental Games) असे म्हणतात. प्रस्तुत लेखातखेळ सिद्धांन्तातीलकैद्यांचापेचप्रसंग, निर्वाणीचा खेळ आणि हुकूमशहा खेळ या प्रसिद्ध तीन खेळांसंदर्भात विविध संशोधकांनी प्रायोगिक पद्धतीचा अवलंब करून जे साक्षीपुरावे सादर केले आहेत, त्यांचा आढावा घेण्याचा प्रयत्न केला आहे.

१) कैद्यांचापेचप्रसंग(**Prisoner's Dilemma**) :

यास कैद्यांसमोरील द्वंद्व किंवा कोडे असेदेखील म्हणतात. खेळ सिद्धांन्तासंदर्भातील ही संकल्पना प्राथमिक स्वरूपातमेरीलफ्लड आणि मेल्विन ट्रेशर यांनी सन १९५० मध्ये मांडली. पुढे सन १९९२ मध्ये अल्बर्ट ट्रकर यांनी तुरुंगात असलेल्या दोन कच्च्या कैद्यांचे एक उदाहरण तयार करून या खेळास मोठी प्रसिद्धी मिळवून दिली. परस्पर सहकार्य केल्यास दोन्ही व्यक्तींचा फायदा होणार असूनही, कोणती व्यक्ती कोणता निर्णय घेणार आहे? याविषयी एकमेकांना माहिती नसल्यामुळे आणि प्रत्येकजणस्वतःच्या तात्पुरत्या फायद्याचाच विचार करीत असल्यामुळे सर्वच खेळाडू जास्त फायद्याचे निर्णय घेऊ शकत नाहीत व परिणामी दोघांनाही काही प्रमाणात नुकसान सहन करावे लागते. असे या खेळातून स्पष्ट होते. कैद्यांचापेचप्रसंग हा खेळ मुळात एक 'दोन व्यक्ती असहकारीस्वरूपाचा खेळ(Two person non-cooperative game)' आहे. एक काल्पनिक उदाहरण घेऊन या खेळाचे स्पष्टीकरण पुढीलप्रमाणे देता येईल.समजा,पोलिसांनी एकाच गुन्ह्यातील दोन संशयित आरोपींना ताब्यात घेतलेले असते. परंतु,पोलिसांकडेत्यांच्याविरुद्ध सबळ पुरावे नसतात. त्यामुळे पोलीस दोघांपैकी एकाला माफीचा साक्षीदार करण्याचा पर्याय अवलंवतात. मात्र कोणत्या कैद्यास माफीचा साक्षीदार करावे? यासाठी एक शक्कललढविली जाते. दोन्ही आरोपींनातुरुंगातील वेगवेगळ्या खोल्यात डांबले जाते आणि त्यांचा संपर्क होणार नाही याची दक्षता घेतली जाते. त्यानंतर त्यांच्यापुढे त्यांनी केलेल्या गुन्ह्याच्या शिक्षेसंदर्भात 'कबुली जबाब देणे (Accept)'. किंवा 'गुन्हा केल्याचे नाकारणे(Deny)' अशा दोन्ही शक्यता लक्षात घेऊन वेगवेगळ्या शिक्षेचे पर्याय ठेवले जातात. हे पर्याय पुढील मेळ सारणीद्वारे(Payoff matrix) दर्शविले आहेत.

कैदी क्र. २

		कबूल	नाकबूल
कैदी क्र१	कबूल	५,५	०,१५
	नाकबूल	१५,०	०,०

उपरोक्त मेळ सारणी असे दर्शविते की, जर दोन्ही कैद्यांनी गुन्हा कबूल करण्याचा पर्याय निवडला तर प्रत्येककैद्याला पाच वर्षांची शिक्षा होईल. जर दोन्ही कैद्यांनी गुन्हा नाकबूल करण्याचा निर्णय घेतला तर कोणालाही शिक्षा होणार नाही. याउलट जर एक जण कबूल व दुसरा नाकबूल झाला तर, कबूल होणाऱ्यास शिक्षेतून मुक्तता व त्याचवेळी नाकबूल होणाऱ्यास १५ वर्षांची शिक्षा भोगावी लागणार असते. या ठिकाणी जर दोन्ही कैद्यांनीकबूल होण्याचा पर्याय स्वीकारला तर त्यास्थितीस 'नॅश समतोल(Nash Equilibrium)' असे म्हणतात. याउलट जर दोन्ही कैद्यांनीनाकबूल होण्याचे धोरण स्वीकारले तर त्यास्थितीस'पॅरेटो समतोल(Pareto Equilibrium)' असे म्हणतात.

कैद्यांच्याअश्या पेचप्रसंगासारख्या अनेक प्रसंगांना अर्थव्यवस्थेतील व्यक्ती, व्यवसाय संस्था,शासन, देशइत्यादींनासामोरे जावे लागते. उदा.- आपल्या वस्तूंची जाहिरात करावी, की करू नये? विक्रीदुताची(Brand Ambassador)नेमणूक करावीकी करू नये? असे अनेक प्रश्नव्यवसायसंस्थांना पडत

असतात. अशा परिस्थितीत नेमके कोणते निर्णय घेतले जातात? व त्यामुळे काय घडत असते? हे तपासून पाहण्यासाठी प्रायोगिक अर्थशास्त्राचे तंत्र अत्यंत उपयुक्त ठरत आहे. कैद्यांच्यापेचप्रसंगासंदर्भात विविध सैद्धांन्तिक शक्यता प्रत्यक्ष व्यवहारात प्रायोगिक अर्थशास्त्राचे तंत्र वापरून अनेकशास्त्रज्ञांनी तपासूनपाहिल्या आहेत.

सन १९९६ मध्ये आर. कूपर आणि त्यांच्या सहकाऱ्यांनीकेलेल्या एका प्रयोगातपदवी आणि पदव्युत्तर वर्गातील समवयस्क४० विद्यार्थ्यांची प्रयोगासाठी निवड केली. त्यांच्यातून सुरुवातीला २०-२० जणांचे दोन गट आणि पुन्हा अनेक उपगट असे करूनपरस्पर भिन्न अशा २० जोड्या तयार करण्यात आल्या. प्रयोगातील प्रत्येक विद्यार्थ्यास स्वतंत्रसंगणक आणि खेळाची नियमावली देण्यात आली. त्यांच्याकडून कैद्यांच्यापेचप्रसंगासंबंधी एक वार खेळ(One-shot game) आणि सांत आवर्ती खेळ(Finitely repeated game) अशा दोन्ही पद्धतीचेखेळ खेळवून घेण्यात आले. या प्रयोगातून त्यांना एकवार खेळ या प्रकारात शेवटच्या टप्प्यातजवळपास ८५ टक्के खेळाडूंनी(प्रतिस्पर्ध्यांनी) परस्पर सहकार्य न करण्याच्या धोरणास प्राधान्य दिल्याचे आढळून आले. सांत आवर्ती खेळ या प्रकाराविषयीच्या प्रयोगात प्रारंभी सहकार्याचा ६० टक्के असलेला दर शेवटच्या फेरीत ३० टक्क्यांपेक्षा खाली घसरलेला आढळून आला. कैद्यांच्यापेचप्रसंगाविषयी इतर अनेक संशोधकांनी प्रत्यक्ष नियंत्रितप्रयोगशाळासदृश्य परिस्थिती निर्माण करून अनेक प्रयोग केले आहेत. त्यात पुन्हःपुन्हा हेच आढळून आले आहे की, यादृच्छिक पद्धतीने जोड्या तयार करण्यात आलेले स्पर्धक प्रारंभी काही प्रमाणात एकमेकांस सहकार्य करण्याची भूमिका घेतात. परंतु, काही फेऱ्यानंतर या भूमिकेचा त्याग केला जातो. विशेषतः जेव्हा शेवटची फेरी जवळ येत आहे, याची कल्पना स्पर्धकांना आली की,त्यांच्यात फसवणुकीचे प्रमाण वाढते. तसेच जेव्हा त्याच स्पर्धकांच्या पुन्हा जोड्या पाडल्या जातात तेव्हा त्यांच्यात सहकार्याची भावना वाढलेली आढळते.

कैद्यांच्यापेचप्रसंगासंबंधी सर्वात महत्वाचा प्रयोग करण्याचे श्रेय अमेरिकेतीलराज्यशास्त्रज्ञ रॉबर्ट ॲक्सेलरॉडयांना द्यावे लागेल. ॲक्सेलरॉड यांनी सन १९८४ मध्ये विविध क्षेत्रांतूनयेणाऱ्या खेळ सिद्धांन्तातील तज्ज्ञ व्यक्तींमध्ये तीन वेळा स्पर्धा(Tournament) घडवून आणल्याआहेत. या खेळात 'सतत सहकार्य करणे', 'सतत फसवणे' आणि 'जशास तसे(Tit-for-tat)' वागणे ही तीन धोरणे निश्चित करण्यात आली. यासंदर्भात तज्ज्ञांकडून वेगवेगळ्या खेळी मागविण्यात आल्या. त्यासाठी एकूण १४ जणांनी आपापल्या खेळी पाठविल्या. ॲक्सेलरॉड यांनी स्वतःची एक यादृच्छिक खेळी त्यात घातली. आता खेळाच्या एकूण १५ x १५ = २२५ जोड्या तयार झाल्या. या सर्व जोड्या संगणकाच्या एका सांकेतिक भाषेत रूपांतरित करून त्यासंबंधी एक प्रोग्राम तयार करण्यात आला. या प्रोग्राममध्येउपरोक्त २२५ जोड्यांना एकमेकांशी २०० वेळा खेळविण्यात आले. तिसऱ्या व अंतिम फेरीनंतर या खेळाचे(अत्यंत खळबळजनक वाटतील असे!) निकाल(निष्कर्ष) जाहीर करण्यात आले. त्यात सतत सहकार्य करणे हे एक अस्थिर धोरण ठरले. हे धोरण अंतिम फेरीपर्यंत खूप मागे पडत गेले. कारण त्यात सतत सहकार्य करणाऱ्या व्यक्ती व समूहांचे खूप मोठे नुकसान होते, असे आढळून आले. याउलट एकमेकांना सतत फसवण्याचे धोरण हे एक स्थिर धोरण म्हणून पुढे आले.जरी हे एक स्थिर धोरण ठरत असले तरी, ते एक कमी प्रतीचे धोरण असल्याचे निदर्शनास आले. कारण, जर व्यक्ती किंवा समूह एकमेकांना सतत सहकार्य करत राहिले तर त्यांना आपला इष्टतम(Optimum) विकास साध्य करता आला असता. जशास तसे हे तिसरे धोरण सर्वात यशस्वी धोरण ठरले. हे धोरण स्पष्ट करण्याचे कार्य प्रसिद्ध मानसशास्त्रज्ञ प्रोफेसरआनातोलरॅपोपोर्ट यांनी केले होते. 'जशास तसे' हे धोरण फायद्याचे व चांगले ठरण्याची कारणे अशी की, हे एक पारदर्शक धोरण असून त्यात सुरुवात नेहमी सहकार्याने होत असते. या धोरणात कोणी अगोदर फसवल्याशिवाय त्यास प्रत्युत्तर दिले जात नाही.

हे धोरण पूर्वग्रह बाळगत नाही. प्रतिस्पर्ध्याने एकदा फसवले की, त्यालादेखील एकदाच फसवले जाते व पुढच्या वेळी सहकार्याची भावना ठेवली जाते. या धोरणात आपणच जिंकावे असा प्रतिस्पर्ध्यांचा हट्ट नसतो. उलट स्पर्धकांना विभागून दिलेले बक्षीस मान्य असते. अशा प्रकारे ॲक्सेलरॉड यांच्या प्रायोगिक संशोधनातून केवळ अर्थशास्त्रातच नव्हे, तर निसर्गात, समाजात व इतर अनेक ठिकाणी अत्यंत यशस्वी ठरत असलेल्या आणि त्या-त्या शास्त्रातील पारंपरिक मतांना छेद देणाऱ्या, 'जशास तसे' या 'खेळीचा' उलगडा झालेला आहे.

२) निर्वाणीचा खेळ(**The Ultimatum Game**) :

हा खेळ प्रायोगिक अर्थशास्त्रात प्रसिद्धीस आणण्याचे श्रेय प्रोफेसर जॉन हर्सानी यांना दिले जाते. हर्सानी हे सन १९६१ या वर्षीच्या नोबेल पारितोषिकाचे मानकरी आहेत. निर्वाणीचा खेळ हा एक वाटाघाटी(Bargaining) संदर्भातील अनुक्रमी खेळ(Sequential Game) असून त्यात दोन खेळाडू असतात. एक खेळाडू हा प्रस्तावक(Proposer) तर दुसरा प्रतिसादक(Responder) असतो. प्रयोगकर्त्याकडून प्रस्तावकाकडे काही पैसा किंवा विभाजनयोग्य वस्तू दिली जाते. प्रस्तावक आपल्या मर्जीप्रमाणे दिलेल्या पैशाचे किंवा वस्तूचे दोन हिस्से करून त्यातला एक भाग प्रतिसादकासमोरठेऊ शकतो. प्रस्तावकर्त्याने ठेवलेला पैसा किंवा वस्तूरूपी प्रस्ताव स्वीकारायचा की नाकारायचा, याचे पूर्ण स्वातंत्र्य प्रतिसादकाकडे असते. त्याने जर प्रस्ताव स्वीकारण्यास नकार दर्शविला तर दोघांनाही काहीही मिळणार नसते. याउलट प्रतिसादकाने प्रस्तावाचा स्वीकार केल्यास प्रस्तावकर्त्यानेठरविल्याप्रमाणे दोघांना हिस्से मिळत असतात. सदर खेळाची नियमावली दोन्ही खेळाडूंना आधीच माहिती असते.

निर्वाणीच्या खेळात प्रस्तावकाकडे देण्यात आलेला पैसा किंवा वस्तूची दोन प्रकारे वाटणी होऊ शकते. एक रास्त वाटणी(Fair split).ज्यात दोघांनाही समान हिस्से मिळतील. तर दुसरी म्हणजे, अनुचित वाटणी(Unfair split) ज्यात दोघांपैकी एकाला कमी हिस्सा तर दुसऱ्याला जास्त हिस्सा मिळेल. खेळसिद्धांन्ताताील विस्तृत स्वरूपाच्या(Extensive form) आकृतीद्वारे हा खेळ पुढील उदाहरणाद्वारे दर्शविता येईल.



उपरोक्त आकृतीत १ हा अंक प्रस्तावकासाठी, तर दोन हा अंक प्रतिसादकासाठी असून, F = रास्त हिस्सा, U = अनुचित हिस्सा, A = स्वीकार तर R = नकार होय. इतर अंक खेळाचे मेळ, म्हणजेच विशिष्ट परिस्थितीत दोन्ही खेळाडूंना मिळणारे हिस्से(उदा. ५०%, ८०%, २०% इत्यादी) दर्शवितात. उपरोक्त उदाहरणात खेळाडूंची संख्या आणि प्रस्तावकाकडून उपलब्ध करून देण्यात आलेल्या पर्यायांची संख्या वाढविता येते. निर्वाणीच्या खेळात प्रस्तावकाने प्रतिसादकापुढे ठेवलेल्या कोणत्याही धनात्मकहिश्श्याचात्याने स्वीकार केला असता, जो समतोल घडून येतो, त्यास 'उपखेळ परिपूर्ण नॅश समतोल(Subgame Perfect Nash Equilibrium)' असे म्हणतात. उपखेळ परिपूर्ण नॅश समतोल म्हणजे, एक असा समतोल की,ज्यामध्ये प्रत्येक उपखेळ समतोल स्थितीत असतो. कैद्यांच्यापेचप्रसंगाप्रमाणेच निर्वाणीच्या खेळाचेदेखील विविध क्षेत्रांतील अनेक शास्त्रज्ञांनी प्रयोगात्मक संशोधन पद्धतीद्वारेपरीक्षण करण्याचा प्रयत्न केलेला आहे.

जीन एन्समिगरयांनी सन २००४ मध्ये पूर्व आफ्रिकेतील अनेक लहान खेड्यांमध्ये निर्वाणीच्या खेळातील वाटाघाटींचे प्रयोग केले आहेत. त्यांच्या प्रयोगात सहभागी होणारे लोक हे ओर्मा(Orma) या स्थानिक कुळातील, काही भटके व पशुपालक जीवन जगणारे, रोख वेतन व बाजारअर्थव्यवस्था यावर फारसेविसंबूननसणारे तसेच काही गावात राहणारेपरंतु, आपल्या गरजा पूर्ण करण्यासाठी रोख वेतन व बाजार व्यवस्थेवर विसंबून असणारे लोक यांचा समावेश होता. अशा प्रकारे भिन्न प्रकारची पार्श्वभूमी असलेल्या लोकांच्या समूहापैकी प्रत्येक कुटुंबातील एका प्रौढ व्यक्तीची प्रयोगार्थी म्हणून निवड करण्यात आली. त्यांची संख्या ११२ इतकी होती. प्रयोगार्थिंना एकमेकांपासून विभक्त करण्यासाठी गवताच्या झोपडींचा उपयोग करण्यात आला.(म्हणून, या प्रयोगास झुडूपातीलसौदेबाजी असेदेखील म्हणतात). सर्वांना एका ओळखीच्या व्यक्तीद्वारे खेळाविषयीचे नियमसमजावून सांगण्यात आले. प्रयोगार्थिंमधील अनावश्यक संपर्क प्रयोगापुरत्या वेळेसाठी तोडण्यात आला. त्यानंतर या भागात दिल्या जाणाऱ्या सरासरी वेतनाइतकी रक्कम प्रत्येकी दोन व्यक्तींच्या एकूण ५६जोड्यांमधून यादृच्छिकपणे निवडलेल्या प्रस्तावकांकडे देण्यात आली. प्रत्येक प्रस्तावकाने त्याला दिलेल्या रकमेचा काही भाग झोपडीतील टेबलावर ठेवायचा आणि तेथून बाजूला व्हायचे. त्यानंतर प्रतिसादक व्यक्तीने ती रक्कम स्वतःकडे ठेवायची किंवा त्यास नकार द्यायचा असा नियम ठरविण्यात आला. सदर प्रयोगात एकूण ५६ प्रस्तावकर्त्यांनी देऊ केलेला सरासरी हिस्सा(Mean split) ४४ टक्के इतका होता. तसेच या हिश्श्यांचे बहुलक(Mode split) ५० टक्के इतके होते. त्यातील सर्वात कमी देऊ केलेला हिस्सा ३० टक्के इतका होता. तर सर्वात जास्त हिस्सा ५५ टक्के इतका होता. या प्रयोगाद्वारे संशोधकास असेदेखील आढळून आले की, उच्च प्रकारचे बाजारीकरण आणि जवळीकताअसणाऱ्या समाजांमध्ये रास्त वाटणीची आणि अनुचित वाटणी न करण्याची प्रवृत्ती जास्त असते.

अल्विनरॉथ आणि इतर संशोधकांनीसन १९९१ मध्ये विविध विकसित देशांच्या चार विद्यापीठांतील विद्यार्थ्यांवर निर्वाणीच्या खेळासंबंधी केलेल्या प्रयोगांमध्ये १० डॉलर या रकमेपैकी प्रस्तावकांनी देऊ केलेल्या सरासरी रकमेचे प्रमाण ४० टक्के इतके आढळून आले. तर येथेदेखील बहुलकाचे प्रमाण ५० टक्के इतके असल्याचे निदर्शनास आले. थोडक्यात,नियंत्रितप्रयोगशालेय परिस्थितीमध्ये देखील प्रस्तावकांनी पारंपरिक अर्थशास्त्रातील मान्यतांनुसार वर्तन न करता, देऊ केलेला हिस्सा रास्त स्वरूपाचाठेवण्यात आल्याचेआढळून आले.

३) हुकूमशहा खेळ(**Dictator Game**) :

हुकूमशहा खेळ हा देखील निर्वाणीच्या खेळाप्रमाणेच वाटाघाटीविषयीचा एक अनुक्रमी खेळ होय. या खेळासंबंधी विवेचन करण्याचे श्रेय डॅनियलकानेमन(१९८०) आणि रॉबर्ट फोर्सिथ व त्यांच्या सहकाऱ्यांना(१९९४) दिले जाते.या खेळात प्रस्तावक आपल्या मर्जीप्रमाणे त्याच्याकडे असलेला पैसा किंवा वस्तूंचे विभाजन करून त्याचा एक हिस्सा प्रतिसादकाला देऊ करतो. प्रस्तावकाने हा जो काही हिस्सा निश्चित केलेला असतो, तो प्रतिसादकास स्वीकारावाच लागतो. निर्वाणीच्या खेळात ज्याप्रमाणे प्रतिसादक नकार देऊ शकत होता, त्याप्रमाणे या खेळात त्यास नकार देता येत नाही. म्हणून, या खेळात प्रस्तावक हा हुकूमशहा ठरतो. पारंपरिक अर्थशास्त्राच्या गृहीतांनुसारहुकूमशहा ठरत असलेला प्रस्तावकर्ता आपल्या उपयोगितेचेमहत्तमीकरण करण्याच्या हेतूने प्रतिसादकास काहीच देणार नाही. परंतु, या गृहीतांच्याचौकटीबाहेर जाऊन प्रायोगिक अर्थशास्त्राच्या संशोधन पद्धतीद्वारे या खेळाचे परीक्षण केले असता काहीसे वेगळे निष्कर्ष अनुभवास येतात.

जीन एन्समिगर यांच्याउपरोक्त प्रयोगात जे प्रस्तावकर्ते निर्वाणीच्या खेळात सरासरी ४४ टक्के हिस्सा देऊ पाहत होतेत्यांच्याकडून हुकूमशहा खेळ खेळून घेण्यात आला असता, सरासरी प्रस्ताव पूर्वीपेक्षा

घसरून ३१ टक्क्यांपर्यंत आले. परंतु, तेशून्य वगैरे झाले नव्हते. आश्चर्याची बाब म्हणजे,याप्रसंगी या तथाकथितहुकूमशहांकडून आलेल्या प्रस्तावांचे बहुलक पूर्वीप्रमाणेच म्हणजे ५० टक्के इतके होते. हॉफमन आणि इतर(१९९६)यांनी यासंदर्भात केलेल्या प्रयोगात हुकूमशहा खेळाच्या अनेक प्रतिकृती(Replications) तयार करण्यात आल्या. विविध प्रयोगार्थि+ना या खेळासंबंधी आवश्यक त्या सूचना देऊन त्यांना स्वतंत्र खोल्यांमध्ये बसवण्यात आले. यादृच्छिक पद्धतीने निवडलेल्या प्रत्येक प्रस्तावकर्त्यांकडे १० डॉलर इतकी रक्कम सुपूर्द करून त्यांच्या मर्जीप्रमाणे ती विभागून प्रतिसादकांकडे काही हिस्सा देण्यास सांगण्यात आले. या खेळात केवळ १८ टक्के प्रस्तावकांनी टोकाचे पाऊल उचलत प्रतिसादकांपुढे शून्य डॉलरचा प्रस्ताव ठेवल्याचे निदर्शनास आले. तर सुमारे १/३ प्रस्ताव हे ४ डॉलर किंवा त्यापेक्षा जास्त रकमेचे असल्याचे आढळून आले. संशोधनकर्त्याने हाच प्रयोग दुहेरी निनावी(Double anonymous) पद्धतीनेखेळून घेतला असता, त्यात शून्य डॉलरचा प्रस्ताव ठेवणाऱ्यांची संख्या वाढून २/३ वर गेलेली आढळून आली. अशा परिस्थितीत केवळ १० टक्के प्रस्तावकांनीच ४ डॉलर किंवा त्यापुढील रकमेचे प्रस्ताव प्रतिस्पर्ध्यासमोर ठेवल्याचे निदर्शनास आले. परंतु, अशा अत्यंत टोकाच्या परिस्थितीतही अधोरेखित करण्यासारखी बाब म्हणजे, सर्वच प्रस्तावकांची वर्तणूक ही काही पूर्णतः किंवा निर्विवादपणे स्वार्थी असल्याचे निदर्शनास आले नाही.

अशा प्रकारे खेळ सिद्धान्तातप्रतिपादित करण्यात आलेल्या विविध खेळांच्या काही प्रकारांचे प्रयोगात्मकअर्थशास्त्रीय संशोधन पद्धतीद्वारेपरीक्षण केले असता, हाती येणारे निष्कर्ष हे अर्थशास्त्रातील प्रस्थापित मान्यतांना मोठ्याप्रमाणावर छेद देणारे ठरत असल्याचे निदर्शनास येते. प्रायोगिक अर्थशास्त्रीय संशोधन पद्धतीत अर्थशास्त्रीयसिद्धांन्तआणि प्रायोगिक निरीक्षणे यातील पश्चप्रदाय प्रणालीला(Feedback system) महत्त्व दिले जात असल्यामुळे, त्यातून पारंपरिक अर्थशास्त्रीयसिद्धान्तांची प्रायोगिक आधारावर पुनर्रचना करणेतसेच नव्या सिद्धान्तांचीमांडणी करणे आवश्यक असल्याचे लक्षात येते.

संदर्भ साहित्य

बापट, र. (२००४). ऐसी प्रमेये रसिके. राजहंस प्रकाशन.

ब्रह्मनाळकर, सु. (२०१२). गोफ जन्मांतरीचे. राजहंस प्रकाशन.

COOPER, R., DEJONG, D. V., FORSYTHE, R., & ROSS, F. W. (1992, September 16). Cooperation without Reputation: Experimental Evidence from Prisoner's Dilemma Games. *GAMES AND ECONOMIC BEHAVIOR*, *12*(2), 187–218. 10.1006/game.1996.0013

Dictator game. (n.d.). Wikipedia. Retrieved September 2, 2022, from https://en.wikipedia.org/wiki/Dictator_game

Dixit, A. K., Reiley, D. H., &Skeath, S. (2015). *Games of Strategy*. W.W. Norton.

DRÈZE, J. (2016, April 2). The Real Insights of Game Theory. *Economic and Political Weekly*, *51*(14), 55-61.

Forsythe, R., Horowitz, J. L., E., S. N., & Sefton, M. (1994). Fairness in Simple Bargaining Experiments. *Games and Economic Behavior*, *6*(3), 347-369. 10.1006/game.1994.1021

Hoffman, E., McCabe, K., Shacha, K., & Smith, V. (1992, September 17). Preferences, Property Rights, and Anonymity in Bargaining Games. *Games and Economic Behavior*, *7*(3), 346-380. 10.1006/game.1994.1056

Hoffman, E., McCabe, K. A., & Smith, V. L. (1996). On expectations and the monetary stakes in ultimatum games. *International Journal of Game Theory*, *25*(3), 289—301. 10.1007/bf02425259

Holt, C. A. (2019). *Markets, Games, and Strategic Behavior: An Introduction to Experimental Economics (Second Edition)*. Princeton University Press.

Kagel, J. H., & Roth, A. E. (Eds.). (2015). *The Handbook of Experimental Economics, Volume 2*. Princeton University Press.

Kreps, D. M., Milgrom, P., Roberts, J., & Wilson, R. (1981, July 8). Rational cooperation in the finitely repeated prisoners' dilemma. *Journal of Economic Theory*, *27*(2), 245—252. 10.1016/0022-0531(82)90029-1

L'Haridon, O., &Jacquemet, N. (2018). *Experimental Economics: Method and Applications*. Cambridge University Press.

Nicholson, W., & Snyder, C. M. (2016). *Microeconomic Theory: Basic Principles and Extensions*. Cengage Learning.

Osborne, M. J. (2004). *An Introduction to Game Theory*. Oxford University Press.

Roth, A. E., Prasnikar, V., Okuno-Fujiwara, M., & Zamir, S. (1991). Bargaining and Market Behavior in Jerusalem, Ljubljana, Pittsburgh, and Tokyo: An Experimental Study. *American Economic Review*, *81*(5), 1068—1095. 10.2307/2006907

The Royal Swedish Academy of Sciences. (2002, October 9). *Foundations of Behavioral and Experimental Economics: Daniel Kahneman and Vernon Smith*. The Nobel Prize. Retrieved September 2, 2022, from https://www.nobelprize.org/uploads/2018/06/advanced-economicsciences2002-1.pdf

अर्थशास्त्रात प्रयोगात्मक पद्धतीची उपयुक्तता

डॉ. समित माहोरे
सहायक प्राध्यापक
पदव्युत्तर अर्थशास्त्र विभाग,
राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठ नागपूर
drsamitmahore@gmail.com
आजीव सभासद क्र. १६४१

प्रस्तावना

वर्तमान काळात शिकले जाणारे, पदवी व पदव्युत्तर विद्यार्थ्यांना शिकविले जाणारे आणि नंतर सरावात आणले जाणारे अर्थशास्त्र हे इतर कोणत्याही विज्ञानापेक्षा अधिक सिद्धांत केंद्रित आणि कमी निरीक्षण केंद्रित आहे. सिद्धांत आणि निरीक्षण या दोन्हीचा वेगवेगळा विचार न करता त्यांच्या परस्परांशी परिसंवाद होणे आवश्यक आहे. आर्थिक समस्यांचा विचार करूनच त्या समजून घेतल्या जाऊ शकतात. या समस्या सोडविण्याकरिता पुरेशे तंत्रज्ञान, अंतर्गत सुसंगतता, त्यांचा परस्परांशी संबंध असेल तर अर्थशास्त्रज्ञ समंकाच्या जगात परिणाम दाखवू शकतात. पण प्रयोगांमुळे आपला अर्थशास्त्राबद्दलचा दृष्टीकोन बदलतो. आपण जर प्रयोग केले तर असे दिसून येते की या महत्वाच्या प्रयोगांच्या परिणामांची पुनरावृत्ती इतरांकडून केली जाते. परिणामी जे प्रदर्शित करण्यास सक्षम किंवा अपयशी अशा अर्थशास्त्रीय संकल्पना आणि प्रस्तावांचे प्रतिनिधित्व करण्यास सुरवात होते. प्रयोगांमुळे अर्थशास्त्रीय अध्ययनाचा दृष्टिकोन बदलत असल्याचे दिसून येते.

वर्तणूक आणि प्रयोगात्मक अर्थशास्त्र हे अर्थशास्त्र अभ्यासाचे एक उदयन्मुख क्षेत्र आहे. दीर्घकाळापासून "प्रयोगात्मक अर्थशास्त्रा" कडे विशिष्ट अध्ययन क्षेत्र म्हणून पाहिले जात आहे. प्रयोगात्मक पद्धतीला आता अर्थशास्त्रज्ञांच्या संशोधन पद्धतींमध्ये महत्वाचे स्थान प्राप्त झाले आहे. या पद्धतीच्या वापराने अर्थशास्त्रीय अध्ययनाची सैद्धांतिक बाजू म्हणजेच निर्णय सिद्धांत, खेळ सिद्धांत, बाजार क्रियांवर आधारित सिद्धांत इ. वर आधारित संशोधनाला अधिक महत्व दिले जात आहे. त्याचबरोबर वर्तवणुकीवर आधारित विषयांवर देखील जसे धोरण, विकास, श्रम अर्थव्यवस्था, शिक्षण, आरोग्य अर्थव्यवस्था इ. वर अध्ययन करतांना प्रयोगात्मक पद्धतीला अधिक महत्व दिले जात असल्याचे दिसून येत आहे. ही पद्धत विकसित झाल्यामुळे "वर्तणुकीचे अर्थशास्त्र" या विषयाला अधिक महत्त्व प्राप्त झाले आहे. परंतु प्रयोगात्मक अर्थशास्त्राची सामान्य प्रासंगिकता त्यापेक्षा खूप खोल आहे. या पद्धतीच्या उपयोगामुळे भारताचे सर्वसामान्य विकासाच्या समस्यांवर विजय मिळविणे शक्य होऊ शकेल, याची प्रचिती भारतीय वंशाचे अर्थशास्त्राचे अभ्यासक डॉ. अभिजित बॅनर्जी यांच्या यादृच्छिक नियंत्रित चाचणीवर आधारित विकासात्मक कार्याचा सर्वोत्कृष्ट नोबेल पारितोषिक देऊन गौरव करण्यात आला आहे, यावरून होते. यामुळे भारतातील तरुण संशोधकांना या पद्धतीचा उपयोग करण्याचे विशेष मनोबल प्राप्त झाले असून संशोधनात या पद्धतीचा उपयोग करण्यासाठी आवश्यक कौशल्ये प्रदान केली जाऊ शकतात.

प्रयोगात्मक अर्थशास्त्र म्हणजे काय?

प्रयोगात्मक अर्थशास्त्र म्हणजे आर्थिक प्रश्नांचा अभ्यास करण्यासाठी प्रयोगात्मक पद्धतींचा वापर करणे होय. आज संशोधन पद्धतीमध्ये प्रयोगांचा उपयोग संकलित केलेल्या समंकाचा प्रभाव, समंक आकाराच्या अनुमानाकरिता, आर्थिक सिद्धांतांच्या वैधतेचे परीक्षण करण्याकरिता आणि बाजार यंत्रणा विकसित करण्यासाठी केला जातो.

प्रयोगात्मक अर्थशास्त्र ही अर्थशास्त्राची एक शाखा आहे जी गणितीय प्रमेयांप्रमाणेच नियंत्रित प्रयोगशाळेमध्ये किंवा विशिष्ट क्षेत्रातील मानवी वर्तनाचा अभ्यास करते. लोक विशिष्ट परिस्थितीत कोणते पर्याय निवडतात याची चाचणी घेण्यासाठी, पर्यायी बाजार यंत्रणेचा अभ्यास करण्यासाठी आणि आर्थिक सिद्धांतांची चाचणी घेण्यासाठी हे वैज्ञानिक प्रयोग वापरले जातात.

प्रयोगात्मक अर्थशास्त्र मुख्यत्वे बाह्य प्रभावांचे परिणाम दूर करण्यासाठी योग्य नियंत्रणांसह प्रयोगशाळेच्या चौकटीबद्ध चाचणीशी संबंधित आहे. प्रयोगात्मक अर्थशास्त्रातील प्रयोगामध्ये सहभागींना ग्राहक आणि विक्रेत्यांची भूमिका दिली जाते आणि प्रयोगादरम्यान त्यांनी कमावलेल्या व्यापारिक नफ्यासह पुरस्कृत केले जाते. मोबदल्याची हमी सहभागींना त्यांच्या फायद्यासाठी तर्कशुद्ध निर्णय घेण्यासाठी नैसर्गिक प्रोत्साहन म्हणून कार्य करते जेणेकरून त्यामध्ये कोणत्याही प्रकारचा पक्षपात होणार नाही. प्रयोगादरम्यान संशोधक आपल्या गृहीतांमध्ये म्हणजेच दिलेल्या परिस्थितीत बदल करून त्यांचा ग्राहक व विक्रेत्यांवर काय परिणाम होतो याची नोंद घेतो व सहभागींना तसे करण्यास प्रोत्साहन देतो. यामुळे जर परिस्थितीमध्ये बदल झाला तर त्याचा काय परिणाम होईल याचे आकलन होते.

वास्तविक-जगातील घडणाऱ्या क्रियांची चाचणी करण्यासाठी आणि संबंधित विषयांना प्रेरित करण्यासाठी सहसा आर्थिक प्रयोग केले जातात. बाजार आणि विनिमय प्रणाली कसे कार्य करते हे समजून घेण्याकरिता प्रयोगात्मक पद्धतीचा उपयोग केला जात आहे. विविध सामाजिक संस्था आणि प्रयोगात्मक पद्धती आणि अर्थशास्त्र समजून घेण्यासाठी प्रयोगात्मक अर्थशास्त्राची व्याप्ती वाढली आहे. प्रयोगात्मक पद्धतीचा एक मूलभूत पैलू म्हणजे वैयक्तिक किंवा समूह वर्तनासंबंधित प्रयोगांची रचना किंवा मांडणी ही प्रयोगशाळेत किंवा इतर इतर कोणत्याही ठिकाणी आयोजित केली जाऊ शकते.

प्रयोगात्मक अर्थशास्त्राची व्याप्ती

प्रयोगात्मक अर्थशास्त्राचा उपयोग बाजार कशा पद्धतीने कार्य करते हे समजून घेण्यात मदत करतो. बाजारातील प्रयोगांमध्ये प्रत्यक्ष लोकांचा समावेश असून ते आपली वास्तविक निवड दर्शवितात. सैद्धांतिक आर्थिक सिद्धांत खरोखरच बाजाराच्या वर्तनाचे स्पष्टीकरण करतात की नाही, तसेच ग्राहक बाजाराच्या सामर्थ्याबद्दल आणि सहभागी प्रोत्साहनांना कसा प्रतिसाद देतात हे तपासण्याचा हा एक उत्तम मार्ग आहे.

आज औपचारिक मर्यादेबाहेरील विषयाच्या प्रकारांमध्ये नैसर्गिक आणि सह-नैसर्गिक प्रयोगांचा समावेश होतो. यामध्ये अनेक विषयांचा वापर करून आर्थिक प्रयोगांचे वर्गीकरण केले जाऊ शकते. इंग्लंड, अमेरिका, युरोपियन राष्ट्रे आणि ऑस्ट्रेलिया इत्यादी अनेक विकसित देश सेवानिवृत्ती नियोजन, बेरोजगारी, निर्णय क्षमता, सौदाशक्ती, करार, लिलाव, समन्वय, सामाजिक समस्यांसंबंधित विषय, शिक्षण, आरोग्य, क्षेत्रीय समस्या संबंधित प्रयोग, कार्बन परिणामकारकता, खर्च कार्यक्षमता आणि इक्विटी आणि म्युच्युअल फंड मधील गुंतवणूक यासाख्या अनेक विषयायांमध्ये प्रयोगात्मक पद्धतीचा उपयोग करीत आहेत. विकसित देशांनी सामाजिक सुविधा, वैयक्तिक गुंतवणूक आणि आर्थिक क्रियांशीसंबंधित समस्या सोडविण्याकरिता आणि सामान्य जनतेला वैयक्तिक सुविधा पुरविण्याकरिता वैविध्यपूर्ण क्षेत्रांशी संबंधित सार्वजनिक योजनांमध्ये वर्तणुकीच्या अर्थशास्त्राचा उपयोग करून जागतिकस्तरावर त्याचे फायदे अनुभवायला सुरुवात केली आहे. त्याच बरोबर कर्मचाऱ्यांच्या कार्यक्षमतेत वाढ करणे, कर्मचाऱ्यांची नियुक्ती आणि पदोन्नतीचे धोरण ठरविणे, विपणन धोरणांची कार्यक्षमता वाढवणे, बचतीवरील परताव्यांना अधिक लाभदायक करणे, गुंतवणूकदारांना मदत करण्यासाठी जगभरातील बहुराष्ट्रीय कंपन्यांनी प्रयोगात्मक आणि वर्तणूकीचे अर्थशास्त्र उपयोगात आणण्यास सुरुवात केली आहे. आज भारतामध्ये ही बहुराष्ट्रीय कंपन्यांनी वर्तणुकीच्या अर्थशास्त्राबरोबरच प्रयोगात्मक अर्थशास्त्राचा उपयोग करण्यास सुरुवात केली आहे. भारत

सरकारने सुद्धा अनेक शासकीय योजनांच्या अंमलबजावणी करिता प्रयोगात्मक पद्धतीचा अवलंब केलेला दिसून येतो.

प्रयोगात्मक अर्थशास्त्र वर्तणूकीच्या अर्थशास्त्राबरोबर मानसशास्त्र आणि समाजशास्त्रासारख्या इतर सामाजिक शास्त्रांमधील अनेक क्लिष्ट समस्यांवर साध्या आणि सोप्या पद्धतीने निर्णय घेण्यास अंतर्दृष्टी प्रदान करते. त्यामुळे व्यक्ती किंवा नियामक आर्थिक सिद्धांताच्या दृष्टीकोनातून तर्कहीन वाटणारे निर्णय कसे आणि का घेतात याची प्रचिती येते. आपण अंतर्दृष्टी वर्तनाबद्दलचे अंदाज सुधारू शकतो आणि त्यामुळे अधिकारी लोकांना इच्छित दिशेने निर्णय घेण्यास मदत करतात किंवा भाग पडतात. प्रयोगात्मक अर्थशास्त्र ही प्रमाणित आर्थिक सिद्धांतांची वैधता शोधण्यासाठी व्यापकपणे वापरली जाणारी संशोधन पद्धत आहे. काळजीपूर्वक आकृतिबद्ध आणि शास्त्रोक्त पद्धतीने केलेल्या प्रयोगांच्या परिणामांनी मुख्यत्वे विकास आणि वर्तवणूक अर्थशास्त्राने जगाच्या विकास आणि प्रगतीमध्ये योगदान देण्यासाठी महत्त्वपूर्ण भूमिका बजावली आहे.

वर्तमान अध्यानाकरिता आर्थिक सिद्धांतांची चाचणी

प्रयोग म्हणजे गृहीतकाची सत्यता पडताळून पाहणे, खंडन करणे किंवा काही संबंध स्थापित करण्याची प्रक्रिया होय. एखाद्या विशिष्ट घटकात फेरफार केल्यावर त्यांच्यामध्ये कोणता परिणाम होतो म्हणजेच प्रयोगाद्वारे कार्यकारणभावाची अंतर्दृष्टी काय आहे याची प्रचिती प्रयोगाद्वारे करण्यात येते. प्रयोग हे उद्देश आणि प्रमाणामध्ये मोठ्या प्रमाणात बदल करतात. परंतु ते नेहमी पुनरावृत्ती करण्यायोग्य प्रक्रियांवर आणि परिणामांच्या तार्किक विश्लेषणावर अवलंबून असतात. नैसर्गिक प्रयोगात्मक अभ्यास पद्धती देखील अस्तित्वात आहे. परंतु नैसर्गिक आर्थिक वातावरणात मानवी वर्तनाचे स्पष्टीकरण करण्यासाठी आर्थिक सिद्धांत काल्पनिक असतात याचा उल्लेख करणे इथे महत्वपूर्ण आहे.

सामान्य सिद्धांत साध्या विशेष प्रकरणांना लागू करणे आवश्यक आहे. प्रयोगशाळा तंत्रज्ञानाचा वापर सामान्य (परंतु वास्तविक) अर्थव्यवस्था निर्माण करण्यासाठी केला जाऊ शकतो. या सोप्या अर्थव्यवस्थेचा वापर सामान्य सिद्धांतांच्या भविष्यसूचक क्षमतेची चाचणी आणि मूल्यमापन करण्यासाठी केला जाऊ शकतो जेव्हा ते विशेष प्रकरणांमध्ये लागू केले जातात आपल्याकडे अर्थशास्त्रात मोठ्या प्रमाणात सिद्धांत मांडण्यात आले असले तरी प्रयोगात्मक पद्धतीचा मुख्य उद्देश सामान्य स्थितीत कोणते सिद्धांत उपयोगी नाहीत हे ठरवून संख्या कमी करणे हा आहे (चार्ल्स प्लॉट, १९९१). एखाद्या सिद्धांताचे भाकीत करण्याची क्षमता म्हणजे विशिष्ट महासागरातील घटनांचा अंदाज लावण्याच्या प्रणालीची क्षमता असून घटना विषयी भाकित करणे होय. यामध्ये सर्व स्त्रोत आणि त्रुटी कमी करण्याचा विचार केला जातो (प्रारंभिक आणि सीमा परिस्थिती, सिद्धांत, संमंक इ.) आणि त्यांच्या उत्क्रांतीसाठी ही पद्धतशीर स्थिती अनेक अर्थशास्त्रज्ञ वापरतांना दिसून येतात.

प्रयोगात्मक अर्थशास्त्रीय संशोधन पद्धतीची पार्श्वभूमी

पूर्वीपासूनच अर्थशास्त्र हे अप्रयोगात्मक शास्त्र मानले गेले आहे. परंपरागत अर्थशात्रज्ञांनी अर्थशास्त्र हे अप्रयोगात्मक शास्त्र असल्याचे अनेक दाखले दिले आहेत. जॉन स्टुअर्ट मिल यांनी असे स्पष्ट केले होते कि सर्व नैतिक विज्ञानांमध्ये एक गुणधर्म समान असल्यामुळे ते अनेक भौतिक विज्ञानांपेक्षा वेगळे आहेत; भौतिक शास्त्रामध्ये ज्याप्रमाणे प्रयोगशाळेत प्रयोग केले जातात तसे प्रयोग नैतिक शास्त्रात क्वचितच केले जातात. मिल्टन फ्रीडमन यांनी सकारात्मक अर्थशास्त्राच्या कार्यपद्धतीवरील त्यांच्या प्रसिद्ध निबंधात याच कल्पनेचा आग्रह धरला आहे. दुर्दैवाने, काल्पनिक परिस्थितीवर आधारित असल्याने, सामाजिक शास्त्रामध्ये मांडण्यात आलेले विविध सिद्धांत क्वचितच सिद्ध केले जाऊ शकतात. त्यामुळे सामान्यपणे घडून येणाऱ्या प्रयोगांद्वारे उपलब्ध पुराव्यांवर आपण विसंबून राहतो. आणखी एक प्रसिद्ध अर्थतज्ञ, जोन रॉबिन्सन, म्हणतात कि "अर्थशास्त्रज्ञ त्यांचे मतभेद सोडवण्यासाठी नियंत्रित

प्रयोगांचा वापर करू शकत नाहीत. त्यांना ऐतिहासिक पुराव्यांचा उपयोग करावाच लागतो". रिचर्ड लिप्से असे लिहितात कि प्रयोगात्मक विज्ञान उदा. रसायनशास्त्र आणि मानसशास्त्राच्या काही शाखांना एक वरदान आहे कारण रसायनशास्त्र आणि मानसशास्त्रासारख्या विषयांत नियंत्रित प्रयोगशाळेच्या प्रयोगांद्वारे पुरावे तयार करणे शक्य आहे. खगोलशास्त्र आणि अर्थशास्त्र यासारख्या शास्त्रांमध्ये तसे करणे शक्य नाही.

पॉल सॅम्युएलसन त्याच्या "प्रिन्सिपल्स ऑफ इकॉनॉमिक्स" च्या प्रत्येक आवृत्तीमध्ये प्रयोग करण्यासाठी अर्थशास्त्रज्ञांच्या अक्षमतेचा संदर्भ देतात. विल्यम नॉर्डहॉस असे मत व्यक्त करतात कि अर्थशास्त्रज्ञ हे रसायनशास्त्रज्ञ किंवा जीवशास्त्रज्ञांसारखे नियंत्रित प्रयोग करू शकत नाहीत कारण अर्थशास्त्रीय सिद्धातांमध्ये काही महत्त्वपूर्ण घटकांवर सहज नियंत्रण ठेवल्या जाऊ शकत नाही. खगोलशास्त्रज्ञ किंवा हवामानशास्त्रज्ञांप्रमाणेच त्यांना केवळ निरीक्षणाचा उपयोग करावा लागतो व आपले अंदाज बांधावे लागतात.

नंतरच्या काळात अर्थशास्त्रीय अध्ययनामध्ये परिस्थिती व कालानुरूप अनेक बदल झालेत. अर्थशास्त्र हे जरी शास्त्र असले तरीही अशी कोणती प्रयोगशाळा आहे ज्यामध्ये अर्थशास्त्रज्ञ त्यांच्या सिद्धांताची चाचणी घेऊ शकतील? असा प्रश्न स्वाभाविक आहे. याचे मुख्य कारण म्हणजे इतर सामाजिक शास्त्रांप्रमाणे एखाद्या घडलेल्या घटनेचे एकच कारण आहे असे म्हणणे फार कठीण आहे. हे आपण नेहमीच पाहतो आपल्या अवतीभोवती किंवा आपल्या सोबत घडलेली एखादी घटना ही अनेक कारणांमुळे घडून आलेली असते म्हणजेच एखादे कारण अनेक घटनांना जन्म देते.

प्रयोगात्मक अर्थशास्त्रातील प्रवर्तकांपैकी असलेले प्रा. चेम्बरलिन (१९४८) यांनी त्याच्या पहिल्या प्रयोगात कार्यकारणभाव समस्याप्रधान आहे यावर भर दिला. पुढे ते म्हणतात की पद्धतींच्या निवडीमध्ये अर्थशास्त्रज्ञ नैसर्गिक विज्ञानासारखी प्रयोगशाळा तंत्रे क्वचितच वापरू शकतात. एकाबाजूने जगाचा वास्तविक संमंक हा अपरिहार्यपणे वेगळ्या करण्याचा प्रयत्न करीत असलेल्या अनेक घटकांच्या प्रभावांचे फलित आहे. दुसरीकडे, अर्थशास्त्रीय प्रयोगशाळेत हेतुपुरस्सर नसलेली चल स्थिर ठेवली जाऊ शकत नाही किंवा काढून टाकली जाऊ शकत नाहीत. कारण मानव, पेढ्या, बाजार आणि सरकार यांचे वास्तविक जग कृत्रिमरित्या नियंत्रित केले जाऊ शकत नाही. अनेक कारणांमुळे आपल्या अवतीभोवती अखंड बदल सुरु असतात. त्यामुळेच प्रा. चेम्बरलिन यांनी प्रचलित पद्धतीला तोडून एका नवीन अध्ययनाची दिशा दाखविली आणि वास्तविक प्रयोगाचे वर्णन करणयासाठी आपल्या लेखाचे वर्णन 'प्रयोगशाळेच्या अटींमध्ये नियंत्रित बाजार' असे केले.

अर्थशास्त्रातील प्रयोगात्मक दृष्टिकोनाच्या वैज्ञानिक प्रासंगिकतेबद्दल सामान्यीकृत शंका असूनही, दुसऱ्या महायुद्धानंतरच्या काही वर्षांमध्ये मूठभर मानसशास्त्रज्ञ, चेंबरलिन आणि इतर अर्थशास्त्रज्ञ यांनी सुरु केलेली अध्ययनाची ही दिशा कालांतराने स्वीकारली गेली आहे. पुढे १९६० च्या दशकापर्यंत अमेरिका आणि युरोपमधील जर्मनी या भागांमध्ये प्रयोगात्मक अर्थशास्त्रामध्ये बरेच अध्ययन झाले. या विविध अध्ययनामधून प्रामुख्याने वैयक्तिक निर्णय, खेळ सिद्धांत आणि बाजारावर आधारित सिद्धांतावर भर देण्यात आला होता.

तीन चार दशकाच्या कमी कालावधीमध्ये प्रयोगशाळेतील प्रयोगांना अर्थशास्त्रज्ञांनी विलक्षण यश मिळविले. याला विज्ञानाच्या इतिहासातील एक आश्चर्यकारक क्रांती मानली जात असून ग्वाला (२००९) यांनी "विज्ञानाच्या इतिहासातील सर्वात विस्मयकारक पद्धतशीर क्रांतींपैकी एक" असा उल्लेख केला आहे. प्रयोगशाळेतील प्रयोगांच्या वापराबाबत अर्थशास्त्र आणि नैसर्गिक शास्त्रे (भौतिकशास्त्र, रसायनशास्त्र, जीवशास्त्र, वैद्यकशास्त्र) यांच्या विचारांमध्ये बरेच अंतर असले तरी - आर्थिक प्रयोगांचे वैशिष्ट्य म्हणजे ते मानवाच्या वर्तनावर अवलंबून असतात त्यामुळे याबद्दल आपल्याला आश्चर्य वाटण्याचे कारण नाही. हे अंतर काळाबरोबर लक्षणीयरीत्या कमी झाले आहे हे मान्य करावे लागेल. चार्ल्स प्लॉट सारख्या लेखकाने १९९० मध्ये सदर्न इकॉनॉमिक असोसिएशनच्या सहाव्या वार्षिक अधिवेशनामध्ये, "अर्थशास्त्र हे प्रयोगात्मक विज्ञान होईल का?" असे विचारण्यास अजिबात संकोच केला

नाही. (प्लॉट, १९९१) आज सुमारे तीस वर्षांनंतर, या प्रश्नाचे नुसते होकारार्थी उत्तर न देता, आपण असे अभिमानाने म्हणू शकतो की "प्रयोगात्मक अर्थशास्त्रा" ला अखेरीस अर्थशास्त्रीय संशोधनामध्ये महत्वपूर्ण स्थान मिळाले आहे.

प्रयोगात्मक अर्थशास्त्रामध्ये नोबेल पारितोषिक विजेत्यांचे कार्य

प्रयोगात्मक अर्थशास्त्राला मुख्य प्रवाहात आणण्याचे श्रेय जॉर्ज मेसन विद्यापीठातील अर्थशास्त्रज्ञ व्हर्नन स्मिथ आणि प्रिन्स्टन येथील मानसशास्त्रज्ञ डॅनियल काहनेमन — या दोन अमेरिकन संशोधकांना द्यावे लागेल. या दोघांनी प्रयोगात्मक अर्थशास्त्राच्या अध्ययनाद्वारे महत्त्वपूर्ण कामगिरी केली आणि या नवीन पद्धती चे महत्व संपूर्ण जगासमोर मांडले. त्यामुळे त्यांना २००२ मध्ये प्रयोगात्मक आणि वर्तणुकीचे अर्थशास्त्र यामध्ये अर्थशास्त्राचे नोबेल पारितोषिक देण्यात आले.

डॉ. व्हर्नन स्मिथ यांना "प्रयोगात्मक अर्थशास्त्राचे जनक" म्हणून ओळखले जाते. याव्यतिरिक्त त्यांना उत्पादन सिद्धांत, सार्वजनिक निवड, पर्यावरणीय अर्थशास्त्र, वर्तणूक अर्थशास्त्र यातील महत्त्वपूर्ण योगदानासाठी ओळखले जाते. ते न्यूरोइकॉनॉमिक्सच्या (व्यक्ती आर्थिक निर्णय कसे घेतात हे निर्धारित करण्यासाठी अर्थशास्त्र, न्यूरोसायन्स आणि मानसशास्त्र यांचे संयोजन वापरले जाते.) उदयोन्मुख क्षेत्रात कार्यरत आहेत.

२००२ मध्ये अर्थशास्त्रातील नोबेल पारितोषिक प्राप्त करणाऱ्या व्हर्नन स्मिथने या क्षेत्राची सुरुवात केली होती. त्यांनी संशोधकांना धोरणात्मक बदलांच्या परिणामांची अंमलबजावणी करण्यापूर्वी धोरणकर्त्यांना चांगले निर्णय घेण्यात मदत करण्यासाठी त्यांच्या परिणामांचे परीक्षण करण्याची परवानगी देणारी पद्धत विकसित केली होती. स्मिथ यांनी सुरुवातीच्या प्रयोगांमध्ये सैद्धांतिक संतुलित किंमतींवर लक्ष केंद्रित केले आणि त्याची वास्तविक-जगातील संतुलन किमतींशी तुलना केली. त्यांना असे आढळून आले की जरी मानवांना संकल्पनात्मक पूर्वाग्रहांचा सामना करावा लागला, तरीही पारंपारिक अर्थशास्त्र लोकांच्या समूह वर्तनाबद्दल अचूक अंदाज लावू शकतो. प्रयोगांद्वारे त्यांना असे आढळून आले कि पक्षपाती वर्तन आणि मर्यादित माहिती असलेले गट अजूनही त्यांच्या उत्स्फूर्त परस्परसंवादाद्वारे हुशारीने संतुलन किंमत गाठतात.

वर्तणुकीच्या अर्थशास्त्रासंबंधी स्मिथ यांनी हे सिद्ध केले आहे की परंपरागत अर्थशास्त्रामध्ये लोकांबद्दल जे गृहीत धरले होते त्यापेक्षा खूपच कमी तर्कसंगती आढळून आली. आज प्रयोगात्मक अर्थशास्त्राचा वापर बाजार कसा अयशस्वी होतो हे तपासण्यासाठी आणि प्रतिस्पर्धेच्या श्रेणीचा शोध घेण्यासाठी देखील केला जात आहे.

अभिजित बॅनर्जी, एमआयटीचे एस्थर डफ्लो आणि हार्वर्डचे मायकेल क्रेमर या तिघांनीसुद्धा विकासाच्या अर्थशास्त्रामध्ये प्रयोगात्मक अध्ययनपद्धतीचा अवलंब केल्यामुळे त्यांना अर्थशास्त्रामध्ये २०१९ साली नोबेल पारितोषिक देण्यात आले होते. जगातील काही गरीब नागरिकांचे जीवन सुधारण्यास मदत करण्याच्या उद्देशाने लघु-स्तरीय धोरणात्मक हस्तक्षेपांच्या परिणामकारकतेबद्दल जाणून घेण्यासाठी प्रयोगात्मक पद्धती वापरणे हे त्यांचे विशिष्ट योगदान होते. नोबेल पारितोषिक विजेत्यांनी मजबूत संशोधन तंत्र आणि जगातील सर्वात महत्त्वाच्या धोरणात्मक समस्यां सोडविण्यासाठी केलेल्या तंत्राचा केलेला वापर या दोन्हीकरीत अभिजित बॅनर्जी, एमआयटीचे एस्थर डफ्लो आणि हार्वर्डचे मायकेल क्रेमर या तिघांना ओळखले जाते.

साधी यादृच्छिक प्रयोग पद्धती हे विकासाच्या अर्थशास्त्र संशोधनातील एक लोकप्रिय साधन बनले आहे यादृच्छिक प्रयोगांचा मुख्य गुण हा आहे की, संशोधक आणि अंमलबजावणीकर्ते यांच्यातील घनिष्ठ सहसंबंधामुळे, ते प्राचलांच्या अशा अंदाजांना अनुमती देतात ज्यांचे मूल्यांकन करणे शक्य होणार नाही. प्रयोगांच्या संदर्भात उपस्थित केलेल्या चिंतेची चर्चा करून सामान्यतः असा निष्कर्ष काढला जातो की जो जरी वास्तविक असला तरी तो सहसा प्रयोगांसाठी विशिष्ट नसतो. अशावेळी सिद्धांत आणि प्रयोग यांच्यातील संबंधांवर चर्चा करून निष्कर्ष काढले जातात असे मत अभिजित बॅनर्जी आणि त्यांच्या सहकार्यांनी मांडले आहे.

प्रयोगात्मक अर्थशास्त्राची उदाहरणे

प्रयोगात्मक अर्थशास्त्राचा उपयोग विविध धोरणात्मक निर्णयांमध्ये दिसून येतो. उदाहरणार्थ, कार्बन ट्रेडिंग उत्सर्जन योजनांच्या रचनेला प्रयोगशाळेमध्ये जगाच्या वेगवेगळ्या प्रदेशात अर्थशास्त्रज्ञांनी केलेल्या प्रयोगांचा फायदा झाला आहे. राज्यशास्त्राचे वेगवेगळे दृष्टीकोनही प्रयोगातून आणि प्रयोगात्मक अर्थशास्त्राच्या प्रदर्शनातून समोर आलेले दिसून येत आहे. आज अनेक क्षेत्रांमध्ये प्रयोगात्मक पद्धतीचा उपयोग होतांना दिसून येतो. काही आर्थिक क्षेत्रांमध्ये या पद्धतीचा उपयोग होताना दिसून येतो.

खेळ सिद्धांत

खेळ सिद्धांत धोरणात्मक वातावरणातील निर्णयांवर प्रोत्साहन कशा प्रकारे परिणाम करते याचे परीक्षण करण्याकरिता प्रयोगात्मक पद्धती एक उत्तम साधन आहे. आर्थिक वातावरण धोरणात्मक असल्याचे म्हटले जाते जेव्हा एका खेळाडूने घेतलेले निर्णय दुसऱ्या खेळाडूसाठी उपलब्ध असलेल्या संधी आणि मोबदला यावर प्रभाव पाडतात तेंव्हा खेळाडूला आपली रणनीती ठरविण्यासाठी या पद्धतीचा उपयोग होतो. खेळ सिद्धान्तामध्ये प्रयोगात्मक अर्थशास्त्र फार उपयुक्त ठरले आहे. विविध प्रयोगांच्या माध्यमातून आपण प्रतिस्पर्ध्याच्या रणनीती जाणून घेऊ शकतो. सहकार्य खेळ सिद्धांत, अ-सहकार्य खेळ सिद्धांत, नॅश संतुलन यामध्ये ही पद्धती उपयोगी असल्याची अनेक उदाहरणे दिसून येतात.

बाजार संरचनेमध्ये खेळ सिद्धांताचा उपयोग

एडवर्ड चेम्बरलिन यांनी सर्वप्रथम बाजार खेळामध्ये पहिला आर्थिक प्रयोग केला. व्हर्नन स्मिथ यांनी चेम्बरलिनच्या कार्यावरील प्रमुख बाबींमध्ये बदल करीत प्रायोगिक बाजारपेठेतील त्यांच्या सैद्धांतिक स्पर्धात्मक समतोल मूल्यांमध्ये किंमती आणि परिमाणांच्या अभिसरण यावर अग्रगण्य प्रयोग केले. स्मिथने "खरेदीदार" आणि "विक्रेते" यांच्या वर्तनाचा अभ्यास केला, त्यांना ते एखाद्या काल्पनिक वस्तूचे किती "मूल्य" देतात हे सांगितले जाते आणि नंतर विविध वास्तविक जागतिक बाजार संस्थांच्या नियमांचे पालन करून या वस्तूंवर स्पर्धात्मकपणे "बोली" लावण्यास सांगितले जाते. (स्मिथला असे आढळून आले की केंद्रीकृत बाजारपेठांमध्ये परिपूर्ण स्पर्धेच्या अनेक गृहितकांना पूर्ण न करता खरेदी-विक्री केलेल्या किमती आणि परिमाण यांचा अंदाज परिपूर्ण स्पर्धेच्या आर्थिक सिद्धांताद्वारे वर्तविला जाईल.

व्हर्नन स्मिथ यांनी इतर सहकार्यांसह अनेक वर्ष अर्थशास्त्रातील नियंत्रित प्रयोगशाळेच्या प्रयोगांचा वापर केला आणि अर्थशास्त्र आणि इतर संबंधित क्षेत्रांमध्ये ते एक वैध साधन म्हणून स्थापित केले. कॅलिफोर्निया इन्स्टिट्यूट ऑफ टेक्नॉलॉजीचे चार्ल्स प्लॉट यांनी १९७० च्या दशकात स्मिथसोबत सहकार्य केले आणि राज्यशास्त्रातील प्रयोग तसेच आर्थिक रचना किंवा अभियांत्रिकी धोरणांची माहिती देण्यासाठी प्रयोगांचा वापर केला. पुढे २००२ मध्ये, स्मिथला अनुभवजन्य आर्थिक विश्लेषणामध्ये, विशेषत: पर्यायी बाजार यंत्रणेच्या अभ्यासात प्रयोगशाळेतील प्रयोग स्थापित केल्याबद्दल आर्थिक विज्ञानातील नोबेल पारितोषिक देण्यात आले.

वित्तीय बाजार

वित्तीय बाजार हा जोखीम पूर्ण असतो. बाजारातील चढ उतारांचा योग्य अभ्यास केल्यास नफा प्राप्त केल्या जाऊ शकतो. आज बाजारपेठेमध्ये गुंतवणुकीची अनेक साधने उपलब्ध आहेत. परंतु प्रत्येकालाच या साधनांचा उपयोग करून नफा मिळविता येतोच असे नाही. शेअर बाजारामध्ये काहींना नफा मिळतो तर काहींना नुकसान होते. एखादा शेअर विशिष्ट किमतीला खरेदी केला आणि बाजाराची स्थिती त्या शेअरकरिता समाधानकारक असेल तर त्या शेअरमध्ये नफा मिळविता येतो. याकरिता बाजाराचे योग्य ज्ञान असणे आवश्यक आहे.

सामाजिक प्राधान्ये

"सामाजिक प्राधान्ये" हा शब्द समाजामध्ये लोकांना एकमेकांबद्दल असलेले हित, नातेसंबंध, चिंता सूचित करतो आणि यामध्ये प्रेम, दया, माया, परोपकार, द्वेष, समानतेची आणि परस्परसंवादाची अभिरुची यांचा समावेश होतो. सामाजिक प्राधान्यांवरील प्रयोग सामान्यतः हुकूमशहा खेळ, अल्टिमेटम खेळ, विश्वास खेळ, भेटवस्तू-विनिमय खेळ, सार्वजनिक वस्तूंचा खेळ आणि अंतर्भूत घटकांमधील बदलांसह आर्थिक खेळांचा अभ्यास करतात. सामान्य भाषेत सांगायचे म्हणजे मनुष्य समाजातील विविध चलीरीतींना, सामाजिक कार्यक्रमांना आवश्यक आर्थिक क्रियांना ज्याप्रमाणे प्रतिसाद देतो त्यांचा समावेश यामध्ये केला जातो. प्रायोगिक परिणामांचे एक उदाहरण म्हणून, अल्टीमेटम खेळामध्ये प्रयोगांनी असे दाखवले आहे की लोक सामान्यतः स्वार्थापोटी जिथे जास्त फायदा आहे तिथे जास्त त्याग करतात. हे विचलन विविध संस्कृतींमध्ये कसे बदलते हे आर्थिक प्रयोगांनी मोजण्यास मदत होते.

करार सिद्धांत

करार सिद्धांता मध्ये काही मार्यादेपर्यंत प्रयोगात्मक पद्धतीचा उपयोग केला जाऊ शकतो. बरेचदा काही चल किंवा कराराशी संबंधित काही माहिती सर्व पक्षांद्वारे लपविली जाऊ शकते. त्यामुळे करार सिद्धांतामध्ये तपास करणे कठीण आहे: जर संशोधक संबंधित चलांची पडताळणी करू शकला, तर कराराचे पक्ष चलांवर किंवा माहितीच्या आधारावर करार करू शकतात, म्हणून कोणतीही महत्वपूर्ण करार-सैद्धांतिक समस्या नाहीशी होऊ शकते. तरीही प्रयोगशाळेच्या प्रयोगांमध्ये काही अटींच्या आधारावर करार सिद्धांताची थेट चाचणी केल्या जाऊ शकते. उदाहरणार्थ, संशोधक नैतिक धोका सिद्धांत (Moral Hazard Theory), प्रतिकूल निवड सिद्धांत (Adverse Selection Theory), अनन्य करार (Exclusive Contract), विलंबित भरपाई (Deferred Compensation), होल्ड-अप समस्या (Hold-Up Problem) लवचिक विरुद्ध कठोर करार (Flexible Vs Rigid Contract), आणि अंतर्जात माहिती संरचना असलेले प्रारूप (Endogenous Information Structure Model) यांचा अभ्यास प्रयोगात्मक पद्धतीच्या अंतर्गत करार सिद्धांताद्वारे केला जातो.

प्रतिनिधी **(Agent)**-आधारित संगणकीय प्रारूप

प्रायोगिक परिमाणांसह एजंट-आधारित संगणकीय प्रारूप ही अर्थशास्त्रातील अलीकडील उपयोगात आणली जाणारी महत्वपूर्ण पद्धत आहे. यामध्ये परस्परसंवादी प्रतिनिधींच्या माध्यमातून संपूर्ण अर्थव्यवस्थेमध्ये समाविष्ट गतिशील आर्थिक घटकांचा प्रारूप म्हणून उपयोग केला जातो. याठिकाणी प्रतिनिधींचा उल्लेख वास्तविक मानवाचा नसून परस्परांशी संवाद साधणाऱ्या संगणकीय घटकांचा आहे. यामध्ये गृहीतकृत्यांच्या आधारे निर्धारित परिस्थितीमध्ये प्रतिनिधी संवाद साधतात. यासंवादाच्या आधारे जे निष्कर्ष निघतात त्याचे सामान्यीकरण करण्यात येते.

अभिजित बॅनर्जी यांनी उपयोगात आणलेली प्रयोगात्मक पद्धत

अभिजित बॅनर्जी आणि एस्टर डफ्लो यांनी आपल्या पुअर इकॉनॉमिक्स या ग्रंथामध्ये दारिद्रय कमी करण्यासाठी दारिद्रय आणि दारिद्रय निर्मूलनाच्या विविध प्रयोगांद्वारे अनुभवाधिष्ठित विवेचन केले आहे. ग्रंथामध्ये १० प्रकरणे असून यामध्ये त्यांनी केलेल्या विविध प्रयोगांचे विवेचन केले आहे. २००३ मध्ये त्यांनी अब्दुल लतिफ जामिल दारिद्रय कृती प्रयोगशाळेची स्थापना केली. या प्रयोगशाळेच्या माध्यमातून त्यांनी जगभरामध्ये दारिद्रय निर्मूलनासाठी अनेक प्रयोग अनेक प्रयोग केले. त्यांना दारिद्रय निर्मूलनाच्या कार्यात चांगले यश मिळाले. २०१० पर्यंत त्यांच्या संशोधकांनी ४० देशात २४० यशस्वी प्रयोग केले. विचारसरणी, अज्ञान आणि निष्क्रियता यावरून

आपणास ध्येये का अपयशी ठरतात याचे विवेचन करता येते. त्यांच्यामते दारिद्रय निर्मूलनासाठी पायरी-पायरीने पुढे जाण्याचा दृष्टिकोन अधिक प्रभावी मार्ग आहे.

त्यांनी केलेल्या प्रयोगांवरून आपणास गरीबांचे आर्थिक जीवन समजून घेता येते. गरीबांना कोठे आणि कोणत्या कारणांसाठी मदतीची गरज असते? ते कोणत्या वस्तू खरेदी करतात? मुलांच्या शिक्षणासाठी काय करतात? स्वतःच्या, मुलांच्या आणि पालकांच्या आरोग्यासाठी काय करतात? त्यांना किती मुले असावीत असे वाटते? बाजार व्यवस्था आणि संस्था त्यांच्यासाठी कसे कार्य करतात? सरकार त्यांच्यासाठी काय करते? इत्यादी गरीबांच्या कौटुंबिक जीवनाचे आवश्यक पैलू अभिजित बॅनर्जी आणि त्यांच्या सहकार्यांनी उलगडले आहेत.

अभिजित बॅनर्जी आणि त्यांच्या संशोधकांनी केलेल्या प्रयोगांवरून गरीबांचे जीवन आणि त्यांच्या आवडीनिवडी तसेच त्या आधारावर जागतिक दारिद्र्याचे कसे निर्मूलन करावे हे समजते. आपणास अनेक प्रश्न समजून घेण्यास मदत होते. गरीबांची मुले अनेक वर्षे शाळेत जाऊनही त्यांना काहीच समजत नाही. त्यांना आरोग्य विम्याची आवश्यकता का नसते? अल्प अनुदान त्यांच्यासाठी कसे लाभदायक ठरू शकते. अनेक देशांमध्ये राबविलेल्या प्रयोगांवरून असे स्पष्ट होते की आशा ही ज्वलंत आणि ज्ञान महत्त्वपूर्ण असते. आव्हाने मोठी असली तरी आपण प्रयत्न करीत राहिले पाहिजे. यश जरी फार दूर वाटत असले तरी ते तितके दूर नसते. भारतासारख्या अनेक विकसनशील देशांमध्ये प्रयोगात्मक संशोधन पद्धती किती उपयोगी आणि प्रभावी आहे हे यासारख्या प्रयोगांवरून सिद्ध होते.

दैनंदिन जीवनातील अनुभव - साबणाचा पुनर्जन्म

आपण दैनंदिन जीवनामध्ये कळत नकळत प्रयोगात्मक पद्धतीचा अवलंब करीत असतो. आपल्या अवतीभवती घडणाऱ्या अनेक घटनांमधून आपण बोध घेत असतो. साध्या या आणि छोट्या छोट्या अनेक घटनांमधून निरीक्षणाच्या आधारे किंवा छोट्या छोट्या क्रिया मधून एखादी मोठी घटना नकळत घडून जाते. उदा. हॉटेल रूम मध्ये चेक इन केल्यानंतर, बॅग्ज ठेवून आपण सहसा पहिल्यांदा वॉशरूम कडे वळतो आणि बाथरूमजवळ ठेवलेला आकर्षक पॅकिंग मधला साबण वापरतो. १-२ दिवस वापरून ग्राहक साबण तसाच ठेवतात (काही ग्राहक घरी पण नेतात !) आणि त्या उरलेल्या साबणाची विल्हेवाट लावण्याची जबाबदारी हॉटेल्स कडे येऊन पडते. भारतात साधारण ५०००० हॉटेल्स असतील प्रत्येक हॉटेल मध्ये सरासरी १० रूम्स धरल्या तर एकूण ५ लाख रूम्स आहेत. ७०% अधिग्रनाच्या दराने साधारण ३.५ लाख रूम्स दररोज वापरल्या जातात म्हणजेच दररोज ३.५ लाख साबण थोडेसे वापरून फेकून दिले जाते. या साबणांचं काय करायचं ? पण १४ वर्षांपूर्वी अमेरिकेत एका माणसाला हा प्रश्न पडला. त्याने साबणाला पुनर्जन्म दिला. अमेरिकेतील शॉन सिपलर ने थोडी आकडेमोड केली आणि त्याला लक्षात आलं की लाखो साबण दररोज फेकले जात आहेत. एका महिन्यातच शॉन हजारो असे साबण घेऊन आला आणि मित्रांच्या साहाय्याने आपल्या गॅरेज मध्येच एक छोटेखानी वर्कशॉप सुरु केले. त्याने या उरलेल्या लागलासाबणांना वितळून पुन्हा साबण तयार केले आणि ते गरीब व गरजू लोकांना वाटून दिले. शॉनच्या वाचनात हे आले होते की जगभरात दररोज सुमारे ९००० बालके अस्वच्छतेमुळे होणाऱ्या आजारांमुळे मरण पावतात. यापैकी निम्म्याहून जास्त मृत्यू केवळ नियमित हात धुतल्याने टाळता येऊ शकतात. आपण तयार केलेले साबण अनेक गरीब देशांतील या बालकांपर्यंत पोहोचविण्याचा शॉनचा प्रयत्न होता. यासाठीच त्याने 'क्लीन द वर्ल्ड' नावाची संस्था सुरु केली.

हजारो हॉटेल्स मधून साबण गोळा करून, प्रोसेस करून , दूरवरच्या अनेक देशांत पोहोचविण्याच्या दृष्टीने कठीण होते आणि यासाठी पैसा उभारावा लागणार होता. देणगी देणाऱ्या अनेक संस्थांकडे त्याने प्रयत्न केले पण पैसे उभे करणे जमत नव्हते. तेव्हाच शॉन सिपलर ने एक उबर सारखे नवीन बिझनेस मॉडेल वापरायचे ठरवले. 'क्लीन द वर्ल्ड' हा हॉटेल्स आणि गरजू बालके याना जोडणारा प्लॅटफॉर्म आहे. शॉनने 'क्लीन द वर्ल्ड' मध्ये सहभागी होणाऱ्या

हॉटेल्सना प्रत्येक रूममागे १ डॉलर प्रति महिना अशी नाममात्र फी आकारायला सुरुवात केली. या फी मध्ये हॉटेल्सना तीन फायदे झाले. पहिला म्हणजे साबणाची विल्हेवाट लावण्याच्या जबाबदारीतून मुक्ती, दुसरा म्हणजे पर्यावरणाच्या दृष्टीने शाश्वत लक्ष्ये पूर्ण करण्यासाठी मदत आणि तिसरा म्हणजे हॉटेलचा सामाजिक प्रभाव दाखविण्याची सोय !

त्याने युनिसेफच्या मदतीने गावातील आरोग्य केंद्रे, शाळा आणि इतर संस्थांना हे साबण पाठविण्याची सोय केली. जगभरात ८ पेक्षा जास्त देशांत साबण तयार करून १२७ देशांत सात करोड साबण आतापर्यंत त्यांनी पोहोचवले आहेत आणि हे करत असताना समुद्रात/जमिनीत जाणारा २३ मिलियन पाउंड कचरा कमी केला आहे. सीरिया मधील रेफ्युजी, सोमालिया, बांगलादेश, पाकिस्तान, झाम्बिया, होन्डुरास हे आफ्रिकन देश सगळ्यात मोठे लाभार्थी ठरले आहेत.

निष्कर्ष

आज जग भरामध्ये अनेक आर्थिक समस्या सोडविण्याकरिता सिद्धांताबरोबरच प्रयोगात्मक पद्धतीचा उपयोग होत असल्याचे दिसून येते. या दोन्हीचा सोबत उपयोग अधिक उपयोगी ठरला आहे. साहित्याच्या प्रगतीसोबत प्रयोगांच्या माध्यमाने सोडविल्या जाणाऱ्या समस्यांची व्याप्ती वाढत असल्याचे दिसून येत आहे. एवढेच नाही तर प्रयोगात्मक पद्धतीने सोडविलेल्या परिणामांची स्वीकृती सर्वच स्तरावर होत आहे. आज जगात अनेक देशांमध्ये प्रयोगात्मक पद्धतीच्या माध्यमातून समस्या सोडविण्याचा किंवा अनेक समस्या सोडविण्याकरिता या पद्धतीचा उपयोग केला जात आहे.

इतर देशांप्रमाणे भारतातही आज धोरणकर्ते आणि संशोधक विद्यार्थी चौकटीच्या बाहेर विचार करण्यासाठी एकत्र काम करतात आणि यश आणि अपयशातून शिकतात तसेच "सर्जनशील प्रयोग" ची ही प्रक्रिया अवलंबितात हे अर्थशास्त्रातील प्रायोगिक कार्यात अलीकडील काळात वाढ होण्याचे मुख्य कारण आहे.

ग्रंथ सूची

1. Chamberlin, E. (1948), “An experimental imperfect market”, Journal of Political Economy 56, April, 95-108.Smith Vernon L.,(1989), “Theory, Experiment and Economics,” Journal of Economic Perspectives, Vol. 3, Number I, winter, Pp. 151-169.
2. **Smith, V.L. (1989). Experimental Methods in Economics. In: Eatwell, J., Milgate, M., Newman, P. (eds) Allocation, Information and Markets. The New Palgrave. Palgrave Macmillan, London. https://doi.org/10.1007/978-1-349-20215-7_10**
3. Banerjee Abhijit and Ester Duflo,(2009) “The Experimental Approach to Development Economics,” the annual review of Economics is online at econ.annualreviews.org, April 21.
4. Sugden Robert, (2006), “The Changing Relationship between Theory and Experiment in Economics,” Philosophy of Science, Vol. 75, No. 5, Proceedings of the 2006 Biennial Meeting of the Philosophy of Science AssociationPart II: Symposia PapersEdited by Cristina Bicchieri and Jason Alexander (December 2008), pp. 621-632.
5. माहोरे, आर. वाय., (2022), “अभिजित बॅनर्जी आणि इस्थर डिफ्लो यांच्या Poor Economics (Rethinking Poverty and the ways to end it) या ग्रंथातील विचार” , अर्थमिमांसा, जानेवारी - जून 2022, खंड 14, अंक 1, पृ. क्र. 10-19.

अर्थशास्त्रीय प्रायोगिक पद्धती आणि उपभोक्त्याच्या वर्तनाचे विश्लेषणात्मक अध्ययन.....

डॉ.विनोद आत्माराम नन्नवरे
अर्थशास्त्रविभाग प्रमुख
डॉ.अण्णासाहेब जी.डी.बेंडाळे
महिला महाविद्यालय, जळगाव
आजीव सभासद क्र-1752
Mail Id - vinodnannavare88@gmail.com

प्रस्तावना -

अर्थशास्त्राचा मुख्य अभ्यासविषय "दुर्मिळ साधन संपत्तीचे विवेकपूर्ण व्यवस्थापन" हा आहे. कारण वास्तविक अर्थशास्त्राच्या मुख्य अभ्यास विषयात वस्तूचे उत्पादन, विभाजन, विनिमय व उपभोग हे भाग आहेत. आणि त्यामुळे मानवी वर्तनाचा अभ्यास करत असतांना व्यक्ती वर्तन कोणत्या परिस्थितीत कसे बदलते. व त्याचा परिणाम त्याच्या खरेदी शक्तीवर कसा होतो. व्यक्ती वेगवेगळ्या परिस्थितीत व्यक्ती वर्तन हे कशा पद्धतीचे असेल आणि तो कशा पद्धतीने आपल्या स्वभावात आपल्या वर्तणुकीत बदल करेल याचे अध्ययन करणारे शास्त्र म्हणजे अर्थशास्त्र आहे. म्हणूनच अर्थशास्त्र विज्ञान आहे की कला याचा ज्यावेळेस अर्थशास्त्राचे अभ्यासक अभ्यास करतात. त्यावेळेस लक्षात येते की, अर्थशास्त्रात इतर परिस्थिती कायम असेल तर अर्थशास्त्राचे नियम विज्ञानाप्रमाणे सत्य ठरतात. आणि त्यामुळेच अर्थशास्त्र हे विज्ञान ठरते. परंतु ते नियम वास्तवात आण्यासाठी कलेची जोड मिळाली तर अर्थशास्त्र काही अंशी विज्ञान तर काही अंशी कला ठरते. ज्या पद्धतीने ते विज्ञान ठरते त्या पद्धतीनेच ते कला देखील ठरते कारण अर्थशास्त्रात कशा पद्धतीने जीवन पद्धती व्यतीत केली पाहिजे कशा पद्धतीने जीवन जगले पाहिजे याचे अत्यंत महत्वपूर्ण अध्ययन करता येते आणि त्यामुळेच अर्थशास्त्र काही अंशीकला देखील आहे.आणि म्हणूनच अर्थशास्त्र काही अंशी विज्ञान व काही अंशी कला आहे. त्यामुळेच सदरील संशोधन करत असताना अर्थशास्त्र हे प्रायोगिक आहे. हेआजच्या परिस्थितीत ते फक्त उपभोक्ता वर्तनाच्या संदर्भात किंवा व्यक्ती उत्पन्नाच्या संदर्भात किंवा व्यक्तीच्या खर्च करण्याच्या प्रवृत्तीत झालेल्या वाढीच्या संदर्भात संशोधक अभ्यासणार आहे. कारण अलीकडील काळात व्यक्तीचे उत्पन्न ज्या पद्धतीने वाढत आहे. त्या पद्धतीने किंवा त्यापेक्षा कितीतरी पटीने महागाई वाढलेली आपल्याला दिसून येते. महागाई सोबतच अनेक वस्तू व सेवांचे किमती या वाढलेल्या दिसून येतात. त्यामुळेच अर्थशास्त्र जे आपल्याला सांगते की, वस्तूची किंमत वाढली म्हणजेत्या वस्तूला असणारी मागणी कमी केली जाते परंतु आजची परिस्थिती लक्षात घेता अनेक व्यक्ती किंवा उपभोक्ते अनेक वस्तूंच्या किमती या वाढत असताना देखील सातत्याने वाढत्या किमतीचा कोणत्याही प्रकारे विचार नकरता त्याला मोठ्या प्रमाणात मागणी करताना दिसून येत आहेत. याचाच अर्थ आजच्या परिस्थितीत हे जे आपल्याला अलीकडील काळात दिसून येत आहे. तो प्रायोगिक अर्थशास्त्राचा एक भाग आहे की, अनुकरणशिलतेचा प्रभाव आहे. हे अभ्यासणे संशोधकाच्या दृष्टीने महत्त्वपूर्ण ठरते. कारण अलीकडील काळात अर्थशास्त्रातील ड्युजेनबेरी यांचा प्रदर्शन परिणामाचा सिद्धांत व्यक्तीची खरेदी शक्ती मोठ्या प्रमाणात वाढवण्यासाठी कारणीभूत ठरत आहे. परिणामी व्यक्तीला आपले जीवन जगत असतांना अनेक समस्यांना सामोरे जावे लागत आहे. उदा.दारिद्र्यात होणारी वाढ हि काही प्रमाणात प्रदर्शन परिणामाचे देखील फलित

असल्याचे आपल्याला दिसते कारण अनुकरण शीलतेमुळे व्यक्ती आपल्या अल्प उत्पन्नाच्या आधारे देखील अत्यंत महागड्या वस्तू खरेदी करणे पसंत करतो किंवा आपल्या आवाक्या बाहेरच्या वस्तूंना पसंती दर्शवितो. त्यामुळेच उत्पन्न कमी आणि खर्च जास्त अशी परिस्थिती निर्माण होऊन दारिद्र्याच्या दृष्ट चक्रात तो अडकत जातो.

आर्थिक प्रवैगिक (Economic Dynamic)प्रवैगिक ह्या शब्दाचा पदार्थविज्ञानशास्त्रातील अर्थ सातत्याने होणाऱ्या बदलाची अवस्था (Position of continuous change)किंवा विश्रांतीचा अभाव (Absence of rest)असा आहे. तर अर्थशास्त्रात प्रवैगिक शब्दाचा अर्थ आर्थिक उत्क्रांती असा केलेला आहे.

आर्थिक प्रवैगिकाची व्याख्या:-

आर्थिक प्रवैगिक अशी पद्धती आहे की, ज्या पद्धतीत सर्व बदल, कालविलंबना (Time lags)क्रम, एकत्रित परिमाणे आणि अपेक्षा यांची मोजणी करून विश्लेषण केले जाते. याविश्लेषण पद्धतीत इतर परिस्थिती समान असताना (Ceteris Peribus) गृहित नकरता विवेचन केले जाते. आर्थिक प्रवैगिकाच्या निरनिराळ्या अर्थशास्त्रज्ञांनी केलेल्या व्याख्या खालीलप्रमाणे आहेत.

प्रो. लिप्से –

अर्थव्यवस्थेच्या वर्तणुकीचा असंतुलनाच्या परिस्थितीतील अभ्यास म्हणजे आर्थिक प्रवैगिकी होय.

प्रो. रेग्नर फ्रिच-

एखादी विश्लेषण पद्धती प्रवैगिक तेव्हाच असते की, जेव्हा त्या विश्लेषण पद्धतीची वर्तणूक निरनिराळ्या कालावधीतील अस्थिरांच्या फलनात्मक संबंधाने दर्शविली जाते.

प्रवैगिक पद्धतीच्या यानिरनिराळ्या व्याख्यांवरून असाच अर्थबोध होतो की, प्रवैगिक पद्धती ही अर्थव्यवस्थेच्या बदलत्या स्वरूपाचे अध्ययन करणारी पद्धती आहे. व्यष्टी अर्थशास्त्रात प्रवैगिक विवेचनाचे उदाहरण किंमतीच्या मागणी व पुरवठ्याशी असलेल्या संबधाद्वारे देता येईल.

तुलनात्मक किंवा सापेक्ष उत्पन्न गृहीतक -

सापेक्ष उत्पन्न गृहीतक ब्रॅडी, फ्रीडमन व ड्युजेनबेरी यांनी विकसित केले. ड्युजेनबेरी यांनी 1949 मध्ये त्यांच्या Income, Saving & The Theory of Consumer या पुस्तकात मांडली. आणि त्यात त्यांनी म्हटले की,उपभोग खर्च हा स्वतंत्रपणे/ स्वायत्तपणे केला जातो. उपभोग खर्चात त्वरित बदल केले जातात. यासंदर्भात ड्युजेनबेरी यांनी म्हटले आहे की, प्रत्येक व्यक्तीचे उपभोग वर्तन स्वतंत्र नसून त्याच्यावर दुसऱ्या व्यक्तीच्या उपभोगाचा वर्तनाचा परिणाम होतो.असे म्हटले आहे.

सापेक्ष उत्पन्नाचीतुलना करता व्यक्तीच्या उत्पन्नात झालेला बदल होय. ही संकल्पना पुढील प्रमाणे उदाहरणाने स्पष्ट करता येते. समजा, 'अ' व 'ब' यादोन व्यक्ती आहेत. 'अ' व्यक्तीच्या उत्पन्नात व 'ब' व्यक्तीच्या उत्पन्नात वाढ झाली आहे. समजा, 'अ' व्यक्तीच्या उत्पन्नात तुलनेने अधिक वाढ झाली आहे व 'ब' व्यक्तीने आपला उपभोग बदललेला नाही तेव्हा 'अ' व्यक्ती उपभोग विषयक निर्णय घेताना केवळ आपल्या उत्पन्न पातळीतील बदल विचार घेतो असे नाही तर 'ब' व्यक्तीने आपल्या उपभोगात फार मोठे बदल केले नसतील तर 'अ' व्यक्ती देखील आपल्या उपभोगात फार मोठे बदल करत नाही. थोडक्यात, व्यक्ती आपले उपभोग निर्णय केवळ आपल्या निरपेक्ष उत्पन्ना नुसार घेत नसून इतर व्यक्तीच्या उत्पन्नाशी तुलना करून सापेक्ष उत्पन्नानुसार घेत असते.

अनुकरण परिणाम:

उपभोग खर्च हा केवळ त्या कुटुंबाच्या उत्पन्न पातळीवर अवलंबून असत नाही, तर दुसऱ्याच्या उच्च उपभोग वर्तवणुकीचा त्यांच्यावर प्रभाव पडत असतो. श्रीमंत वर्गाची सरासरी उपभोग प्रवृत्ती ही कमी

असते, तर गरीब वर्गाची सरासरी उपभोग प्रवृत्ती अधिक असते. कमी उत्पन्न गटातील कुटुंबे नेहमी उच्च उत्पन्न गटातील कुटुंबाच्या उपभोग सवयीकडे आकर्षित होतात व त्यांचे अनुकरण करतात / श्रीमंत व्यक्तीच्या जीवनस्तराचे अनुकरण करतात. श्रीमंत व्यक्तीच्या जीवनस्तराचे अनुकरण करण्याच्या या सवयीला अनुकरण परिणाम म्हणतात. या प्रवृत्तीमुळेच गरीब गटातील व्यक्ती आपल्या उत्पन्नातील मोठा हिस्सा उपभोगावर खर्च करतात. म्हणूनच अविकसित देशांतील सरासरी उपभोग प्रवृत्ती अधिक व श्रीमंत देशांतील सरासरी उपभोग प्रवृत्ती कमी असते.

उद्दिष्टे :-

1. प्रदर्शन परिणाम वस्तूच्या किमती वाढविण्यास कारणीभूत ठरतो का हे अभ्यासणे.
2. वस्तूंच्या किमती वाढल्यास व्यक्तीची बचत प्रवृत्ती कमी होते का हे अभ्यासणे.

गृहीतके :-

1. प्रदर्शन परिणाम वस्तूच्या किमती वाढविण्यास कारणीभूत ठरतो.
2. वस्तूंच्या किमती वाढल्यास व्यक्तीची बचत प्रवृत्ती कमी होते.

संशोधन पद्धती :-

सदर शोधनिबंध विषयाचा अभ्यास करण्यासाठी संशोधकाने प्राथमिक साधन सामुग्रीचा आधार घेऊन प्रश्नावलीच्या सहाय्यानेत्याचबरोबरदुय्यम साधन सामुग्रीचा आधार घेऊन माहिती प्राप्त केलेली आहे. आणि सदर संशोधन पेपर हा तयार केला आहे. या संशोधनात प्रामुख्याने विविध संदर्भ ग्रंथ, वर्तमान पेपर, विविध मासिके, त्रैमासिक, साप्ताहिके,संशोधन पेपर, इन्टरनेट यांच्या सहाय्याने अध्ययन केले आहे.

नमुना निवड :-

नमुना निवड करतांना यादृच्छिक नमुना निवड पद्धतीच्या आधारे संशोधकाने वेगवेगळ्या क्षेत्रातील 30 उपभोक्त्याची निवड नमुना म्हणून केली. आणि यात प्रामुख्याने विद्यार्थी, श्रमिक, शेतकरी, बँकिंग कर्मचारी, खाजगी क्षेत्रात काम करणारे, कर्मचारी, प्राध्यापक, इत्यादी. व्यक्तीची निवड संशोधकाने केलेली आहे.

तक्ताक्र.1

प्रदर्शन प्रभावाचा व्यक्तीच्या राहणीमानावर व किमतीवर होणारा परिणाम

अ.क्र.	तपशिल	वारंवारिता	टक्केवारी
1.	होय	24	80.00
2.	नाही	05	16.70
3.	निश्चित सांगता येत नाही	01	03.30
एकुण		30	100.00

स्त्रोत- संकलित प्राथमिक माहितीच्या आधारे



वरील क्र.1 तक्त्यामध्ये संशोधकाने उपभोक्त्यावर प्रदर्शन प्रभावाचा परिणाम आपल्या राहणीमानावर होतो काय तसेच प्रदर्शन प्रभावामुळे वस्तूचे किमतीत वाढ होते काय, याची माहिती मिळविण्यासाठी सदर प्रश्न उपस्थित केला आहे. आणि त्यासाठी संशोधकाने होय, नाही आणि निश्चित सांगता येत नाही असे तीन वेगवेगळे पर्याय उपलब्ध करून दिले. होते त्यात होय असे मत व्यक्त करणाऱ्या उपभोक्त्यांची संख्या 80 टक्के इतकी असून नाही असे मत व्यक्त करणाऱ्या उपभोक्त्यांची संख्या 16.70% इतकी होती. तर निश्चित सांगता येत नाही असे मत व्यक्त करणाऱ्या उपभोक्त्यांची संख्या 3.30% इतकी आहे.

यावरून असे दिसून येते की, प्रदर्शन प्रभावाचा व्यक्तीच्या राहणीमान व किमतीवर परिणाम होतो. परंतु उपभोक्त्यावर होणाऱ्या प्रदर्शन परिणाम किंमत प्रभावा पेक्षा जास्त प्रभावी आहे. आणि याची माहिती प्रत्येक उपभोक्त्याला आहे की इतर व्यक्तींचे अनुकरण केल्यास आपल्या खर्चावर तसेच वस्तूच्या किमतीत वाढ होण्यावर त्याचा परिणाम दिसून येतो.

तक्ता क्र.2

प्रदर्शन परिणामामुळे वस्तूच्या उपभोग क्षमतेत होणारा बदल

अ.क्र.	तपशिल	वारंवारिता	टक्केवारी
1.	होय	21	70.00
2.	नाही	07	23.30
3.	निश्चित सांगता येत नाही	02	06.70
एकुण		30	100.00

स्त्रोत- संकलित प्राथमिक माहितीच्या आधारे



वरील क्र.2तक्त्यामध्ये संशोधकाने प्रदर्शन परिणामामुळे वस्तूच्या उपभोग क्षमतेत काही बदल होतो का याबाबतची माहिती मिळवण्यासाठी सदर प्रश्न वेगवेगळे तीन पर्यायाच्या माध्यमाने उपलब्ध करून दिले. त्यातहोय, नाही तसेच निश्चित सांगता येत नाही असे पर्याय उपलब्ध करून दिले होते या संदर्भातील उपभोक्ता आपले मत व्यक्त करत असताना प्रदर्शन परिणामामुळे वस्तूच्या उपक्षमतेत बदल होतो असे मत 70% उपभोक्त्यांनी व्यक्त केलेअसुन, 23.30% उपभोक्त्यांनी नाही असे मत व्यक्त केले, तर06.70% उपभोक्त्यांनी याबाबत निश्चित सांगता येत नाही असे मत व्यक्त केलेले आहे.

यावरून असे लक्षात येते की प्रदर्शन प्रभावाचा उपभोक्त्याच्या उपभोग प्ररुत्तीवर परिणाम हा होत असतो. व उपभोक्त्याची उपभोग प्रवृतीत वाढ होत असते. आणि याची माहिती एक उपभोक्ता म्हणून बहुतांशी व्यक्तींना आहे.

तक्ता क्र.3

प्रदर्शन परिणामामुळे वस्तूच्या किमतीवर होणारापरिणाम

अ.क्र.	तपशिल	वारंवारिता	टक्केवारी
1.	वस्तूची मागणी वाढते	27	90.00
2.	वस्तूची मागणी घटते	00	00.00
3.	वस्तूची मागणी स्थिर राहते	00	00.00
4.	निश्चित सांगता येत नाही	03	10.00
एकुण		30	100.00

स्त्रोत- संकलित प्राथमिक माहितीच्या आधारे

वरील तक्ता क्रमांक 03मध्ये संशोधकांनी प्रदर्शन परिणामामुळे वस्तूच्या किमतीवर काही परिणाम होतो का, याची माहिती मिळावी याहेतूने सदर प्रश्न उपस्थित केला. त्यासाठी किमतीवर होणारा परिणाम वेगवेगळे बहुपर्यायी चार प्रश्न उपस्थित केले.आणि त्यानंतर माहिती मिळवल्या नंतर असे दिसूनआले की, प्रदर्शन परिणामा मुळे वस्तूच्या किमतीवर होणारा परिणाम काय आहे किंवा कसा होतो हे माहिती केले असता वस्तूची मागणी वाढते असे मत व्यक्त करणारे उपभोक्त्यां व्यक्तींची संख्या 90% इतकी होती. तर निश्चित सांगता येत नाही असे मत व्यक्त करणाऱ्यांची 10% इतकी दिसून आली. तर वस्तूची मागणी घटते किंवा वस्तूची मागणी स्थिर राहते असे एकही उपभोक्त्याने आपले मत व्यक्त केलेले नाही.

यावरून असा निष्कर्ष निघतो की, प्रदर्शन परिणामा मुळे उपभोग प्रवृतीत वाढ झाल्याने वस्तूच्या गणित वाढ होऊन किंमत पातळीत वाढ होते. आणि असे असतांना देखिल अनेक उपभोक्ते वस्तूंना मागणी करतात.

तक्ता क्र.4

प्रदर्शन परिणाम आणि उत्पन्न व खर्च विषयकस्थिती

अ.क्र.	तपशिल	वारंवारिता	टक्केवारी
1.	होय	16	53.30
2.	नाही	11	36.70
3.	निश्चित सांगता येत नाही	03	10.00
एकुण		30	100.00

स्त्रोत- संकलित प्राथमिक माहितीच्या आधारे



तक्ता क्रमांक 4मध्ये संशोधकाने प्रदर्शन परिणामामुळे उत्पन्न कमी आणि खर्च जास्त अशी परिस्थिती निर्माण होते काय यासंबंधी माहिती मिळवून घेण्यासाठी सदर प्रश्न उपस्थित केला. त्यासाठी बहुपर्यायी अशी तीन पर्याय उपलब्ध करून दिले. त्यात होय, नाही तसेचनिश्चित सांगता येत नाही. असे वेगवेगळे पर्याय उपलब्ध करून दिल्यावरहोय असे मत व्यक्त करणाऱ्यांचे उपभोक्त्याचे प्रमाण 53.30% तर नाही असे मत व्यक्त करणाऱ्यांचे प्रमाण 36.70% तसेच निश्चित सांगता येत नाही असे मत व्यक्त करणाऱ्या उपभोक्त्याचे प्रमाण 10% इतके दिसून आले.

यावरुन संशोधकाला असे लक्षात आले की उत्पन्न हे जरी अल्प आले तरी देखील प्रदर्शन परिणामामुळे व्यक्तीच्या उपभोग खर्चात मोठ्या प्रमाणात वाढहोते आणि म्हणूनच उत्पन्न कमी आणि खर्च जास्त अशी परिस्थिती तयार होते याची जाणीव उपभोक्त्यास देखील दिसून येते.

तक्ता क्र.5

प्रदर्शन परिणाम आणि उपभोक्त्याची बचत प्रवृत्ती

अ.क्र.	तपशिल	वारंवारिता	टक्केवारी
1.	वस्तूचीबचत प्रवृत्ती वाढते	02	06.70
2.	वस्तूचीबचत प्रवृत्ती घटते	23	76.70
3.	वस्तूचीबचत प्रवृत्ती स्थिर राहते	00	00.00
4.	निश्चित सांगता येत नाही	05	16.70
एकुण		30	100.00

स्त्रोत- संकलित प्राथमिक माहितीच्या आधारे

तक्ता क्रमांक5 मध्ये संशोधकाने उपभोक्त्यास प्रदर्शन परिणामामुळे खर्च प्रवृत्ती वाढून बचत प्रवृत्तीवर कसा परिणाम होतो याची माहिती जाणून घेण्यासाठी बहुपर्यायीअसे चार पर्याय उपलब्ध करून दिले त्यात व्यक्तीची बचत प्रवृत्ती वाढते, व्यक्तीची बचत प्रवृत्ती घटते, व्यक्तीची बचत प्रवृत्ती स्थिर राहते किंवा निश्चित सांगता येत नाही असे पर्याय उपलब्ध करून दिले. त्यानंतर असे लक्षात आले की, उपभोक्त्यास प्रदर्शन परिणामामुळे उपभोक्त्याची बचत प्रवृत्ती वाढते असे 6.70% व्यक्तींनी आपले मत व्यक्त केले. तर वस्तूची बचत प्रवृत्ती घटते असे 76.70% व्यक्तींनी मत व्यक्त केले, बचत प्रवृत्ती स्थिर राहते असे एकाही उपभोक्त्याने आपले मत व्यक्त केले नाही. तर निश्चित सांगता येत नाही असे 16.70% उपभोक्त्यांनी आपले मत व्यक्त केले.

यावरून असा निष्कर्ष निघतो की, प्रदर्शन परिणामाच्या प्रभावामुळे व्यक्तीची उपभोग प्रवृत्ती हि बचत प्रवृतीपेक्षा जास्त होते. ज्यामुळे एकूण उपभोक्त्याची बचतीत घट होते.

तक्ता क्र.6

प्रदर्शन परिणाम कोणत्या गटातील व्यक्तींवर सर्वाधिक होतो

अ.क्र.	तपशिल	वारंवारिता	टक्केवारी
1.	कमीउत्पन्न गटातील व्यक्तीवर	12	40.00
2.	उच्चउत्पन्न गटातील व्यक्तीवर	09	30.00
3.	वरील दोन्ही उत्पन्न गटातील व्यक्तीवर	08	26.70
4.	निश्चित सांगता येत नाही	01	03.30
एकुण		30	100.00

स्त्रोत- संकलित प्राथमिक माहितीच्या आधारे



वरील तक्ताक्र 6मध्ये संशोधकाने प्रदर्शन परिणामाचा सर्वाधिक प्रभाव कोणत्या उत्पन्न गटातील व्यक्तींवर सर्वाधिक होतो याची माहिती मिळावी यासाठी बहुपर्यायी असे चार पर्याय उपलब्ध करून दिले.व त्याआधारे असे दिसून आले की,कमी उत्पन्न गटातील व्यक्तींवर 40%, उच्च उत्पन्न गटातील व्यक्तींवर 30 टक्के, कमी उत्पन्न वउच्च उत्पन्न या दोन्ही गटातील व्यक्तीवर2 6.70% तरनिश्चित सांगता येत नाही असे मत 3.30% व्यक्तींनी आपले मत व्यक्त केलेले दिसून येते.

वरील माहितीवरुन असा निष्कर्ष निघतो की, प्रदर्शन परिणामाचा सर्वाधिक परिणाम हा कमी उत्पन्न गटातील व्यक्तींवर होतो व ते आपले अल्प उत्पन्न इतर व्यक्तींच्या राहणीमानामुळे खूप मोठ्या प्रमाणात खर्च करतात. आणि एक प्रकारे आपल्यावर दारिद्र्य हे ओढून घेतात.

तक्ता क्र.7 वाढलेली महागाई आणि उत्पन्न विषयक स्थिती

अ.क्र.	तपशिल	वारंवारिता	टक्केवारी
1.	होय	04	13.30
2.	नाही	25	83.30
3.	निश्चित सांगता येत नाही	01	03.30
एकुण		30	100.00

स्त्रोत- संकलित प्राथमिक माहितीच्या आधारे



वरील तक्ता क्र. 07 मध्ये संशोधकाने अलीकडील काळात जितक्या प्रमाणात महागाई वाढलेली तितक्या प्रमाणत उत्पन्नात वाढ झाली आहे का तसेच प्रदर्शन परिणामाचा आणि महागाईचा काही संबंध आहे का याची माहिती जाणून घेण्यासाठी सदर प्रश्न उपस्थित केला आहे. त्याकरिता तीन वेगवेगळे पर्याय देखील उपलब्ध करून दिले त्यातूनअसे लक्षात आले की, ज्या प्रमाणात महागाई वाढलेली आहे. त्याप्रमाणात उत्पन्नात वाढ झालेली नाहीअसे मत 13.30% व्यक्तींनी व्यक्त केले. तर महागाई वाढलेली आहे परंतु उत्पन्नात तितक्या प्रमाणात उत्पन्नात वाढ झालेली नाही असे मत 83.30% उपभोक्त्यांनी व्यक्त केले असून निश्चित सांगता येत नाही. असे मत व्यक्त करणाऱ्यांची उपभोक्त्यांची संख्या 3.30% इतकी असल्याचे दिसून आले.

यावरून असे दिसून येते की, उपभोक्त्यांस या गोष्टीची जाणीव आहे की जितक्या प्रमाणात महागाई वाढलेली आहे तितक्या प्रमाणात उत्पन्नात वाढ झालेली नाही. तरी देखील आजही उपभोक्ता आपल्या उत्पन्नाच्या तुलनेत खर्च मोठ्या प्रमाणात करतो. आणि त्याचे प्रमुख कारण म्हणजे प्रदर्शन परिणाम हेच असल्याचे दिसून येते.

तक्ता क्र.8

सर्वसामान्य व्यक्तीवर होणारा प्रदर्शन प्रभावाचापरिणाम

अ.क्र.	तपशिल	वारंवारिता	टक्केवारी
1.	होय	17	56.70
2.	नाही	12	40.00
3.	निश्चित सांगता येत नाही	01	03.30
एकुण		30	100.00

स्त्रोत- संकलित प्राथमिक माहितीच्या आधारे



वरीलतक्ता क्र.8मध्ये संशोधकाने सर्वसामान्य व्यक्तींवर प्रदर्शन परिणामाचा सर्वाधिक वापर होतो काय याची माहिती घेण्यासाठी बहुविध असे तीन पर्याय उपलब्ध करून दिले त्यात होय असे मत व्यक्त करणाऱ्यांची संख्या 56.70% इतकी, तर सर्वसामान्य व्यक्तींवर प्रदर्शन प्रवाहाचा परिणाम होत नाही असे मत व्यक्त करणाऱ्यांची संख्या 40% इतकी असल्याची दिसून आले. तर निश्चित सांगता येत नाही म्हणणारऱ्यांचे प्रमाण 3.30% इतके होते.

यावरून असे दिसून येते की, सर्वसामान्य उपभोक्त्यावर प्रदर्शन प्रभावाचा परिणाम या पद्धतीने होतो कि व्यक्ती हा जरी सर्व सामान्य जीवन जगत असला तरी तो आजच्या या आधुनिक तंत्रज्ञानाच्या युगात उपभोक्त्यांना बाजार पेठेत असंख्य विकल्प व उपभोग साधने उपलब्ध आहे. ज्याच्या विक्रीसाठी उद्योग संस्था अनेक मार्गांचा अवलंब करतात. आणि अतितंत्रज्ञानाच्या विकासामुळे अनेक वस्तूचा परीचय आज हा प्रत्येक व्यक्तीला सहज होत आहे. आणि तो आज आपल्याला प्रदर्शन परिणामाच्या स्वरुपात उपभोक्त्यावर होतांना दिसत आहे.

तक्ताक्र. 9 प्रदर्शन परिणामामुळे व्यक्तीची खर्च प्रवृत्ती वाढून कर्जबाजारीपणा विषयक माहिती

अ.क्र.	तपशिल	वारंवारिता	टक्केवारी
1.	होय	14	46.7
2.	नाही	08	26.7
3.	निश्चित सांगता येत नाही	08	26.7
एकुण		30	100

स्त्रोत- संकलित प्राथमिक माहितीच्या आधारे



वरील तक्ता क्र.9 मध्ये संशोधकाने प्रदर्शन परिणामामुळे व्यक्तीचे खर्च प्रवृत्ती वाढवून कर्ज बाजारीपणा वाढतो का, याची माहिती जाणून घेण्यासाठी तीन पर्याय उपलब्ध करून दिले. व त्यातून असे दिसून आले की, प्रदर्शन परिणामामुळे व्यक्तीची खर्च प्रवृत्ती वाढून कर्ज बाजारीपणा वाढतो. असे मत व्यक्त करणाऱ्यांची व्यक्तीची संख्या 46.7% इतकी होती. प्रदर्शन परिणामामुळे व्यक्तीचे खर्च प्रवृत्ती किंवा बाजारीपणा वाढत नाही असे मत व्यक्त करणाऱ्यांचे प्रमाण 26.7% इतकी होती तर निश्चित सांगता येत नाही असे 26.7% व्यक्तींनी सांगितले.

यावरून असे लक्षात येते की प्रदर्शन परिणामामुळे व्यक्तीची खर्च करण्याची प्रवृत्ती वाढून कर्ज बाजारीपणा वाढतो याची जाणीव हि जवळपास बहुतांश उपभोक्त्यास असते.

निष्कर्ष –

1. प्रदर्शन प्रभावाचा व्यक्तीच्या राहणीमानावर व किमतीवर होणारा परिणाम हा खूप जास्त आहे. याची माहिती प्रत्येक उपभोक्त्याला आहे की इतर व्यक्तींचे अनुकरण केल्यास आपल्या खर्चावर तसेच वस्तूच्या किमतीत वाढ होण्यावर त्याचा परिणाम दिसून येतो.

2. प्रदर्शन परिणामामुळे उपभोक्त्याच्या उपभोग क्षमतेत बदल होतो व याची जाणीव एक उपभोक्ता म्हणून असंख्य व्यक्तींना आहे.

3. प्रदर्शन परिणामामुळे उपभोक्त्याच्या उपभोग प्रवृतीत वाढ झाल्याने मागणीत वाढ होऊन किंमत पातळीत वाढ होते. तरी देखिल अनेक वस्तूंना उपभोक्ता मागणी करतो.

4. उत्पन्न हे जरी अल्प आले तरी देखील प्रदर्शन परिणामामुळे व्यक्तीच्या उपभोग खर्चात मोठ्या प्रमाणात वाढ होते. म्हणूनच उत्पन्न कमी आणि खर्च जास्त अशी परिस्थिती निर्माण होते याची जाणीव उपभोक्त्यास देखील दिसून येते.

5. प्रदर्शन परिणामामुळे उपभोक्त्याची बचत प्रवृत्ती घटतेआणि याची जाणीव उपभोक्त्यांना असते.

6. प्रदर्शन परिणामाचा सर्वाधिक परिणाम हा कमी उत्पन्न गटातील व्यक्तींवर होतो ते आपले अल्प उत्पन्न इतर व्यक्तींच्या करत असलेल्या अनुकरणामुळे आपल्या राहणीमाणावर खूप मोठ्या प्रमाणात खर्च करतात. वएक प्रकारे आपल्यावर दारिद्रय हे ओढून घेतात.

7. उपभोक्त्यांस या गोष्टीची जाणीव आहे की जितक्या प्रमाणात महागाई वाढलेलीआहे तितक्या प्रमाणात उत्पन्नात वाढ झालेली नाही. तरीदेखील आजही उपभोक्ता आपल्या उत्पन्नाच्या तुलनेत खर्च मोठ्या प्रमाणात करतो. आणि त्याचे प्रमुख कारण म्हणजे प्रदर्शन परिणाम हेच असल्याचे दिसून येते.

8. मध्यमवर्गीय व्यक्ती एक सामान्य जीवन जगत असला तरी तो आजच्या आधुनिक जगात झालेल्या अतितंत्रज्ञानाच्या विकासामुळे त्यांना अनेक वस्तू व सेवांचा परीचय सहज होतो. व तो उपभोग व प्रदर्शन परिणामाच्या स्वरुपात उपभोक्त्यावर होतांना दिसत आहे.

9. प्रदर्शन परिणामामुळे व्यक्तीची खर्च करण्याची प्रवृत्ती वाढून कर्जबाजारीपणा वाढतो याची जाणीव हि जवळपास बहुतांश उपभोक्त्यास असते.

संदर्भ -

1.प्रा. कृष्णराव पाटील - उच्चतर आर्थिक सिद्धांत – श्री. मंगेश प्रकाशन 23 नवी रामदासपेठ नागपूर - द्वितीय

आवृत्ती -2021

2.डॉ. सुलोचना मानकर, डॉ. प्राची देशपांडे –सूक्ष्म अर्थशास्त्राची मुलतत्वे - विसा बुक प्रकाशन आवृत्ती पहिली –

3. डॉ. जे.एफ.पाटील – साकलिक आर्थिक विश्लेषण – फडके प्रकाशन, कोल्हापूर.

4. स्त्रोत- संकलित प्राथमिक माहितीच्या आधारे

Second Session

पंधरावा वित्त आयोग : केंद्र राज्य वित्तीय संबंधांची चिकित्सा

प्रा. डॉ. रमेश जानकिराम इंगोले
अबड , लोढा आणि जैन वरिष्ठ महाविद्यालय ,
चांदवड , ता. चांदवड , जि. नाशिक -423101
Email : rameshingole358@gmail. Com
मोबा: 9423180876
आजीव सभासद क्र: 1743

प्रस्तावना :

भारतात केंद्र सरकार , राज्यसरकार आणि स्थानिक स्वराज्य संस्था अशी कार्याची विभागणी आहे. आणि राज्य आणि केंद्र यांच्यात समन्वय साधण्याचे काम केंद्र सरकार करते. आपल्या देशात संघराज्य व्यवस्था स्वीकारल्यामुळे घटक राज्ये आणि केंद्र सरकार यांच्यामध्ये वित्तसंबधीचे अथवा उत्पन्नाच्या साधनाचे विभाजन करणे गरजेचे आहे. त्याप्रमाणे आपली आर्थिक विभागणी झालेली आहे. 246 व्या कलमानुसार केंद्र अथवा राज्य यांच्याकडे सातव्या अनुसूचीनुसार समाविष्ट आहेत. मात्र तुटीचा अर्थभरणा फक्त केंद्र सरकारच करू शकते. परकीय कर्ज घेणे हा शासनाचा अधिकार आहे परंतु देशांतर्गत कर्ज शासनाला उभारता येतात पण केंद्र सरकारचे घेतलेले कर्ज जर बाकी असेल तर नविन कर्ज घेतांना केंद्राची परवानगी आवश्यक आहे. आणि 280 व्या कलमानुसार राष्ट्रपती वित्तआयोगाची नेमणूक करतात. असे आयोग राष्ट्रपती दर पाच वर्षांनी नेमतात. कारण प्रत्येक वेळी देशाच्या गरजा बदलतात आणि मग त्यानुसार उत्पन्नाची विभागणी आणि तरतूद करावी लागते. वित्त आयोगाची तरतूद हे भारतीय राज्यघटनेचे महत्वाचे वैशिष्टे मानावे लागेल.

केंद्र –राज्य वित्तीय संबंध :

केंद्र आणि राज्य यांच्यात वित्तीय संबंध आणि अधिकार यांची विभागणी तीन प्रकारे केलेली आहे पहिला केंद्राचे अधिकार , दूसरा राज्याचे अधिकार आणि तिसरा सामायिक म्हणजे दोघांचे अधिकार आणि त्यानुसार वेगवेगळ्या क्षेत्राची विभागणी केली आहे त्यामध्ये प्रथम आपण केंद्राचे अधिकार क्षेत्र पाहू .

केंद्राच्या अधिकारात संरक्षण , सशस्त्र बळ , परराष्ट्र व्यवहार , जहाज वाहतूक , राष्ट्रीय महामार्ग , टपाल व तार , नौकायन आणि हवाई वाहतूक , बिनतारी व तत्सम दळणवळण साधने , चलन व नाणे पद्धती , बँक व्यवसाय व विमा , परराष्ट्र व्यापार , परकीय चलन व परकीय कर्जे , मत्स्यक्षेत्र , जनगणना आणि मध्यवर्ती व घटकराज्य सरकारची हिशोबतपासणी असे अधिकार केंद्राचे आहेत.

घटक राज्याचे अधिकार :- पोलिस शासकीय सुव्यवस्था , आरोग्य , सफाई , रुग्णालये व दवाखाने , अपंगांना मदत , रस्ते व पूल , शेती व सिंचन , जंगले आणि अंतर्गत व्यापार इत्यादी. आता आपण सामायिक सूचीमध्ये काही अधिकार आहेत की, ज्यामध्ये केंद्र आणि राज्य सरकार असतात त्यात आर्थिक व सामाजिक नियोजन , फौजदारी कायदा , दिवाळखोरी व नादारी , औद्योगिक कामगार कलह , सामाजिक सुरक्षा व सामाजिक विमा , किंमत –नियंत्रण आणि अन्य वस्तूंची भेसळ आणि शिक्षण असे अधिकार आहेत.

भारतीय संविधानाच्या कलम 280 आणि 281 मध्ये याचा उल्लेख आहे . संसदेप्रमाणे वित्त आयोगाच्या सदस्याची पात्रता निर्धारित करतांना 1951 च्या अधिनियमानुसार खालीलप्रमाणे निश्चित केली आहे त्यामध्ये अध्यक्ष हा समाजाच्या समस्या चांगल्या प्रकारे माहीत असणारा असावा. आणि इतर जे चार सदस्य

असतात त्यांची पात्रता ही उच्च न्यायालयाचे न्यायाधीश असण्याची पात्रता असावी आणि आणि त्यांना प्रशासन आणि आर्थिक ज्ञान असावे म्हणजेच ते अर्थशास्त्राचे तज्ञ असावे. वित्त आयोग आपला अहवाल देशाच्या राष्ट्रपतीला सुपूर्त करतो आणि आणि वित्त आयोगाने केलेल्या सर्व शिफारशी या सल्लागार सारख्या असतात आणि त्या सरकारवर बंधनकारक नसतात त्या सरकारला योग्य वाटल्या तर सरकार त्या स्वीकारू शकते नसता नाही असे स्वरूप त्यांचे असते. या 15 व्या वित्त आयोगाची स्थापना 22 नोव्हेंबर 2017 मध्ये झाली. आणि या वित्त आयोगाचा कार्यकाळ हा 2020-25 असा आहे.

पहिल्या वित्त आयोगाचे अध्यक्ष हे के.सी. नोयोगी होते आणि 15 व्या वित्त आयोगाचे अध्यक्ष हे श्री. एन.के. सिंह यांना नियुक्त केले आहे. हे भारत सरकारचे निवृत्त सचिव आहेत आणि 2008-2014 पर्यन्त बिहार मधून राज्यसभा सदस्य होते. आणि इतर सदस्यामध्ये डॉ. अनुप सिंह , डॉ. अशोक लाहीडी ,डॉ. रमेश चंद्र अशी नांवे आहेत.

भारतातील केंद्र –राज्य संबंधाचा पुढील प्रमाणे अभ्यास केला जाऊ शकतो

1: विधीमंडळ संबंध

2: प्रशासकीय संबंध

3: वित्तीय संबंध

वित्त आयोग कलम (280):

केंद्र आणि राज्यामध्ये कर महसुलाचे पुनर्विवितरण करण्यासाठी राष्ट्रपतीद्वारे दर पाच वर्षांनी वित्त आयोगाची स्थापना केली जाते. वित्त आयोग राष्ट्रपतींना पुढीलप्रमाणे शिफारस करू शकतो:-

1: कराच्या निव्वळ उत्पन्नाचे केंद्र आणि राज्ये यांच्यात वाटप करणे आणि अशा उत्पन्नाच्या संबांधित समभागाचे राज्यांमध्ये वाटप ;

2: भारताच्या एकत्रित निधीतून राज्यांच्या महसुलाच्या अनुदानाचे नियमन करणारी तत्वे ;

3: राज्यातील पंचायतींच्या तसेच नगरपालिकांच्या संसाधनान्चा पूरक म्हणून राज्याच्या एकत्रित निधीमध्ये वाढ करण्यासाठी आवश्यक असलेल्या उपाययोजना ;

4: राष्ट्रपतींनी योग्य वित्ताच्या हितासाठी आयोगाकडे पाठवलेल्या इतर कोणत्याही बाबी

केंद्र –राज्य संबंधातील कल :

सर्वात अलीकडे म्हणजे जम्मू काश्मीर आणि लडाख राज्याचे पुर्णपणे एकत्रीकरण करण्यासाठी कलम 370 रद्द करण्याचा निर्णय . यामुळे एका राज्याचे केंद्रशासित प्रदेशात रूपांतर झाले आणि त्यामुळे केंद्र-राज्य संबंधावर नविन वादविवाद सुरू झाले.

केंद्र आणि राज्य यांच्यातील तणावाची प्रमुख क्षेत्रे :-

1: राज्यापालाची नियुक्ती आणि बडतर्फीची पद्धत

2: राज्यापालांची भेदभावपूर्ण आणि पक्षपाती भूमिका

3: पक्षपाती कारणासाठी राष्ट्रपती राजवट लागू

4: राज्यांना आर्थिक वाटप करतांना भेदभाव

5: अखिल भारतीय सेवांचे व्यवस्थापन

6: राज्यांच्या विषयात केंद्राचे अतिक्रमण

सरकारिया आयोग :

विविध क्षेत्रातील केंद्र-राज्य संबंध तपासण्यासाठी आणि घटनात्मक चौकटीत सूचना देण्यासाठी केंद्र सरकारने 1983 मध्ये सरकारिया आयोगाची स्थापना केली. आयोगाने 1988 मध्ये पुढील शिफारशीसह अहवाल सादर केला.

- घटनेच्या कलम 356 चा वापर जपून केला पाहिजे आणि राज्यात कलम 356 लागू करण्यापूर्वी पर्यायी सरकार स्थापन करण्याच्या सर्व शक्यता तपासल्या गेल्या पाहिजेत. घोषणेला संसदेची मान्यता मिळाल्याशिवाय राज्य विधानसभा विसर्जित करू नये.
- केंद्र आणि राज्यामध्ये मतभेद निर्माण करणाऱ्या शासनाच्या विविध नियमावर एकत्रितपणे चर्चा करण्यासाठी पंतप्रधान आणि मुख्यमंत्री यांचा समावेश असलेल्या आंतर-सरकारी परिषदेची निर्मिती केली जावी.
- राज्य सरकारांशी सल्लामसलत करून वित्त आयोगाच्या संदर्भाच्या अटी करण्यासाठी आणि राज्य स्तरावर तत्सम तज्ञ संस्था स्थापन करण्याची सूचना करण्यात आली
- उच्च न्यायालयाच्या न्यायमूर्तींची संख्या त्यांच्या संमतीशिवाय बदली करू नये.
- त्रिभाषेचे सूत्र भारताच्या सर्व भागात खऱ्या अर्थाने लागू केले पाहिजे.

15 व्या वित्त आयोगानुसार पंचायतींना दिले जाणारे अनुदान :

15 व्या वित्त आयोगानुसार स्थानिक स्वराज्य संस्थांना 2021-22 ते 2025-26 या पाच वर्षासाठी पाणी आणि स्वच्छतेसाठी दिले जाणारे अनुदान 1,42,084 कोटी आहे. या अनुदानामुळे ग्रामीण भागात अधिक निधीची गरज पूर्ण होईल. भारतीय संविधानाच्या 73 व्या घटनादुरुस्तीनुसार स्थानिक स्वराज्य संस्था मजबूत करण्यासाठी हे एक महत्वपूर्ण पाऊल आहे. यामुळे गावागावातून जलवाहिनीद्वारे पाणी पुरवठा एक लाख कोटीपेक्षा जास्त निधी उपलब्ध आहे . यामुळे ग्रामीण व्यवस्थेवर याचा चांगला परिणाम होईल 15 व्या वित्त आयोगानुसार 2021-22 ते 2025-26 या काळासाठी ग्रामीण स्थानिक स्वराज्य

संस्था आणि पंचायतराज संस्थांना 2,36,805 कोटी वित्त आयोगाने "पाणी पुरवठा आणि स्वच्छता " हे क्षेत्र राष्ट्रीय प्राधान्य म्हणून ओळखले गेले आहे. पंचायतींना 60% वाटप अर्थात 1,42,084 कोटी रुपये पिण्याच्या पाण्याचा पुरवठा , पावसाचे पाणी साठवणे आणि पाण्याचा पुनर्वापर यासाठी अनुदान म्हणून दिले आणि उघड्यावरील शौच मुक्त स्थितीची देखभाल

यासाठी दिलेले अनुदान खालीलप्रमाणे आहे.

Source: https://pib.gov.in/pressRelease

Sr. No	State	2021-22	2022-23	2023-24	2024-25	2025-26	Total (In Crore)
1	Andhra Pradesh	1,164	1,206	1,218	1,292	1,260	6.138
2	Arunachal Pradesh	102	106	108	114	112	540
3	Assam	712	736	744	790	770	3,752
4	Bihar	2,226	2,306	2,330	2,468	2,408	11,736
5	Chhattisgarh	646	668	676	716	698	3.402
6	Goa	34	34	34	38	36	176
7	Gujarat	1,418	1,468	1,484	1,572	1,534	7,474
8	Haryana	562	580	588	622	606	2,958
9	Himachal Pradesh	190	198	200	212	206	1,004
10	Jharkhand	750	776	784	832	810	3,952
11	Karnataka	1,426	1,478	1,494	1,582	1,544	7,524
12	Karla	722	748	756	800	780	3,806
13	Madhya Pradesh	1,766	1,830	1,850	1,960	1,912	9,316
14	Maharashtra	2,584	2,676	2,706	2,866	2,796	13,628
15	Manipur	78	82	82	88	86	414
16	Meghalaya	82	84	84	90	88	428
17	Mizoram	42	42	44	46	44	218
18	Nagaland	56	58	58	62	60	292
19	Odisha	1,002	1,036	1,048	1,110	1,084	5,280
20	Punjab	616	638	644	682	666	3,246
21	Rajasthan	1,712	1,774	1,794	1,900	1,852	9,032
22	Sikkim	18	20	20	22	20	100
23	Tamil Nadu	1,600	1,656	1,674	1,774	1,730	8,436
24	Telangna	820	850	858	908	886	4,320
25	Tripura	84	88	88	94	92	448
26	Uttar Pradesh	4,324	4,480	4,528	4,796	4,678	22,808
27	Uttarakhand	256	264	268	282	274	1,344
28	West Bengal	1,956	2,026	2,050	2,170	2,116	10,320
Total		26,940	27,908	28,212	29,880	29,144	1,42,084

वरील तक्त्यात आपण पाहतो अनेक राज्यांना दिले जाणारे अनुदान हे वेगवेगळे आहे कारण राज्याची लोकसंख्या आणि क्षेत्र यानुसार त्यात बदल होतो. तसेच कांही राज्य सुरुवातीपासूनच आर्थिक विकासात मागे आहेत आणि त्यामुळे त्यांना हा असमतोल कमी करण्यासाठी अनुदान थोडे जास्त द्यावे लागते उत्तर प्रदेश सारख्या राज्याचे आनुदान सर्वात जास्त म्हणजे 22,808 कोटी इतके आहे. कारण हे राज्य क्षेत्रफळाने मोठे आहे आणि आर्थिक विकासात सुद्धा मागे आहे आणि नंतर मग महाराष्ट्र आणि बिहार अशी राज्ये येतात.

संशोधांनाची उद्दिष्ट्ये :

01: केंद्र आणि राज्याच्या आर्थिक संबंधांचा अभ्यास करणे.

02: वित्त आयोगाचा देशाच्या आर्थिक प्रगतीवर होणाऱ्या बदलाचा अभ्यास करणे.

03: केंद्र –राज्यातील ताण-तणावाचा अभ्यास करणे.

04: वित्त आयोगातील आर्थिक तरतुदीचा अभ्यास करणे.

संशोधनाची गृहीतके :

01: वित्त आयोगामुळे देशातील आर्थिक स्थिती मोठया प्रमाणात सुधारली आहे.

02: देशातील लोकांच्या जीवनमानात मोठा सकारात्मक बदल झाला आहे.

03: मूलभूत सुविधामध्ये आमुलाग्र बदल झाला आहे.

संशोधन पद्धती :

प्रस्तुत संशोधांनकरिता संशोधकाने दुय्यम साधन सामुग्रीचा वापर केला आहे. यासाठी इंटरनेट , आर्थिक अहवाल आणि संदर्भ ग्रंथ याचा वापर केला आहे.

विषयाचे विश्लेषण :

वित्त आयोगाची चिकित्सा अथवा मूल्यमापन :

भारतीय संविधानानुसार केंद्र आणि घटक राज्ये यांच्या अधिकार आणि उत्पन्नाची विभागणी स्पष्ट आहे त्यानुसार 1961 पासून आजपर्यंत यांचे वित्त व्यवहार चालू आहेत तरी घटक राज्य अनेक वेळा तक्रारी करतात की, त्यांना असणारे उत्पनाचे मार्ग कमी आहेत त्यांना अनेक कामे करतांना अडचणी येतात. घटक राज्यांना त्यांचे कार्य करतांना स्वायत्तता असावी आणि केंद्र सरकार त्यांच्या बाजूने बाजू मांडते की, देशाची एकात्मता टिकवून ठेवण्यासठी हे आवश्यक मानते आणि यामुळे आपण याबद्दल या वित्तीय धोरणाची चिकित्सा किंवा मूल्यमापन करणे आवश्यक आहे.

01: घटक राज्यांची आर्थिक समस्या :

आपण पाहतो सरकारची जबाबदारी वाढत असतांना आणि जनतेच्या अपेक्षा वाढत असतांना खर्च वाढतो आणि त्यामुळे जे पारंपारिक उत्पन्नाचे स्त्रोत आहेत ते प्रत्येक राज्यांना कमी पडत आहेत आणि त्यामुळे मग नेहमी आपण पाहतो की, केंद्राची तक्रार नेहमी अनेक राज्य करतांना आपणास पाहवयास मिळते आपण पाहिले असेल की, 2020 च्या कोरोंना महामारीच्या वेळी अनेक राज्ये किंवा महाराष्ट्र राज्य केंद्राची तक्रार करीत होते की, त्यांचा GST चा हिस्सा दिला नाही आणि कोरोंनामुळे सरकारचा खर्च वाढला आहे आणि नियमीत सुद्धा अनेक प्रकारचा खर्च असतो आणि त्याची हातमिळवणी करतांना राज्यांना दमछाक होते आणि म्हणून राज्य आणि केंद्र यांचा हा संघर्ष चालूच राहणार आहे आणि जर अशी स्थिती असेल की, केंद्र आणि राज्य यामध्ये वेगवेगळ्या पक्षाचे सरकार असेल तर मग तो संघर्ष पुन्हा वाढतो आणि याचे उदाहरण आपण केंद्र आणि महाराष्ट्र याचे पाहत आहोत आणि मग पक्ष कोणताही असेल तरी हा अनुभव येणारच आहे.

02: राज्यांच्या वाढत जाणाऱ्या जबाबदाऱ्या :

आपण मागे पाहिल्याप्रमाणे राज्य आणि केंद्र यांचे अधिकार क्षेत्र वेगवेगळे आहे पण मग जशी लोकसंख्या वाढेल तसे त्यावर होणारा खर्च वाढतो तसेच अलीकडे ग्रामीण भागाचा अनेक कारणामुळे शहराकडे ओढा वाढला आहे आणि त्यामुळे पुन्हा राज्य सरकार यांची जबाबदारी वाढते शहरात राहण्यासाठी घरे नसल्यामुळे झोपडपट्टी समस्या वाढते आणि इतर पाणी ,रस्ते , वाहतूक , शिक्षण , रोजगार अशा अनेक सेवावर पाहिल्यापेक्षा जास्त ताण वाढतो याला कारण पुन्हा आपण आर्थिक असल्याचे स्पष्ट करू शकतो की, अपुरे उत्पन्नाचे मार्ग आणि खर्च मोठा असल्यामुळे राज्याचे आर्थिक गणित बिघडते.

03: राज्यांचे पुरेशा प्रमाणात न वाढणारे उत्पन्न :

घटक राज्यांच्या जबाबदऱ्या ज्या प्रमाणात वाढतात त्या प्रमाणात त्यांचे उत्पन्न वाढत नाही. कारण ज्या करापासून जास्त उत्पन्न मिळते ते कर केंद्र सरकार वसूल करते. उदा: आयकर किंवा नफ्यावरील कर आणि त्यामुळे घटक राज्य आपला खर्च भागवू शकत नाहीत.

04: केंद्र –राज्य संघर्ष :

जेंव्हा केंद्र सरकार आणि राज्य सरकार यामध्ये एकाच पक्षाचे सरकार असते त्यावेळी संघर्ष होत नाही पण जेंव्हा वेगवेगळे पक्ष असतात त्यावेळी अनेक बाबतीत संघर्ष होतो आणि याचे प्रमाण आता जास्त प्रमाणात वाढले आहे. कारण पक्ष द्वेष जास्त प्रमाणात वाढला आहे म्हणजे राज्याचा किंवा देशाचा विकास सोडून आज अनेक प्रादेशिक आणि राष्ट्रीय पक्ष एकाच कामात लागलेत की, कोणाची अडवणूक कुठे करता येईल. आणि त्यामुळे केंद्र आणि राज्य संघर्ष आपण पाहत आहोत पुन्हा केंद्रशाशीत प्रदेश आणि केंद्र यांचा सुद्धा संघर्ष वेगळा आहे याचे आपण दिल्ली राज्य सरकार आणि केंद्र सरकार यांचा आपण पाहत आहोत.

05: प्रादेशिक समतील :

कांही राज्यांची प्रादेशिक असमतोलाची समस्या निर्माण झाली आहे जसे केरळ मध्ये औद्योगिक विकासाबाबत असमतोल दिसून येतो. आणि केंद्राने वित्तीय मदतीद्वारे असमतोल दूर केला नाही अशी तक्रार केली जाते. आणि जे प्रदेश मागास आहेत त्याबद्दल अनेक मार्गाचा अवलंब केला जात नाही. उद्योग , शेती , ऊर्जा आणि वाहतूक व्यवस्था याबद्दल समतोल दिसून येत नाही. आणि आजच्या काळात राज्याची जबाबदारी वाढत गेल्यामुळे राज्याचे केंद्रावर कर्ज आणि अनुदाने यावर अवलंबित्व जास्त वाढले आहे.

06: वित्तीय जमवाजमावीबाबत राज्यांची तक्रार :

केंद्र सरकार कराच्या 269 व्या कलमानुसार राज्यांना पुरेसे कर देत नाही. निगम करात सुरुवातीपासूनच राज्यांना सामावून घेतले गेले पाहिजे होते. राज्यांमध्ये निगम क्षेत्र पुरेशा प्रमाणात विकसीत झालेले आहे आणि निगम क्षेत्रासाठी पायाभूत सुविधा मोठया प्रमाणात विकसीत केल्या पायाभूत सुविधांवर खर्च केला उदा: ऊर्जा , पाणी , कच्चा माल रस्ते , जमीन इत्यादी उद्योगाला त्याचा मोठा फायदा झाला आहे त्यामुळे राज्याला निगम कराचा फायदा देणे आवश्यक होते. राज्यांच्या मते केंद्र राज्यांच्या करात मोठया प्रमाणात हस्तक्षेप करीत आहे

2020-21 मध्ये कोविड 19 च्या काळात अनेक राज्यांना केंद्राने आपल्या वाटयाला निधी अल्प प्रमाणात दिला त्यामुळे केंद्र आणि राज्यात तणाव निर्माण झाला आहे उदा: महाराष्ट्र , पश्चिम बंगाल या राज्यात विरोधी सत्ता असणाऱ्या राज्यात केंद्र अन्याय करीत आहे. यामुळे अशा राज्यांना आपला आर्थिक खर्च भागवतांना अनेक अडचणी येत आहेत. केंद्राने साधारणपणे कोणत्याही राज्याशी वागताना निरपेक्ष भावनेने वागले पाहिजे.

07: राज्यांना अधिक निधीची गरज आहे :

राज्यांच्या अधिकार वाढीमुळे केंद्रावरील अवलंबित्व कमी होईल केंद्र सरकार सामाजिक योजनांची जबाबदारी राज्यांवर अधिक सोपवेल आणि त्याचा परिणाम म्हणजे अन्नसुरक्षा , मनरेगा , आरोग्य आणि शिक्षण यासारख्या योजनामध्ये राज्यांना अधिक निधी पुरवावा लागेल. कारण यापुढे या योजनावर होणारा खर्च वाढणार आहे.

संदर्भ :

01: आर्थिक सर्वेक्षण – 2014-15 आणि 2017-18 व 2020-21

02: भारतीय अर्थव्यवस्था , देसाई स.श्री.मु. डॉ. भालेराव निर्मल , निराली प्रकाशन, पुणे (2004)

03: रारावीकर डॉ. यशवंत , " असा आहे केंद्रीय अर्थसंकल्प " डायमंड पब्लिकेशन,पुणे (2010)

04: रायखेलकर , डॉ. दामजी " सार्वजनिक अर्थशास्त्र व सार्वजनिक वित्त " विद्या बुक्स पब्लिकेशन, औरंगाबाद (2014)

05: ओझरकर सु.रा. " राजस्व " विद्या प्रकाशन , नागपूर (1969)

06: कोळंबे रंजन , " भारतीय अर्थव्यवस्था " भागीरथ प्रकाशन , पुणे (2014-15) व 2019

07 : विविध वृत्तपत्रे तसेच इंटरनेट

पंधराव्या वित्त आयोगाचा अहवाल आणि महाराष्ट्राच्या आर्थिक स्थितीचा आढावा

डॉ. सुनिल अण्णा गोरडे
संशोधन मार्गदर्शक आणि अर्थशास्त्र विभाग प्रमुख
शिवाजी कला, वाणिज्य विज्ञान महाविद्यालय, कन्नड
तालुका कन्नड, जिल्हा औरंगाबाद-431103
आजीव सभासद नंबर: 1695 मोबाईल नंबर: 9860714744
ई-मेल: sunilgorde1982@gmail.com

गोषवारा:

पंधराव्या वित्त आयोगाच्या अहवालामध्ये राज्य सरकारांनी पुढील काळातील योजना तयार करताना राजकोषीय सुधारणा तसेच स्थानिक सत्ता या बाबींना विशेष महत्त्व दिल्याचे आढळून येते. पंधराव्या वित्त आयोगाच्या अहवालातील खंड चार हा संपूर्णपणे राज्यांच्या संदर्भात असून यामध्ये प्रत्येक राज्याच्या अर्थव्यवस्थेचे सूक्ष्म विश्लेषण हे त्या राज्यातील संसाधने, त्या राज्यांच्या समोरील अडचणी व त्या अनुषंगाने शिफारशी या बाबींचे विश्लेषण त्यामध्ये असल्याचे दिसून येते. खंड चार या अहवालामध्ये भारतातील 28 राज्यांचे विश्लेषण केल्याचे दिसून येते. हे विश्लेषण करत असताना 18 सामान्य राज्य आणि 10 हिमालय आणि पूर्वेकडील राज्य या पद्धतीने राज्यांचे विश्लेषण केल्याचे दिसते. प्रत्येक राज्याचे महालेखापरीक्षक, राज्य सरकार, निती आयोग, विद्युत मंत्रालय व पंचायत राज मंत्रालय यांच्या माध्यमातून पंधराव्या वित्त आयोगाच्या या अहवालासाठी माहिती जमा केल्याचे अहवालातून आढळून येते. पंधराव्या वित्त आयोगाच्या खंड चार अहवालामध्ये प्रत्येक राज्याची लोकसंख्या, व्यापक आर्थिक निकष, सामाजिक आर्थिक निकष, राजकोषीय निकष,

आरोग्य संदर्भातील निकष या घटकांचे विश्लेषण केल्याचे आढळते. स्थानिक स्वराज्य संस्थांना निधी वितरण व त्यांची कार्यप्रणाली, राज्यातील विद्युत, राज्यासाठी उपलब्ध असलेले महत्त्वाचे घटक आणि राज्यासमोरील महत्त्वाचे प्रश्न याही बाबींचा आढावा या अहवालामध्ये पाहावयास मिळतो. सदरील पेपर मध्ये पंधराव्या वित्त आयोगाच्या अहवालातील महाराष्ट्र राज्याच्या आर्थिक स्थितीचे विश्लेषण केले आहे. महाराष्ट्र राज्याचे व्यापक आर्थिक निकष आणि राजकोषीय निकष चांगल्या स्थितीमध्ये असताना काही भागांचा विकासाचा अनुशेष प्रलंबित असल्याचे दिसते तसेच गरिबी आणि भूकमारीचा प्रश्न सामान्य राज्यांच्या तुलनेत प्रतिकूल असल्याचे दिसते. मराठवाडा आणि विदर्भातील प्रति मानसी सकल अंतर्गत उत्पादन हे महाराष्ट्र आणि देशाच्या सरासरी पेक्षा कमी असल्याचे प्रामुख्याने दिसून येते. महाराष्ट्र राज्याच्या सकल अंतर्गत उत्पादनामध्ये तृतीय क्षेत्राचा वाटा विकसित देशांच्या तुलनेत अत्यंत कमी असल्याचा दिसते. महाराष्ट्र राज्याचे सकल अंतर्गत उत्पादनाचे सामान्य राज्यांच्या सकल अंतर्गत उत्पादनाशी असलेले प्रमाण तुलनेने कमी होत असल्याचे अहवालातून दिसून येते. या बाबीकडे प्रामुख्याने महाराष्ट्राने लक्ष देण्याची आवश्यकता दिसते.

व्यापक आर्थिक निकष:

सदरील अहवालामध्ये व्यापक आर्थिक निकषांचे विश्लेषण करण्यासाठी राज्य सकल अंतर्गत उत्पादनाचा (SGDP) वृद्धीदर, प्रति व्यक्ती राज्य सकल अंतर्गत उत्पादन, राज्य सकल अंतर्गत

उत्पादनामध्ये वेगवेगळ्या क्षेत्रांचा वाटा या निकषांचा आधार घेतलेला आढळून येतो. 2018-19 या आर्थिक वर्षामध्ये महाराष्ट्र राज्याचा राज्य सकल अंतर्गत उत्पादनाचा वृद्धीदर 10.5 प्रतिशत व प्रतिव्यक्ती राज्य सकल अंतर्गत उत्पादनाचा वृद्धी दर 10 प्रतिशत असल्याचे अहवालात दिसते. याच वर्षांमध्ये कराचे राज्य सकल अंतर्गत उत्पादनाशी असलेले प्रमाण 7.1 एक प्रतिशत असल्याचे दिसते.

तक्ता क्रमांक: 1

राज्य सकल अंतर्गत उत्पादनामध्ये वेगवेगळ्या क्षेत्रांचा वाटा प्रतिशत मध्ये (2018-19)

क्षेत्र	महाराष्ट्र	भारत
प्राथमिक क्षेत्र	11	17
द्वितीय क्षेत्र	24	24
तृतीय क्षेत्र	52	49
कर	13	10

आधार: पंधराव्या वित्त आयोगाचा अहवाल खंड चार

विकसित देशांमध्ये तृतीय क्षेत्राचा वाटा सकल अंतर्गत उत्पादनामध्ये मोठ्या प्रमाणात असल्याचे आपल्याला दिसते. परंतु भारतामध्ये आणि तुलनेने महाराष्ट्रामध्ये तृतीय क्षेत्राचा वाटा आपणास त्या प्रमाणात तुलनेने कमी असल्याचे वरील तक्त्यावरून आढळून येते. महाराष्ट्र राज्याचे राज्य सकल अंतर्गत उत्पादन हे 2011-12 या वर्षामध्ये रु.12,80369 कोटी वरून 2018-19 मध्ये रू. 26,32792 कोटी इतके वाढल्याचे दिसते. परंतु महाराष्ट्र राज्याच्या राज्य सकल अंतर्गत उत्पादनाचे सामान्य राज्यांच्या (GS 18 राज्ये) राज्य सकल अंतर्गत उत्पादनाशी असलेले प्रमाण वरील काळात 16.5 प्रतिशत वरून कमी होऊन 15.2 प्रतिशत झाल्याचे अहवालातून आढळून येते. प्रति मानसी राज्य सकल अंतर्गत उत्पादन हे 2018-19 मध्ये रुपये 2,16,376 इतके असल्याचे आढळून आले. महाराष्ट्र राज्याचे प्रतिमानसी उत्पादन राष्ट्रीय स्तरापेक्षा मोठ्या प्रमाणात जास्त असल्याचे दिसते.

आरोग्य निकष:

आरोग्य संदर्भातील निकषांचा अभ्यास करण्यासाठी या अहवालामध्ये प्रति हजार व्यक्ती उपलब्ध असलेल्या डॉक्टरांची संख्या, आरोग्य केंद्रांची उपलब्धता, नर्स उपलब्धता, फार्मासिस्ट उपलब्धता, सरकारी दवाखान्यातील घाटांची उपलब्धता या निकषांचा आधार विश्लेषणासाठी घेतल्याचे आढळून येते

सामाजिक आर्थिक निकष:

सामाजिक आर्थिक निकषांचे विश्लेषण करण्यासाठी सदरील राज्यातील लोकसंख्येमध्ये दहा वर्षांमध्ये झालेली वृद्धी, जन्मदर, निती आयोगाने 2019 मध्ये प्रकाशित केलेले एसडीजी निकष तसेच वित्तीय वर्ष 2005 ते 2012 या काळात गरीबी मध्ये झालेली घट या बाबींचा आढावा घेतलेला दिसून येतो. महाराष्ट्र राज्याच्या लोकसंख्येचे देशाच्या लोकसंख्येची असलेले प्रमाण 9.4 प्रतिशत, राज्याच्या क्षेत्रफळाचे देशाच्या क्षेत्रफळाचे असलेले प्रमाण 9.4 प्रतिशत, राज्याच्या वनक्षेत्राचे देशाच्या वनक्षेत्राशी असलेले प्रमाण 7.2 प्रतिशत, राज्याच्या वनक्षेत्राचे राज्याच्या क्षेत्रफळाशी असलेले प्रमाण 16.5 प्रतिशत असल्याचे अहवालातून दिसून येते. अहवालातून महाराष्ट्र राज्यामध्ये 45.2 प्रतिशत नागरीकरण झाल्याचे दिसते. महाराष्ट्रातील लिंग गुणोत्तर प्रतिकूल असल्याचे अहवालातून दिसून येते. निती आयोगाने प्रकाशित केलेल्या एसडीजी निकष 2019 मध्ये महाराष्ट्राने 64 एसडीजी अंक मिळवून सर्व राज्यांमध्ये दहाव्या नंबर वरती स्थान घेतल्याचे दिसते. एसडीजी चार गुणवत्ता पूर्ण शिक्षण, एसडीजी सहा स्वच्छ जल आणि स्वच्छता, एसडीजी सात किफायत आणि स्वच्छ ऊर्जा, एसडीजी आठ सामाजिक कार्य व आर्थिक वृद्धी, एसडीजी दहा

असमानतेतील कमी, एसडीजी 15 जमिनीवरील जीवन, एसडीजी 16 शांतता न्याय संस्था या एसडीजी मध्ये राज्य अग्रणी असल्याचे अहवालातून दिसून येते. एसडीजी एक गरिबी, एसडीजी दोन भुकमारी, एसडीजी पाच लिंग असमानता, एसडीजी 11 नगर व समुदाय सुधार या एसडीजी मध्ये राज्याने सुधारणा करण्याची आवश्यकता असल्याचे या अहवालात नमूद केल्याचे आढळून येते.

तक्ता क्रमांक:2 प्रमुख राज्यातील गरिबीचे प्रमाण प्रतिशत मध्ये

राज्य	2004-05	2011-12
महाराष्ट्र	38.1	17.4
उत्तर प्रदेश	40.9	29.4
बिहार	54.4	33.7
कर्नाटक	33.4	20.9
पश्चिम बंगाल	34.3	20.0
गोवा	25	5
केरळ	19.7	7.1
आंध्र प्रदेश	29.9	9.2
पंजाब	20.9	8.3
भारत	37.2	21.9

आधार: पंधराव्या वित्त आयोगाचा अहवाल खंड चार

वरील तक्त्यावरून गरीब लोकांच्या प्रमाणामध्ये घट झालेली दिसून येते परंतु याच कालावधीमध्ये अरुणाचल प्रदेश, नागालँड, मिझोराम या राज्यामध्ये 2004-05 या वर्षाच्या तुलनेत 2011-12 या काळात गरिबी खालील लोकसंख्येच्या प्रमाणात वाढ झाल्याचे अहवालातून आढळून येते.

राजकोषीय निकष:

राजकोषीय निकषांचा आढावा घेण्यासाठी या अहवालामध्ये राजस्व तुटीचे राज्य सकल अंतर्गत उत्पादनाशी असलेले प्रमाण, राजकोषीय तुटीचे राज्य सकल अंतर्गत उत्पादनाशी असलेले प्रमाण, राज्याचे कर्ज, राज्याचा खर्च, राज्याच्या स्वतःच्या कर महसुलाचे राज्य सकल अंतर्गत उत्पादनाशी असलेले प्रमाण, राज्याच्या करेत्तर महसुलाचे राज्य सकल अंतर्गत उत्पादनाशी असलेले प्रमाण, भांडवली खर्चाचे राज्य सकल अंतर्गत उत्पादनाशी असलेले प्रमाण, एकूण राजस्व खर्च आणि स्वतःची राजस्व प्राप्ती यातील अंतर, एकूण राजस्व प्राप्ती, केंद्राकडून मिळालेला कर महसूल व साह्यता अनुदाने यांचे एकूण राजस्व प्राप्तीशी असलेले प्रमाण या निकषांच्या आधारे विश्लेषण केल्याचे दिसते. महाराष्ट्राने एफआरबीएम 2006 मध्ये आणला व यामध्ये 2008 व 2016 मध्ये सुधारणा केल्याचे दिसून येते. 2017-18 या वर्षामध्ये महाराष्ट्र राज्याची राजकोषीय तूट राज्य सकल अंतर्गत उत्पादनाच्या एक प्रतिशत तर महाराष्ट्र राज्याच्या कर्जाचे राज्य सकल अंतर्गत उत्पादनाशी असलेले प्रमाण 18.1 प्रतिशत असल्याचे दिसते.

महाराष्ट्राच्या वित्त आयोगाच्या संदर्भातील अपेक्षा:

महाराष्ट्र राज्याने वित्त आयोगाच्या माध्यमातून उर्ध्वस्तरीय समानता येण्यासाठी राज्यांना मिळणारा वाटा 50 प्रतिशत करावा तसेच क्षितिज समांतर समानता प्रस्थापित करण्यासाठी राज्या राज्यांमध्ये वाटपाचे निकष ठरवत असताना 2011 मधील लोकसंख्येला 35 प्रतिशत महत्त्व, राज्याच्या क्षेत्रफळाला 15 प्रतिशत महत्त्व, उत्पन्न अंतर या निकषाला पंधरा प्रतिशत महत्त्व, वंचित ग्रामीण कुटुंबे या निकषाला 15 प्रतिशत महत्त्व, नागरिकरण या निकषाला दहा प्रतिशत महत्त्व, राजकोषीय दक्षता या निकषाला 7.5

प्रतिशत महत्त्व, वनाखालील क्षेत्र या निकषाला 2.5 प्रतिशत महत्त्व देऊन राज्या राज्यांमधील निधीचे वाटप करण्यात यावे असे अहवालात सुचविल्याचे दिसून येते.

महाराष्ट्र राज्याची आकस्मिक देयता ही प्रामुख्याने सहकारी संस्थांना दिलेली हमी असल्याचे दिसते. सहकारी साखर कारखाने आणि सहकारी कापूस संस्था यांना महाराष्ट्र सरकारने मोठ्या प्रमाणात हमी दिल्याची आढळून येते. पंधराव्या वित्त आयोगाने हमी देत असताना राज्य सरकारने प्रणालीगत मूल्यांकन किंवा संबंधित संस्थांचे रेटिंग करण्याची शिफारस केल्याचे आढळून येते.

नवीन आणि नवीकरणीय ऊर्जा मंत्रालयानुसार 2017 या वर्षामध्ये महाराष्ट्रामध्ये 64.32 गीगा व्हॅट ऊर्जा तयार करण्याची क्षमता असून प्रत्यक्षामध्ये अत्यंत कमी सौर ऊर्जा तयार होते. या क्षमतेचा विस्तार होण्याची आवश्यकता पंधराव्या वित्त आयोगाच्या अहवालामध्ये नमूद करण्यात आल्याचे दिसून येते.

सामाजिक व आर्थिक भविष्यासाठी दहा लक्ष लोकसंख्येची दहा शहरे महाराष्ट्रामध्ये असून या शहरांचे आर्थिक केंद्रात रूपांतरण करून विकास करण्याची आवश्यकता पंधराव्या वित्त आयोगाच्या अहवालात नमूद करण्यात आलेली आहे. या शहरांमध्ये मोठ्या प्रमाणात वाढत जाणारे प्रदूषण यावरती प्रभावी योजना करण्याची आवश्यकता अहवालात नमूद करण्यात आली आहे. मुंबईसारख्या मोठ्या शहरांकडे स्वतःचे आर्थिक मार्ग उपलब्ध आहेत. मुंबईतील स्थानिक सत्तेच्या माध्यमातून रस्ते, पूल, रेल्वे, पाणीपुरवठा, पूर व्यवस्था, झोपडपट्टी विकास, रिकाम्या जागा व पार्क सुविधा यामध्ये व्यापक सुधारणा करण्याची आवश्यकता आयोगाच्या अहवालात नमूद करण्यात आल्याचे दिसून येते.

महाराष्ट्र राज्याच्या स्वतःच्या करेत्तर महसुलाचे राज्य सकल अंतर्गत उत्पादिताशी असलेले प्रमाण कमी आहे. आर्थिक व सामाजिक सेवांच्या माध्यमातून त्यामध्ये वाढ करण्याची शिफारस आयोगाच्या अहवालात दिसते.

2013-14 ते 2018-19 या काळामध्ये महाराष्ट्र सरकारने मुंबई महानगर क्षेत्रीय विकास प्राधिकरण, महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळ, शहर आणि औद्योगिक विकास महामंडळ, महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ यामध्ये 2.07 लाख करोड रुपये गुंतवणूक केलेली आहे मात्र याचा उल्लेख अंदाजपत्रकामध्ये नाही. पुढील काळातील राजकोषीय क्षमतेवर विपरीत परिणाम होऊ नये म्हणून खबरदारी घेण्याची आवश्यकता असल्याचे अहवालातून दिसून येते. राज्य वित्त आयोगाने केलेल्या शिफारशींची अंमलबजावणी करण्याची आवश्यकता अहवालात नमूद करण्यात आली आहे.

शेती, पाणी व्यवस्थापन व सिंचनासंदर्भातील निष्कर्ष:

पाण्याची बचत पाणी वाटप या संदर्भात कार्यप्रणाली निश्चित करण्यात यावी. महाराष्ट्र राज्याच्या लागवड क्षेत्राच्या 18 प्रतिशत क्षेत्र हे सिंचित क्षेत्र आहे. भारताच्या सिंचित क्षेत्राच्या तुलनेत(48.6%) महाराष्ट्रातील संचित क्षेत्राचे प्रमाण अल्प असल्याचे दिसते. महाराष्ट्रामध्ये सिंचनाच्या 190 पेक्षा जास्त योजना 20 वर्षापासून अपूर्ण असल्याचे दिसते.2012 ते 2017 या काळामध्ये भांडवली खर्चाच्या 27 प्रतिशत ते 53 प्रतिशत खर्च सिंचन योजना वर झाला परंतु त्याचा अनुकूल प्रमाण सिंचित क्षेत्रावरती दिसून येत नाही. शेती आणि पाणी या संदर्भात पंधराव्या वित्त आयोगाच्या अहवालात वरील बाबी नमूद केल्याचे दिसून येते.

तीव्र सामाजिक विषमता:

चांगल्या राजकोषीय निकषांच्या तुलनेत महाराष्ट्र राज्यामध्ये विदर्भ व मराठवाड्याचा अनुशेष बाकी असल्याचे दिसून येते. महाराष्ट्र राज्यातील 36 जिल्ह्यांपैकी मराठवाडा व विदर्भातील 16 जिल्ह्यातील प्रति

व्यक्ती उत्पन्न हे राज्य व भारताच्या सरासरीपेक्षा कमी असल्याचे आढळून येते. ही विषमता कमी होण्याच्या अनुषंगाने प्रयत्न करण्याची आवश्यकता आयोगाच्या अहवालात नमूद करण्यात आल्याचे दिसून येते. यासाठी नगद राशीचा उपयोग करण्यात यावा.

अहवालातील सुधारणे संदर्भातील निर्देश:

1) महाराष्ट्र राज्याकडे चांगल्या प्रकारे नगदी शेष असल्यामुळे याचा वापर अंतर क्षेत्रीय विषमता कमी करण्यासाठी आणि सामाजिक निकष सुधारण्यासाठी करण्यात यावा.

2) महाराष्ट्र राज्याचा पाणीपुरवठा व आरोग्यावरील प्रतिव्यक्ती खर्च हा इतर राज्यांच्या तुलनेत कमी आहे. प्रामुख्याने मराठवाडा व विदर्भामध्ये यासंदर्भात मोठी तूट असल्याचे दिसते.

3) महाराष्ट्र राज्याचा एकूण राजस्व खर्चाच्या प्रमाणात आरोग्यावरील खर्च वाढला(4.5) असला तरी राष्ट्रीय सरासरी(5.3) हरियाणा (4.8)व कर्नाटक(5.1) या राज्यांच्या तुलनेत कमी असल्याचे दिसते.

4) महाराष्ट्राचा स्वतःचा कर महसूल 2009 -2013 या काळात 19.44 प्रतिशत होता 2014 - 2017 या काळात 8.16 प्रतिशत झाला. कर महसूल नियंत्रित करण्यासाठी उपाय योजना आवश्यक आहे. मोठ्या प्रमाणात बजेटत्तर उधार घेतलेल्या रकमांचे नियोजनपूर्वक प्रबंधन आवश्यक असल्याचे अहवालात नमूद करण्यात आले.

5) मुंबईसारख्या शहरांमध्ये कोविड काळात स्थानिक निधींचा वापर करण्याची आवश्यकता नमूद करण्यात आली.

6) महाराष्ट् राज्याच्या कर्जाचे प्रमाण राज्य सकल अंतर्गत उत्पादनाशी कमी (18%) असल्यामुळे कर्ज घेऊन विकास करण्यास वाव असल्याचे अहवालात नमूद करण्यात आले.

निष्कर्ष:

1) वेगवेगळ्या महामंडळासाठी महाराष्ट्र शासनाने मोठ्या प्रमाणात निधी उभारून गुंतवणूक केलेली आहे. राजकोषीय क्षमतेवरील विपरीत परिणाम टाळण्यासाठी या निधीचे नियंत्रण आवश्यक आहे.

2) व्यापक आर्थिक निकष तसेच राजकोषीय निकष चांगले असतानाही महाराष्ट्राच्या काही प्रदेशांचा अनुशेष प्रलंबित असल्याचे आढळून येते.

3) महाराष्ट्र राज्याच्या कर्जाचे राज्य सकल अंतर्गत उत्पादनाशी असलेले प्रमाण 18.1 प्रतिशत (2017-18) असल्याचे आढळते. हे प्रमाण इतर राज्यांच्या तुलनेत कमी आढळते. सर्व राज्यांची सरासरी ही या काळात 25 प्रतिशत पेक्षा जास्त असल्याचे दिसते.

4) महाराष्ट्र राज्याच्या सकल अंतर्गत उत्पादनाचे प्रमाण सामान्य राज्यांच्या सकल अंतर्गत उत्पादनाशी घटत असल्याचे आढळून येते.

5) प्रति व्यक्ती राज्य सकल अंतर्गत उत्पादन चांगले असताना महाराष्ट्रामध्ये गरिबी रेषेच्या खालील लोकांचे प्रमाण सामान्य राज्यांच्या तुलनेत फारसे समाधानकारक नसल्याचे दिसते. याबाबत गोवा, पंजाब, केरळ, आंध्र प्रदेश या राज्यांनी चांगल्या प्रकारे काम केल्याचे आढळून येते.

संदर्भ:

1) Finance Commission in Covid Times, Report for 2021-26, XV Finance Commission Volume-I Main Report October 2020.

2) वित्त आयोग-कोविड के दौर मैं 2021-26 के लिय रिपोर्ट, पंद्रहवा वित्त आयोग, खंड-IV. राज्य, अक्तुबर 2020.

मराठवाड्यातील ग्रामीण स्थानिक स्वराज्य संस्थेच्या आर्थिक विकासात १५ व्या केंद्रीय वित्त आयोगाची भूमिका : एक अभ्यास

डॉ. एस. एल. मेढे
सहयोगी प्राध्यापक, अर्थशास्त्र विभाग
सिद्धार्थ कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय,जाफ्राबाद.जि .जालना
पिन कोड - ४३१२०६
Email:drsunilmedhe2224@gmail.com
भ्रमणध्वनी :९४२३४५९२४६
आजीव सभासद क्रमांक – १३०९

गोषवारा :

प्रस्तुत शोध निबंधामध्ये मराठवाड्यातील ग्रामीण स्थानिक स्वराज्यसंस्थेच्याआर्थिक विकासात १५ व्या केंद्रीय वित्त आयोगाची भूमिका या संदर्भात अभ्यास करण्यात आला आहे. १५ व्या केंद्रीय वित्त आयोगाच्या शिफारशीनुसारराज्यातील ग्रामीण स्थानिक स्वराज्य संस्थाना वितरित करण्यासाठी सन २०२१-२२ च्या अनुदानाच्या (टाईड ग्रॅट) हस्यापोटीरू.१४५६.७५ कोटी इतकानिधी वितरीत करण्याचे निश्चित केले असून केंद्रशासनाच्या संदर्भ क्र.५ व दि १५.०७.२०२० च्या पत्रात तरतूद दिसून येते. त्यानुसार केंद्रशासनाकडून राज्यशासनास प्राप्त झालेला निधी राज्यातील स्थानिक स्वराज्य संस्थेला वितरीत करण्याचा प्रस्ताव शासनाचा विचाराधीन असल्याचे दिसून येते. वरील निधी वाटपाचा संदर्भ लक्षात घेता मारठवाड्यातील स्थानिक स्वराज्य संस्थाना निधीचे वाटप किती प्रमाणात व्हावे याची तरतूद आहे याचा देखील या शोध निबंधा मध्ये अभ्यास करण्यातआला आहे. इतर विभागांच्या तुलनेत मराठवाडा हा अतिशय मागासलेला असून निधी वाटपाच्या तुलनेत प्रचंड असा प्रादेशिक असमतोल दिसून येतो. म्हणून या शोधनिबंधाचा निधी हा मुख्य केंद्र बिंदु समोर ठेवून अभ्यास करण्यात आला आहे. पंधराव्या केंद्रीय वित्त आयोगामार्फत केंद्र सरकारच्या मार्गदर्शनानानुर निधी योग्य प्रमाणात निधी वाटप होत आहे का याचा देखील या शोधनिबंधा मध्ये अभ्यास करण्यात आला आहे.

सर्व शहरातील,गावातील मूलभूत गरजा म्हणजेच वीज, रस्ते, पाणी आणि इतर नागरी सुविधा पूरवण्यासाठी जिल्हा परिषद,पंचायत समिती व ग्रामपंचायतीला निधीची आवश्यकता असते. तो निधी जमा करण्यासाठी स्थानिक स्वराज्यसंस्था गावात विविध कर व फी आकारणी करते. गावातील कारभार सुव्यवस्थित चालावा आणि नागरिकांना सोयी-सुविधा उपलब्ध व्हाव्यात म्हणून हा निधी वापरला जातो. याशिवाय केंद्र आणि राज्य शासनाकडून गावातील विकासकामांसाठी विविध निधी ग्रामपंचायतीला पुरवला जातो.याच पार्शवभूमीवर मराठवाडयतील ग्रामीण व शहरी भागात निधी वाटपाचे प्रमाण योग्य होत आहे की नाही आणि मराठवाडयाच्या विकासात धनात्मक बदल होत आहे की नाही या साठी संशोधकाने या विषयचा सखोल अभ्यास करण्याचा प्रयत्न केला आहे.

सूचक शब्द :जिल्हा परिषद,पंचायत समिती,ग्रामपंचायत.

प्रस्तावना :

वित्त आयोग हा दर पाच वर्षांनी भारताच्या राष्ट्रपती द्वारे नेमला जाणारा, एक आर्थिक नियोजन करणारा आयोग आहे. या आयोगाची सर्वप्रथम स्थापना डॉ बाबासाहेब आंबेडकरांनी इ.स. १९५१ मध्ये केली होती. वित्तआयोग स्थापनेचा उद्देश केंद्र सरकार आणि भारतातील राज्य सरकारांमधील आर्थिक संबंध प्रसारित करणे हा आहे. वित्त आयोगाचा कार्यकाळ ५ वर्षांचा असतो. वित्त आयोगाची स्थापना कलम २८० अन्वये घटनात्मक संस्था म्हणून करण्यात आली आहे, ती अर्ध-न्यायिक संस्था आहे. या संदर्भात चौथ्या वित्त आयोगाचे अध्यक्ष डॉ. पी.व्ही.राजा मन्ना यांनी बरोबरच म्हटले आहे की, "वित्त आयोग ही एक घटनात्मक संस्था आहे जी अर्ध-न्यायिक कार्य करते आणि तिचा सल्ला अधिकृत कारण असल्याशिवाय स्वीकारण्यास भारत सरकार बाध्य नाही."

इ.स. १९५१ पासून ते २०१७ पर्यंत १५ वित्त आयोग नेमण्यात आले आहेत. इ.स. २०१७ मध्ये एन.के. सिंग (भारतीय नियोजन आयोगाचे माजी सदस्य) यांच्या अध्यक्षतेखाली नवीनतम वित्त आयोगाची स्थापना करण्यात आली. १९९३मध्ये, भारतातील सर्व राज्यांमध्ये राज्य वित्त आयोग देखील स्थापन करण्यात आले होते. वित्त आयोगामध्ये एक अध्यक्ष आणि चार सदस्य असतात. त्यापैकी दोन सदस्य पूर्णवेळ म्हणून, तर दोन अर्धवेळ सदस्य आहेत.

एक संघीय राष्ट्र म्हणून, भारताला विविध प्रकारच्या आर्थिक असमतोलांचा सामना करावा लागतो. केंद्र आणि राज्य सरकारांमधील उभ्या असमतोलाचा परिणाम म्हणजे राज्यांनी त्यांच्या जबाबदाऱ्या पार पाडण्याच्या प्रक्रियेत त्यांच्या महसुलाच्या स्त्रोतांच्या तुलनेत असामान्य खर्च केलेला असतो. तथापि, राज्ये त्यांच्या नागरिकांच्या गरजा आणि अडचणी जाणून घेण्यास अधिक सक्षम असतात.

उत्पन्न करांची विभागणी केंद्र व राज्यांमध्ये करण्यासाठी काही तत्त्वे ठरविली जातात. उदा. १) पहिले तत्त्व म्हणजे लोकसंख्या-तत्त्वः राज्यातील एकूण किती टक्के लोकसंख्या त्या जिल्ह्यात आहे, त्यानुसार त्या प्रमाणात वाटपयोग्य करनिधीची विभागणी ठरविणे. २) दुसरे म्हणजे संकलन-तत्त्वः एखाद्या जिल्ह्याने जितका कर गोळा केला असेल, त्या प्रमाणात त्याजिल्ह्यास एकूण निधीतून वाटा देणे. लोकसंख्या-तत्त्व सर्व राज्यांना साधारणपणे न्याय देणारे आहे. जास्त लोकसंख्या असणाऱ्याजिल्ह्यास स्वाभाविकपणे अधिक निधी यामार्फत मिळू शकतो. एखाद्या जिल्ह्याने भरपूर करनिधी गोळा केला, तर त्यालाही या सर्व यंत्रणेत प्रोत्साहन मिळावे म्हणून संकलन-तत्त्व वापरले जाते. उदा., मारठवाडयाची लोकसंख्या महाराष्ट्रातील एकूण लोकसंख्येच्या जेमतेम १० टक्के आहे. तथापि एकूण उत्पन्न करापैकी सु. २० टक्के वाटा मराठवाड्यातून येतो. येथे जर फक्त लोकसंख्या-तत्त्व वापरले, तर बीड,हिंगोली व उस्मानाबाद,अशा लहान जिल्हयावर अन्याय होईल. जर संकलनानुसार निधी वाटायचा ठरवला, तर लातूर व परभणी अशा जिल्हयावर अन्याय होईल. कारण तेथील सापेक्षेतेने कमी दरडोई उत्पन्नामुळे तेथील करसंकलन कमी आहे, म्हणजे ज्यांना निधीची अधिक गरज आहे त्यांनाच नेमका कमी वाटा मिळेल. यांसाठी दोन्ही तत्त्वे एकाच वेळी वापरली जाऊन ही त्रुटी दूर करण्याचे प्रयत्न विविध वित्त आयोगाने करणे गरजेचे आहे.

वित्त आयोगाचे कार्य :

१. केंद्र आणि राज्यांमध्ये करांच्या 'निव्वळ उत्पन्नाचे' वितरण, करांमध्ये त्यांच्या संबंधित योगदानानुसार विभागले जावे.
२. राज्यांना सहाय्य अनुदान नियंत्रित करणारे घटक आणि त्याचे प्रमाण निश्चित करणे.

३. राज्याच्या वित्त आयोगाने केलेल्या शिफारशींच्या आधारे राज्यातील पंचायती आणि नगरपालिकांच्या संसाधनांना पूरक म्हणून राज्याचा निधी वाढवण्यासाठी आवश्यक असलेल्या उपाययोजनांबाबत राष्ट्रपतींना शिफारसी करणे.

४. राष्ट्रपतींनी योग्य अर्थाच्या हितासाठी त्याच्याशी संबंधित इतर कोणतीही बाब.

५. वित्त आयोग ही एक स्वायत्त संस्था आहे जी भारत सरकारद्वारे नियंत्रित केली जाते

वित्त आयोगाचे सदस्य पात्रता:

वित्त आयोगाचा अध्यक्ष हा सार्वजनिक कामकाजात अनुभवी असावा आणि इतर चार सदस्यांची निवड खालीलपैकी करावी-

(१) उच्च न्यायालयाचा न्यायाधीश किंवा या पदासाठी पात्र व्यक्ती,

(२) भारताच्या खात्यांचे आणि वित्तविषयक विशेष ज्ञान असलेली व्यक्ती,

(३) प्रशासकीय आणि आर्थिक बाबींचा व्यापक अनुभव असलेली व्यक्ती, आणि

(४) अर्थशास्त्राचे विशेष ज्ञान असलेली व्यक्ती.

वित्त आयोगाचे चार सदस्य:

१. शक्तिकांत दास (भारत सरकार चे पूर्व सचिव) सदस्य
२. डॉ अनुप सिंह साहयक प्रोपेसर (जॉर्जटाऊन विश्व विद्यालय वॉशिंग्टन, डी.सी. अमेरिका) सदस्य
३. डॉ अशोक लाहाडी (अध्यक्ष गैर कार्यकारी,अंशकालीन बंधन बँक) सदस्य अंशकालीन
४. डॉ रमेश चंद्र (सदस्य नीती आयोग) सदस्य अंशकालीन

वित्त आयोग ही घटनात्मक संस्था आहे. केंद्र-राज्य यांच्यातील आर्थिक संबंधांवर सूचना देण्याच्या उद्देशाने भारताच्या राष्ट्रपतींनी त्याची स्थापना केली आहे. १५ वा वित्त आयोग (अध्यक्ष: एनके सिंग) दोन अहवाल सादर केला. १५ व्या वित्त आयोगाचा पहिला अहवाल १ फेब्रुवारी २०२० रोजी संसदेच्या पटलावर ठेवण्यात आला होता. या अहवालात२०२०-२१ साठी सूचना देण्यात आल्या होत्या. २०२१-२६ या कालावधीसाठी दुसऱ्या अहवालात सूचना केल्या जातील आणि हा अंतिम अहवाल ३०ऑक्टोबर २०२० रोजी सादर केलागेला .

जिल्हा परिषद: प्रत्येक जिल्ह्याकरिता अध्यक्ष व परिषदेचे सदस्य यांची मिळून एक कार्यकारिणी स्थापन करण्यात येते, तिला जिल्हा परिषद असे म्हणतात.

पंचायत समिती: हा जिल्हा परिषद व ग्रामपंचायत यांच्या मधील दुवा होय.महाराष्ट्रात ७५,००० ते १ लाख लोकसंख्येसाठी व १०० ते १२५ खेड्यांसाठी एक विकास गट समितीने पंचायत समितीला जास्त अधिकार दिले आहेत.

ग्रामपंचयात: ही भारतातील पंचयात राजपद्धतीची स्थानिक स्वराज्य संस्था आहे जी गाव किंवा शहर पातळीवर आहे आणि पंचायती राजच्या पायाभूत पातळीवर आहे.

इस २०१७ पर्यंत एकूण १५ वित्त आयोग नेमण्यात आले आहेत जे खालीलप्रमाणे आहेत

तक्ता क्रमांक-१

वित्त आयोग	स्थापनेचे वर्ष	अध्यक्ष	कार्यकाळ
पहिला	१९५२	के.सी. नेओगी	१९५२-१९५७
दूसरा	१९५६	के. संथानम	१९५७-१९६२
तिसरा	१९६०	ए.के. चंदा	१९६२-१९६६

चौथा	१९६४	पी.व्ही. राजमन्नर	१९६६-१९६९
पाचवा	१९६८	महावीर त्यागी	१९६९-१९७४
सहावा	१९७२	के. ब्रह्मानंद रेड्डी	१९७४-१९७९
सातवा	१९७७	जे.एम. शेलाट	१९७९-१९८४
आठवा	१९८३	वाय.बी. चव्हाण	१९८४-१९८९
नववा	१९८७	एन.के.पी.साळवे	१९८९-१९९५
दहावा	१९९२	के.सी. पंत	१९९५-२०००
अकरावी	१९९७	ए.एम. खुसरो	२०००-२००५
बारावा	२००२	सी. रंगराजन	२००५-२०१०
तेरावा	२००७	डॉ.विजय एल.केळकर	२०१०-२०१५
चौदावा	२०१३	डॉ. वाय.व्ही. रेड्डी	२०१५-२०२०
पंधरावा	२०१७	एन.के. सिंग	२०२०-२०२६

संदर्भ : बिझनेस स्टॅंडर्ड. नवी दिल्ली. २७ नोव्हेंबर २०१७

शोध निबंधाची उदिष्टे:

१. मराठवाडा विभागामध्ये १५ व्या वित्त आयोगा मार्फत जिल्हा परिषदेला वितरित झालेल्या निधीचा अभ्यास करणे

२. मराठवाडा विभागामध्ये १५ व्या वित्त आयोगा मार्फत पंचयात समितीला वितरितझालेल्या निधिचा शोध घेणे.

३. मराठवाडा विभागामध्ये १५ व्या वित्त आयोगा मार्फत ग्रामपंचायतेला वितरीत झालेल्या निधीचा अभ्यास करणे.

शोध निबंधाची गृहीतके:

१. १५ व्या वित्त आयोगामुळे मारठवड्यातील स्थानिक स्वराज्य संस्थांना निधी योग्य प्रमाणात मिळत आहे

अभ्यास क्षेत्र :

मराठवाड्यात एकूण आठ जिल्हयाचा समावेश होतो औरंगाबाद, जालना, परभणी, नांदेड, हिंगोली ,बीड, उस्मानाबाद व लातूर यांचा समावेश होतो . मराठवाड्यात सुमारे १.८७ कोटी लोकसंख्या आहे ६४.५ हजार चौरस कीलो मिटरचे क्षेत्रफळ आहे.

अभ्यास पद्धती:

सदरील शोधनिबंधामध्ये द्वितीय साधन सामग्रीचा वापर केला आहे तसेच विविध शासकीय व निमशासकीय प्रकाशने संदर्भ ग्रंथ ,मासिके पाक्षिके, दैनिक वर्तमान पत्रांचा समावेश करणायात आला आहे

मराठवाडा विभागातील (बंधित टाईट ग्रॅंट)

तक्ता क्रमांक -२

(रू. हजारत)

अ.क्र.	जिल्हा परिषदेचे नाव	जिल्हा परिषद	पंचायात समिती	ग्रामपंचयात	एकूण रक्कम

१	औरंगाबाद	४९११५	४९११५	३९२९१६	४९११४६
२	जालना	३७३७८	३७३७८	२९९०८८	३७३७८४
३	परभणी	२९९२९	२९९२९	२३९४३५	२९९२९३
४	हिंगोली	२३५८७	२३५८७	१८८६९९	२३५८७३
५	बीड	४९२७१	४९२७१	३९४१७०	४९२७१२
६	नांदेड	५७१३६	५७१३६	४५७०९१	५७१३६३
७	उस्मानाबाद	३२९६७	३२९६७	२६३७३२	३३९६६६
८	लातूर	४२३९९	४२३९९	३३९१९०	४२३९८८

संदर्भ : शासन निर्णय क्रमांक पंविआ २०२० / प्र.क्र. ६२ /वित्त-४.



आकृती क्रमांक -१

आकृती क्रमांक -१ संदर्भ : शासन निर्णय क्रमांक पंविआ २०२० / प्र.क्र. ६२ /वित्त-४.

अर्थनिर्वचन व विश्लेषण:

वरील तक्ता क्रमांक -२ पहाणीनुसार असे दिसून येते की,सर्व जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी यांच्या अर्थ संकल्पीय वितरण प्रणाली द्वारे निधी (बीमस्वर) वितरीत केल्याचे दिसून येते. सदर निधी जिल्हा परिषद, पंचायत समिति व ग्रामपंचयात यामध्ये अनुक्रमे १० : १० : ८० या प्रमाणात निधी वितरीत केल्याचे दिसून येते. पंधराव्या केंद्रीय वित्तीय आयोगा अंतर्गत केंद्र शासनाच्या मार्गदर्शक सुचनानुसार प्राप्त संपूर्ण अनुदान जिल्हा परिषद, पंचायत समिती व ग्रामपंचायत या स्थानिक स्वराज्य संस्थानावितरीत केल्याचे दिसून येते. सर्व पंचायत समिति व ग्रामपंचयतीना ई. सी. एस (एलेक्ट्रॉनिक्स क्लिरियन्स सिस्टम) / एन. ई. एफ. टी. (नॅशनल ईलक्ट्रॉनिक फंड ट्रान्सफर) किंवा आर. टी. जी .एस (रीयल टाइम ग्रॉस्स सेटेलमेन्ट) या आधुनिक बँकिंग सिस्टम द्वारे सबंधित पंचायत समिती व ग्रामपंचयातीच्या खात्यावर वर्ग केल्याचे दिसून येते. दि. २६ जून २०२० च्या शासन निर्णयानुसार २०२०

-२१ या आर्थिक वर्षापासून १५ व्या वित्त आयोगाच्या वितरित निधीतून पंचायत राज संस्थानी ग्रामपंचायत विकास आराखडयातून कामे व उपक्रमाची प्रभावी अमलबजावणी करावी असे या शासन निर्णयातून दिसून येते. ग्रामसभा व ग्रामपंचायतला गावाच्या सद्यस्थितीचे परीक्षण करून गावाच्या कोणत्या समस्या आहेत त्यावर कोणत्या उपाय योजना करणे अनिवार्य आहे हे सुद्धा या निर्णयातून दिसते.

१५ व्या वित्त आयोगाच्या शिफारशी नुसार टाईड ग्रँड चा वापर सुंदर परिसर आणि हगंणदारी मुक्त स्थानिक स्वराज्य संस्थेची देखभाल व दुरुस्ती, पेयजल पाणीपुरवठा,रेनवॉटर, हार्वेस्टीनग वॉटर रिसायकलिंग,गरजेनुसार निधी वाटप केल्याचे दिसून येते. वरील बाबींवर खर्च करणे अनिवार्य आहे , जर निधी उरलातर इतरबाबींवर खर्च करावा.

वरील तक्ता क्रमांक -२ नुसार असे दिसून येते की मारठवाड्यातील नांदेड स्थानिक स्वराज्य संस्थेला सर्वात जास्त निधी उपलब्ध झाल्याचे दिसून येते. आणि सर्वात कमी निधी हिंगोलीच्या स्थानिक स्वराज्य संस्थाला सर्वात कमी निधी उपलब्ध झाल्याचे दिसूणे येते. मराठवाड्यातील इतर जिल्हास्तरावर सरासरीने निधी उपलब्ध होत असल्याचे दिसून येते.

निष्कर्ष :

१. नांदेड जिल्हा क्षेत्रफळाने इतर जिल्ह्याच्या तुलनेत मोठा असल्यामुळे त्यास सर्वात जास्त निधी उपलब्ध झाला असावा.
२. निधी वाटपामध्ये प्रचंड प्रादेशिक असमतोल दिसून येतो.
३. १५ वित्त आयोगाने २०११ च्याजनगणनेचा वापर करून निधी वाटप केल्याचे दिसून येते, परंतु २०२१ ची जनगणना न झाल्यामुळे लोकसंखेच्या तुलनेत निधी कमी पडत आहे .
४. प्रत्येक विभाग किंवा जिल्हा आकार, लोकसंख्या, भौगोलिक परिस्थिती, आर्थिक व सामाजिक प्रश्न हे विभिन्न असतात, त्यामुळे सर्व राज्यांना एकच एक समान वाटपाचे तत्त्व लावता येत नाही. अशा परिस्थितीत वित्तीय विभाजनाचा प्रश्न अत्यंत महत्त्वाचा ठरतो.
५. विविध राज्यांतील प्रादेशिक असमतोलामुळे उत्पन्नाच्या न्याय्य वाटपाचा प्रश्न निर्माण होतो, त्यातच केंद्रस्थानी एका पक्षाचे व राज्यांमध्ये अन्य पक्षांची सरकारे सत्तेवर असल्यास संघर्षाचे प्रसंग निर्माण होण्याची शक्यता असते. त्यामुळे निधी वाटपा मध्ये दुर्लक्ष असमतोल झाल्याचे दिसते.

शिफारशी :

१. भारत सरकारने निर्गमित करण्यात आलेल्या मार्गदर्शक सुचनानुसार राज्यातील सर्व ग्राम पंचायतीना आपल्या ग्रामपंचायत विकास आराखड्यात पेयजल आणि स्वचछता या बाबींवरवर सर्वात जास्त खर्च करावा.
२. वित्त आयोगाच्या शिफारशीनुसार सर्व पायाभूत सुविधा उपलब्ध करुणे देणे आवश्यक आहे.
३. दर वर्षीच्या आपल्या अर्थसंकल्पात किती प्रमाणात खर्च केला या बाबींचा पारदर्शक आढावा सादर करावा .
४. सरकारने दर १० वर्षानी होणारी जनगणना तात्काळ करावी म्हणजे निधीचे प्रमाण ठरवून निधी उपलब्ध योग्य प्रमाणात उपलब्ध होईल.
५. सर्व मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी सर्व जिल्हा परिषद ,पंचायत समिती व ग्रामपंचायत स्तरावरील अधिकारी यांनी निधी वाटपाच्या संदर्भात गैर प्रकार केल्यास त्यांना शासन करणे गरजेचे आहे.
६. दर पाचवर्षांनी वित्त आयोग नेमण्याऐवजी तो कायमस्वरूपी आयोग असावा.

७. राज्याना वित्तीय निधी साठी केंद्रावर अवलंबून राहावे लागते , राज्यांची वित्तीय शक्ति वाढविण्यासाठी वित्त आयोगाने निरपेक्ष धोरण आखणे गरजेचे आहे.

८. प्रतेक विभागाला कायदा, सुव्यवस्था, विकासाच्या पायाभूत सोयी यांसाठी राज्यांना वाढता खर्च येतो. तो खर्च तसेच तूट भरून काढण्यासाठी उत्पादन शुल्काच्या व कराच्या माध्यमातून भरघोस निधी मिळतो परंतु त्याचे योग्य प्रमाणात वाटप होणे गरजेचं आहे.

संदर्भ :

१. बिझनेस स्टॅंडर्ड. नवी दिल्ली. २७ नोव्हेंबर २०१७.
२. शासन निर्णय क्रमांक पंविआ २०२० / प्र.क्र. ६२ /वित्त-४.
३. नवी दिल्ली: द हिंदू. November 27, 2017. 10 सप्टेंबर २०२२ रोजी पाहिले.
४. ओझरकर, सु. रा. राजस्व- सार्वजनिक आय-व्यय, नागपूर, १९६९
५. खेर, सी. पं. केंद्र-राज्य वित्तीय संबंध, पुणे, १९९३.
६. भारतीय अर्थव्यवस्था : निर्मल भालेराव
७. भारतीय अर्थव्यवस्था : दत्त आणि सुंदरम

पंधराव्या वित्त आयोगाच्या शिफारसींचे विश्लेषण

डॉ. डी. एस. गुर्जर (सहा. प्राध्यापक), आजीव सभासद क्रमांक 1808
जय विकास महाविद्यालय, शिरपूर (होरे), ता. देवळी, जि. वर्धा.

प्रस्तावना :-

भारत हे एक संघराज्य असल्याने येथे संघीय वित्त व्यवस्था आहेत.संघीय व्यवथेत मुख्य स्वरुपात केंद्र सरकार आणि राज्य सरकार अस्तित्वात असतात.तसेच स्थानिक पातळीवर स्थानिक संस्था कार्यरत असतात.ह्यामधे संरक्षण, विदेशी व्यवहार, चलन, ई. कार्य केंद्र सरकारकडे असतात आणि शिक्षण, सार्वजनिक आरोग्य, कायदा व सुव्यवस्था ई. कार्य राज्य सरकारकडे सोपविलेली असतात.घटनेने ठरवून दिलेली कार्य केंद्र व राज्य सरकारला करावी लागतात.तसेच काही कार्य केंद्र व राज्य सरकारांना संयुक्तपणे करावी लागतात.केंद्र सरकार व राज्य सरकार मध्ये वित्तीय सामंजस्य निर्माण करण्यासाठी नेमकी कोणती उपाय योजना करावी ह्या उपाय योजनेचा आधार कोणता असावा ई. प्रश्नांचा विचार करून केंद्र सरकारला सल्ला देण्यासाठी दर पाच वर्षांनी माननिय राष्ट्रपती वित्तीय आयोगाची स्थापना करतात.प्रस्तुत शोध निबंधामध्ये 15 व्या वित्त आयोगाच्या शिफारसींचे विश्लेषण करण्यात आले आहे.

भारतीय राज्यघटनेतील कलम 280 नुसार माननिय राष्ट्रपती वित्त आयोगाची स्थापना करतात.वित्त आयोग हि एक संविधानिक संस्था आहे.राष्ट्रपती देशातील मान्यवर व तज्ज्ञ व्यक्तिंची तसेच देशातील संपूर्ण परिस्थितीचे ज्ञान असलेली तज्ज्ञ व्यक्तिंची वित्त आयोगाचे अध्यक्ष म्हणून नियुक्ती करतात.व अन्य सभासदही नेमले जातात. विशिष्ट वित्त आयोगाच्या स्थापनेच्या अधिसुचनेत त्या आयोगापुढील संदर्भ व अटी स्पष्ट केल्या असतात.सर्व प्रथम पहिला वित्त आयोग 22 नोव्हेंबर 1951 मध्ये श्री. के. सी. नियोगी यांचे अध्यक्षतेखाली स्थापन केला होता.केंद्र आणि राज्य सरकारे यांच्यातील आर्थिक संबध निश्चित करणे हा आयोगाच्या स्थापनेचा मुख्य उद्देश होता.आयोगाच्या शिफारसी सन.1952-57 या पाच वर्षांच्या कालावधीसाठी होत्या.तेराव्या वित्त आयोगाची स्थापना मा.राष्ट्रपतींच्या द्वारे 13 नोव्हेंबर 2007 ला झाली होती.डॉ. विजय केळकर हे आयोगाचे अध्यक्ष होते.तसेच आयोगावर अन्य चार तज्ज्ञ सदस्य होते.आयोगाच्या शिफारसी हया सन 2010 ते 2015 या पाच वर्षासाठी होत्या.त्याच प्रमाने 14 व्या वित्त आयोगाची स्थापना जानेवारी 2013 मध्ये केल्या गेली.रिझर्व बँकेचे माजी गव्हर्नर डॉ. वाई. वी. रेड्डी हे अध्यक्ष होते.आणि अन्य चार सदस्य होते.चौदाव्या वित्त आयोगाच्या शिफारसी हया सन 2015 ते 2020 हया पाच वर्षांच्या कालावधी करीता होत्या.

पंधराव्या वित्त आयोगाची स्थापना मा.राष्ट्रपतींच्या द्वारे 27 नोव्हेंबर 2017 रोजी भारतीय नियोजन आयोगाचे माजी सदस्य श्री. एन. के. सिंग यांच्या अध्यक्षतेखाली करण्यात आली होती. तर आयोगामध्ये श्री. अजय नारायन झा, श्री. अनुप सिंग, श्री. अशोक लाहिरी, श्री रमेश चंद्र हे अन्य चार सदस्य आहेत.सुरुवातीला श्री. शक्तिकांत दास हे सदस्य म्हणून होते.परंतु त्यांची रिझर्व्ह बँकेच्या गर्व्हनर पदी निवड झाल्यामुळे त्यांच्या जागी श्री. अजय नारायन झा यांना सदस्यत्व देण्यात आले.तसेच श्री.अरविंद मेहता यांनी सचिव पदाचा कार्यभार सांभाळला होता.सदर वित्त आयोग स्थापनेचा मुख्य उद्देश कर आणि इतर आर्थिक बाबींच्या हस्तांतरणासंबधी शिफारसी करणे हा होता.सदर आयोगाने सन 2020 - 2021 या एका वर्षासाठीचा वार्षिक अहवाल फेब्रुवारी 2020 मध्ये मा.राष्ट्रपतींना सादर केला.तसेच अंतीम अहवाल 30 आक्टोंबर 2020 मध्ये सादर केला.पंधराव्या वित्त आयोगाच्या शिफारसी हया सन 2021 ते 2026 हया पाच वर्षाच्या कालावधीसाठी राहील.पहिल्या वित्त आयोगा पासून तर 14 व्या वित्त आयोगापर्यंत

जवळपास सर्वच वित्त आयोगाच्या शिफारसी हया पाच वर्षाच्या कालावधी करीता होत्या.परंतु 15 व्या वित्त आयोगाच्या शिफारसी हया सहा वर्षासाठी आहेत.

पंधराव्या वित्त आयोगाच्या शिफारसी केंद्र व राज्य सरकारांना आपआपली कार्य योग्य रितीने व कार्यक्षमतेने करण्यासाठी उत्पन्नाची शाश्वत व पर्यायी साधने उपलब्ध असली पाहीजे.भारतात केंद्र सरकारजवळ उत्पन्न प्राप्तीची मोठी व टिकाऊ साधने आहेत.त्यामानाने राज्यांजवळ सीमित व छोटी साधने आहेत.या दृष्टीने आपल्या संविधानात योग्य ती तरतुदही केली आहेत.केंद्राकडून राज्यांकडे उत्पन्न अंतरणाची व्यवस्था केली आहेत.ह्या अंतरण प्रक्रियेत केंद्राने लावलेल्या व गोळा केलेल्या कर उत्पन्नात राज्यांना विशिष्ट हिस्सा दिला जातो.

पंधराव्या वित्त आयोगानुसार केंद्रीय करातील राज्यांना मिळणारा हिस्सा हा 41 प्रतिशत राहील.चौदाव्या वित्त आयोगानुसार 42 प्रतिशतच्या तुलनेत 1 प्रतिशत कमी आहेत.कारण जम्मु काश्मीर व लद्दाख हे नव्याने निर्मित झालेली केंद्रशासीत प्रदेश आहेत.त्यामुळे तेथील विकासाकरीता केंद्रीय करातील 1 प्रतिशत हिस्सा याची तरतुद जम्मु काश्मीर व लद्दाख ह्या केंद्रशासीत प्रदेशासाठी करण्यात आली आहेत.

तेराव्या वित्त आयोगानुसार केंद्रीय करातील राज्यांना मिळणारा कर हिस्सा हा 32 प्रतिशत होता.तर चौदाव्या वित्त आयोगामध्ये त्यात एकदम 10 प्रतिशतने वाढ अर्थात 42 प्रतिशत करण्यात आली.परंतू पंधराव्या वित्त आयोगानुसार त्यात 1 प्रतिशत घट म्हणजेच 41 प्रतिशत करण्यात आली.वित्त आयोग पाच वर्षांपासून मिळणाऱ्या कर उत्पन्नापैकी किती प्रतिशत कर उत्पन्न राज्यांमध्ये वाटले जाईल.तसेच हे कर उत्पन्न वाटतांना कोणत्या तत्वाच्या आधारे वेगवेगळया राज्यामध्ये हे कर उत्पन्न वाटले जावे या बाबत वित्त आयोग शिफारस करते. पंधराव्या वित्त आयोगानुसार राज्यांना करांचे ऊर्ध्व हस्तांतरणः-

केंद्र सरकार विविध करांच्या द्वारा जे उत्पन्न प्राप्त करते त्यापैकी विशिष्ट प्रतिशत उत्पन्न राज्य सरकांराकडे हस्तांतरीत होते यालाच ऊर्ध्व हस्तांतरण म्हणतात.पंधराव्या वित्त आयोगानुसार केंद्र सरकारद्वारे लावण्यात येणाऱ्या वेगवेगळया करांच्या द्वारे 135.2 लाख करोड रुपये प्राप्त होतील.त्यापैकी केंद्र सरकारद्वारे लावण्यात येणारा सरचार्ज, सेस , अधिभार आणि कर गोळा करण्यासाठी येणारा खर्च वजा केला असता केंद्रिय करातील राज्यांना हस्तांतरणीय योग्य कर हा 103 लाख करोड रुपये आहेत.केंद्रिय करातील राज्यांना मिळणारा हिस्सा आयोगाच्या शिफारसी नुसार 41 प्रतिशत म्हणजेच 42.2 लाख करोड रुपये आहेत.तसेच केंद्राकडून राज्यांना मिळणारे अनुदान 10.33 लाख करोड रुपये आहेत.कर आणि अनुदान एकत्र मिळून राज्यांना मिळणारा एकूण हिस्सा हा 52.53 लाख करोड रुपये आहे.यावरुन असे दिसून येते की, केंद्रिय हस्तांतरणीय एकूण करांचा जवळपास 50.9 प्रतिशत हिस्सा राज्यांना प्राप्त होतील.

पंधराव्या वित्त आयोगानुसार राज्यांना क्षितीज किंवा समांतर कर हस्तांतरः-विविध राज्यांचा आकार, राज्यातील लोकसंख्या, विकासाची स्थिती ई.बाबत भिन्नता असल्यामुळे हा हिस्सा भिन्न प्रांतामध्ये वेगवेगळया प्रमाणात प्राप्त होतो.यालाच समांतर किंवा क्षितीज कर हस्तांतरण म्हणतात.

राज्यांना क्षितिज कर हस्तांतरण

तक्ता क्र -1

14 व्या व 15 व्या वित्त आयोगाची तुलना

क्र	घटक	14 वा वित्त आयोग (भारांक)	15 वा वित्त आयोग (भारांक)
1	लोकसंख्या (1971 नुसार)	17.5%	-
	लोकसंख्या (2011 नुसार)	10%	15%

2	क्षेत्रफळ	15%	15%
3	वन आणि परिस्थितीकी	7.5 %	10 %
4	उत्पन्नातील अंतर	50 %	45 %
5	कर आणि राजकोषीय प्रयत्न	-	2.5%
6	लोकसांख्यिकीय प्रदर्शन	-	12.5%
7	एकूण	100 %	100 %

वरील तक्ता क्र 1 नुसार 15 व्या वित्त आयोगाने सन 2011 ची लोकसंख्या गृहित घेतली आहेत.त्यानुसार लोकसंख्या हया घटकाला 15 प्रतिशत भारांक दिला आहेत.परंतु 14 व्या वित्त आयोगानुसार सन 1971 व 2011 ची लोकसंख्या गृहित घेतल्यामुळे सन 1971 च्या लोकसंख्येला 17.5 प्रतिशत भारांक तर 2011 च्या लोकसंख्येला 10 प्रतिशत भारांक देण्यात आला होता.यावरुन असे दिसून येते की, 15 व्या वित्त आयोगानुसार सन 2011 ची लोकसंख्या गृहित घेतल्यामुळे ज्या राज्यांची लोकसंख्या सन 1971 च्यातुलनेत सन 2011 मध्ये कमी झाली असेल त्या राज्यांना मिळणारा कर हिस्सा सन 1971 च्यालोकसंख्येच्या तुलनेत कमी राहील.राज्यांच्या क्षेत्रफळासाठी 15 व्या वित्त आयोगाने 15 प्रतिशत भारांक दिला असून तो 14 व्या वित्त आयोगा प्रमाणे कायम ठेवला आहे.वन आणि परिस्थितीकी या करीता 14व्या वित्त्त आयोगाच्या तुलनेत 15 व्या वित्त आयोगाने 7.5 प्रतिशत वरुन 10 प्रतिशत पर्यंत वाढ केली आहेत.

उत्पन्नातील अंतर म्हणजे सर्वाधिक उत्पन्न व प्रतिव्यक्ति उत्पन्न असणारे राज्य व विचाराधीन राज्यामधील उत्पन्न व प्रतिव्यक्ति उत्पन्नातील अंतर होय.14 व्या वित्त आयोगाने उत्पन्नातील अंतरासाठी 50 प्रतिशत भारांक दिला होता.परंतु 15 व्या वित्त आयोगाने 50 प्रतिशत वरुन 45 प्रतिशत पर्यंत त्यात घट केली आहेत.त्यामुळे ज्या राज्यांतील प्रतिव्यक्ति उत्पन्नातील अंतर जास्त असेल त्यांना 14 व्या आयोगाच्या तुलनेत 15 व्या आयोगानुसार कमी हिस्सा मिळेल हे यावरुन दिसून येते.लोकसांख्यिकीय प्रदर्शन हा घटक नव्यानेच 15 व्या वित्त आयोगाने घेतला त्यासाठी 12.5 प्रतिशत भारांक देण्यात आला.लोकसांख्यिकीय प्रदर्शन म्हणजे लोकसंख्येत संख्यात्मक घट करुन त्यात गुणात्मक वाढ करणे होय.यामध्ये जन्म दरात घट, साक्षरता दरात वाढ, आर्युमानात वाढ, प्रतिव्यक्ति उत्पन्नात वाढ ई.साठी राज्यांनी प्रयत्न करणे गरजेचे आहेत.ज्या राज्यांनी जनजागृती करुन वरील प्रकारच्या सुधारणा ज्या राज्यात घडवून आणल्या असतील अशा राज्यांना 12.5 प्रतिशत भारांका नुसार अतिरिक्त हिस्सा प्राप्त होतील अशी 15 व्या वित्त आयोगाने शिफारस केली आहेत.15 व्या वित्त आयोगानुसार ज्या राज्यांनी अधिकाधिक कर प्राप्त व्हावा यासाठी प्रयत्न केले असतील अशा राज्यांना 2.5 प्रतिशत भारांकानुसार केंद्रीय करातील अतिरिक्त करांचा हिस्सा देण्यात येईल.अशी आयोगाने शिफारस केली आहे.

14 व्या आणि 15 व्या वित्त आयोगाच्या तुलनेवरुन असे निदर्शनास येते की, राज्यांना आत्मनिर्भर बनविण्यासाठी राज्यांनी आपल्या ध्येयधोरणात परिवर्तन घडवून आणायला पाहीजेत.राज्यातील लोकसंख्येत संख्यात्मक घट करुन त्यात गुणात्मक वाढ करणे.यामध्ये जन्म दरात घट, साक्षरता दरात वाढ, स्त्री सक्षमीकरण, कौशल्य विकास, प्रतिव्यक्ति उत्पनात वाढ, कर संकलनात वाढ परिणामत: राज्यांच्या आर्थिक उत्पन्नात वाढ अशा प्रकाराचे प्रयत्न सर्वच राज्यांनी केले तर त्याचा परिणाम राज्याराज्या मधील आर्थिक विषमतेत घट होईल.तसेच 14 व्या वित्त आयोगाच्या तुलनेत 15 व्या वित्त आयोगानुसार अरुणाचल प्रदेश,

मेघालय, नागालँड, पंजाब ह्या राज्यांना फायदा तर आंध्रप्रदेश, आसाम, तेलंगाना, केरला, कर्नाटक ह्या राज्यांना नुकसान होईल.15 व्या वित्त आयोगाने आपल्या अहवालात नमुद केले आहेत.

केंद्रीय करातील हिस्सा यांची राज्यांना विभागणी, वित्तीय तुट व महसूल तुट अनुदान, शिक्षण आरोग्य आणि पोषण, पायाभूत सुविधा, कौशल्य विकास, न्यायालयीन व्यवस्थेत सुधारणा, शेती क्षेत्राचा विकास आणि पाण्याचे व्यवस्थापन, स्थानिक संस्थामध्ये ग्रामपंचायत व शहरी भागातील नगरपालीकांना निधीचे वाटप ई.संबधित 15 व्या वित्त आयोगाने शिफारसी केल्या आहेत त्यातील काही महत्वाच्या शिफारसी खालील प्रमाणे आहे.

काही महत्वाच्या शिफारसी :- 1) आपत्ती व्यवस्थापन : - काही राज्यांत नेहमीच आपत्ती येते.त्यामुळे आपत्तीचे व्यवस्थापन करण्यासाठी त्या राज्यांनी आपत्ती पुर्व आणि आपत्ती नंतरच्या निधीची तरतुद करावयाची आहेत.आपत्तीपुर्व तरतुदीसाठी(मिटीगेशन फंडांची निर्मिती) आपत्ती व्यवस्थापनासाठी 1.6 लाख करोड रुपयाची तरतुद करण्यात आली आहेत.आपत्ती निवारनार्थ केंद्राचा वाटा 75 प्रतिशत व राज्यांचा वाटा 25 प्रतिशत राहील. अशा प्रकारची शिफारस 15 व्या वित्त आयोगाने केली आहेत.

2) संरक्षण आणि आंतरिक सुरक्षा:- संरक्षण व अंतर्गत सुरक्षेसाठी नव्यानेच कायम स्वरुपी फंडाची निर्मिती करण्यात यावी असे आयोगाने सुचविले आहेत.संरक्षण आणि अंतर्गत सुरक्षेसाठी एम.एफ.डी.आय.एस किंवा राष्ट्रीय सुरक्षा नैव्यद्यम कोषाची निर्मिती करण्यात यावी.आणि हा कोष कधीही समाप्त होणार नाहीत अशी तरतुद करण्यात यावी.

3) शेती क्षेत्रात सुधारणा करण्यासाठी केंद्राकडून राज्यांना प्रदर्शनावर आधारित प्रोत्साहित अनुदान:- शेती क्षेत्रात सुधारणा करण्यासाठी केंद्राकडून प्रदर्शनावर आधारित राज्यांना 45,000 करोड रुपये प्रोत्साहित अनुदान प्राप्त होतील ते राज्यांनी आपल्या राज्यात शेती क्षेत्रात केलेल्या सुधारणेवर अवलंबून राहील. अ) शेती कसण्याच्या मौखिक करारात सुधारणा घडवून आणून त्या ठिकाणी लिखित स्वरुपात करार करणे की, जेणे करुन शेती कसतांना शेतकऱ्यांना विम्याचे कवच प्राप्त होईल.त्यामुळे शेतकऱ्यांचे होणारे संभाव्य नुकसान टाळता येईल.ब) शेतीमध्ये पाण्याचा शाश्वत आणि कार्यक्षम उपयोग करण्यासाठी भूपृष्ठीय पाण्याचा साठा वाढविणे व संरक्षित ठेवणे.तसेच पावसाळयात पडणाऱ्या पाऊसानुसार पाण्याच्या साठयाचे नियोजन करुन शेतीमध्ये पाण्याचा कार्यक्षम उपयोग करणे.त्यामुळे शेती उत्पादनात वाढ घडून येईल.परिणामतः शेती कसणाऱ्यांच्या आर्थिक स्थितीत सुधारणा घडून येईल. क) राज्यांनी शेतीमधील आधिक्य स्वरुपाच्या शेती उत्पादनाची निर्यात करण्यासाठी प्रयत्न करावे.की, जेणे करुन किंमतीतील चढउतारामुळे शेतकऱ्यांचे होणारे संभाव्य नुकसान टाळता येईल.परिणामतः शेतकऱ्यांच्या आर्थिक उत्पन्नात वाढ होईल.ड) भारत अन्नधान्याच्या उत्पादनात स्वयंपूर्ण झाला असला तरी अजुन पर्यंत तेलबिया व डाळीवर्ग पिकांच्या बाबतीत मात्र अजुनही आयातीवरच अवलंबून राहावे लागते.त्यामुळे राज्यांनी तेलबिया व डाळीवर्ग पिकांच्या लागवडी क्षेत्रात वाढ आणि पिकांच्या उत्पादक्तेत वाढ घडवुन आणण्यासाठी राज्यांनी शेतकऱ्यांना प्रोत्साहित करणे गरजेचे आहेत.अशा प्रकारे जे राज्य वरील प्रकारच्या सुधारणा आपल्या राज्यात घडवून आणतील त्या राज्यांना शेती क्षेत्राच्या विकासासाठी प्रदर्शनावर आधारित केंद्राकडून प्रत्येक घटकांसाठी 25 प्रतिशत भारांकानुसार प्रोत्साहित अनुदान प्राप्त होतील.

समारोप:- निष्कर्ष रुपाने असे सांगता येईल की, 15 व्या वित्त आयोगाने राज्याराज्यातील आर्थिक असमानता दुर करण्यासाठी अनेक महत्वपुर्ण शिफारसी केल्या आहेत.तसेच राज्यातील लोकसंख्येत संख्यात्मक घट व्हावी आणि त्यात गुणात्मक वाढ व्हावी यासाठी लोकसांख्यिकीय प्रदर्शनाला महत्व दिले आहेत.राज्यांची आर्थिक स्थिती बळकट व्हावी यासाठी राज्यांनी आपल्या ध्येय धोरणात योग्य ते बदल

घडवून आणावेत.त्याचप्रमाने आपत्ती व्यवस्थापन, संरक्षण आणि अंतर्गत सुरक्षेला महत्व देण्यात आले आहेत.असे 15 व्या वित्त आयोगाच्या अहवालावरुन दिसून येते.

संदर्भ:-

1) Fifteen Finance Commission Report

2) Fourteen Finance Commission Report.

3) Various Reports of the Finance Commission : Ministry of Finance, New Delhi

4) Pinaki Chakraborty (Aug 2021): COVID-19 Contest and the Fifteen Finance Commission, EPW, Vol 56, Issue no. 33

5) Ajay Narayan Jha (Aug 2021): Continuity with change EPW, Vol 56, Issue no. 33

6) Website: - 1) www.fincomindia.nic.in 2) www.prsindia.org 3) www.gov.in

पंधरावा वित्त आयोग ; एक चिकित्सक आभ्यास

डॉ. सुरेखा भागुजी भिंगारदिवे
अर्थशास्त्र विभाग प्रमुख
के.जे. सोमैया कला,वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय,कोपरगाव
आजीव सदस्य क्र.१६६८
भ्रमणध्वनी :- ९४२१६०१३९६
Mail.Id :-bhingardive.surekha@gmail.com

गोषवारा :-

भारताने संघराज्य पद्धतीचा स्वीकार केलेला आहे. भारतीय संघराज्यातील उत्पन्नाच्या साधनांची विभागणी अतिशय तर्कसंगत व परिपूर्ण आहे. भारतीय संघराज्यात केंद्र व राज्य सरकारे यांच्या कार्याची शास्त्रशुद्ध विभागणी तीन विभागांमध्ये करण्यात आलेली आहे. देशाचा सामूहिकपणे एकत्र विकास साधायचा असेल तर भिन्नतेचा विचार करून सर्व राज्यांना आवश्यक ती मदत केंद्र सरकार अनुदान व विविध योजनांच्या माध्यमातून करत असते. भारतीय राज्यघटनेत केंद्र सरकार व घटक राज्य सरकार यांच्यामध्ये साधनसामग्रीचे वाटप करण्यासंबंधीची तरतूद केलेली आहे. केंद्र सरकारने महसुलातील वाटा, अनुदान राज्यांना किती द्यावेत, राज्यांना कशी वितरित करावेत हे सुचवण्यासाठी दर पाच वर्षांसाठी वित्त आयोग विविध निकष सुचवत असते. भारताचे राष्ट्रपती राज्यघटनेच्या कलम २८० नुसार वित्त आयोगाचे नेमणूक करतात.

शोधनिबंधाचे उदिष्टे :-

१. केंद्र व राज्य वित्तीय संबंधाचा अभ्यास करणे.

२. पंधराव्या वित्त आयोगाचा आभ्यास करणे .

सूचक शब्द : केंद्र राज्य संबंध, केंद्र राज्य जबाबदाऱ्या व अधिकार ,पंधरावा वित्त आयोग

संशोधन पद्धत : प्रस्तुत शोधनिबंधासाठी दुय्यम साधन सामुग्रीचा वापर केला आहे.

प्रस्तावना :-

भारताने संघराज्य पद्धतीचा स्वीकार केलेला आहे. केंद्र,राज्य व स्थानिक सरकारांचे कार्यक्षेत्र निश्चित स्वरूपाचे आहे. देशातील राज्य व स्थानिक संघाने त्यांच्या उत्पन्नाच्या साधनाचे विभाजन व्यवस्थित करणे आवश्यक आहे. भारतीय संघराज्यातील उत्पन्नाच्या साधनांची विभागणी अतिशय तर्कसंगत व परिपूर्ण आहे. केंद्र व राज्याच्या महसुलाच्या व खर्चाच्या बाबी निश्चित आहे. केंद्र सरकारकडून राज्याला वित्तीय हस्तांतरण केले जाते. कर आकरणीचे सर्व अधिकार सहाव्या कलमाच्या सातव्या अनुसूचीतील केंद्र यादीत समाविष्ट केलेले आहे. घटनेच्या २८० कलमानुसार राष्ट्रपती वित्त आयोगाची नेमणूक करतात.

केंद्र आणि राज्य सरकारच्या कार्याची विभागणी :-

केंद्र आणि राज्य सरकारच्या कार्याची विभागणी करताना कार्यक्षमता निकष लावला जातो. म्हणजेच केंद्र व घटक राज्य सरकारला विभागून देण्यात आलेली वित्तीय साधने त्यांच्यावर सोपवण्यात आलेल्या जबाबदाऱ्यांशी अनुरूप असावी लागते. भारतीय संघराज्यात केंद्र व राज्य सरकारे यांच्या कार्याची शास्त्रशुद्ध विभागणी तीन विभागांमध्ये करण्यात आलेली आहे. पहिल्या भागात कार्य व अधिकार केंद्र सरकारला सोपवण्यात आलेले आहेत. दुसऱ्या भागात कार्य व अधिकार राज्य सरकारला देण्यात आले आहेत. तसेच

तिसऱ्या विभागात कार्य व अधिकार केंद्र आणि राज्य या दोघांकडे सामायिकपणे सोपवण्यात आलेले आहेत. याशिवाय उर्वरित अधिकार केंद्र सरकारकडे सोपवण्यात आलेले आहेत. या विभागाची सविस्तर माहिती पुढीलप्रमाणे;-

- केंद्र सरकार / मध्यवर्ती सरकार : संरक्षण, सशस्त्र दल, परकीय व्यवहार, जहाज, हवाई वाहतूक,राष्ट्रीय महामार्ग टपाल व तार, दळणवळण साधने इत्यादी
- घटक राज्य सरकार : पोलीस, शासकीय, सुव्यवस्था, आरोग्य, सरकारी रुग्णालय ,दवाखाने, शिक्षण अपंगांना मदत, शेती,जलसिंचन इत्यादी
- सामायिक सूचीमध्ये : आर्थिक व सामाजिक नियोजन,फौजदारी कायदा दिवानी व नादारी, कामगार , किंमत, नियंत्रण इत्यादी.

भारतीय संघराज्यामध्ये प्रत्येक राज्याची भौगोलिक सामाजिक व आर्थिक परिस्थिती भिन्न स्वरूपाची आहे .त्यामुळे मार्ग देखील भिन्न आहे.प्रत्येक राज्याचे दरडोई उत्पन्न वेगळे आहे. त्यामुळे प्रत्येक राज्याचा विकासाचा दर वेगळा आहे. देशाचा सामूहिकपणे एकत्र विकास साधायचा असेल तर या भिन्नतेचा विचार करून सर्व राज्यांना आवश्यक ती मदत केंद्र सरकार अनुदान व विविध योजनांच्या माध्यमातून करत असते.

संविधानिक तरतुदी : -

भारतीय राज्यघटनेत केंद्र सरकार व घटक राज्य सरकार यांच्यामध्ये साधनसामग्रीचे वाटप करण्यासंबंधीची तरतूद केलेली आहे. केंद्र सरकारकडून आका रवयाचे कर आणि राज्य सरकारकडून आकारावयाचे कर यांची दोन विभागात विभागणी करण्यात आलेली आहे. तसेच केंद्र व राज्य सरकारच्या कर,अधिकार कक्षा ठरविण्यात आलेल्या आहेत. भारतीय राज्यघटनेत केंद्र सरकारच्या कायदेशीर अधिकार कक्षेत आणि घटक राज्य सरकारच्या कायदेशीर अधिकार कक्षेत कोणकोणते कर आहेत याचा उल्लेख केलेला आहे. उर्वरित कर आकरण्याचे अधिकार केंद्र सरकारकडे दिलेले आहेत.

केंद्र सरकारच्या करांची विभागणी :-

- जे कर केंद्र सरकारने बसवायचे वसूल करावयाचे आणि मिळणारे सर्व उत्पन्न केंद्र सरकारकडे स्वतःकडे ठेवायचे असे कर उदा. जकात कर,महामंडळ कर, उत्पन्न कर
- जे कर केंद्र सरकारने बसवायचे असतात आणि वसूल करावयाचे असतात परंतु त्या करापासून मिळणारे उत्पन्न केंद्र व घटक राज्य सरकारांमध्ये वाटावे लागते. उदा. उत्पन्न कर ,शेती उत्पन्न, उत्पादन कर
- जे कर केंद्र सरकारने बसवायचे वसूल करावेच असतात परंतु करापासून मिळणारे सर्व उत्पन्न राज्यांमध्ये विभागून द्यावयाचे असतात असे कर उदा. मालमत्तेवरील कर, वारसा कर, रेल्वे समुद्रमार्ग व हवाई मार्गाने वाहतूक केल्या जाणाऱ्या वस्तूंवरील कर

वित्त आयोग :-

केंद्र सरकारने महसुलातील वाटा, अनुदान राज्यांना किती द्यावेत राज्य राज्यांना कशी वितरित करावेत हे सुचवण्यासाठी दर पाच वर्षांसाठी वित्त आयोग विविध निकष सुचवत असते. भारतीय राज्यघटनेच्या कलम २८० मधील तरतुदीनुसार वित्त आयोग एक स्वतंत्र न्यायिक संस्था म्हणून कार्य करते.या वित्त आयोगाच्या कालावधी हा पाच वर्षाचा असतो. हा आयोग अनुदान यांच्या बाबतीत शिफारशी करतो .त्यामुळे नेहमी बदलणाऱ्या गरजा आणि बदलणारी परिस्थिती पाहून उत्पन्न विभागणीची योग्य तरतूद होते. वित्त आयोगाची तरतूद हे भारतीय राज्यघटनेचे महत्त्वाचे वैशिष्ट्य आहे.

भारताचे राष्ट्रपती राज्यघटनेच्या कलम २८० नुसार वित्त आयोगाची नेमणूक करतात. एक अध्यक्ष व इतर चार सदस्य असे एकूण पाच सदस्य असतात. कलम २८० दोन नुसार वित्त आयोगाचा अध्यक्ष व सदस्यांची नेमणूक करण्याची पद्धती कशी असावी हे ठरवण्याचा अधिकार संसदेला दिलेला आहे.

वित्त आयोगाच्या सदस्यांची पात्रता पुढीलप्रमाणे :-

1. सर्वोच्च न्यायालय किंवा उच्च न्यायालयाचा न्यायाधीश होण्याची पात्रता सदस्यांची असावी.
2. अर्थशास्त्राची मूलभूत ज्ञान असावे

वित्त आयोग खालील बाबी विषयक राष्ट्रपतींना सल्ला देण्याचे कार्य करतो.

- केंद्रीय कर उत्पन्नापैकी ज्या कराची विभागणी होऊ शकते ती विभागणी सुचविणे
- राज्यांना दिली जाणारे अनुदानाचे तत्वे निकष ठरवणे
- केंद्र राज्यांमधील वित्त विषयक बाबी संबंधी मार्गदर्शन करणे
- राष्ट्रपतीने सुचवलेल्या वित्त विषयक बाबींविषयी सल्ला देणे.

पंधरावा वित्त आयोग ;-

पंधराव्या वित्त आयोगाचे अध्यक्ष श्री एन.के.सिंग आहेत. २७ नोव्हेंबर २०१७ ला त्यांची नेमणूक करण्यात आली. या वित्त आयोगाच्या शिफारसीचा कालावधी २०२० ते २०२५ पर्यंत आहे. या आयोगाचे सदस्य शक्तिकांत दास, डॉ. अनुप सिंग, अशोक लाहीरी ,रमेश चंद आणि सचिव अरविंद मेहता आहे.

१५ व्या वित्त आयोगाच्या शिफारसी खालील प्रमाणे :-

- राज्यांच्या वाट्यातील ४२ टक्के करांमध्ये कपात करून ४१ टक्के करण्याची करण्याचे शिफारस करण्यात आली.
- जम्मू काश्मीर लडाख या नव्याने स्थापन झालेल्या केंद्रशासित प्रदेशांसाठी एक टक्का वाढ करण्यात आली आहे.
- प्रशासनाची कार्यक्षमता वाढवण्याची शिफारस केलेली आहे.
- आयोगाने राज्यांना कोणत्या निकषा अंतर्गत निधीचे वाटप केले जाते याचे निकष आणि प्रमाण बदलले आहे.
- पंधराव्या वित्त आयोगाने राज्यांच्या लोकसंख्येचे प्रमाण १५% प्रमाण नियुक्त केले.
- केंद्र आणि राज्य सरकारांनी कर्ज एकत्रीकरणावर लक्ष केंद्रित केले पाहिजे आणि त्यांच्या संबंधी वित्तीय जबाबदारी आणि बजेट व्यवस्थापन कायद्यानुसार वित्तीय कर्ज पातळीचे पालन करावे अशी शिफारस करण्यात आली.
- सार्वजनिक आर्थिक व्यवस्थापनासाठी वैधानिक चौकट प्रदान करण्यासाठी कायद्याचा प्रमुख मसुदा तयार करण्यासाठी तज्ञ गट तयार करण्याची शिफारस केली आहे.

केंद्र राज्यांमध्ये महसुली विभागणीच्या शिफारसींसाठी पंधरावा वित्त आयोग स्थापन करण्याचा केंद्रीय मंत्रिमंडळाच्या बैठकीत तत्वतः निर्णय घेण्यात आला. पंधराव्या वित्त आयोगाच्या शिफारशींची अंमलबजावणी १ एप्रिल २०२० पासून ३१ मार्च २०२५ पर्यंत होईल.केंद्र आणि राज्य संदर्भात महसुली विभागाचे निकष बदललेले आहेत. तसेच जीएसटीच्या अंमलबजावणीच्या पार्श्वभूमीवर पंधरावा वित्त आयोगाच्या शिफारशी आधीच्या वित्त आयोगाच्या तुलनेत सर्वस्वी वेगळ्या असतील अशी अपेक्षा केंद्रीय अर्थमंत्री अरुण जेटली यांनी व्यक्त केली.महिला सबलीकरणासाठी राज्य, जिल्हा आणि तालुका पातळीवर प्रधानमंत्री महिला शक्ती केंद्राची स्थापना करण्यात येणार आहे.बेटी बचाव बेटी पढाव कार्यक्रम राबवला जाईल.ग्रामीण लोकांना डिजिटल साक्षरतेचे प्रशिक्षण देण्यात येईल.

संदर्भ सूची :-

डॉ. गंगाधर कायन्दे पाटील , पैसा बँकिंग आणि राजस्व ,चैतन्य प्रकाशन

Datta and Sundharam , Indian Economy,S.Chand publication

Lokal publiceFinanacial Managment , Anwar Shah

शा. स. मोडक, सार्वजनिक आयव्यय, अथर्व पुब्लिकेशन

https://www.nitinsir.

https:// maharashtratimes .com

पंधराव्या वित्त आयोगातून परभणी जिल्हा परिषदेस प्राप्त झालेल्या निधीचे अध्ययन

डॉ.नासिकेत जी.सूर्यवंशी
सहाय्यक प्राध्यापक ,
अर्थशास्त्र विभाग, एम.जे.कॉलेज, जळगाव

प्रस्तावना :

वित्त आयोग ही एक संवैधानिक संस्था आहे. वित्त आयोग केंद्र आणि राज्यांमध्ये घटनात्मक व्यवस्था आणि सध्याच्या गरजांनुसार कराची रक्कम वितरीत करण्याची पद्धत आणि सूत्र ठरवण्याचे काम करते. राज्यघटनेच्या कलम २८० नुसार, भारताच्या राष्ट्रपतींनी पाच वर्षांच्या अंतराने किंवा त्यापूर्वी वित्त आयोगाची स्थापना करणे आवश्यक आहे. १५ व्या वित्त आयोगाच्या शिफारशींमध्ये २०२१-२२ ते २०२५-२६ या पाच वर्षांच्या कालावधीचा समावेश आहे. भाजपचे ज्येष्ठ सदस्य एन. के. सिंह पंधराव्या वित्त आयोगाचे अध्यक्ष आहेत. १ एप्रिल २०२० पासून सुरू होणाऱ्या पाच आर्थिक वर्षांसाठी कर आणि इतर आर्थिक बाबींच्या हस्तांतरणासाठी शिफारसी देण्यासाठी आयोगाची स्थापना करण्यात आली होती. आयोगाची मुख्य कार्ये "सहकारी संघराज्यवाद मजबूत करणे, सार्वजनिक खर्चाची गुणवत्ता सुधारणे आणि वित्तीय स्थिरतेचे संरक्षण करण्यात मदत करणे" हे होते. " १५ व्या वित्त आयोगाची स्थापना नियोजन आयोग रद्द करण्याच्या पार्श्वभूमीवर (योजनेतर आणि योजनातर खर्चामधील फरक) आणि वस्तू आणि सेवा कर (GST) लागू करण्याच्या पार्श्वभूमीवरकरण्यात आली आहे.

उद्दिष्टे:

१) वित्त आयोगाच्या पार्श्वभूमीचा अभ्यास करणे

२) १५ व्या वित्त आयोगाच्या हस्तांतरणाच्या निकषांचा अभ्यास करणे

३) महाराष्ट्र राज्याच्या अनुदानाच्या तपशीलाचा अभ्यास करणे.

४) १५ व्या वित्त आयोगातून परभणी जिल्हा परिषदेला मिळालेल्या निधीचा अभ्यास करणे.

गृहीतके:

१) वित्त आयोगातून मिळालेल्या निधीमुळे विकासास मदत होत आहे.

२) १५ व्या वित्त आयोगातून परभणी जिल्हा परिषदेला मिळालेला निधी इतर जिल्ह्यांच्या तुलनेत कमी आहे

संशोधन पद्धती:

प्रस्तुत संशोधन हे दुय्यम साधन सामुग्रीवर अवलंबून असून यामध्ये शासकीय अहवाल,मासिके, साप्ताहिके,वेगवेगळी संकेत स्थळे माहिती संकलनासाठी वापरण्यात आली आहेत.

वित्त आयोगाची पार्श्वभूमी:

एकसंघीय राष्ट्रात सर्वात मोठी आणि निर्णायक समस्या म्हणजे सरकारांमधील शक्ती आणि संसाधने संतुलित करणे. म्हणूनच आमच्या घटना निर्मात्यांनी मोजणीवर खूप सावधगिरी बाळगली आणि अनुच्छेद २८० अंतर्गत वित्त आयोगाची तरतूद केली, मुख्यत: अनुलंब तसेच क्षैतिज एकसंघीय राष्ट्रात वित्तीय असंतुलन कमी करण्याच्या दृष्टीकोनातून केंद्राकडून राज्यांना आर्थिक हस्तांतरणाची शिफारस करण्यासाठी वित्त आयोग महत्वाची भूमिका निभावते.

वित्त आयोगाची स्थापना तत्कालीन कायदेमंत्री डॉ. बी.आर. आंबेडकर यांनी १९५१ मध्ये या वित्तीय असमतोलांना दूर करण्यासाठी केली. कैंद्र आणि राज्यांमधील वित्तीय दरी भरून काढण्यासाठी अनेक तरतुदी आधीच भारतीय संविधानात समाविष्ट केल्या गेल्या आहेत, ज्यामध्ये कलम २६८ समाविष्ट आहे, जे कैंद्राद्वारे शुल्क आकारणे सुलभ करते परंतु राज्यांना ते गोळा करण्यासाठी आणि ते ठेवण्यासाठी सुसज्ज करते. त्याचप्रमाणे, अनुच्छेद २६९, २७०, २७५, २८२ आणि २९३, इतरांसह, कैंद्र आणि राज्यांमध्ये संसाधने वाटण्याचे मार्ग आणि माध्यम निर्दिष्ट करतात.

वित्त आयोगाच्या शिफारशी मध्ये पुढील बाबींचा अंतर्भाव होतो. राज्याकडून आकारण्यात येणारे कर, शुल्क, टोल आणि शुल्क यांच्या निव्वळ उत्पन्नाचे राज्य सरकार आणि नगरपालिका यांच्यात वितरण करणे,राज्यातील सर्व स्तरांवर नगरपालिकांमध्ये अशा उत्पन्नाचे समान वाटप करणे,कर, शुल्क, टोल आणि नगरपालिकेद्वारे नियुक्त केलेले किंवा विनियोजन केलेले शुल्क यांचे निर्धारण करणे,राज्याच्या एकत्रित निधीतून नगरपालिकांना अनुदान वितरीत करणे आणि नगरपालिकांची आर्थिक स्थिती सुधारण्यासाठी आवश्यक उपाययोजना सुचविणे.

१५ व्या वित्त आयोगाच्या हस्तांतरणासाठीचे निकष:

निकष	१४ वा वित्त आयोग २०१५-२०	१५ वा वित्त आयोग २०२०-२१	१५ वा वित्त आयोग २०२१-२६
उत्पन्न	५०.०	४५.०	४५.०
क्षेत्रफळ	१५.०	१५.०	१५.०
लोकसंख्या (१९७१)	१७.५	-	-
लोकसंख्या (२०११)#	१०.०	१५.०	१५.०
लोकसंख्याशास्त्रीय कामगिरी	-	१२.५	१२.५
फॉरेस्ट कव्हर	७.५	-	-
वन आणि पर्यावरणशास्त्र	-	१०.०	१०.०
कर आणि वित्तीय प्रयत्न*	-	२.५	२.५
एकूण	१००	१००	१००

स्रोत: १४ व्या आणि १५ व्या वित्त आयोगाचे अहवाल; पीआरएस.

लोकसंख्या: फक्त २०११ च्या जनगणनेची संख्या टीओआर नुसार वापरली जाते. लोकसंख्येच्या निकषावर केवळ १५ टक्के वजन निश्चित केले आहे. कारण इतर काही निकष देखील त्याद्वारे मोजले जातील. क्षेत्रफळ या निकषावरून १५ टक्के मध्यम वजन मोठ्या क्षेत्रासाठी नियुक्त केले आहे, त्यासाठी काही अतिरिक्त प्रशासकीय खर्च येतो. परंतु यामुळे सेवा प्रदान करण्याच्या खर्चात प्रमाणानुसार वाढ होऊ शकत नाही. वन आणि इकोलॉजी: हा निकष एखाद्या राज्याच्या वनक्षेत्राद्वारे संपूर्ण देशाला पुरवल्या जाणाऱ्या पर्यावरणीय सेवांसाठी आहे. आणि सर्व राज्यांच्या एकूण घनदाट जंगलात प्रत्येक राज्याच्या घनदाट जंगलाचा वाटा मोजून तो गाठला जातो. वन आणि पर्यावरणाच्या निकषासाठी १० टक्के वाट नियुक्त केला आहे. उत्पन्नाचे अंतर: दरडोई उत्पन्नाचे अंतर हे देवाणघेवाण फॉर्म्युला अधिक समान आणि प्रगतीशील बनविण्यासाठी वापरलेला निकष आहे आणि कमी दरडोई उत्पन्न आणि कमी स्वतःची कर क्षमता असलेल्या राज्यांना उच्च हस्तांतरण प्रदान करते. ४५ टक्के हिस्स्यासह उत्पन्न अंतराचा निकष

कायम ठेवला. लोकसंख्याशास्त्रीय कामगिरी: १९७१ च्या जनगणनेच्या माहिती वरून २०११ च्या जनगणनेच्या माहिती मध्ये अचानक बदल केल्याने लोकसंख्या नियंत्रणात चांगली कामगिरी करणाऱ्या काही राज्यांना अन्यायकारकपणे दंड होऊ नये. त्यामुळे, लोकसंख्येच्या आघाडीवर चांगली कामगिरी करणाऱ्या राज्यांना बक्षीस देण्यासाठी आयोगाने नवीन कामगिरी-आधारित निकष लागू करण्याची शिफारस केली. लोकसंख्याशास्त्रीय कामगिरीचा हा निकष प्रत्येक राज्याच्या TFR च्या परस्पर वापरून मोजला जातो, ज्या राज्यांनी कमी TFR प्राप्त केला आहे त्यांना जास्त गुण दिले जातील आणि त्याउलट. या निकषाला १२.५ टक्के वजन नियुक्त केले आहे. कर प्रयत्न: कामगिरी-आधारित निकष म्हणून कर प्रयत्नांचा समावेश केल्याने राज्यांना उच्च कर संकलन कार्यक्षमतेसह पुरस्कृत केले जाईल आणि सर्व राज्यांना अधिक कर कार्यक्षम होण्यासाठी प्रोत्साहन मिळेल. एखाद्या राज्याच्या तीन वर्षांतील सरासरी दरडोई स्वत:च्या कर महसूल आणि त्याचा दरडोई जीएसडीपी यांचे गुणोत्तर घेऊन आणि राज्याच्या लोकसंख्येनुसार हे प्रमाण मोजून त्याची गणना केली जाते. या निकषासाठी एकूण २.५ टक्के परिमाण नियुक्त केले आहे.

महाराष्ट्र राज्य २०२१-२६ च्या अनुदानाचा तपशील (कोटीमध्ये)

राज्ये	महसुली तूट अनुदान	स्थानिक स्वराज्य संस्थांना अनुदान	आपत्ती व्यवस्थापन	विशिष्ट क्षेत्र-विशिष्ट अनुदान	राज्य-विशिष्ट अनुदान
महाराष्ट्र	०	४१३९१ (०९.६७%)	१७८०३ (१४.५२%)	८४३१ (०६.९०)	२७५० (०५.५४%)
संपूर्ण भारत	२९४५१४	४२७९११	१२२६०१	१२२०३७	४९५९९

स्रोत: २०२१-२६ साठी १५ व्या वित्त आयोगाचा अहवाल; पीआरएस

१५ व्या वित्त आयोगातून महाराष्ट्र राज्याला मिळालेल्या निधीचा तपशील वरील तक्त्यात दिलेला आहे. एकूण निधीच्या १४.५२% इतका निधी आपत्ती व्यवस्थापनाला सर्वाधिक मिळाला

१५ व्या वित्त आयोगातून परभणी जिल्हा परिषदेला प्राप्त निधी.(रु.)

१५ व्या वित्त आयोगांतर्गत जिल्हा परिषद, पंचायत समिती आणि ग्रामपंचायत स्तरासाठी खालील निधी प्राप्त झाला आहे.

अ. क्र	लेखाशीर्ष	बाब	जिल्हा परिषद (१०%)	पंचायत समिती (१०%)	ग्रामपंचायत (८०%)	एकूण
१	२५१५-२४७७	अबंधित	२९९२९०००	२९९२९०००	२३९४३५०००	२९९२९३०००
२	२५१५-२४७७	बंधित	२९९२९०००	२९९२९०००	२३९४३५०००	२९९२९३०००
३		अबंधित	२९९२९००० (लेखाशीर्ष) २५१५-२६२८	२९९२९००० (लेखाशीर्ष) २५१५-२६४६	२३९४३५०००	२९९२९३०००

४		बंधित	२९९२९००० (लेखाशीर्ष) २५१५-२६३७	२९९२९००० (लेखाशीर्ष) २५१५-२६५५	२३९४३५००० (लेखाशीर्ष) २५१५-२६७३	२९९२९३०००

स्रोत: परभणी जिल्हा परिषद अहवाल

१५ व्या वित्त आयोगांतर्गत २०२१-२६ या कालावधीत जिल्हा परिषद परभणीला प्राप्त झालेल्या अपेक्षित निधीचे विवरण खाली दिले आहे.

अ. क्र	वर्ष	बंधित	जिल्हा परिषद (१०%)	पंचायत समिती (१०%)	ग्रामपंचायत (८०%)	एकूण
१	२०२१-२२	बंधित	३५३९५०००	३५३९५०००	२८३१६४०००	३५३९५४०००
२	२०२२-२३	बंधित	३६६६१०००	३६६६१०००	२९३२८९०००	३६६१११०००
३	२०२३-२४	बंधित	३७०६४०००	३७०६४०००	२९६५१००००	३७०६३८०००
४	२०२४-२५	बंधित	३९२५००००	३९२५००००	३१३९९८०००	३९२४९८०००
५	२०२५-२६	बंधित	३८२८८०००	३८२८८०००	३०६३०६०००	३८२८८२०००

स्रोत: परभणी जिल्हा परिषद अहवाल

२०२१-२२ या वर्षासाठी जिल्हा परिषद, पंचायत समिती आणि ग्रामपंचायतींना १५ व्या वित्त आयोगांतर्गत एकूण ३५३९५४००० रु. २०२४-२५या वर्षात परभणी जिल्हा परिषदेला सर्वाधिक रक्कम मिळाली आहे. यामध्ये १५ व्या वित्त आयोगांतर्गत सर्वाधिक ८०% वाटा ग्रामपंचायतीला मिळाला आहे. तर जिल्हा परिषद आणि पंचायत समित्यांना प्रत्येकी १० टक्के समान वाटा मिळाला आहे.

अ.क्र	वर्ष	अबंधित	जिल्हा परिषद (१०%)	पंचायत समिती (१०%)	ग्रामपंचायत (८०%)	एकूण
१	२०२१-२२	अबंधित	५३०९३०००	५३०९३०००	४२४७४६०००	५३०९३२०००
२	२०२२-२३	अबंधित	५४९९२०००	५४९९२०००	४३९९३३०००	५४९००१७०००
३	२०२३-२४	अबंधित	५५५९६०००	५५५९६०००	४४४७६५०००	५५५९५७०००
४	२०२४-२५	अबंधित	५८८७५०००	५८८७५०००	४७०९९८०००	५८८७४८०००
५	२०२५-२६	अबंधित	५७४३२०००	५७४३२०००	४५९४५९०००	५७४३२३०००

Sources: परभणी जिल्हा परिषद अहवाल

२०२१-२२ या वर्षासाठी जिल्हा परिषद, पंचायत समिती आणि अबंधित क्षेत्राखालील ग्रामपंचायतींना एकूण ५३०९३२००० रु. १५ व्या वित्त आयोगाच्या अंतर्गत. २०२४-२५ या वर्षात परभणी जिल्हा परिषदेला सर्वाधिक रक्कम मिळाली आहे. यामध्ये १५ व्या वित्त आयोगांतर्गत सर्वाधिक ८०% वाटा ग्रामपंचायतीला मिळाला आहे. तर जिल्हा परिषद आणि पंचायत समित्यांना प्रत्येकी १० टक्के समान वाटा मिळाला आहे.

निष्कर्ष:

१५ व्या वित्त आयोगाच्या निधीचा विचार करता महाराष्ट्राला मिळालेला निधी विविध घटकांमध्ये वाटण्यात आला आहे. वितरित करण्यात आलेला बहुतांश निधी हा आपत्ती व्यवस्थापनासाठी आहे. परभणी जिल्ह्याचे क्षेत्रफळ आणि लोकसंख्या लक्षात घेता जिल्हा परिषदेला मिळणारा निधी इतर जिल्ह्यांच्या तुलनेत

खूपच कमी आहे. त्यात वाढ व्हायला हवी होती, परंतु निधी हस्तांतरणासाठी ठरवून दिलेल्या निकषांच्या तुलनेत निधी खूपच कमी असल्याने विकासकामे होत नाहीत.

संदर्भ:

१४ व्या आणि १५ व्या वित्त आयोगाचे अहवाल; पीआरएस.

२०२१-२६ साठी १५ व्या वित्त आयोगाचा अहवाल; पीआरएस

जे.एफ. पाटील (२००६) पब्लिक फायनान्स, फडके प्रकाशन, कोल्हापूर

परभणी जिल्हा परिषद अहवाल

Parbhani.gov.in

१५वा वित्त आयोग आणि केंद्र व राज्य वित्तीय संबंध

डॉ.सचिन भास्कर कुंभार
अर्थशास्त्र विभाग,
डॉ. अण्णासाहेब जी.डी.बेंडाळे
महिला महाविद्यालय, जळगाव
आजीव सभासद क्र. १५८३
भ्रमणध्वनी – ९५९५४३०७७४
डॉ.राजेन्द्रकुमार गव्हाळे
अर्थशास्त्र विभाग प्रमुख,
गो.से.विज्ञान,कला आणि वाणिज्य महाविद्यालय,खामगाव

प्रस्थावना -

कोणत्याही देशाची घटनात्मक व्यवस्था एक तर एक संघ व्यवस्था असते किंवा संघराज्यात्मक व्यवस्था असते . एक संघ घटनात्मक व्यवस्थेमध्ये केंद्रीय पातळीवर केंद्र सरकार असते. केंद्र सरकार आर्थिक,सामाजिक आणि राजकीय निर्णय स्वतः घेते.देशाचे संरक्षण,अंतर्गत शांतता व सुव्यवस्था निर्माण करणे,न्याय,शिक्षण, लोकांचे कल्याण या सोबतच वित्तीय निर्णय केंद्रीय स्थरावर घेतले जातात. या व्यवस्थेत घटक राज्ये असतात परंतु त्यांना कोणतीही स्वायत्तता नसते. या प्रकारची व्यवस्था ब्रिटन,फ्रान्स,जर्मनी,ऑस्टेलिया आणि आशिया खंडातील बहुतांश देशांमध्ये कार्यरत आहे. संघराज्यात्मक व्यवस्थेमध्ये दोन पातळीवर सरकार असते. केंद्रीय पातळीवर केंद्रसरकार आणि राज्य पातळीवर राज्य सरकार देशाचे संरक्षण,आंतरराष्ट्रीय व्यवहार आणि चलन व्यवस्था ही प्रमुख कार्ये केंद्र सरकारला करावी लागतात. या बरोबरच केंद्र आपल्या कार्याच्या कक्षा विस्तारू शकते. बाकी सर्व कामे राज्य सरकारला करावी लागतात. राज्य स्वायत्त असतात. केंद्र आणि राज्यांची कार्ये आणि वित्तीय अधिकारांचे विभाजन घटनात्मक तरतूदीनुसार केले जाते. या प्रकारची व्यवस्था अमेरिका,कॅनडा आणि भारत या देशात अस्तित्वात आहे. स्वातंत्र्योत्तर काळात भारताने संघराज्यात्मक व्यवस्थेचा स्वीकार केला. भारतात २८ घटक राज्ये आणि ८ केंद्र शासीत प्रदेशांचा एक संघ आहे. या संघावर केंद्राचे नियंत्रण आहे. राज्यांना स्वायत्तता आहे. २६ जानेवारी १९५० रोजी भारतीय घटनातयार करण्यात आली. घटनेतील कलम २६४ ते २९३ मध्ये केंद्र सरकार आणि राज्य सरकारांच्या कार्याचे आणि वित्तीय अधिकाराचे विभाजन केलेले आहे. सदर शोध निबंधात केंद्र आणि राज्य सरकारांच्या वित्तीय संबंधी अभ्यास केलेला आहे.

उद्दिष्ट : १) केंद्र आणि राज्य सरकारांच्या वित्तीय संबंधी अभ्यास करणे.

गृहीतक : १) केंद्र आणि राज्य सरकारांच्या वित्तीय संबंधांमध्ये तणावा असलेला दिसून येतो.

संशोधन पद्धती : या शोध निबंधासाठी संशोधकाने दुय्यम साधन सामग्रीचा वापर केलेला आहे.

१५वा वित्त आयोग संबंधी माहिती -

१५वा वित्त आयोगाची स्थापना २७ नोव्हेंबर २०१७ ला झाली याचा कार्यकाल २०२० ते २०२५ पर्यंत आहे, याचे अध्यक्ष नंदकिशोर शिंग असून सदस्य अजय नारायण झा आणि डॉ.अनुप सिंह,अंशकालीन सदस्य डॉ.अशोक लाहिरी आणि डॉ.रमेश चंद, सचिव श्री. अरविंद मेहता हे आहेत.

निव्वळ कर उत्पनापैकी राज्यांना वाटा -

घटक आणि भर

घटक	भर
लोकसंख्या (२०११)	१५ %
राजकोषीय शिस्त	२.५ %
क्षेत्रफळ	१५ %
वन आणि पर्यावरणशास्त्र	१० %
लोकसंख्याशास्त्रीय कामगिरी	१२.५ %
राजकोषीय क्षमता किवा उत्पन अंतर	४५ %

सर्वाधिक रक्कम मिळाली राज्याला

राज्य	किती %
१) उत्तर प्रदेश	१७.९३९%
२) बिहार	१०.०५८ %
३) मध्य प्रदेश	७.८५०%
४) पश्चिम बंगला	७.५२३
५) महाराष्ट्र	६.३१७%

सर्वात कमी रक्कम मिळाली राज्याला

राज्य	किती %
१)गोवा	०.३८६ %
२)सिक्कीम	०.३८८ %
३)मिझोरम	०.५०० %
४)नागालँड	०.५६९ %

देशातील एकूण राज्यामध्ये कर महसुलाच वाटा ४१ % आहे, **सर्वाधिक रक्कम** उत्तरप्रदेश **राज्याला मिळणार** आहे. **सर्वाधिक कमी रक्कम** गोवा **राज्याला मिळणार आहे.**

केंद्र आणि राज्य सरकारांच्या वित्तीय संबंधांमध्ये तणाव –

भारतीय राज्य घटनेत केंद्र सरकार आणि राज्य सरकार यांच्यात वित्तीय साधनांचे आणि कार्याचे विभाजन करण्यात आलेले आहे. घटनाकारांनी विभाजन करताना केंद्र आणि राज्यांमध्ये सलोख्याचे संबंध निर्माण होतील, संपूर्ण देश एकसंघ राहील याची खबरदारी घेतलेली आहे. असे असले तरी गेल्या पाच दशकामध्ये केंद्र सरकार आणि राज्य सरकार यांच्यात वित्तीय साधनांच्या विभाजनावरून अनेक तणाव आणि संघर्ष निर्माण झालेले आहेत.

१) **उत्पन्नाचे साधने आणि जबाबदारी या बाबत तणाव** :- राज्य घटनेतील कलम २६४ ते २९३ मध्ये केंद्र सरकार आणि राज्य सरकारची कार्ये आणि ती पार पाडण्यासाठी उत्पन्न साधने यांचे विभाजन केलेले आहे. या मध्ये तणावाचा मुद्दा असा की, केंद्र सरकारकडे संरक्षण,विदेश व्यवहार व व्यापार,विदेश चलन व्यवहार,चलन निर्मिती (रुपया व नाणी) रेल्वे,पोस्ट व तारखाते,महामार्ग,हवाई व जल वाहतूक,कायदे इ.जबाबदाऱ्या आहेत तर राज्य सरकारकडे कृषी व जलसिंचन, सार्वजनिक आरोग्य व स्वच्छता, अंतर्गत शांतता व सुव्यवस्था, शिक्षण व प्रशिक्षण, अंतर्गत रस्ते, जल वाहतूक आणि व्यापार या सारखी अनेक विकासात्मक कामे सोपविलेली आहेत. जबाबदाऱ्यांच्या विचार करता केंद्र सरकारपेक्षा राज्य सरकारांकडे अनेक विकासात्मक आणि कल्याणकारी जबाबदाऱ्या मोठ्या प्रमाणावर सोपविलेल्या सीमा आहेत. उत्पन्न साधनांचा जर आपण विचार केल्यास केंद्र सरकारला प्राप्ती कर, महामंडळ कर. शुल्क, संपत्ती व वारसा हक्क शुल्क,स्टँप ड्युटी या सारख्या प्रमुख करांपासून

प्रचंड प्रमाणावर उत्पन्न मिळते तर राज्य सरकारांना कृषी उत्पन्न कर,जमीन महसूल,घट पट्टी, विक्रीकर, मद्यार्क युक्त पदार्थोंवरील उत्पादन शुल्क, मनोरंजन कर यासारख्या गौण उत्पन्न मिळवून देणाऱ्या करांपासून उत्पन्न मिळते.

मागील अनेक दशकात केंद्रीय कराचा आकार आणि आधार हा विस्तारलेला आहे. पण महामंडळ कर,सीमा शुल्क आणि उत्पादन शुल्क या प्रमुख राज्याच्या कराचा आधार आणि आकारात फारस बदल झाले नाहीत. केंद्र सरकार २०१४-१५ मध्ये ८२९३८३ कोटी रुपये महसूल मिळाला होता. तर २४ घटक राज्यांना त्यांच्या करापासून २०१३-१४ मध्ये ११०७९१६ कोटी रुपये उत्पन्न मिळाले. राज्यांना मिळणारे उत्पन्न आणि खर्च यांचा मेळ घालण्यासाठी केंद्रावर अवलबून राहावे लागते. यातूनच केंद्र आणि राज्य सरकारमध्ये तणाव निर्माण होत असतात.

२) राज्य सरकारांचे केंद्र सरकारवरील वाढते अवलंबित्व - राज्य सरकारांच्या जबाबदाऱ्या दिवसेंदिवस वाढत आहेत. परंतु त्या जबाबदाऱ्या पूर्ण करण्यासाठी अनेक मार्गापासून मिळणारे उत्पन्न कमी पडत असल्याने राज्यांचे केंद्रावरील अवलंबित्व दिवसेंदिवस वाढत आहे. १९८०-८५ या काळात केंद्र सरकारकडून राज्याना एकूण ५३३२० कोटी रुपये हस्तांतरीत झाले. १९९०-९५ या काळात ही रक्कम २४४२६० कोटी रुपयांपर्यंत बाढली. १९९०-९५ या काळात राज्यांचा एकूण खर्च ६१५४९६ कोटी रुपये झाला होता. एकूण खर्चात केंद्रीय हस्तांतरित उत्पन्नाचा वाटा ४०% होता. याचा अर्थ राज्य सरकारला ज एकूण उत्पन्न मिळते त्यातून राज्याचा फक्त ६०% च खर्च भागविला गेला. दहाव्या वित्त आयोगाच्या शिफारशी नुसार१९९५-२००० या काळात राज्यांकडे २२६६४० कोटी रुपये हस्तांतरीत करण्याची शिफारस होती. तर अकराव्या वित्त आयोगाने यात ४३४९०५ कोटी रुपये हस्तांतरणाची शिफारस केलेली आहे. १२व्या वित्त आयोगाने ७५५७५२ कोटी रूपये,१३व्या वित्त आयोगाने ३१८५८१ कोटी रुपये हस्तांतरणाची शिफारस केली होती. राज्यांचे केंद्रावरील अवलंबित्वामुळे केंद्र सरकारचे राज्य सरकाराच्या कारभारातील हस्तक्षेप वाढत आहे. या हस्तक्षेपातूनच केंद्र आणि राज्यांमध्ये तणाव निर्माण होत आहेत. राज्यांचे केंद्रावरील अवलंबित्वाबाबत केंद्र सरकार तक्रार करते की,राज्य सरकार त्याच्या उत्पन्न मार्गात वाढ करण्याचे प्रामाणिक प्रयत्न करीत नाही. प्राप्ती कराप्रमाणेच पन्यांनी कृषीवर प्राप्तीकर आकारला तर राज्याच्या महसुलात वाढ होऊ शकेल पण राज्य सरकार कृषीवर कर आकारत नाहीत. केंद्रात आणि राज्यात एकाच पक्षाचे सरकार असेल तर वित्तीय हस्तारणाबाब कच्या पक्षाचे सरकार आहे. त्यातही केंद्रातील सरकारला सहकार्य करणाऱ्या राज्यांना सरकारांमध्ये झुकते माप मिळते त्यात इतर राज्यांवर अन्याय होतो. यातूनच केंद्र आणि राज्य सरकारांना मध्ये तणाव निर्माण होतात.

३) राज्यांच्या स्वायत्ततेबाबत – राज्य घटनाकारांनी देशाला विघटन शक्तीपासून वाचविण्यासाठी हेतू पुरस्काररित्या घटक राज्यापेक्षा केंद्र सरकारला अधिक जास्त दिलेले आहेत. स्वातंत्र्योत्तर काळात बरेच वर्ष केंद्रात आणि राज्यामध्ये पक्षाचे सरकार असल्याने केंद्र व राज्यामधील संबंध मजबूत झालेत. यात केंद्र सरकार अधिक प्रभावी झाले. पण १९७९ मध्ये पश्चिम बंगाल मधिल सरकारने केंद्र राज्य सरकार संबंधावर टिप्पणी केली. यात म्हटले की,भारतातील घटनेची रचना संघीय नसून एक संघ जास्त आहे. केंद्र सरकारला सर्वोच्च अधिकार दिलेले आहेत. त्यामुळे केंद्र सरकार राज्यांच्या कारभारामध्ये हस्तक्षेप जास्त करते. उदा. कायदे आणि न्याय व्यवस्था हा राज्यांचा अधिकार आहे. असे असले तरी केंद्रीय राखीव पोलीस, सीमा सुरक्षा दल, औद्योगिक सुरक्षा दल इत्यादीच्या माध्यमातून केंद्र सरकार राज्यांच्या सुरक्षा व्यवस्थेत हस्तक्षेप करते. यामुळे राज्यांची स्वायत्तता कमी होते. तसेच केंद्र सरकार आर्थिक आणि राजकीय क्षेत्रांमध्ये हस्तक्षेप करून राज्यांच्या अधिकारावर अतिक्रमण करते. त्यामुळे केंद्र सरकार व राज्य सरकारांमध्ये तणाव निर्माण होतात. असा तणाव उत्तर प्रदेशातील मायावती सरकार,तामिळनाडूतील जयललिता सरकार,बिहारमधील यादव सरकार आणि केंद्र सरकार यांच्यात गेल्या ५ वर्षात नेहमीच निर्माण झाले आहेत.

४) उत्पन्न साधनातील लवचिकतेवरून तणाव – राज्यघटनेतील तरतुदीनुसार केंद्र सरकारला जे कर बसविण्याचे अधिकार आहेत. त्या करांमध्ये लवचिकता जास्त आहे. उदा. प्राप्तीकरांचा दर उत्पन्न वाढीबरोबर वाढत जातो, उत्पादन शुल्क उत्पन्न उत्पादन प्रमाण वाढीबरोबर वाढ जाते. आयातीत घट करण्यासाठी सरकार सीमा शुल्क दर वाढवून मोठ्या प्रमाणावर उत्पन्न मिळवू शकते. पण राज्यांना जे कर बसविण्याचे अधिकार आहेत ते बरेचसे अलवचिक आहेत. शेतसाऱ्यात फारशी वाढ करता येत नाही. मनोरंजनकरही फारसे वाढविता येत नाही. विक्री कराचे दर वाढविले तर उत्पादक व विक्रेते विरोध करतात. ग्राहक आपला उपभोग किंमत वाढीमुळे कमी करतात असे झाले तर विक्री कमी होऊन सरकारचा महसूल घटतो. यामुळे राज्यांच्या उत्पन्न वाढीवर मर्यादा येतात. राज्यांना उत्पन्न अपुरे पडू लागल्याने ते केंद्राकडे अनुदान,मदत आणि कर्ज मागणी करतात. यातूनच केंद्र व राज्यांमध्ये वाद निर्माण होतात.

५) नियोजन मंडळाचे महत्त्व जास्त आणि वित्त आयोगाचे महत्त कमी - घटनेतील २८० कलमानुसार राष्ट्रपती वित्त आयोगाची स्थापना करतात. वित्त आयोग विभाज्यकर आणि करेत्तर उत्पन्न विभाजनाबाबत सरकारला शिफारस करू शकते. थोडक्यात वित्त आयोग हा घटनात्मक आहे. पण १९५१ पासून भारतात पंचवार्षीक योजना राबविण्यात येत आहे. योजना तयार करण्यासाठी आणि त्याची अंमलबजावणी करण्यासाठी नियोजन मंडळाची स्थापना करण्यात आली. नियोजन मंडळ स्थापन करण्याविषयी व त्याच्या कार्याविषयी घटनेत कोणतीही तरतूद नाही. म्हणजेच नियोजन मंडळ हे घटनाबाह्य केंद्र आहे. उत्पन्न हस्तांतरण शिफारस करताना वित्त आयोग व नियोजन मंडळ यांच्यात वाद निर्माण होतात. आज भारतात एक तृतीयांश उत्पन्नाचे हस्तांतरण वित्त आयोगाच्या तर दोन तृतीयांश हस्तांतरण नियोजन मंडळाच्या शिफारशीनुसार केले जाते. याचा अर्थ नियोजन मंडळ या घटनाबाह्य केंद्राचे महत्त्व वाढले आणि वित्तीय आयोगाचे महत्त्व कमी झाले. नियोजन मंडळाने उत्पन्न हस्तांतरणाच्या संदर्भात सुरुवातीची बरीच वर्षे कोणतेही निकष तयार केले नाहीत. नियोजन मंडळावर केंद्र सरकारचे पूर्ण प्रभुत्व असल्याने केंद्र सरकार नियोजन मंडळामार्फत काही राज्यांना सापत्निकाची वागणूक देऊ लागले यातून केंद्र सरकार आणि राज्य सरकारांमध्ये तणाव निर्माण होऊ लागले आहेत.

६) प्रादेशिक असमतोल - वित्त आयोग आणि नियोजन आयोगाच्या शिफारशीनुसार राज्यांकडे जे उत्पन्न हस्तांतरीत केले जाते त्यातून प्रादेशिक असमतोल कमी झाला नाही. या उलट यातून दरडोई उत्पन्नात असमानता वाढली . योजना आयोगाच्या शिफारशीनुसार योजनाबद्ध साहाय्यता ७० % कर्जरूपाने आणि ३० % अनुदान रूपाने दिली जाते . हे प्रमाण स्थिर आहे ही साहाय्यता देताना विकसित आणि अविकसित राज्ये असा भेदभाव केला जात नाही . व्यवहारात हे धोरण अविकसित राज्यांच्या विरुद्ध जाते. प्रत्यक्षात अविकसित राज्यांना त्यांच्या विकासासाठी अनुदान जास्त आणि कर्ज कमी असे प्रमाण असावे. पण असे न झाल्याने अविकसित राज्यांचा कर्जाचा भार वाढला त्यामुळे विकसित राज्यांच्या तुलनेत त्याचे दरडोई उत्पन्न कमी आहे . विकसित राज्ये विकासाच्या नावाखाली केंद्राकडून स्वत: जास्तीत जास्त हस्तांतरण करून घेतात . त्यातून ते पायाभूत सुविधा निर्माण करून आपल्या विकासाचा वेग वाढवितात त्यामुळे त्यांचे उत्पन्न वाढते आणि दरडोई उत्पन्नात वाढ होते . तसेच विकसित राज्ये आपली महसूली व वित्तीय तुट जादा अनुदान प्राप्त करण्यात यशस्वी ठरतात. या सर्वांतून जास्त दाखवून केंद्राकडून विकसित राज्ये आणि अविकसित राज्ये असा प्रादेशिक असमतोल निर्माण होत आहे . यातून विकसित राज्ये व अविकसित राज्ये यांच्यात तणाव वाढत आहेत.

अशा प्रकारे केंद्र सरकार आणि राज्य सरकार एकमेकांवर आरोप - प्रत्यारोप करतात त्यातूनच त्यांच्यात तणाव निर्माण होत होत असल्याचे दिसून येत आहे.

निकर्ष :-

१) **वित्त आयोग** एक स्वतंत्र अर्ध न्यायिक विशेषज्ञ संस्था आहे.

२) वित्त आयोग **स्थापने मागे उद्देश** हा केंद्र सरकार व राज्य सरकार वित्तीय सामंजस्य निर्माण करण्यासाठी आहे.

३) **वित्त आयोगाला** राजकोषीय संघराज्यवादाचे संतूलन चाक म्हणतात परंतु केंद्र आणि राज्य यात आर्थिक असंतुलन असल्याचे दिसून येते.

४) देशातील विविध राज्यात प्रादेशिक असमतोलता मोठ्या प्रमाणात दिसून येते.

५) राज्य सरकार जे कर लावतात त्या करांन मध्ये राज्य सरकार वाढ करण्यास तयार नाही, कारण राज्य सरकार राजकीय स्वार्थासाठी या अधिकाराचा वापर करीत नाही.

६) केंद्र सरकार राज्यांच्या कारभारामध्ये हस्तक्षेप जास्त प्रमाणात करताना आढळते.

७) केंद्र सरकार आर्थिक आणि राजकीय क्षेत्रांमध्ये हस्तक्षेप करून राज्यांच्या अधिकारावर अतिक्रमण करत असलेले दिसून येते.

८) पश्चिम बंगाल व इतर काही राज्यांनी स्वायत्ततेची मागणी केली आहे.

संदर्भ :-

१) https://azreview.org

२) https://finance.maharashtra.gov.in/

३) भारतीय अर्थव्यवस्था – प्रा.डॉ.एन.एल.चव्हाण, प्रशांत पब्लिकेशन जळगाव.

पंधरावा वित्त आयोग : केंद्र राज्य वित्तीय संबंधाची चिकित्सा

डॉ.पांडुरंग एन. डापके,
सहयोगी प्राध्यापक व अर्थशास्त्र विभागप्रमुख
पंडित जवाहरलाल नेहरु महाविद्यालय, औरंगाबाद.

गोषवारा :-

भारतामध्ये प्रत्येक राज्याची भौगोलिक, सामाजिक आणि आर्थिक परिस्थिती भिन्न असल्यामुळे प्रत्येक राज्याचे उत्पन्नाचे स्त्रोत, दरडोई उत्पन्न आणि त्यांचा विकास दर सुध्दा भिन्न आहे. त्यामुळे भारतातील काही राज्य अधिक विकसित तर काही राज्य कमी विकसित आहे. परंतू देशाचा विकास हा समतोल असावा म्हणून केंद्र सरकार सर्व राज्यांना आवश्यक ती मदत अनुदान व विविध योजनांच्या माध्यमातून करत असते. ही मदत करतांना कोणत्याही राज्यावर अन्याय होवू नये म्हणून केंद्र सरकार व राज्य सरकार यांच्यामध्ये वित्तीय सामंजस्य निर्माण करण्यासाठी वित्त आयोगाची स्थापना करण्यात आली. भारतीय राज्यघटनेच्या कलम 280 मधील तरतुदीनूसार वित्त आयोग एक स्वतंत्र अर्धन्यायिक संस्था म्हणून कार्य करते. वित्त आयोगाचा कालावधी हा पाच वर्षांचा असून केंद्र सरकारने महसूलातील वाटा राज्यांना कोणत्या निकषानूसार वितरित करावा हे सुचवित असते. या आयोगात अध्यक्षासहित पाच सदस्य असतात. त्यानूसार पहिला वित्त आयोग 1951 साली स्थापन झाला.

1931 मध्ये केंद्र व राज्य यांच्यात उत्पन्नाचे विभाजन करण्यासाठी पील समितीची नेमणूक करण्यात आली. आयकराचे वाटप केंद्र व राज्यांमध्ये विभागून निगम करापासून मिळणारे उत्पन्न केंद्राने स्वत:कडे ठेवावे असे सुचविले. पुढे ऑटो नेमियर समितीने प्रांताची स्वायतत्ता वाढवून आयकराचा निम्मा वाटा राज्यांना मिळावा अशी महत्वाची शिफारस केली. तर 1935 च्या भारत सरकार कायद्यान्वये वित्तीय संसाधनांचे वाटप पुढीलप्रमाणे करण्याचे सुचविले.

1) केंद्र सरकारच्या अधिन असलेली वित्तीय संसाधने. 2) केवळ प्रांतिक सरकारांच्या उपयोगासाठी असलेली वित्तीय संसाधने. 3) केंद्र सरकारने आकारुन व गोळा करुन त्यापासून मिळणारे सर्व उत्पन्न प्रांतांनाच मिळतील असे कर. 4) केंद्र सरकार व प्रांतिक सरकार यांच्यात विभाज्य असलेले कर - उत्पन्न अशी करण्यात आली.

15 ऑगस्ट 1947 ला भारताला स्वातंत्र्य मिळाल्यानंतर राज्यांच्या सीमा व लोकसंख्या यात बदल झाल्यामुळे आर्थिकदृष्ट्या घटक राज्यांच्या उत्पन्नाच्या वाटपाबाबत फेरविचार करणे आवश्यक ठरले. त्यानूसार एन.आर. समितीने सुचविल्याप्रमाणे भारत सरकारने बी.के.नेहरु व बी.पी.आडारकर या दोघांना ऑस्ट्रेलियाला पाठविले व त्यांच्या अहवालानूसार वित्त आयोगाच्या स्थापनेचा समावेश भारतीय संविधानात करण्यात आला व "फायनान्स कमिशन अॅक्ट 1951" नुसार पहिला वित्त आयोग 1951 मध्ये स्थापन करण्यात आला.

वित्त आयोगाची व्याख्या :- वित्त आयोग म्हणजे राष्ट्रपती राज्यघटना सुरु झाल्यापासून दोन वर्षांच्या आत आणि यानंतर प्रत्येक पाचव्या वर्षाच्या शेवटी किंवा त्याआधी त्याला / तिला आवश्यक वाटेल त्याप्रमाणे वित्त आयोगाची स्थापना करतील, ज्यामध्ये अध्यक्ष आणि इतर चार सदस्य असतील.

संशोधन पद्धती :- प्रस्तुत संशोधनासाठी दुय्यम साधनांचा वापर करण्यात आला आहे. यामध्ये संबंधित संदर्भग्रंथ, अहवाल, वर्तमानपत्र, इंटरनेट इत्यादींचा वापर केला आहे.

संशोधनाची उद्दिष्ट्ये :- संशोधनाची उद्दिष्टये पुढीलप्रमाणे आहेत.

1) पंधराव्या वित्त आयोगाने सुचविलेल्या शिफारशींचा अभ्यास करणे.

2) पंधराव्या वित्त आयोगाने केंद्र व राज्य यांच्यामध्ये कर विभाजनासाठी सुचविलेल्या निकषांचा अभ्यास करणे.

3) पंधराव्या वित्त आयोगानूसार केंद्रीय करांमध्ये राज्यांचा हिस्सा अभ्यासणे.

वित्त आयोगाचे स्वरुप :- संघराज्यात्मक वित्त व्यवस्थेतील विविध घटकांच्या बाबत कार्य क्षेत्राची असणारी विभागणी, केंद्र व राज्य यांच्यात सामायिक असणारी उत्पन्नाची काही साधने, काही बाबीत केंद्राचे वर्चस्व असल्यामुळे निर्माण होणारा हस्तक्षेपाचा अधिकार, कर आकारणीबाबत परस्पर सहकार्य आणि घटनेचे सार्वभौमत्व ही काही संघराज्यात्मक वित्तीय व्यवस्थेची ठळक वैशिष्ट्ये आहेत. तसेच संघराज्यात्मक वित्तीय व्यवस्थेत स्वतंत्रतेच्या तत्वानूसार प्रत्येक घटकाला कर लावण्याचा, कर्ज उभारण्याचा आणि खर्च करण्याचा पूर्ण अधिकार असतो. समन्यायतेच्या तत्वानूसार संसाधनांचे वाटप होतांना कोणावरही अन्याय होवू नये हे अपेक्षित असते. तर पर्याप्तेच्या तत्वानूसार वित्तीय साधनांपासून मिळणाऱ्या उत्पन्नात पुरेशी लवचिकता असावी हे अपेक्षित असते आणि हस्तांतरणाच्या तत्वानूसार सधन घटकांकडील संपत्तीचा वाटा निर्धन घटकांकडे वितरित होणे अपेक्षित असते.

वित्त आयोगाचे कार्य :- वित्त आयोगाचे कार्य पुढीलप्रमाणे आहेत.

1) केंद्रीय कर उत्पन्नापैकी ज्या करांची विभागणी शक्य आहे ती विभागणी सुचविणे. 2) केंद्र सरकारच्या संचित निधीतून राज्यांना दिल्या जाणाऱ्या अनुदानाचे निकष ठरवून केंद्र व राज्यांमधील वित्त विषयक बाबी संबंधित मार्गदर्शन करणे. 3) केंद्र आणि राज्यांमध्ये करांचे विभाजन करतांना हे त्यांच्या करांच्या योगदानानूसार वितरीत करणे. 4) राज्यांना सहाय्य अनुदान नियंत्रित करणारे घटक आणि त्याचे प्रमाण निश्चित करणे. 5) राज्यांच्या संचित निधीमध्ये वाढ करण्यासाठी उपाययोजना सुचवून राष्ट्रपतींनी सुचविलल्या इतर कोणत्याही वित्त विषयक बाबींसंबंधी सल्ला देणे. 6) राष्ट्रपतींनी योग्य अर्थाच्या हितासाठी त्याच्याशी संबंधित इतर कोणतीही बाब. 7) पंचायतराज आणि नागरी पंचायतराज व्यवस्थेकडे स्त्रोत उपलब्ध करण्यासाठी राज्यांच्या संचित निधीत वाढ करण्याच्या उपाययोजना सुचविणे.

2) तक्ता क्र. 1 मध्ये वित्त आयोगाचा कालावधी व अध्यक्ष दर्शविलेले आहे. आतापर्यंत एकूण 15 वित्त आयोगाची स्थापना झाली असून पहिल्या वित्त आयोगाचा कालावधी हा 1952-1957 असा होता. या आयोगाचे अध्यक्ष के.सी.नियोगी हे होते तर पंधराव्या वित्त आयोगाचे अध्यक्ष हे एन.के.सिंह असून कालावधी हा 2020-2025 असा होता.

3) पंधरावा वित्त आयोग :-

4) पंधराव्या वित्त आयोगाचा कालावधी हा 2021-2026 असा आहे. या वित्त आयोगाचे अध्यक्ष श्री.एन.के.सिंह असून त्यांची नेमणूक दिनांक 27 नोव्हेंबर 2017 रोजी करण्यात आली होती. श्री.शक्तीकांत दास, डॉ.अनुप सिंग, श्री.अशोक लाहिरी आणि श्री.रमेश चांद हे या आयोगाचे सदस्य आहेत, तर श्री.अरविंद मेहता हे सचिव आहेत.

तक्ता क्र. 1

वित्त आयोगाचा कालावधी व अध्यक्ष

अ.क्र.	आयोग	कालावधी	अध्यक्ष
1.	पहिला	1952-1957	के.सी.नियोगी
2.	दुसरा	1957-1962	के.सन्थानम्
3.	तिसरा	1962-1966	ए.के.चन्दा

अ.क्र.	आयोग	कालावधी	अध्यक्ष
4.	चौथा	1966-1969	पी.व्ही.राजमन्नार
5.	पाचवा	1969-1974	महावीर त्यागी
6.	सहावा	1974-1979	के.ब्रम्हानंद रेड्डी
7.	सातवा	1979-1984	जे.एम.शेलात
8.	आठवा	1984-1988	यशवंतराव चव्हाण
9.	नववा	1988-1995	एन.के.पी.साळवे
10.	दहावा	1995-2000	कृष्णचंद पंत
11.	अकरावा	2000-2005	ए.एम. खुसरो
12.	बारावा	2005-2010	चक्रवर्ती रंगराजन
13.	तेरावा	2010-2015	विजय एल. केलकर
14.	चौदावा	2015-2020	डॉ.यागा वेणुगोपाल रेड्डी
15.	पंधरावा	2020-2025	एन.के.सिंह

स्त्रोत :- Finance Commission of India, August 2020

पंधराव्या वित्त आयोगाच्या शिफारशी :-

वित्त आयोगाचे मुख्यालय नवी दिल्ली येथे असून कलम-281 नूसार वित्त आयोगाच्या शिफारशी या अहवालामार्फत राष्ट्रपतींकडे पाठविल्या जातात. त्यानंतर राष्ट्रपती या शिफारशी संसदेत मांडतात. आत्तापर्यंत एकूण पंधरा वित्त आयोग स्थापन झाले आहे. मात्र 15 व्या वित्त आयोगामध्ये वित्तीय स्त्रोतांची विभागणी ही 14 व्या वित्त आयोगाच्या शिफारशीनूसार होत आहे. पंधराव्या वित्त आयोगाच्या शिफारशी पुढीलप्रमाणे आहेत.

1) केंद्र व राज्य सरकारांमध्ये कराची विभागणी कशी असावी हे सुचविणे.
2) कलम 275 नूसार राज्यांना देण्यात येणाऱ्या अनुदानासाठी मार्गदर्शक तत्वे सांगून त्याचे निकष सुचविणे.
3) स्थानिक स्वराज्य संस्थांना वित्तीय स्त्रोत उपलब्ध करण्यासाठी राज्यांचा संचित निधीस कशा पध्दतीने वाढ करावी हे सुचविणे.
4) पंधराव्या वित्त आयोगाने चौदाव्या वित्त आयोगाच्या शिफारशीनूसार राज्यांच्या हिश्यातील 42% करांमध्ये कपात करुन तो 41% करावा अशी शिफारस केली आहे.
5) सुरक्षा आणि इतर गरजांच्या पुर्ततेसाठी 1% वाढ करण्याचे सुचविले आहे.
6) सरकारच्या सर्व स्तरांवर लेखापरिक्षणासाठी कुशल सार्वजनिक वित्तीय प्रबंधन व्यवस्था निर्माण करुन वैधानिक संरचना निर्मितीसाठी एका विशिष्ट कायद्याची गरज असून त्यासाठी एका अभ्यासक कार्यगटाची निर्मिती करण्याची शिफारस केली आहे.
7) देशाची कर प्रणाली विस्तृत करुन आणि कर निर्धारण सोपे करुन प्रशासनाची कार्यक्षमता वाढविण्याची शिफारस केली आहे.
8) केंद्र शासनाकडून ग्रामीण स्थानिक स्वराज्य संस्थांच्या बळकटी करणासाठी राज्याला बेसिक ग्रँट व टाईड ग्रँट यासाठी 50-50% निधी प्राप्त करुन देण्याची शिफारस केली आहे.

9) कर प्रणालीमध्ये राज्यांचा हिस्सा निर्धारित करतांना 14 व्या वित्त आयोगाने 1971 व 2011 च्या जनगणनेच्या आधारावर आपल्या शिफारशी सादर केल्या होत्या. मात्र या आयोगाने फक्त 2011 च्या जनगणनेचा आधार घेण्याची शिफारस केली आहे.

पंधराव्या वित्त आयोगाने केंद्र सरकार व राज्य सरकारांच्या राजकोषीय धोरणा संदर्भात राजकोषीय दृढीकरण सुचविणे अपेक्षित असल्यामुळे त्यासाठी पुढील बाबी विचारात घेतल्या आहेत.

1) केंद्र व राज्याची एकूण महसूल क्षमता
2) केंद्राचे व राज्याचे आवश्यक खर्च
3) 14 व्या वित्त आयोगाच्या शिफारशी व त्यांच्या अंमलबजावणीची स्थिती.

त्याचप्रमाणे 15 व्या वित्त आयोगाच्या शिफारशीनूसार सन 2021-22 ते 2025-26 पर्यंत ग्रामीण स्थानिक पंचायतीसाठी 1,42,084 कोटी रुपये अनुदान देण्यात आले आहे. त्यामुळे प्रत्येक गावासाठी प्रत्येक घरामध्ये नळाद्वारे पाणी पुरवठा करुन गावामध्ये स्वच्छतेवर भर देण्यात आला आहे. त्याचा चांगला परिणाम हा ग्रामीण भागातील सार्वजनिक आरोग्यात सुधारणा होऊन लोकांच्या राहणीमानात सुधारणा होईल.

तक्ता क्र. 2

हस्तांतरणाचे निकष

अ.क्र.	निकष	14 वा वित्त आयोग (2015-2020)	15 वा वित्त आयोग (2021-2026)
1.	उत्पन्न अंतर (Income Distribution)	50.00	45.00
2.	क्षेत्रफळ (Area)	15.00	15.00
3.	लोकसंख्या (1971)	17.50	--
4.	लोकसंख्या (2011)	10.00	15.00
5.	वनक्षेत्र	7.50	--
6.	वन आणि परिस्थिकी (Forest and Ecology)	--	10.00
7.	लोकसांख्यिकीय प्रदर्शन (Demographic performance)	--	12.50
8.	कर आणि वित्तीय प्रयत्न	--	2.50
	एकूण	100.00	100.00

स्त्रोत :- Report of the 14th & 15th Finance Commission.

तक्ता क्र. 2 मध्ये केंद्र व राज्य यांच्यामध्ये कराच्या विभाजनाचे निकष दर्शविलेले आहे. 14 व्या वित्त आयोगामध्ये वन आणि परिस्थिकी, लोकसांख्यिकीय प्रदर्शन व कर आणि वित्तीय प्रयत्न यासाठी कुठल्याही प्रकारचे निकष लावण्यात आले नव्हते, ते मात्र 15 व्या वित्त आयोगात लावण्यात आले आहे. तसेच सन 2016-17 ते 2018-19 या तीन वर्षात ज्या राज्यांचे दरडोई उत्पन्न कमी आहे अशा राज्यांना कराचा अधिक हिस्सा देऊन राज्या-राज्यांमधील विषमता कमी करण्यासाठी प्रयत्न केले जाणार आहे. त्याचप्रमाणे लोकसंख्येला आळा घालण्यासाठी 2011 च्या जनगणनेनूसार ज्या राज्यात जन्मदराचे प्रमाण कमी आहे त्या राज्यांना अधिक हिस्सा देण्यात येणार आहे. तसेच ज्या राज्यांचा कर संकलनात मोठा वाटा आहे त्या राज्यांना सुध्दा अधिक हिस्सा देण्यात येणार आहे.

तक्ता क्र. 3 केंद्रिय करांमध्ये राज्यांचा हिस्सा (%)

अ.क्र.	राज्य	14 वा वित्त आयोग	15 वा वित्त आयोग
1.	आंध्र प्रदेश	4.305	4.047
2.	अरुणाचल प्रदेश	1.370	1.757
3.	आसाम	3.311	3.128
4.	बिहार	9.665	10.058
5.	छत्तीसगड	3.080	3.407
6.	गोवा	0.378	0.386
7.	गुजरात	3.084	3.478
8.	हरियाणा	1.084	1.093
9.	हिमाचल प्रदेश	0.713	0.830
10.	जम्मु-काश्मिर	1.854	--
11.	झारखंड	3.139	3.307
12.	कर्नाटक	4.713	3.647
13.	केरळ	2.500	1.925
14.	मध्यप्रदेश	7.548	7.850
15.	महाराष्ट्र	5.521	6.317
16.	मणिपूर	0.617	0.716
17.	मेघालय	0.642	0.767
18.	मिझोरम	0.460	0.500
19.	नागालँड	0.498	0.569
20.	ओडिसा	4.642	4.528
21.	पंजाब	1.577	1.807
22.	राजस्थान	5.495	6.026
23.	सिक्कीम	0.367	0.388
24.	तामिळनाडू	4.023	4.079
25.	तेलंगणा	2.437	2.102
26.	त्रिपुरा	0.642	0.708
27.	उत्तर प्रदेश	17.959	17.939
28.	उत्तराखंड	1.052	1.118
29.	पश्चिम बंगाल	7.324	7.523
	एकूण	100.00	100.00

स्रोत : 14th & 15th Finance Commission.

तक्ता क्र. 3 मध्ये केंद्रिय करांमध्ये राज्यांचा हिस्सा (%) दर्शविलेला आहे. 14 व्या वित्त आयोगाच्या तुलनेत 15 व्या वित्त आयोगामध्ये बिहार, महाराष्ट्र, राजस्थान यांच्या हिश्यात वाढ झाली असून कर्नाटक

आणि केरळ यांच्या हिश्यात घट झाल्याचे दिसून येते. इतर राज्यांच्या हिश्यांत मात्र कमी वाढ झाल्याचे दिसून येते.

15 व्या वित्त आयोगाचे नियोजन :-

15 व्या वित्त आयोगानूसार पाणी पुरवठा आणि स्वच्छतेसाठी वर्षनिहाय पुढीलप्रमाणे अनुदान देण्यात आले आहे.

तक्ता क्र. 4

पाणी पुरवठा व स्वच्छतेसाठी वर्षनिहाय अनुदान (रुपये कोटीमध्ये)

अ.क्र.	वर्ष	अनुदान (बंदिस्त)
1	2021-22	26940
2	2022-23	27908
3	2023-24	28212
4	2024-25	29880
5	2025-26	29144

स्रोत :- जल शक्ति मंत्रालय, ऑगस्ट 2021, दिल्ली

गावाच्या विकासासाठी 15 व्या वित्त आयोगातून 50% बंदिस्त निधी घेवून 10 प्रकारची कामे घ्यावी तसेच पिण्यासाठी पाणी पुरवठा, पावसाचे पाणी संकलन व पाण्याचा पुर्नवापर करणे शासनाने बंधनकारक केले आहे. याशिवाय सार्वजनिक स्तरावर गाळ व्यवस्थापन प्रकल्प, मोठ्या ग्रामपंचायतीसाठी सेफ्टीक टाकी मधील गाळ उपसण्यासाठी मशीन खरेदी करणे, अंगणवाडी, प्राथमिक शाळा, ग्रामपंचायत, मंदिर, इतर धार्मिक स्थळे, बाजाराचे ठिकाण, एस.टी.स्टँण्ड, इत्यादी ठिकाणी मुत्रीघर, शौचालये व हॅण्डवॉश स्टेशन निर्माण करणे, कचरा संकलनासाठी वाहतूक सुविधा करणे, सांडपाणी व्यवस्थापनासाठी शोषखड्डे, भूमिगत व बंदिस्त गटारे यांचे बांधकाम करणे तर पावसाच्या पाण्याचे संकलन करुन त्याचे पुर्नभरण करणे, नळ पाणी पुरवठा योजनेसाठी स्वयंचलित क्लोरीन डोसर बसविणे, गावातील नळधारकांना वॉटर मीटर बसविणे, मोबाईल अॅपद्वारे पाणीपट्टी बील देणे, हातपंप, वीजपंप व पाणी योजनांची दुरुस्ती करणे, शासनाच्या मार्गदर्शक तत्वानुसार याच निधीतून शाळा ई-लर्निंग करणे, शाळेला शैक्षणिक साहित्य पुरवठा करणे, प्राथमिक शाळेतील विद्यार्थ्यांसाठी छोटे वाचनालय उभारणे, शाळा खोली दुरुस्ती करणे, मैदान तयार करणे, प्राथमिक आरोग्य केंद्र, उपकेंद्रांना आरोग्य साहित्य पुरविणे, गावातील नागरिक, विद्यार्थ्यांसाठी आरोग्य शिबिर घेणे आणि बाजारगाळे बांधकाम करुन बचतगटांना दुकाने उपलब्ध करुन देणे.

वित्त आयोगासमोरील आव्हाने :-

भारतातील प्रत्येक घटक राज्यांचा आकार, लोकसंख्या, भौगोलिक परिस्थिती, आर्थिक व सामाजिक प्रश्न हे वेगवेगळे असल्यामुळे सर्व राज्यांना एकच समान वाटपाचे तत्व लावता येत नाही. त्यामुळे केंद्र व राज्यांमध्ये उत्पन्न करांची विभागणी करण्यासाठी लोकसंख्या, कर संकलन यासारखी तत्वे वापरली जातात. परंतू अलीकडे ही तत्वे पुरेशी नसल्यामुळे 15 व्या वित्त आयोगासमोर अनेक आव्हाने निर्माण झाली. ती आव्हाने म्हणजे -

पंधराव्या वित्त आयोगासमोर नियोजन आयोगाच्या जागी नीती आयोगाला अनुसरुन शिफारशी करणे, योजना खर्च आणि योजनेवरील खर्च यांच्यातील तफावत कमी करणे, जुलै 2017 पासून लागू करण्यात आलेल्या वस्तू व सेवा करांशी संबंधित सर्व मुद्दे समोर ठेवून कार्य करणे अशी आव्हाने होती.

निष्कर्ष :-

भारतीय संघराज्यांमध्ये प्रत्येक राज्याची भौगोलिक, सामाजिक आणि आर्थिक परिस्थिती भिन्न असल्यामुळे त्यांचे उत्पन्नाचे स्त्रोत, दरडोई उत्पन्न आणि राज्याचा विकास दर सुध्दा भिन्न-भिन्न आहे. तेव्हा देशाच्या सर्वांगिण व समतोल विकासासाठी केंद्र सरकार सर्व राज्य सरकारांना विविध योजनांच्या माध्यमातून आवश्यक ती मदत करत असते. परंतू सर्व राज्यांमध्ये आर्थिक स्त्रोत समान नसल्यामुळे कोणावर तरी अन्याय होण्याची शक्यता असते, असे होवू नये म्हणून केंद्र व राज्य सरकारांमध्ये वित्तीय सामंजस्य निर्माण व्हावे या हेतूने केंद्राला आर्थिक सल्ला देण्यासाठी वित्त आयोग निर्माण केला जातो.

संदर्भग्रंथ :-

1) ओझरकर, सु.रा., राजस्व - सार्वजनिक आय-व्यय, नागपूर, 1969.
2) योजना (विकास समर्पित मासिक), मार्च 2015.
3) लोकसत्ता, 20 नोव्हेंबर 2020.
4) लोकमत, 9 जुलै 2020.
5) खेर, सी.पं., केंद्र-राज्य वित्तीय संबंध, पुणे, 1993.
6) आर्थिक सर्वेक्षण 2014-15, वित्त मंत्रालय, भारत सरकार, नवी दिल्ली.
7) Finance Commission of India, August 2020.
8) Reports of the 14th Finance Commission.
9) Reports of the 15th Finance Commission.

केंद्र व राज्य सरकारेवित्तीय संबंध आणि वित्त आयोग

प्रा. डॉ. सानप गोरक्षनाथ कचरू
विभाग प्रमुख अर्थशास्त्र विभाग व संशोधन केंद्र संगमनेर
महाविद्यालय संगमनेर जि. अहमदनगर)आजीव सभासद क्र- 1033
ई-मेल – gksanap11@gmail.comमो. 9881748880
प्रा. काळे निलम निवृत्ती
Kalenilam1987@gmail.com मो.नं. 8390265929
सहायकप्राध्यापक,
लोकनेते बाळासाहेब थोरात कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय, तळेगावदिघे

गोषवारा

भारताने 26 जानेवारी 1950 रोजी संविधानाचा स्वीकार केला असून राज्यघटनेनुसार भारतात संघराज्य स्वरूपाची शासन पद्धती स्वीकारण्यात आली आहे. या शासन पद्धतीत राज्याची कार्ये दोन गटात वाटली जातात एक केंद्रसरकार आणि दोन घटक राज्यसरकारे, केंद्रसरकार आणि राज्यसरकारे यांच्या दरम्यान स्वतंत्रपणे कार्याची वाटणी होते.सामान्यतः संरक्षण , परराष्ट्र व्यवहार , चलन इत्यादी कार्ये केंद्र सरकारकडे आणि शिक्षण सार्वजनिक स्वास्थ्य , कृषी कायदा व सुव्यवस्था इत्यादी कार्ये राज्य सरकारांकडे सोपविले जातात जी कार्येसंपूर्ण राष्ट्राच्या दृष्टीने महत्त्वाचे असतात ती साधारणपणे केंद्र सरकारकडे सोपविल्याचे आणि जी कार्ये स्थानिक दृष्टीने महत्त्वाची वाटतात किंवा जी क्षेत्रीय आधारावर चांगल्या प्रकारे कार्यान्वित केली जाऊ शकतात ती राज्य सरकारांकडे सोपविल्याचे दिसून येते. देशातल्या वेगवेगळ्या राज्य सरकारांकडे सोपविली जातात त्या कार्यात राष्ट्रीय आधारावर समन्वय स्थापन करणे आवश्यक असते व हा समन्वय साधण्याचे कार्य केंद्र सरकारेला करावी लागते.

संघराज्य शासनपद्धतीत केंद्र व राज्य दोन्ही पातळीवरील सरकारकडे स्वतंत्रपणेकार्यांचेविभाजन करण्यात आलेआहे. तसेच त्यांच्यावर सोपविण्यात आलेल्या जबाबदाऱ्या यशस्वीपणे पार पाडता याव्यात यासाठी उत्पन्न साधनांचे वाटप देखील घटनेनुसार ठरवून देण्यात आले आहे तसेच प्रशासनासाठी आवश्यक निधी उभारता यावा याकरिता तरतूद केली आहे परंतु बऱ्याचदा राज्यांच्या भौगोलिक, सामाजिक व आर्थिक भिन्नतेमुळे राज्यांच्या उत्पन्नाच्या स्त्रोतांत आणि खर्चात देखील भिन्नता आढळते.प्रत्येक राज्याचे दरडोई उत्पन्न वेगवेगळे आहे. तसेच प्रत्येक राज्याचा विकासदर वेगवेगळा आहे. या सर्व बाबींचा व भिन्नतेचा विचार करून देशाचा एकत्रित समावेशक विकास साधणे गरजेचे असते. त्यासाठी राज्यांची भिन्नता व गरजेनुसार आवश्यक ती मदत केंद्र सरकार अनुदान व विविध उत्पन्न स्रोत तसेच योजनांच्या माध्यमातून करत असते. अशा अवस्थेत आर्थिक स्त्रोतांबाबत एकवाक्यता निर्माण होणे आवश्यक आहे. कारण केंद्र व राज्य सरकारे दरम्यान कार्यांचे विभाजन केल्याने संघीय वित्ताच्या काही समस्या निर्माण होतात. दोन्ही सरकारांवर सोपविलेली कार्ये सुयोग्य रीतीने पूर्ण करण्यासाठी त्यांना उत्पन्न प्राप्त करण्याची साधने उपलब्ध करून दिली जातात यालाच "केंद्र व राज्य सरकारे यांच्या दरम्यान उत्पन्न प्राप्त करून देणाऱ्या साधनांचे विभाजन" असे म्हणतात. हे विभाजन करताना प्रत्येक सरकारची आवश्यकता व त्याला उपलब्ध करून दिलेली उत्पन्न प्राप्तीची साधने यात पूर्णपणे संतुलन राहीलच असे नाही. म्हणजेच सरकारेला स्वतःची कार्ये पूर्ण करण्यासाठी आवश्यक असणाऱ्या उत्पन्नापेक्षा कमी किंवा जास्त उत्पन्न प्राप्त होऊ

शकते म्हणून संघीय वित्तीय सामंजस्य निर्माण करण्याची गरज भासते. हे करत असताना प्रत्येक राज्याचे तसेच राष्ट्राचे हित जोपासले जाईल अशा पद्धतींचा विचार केला पाहिजे.

संघीय वित्ताच्या अंतर्गत उत्पन्नाच्या साधनांचे योग्य वितरण व सामंजस्य स्थापन करण्यासाठी स्वतंत्रता, पर्यायता व एकरूपता या तत्त्वांचा आधार घेतला जातो. स्वतंत्रता तत्त्वानुसार असे म्हणता येईल की प्रत्येक सरकारला उपलब्ध करून दिलेली उत्पन्नाची साधने स्वतंत्र असली पाहिजेत. तसेच सरकारला आपली कार्ये योग्य प्रकारे चालविण्यासाठी जी स्वतंत्र उत्पन्नाची साधने उपलब्ध करून दिली जातील ती पर्याप्त असली पाहिजेत. राज्य सरकारे आणि केंद्र सरकार दरम्यान कार्याचे जे विभाजन केलेले आहे त्याचा विचार केला तर असे दिसते की राज्य सरकारांना शिक्षण, सार्वजनिक स्वास्थ्य, कृषी विकास यावर भविष्यकाळात वाढत्या स्वरूपाचा खर्च करावा लागतो. परिणामी वाढत्या खर्चाबरोबर त्यांना उत्पन्नाची साधने अपर्याप्त वाटू लागतात. यामुळेच सामंजस्याचा प्रश्न निर्माण होतो. केंद्र व राज्य सरकारांच्या दरम्यान वेगवेगळ्या प्रकारे वित्तीय सामंजस्य प्रस्थापित केले जाऊ शकते. करांपासून केंद्र सरकारला जे उत्पन्न मिळते त्यातील ठराविक करांपासून मिळणाऱ्या उत्पन्नाचा राज्यांना काही प्रतिशत हिस्सा वाटून दिला जातो. या केंद्राला करांपासून मिळणाऱ्या उत्पन्नाचा किती प्रतिशत हिस्सा राज्यात वाटून द्यावा तसेच तो कोणत्या आधारावर वाटावा असे प्रश्न उपस्थित होतात. वित्तीय सामंजस्य स्थापन करण्याची दुसरी पद्धत करांबाबत आहे.केंद्र सरकार जे कर लावतील त्यावर राज्य सरकारे स्वतःच्या उपयोगासाठी अनुपुरक कर बसवतील किंवा राज्य सरकारांनी लावलेल्या करावर केंद्रीय सरकार स्वतःच्या उपयोगासाठी अनुपुरककर बसवतील. वित्तीय सामंजस्य प्रस्थापित करण्याच्या तिसऱ्या पद्धतीत राज्यसरकारे केंद्रसरकारला किंवा केंद्र सरकार राज्य सरकारांना सहाय्यक अनुदान देईल या निकषांच्या अनुषंगाने वित्तीय सामंजस्य निर्माण करण्यासाठी व केंद्र सरकारला अर्थ व उत्पन्न विषयक सल्ला देण्यासाठी वित्त आयोगाची निर्मिती केली जाते.

प्रस्तावना :-

भारतीय राज्यघटनेच्या कलम 280 नुसार वित्त आयोग भारतीय राज्यघटनेचे स्वतःची विशेषतः आहे व एक संवैधानिक संस्था आहे. केंद्र सरकारेने महसुलातील वाटा अनुदाने राज्यांना किती द्यावेत,राज्यांना ती कशी वितरित करावी, त्याचे निकष काय हे सुचवण्यासाठी दर पाच वर्षांसाठी वित्तीय आयोग विविध निकष सुचवत असते.राष्ट्रपतींना करांचे विभाजन, अनुदान इत्यादी संदर्भात सल्ला देते. राज्यघटनेनुसार केंद्र आणि राज्यांमध्ये संसाधनांच्या विभाजनासाठी कोणताही असा नियम निर्धारित केलेला नाही परंतु राज्यघटनेत वित्त आयोगाची स्थापना करण्याची व्यवस्था करण्यात आली आहे. वित्त आयोगाची केंद्र आणि राज्यांच्या वित्तीय संसाधन वाटपातील भूमिका अत्यंत महत्त्वाची आहे. कारण वित्त आयोगाच्या शिफारशींमुळे परिस्थितीतील बदलानुसार आणि आवश्यकतेनुसार केंद्र आणि राज्यांमधील वित्तीय साधनांत बदल करता येतो. वित्त आयोगाकडून केंद्र आणि राज्यांच्या करांच्या हस्तांतरणाबाबत शिफारशी करण्यात येतात. यामध्ये अधिभार आणि उपकरांसहित सर्व केंद्रीय करांचा समावेश होतो, या करांनाराज्यांमध्येविभाजित करण्याचा अधिकार राज्यघटनेद्वारे केंद्र सरकारला मिळालेला आहे. त्या दृष्टीने वित्त आयोगाची भूमिका महत्त्वपूर्ण ठरते.

केंद्र राज्य वित्तीय संबंध :-

१.घटनात्मकतरतुदी :-

भारतीय संविधानानुसार केंद्र सरकार आणि राज्य सरकारे यांच्यातील वित्तीय साधनसामग्रीचे वाटप पुढील प्रमाणे करण्यात आले आहेत.

१. (कलम 268)- केंद्र आकरत व वसूल व वापर करत असलेले कर.
उदा. स्टॅम्प शुल्क
२.(कलम 269)- केंद्र आकारत वसूल करत असलेले परंतु राज्य वापर करत असलेले कर उदा. संपत्ती कर, रेल्वे वाहतूक व प्रवाशांवरील कर, रोखे बाजारातील व्यवहारांवरील कर.
३. (कलम 270)- केंद्र आकारात व वसुली करत असलेले परंतु केंद्र व राज्यांमध्ये वितरित केले जाणारे कर 270 व्या कलमानुसार केंद्र आणि राज्यांमध्ये कराचे वाटप कसे करायचे यासाठी वित्ती आयोगाच्या शिफारशी महत्त्वाचे ठरतात. वित्त आयोगाच्या शिफारशीनुसार या करा मधील जो वाटा राज्यांना द्यावयाचा असतो तो भारताच्या संचित निधीत जमा केला जात नाही.
२. अनुदान वाटपाच्या तरतुदी:-

भारतीय संघराज्य पद्धतीत घटनेने राज्य सरकारांवर कृषी विकासाबरोबरच सामाजिक जबाबदाऱ्या सोपविल्या आहेत. त्यामुळे राज्य सरकारांना त्यांच्यावर सोपविलेल्या जबाबदाऱ्या पार पाडता याव्यात तसेच उत्पन्न आणि खर्चातील तफावत भरून काढता यावी म्हणून राज्य सरकारांना कलम 275 नुसार संसदीय कायद्याने विशिष्ट अनुदान मिळविण्याची तरतूद आहे. त्यामुळे केंद्र सरकारे आणि राज्य सरकारेमध्ये सामंजस्य निर्माण होण्याच्या दृष्टीने अनुदाने महत्त्वाची ठरतात.

३. कर्जासंबंधी तरतुदी:-

भारतीय राज्यघटनेच्या कलम 293(2) नुसार राज्यसरकारांना भाग बाजार आणि भांडवल बाजारातून कर्ज उभारता येते.

भारतीय घटनेनुसार कर उत्पन्नाचे वाटप जरी केंद्र सरकार आणि राज्य सरकारे यांच्यात करण्यात आले असले तरी केंद्र सरकारला नवीन कर आकारण्याचा अधिकार देण्यात आलेला आहे. तसेच केंद्र सरकार आर्थिक दृष्ट्या सक्षम राहील आणि राज्य सरकारांना आर्थिक मदतीसाठी केंद्र सरकारवरच अवलंबून राह्यावे लागेल आणि आर्थिक मदतीच्या माध्यमातून राज्यांवर नियंत्रण ठेवता येईल, याकडेही लक्ष देण्यात आले आहे.

*केंद्र सरकार आणि राज्य सरकारे वित्तीय संघर्ष:-

भारताच्या राज्यघटनेतच केंद्र सरकार व राज्य सरकारे यांचे वित्तीय संबंध ठरविले आहेत त्यानुसार 1961 पासून आज पर्यंत केंद्र सरकार आणि राज्य सरकारे यांचे वित्त व्यवहार चालू आहेत. असे असले तरी घटक राज्यांची सरकारी वेळोवेळी त्याबद्दल तक्रार करताना दिसतात. त्यांना दिलेले उत्पन्नाचे मार्ग पुरेसे फलदायी नाहीत. केंद्राकडून वारंवार हस्तक्षेपच केला जातो. असे आरोप केलेले आहेत. उलट केंद्र सरकारच्या मते राज्य सरकारे स्वतःचे वित्तीय स्रोत वाढवीत नाहीत असा अनुभव आहे. तसेच देशाची एकात्मता टिकवण्यासाठी व संपूर्ण देशाचा सर्वांगीण विकास घडवून आणण्यासाठी घटक राज्यांना आज आहे त्यापेक्षा जास्त वित्तीय स्वातंत्र्य देणे योग्य ठरणार नाही.

*केंद्र-राज्य वित्तीय संघर्ष निर्माण होण्यास कारणीभूत ठरणाऱ्या बाबी:-

१. घटक राज्यांच्या वित्तीय समस्या:-

केंद्र व राज्य यांच्यात वित्तीय तणावाचे मूलभूत कारण म्हणजे राज्यांवर सोपविण्यात आलेल्या जबाबदाऱ्या पूर्ण करण्यासाठी उपलब्ध असलेल्या साधन संपत्तीचा अपुरेपणा होय. राज्य सरकारांकडे उपलब्ध असलेली साधन संपत्ती एकसारखी नसते. त्यामध्ये विषमता दिसून येते. नैसर्गिक दृष्ट्या सधन राज्यांचा जलद विकास घडून येतो. अशा राज्यातील लोकांना दर्जेदार सार्वजनिक सेवा मिळतात. याउलट नैसर्गिक साधनसामग्रीचा अभाव असणाऱ्या राज्यांच्या आर्थिक विकासाचा वेग मंदावतो. राज्यांची स्वतःच्या

साधनसंपत्ती संबंधी असलेली अपुरेपणाची जाणीव आणि त्यातून निर्माण झालेले वैफल्य हे विसंवादाचे कारणे म्हणता येईल.

२. राज्यांच्या वाढत जाणाऱ्या जबाबदाऱ्या:-

घटकराज्यांच्या ज्या जबाबदाऱ्या आहेत त्यामध्ये शिक्षण व सार्वजनिक आरोग्य इत्यादींचा समावेश होतो. वाढत्या लोकसंख्येबरोबर पाणीपुरवठा, नागरी सोयी, वाहतूक इत्यादी कार्यावरील खर्च वाढत आहे. वाढत जाणाऱ्या जबाबदारी आणि अपुरे उत्पन्न या कात्रीत घटक राज्यांची सरकारे सापडली आहेत.

३. राज्यांची अलवचिक साधन संपत्ती:-

राज्यांना आपल्या वाढत्या जबाबदाऱ्या पूर्ण करण्यासाठी असलेली साधन संपत्ती मात्र सहज वाढणारी नाही ती अतिशय लवचिक आहेत. जमीन महसूल हे राज्यांचे भरीव उत्पन्नाचे साधन असले तरी त्यात फार मोठ्या प्रमाणात करता येत नाही. तसेच ज्या करांमध्ये लवचिकता आहे असे कर राज्यांच्या क्षेत्रात येत नाहीत. अशाप्रकारे एका बाजूने करांची अलवचिकता राज्यांना जाचक ठरते आणि दुसऱ्या बाजूने वित्त आयोगाने ठरवून दिलेली मदत अपुरी ठरते.

४. केंद्र :- राज्यातील तणाव निर्माण करणारे स्रोत:-

केंद्र राज्य वित्तीय संबंधात तणाव निर्माण होत असला तरी तो एक केंद्र राज्यातील संबंधाचा भाग आहे. विविध मार्गाने केंद्र व राज्य तणाव निर्माण होऊ शकतो.

१. घटनेत केंद्र सामर्थ्यशाली असावे असे नमूद केले आहे. राज्यसरकारे केंद्र सरकारवर अवलंबून असल्याने ती दुर्बल दिसूनयेतात.
२. राज्यांच्या सांस्कृतिक व पारंपारिकतेनुसार स्वतंत्र राज्याच्या स्वायत्ततेला मागणीवाढतआहे.हा घटक राज्यांचा स्वायत्ततेचा दावा मान्य करणे अतिशय कठीणदिसते.
३. केंद्र सरकार शिक्षण, सार्वजनिक आरोग्य इत्यादी राज्यांच्या विषयात नाहक लक्ष घालतात.
४. कायदा व सुव्यवस्था राखणे राज्यांचेकाम आहे. केंद्रीय राखीव पोलीस, सीमा सुरक्षा दल, औद्योगिक सुरक्षा दल इत्यादी बाबत हस्तक्षेप दिसून येतो.

५. वित्तीय जमवाजमवी बाबत तक्रारी:-

१. केंद्र सरकार कराच्या 279 कलमानुसार राज्यांना पुरेसे कर देत नाही. निगम करात सुरुवातीपासूनच राज्यांना सहभागी करून घ्यावयास हवेहोते.

२. वैयक्तिक करांबाबत केंद्रसरकार व राज्यसरकारे तणावआहे.

३.महसुली आणि भांडवली खर्चात करांबाबत असमतोल दिसून येतो.

४.चौदाव्या वित्त आयोगाने महसुलीचा तुटवडा असणाऱ्या राज्यांसाठी अतिरिक्त तरतूद केलेली आहे. मात्र या अतिरिक्त रकमेबरोबरच राज्यांच्या योजनांमधील केंद्राची मदत नष्ट होईल.

५. वित्तीय साधनांच्या बाबतीत राज्यांना अधिक स्वायत्तता देण्याचा प्रयत्न बाजार अर्थव्यवस्थेबरोबर ताळमेळ घालून पुढे जाणाऱ्या राज्यांसाठी फायदेशीर आहे परंतु विकास प्रक्रियेत मागे असणाऱ्या राज्यांना त्यामुळे नवीन समस्यांना सामोरे जावे लागणार आहे.

६. करांमध्ये हिस्सा वाढविल्याने राज्यांना फायदा होईल परंतु केंद्राच्या विशेष संरक्षणाची यानंतर सुद्धा आवश्यकता राहील. केंद्राची भूमिका मर्यादित राहिल्याने ही राज्य आपल्या समस्या दूर करण्याबाबत एकटे पडण्याची शक्यता आहे.

७. राज्यांच्या अधिकार वाढीमुळे केंद्रावरील अवलंबित्व कमी होईल. केंद्र सरकार सामाजिक योजनांची अधिक जबाबदारी राज्यांवर सोपवेल. त्यामुळे अन्नसुरक्षा, मनरेगा, आरोग्य शिक्षण, समावेशक विकास इत्यादी सारख्या केंद्रीय योजनांमध्ये राज्यांना यापुढे अधिक निधी पुरवावा लागेल.

६. उर्ध्व व सम पातळी असमतोल:-

भारतीय संघराज्य शासन व्यवस्थेत केंद्र व राज्य सरकारे यांच्यात कार्ये व वित्तीय साधनांच्या विभाजनातून असमतोल निर्माण होतो. हा वित्तीय असमतोल निर्माण होण्याचे कारण म्हणजे केंद्र सरकारवर सोपविण्यात आलेली कार्ये पार पाडण्यासाठी होणारा खर्च हा केंद्र सरकारला मिळणाऱ्या महसुलापेक्षा कमी असतो म्हणजेच महसूल अधिक व खर्च कमी याउलट राज्य सरकारांना नेमून दिलेली कार्ये पार पाडण्यासाठी होणारा खर्च हा राज्य सरकारांना मिळणाऱ्या महसुलापेक्षा अधिक असतो. म्हणजेच उत्पन्न कमी आणि खर्च जादा अशी परिस्थिती निर्माण होतेत्याला उर्ध्वस्तंभात्मक असमतोल असे म्हणतात. याचाच अर्थ वित्तीय साधनांचे केंद्रीय पातळीवर केंद्रीकरण दिसून येते तर शासकीय कार्यांचे राज्यस्तरावर केंद्रीकरण हे देखील असमतोलाचे कारण आहे.दुसरे वित्तीय असमतोलाचे कारण हे राज्या-राज्यांमधील असमतोलाशी संबंधित दिसून येते. याला सम पातळी असमतोल असे म्हणतात.

वरील दोन्ही प्रकारचे असमतोल दूर करण्यासाठी केंद्रसरकारकडून वित्तीय सामग्रीचे हस्तांतरण करण्याची गरज निर्माण होते. कारण वित्तीय साधनसामग्रीसाठी राज्यांना मोठ्या प्रमाणात केंद्रसरकारवर विसंबून राहावे लागते व त्यामुळे राज्यांची स्वायत्तता धोक्यात येते. भारतीय संघराज्यशासनपद्धतीत असा वित्तीय असमतोल निर्माण होण्याची शक्यता विचारात घेऊन घटनेनुसार केंद्राकडून राज्यांना द्यावयाच्या वित्तीय साधनसामग्रीच्या हस्तांतरणाची तरतूद केलेली आहे. हे वित्तीय हस्तांतर प्रामुख्याने कर उत्पन्नातील हिस्सा, अनुदाने व कर्जे या स्वरूपात असते. या वित्तीय साधनसामग्रीच्या हस्तांतरणाचे प्रमाण, तत्वे व निकष ठरविण्यासाठी दर पाच वर्षांनी भारतात वित्त आयोगाची नेमणूक केली जाते.

*केंद्र व राज्य वित्तीय संबंध आणि वित्त आयोग:-

वित्त आयोग:-

भारतात 1951 मध्ये पहिल्या वित्त आयोगाची नेमणूक करण्यात येऊन वित्त आयोग अस्तित्वात आला. भारतीय राज्यघटनेच्या कलम 280 नुसार राष्ट्रपतीद्वारे वित्त आयोगाची नेमणूक केली जाते. आतापर्यंत एकूण पंधरा वित्त आयोग नेमण्यात आलेले आहेत. सदर आयोगाने पुढील विषयासंदर्भात राष्ट्रपतींना शिफारस करणे अपेक्षित आहे.

१. केंद्राने आकारलेल्या करातील किती हिस्सा राज्यांना द्यायचा आणि त्यात प्रत्येक राज्याचा वाटा कसा ठरवायचा.

२.भारत सरकारच्या संचित निधी मधून राज्यांना वर्ग करावयाच्या सहाय्यक अनुदानाचे वाटपाचे तत्व काय असावे.

३. राज्यातील पंचायत आणि नगरपालिका यांच्या साधनसंपत्तीत हातभार लावण्यासाठी राज्यांच्या एकत्रित निधीत वाढ करण्याची उपायोजना.

४. राज्यांची वित्तस्थिती चांगली राहण्यासाठी राष्ट्रपतींनी संदर्भित केलेले विषय व राष्ट्रपतींनी वित्त आयोगाकडून आलेल्या शिफारशी त्यावर केलेल्या कृतीसह संसदेत प्रस्तुत करणे घटनेने अनिवार्य केले आहे.

*वित्त आयोगाची कार्यपद्धती:-

राष्ट्रपती वित्त आयोगाची नेमणूक करतात वित्त आयोगाची रचना आणि निर्देशाच्या अटी(Terms of Reference) सरकारेने जाहीर केल्यावर लगेच आयोगाचे काम सुरू होते. केंद्रसरकार आणि राज्यसरकारे यांच्यामधील वित्तीय संबंधाच्या बदलत्या परिस्थितीनुसार बदल करण्याचे कार्य वित्त आयोग करते. वेगवेगळ्या राज्यांची आर्थिक स्थिती वेगवेगळी असते त्यामुळे राज्यांमध्ये आर्थिक संसाधनांची वाटणी करताना वेगवेगळे मापदंड स्वीकारावे लागतात तसेच केंद्रसरकार आणि राज्यसरकारे यामध्ये आर्थिक स्रोतांच्या वाटणीत विविध प्रकारच्या समस्या निर्माण होतात तसेच विसंगती निर्माण होतात या सर्वांचा विचार करता केंद्र व राज्यसरकारांमध्ये आर्थिक सामंजस्य निर्माण करण्यासाठी निश्चित उपाय योजना कोणती करावी, त्यासाठी कोणता आधार घ्यावा यासाठी वित्त आयोगाची निर्मिती केली आहे.

केंद्रसरकारला वैयक्तिक प्राप्तिकरापासून मिळणाऱ्या उत्पन्नाचे वाटप केंद्र व राज्यांमध्ये वित्त आयोग करते. राज्यांचा वाटा आणि वाटावयाची रक्कम कोणत्या तत्त्वानुसार वाटायची याचीशिफारस वित्त आयोग करते. तसेच केंद्रीय कराची वाटणी व विभागणी राज्यांमध्ये कशी करावयाची याची शिफारस वित्त आयोग करते. राज्यांना महसुली तूट काढण्यासाठी अथवा राज्य राज्यांमधील वित्तीय साधनसामग्रीच्या बाबत तफावत कमी करण्यासाठी दिली जातात. प्रत्येक पंचवार्षिक योजनेत राज्यांना किती सहाय्यक अनुदान द्यावीत हे वित्त आयोग ठरवते. तसेच केंद्राने राज्यांना किती मुदतीची कर्जे द्यावीत त्यांची शिफारस वित्त आयोग करते.

वित्त आयोग आणि त्यांच्या शिफारशी कालावधी

वित्त आयोग	वित्तआयोगअध्यक्ष	अध्यक्षनियुक्तीवर्ष	शिफारस कालावधी	उत्पन्नातीलराज्यांना दिलेलावाटा %
1	के.सी. नियोगी	1951	1952- 1957	55
2	केसन्यानम	1956	1956-1962	60
3	ए.के.चंद्रा	1960	1960-1966	66
4	डॉ.पी.व्ही. राजमन्नार	1964	1966-1969	75
5	महावीरत्यागी	1968	1969-1974	75
6	ब्रम्हांडरेडडी	1972	1974-1979	80
7	जे.एम. शेलार	1977	1979-1984	85
8	यशवंतरावचव्हाण	1982	1984-1989	85
9	एन.के.पी. साळवे	1987	1989-1994	85
10	के.सी. पंत	1992	1995-2000	75.5
11	ए.एम.खुस्त्रो	1998	2000-2005	37.5
12	डॉ.सी.रंगराजन	2002	2005-2010	30.5
13	विजयकेळकर	2007	2010-2015	32.5
14	डॉ.वाय.व्ही. रेडडी	2013	2015-2020	42
15	एन.के. सिंग	2017	2020-2025	41

वरील सर्व वित्त आयोगांनी पुढील बाबींवर शिफारशी केल्या आहेत.

थोडक्यात केंद्र सरकारे आणि घटक राज्य सरकारे यांच्यात वित्तीय साधनसामग्रीचे योग्य वाटप करण्याचे काम वित्त आयोग करते, वित्त आयोग हे वैधानिक मंडळ असून वित्त आयोगाद्वारे बिगर योजना वित्तीय सामग्रीचे केंद्र सरकारकडून राज्य सरकारांकडे स्थानांतर केले जाते. तसेच वित्त आयोगाच्या शिफारशी निर्णयात्मक असतात त्या केंद्र सरकारला स्वीकाराव्या लागतात.

*वित्तीय आयोगाचे योगदान:-

वित्त आयोग उत्पन्न साधनांचा अभ्यास करून वित्तीय साधनांच्या वाटपासंबंधीच्या शिफारशींचा अहवाल केंद्र सरकारला सादर करतात. भारतात आतापर्यंतच्या 15 वित्त आयोगाचे अध्यक्ष आणि त्यांच्या शिफारशींचा कालावधी पुढील तक्त्यात देण्यात आलेला आहे.

१. वैयक्तिक प्राप्ती करातून मिळणाऱ्या निव्वळ उत्पन्नाची केंद्रसरकार व घटक राज्यसरकारे यांच्यामध्ये विभागणी आणि घटक राज्य सरकारे यांच्या हिश्याचे वाटप.
२. मध्यवर्ती उत्पादन करांपासून मिळणाऱ्या निव्वळ उत्पन्नाची केंद्रसरकारव घटकराज्यसरकारे यांच्यामध्ये विभागणी आणि घटकराज्यसरकारांच्या हिश्याची घटकराज्यसरकारांमध्ये वाटप.
३. मालमत्तेवरील करांपासून मिळणाऱ्या उत्पन्नाचे वाटप.
४. केंद्रसरकारने घटकराज्यसरकारांना द्यावयाची सहाय्यक अनुदाने.
५. घटकराज्यांनी केंद्रसरकारकडून घेतलेली कर्जे.

वरील बाबतीत वेगवेगळ्या आयोगांनी वेळोवेळी बदलत्या परिस्थितीनुसार आपल्या शिफारशी केलेले आहेत.

वित्त आयोगाने केंद्राने कर महसुलात राज्यांना द्यायच्या हिच्याबद्दल तसेच सहाय्यक अनुदानाबद्दल वेळोवेळी चांगल्या शिफारशी केल्या आहेत. पहिल्या दहा वित्त आयोगांनी केवळ आयकर आणि केंद्रीय उत्पादन शुल्क या दोनच करांचा विचार केला. दहाव्या वित्त आयोगाने सुचविलेल्या शिफारशीनुसार 2000 साली घटनेत दुरुस्ती होऊन अकराव्या वित्त आयोगानुसार केंद्राच्या सर्व निव्वळ उत्पन्नातील हिस्सा राज्यांना द्यावयास सुरुवात झाली. केंद्राने किती हिस्सा राज्यांना द्यायचा हे ठरविल्यानंतर त्यात प्रत्येक राज्याचा हिस्सा ठरविण्याचे काम वित्त आयोगाने केले. त्यासाठी सामान्यतः राज्याची लोकसंख्या, अत्युच्च उत्पन्नापासून राज्याच्या उत्पन्नातील तफावत, राज्याचे क्षेत्रफळ आणि पायाभूत सुविधांमधील तफावत, राज्यांचे कर आकारणीतील प्रयत्न आणि वित्तीय शिस्त यांसारखे वित्तीय कार्येक्षमता निकष ठरविले आहेत. सुरुवातीच्या काळात लोकसंख्या या घटकाला अधिक भार दिलेला होता. पण हळूहळू उत्पन्नातील फरक आणि वित्तीय कार्येक्षमता या घटकांना जास्त महत्त्व दिलेले दिसते.

राज्यघटनेच्या कलम 275 नुसार गरजू राज्यांना केंद्राने द्यायच्या अनुदानाबाबत वित्त आयोगाने प्रत्येक राज्याच्या अनुदान रकमेविषयी शिफारस करणे अपेक्षित आहे. पहिल्या वित्त आयोगाने अनुदान मिळण्यास पात्र होण्यासाठी राज्याचे अंदाजपत्रक, आपली पूर्ण क्षमता वापरण्यासाठी राज्याने केलेले प्रयत्न, राज्यांराज्यातील मूलभूत स्तर समान करण्यासाठी अनुदानाचा होणारा वापर देश हिताच्या दृष्टीने राज्यावर असलेली विशेष जबाबदारी कमी विकसित राज्यांना आवश्यक सेवा पुरविण्याची गरज या सर्व निकषांचे पालन सर्व वित्त आयोगाने केलेले दिसते. त्यात राज्यांची महसुली तूट भरून काढणे, राज्यांच्या विशेष अडचणीसाठी पैसा उपलब्ध करून देणे, राज्यांच्या भांडवली खर्चाची गरज भरून काढणे यासाठी हळूहळू अनुदाने देण्याची शिफारस केली गेली. राष्ट्रपतींनी वित्त आयोगाची नेमणूक करताना काही विशेष मुद्द्यांचा

उल्लेख केलेला आढळतो. त्याचा उपयोग वित्त आयोगाची कक्षा वृंदावण्यासाठी झाला. त्यामुळे केंद्र - राज्य वित्तीय संबंध सुधारण्यास मदत झाली आहे.

गेल्या 65 वर्षाच्या कालावधीत वित्त आयोगाने स्वतःला सिद्ध केले आहे. केंद्राने राज्यांना द्यावयाच्याहिश्श्यांविषयी केवळ लवादाची भूमिका न वठवता वित्त आयोग आता वित्तीय पुनर्रचनेचा शिल्पकार म्हणून ओळखला जाऊ लागला आहे. वित्त आयोगाने नेहमीच आपल्या शिफारशी मध्ये मागास राज्यांना झुकते माप दिले आहे. तसेच वित्त आयोगाकडून शिफारस केल्या जाणाऱ्या हस्तांतरणाचे प्रमाण वाढत आहे.

राज्यांच्याहिश्श्यांबाबतनियमआणि भार

घटक	तेरावावित्तआयोग	चौदावावित्तआयोग
लोकसंख्या (1971)	25	17.5
लोकसंख्या (2011)	0	10
आर्थीकक्षमताउत्पनातीलअंतर	47.5	50
क्षेत्र	10	15
जंगलक्षेत्र	0	7.5
वित्तीयशिस्त	17.5	0
एकूण	100	100

(Source –Economic Survey 2014-15 Volume–I Page-131)

वित्त आयोग वित्तीय असमतोल दूर व्हावा या दृष्टीने मोठे प्रयत्न करत आहे. राजकोषीय शिस्त पाळणाऱ्या राज्यांना याचा फायदा होतो तर शिस्त न पाळणाऱ्या राज्यांची आर्थिक परिस्थिती बिघडलेली दिसते. असे असले तरी एकूणच केंद्र आणि राज्य सरकारी यांचे वित्तीय संबंध सौहार्दपूर्ण ठेवण्याचे श्रेय वित्त आयोगाला द्यायला हवे.

*१५ वा वित्त आयोग :-

१५ व्या वित्त आयोगाने 2021- 22 ते 2025 - 26 या कालावधीसाठीचा finance commission in covid Times या शीर्षकाखाली आपला अहवाल नुकताच राष्ट्रपतींना सादर केला आहे. भारत सरकारेने 15 व्या वित्त आयोगाची स्थापना नोव्हेंबर 2017 मध्ये केली होती. या आयोगाचे अध्यक्ष म्हणून नंदकिशोर सिंग यांनी तर अजय नारायण झा,डॉ.अशोक लाहिरी, प्रा. अनुप सिंग आणि रमेशचंद्र यांनी आयोगाचे सदस्य म्हणून आपले योगदान दिले आहे.

* १५ वा वित्त आयोग शिफारशी:-

१. आयोगाने 14 वित्त आयोगाच्या शिफारशीनुसार राज्यांच्या हिश्श्यांतील
42 टक्के करांमध्ये कपात करून 41 टक्के करण्याची शिफारस केली आहे.

२. नवनिर्मिती केंद्रशासित प्रदेश जम्मू काश्मीर आणि लडाख यांची सुरक्षा व इतर गरजांच्या पूर्तीसाठी केंद्र शासनाच्या हिश्श्यांत 1 % वाढ करण्यात आली आहे.

3. सार्वजनिक वित्तीय लेखापरीक्षण व्यवस्था निर्माण करण्यासाठी वैधानिक संरचना निर्मिती करण्यासाठी कायद्याची गरज असून असा कायदा तयार करण्यासाठी कार्ये गटाची निर्मिती करण्याची शिफारस १५ व्या वित्त आयोगाने केली आहे.

४. देशाची कर प्रणाली विस्तृत बनवून कर निर्धारण सोपे करून सरकारेच्या सर्व स्तरावर कर प्रशासनाची कार्यक्षमता वाढविण्याची शिफारस केली आहे.
५. ग्रामीण स्थानिक स्वराज्य संस्थांच्या बळकटीकरणासाठी केंद्र शासनाकडून राज्यांना बेसिक ग्रँट व टाईड ग्रँट अशा दोन प्रकारच्या ग्रँटच्या स्वरूपात 50 टक्के निधी प्राप्त करून द्यावा अशी शिफारस केली आहे.
६. कर प्रणाली मध्ये राज्यांचा हिस्सा निर्धारित करण्यासाठी फक्त 2011 च्या जनगणनेचा आधार घेण्यात आलेला आहे.
७. राज्यांना द्यावयाच्या केंद्रीय कर व शुल्काच्या एकूण रकमेतील राज्यांचा वाटा ठरविण्याच्या सूत्रात बदल केला आहे.

14 व्या व 15 व्या वित्त आयोगाच्या भारातील बदल

निकष	14 वावित्त आयोग (2015-20)	15 वावित्त आयोग (2020-21)	15 वावित्त आयोग (2021-26)
राजकोषीय क्षमताउत्पन्न /फरक	50.0	45.0	45.0
क्षेत्र	15.0	15.0	15.0
लोकसंख्या (1971)	17.5		
लोकसंख्या (2011)	10.0	15.0	15.0
लोकसंख्याशा. कामगिरी		12.5	12.5
वनआच्छादन	7.5		
वनवपर्यावरणशास्त्र		10.0	10.0
करववित्तीयप्रयत्न		2.5	2.5
एकूण	100	100	100

Source Reports of the 14th& 15th Finance commissions, PRS

१५ व्या वित्त आयोगासमोर नियोजन आयोगाच्या जागी नीती आयोगाला अनुसरून शिफारशी करणे, योजनाबाह्य खर्च आणि योजनेवरील खर्च यांच्यातील तफावत कमी करणे, जुलै 2017 पासून लागू झालेल्या वस्तू व सेवा करांची संबंधित मुद्दे समोर ठेवून कार्य करणे तसेच नवी FRBH संरचना तयार करणे अशी आव्हाने आहेत. ही आव्हाने पूर्ण करण्यासाठी तसेच वित्त आयोगाच्या कार्यपद्धतीत सुधारणा होण्यासाठी पुढील काही उपाययोजना आवश्यक आहे.
१. वित्त आयोग अधिक परिणामकारक होण्यासाठी त्यांचे कायमस्वरूपी संस्थेत रूपांतर होणे आवश्यक आहे.
२. वित्त आयोगाच्या व्याप्तीत वाढ करून महसुली व भांडवली खात्यावरील सर्व बिगर योजना हस्तांतरित रकमांचा समावेश करावा.
३. निती आयोग आणि वित्त आयोग यांच्यात अधिक समन्वय निर्माण होण्याची गरज आहे.
४. वित्त आयोगाने राज्य-राज्यातील असमानता कमी करण्यासाठी प्रयत्न केले पाहिजेत. थोडक्यात भारतीय संघीय वित्त पद्धती अधिक बळकट होण्यासाठी वित्त आयोगाचे कार्यानुवर्तन (Functioning)अधिक कार्यक्षम होण्याची गरज आहे.

५. देशातील वित्तीय रचना बदलविण्याच्या दृष्टीने आणि वित्तीय संबंधात सुदृढ व निकोप आधार प्राप्त व्हावा या दृष्टीने वित्त आयोगाची व्याप्ती वाढवली पाहिजे.

६. वित्त आयोग ज्या निकषाच्या आधारावर साधनसंपत्तीची वाटणी करते त्या निकषांची पुनर्रचना व्हायला हवी.

७. राज्यांच्या मागासलेपणाच्या निकषाला अधिक महत्त्व दिले पाहिजे.

सारांश :-

संघराज्याची एकात्मता जर टिकून ठेवायचे असेल तर लोककल्याणापेक्षा राष्ट्रीय एकतेला महत्व दिले पाहिजे.घटनेत ज्या मूलभूत तत्त्वांना महत्त्वाचे स्थान दिले आहे ते राखणे आवश्यक आहे तसेच एकूण राष्ट्राच्या दृष्टीने जी कार्ये महत्त्वाची आहेत आणि ज्यांची जबाबदारी स्वीकारणे राज्यांना शक्य नाही ती कार्ये केंद्राकडेच सोपविली पाहिजेत.या दोन गोष्टींचा संकलित निष्कर्ष असा की, आपापल्या क्षेत्रात केंद्र आणि राज्य ही दोघेही शक्तिशाली असली पाहिजेत. तरच संघराज्याची निकोपता टिकून राहील, पण जेव्हा राज्यांना सर्व प्रकारचे सहाय्य देऊनही त्यांच्यात व केंद्रात संघर्ष होत असेल तर राष्ट्रीय हित समोर ठेवून राज्यांनी केंद्रापुढे नमते घ्यायला हवे म्हणजे दोघेही शक्तिशाली असावे पण केंद्र राज्यापेक्षा शक्तिशाली असली पाहिजे.

संदर्भ :-

१. ओझरकरसु.रा. ,"राजस्व" विदयाप्रकाशन, नागपुर (1969)
२. ढमढेरे, डॉ. एस.व्ही. , भारतातीलसार्वजनिकआयव्यायडायमंडपब्लीकेशनपूणे (जून 2015)
३. अर्थसंवाद- विविध अंक
४. आर्थिक सर्वेक्षण, (2014 -15) भारत सरकार
५. आव्हाड, प्रा.सुहास काळे, संभाजी सार्वजनिक प्रशांत पब्लिकेशन जळगाव 2021.
६. वसुंधरा भोपळे, (20 नोव्हेंबर 2020), लोकसत्ता ई –पेपर.
७. गोवारीकर, डॉ. (6 मार्च 2017) "वित्त आयोग" महाराष्ट्र टाइम्स.
८. शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर 'संघराज्य वित्त'.
९. देसले, डॉ. किरण, स्पर्धा परीक्षा अर्थशास्त्र भाग -१
१०. "योजना" फेब्रुवारी (2015)

पंधरावा वित्त आयोग

प्रा. डॉ. कृष्णा शंकर शहाणे
(आजीव सदस्य क्रमांक 1236)
Recognized Research guide, Savitribai Phule, Pune University, Pune.
प्राध्यापक तथा अर्थशास्त्र विभाग प्रमुख, बिटको महाविद्यालय, नाशिकरोड, नाशिक मो. 9850748481
e-mail – drkrishnashahane1@gmail.com

1.1प्रस्तावना –

भारतीय राज्य घटनेच्या 280व्या कलमान्वये वित्त आयोगाची स्थापना करण्यात येते. वित्त आयोग ही एक अर्धन्यायिक संस्था आहे. दर पाच वर्षांनी किंवा आवश्यकता असेल तेव्हा राष्ट्रपती वित्त आयोगाची स्थापना करू शकतात. वित्त आयोगामध्ये एक अध्यक्ष व चारअथवा जास्त सदस्य असतात. वित्त आयोगाच्या सदस्यांची अर्हता आणि त्यांच्या निवडीची प्रक्रिया ठरवण्याचे अधिकार राज्यघटनेने संसदेला दिलेले आहेत. त्यानुसार संसदेने अध्यक्ष व सदस्यांची पात्रता अथवा अर्हता वित्त आयोग कायदा 1951 नुसार निश्चित केली आहे.वित्त आयोगाचे मुख्यालय नवी दिल्ली येथे आहे.

भारतीय संघराज्यामध्ये प्रत्येक राज्याची भौगोलिक, सामाजिक, आर्थिक परिस्थिती भिन्न स्वरूपाची आहे. यामुळे उत्पन्नाच्या स्त्रोतात देखील भिन्नता आढळते. प्रत्येक राज्याचे दरडोई उत्पन्न वेगवेगळे आहे. प्रत्येक राज्याचा विकास दर वेगवेगळा आहे.देशाचा एकत्रितरित्या सामूहिकपणे विकास साधायचा असेल तर या भिन्नतेचा विचार करून सर्व राज्यांना आवश्यक ती मदत केंद्र सरकार अनुदान व विविध योजनांच्या माध्यमातून करत असते. अशा अवस्थेत आर्थिक स्त्रोतांच्या बाबतीत एकवाक्यता निर्माण होणे आवश्यक असते. या दृष्टीने केंद्र सरकार व राज्य सरकारांमध्ये वित्तीय सामंजस्य निर्माण करण्यासाठी, केंद्राला आर्थिक विषयांवर सल्ला देण्यासाठी वित्त आयोगाची निर्माण केला जातो.

केंद्र सरकारने महसुलातील वाटा, अनुदाने राज्यांना किती द्यावेत, राज्या-राज्यांना कशी वितरित करावी हे सुचवण्यासाठी दर पाच वर्षासाठी वित्त आयोग विविध निकष सुचवत असते.

1.2वित्त आयोगाची निर्मिती -

भारतीय राज्यघटनेच्या कलम 280नुसार दर पाच वर्षांनी किंवा गरज असल्यास या मुदतीपूर्वी भारताचे राष्ट्रपती वित्त आयोगाची नेमणूक करतात. एक अध्यक्ष व इतर चार सदस्य असे एकूण पाच सदस्य यांची यामध्ये नेमणूक केलेली असते. कलम 280 (2)नुसार वित्त आयोगाच्या अध्यक्ष व सदस्यांची नेमणूक करण्याची पद्धत कशी असावी हे ठरवण्याचा अधिकार संसदेला दिलेला आहे. यानुसार संमत करण्यात आलेल्या वित्त आयोग अधिनियम 1951अंतर्गत अध्यक्ष व सदस्य यांची निवड केली जाते.

1.3वित्त आयोगाच्या सदस्याची पात्रता पुढीलप्रमाणे –

1)आयोगाचा सदस्य हा सर्वोच्च न्यायालय किंवा उच्च न्यायालयाचा न्यायाधीश होण्याची पात्रता धारण करणारा असावा.

2)आयोगाचा सदस्य हा सरकारी विभागात वित्तीय घडामोडीं संदर्भात तज्ञ व्यक्ती असावा.

3)आयोगाच्या सदस्याला अर्थशास्त्राचे मूलभूत ज्ञान असावे.

1.4कलम 280 (3) नुसार वित्त आयोग पुढील बाबींसंदर्भात राष्ट्रपतींना सल्ला देण्याचे कार्य पार पडतो-

1. निव्वळ कर संकलनाची केंद्र व राज्य मध्ये विभागणी कशी असावी याची तत्वे निर्धारित करण्याचे काम वित्त आयोग करत असतो.
2. भारताच्या संचित निधीतून केंद्राने राज्याला द्यावयाच्या अनुदानाची तत्त्वे वित्त आयोग ठरवत असतो.

3. केंद्र व राज्यांमधील वित्तीय बाबी संबंधित मार्गदर्शन करणे.
4. राज्यांच्या संचित निधीमध्ये वाढ करण्यासाठी उपाययोजना सुचविणे.
5. राष्ट्रपतींनी सुचविलेल्या इतर कोणत्याही वित्त विषयक बाबीसंबंधी सल्ला देणे.
6. पंचायत राज व्यवस्थे कडे स्त्रोत उपलब्ध करण्यासाठी राज्यांच्या संचित निधीत वाढ करण्याच्या उपाययोजना सुचवणे.
7. नागरी पंचायत राज व्यवस्थेकडे स्त्रोत उपलब्ध करण्यासाठी राज्यांच्या संचित निधीत वाढ करण्याच्या उपाययोजना सुचविणे.
8. राज्याच्या संचित निधीमध्ये वाढ करण्यासाठी आवश्यक असलेल्या उपाययोजना सुचवणे.
9. वित्त प्रणाली बाबत राष्ट्रपतींनी सांगितलेल्या कोणत्याही गोष्टीवर वित्त आयोग काम करण्यास बांधील असतो.

वित्त आयोग हा घटनात्मक दृष्टीकोनातून महत्त्वाचा आयोग असला तरी वित्त आयोगाने केलेल्या शिफारशी राष्ट्रपतींनी मान्य कराव्याच असे नसते. या शिफारशी केवळ सल्लागार स्वरूपाच्या असतात त्या सरकारवर बंधनकारक नसतात. तरीही वित्त आयोग हा महत्त्वाचा आहे कारण वित्त आयोग हा घटनात्मक आयोग असून अर्धन्यायिक संस्था आहे.

1.5वित्त आयोगाचे आजतागायत अध्यक्ष -

अ.नं.	वित्त आयोग	स्थापना वर्ष	अध्यक्ष	शिफारसींचा कालावधी
1	पहिला	1952	के.सी. नियोगी	1952-1957
2	दुसरा	1956	के. संथानाम	1957-1962
3	तिसरा	1960	न्या. ए. के. चंदा	1962-1966
4	चौथा	1964	पी.व्ही. राजमन्नार	1966-1969
5	पाचवा	1968	महावीर त्यागी	1969-1974
6	सहावा	1972	कासू ब्रम्हानंद रेड्डी	1974-1979
7	सातवा	1977	न्या. जे. एम. शेलाट	1979-1984
8	आठवा	1983	यशवंतराव चव्हाण	1984-1989
9	नववा	1987	एन. के. पी. साळवे	1989-1995
10	दहावा	1992	के. सी. पंत	1995-2000
11	अकरावा	1997	एस.एस. खुसरो	2000-2005
12	बारावा	2002	सी. रंगराजन	2005-2010
13	तेरावा	2007	डॉ. विजय केळकर	2010-2015
14	चौदावा	2013	डॉ. वाय.व्ही.रेड्डी	2015-2020
15	पंधरावा	2017	एन.के. सिंग	2020-2026

1.6पंधरावा वित्त आयोग –

पहिला वित्त आयोग 22नोव्हेंबर 1951मध्ये स्थापन करण्यात आला होता. पहिल्या वित्त आयोगाचे अध्यक्ष के.सी. नियोगी हे होते तर या वित्त आयोगाच्या शिफारसींचाकालावधी 1952ते 1957इतका होता. भारतीय राज्यघटना अंमलात आल्यापासून आजपर्यंत 15वित्त आयोग स्थापन झाले आहेत. सध्य स्थितीत पंधराव्या वित्त आयोगाच्या शिफारसींचा कालावधी सुरु आहे.

भारत सरकारने पंधराव्या वित्त आयोगाची स्थापना 27नोव्हेंबर 2017मध्ये केली होती. या आयोगाचे अध्यक्ष एन के (नंदकिशोर) सिंग हे होते. अजय नारायण झा, अशोक लाहिरी, अनुप सिंग, रमेश चंद हे चार सदस्य तसेच अरविंद मेहता हे या आयोगाचे सचिव या आयोगामध्ये त्यांच्या बरोबर कार्यरत होते. या वित्त आयोगाच्या सदस्यपदी प्रारंभी एक वर्षासाठी भारतीय रिझर्व बँकेचे 25वे गव्हर्नर शक्तीकांत दास हे सुद्धा होते, परंतु त्यांचीगव्हर्नर पदी नेमणूक झाल्यानंतर त्यांना सदर आयोगाचे काम थांबवावे लागले.

या वित्त आयोगाच्या शिफारासींचा कालावधी हा 2020ते 2025हा आहे. पंधराव्या वित्त आयोगाने 2020ते 2025या कालावधीसाठी चा आपला अहवाल “फायनान्स कमिशन इन कोविड टाइम्स” या शीर्षकाखाली राष्ट्रपतींना सादर केला.

1.7पंधराव्या वित्त आयोगाच्या शिफारसी-

भारतीय राज्य घटनेच्या कलम 281नुसार वित्त आयोगाच्या शिफारशी या अहवाला मार्फत राष्ट्रपतींच्या कडे सुपूर्द केल्या जातात. राष्ट्रपति वित्त आयोगाच्या या शिफारशी स्पष्टीकरणासह संसदेत मांडण्याचे कार्य करतात.

1.8 पंधराव्या वित्त आयोगाच्या शिफारशी

1. 14व्या वित्त आयोगाच्या शिफारशीनुसार राज्याच्या वाट्यातील 42टक्के करांमध्ये कपात करून 41टक्के करण्याची शिफारस पंधराव्या वित्त आयोगाने केलेली आहे.
2. नवनिर्मिती केंद्रशासित प्रदेश जम्मू काश्मीर आणि लडाख यांची सुरक्षा व इतर गरजांच्या पूर्तीसाठी केंद्र शासनाच्या हिश्यात एक टक्का वाढ करण्यात आलेली आहे.
3. सार्वजनिक वित्तीय लेखापरीक्षण व्यवस्था निर्माण करण्यासाठी वैधानिक संरचना निर्मिती करण्यासाठी कायद्याची गरज असून असा कायदा तयार करण्यासाठी कार्य गटाची निर्मिती करण्याची शिफारस या आयोगाने केली आहे.
4. कर प्रशासनाची कार्यक्षमता वाढवण्याची शिफारस देखील केलेली आहे.
5. ग्रामीण स्थानिक स्वराज्य संस्थांच्या बळकटीकरणासाठी केंद्र शासनाकडून राज्यांना बेसिक ग्रँट व टाईड ग्रँट अशा दोन प्रकारच्या ग्रँटच्या स्वरूपात 50 - 50टक्के निधी प्राप्त करून द्यावा अशी शिफारस केली आहे.
6. करप्रणाली मध्ये राज्यांचा हिस्सा निर्धारित करण्यासाठी फक्त 2011च्या जनगणने चा आधार घेण्यात आलेला आहे यापूर्वी 14वित्त आयोगाने 1971व 2011च्या जनगणनेच्या आधारे शिफारशी सादर केलेल्या होत्या.

1.9 समारोप –

या वित्त आयोगात कर प्रशासनात कार्यक्षमता अधिकाधिक यावी याकडे लक्ष देण्यात आले आहे. स्थानिक स्वराज संस्थांच्या बळकटीसाठी प्रयत्न करण्यात आलेले आहेत. केंद्रशासित प्रदेश जसे जम्मू काश्मीर आणि लडाख यांच्या सुरक्षेसाठी खास लक्ष देण्यात आलेले आहे.

१५ वा वित्त आयोग अहवाल (२०२१-२०२६) – अनुदाने आणि शिफारशी यांचा विश्लेषणात्मक अभ्यास

मार्गदर्शक - प्रा. डॉ. गोरक्षनाथ सानप
आजीव सभासद क्रमांक: १०१३, भ्रमणध्वनी- ७५८८६०६२९०,
ई-मेल- gksanap11@gmail.com
संगमनेर नगरपालिका कला,डी.जे. मालपाणी वाणिज्य व
बी.एन. सारडा विज्ञान महाविद्यालय,संगमनेर (स्वायत्त)
संशोधक – प्रा. सुनिल राजाराम ठोकळे
भ्रमणध्वनी- ८१८०८२२८१०, ई-मेल- sunilthokle2017@gmail.com
जे. एस. एम. महाविद्यालय, अलिबाग. जिल्हा –रायगड ,४०२२०१

गोषवारा:

वित्त आयोग ही केंद्र-राज्य आर्थिक संबंधांवर सूचना देण्यासाठी भारताच्या राष्ट्रपतींनी स्थापन केलेली एक घटनात्मक संस्था आहे. वित्त आयोगाची स्थापना घटनेच्या कलम २८० नुसार करण्यात आली आहे. वित्त आयोगाच्या स्थापनेबाबत डॉ.बाबासाहेब आंबेडकरांचे मोठे योगदान आहे. वित्त आयोग हा प्रामुख्याने राज्यांतर्गत निर्माण झालेला वित्तीय असमतोल, असंतुलन(Vertical imbalance) दूर करण्याचा प्रयत्न करतो. तसेच राज्या-राज्यांमध्ये जो आर्थिक असमतोल(Horizontal imbalance) निर्माण झालेला असतो तो दूर करणे आणि केंद्रीय संसाधनांचे राज्यांना योग्य वितरण, वाटप करण्यासाठी वित्त आयोगाची नेमणूक केली जाते. १५ व्या वित्त आयोगाला (अध्यक्ष: श्री. एन. के. सिंग) दोन अहवाल सादर करणे आवश्यक होते. २०२०-२१ या आर्थिक वर्षासाठीच्या शिफारशींचा समावेश असलेला पहिला अहवाल फेब्रुवारी २०२० मध्ये संसदेत मांडण्यात आला. २०२१-२०२६ कालावधीसाठीच्या शिफारशींसह अंतिम अहवाल १ फेब्रुवारी २०२१ रोजी संसदेत मांडण्यात आला. २०२१-२०२६ कालावधीसाठी केंद्रीय करांमध्ये राज्यांचा हिस्सा २०२०-२१ प्रमाणे ४१% असण्याची शिफारस करण्यात आली आहे. १४ व्या वित्त आयोगाने हि शिफारस ४२% केली होती. १५ व्या वित्त आयोगाने प्रादेशिक असमतोल तसेच राज्यांच्या उत्पन्नातील विषमता कमी करण्यासाठी एकूण निधीपैकी ४५% निधी राज्यांना वितरीत केला जाईल. राज्यांना विविध क्षेत्रानुसार १५% निधी उदा. आरोग्य, शिक्षण, कृषी क्षेत्र, रस्ते, न्यायव्यवस्था इत्यादी विकासासाठी निधीची तरतूद करण्यात आली आहे. तसेच लोकसंख्याआधारित व लोकसंख्यावरती नियंत्रण, सुधारणा आणि पर्यावरण व वनांचे संरक्षण यासाठी निधीची तरतूद करण्यात आली आहे. केंद्राकडून सर्वात जास्त कर वाटपातील हिस्सा उत्तरप्रदेश राज्याला १७.९३९ टक्के आणि बिहार साठी १०.०५८ टक्के एवढा सर्वात जास्त मिळाला आहे. महाराष्ट्रासाठी तो ६.३१७ टक्के एवढा आहे. तसेच स्थानिक स्वराज्य संस्थाच्या विकासासाठी २०२१-२०२६ या पाच वर्षासाठी एकूण अनुदान ४.३६ लाख कोटी रुपये असेल. तसेच राज्यांसाठी महसुली तुट अनुदान व राज्यांच्या विकासासाठी विशिष्ट अनुदान तरतूद केली आहे. तसेच राज्य आपत्ती व्यवस्थापन निधीमध्ये रु.१.६ लाख कोटीची तरतूद केली आहे. तसेच राज्यांना संरक्षण आणि अंतर्गत सुरक्षेसाठी आधुनिकीकरण निधी दिला जाईल. वित्त आयोगाने राज्यांच्या बाबतीत अनेक सुधारणा व शिफारसी सांगितल्या आहेत त्यामध्ये प्रामुख्याने वित्तीय तुट कमी करणे, भारतीय रिजर्व बँकेकडून कर्ज घेणे, राज्यांनी उत्पन्न आणि मालमत्तेवर आधारित कर आकारणी मजबूत केली पाहिजे. तसेच वस्तू व सेवा करांचे दर तर्कसंगत योग्य ठेवले पाहिजेत. आर्थिक व्यवस्थापन सुधारणे, जमा-खर्च, लेखांकन यासाठी योग्य गुणवत्तेवर आधारित

पद्धत स्वीकारणे. तसेच राज्यांनी २०२२ पर्यंत आरोग्यावरील खर्च त्यांच्या अंदाजपत्रकाच्या ८ % पेक्षा जास्त वाढवला पाहिजे. १५ व्या वित्त आयोगाने खूप चांगल्या सूचना केल्या आहेत मात्र केंद्र सरकारची जबाबदारी आहे कि वेळेवर आणि योग्य निधी, अनुदानाचे वाटप राज्यांना झाले पाहिजे.

१) प्रस्तावना:

भारतात संघराज्य व्यवस्था आहे त्यामुळ्ये घटक राज्यांमध्ये वित्तीय समतोल ठेवण्यासाठी संविधानाच्या कलम २८० नुसार वित्त आयोगाची स्थापना करण्यात आली आहे. दर पाच वर्षांनी वित्त आयोगाची स्थापना केली जाते. अध्यक्ष आणि इतर चार सदस्य असे एकूण पाच सदस्य असतात. पहिला वित्त आयोग १९५१ साली स्थापन झाला. सध्या १५ व्या वित्त आयोगाचा कालावधी हा २०२१-२०२६ आहे आणि त्याचे अध्यक्ष एन. के. सिंग हे आहेत. राज्यांच्या विकासातील असमतोल दूर करण्यासाठी कायदेमंत्री डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी इस. १९५१ मध्ये वित्त आयोगाची स्थापना केली होती. वित्त आयोग हा विविध प्रकारची कार्ये करतो त्यामध्ये केंद्र आणि राज्य सरकारे यांच्यामध्ये कर उत्पन्नाचे वाटपाचे निकष ठरवणे. राज्यांना सहाय्यक अनुदान प्रमाण निश्चित करणे व कर्जाबाबत शिफारशी करणे, स्थानिक स्वराज्य संस्थाना निधी उपलब्ध करून देण्याबाबत शिफारस करणे, केंद्र आणि राज्य यामधील वित्तीय संबंधाविषयी इतर शिफारशी करणे. इत्यादी वित्त आयोगाची कार्ये आहेत. सध्याचा १५ वा वित्त आयोग हा राज्यातील प्रादेशिक आर्थिक असमतोल दूर करणे, लोकसंख्या नियंत्रण, वने आणि पर्यावरण संरक्षण करणे. तसेच राज्यांना विविध क्षेत्रानुसार उदा. आरोग्य, शिक्षण, कृषी क्षेत्र, रस्ते, न्यायव्यवस्था इत्यादी विकासासाठी निधीची तरतूद केली आहे. तसेच वित्त आयोगाने राज्यांच्या बाबतीत अनेक सुधारणा व शिफारसी सांगितल्या आहेत त्यामध्ये प्रामुख्याने वित्तीय तुट कमी करणे, भारतीय रिजर्व बँकेकडून कर्ज घेणे, राज्यांनी उत्पन्न आणि मालमत्तेवर आधारित कर आकारणी मजबूत केली पाहिजे. तसेच वस्तू व सेवा करांचे दर तर्कसंगत योग्य ठेवले पाहिजेत. आर्थिक व्यवस्थापन सुधारणे, जमा-खर्च, लेखांकन यासाठी योग्य गुणवत्तेवर आधारित पद्धत स्वीकारणे. तसेच राज्यांनी २०२२ पर्यंत आरोग्यावरील खर्च त्यांच्या अंदाजपत्रकाच्या ८ % पेक्षा जास्त वाढवला पाहिजे. थोडक्यात १५ व्या वित्त आयोग हा भारतात आर्थिक समतोल निर्माण करणे, लोकसंख्या नियंत्रण आणि राज्यांना आत्मनिर्भर करणे, राज्यांचा पायाभूत विकास साध्य करणे आणि स्थानिक स्वराज्य शासन संस्थाना विकासासाठी निधी उपलब्ध करून देणे यासाठी प्रयत्न करीत आहे. मात्र वित्त आयोगाने निर्धारित केलेला निधी राज्यांना वेळेवर देणे हे केंद्र सरकारच्या हातात आहे. त्यामुळ्ये प्रादेशिक आर्थिक समतोल निर्माण करून राज्यांचा सर्वांगीण विकास करणे हि जबाबदारी राज्यांची आहेच त्याबरोबर केंद्र सरकारची सुद्धा आहे.

२) संशोधन अभ्यासाची उद्दिष्टे: संशोधन अभ्यासाची पुढील उद्दिष्टे निश्चित केली आहेत.

१) १५ व्या वित्त आयोगाच्या निधी वाटपाच्या निकषांचा अभ्यास करणे.

२) १५ व्या वित्त आयोगानुसार केंद्राकडून राज्यांना मिळणारे अनुदान वाटप याचा अभ्यास करणे.

३) १५ व्या वित्त आयोगाच्या विविध शिफारशींचा अभ्यास करणे.

४) निष्कर्ष आणि आढावा घेणे.

१) निधी वाटपासाठी निकष: केंद्राकडून राज्यांना मिळणारा कर उत्पन्नातील हिस्सा व दिली जाणारी विविध अनुदाने यासाठी वित्त आयोगांनी पुढीलप्रमाणे निकष निश्चित केले आहेत. खालील तक्ता क्र.१ मध्ये केंद्रीय करांमधील प्रत्येक राज्याचा वाटा निश्चित करण्यासाठी आयोगाने वापरलेले निकष आणि भार दिलेला आहे. 2021-26 कालावधीसाठी केंद्रीय करांचे राज्यांमध्ये वितरणाचे निकष 2020-21 प्रमाणेच आहेत.

तक्ता क्र.१ निधी वाटपाचा निकष (टक्केवारी मध्ये)

निकष	१४वा वित्त आयोग (२०१५ – २०२०)	१५वा वित्त आयोग (२०२० – २०२१)	१५वा वित्त आयोग (२०२१ – २०२६)
उत्पन्नातील फरक	५०.०	४५.०	४५.०
क्षेत्र किंवा विभाग	१५.०	१५.०	१५.०
लोकसंख्या २०११	१०.०	१५.०	१५.०
लोकसंख्याशास्त्रीय प्रगती	----	१२.५	१२.५
वनाखालील क्षेत्र	७.५	----	----
वन आणि पर्यावरणशास्त्र	----	१०.०	१०.०
कर आणि राजकोषीय प्रयत्न	----	२.५	२.५
एकूण	१००	१००	१००

(संदर्भ – १५ वा वित्त आयोगाचा अहवाल)

१) उत्पन्नातील फरक: उत्पन्नातील फरक हे सर्वाधिक उत्पन्न असलेल्या राज्यापासून इतर राज्याच्या उत्पन्नातील फरक किती आहे त्याचे मापन केले जाते. २०१६-२०१७,२०१७-२०१८ आणि २०१८-२०१९ या तीन वर्षांच्या कालावधीत राज्याच्या उत्पन्नाची सरासरी दरडोई (Gross State Domestic Product) प्रमाणे गणना करण्यात आली आहे. कमी दरडोई उत्पन्न असलेल्या राज्यांना राज्यांमध्ये समानता राखण्यासाठी जास्त वाटा दिला जाईल.

२) लोकसंख्याशास्त्रीय कामगिरी: आयोगाच्या संदर्भ अटींनुसार शिफारशी करताना २०११ चा लोकसंख्याविषयी माहिती वापरणे आवश्यक होते. त्यानुसार आयोगाने २०११ च्या लोकसंख्येची आकडेवारी आपल्या शिफारशींसाठी वापरली. लोकसंख्येच्या कामगिरीचा निकष राज्यांनी त्यांच्या लोकसंख्येवर नियंत्रण ठेवण्याच्या प्रयत्नांना पुरस्कृत करण्यासाठी वापरला आहे. या निकषावर कमी प्रजनन गुणोत्तर असलेल्या राज्यांना जास्त गुण दिले जातील.

३) वन आणि पर्यावरणशास्त्र: सर्व राज्यांच्या एकूण घनदाट वनाखालील क्षेत्रापैकी प्रत्येक राज्याचा वनाखालील क्षेत्राचा हिस्सा मोजून हा निकष लावण्यात आला आहे. वनाखालील क्षेत्र आणि पर्यावरण संरक्षणास महत्व दिले.

४) कर आणि वित्तीय प्रयत्न: हा निकष उच्च कर संकलन कार्यक्षमतेसह राज्यांना पुरस्कृत करण्यासाठी वापरला गेला आहे. हे २०१६-२०१७,२०१७-२०१८ आणि २०१८-२०१९ या तीन वर्षांतील सरासरी दरडोई स्वतःचा कर महसूल आणि सरासरी दरडोई राज्य उत्पन्न यांचे गुणोत्तर म्हणून मोजले जाते.

२) केंद्राद्वारे वाटप केलेल्या करांमध्ये राज्यांचा वैयक्तिक हिस्सा: केंद्रसरकारद्वारे राज्यांना करातील उत्पन्नाचा हिस्सा पुढील प्रमाणे दिलेला आहे. १५ व्या वित्त आयोगानुसार(२०२१-२०२६) आंध्रप्रदेश ४.०४७, अरुणाचल प्रदेश-१.७५७, आसाम-३.१२८, बिहार- १०.०५८, छत्तीसगढ-३,४०७, गोवा- ०.३८६, गुजरात-३.४७८, हरयाणा-१.०९३, हिमाचल प्रदेश-०.८३०, जम्मू-काश्मीर- ०, झारखंड- ३.३०७, कर्नाटक- ३.६४७, केरल- १.९२५, म.प्रदेश-७.८५०, महाराष्ट्र- ६.३१७, मणिपूर- ०.७१६, मेघालय- ०.७६७, मिझोराम- ०.५००, ओडिशा ४.५२८,पंजाब-१.८०७, राजस्थान-६.०२६, सिक्कीम- ०.३८८, तामिळनाडू- ४.०७९, तेलंगणा-२.१०२, त्रिपुरा- ०.७०८, उत्तर प्रदेश- १७.९३९, उत्तराखंड- १.११८,पश्चिम बंगाल- ७.५२३. वरील आकडेवारीचा अभ्यास केला असता असे दिसून येते कि केंद्राकडून सर्वात जास्त कर वाटपातील हिस्सा उत्तरप्रदेश राज्याला १७.९३९, आणि बिहार साठी १०.०५८ एवढा सर्वात जास्त मिळाला आहे.

३) केंद्राकडून राज्यांना अनुदान वाटप:

१५ व्या वित्त आयोगाच्या अहवालानुसार २०२१-२०२६ या कालावधीत, केंद्राच्या संसाधनांमधून खालीलप्रमाणे सर्व राज्यांना अनुदान दिले जातील.

१) महसुली तूट अनुदान: महसुली तूट दूर करण्यासाठी १७ राज्यांना २.९ लाख कोटी रुपयांचे अनुदान मिळणार आहे.

२) क्षेत्र-विशिष्ट अनुदान: राज्यांना आठ क्षेत्रांसाठी १.३ लाख कोटी रुपयांचे क्षेत्र-विशिष्ट अनुदान दिले जाईल: (i) आरोग्य, (ii) शालेय शिक्षण, (iii) उच्च शिक्षण, (iv) कृषी सुधारणांची अंमलबजावणी, (v)) PMGSY रस्त्यांची देखभाल, (vi)
न्यायव्यवस्था, (vii) आकडेवारी आणि (viii) महत्त्वाकांक्षी जिल्हे आणि तालुके.

३) राज्य-विशिष्ट अनुदान: आयोगाने ४९,५९९ कोटी रुपयांच्या राज्य-विशिष्ट अनुदानाची शिफारस केली. हे खालील क्षेत्रांमध्ये दिले जाईल: (i) सामाजिक गरजा, (ii) प्रशासकीय प्रशासन आणि पायाभूत सुविधा, (iii) पाणी आणि स्वच्छता, (iv) संस्कृती आणि ऐतिहासिक वास्तूंचे जतन, (v) उच्च किमतीच्या भौतिक पायाभूत सुविधा आणि (vi) पर्यटन. आयोगाने राज्य-विशिष्ट आणि क्षेत्र-विशिष्ट अनुदानांच्या वापराचे पुनरावलोकन आणि निरीक्षण करण्यासाठी राज्य-स्तरावर उच्च-स्तरीय समितीची शिफारस केली आहे.

४) स्थानिक स्वराज्य संस्थांना अनुदान: स्थानिक स्वराज्य संस्थांना एकूण अनुदान ४.३६ लाख कोटी रुपये असेल (कामगिरीशी निगडीत अनुदान असेल) यासह: (i) ग्रामीण स्थानिक स्वराज्य संस्थांसाठी २.४ लाख कोटी रुपये, (ii) १.२ लाख कोटी रुपये शहरी स्थानिक संस्था, आणि (iii) स्थानिक स्वराज्य संस्थांमार्फत आरोग्य अनुदानासाठी रु. ७०,०५१ कोटी. स्थानिक स्वराज्य संस्थांना दिले जाणारे अनुदान गाव, गट आणि जिल्हा या पंचायतीच्या तिन्ही स्तरांना उपलब्ध करून दिले जाईल. आरोग्यविषयी अनुदान प्रामुख्याने प्राथमिक आरोग्य केंद्रासाठी दिले जाईल.

५) आपत्ती व्यवस्थापन: आयोगाने आपत्ती व्यवस्थापन निधीसाठी केंद्र आणि राज्यांमधील विद्यमान खर्च-वाटप पद्धती कायम ठेवण्याची शिफारस केली आहे. केंद्र आणि राज्यांमधील खर्च-वाटपाचा नमुना आहे: (i) उत्तर-पूर्व आणि हिमालयीन राज्यांसाठी ९०:१० आणि (ii) इतर सर्व राज्यांसाठी ७५:२५ असेल. राज्य आपत्ती व्यवस्थापन निधीमध्ये रु. १.६ लाख कोटी (केंद्राचा वाटा रु. १.२ लाख कोटी) असेल.

* केंद्राकडून १५ व्या वित्त आयोगानुसार राज्यनुसार अनुदान वाटप (२०२१-२०२६),सर्व आकडे कोटी रू. मध्ये आहेत.

तक्ता. क्र.२ (अ)

राज्ये	महसूल तूट अनुदान	स्थानिक स्वराज्य संस्थाना अनुदान			आपत्ती व्यवस्थापन
		आरोग्यविषयी अनुदान	ग्रामीण संस्था	शहरी संस्था	
आंध्र प्रदेश	३०४९७	२६०१	१०२३१	५२३१	६१८३
अरुणाचल प्रदेश	०	२५९	९००	४५९	१३८२
आसाम	१४१८४	१४८४	६२५३	३१९७	४२६८
बिहार	०	६०१७	१९५६१	९९९९	७८२४

छत्तीसगढ	०	१७९९	५६६९	२९००	२३८७
गोवा	०	१६७	२९३	१४९	६३
गुजरात	०	३३४१	१२४५५	६३६७	७३१६
हरयाणा	१३२	१६१७	४९२९	२५२०	२७१५
हिमाचल प्रदेश	३७१९९	५२१	१६७३	८५५	२२५८
झारखंड	०	२३७०	६५८५	३३६७	३१३८
कर्नाटक	१६३१	२९२९	१२५३९	६४०९	४३६९
केरळ	३७८१४	२९६८	६३४४	३२४२	१७३८
मध्य प्रदेश	०	४९०२	१५५२७	७९३८	१००५९
महाराष्ट्र	०	७०६७	२२७१३	११६११	१७८०३
मणिपूर	९७९६	२३४	६९०	३५३	२३४
मेघालय	३१३७	३११	७११	३६३	३६३
मिझोरम	६५४४	१६६	३६२	१८५	२५९
नागालंड	२१२४९	३०३	४८६	२४९	२२८
ओडिशा	०	२४५४	८८००	४४९८	८८६५
पंजाब	२५९६८	२१३१	५४१०	२७६७	२७३६
राजस्थान	१४७४०	४४२३	१५०५३	७६९६	८१८६
सिक्कीम	१२६७	१११	१६५	८४	२७९
तमिळनाडू	२२०४	४२८०	१४०५९	७१८७	५६३७
तेलंगणा	०	२२२८	७२०१	३६८२	२४८३
त्रिपुरा	१९८९०	४५३	७४६	३८१	३७८
उत्तरप्रदेश	०	९७१६	३८०१२	१९४३२	१०६८५
उत्तराखंड	२८१४७	७९७	२२३९	११४५	५१७८
पश्चिम बंगाल	४०११५	४४०२	१७१९९	८७९२	५५८७
एकूण	२९४५१४	७००५१	२३६८०५	१२१०५५	१२२६०१

तक्ता. क्र.२ (ब)

राज्ये		क्षेत्रनुसार विशेष अनुदान					राज्य –विशेष अनुदान
	आरोग्य	PMGSY रस्ते	संख्याशास्त्रीय	न्यायव्यवस्था	उच्च शिक्षण	कृषी	
आंध्र प्रदेश	८७७	३४४	१९	२९५	२५०	४२०९	२३००
अरुणाचल प्रदेश	१३३	१५०८	४९	२०	४८	१०७	४००
आसाम	२१६१	३१०३	५७	६१०	१७१	७४८	१३७५

बिहार	३२२३	१६९४	७७	९६०	४८३	१७२०	२२६७
छत्तीसगढ	५८८	९११	५४	२००	१४६	९१७	१६६०
गोवा	५६	०	५	१५	५०	६३	७००
गुजरात	१०७०	३३०	५१	३१०	२९८	२८१८	२८६०
हरयाणा	६९५	१२८	४०	३००	१४६	१६९६	२००३
हिमाचल प्रदेश	३७७	२२२२	२१	५०	७०	२४७	१४२०
झारखंड	१०१४	९६६	४८	२७५	१७९	६७७	१३००
कर्नाटक	१२३३	३९८	४५	२९५	२९९	२२९०	६०००
केरळ	६०७	११३	२०	४०५	१८१	१०८६	११००
मध्य प्रदेश	२३४०	२१०९	१०२	६९०	३४९	४५८७	१७६५
महाराष्ट्र	२७१०	६१३	६३	१२४०	५२०	३२८५	२७५०
मणिपूर	१९१	११९३	२८	३०	५४	१०१	९००
मेघालय	१८७	५४४	२३	३०	५४	८६	८००
मिझोरम	११५	५४६	१४	१५	४८	८६	७००
नागालंड	१५३	३७२	२३	१०	५१	१२४	५२५
ओडिशा	९६२	१९४९	४५	४२५	२१८	१२७१	१७७५
पंजाब	९०२	२३०	४३	१४५	१५६	१९६६	१५४५
राजस्थान	११८६	१६१८	५७	४६०	३३२	३३०१	२३२२
सिक्कीम	१००	४८४	७	५	४५	४१	५००
तमिळनाडू	१००२	५०६	४७	२५०	३४७	२६३२	२२००
तेलंगणा	६२४	२५५	४६	२४५	१८९	१६६५	२३६२
त्रिपुरा	२६५	५०२	१७	८५	५५	२२८	८७५
उत्तरप्रदेश	६१५०	१४६५	११४	१८२५	८९३	५३३४	३४९५
उत्तराखंड	७२८	२३२२	२५	७०	८३	२७७	१६००
पश्चिम बंगाल	२१०६	१११४	३५	११६५	४२८	३४३८	२१००
एकूण	३१७५५	२७५३९	११७५	१०४२५	६१४३	४५०००	४९५९९

(संदर्भ – १५ वा वित्त आयोगाचा अहवाल)

४) १५ व्या वित्त आयोगाच्या शिफारशी :

१५ व्या वित्त आयोगाने पुढीलप्रमाणे काही शिफारशी सुचविल्या आहेत

१) वित्तीय तूट आणि कर्ज पातळी: आयोगाने सुचवले की केंद्राने 2025-26 पर्यंत वित्तीय तूट GDP च्या 4% पर्यंत खाली आणावी. राज्यांनी वित्तीय तूट मर्यादा 2021-22 मध्ये 4%, 2022-23 मध्ये 3.5% आणि 2023-26 दरम्यान 3% पर्यंत आणावी. पहिल्या चार वर्षांत (2021-25) राज्यांना जीएसडीपीच्या 0.5% किमतीचे अतिरिक्त वार्षिक कर्ज घेण्यास परवानगी दिली जाईल. आयोगाने निरीक्षण केले की केंद्र आणि राज्यांसाठी वित्तीय तुटीसाठी शिफारस केलेल्या मार्गामुळे एकूण दायित्वे कमी होतील (i) वित्तीय जबाबदारी आणि बजेट व्यवस्थापन कायद्याचे (FRBM) पुनरावलोकन करावे.

२) महसूल जमा करणे: उत्पन्न आणि मालमत्तेवर आधारित कर आकारणी मजबूत केली पाहिजे. पगारदार मिळकतीवरील प्राप्तिकरावरील अत्याधिक अवलंबित्व कमी केले पाहिजे. संगणकीकृत मालमत्तेच्या नोंदी व्यवहारांच्या नोंदणीसह एकत्रित केल्या पाहिजेत आणि मालमत्तेचे बाजार मूल्य केले पाहिजे. राज्य सरकारांनी मालमत्तेच्या मूल्यांकनाची पद्धत सुव्यवस्थित करावी.

३) वस्तू व सेवा कर : वस्तू व सेवा करामधील शुल्क संरचना सोडवणे आवश्यक आहे. १२% आणि १८% दर विलीन करून दर रचना तर्कसंगत केली पाहिजे. राज्यांनी जीएसटीचा आधार वाढवण्यासाठी आणि अनुपालन सुनिश्चित करण्यासाठी क्षेत्रीय प्रयत्नांना गती देण्याची गरज आहे.

४) आर्थिक व्यवस्थापन पद्धती: सार्वजनिक आर्थिक व्यवस्थापनासाठी एक व्यापक संरचना विकसित केली पाहिजे. केंद्र तसेच राज्यांच्या नोंदींचे मूल्यमापन करण्याचे अधिकार असलेली स्वतंत्र वित्तीय परिषद स्थापन करावी. परिषदेची केवळ सल्लागार भूमिका असेल. केंद्र आणि राज्य या दोन्हींसाठी गुणवत्तेवर आधारित जमाखर्च लेखांकनाचा वापर केला पाहिजे. केंद्र आणि राज्यांनी कोणत्याही खर्चासाठी अर्थसंकल्पाबाहेर वित्तपुरवठा किंवा वित्तपुरवठा करण्याच्या इतर कोणत्याही गैर-पारदर्शक माध्यमांचा अवलंब करू नये. केंद्राच्या कायद्याशी, विशेषत कर्जाच्या व्याख्येसह सुसंगतता सुनिश्चित करण्यासाठी राज्यांनी त्यांच्या वित्तीय जबाबदारी कायद्यात सुधारणा केली पाहिजे. रिझर्व्ह बँक ऑफ इंडियाकडून राज्यांनी अल्प-मुदतीची कर्जे, योग्य गरजेनुसार घेतली पाहिजेत. राज्यांना कर्जाचे व्यवस्थापण करण्यासाठी त्यांनी स्वतंत्र कर्ज व्यवस्थापन कक्ष स्थापन केला पाहिजे.

५) आरोग्य: राज्यांनी 2022 पर्यंत आरोग्यावरील खर्च त्यांच्या बजेटच्या 8% पेक्षा जास्त वाढवला पाहिजे. प्राथमिक आरोग्य सेवा खर्च 2022 पर्यंत एकूण आरोग्य खर्चाच्या दोन-तृतियांश असावा.

६) संरक्षण आणि अंतर्गत सुरक्षेसाठी निधी: संरक्षण आणि अंतर्गत सुरक्षेसाठी आधुनिकीकरण निधी (MFDIS) प्रामुख्याने अर्थसंकल्पीय आवश्यकता आणि संरक्षण अंतर्गत सुरक्षेतील भांडवली खर्चासाठी दिला जाईल. पाच वर्षांमध्ये (२०२१-२०२६) निधी अंदाजे २.४ लाख कोटी रुपये असेल.

५) निष्कर्ष आणि आढावा:

१५ व्या वित्त आयोगाच्या अनुदाने आणि शिफारशी यांचा अभ्यास केल्यानंतर असे दिसून येते कि १) वित्त आयोगाने करांचे वितरण आणि अनुदान वाटप यासाठीचे जे निकष ठरवले आहेत ते बरोबर आहेत. प्रादेशिक समतोल निर्माण करण्याचा प्रयत्न केला आहे. २) लोकसंख्या नियंत्रण, वने आणि पर्यावरण संरक्षण हे महत्त्वाचे निकष घेतले आहेत. ३) केंद्राकडून सर्वात जास्त कर वाटपातील हिस्सा उत्तरप्रदेश राज्याला १७.९३९ टक्के आणि बिहार साठी १०.०५८ टक्के एवढा सर्वात जास्त मिळाला आहे. महाराष्ट्रासाठी तो ६.३१७ टक्के एवढा आहे. ४) महसुली तूट दूर करण्यासाठी १७ राज्यांना २.९ लाख कोटी रुपयांचे अनुदान मिळणार आहे. ५) राज्यांना आठ क्षेत्रांसाठी १.३ लाख कोटी रुपयांचे क्षेत्र-विशिष्ट अनुदान दिले जाईल उदा. शिक्षण, आरोग्य, कृषी,रस्ते, इत्यादीकरिता. ६) आयोगाने ४९,५९९ कोटी रुपयांच्या राज्य-विशिष्ट अनुदानाची शिफारस केली आहे. राज्यात पायभूत सुविधा निर्माण करणे. ७) स्थानिक स्वराज्य संस्थांना एकूण अनुदान ४.३६ लाख कोटी रुपये ग्रामीण स्वराज्य संस्थांसाठी २.४ लाख कोटी रुपये आणि १.२ लाख कोटी रुपये शहरी स्थानिक संस्थासाठी आणि स्थानिक स्वराज्य संस्थांमार्फत आरोग्य अनुदानासाठी रु. ७०,०५१ कोटी. ८) राज्य आपत्ती व्यवस्थापन निधी १.२ लाख कोटी असेल. ९) केंद्राने वित्तीय तूट GDP च्या 4% पर्यंत आणि राज्यांनी ३% पर्यंत खाली आणावी. १०) उत्पन्न आणि मालमत्तेवर आधारित कर आकारणी मजबूत केली पाहिजे. १०) वस्तू व सेवा करामधील शुल्क संरचना सोडवणे आवश्यक आहे. सुधारणा आवश्यक आहे. ११) केंद्र आणि राज्य या दोन्हींसाठी गुणवत्तेवर आधारित जमाखर्च

लेखांकनाचा वापर केला पाहिजे. १२) राज्यांनी 2022 पर्यंत आरोग्यावरील खर्च त्यांच्या बजेटच्या 8% पेक्षा जास्त वाढवला पाहिजे. अश्याप्रकारे १५ व्या वित्त आयोगाने खूप चांगल्या सूचना केल्या आहेत मात्र केंद्र सरकारची जबाबदारी आहे कि वेळेवर आणि योग्य निधी, अनुदानाचे वाटप राज्यांना झाले पाहिजे.

६) संदर्भ:

१) report of Fifteenth finance commission for 2021-2026.

२) report of Fifteenth finance commission for 2020-2021.

३) https://fincomindia.nic.in.

पंधरावा वित्त आयोग

प्रा. सुभाष रामचंद्र भोसले
(मराठी अर्थशास्त्र परिषद, आजीव सदस्य क्रमांक : १८४९)
अर्थशास्त्र विभाग,
आर. एन. सी. आर्ट्स, जे. डी. बी. कॉमर्स आणि एन. एस. सी. सायन्स कॉलेज, नाशिक रोड, नाशिक.
Email : subhashbhosale1982@gmail.com
Mobile No: 9850452991

प्रस्तावना

वित्त आयोग ही एक घटनात्मकदृष्ट्या अनिवार्य संस्था आहे. जी वित्तीय संघवादाच्या केंद्रस्थानी आहे. घटनेच्या कलम 280 अंतर्गतवित्त आयोगाची निर्मिती करण्यात आली आहे. वित्त आयोगाची मुख्य जबाबदारी केंद्र आणि राज्य सरकारांच्या वित्त स्थितीचे मूल्यांकन करणे, त्यांच्यामध्ये करांच्या वाटणीची शिफारस करणे, राज्यांमध्ये या करांचे वितरण निर्धारित करणारी तत्त्वे मांडणे हे आहे.सर्व स्तरावरील सरकारांशी व्यापक आणि गहन सल्लामसलत करून वित्तीय शिफारशी करणे.त्याच्या शिफारशी सार्वजनिक खर्चाची गुणवत्ता सुधारण्यासाठी आणि वित्तीय स्थिरतेला प्रोत्साहन देण्यासाठी देखील आवश्यक असतात.

मा. श्री. एन के सिंग यांच्या अध्यक्षतेखाली भारत सरकारने २७ नोव्हेंबर २०१७ रोजी नियोजन आयोग रद्द करण्याच्या पार्श्वभूमीवर (योजनेतर आणि योजनातर खर्चातील फरक) आणि वस्तू आणि सेवा कर (जीएसटी) लागू करण्याच्या पार्श्वभूमीवर १५ व्या वित्त आयोगाची नियुक्ती केली. आयोगाच्या शिफारशींमध्ये २०२०-२५ या पाच वर्षांच्या कालावधीचा समावेश असेल. आयोगाला सुरुवातीला ऑक्टोबर २०१९ पर्यंत अहवाल सादर करण्यास सांगितले होते.

सध्याच्या आयोगाच्या संदर्भ अटींमध्ये काही विशिष्ट वैशिष्ट्ये आहेत, ज्यात महत्त्वाच्या राष्ट्रीय प्रमुख कार्यक्रमांसाठी देखरेख करण्यायोग्य कामगिरीच्या निकषांची शिफारस करणे आणि भारताच्या संरक्षण गरजांसाठी कायमस्वरूपी व्यपगत न होणारा निधी उभारण्याची शक्यता तपासणे समाविष्ट आहे.जम्मू आणि काश्मीर राज्याची दोन केंद्रशासित प्रदेशांमध्ये पुनर्रचना - एक जम्मू आणि काश्मीर आणि एक लडाख - एक नवीन गतिशीलता सादर करते.एकंदरीत आपल्या संघराज्याच्या उत्क्रांतीच्या प्रक्रियेत वित्त आयोगासमोर नवीन आव्हाने आहेत.एक महत्त्वाची घटनात्मक संस्था म्हणून, आयोग विश्वासार्ह पद्धतीने सरकारच्या तिन्ही स्तरांमधील प्रतिस्पर्धी दावे आणि प्राधान्यक्रम संतुलित करण्यासाठी वचनबद्ध आहे.

आयोगाला खालील बाबींवर शिफारस करण्यास सांगितले आहे:

१. केंद्र आणि राज्य यांच्यातील कराच्या निव्वळ उत्पन्नाचे वितरणकिंवात्यांच्यामध्ये विभागले गेले आणि अशा उत्पन्नाच्या संबंधित भागाचे राज्य दरम्यान वाटप.
२. राज्यघटनेच्या अनुच्छेद २७५ नुसार, राज्यांना त्यांच्या महसुलाच्या सहाय्याने अनुदानाच्या मार्गाने अदा करावयाची रक्कमभारताच्या एकत्रित निधीतून दिली गेली पाहिजे.
३. वित्त आयोगाने केलेल्या शिफारशीच्या आधारे राज्यातील अंतर्गत आणि नगरपालिकांच्या संसाधनांना पूरक करण्यासाठी राज्याच्या एकत्रित निधीमध्ये वाढ करण्यासाठी आवश्यक असलेल्या उपाययोजना
४. जीएसटी अंतर्गत केलेल्या कराच्या विस्तारासाठी आणि त्यावर अवलंबून राज्याने केलेले प्रयत्न.
५. लोकसंख्या वाढीचा दर बदलण्याच्या दिशेने वाटचाल करण्यासाठी केलेले प्रयत्न आणि प्रगती.
६. भारत सरकारच्या प्रमुख योजनांच्या अंमलबजावणीतील यश,

15 व्या वित्त आयोगाचे महत्व:

१५ व्या वित्त आयोगाने वित्तीय परिस्थितीशी संबंधित सुधारणांवर प्रकाश टाकणारे अहवाल दिला आहे. १५ व्या वित्त आयोगाची स्थापना अशा काळात करण्यात आली आहे जेव्हा वित्तीय संघराज्यांतर्गत मोठ्या प्रमाणात सुधारणा केल्या गेल्या आहेत. जय मध्ये नियोजन आयोगाची जागा निती आयोगाने घेतली आहे.नियोजित आणि अनियोजित खर्च रद्द करून जीएसटी सुधारणांची अंमलबजावणी केली आहे. वित्तीय आयोग केंद्र आणि राज्यांमध्ये करांच्या निव्वळ उत्पन्नाच्या वितरणाबाबत शिफारसी करताना पुढील बाबी लक्षात घेतल्या आहे.

1. 41 टक्के वर अनुलंब विचलन राखणे:

• आयोगाने असे सुचवले आहे की 2020-21 च्या अहवालात सुचविलेल्या समान दराने अनुलंब देवाण-घेवाण कायम ठेवावी; विशेषत: कोविडच्या काळात, भविष्य सांगण्याची क्षमता राखण्यात आणि संसाधने स्थिर करण्यात मदत होईल.

2. **GST** वर:

• संघाच्या सकल कर महसुलात जी.एस.टी. चा वाटा 35 टक्के आहे.

• राज्यांच्या स्वतःच्या कर महसुलात जी.एस.टी.चा वाटा सुमारे 44 टक्के आहे.

3. एकूण कर महसुलावर:

• 2016-17 च्या आकडेवारीच्या तुलनेत GST उपकर संकलन वगळल्यानंतर सकल कर महसुलात 1.7 टक्के गुणांची घट झाली आहे. या घसरणीचा परिणाम राज्यांना कर वाटपावर दिसू शकतो.

• सकल कर महसूल मूल्यांकन 2021-26: ते 135.2 लाख कोटी अपेक्षित आहे, त्यापैकी विभाज्य पूल अंदाजे 103 लाख कोटी आहे.

4. क्षैतिज विकासावर: क्षैतिज उत्क्रांतीसाठी नियुक्त केलेले निकष आणि महत्व:

अ. क्र	निकष	महत्व:
१	लोकसंख्या	– १५%
२	क्षेत्रफळ	–१५ %
३	वन आणि पर्यावरण	–१० %
४	उत्पन्नतफावत	– ४५%
५	कर आणि वित्तीय प्रयत्न	–२.५ %
६	लोकसंख्याशास्त्रीय कामगिरी	१२.५%

5. वित्त आयोगाने क्षैतिज विकासामध्ये लोकसंख्याशास्त्रीय कामगिरीच्या निकषावर 12.5 टक्के महत्व दिले आहे. वित्त आयोगाने वित्तीय कामगिरीचे बक्षीस देण्यासाठी कर प्रयत्नांचे निकष देखील पुन्हा सादर केले आहेत.

6. महसूल तूट अनुदान (**RDG**):

• वित्त आयोगाने सतरा राज्यांसाठी चालू कालावधीत सुमारे २९,४५४कोटी रुपयांच्या एकूण महसुली तूट अनुदानाची शिफारस केली आहे.

7. स्थानिक सरकारांवर:

रु. 4,36,361 कोटी हे 2021-26 या कालावधीसाठी स्थानिक सरकारांना दिलेले एकूण अनुदान आहे. एकूण अनुदानापैकी; 450 कोटी रुपये सामायिक नगरपालिका सेवांसाठी समर्पित आहेत.

8. आरोग्यावर:

• आयोगाने 2022 पर्यंत आरोग्यावरील राज्याचा खर्च 8 टक्क्यांनी वाढवण्याची सूचना केली आहे.

• १५ व्या वित्त आयोगाने 2021-26 या पुरस्कार कालावधीसाठी आरोग्य क्षेत्राला एकूण रु. 106606 कोटी सहाय्य अनुदानाची शिफारस केली आहे. जी शिफारस केलेल्या एकूण अनुदानाच्या 10.3 टक्के आहे.

• 15 वित्त आयोगाने शहरी आरोग्य आणि कल्याण केंद्रांसाठी 70,051 कोटी रुपयांच्या अनुदानाची शिफारस केली आहे.ब्लॉक स्तरीय सार्वजनिक आरोग्य युनिट, प्राथमिक आरोग्य सेवा उपक्रमांसाठी आणि ग्रामीण उपकेंद्र आदि उपक्रमासाठी हे अनुदान स्थानिक सरकारला देण्यात येणार आहे

• आयोगाने UPSC नागरी सेवांच्या धर्तीवर अखिल भारतीय आरोग्य सेवा/अखिल भारतीय वैद्यकीय सेवांच्या निर्मितीला प्राधान्य देण्याची सूचना केली.

• नॅशनल मेडिकल कौन्सिलने एमबीबीएस डॉक्टरांसाठी वेलनेस क्लिनिक, बेसिक सर्जिकल प्रक्रिया, भूल, प्रसूती आणि स्त्रीरोग, नेत्र, ईएनटी इत्यादींवर छोटे अभ्यासक्रम विकसित करण्याची सूचना केली आहे.

• आयुषला वैद्यकीय पदवीधरांसाठी एक निवडक विषय म्हणून प्रोत्साहित केले जाईल.

• अलाईड आणि हेल्थकेअर प्रोफेशन्स विधेयक लवकरात लवकर मंजूर केले जावे.

9. उच्च शिक्षण:

• १५ व्या वित्त आयोगाने उच्च शिक्षणाच्या संदर्भात अनुदानाच्या दोन उपप्रकारांची शिफारस केली आहे:

• ऑनलाइन शिक्षणाचा प्रचार – रु. ऑनलाइन शिक्षणाच्या प्रचारासाठी एकूण 5,078 कोटी अनुदान आहे.

• प्रादेशिक भाषांमधील व्यावसायिक अभ्यासक्रमांचा विकास: आयोगाची शिफारस नवीन शैक्षणिक धोरण 2020 च्या अनुषंगाने आहे. रु. 2021-26 पासून या अभ्यासक्रमांच्या विकासासाठी 1,065 कोटींची तरतूद करण्यात आली आहे.

• प्रत्येक राज्यातील दोन महाविद्यालयांनी त्यांचे शिक्षण साहित्य आणि अध्यापनशास्त्र मान्यताप्राप्त प्रादेशिक भाषेत रूपांतरित करावे.

10. संरक्षण:

• जागतिक संदर्भात राष्ट्रीय संरक्षणासाठी सध्याच्या धोरणाची आवश्यकता लक्षात घेऊन15 व्या वित्त आयोगाने आपल्या दृष्टिकोनानुसार, एकूण महसूल प्राप्तीमध्ये केंद्र आणि राज्याचा सापेक्ष वाटा पुन्हा मोजला आहे.हे 15 वित्त आयोगाने प्रस्तावित केलेल्या विशेष निधी यंत्रणेसाठी संसाधने बाजूला ठेवण्यास केंद्राला सक्षम करेल.

• भारताच्या सार्वजनिक लेखा अंतर्गत संरक्षण आणि अंतर्गत सुरक्षा क्षेत्रासाठी नॉन-लॅप्सबल पूल तयार करण्याची शिफारस. (केंद्र सरकारच्या निधीबद्दल लिंक दिलेल्या लेखात वाचा.)

11. आपत्ती जोखीम व्यवस्थापन:

• पंधराव्या वित्त आयोगाने राज्य आपत्ती जोखीम निधी (SDRF) मध्ये राज्यांचे योगदान 25 टक्के ठेवण्याची शिफारस पूर्वोत्तर राज्ये वगळता (10 टक्के.) 13 व्या वित्त आयोगाने समान व्यवस्थेची शिफारस केल्यापासून त्यात कोणताही बदल झालेला नाही.

• केंद्र आणि राज्य स्तरावर शमन निधीची निर्मिती.

भारतातील संघराज्याच्या वित्तीय समस्या

१. राज्य सरकारच्या गरजा आणि संसाधनांमधील अंतर:

केंद्र आणि राज्यांमध्ये आर्थिक शक्तीचे विभाजन करण्याची तरतूद संविधानात आहे. तथापि, राज्यानी लावायच्या करांच्या स्वरूपामुळे राज्याचीमहसूल निर्मिती क्षमता ही मर्यादित आहे.कृषी उत्पन्नावर कर, मोटार वाहनावरील कर,मादक पदार्थावरील उत्पादन शुल्क, करमणूक करइत्यानदी कर हे केंद्रानीलावलेल्या करांपेक्षा तुलनेने कमी लवचिक आहेत. विक्री कर हा राज्याचा एकमेव कर आहे ज्यात भरीव लवचिकता होती.गेल्या तीन दशकांत देशाने नोंदवलेल्या आर्थिक प्रगतीमुळे, आयकर, केंद्रीय उत्पादन शुल्क, सीमाशुल्क आणि इतर महत्त्वाच्या केंद्रीय करांचा पाया बराच विस्तारला आहे.यामुळे केंद्र सरकारला वेळोवेळी संसाधने वाढवण्याची प्रचंड शक्ती मिळाली आहे. केंद्र आणि राज्य सरकारांमधील आर्थिक संबंधांची रचनाही राज्यासाठी महसुलाचे कमी लवचिक स्त्रोत आणि केंद्रासाठी महसूलाचे अधिक लवचिक स्त्रोतहे राज्यांना प्रतिकूल परिस्थितीठेवते.विकास सेवांच्या दबावामुळे, विशेषतः समाजकल्याण क्षेत्रात राज्यांच्या संसाधनांची मागणी झपाट्याने वाढत असताना, त्यांचे उत्पन्न त्या प्रमाणात वाढू शकले नाही.त्यानुसार उभ्या असमतोलात गेल्या काही वर्षांत भर पडली आहे आणि राज्य सरकारांचे केंद्रावरील अवलंबित्व मोठ्या प्रमाणात वाढले आहे.

२. राज्यांच्या स्वायत्ततेचे समीकरण:

अर्थव्यवस्थेत कार्यरत असलेल्या फुटीरतावादी शक्तींना आळा घालण्यासाठी ही मजबूत केंद्र आणि कमकुवत राज्य व्यवस्था राज्यघटनेच्या रचनाकारांनी जाणूनबुजून आणली होती.भारतीय राज्यघटनेची रचना संघराज्यापेक्षा अधिक एकात्मक आहे.सर्व अवशेष अधिकार केंद्राकडे देऊन आणि समवर्ती सूचीमध्ये 47 बाबी ठेवून केंद्रीय नियंत्रणाचा पाया मजबूत केलेला दिसून येतो. केंद्र सरकारला राज्यांच्या कारभारात हस्तक्षेप करण्याचे व्यावहारिकपणे अमर्याद अधिकार दिले.

३. वित्त आयोगाचे महत्त्व कमी करा:

केंद्र राज्याला विवेकाधीन अनुदानाच्या स्वरूपात मोठ्या प्रमाणात संसाधनांचे योगदान देते, या मुळे केंद्राला राज्य स्तरावरील निर्णय प्रक्रियेवर परिणाम करण्यासाठी लक्षणीय शक्ती प्राप्त होते. त्यामुळे राज्यांच्या स्वायत्ततेला आणखी खीळ बसते.

४. प्रादेशिक असमतोलाची समस्या समाधानकारक प्रमाणात हाताळण्यात अपयश:

नियोजन आयोग आणि वित्त आयोगामार्फत संसाधने हस्तांतरित करण्याची प्रक्रिया संघराज्य घटकांमधील क्षैतिज असमतोल दुरुस्त करण्यात अयशस्वी ठरली आहे आणि त्यांच्या दरडोई उत्पन्नातील असमानता वाढत आहे.**नियोजित मदतीचे**गुणोत्तर निश्चित केले आहे. ज्यामुळेविकसित आणि मागास राज्यांमध्ये भेदभाव केला जात नाही. हे मागासलेल्या राज्याविरुद्ध भेदभाव करण्यासारखे आहे.

भारतातील संघराज्याच्या वित्तीय समस्यासुधारणेसाठी सूचना

१. वित्त आयोग ही वैधानिक संस्था असल्याने त्याची व्याप्ती बरीच वाढवली पाहिजे.
२. काही राज्यांनी 5 वर्षातून एकदा वित्त आयोगाची स्थापना कारण्या एवजी कायमस्वरूपी वित्त आयोग स्थापन करण्याची मागणी केली आहे.
३. राज्याच्या मागासलेपानाचे निकष स्वीकारून आंतरराज्यीय विषमता कमी करण्यासाठी पुरेसे पाऊल उचलले जावे.

सारांश

2011 च्या लोकसंख्येला कमी महत्व देणे. लोकसंख्या नियंत्रण सुधारणांमध्ये चांगली कामगिरी करणाऱ्या राज्यांना प्रोत्साहन देणे. क्षैतिज सूत्र निश्चित करण्यासाठी वित्त आयोगाने विविध मापदंडाला महत्व देणे बाकी असल्याने दक्षिणेकडील राज्यांच्या समभागांबाबत निष्कर्षापर्यंत पोहोचणे घाईचे

होईल.ऑस्ट्रेलिया आणि कॅनडा प्रमाणेच समानीकरणाचा दृष्टिकोन आहे. ज्यामध्ये प्रत्येक राज्यामध्ये तुलनात्मक स्तरावर सेवा प्रदान केल्या जातील याची खात्री करण्यासाठी आर्थिक संसाधनांचे वाटप केले जाते बशर्ते राज्यांनी महसूल वाढवण्यासाठी तुलनात्मक प्रयत्न केले पाहिजे.भारताच्या बाबतीत, वित्त आयोगाचा दृष्टिकोनखर्च आणि महसुलामधील अंतर भरण्याच्या ऐतिहासिक कलावर अवलंबून असलेला दृष्टिकोन आहे.

संदर्भ सूची

1. Pandey, J.N. (2010). The constitutional law of India, (47th Ed.).
2. Puri, V.K. (2021). Indian Economy, (39th Ed.).
3. Manish Gupta & Pinaki Chakraborty (2019) State Finance Commissions: How successful have they been in Empowering Local Governments.
4. https://www.thehindu.com/news/national/the-hindu-explains-why-the-15th-finance-commission-has-some-states-riled/article23384141.ece
5. https://fincomindia.nic.in/ShowContent.aspx?uid1=3&uid2=0&uid3=0&uid4=0

१५ वा वित्त आयोगआणि स्थानिक स्वराज्य संस्थांना निधी वाटपाच्या निकषांची मिमांसा

माधव शिंदे*
*सहयोगी प्राध्यापक,
अर्थशास्त्र विभाग, अहमदनगर महाविद्यालय, अहमदनगर. आजीव सभासद क्र. १४३२.

गोषवारा
भारतामध्ये त्रिस्तरीय शासनव्यवस्था आहे. यामध्ये राष्ट्रीय स्तरावर केंद्र, राज्य स्तरावर राज्य तर स्थानिक स्तरावर स्थानिक स्वराज्य संस्था कार्यरत आहेत. यापैकी वित्तीयदृष्टया केंद्र सरकार प्रबळ राहिलेले आहे. केंद्र सरकारकडे जमा होणाऱ्या कर महसुलाचे प्रमाण मोठे असल्याने वित्तीयदृष्टया ते प्रबळ आहे.असे असले तरी, केंद्र सरकारकडे जमा होणाऱ्या कर महसुलाचे केंद्र –राज्ये आणि केंद्र – स्थानिक स्वराज्य संस्था असे वितरण केले जाते. संविधानातील ७३ व्या आणि ७४ व्या घटना दुरुस्तीनंतर स्थानिक स्वराज्य संस्थांचे आर्थिक विकासातील वाढते महत्व लक्षात घेऊन महत्वपूर्ण वाटा स्थानिक स्वराज्य संस्थाना वितरीत केला जातो. केंद्र सरकारकडे जमा होणाऱ्या कर महसुलाचे अशा प्रकारचे वितरण करण्यासाठी दर पाच वर्षांनी वित्त आयोगाची स्थापना केली जाते. संविधानातील कलम २८० नुसार वित्त आयोगाची स्थापना करणे आणि त्यांनी केलेल्या शिफारशीनुसार कर महसुलाचे वाटप करणे केंद्र सरकारसाठी बंधन कारक असते. आजपर्यंत देशात १५ वित्त आयोगाची स्थापना झालेली असून त्यांनी केलेल्या शिफारशींनुसार केंद्र सरकारने महसुलाचे वाटप केल्याचे दिसून येते. १९५१ साली देशातील पहिल्या वित्त आयोगाची स्थापना करण्यात आली होती. तेव्हापासून आजपर्यंत १५ वित्त आयोगांनी आपले कार्य पूर्ण केलेले आहे. २७ नोव्हेंबर २०१७ साली देशातील १५ व्या वित्त आयोगाची स्थापना करण्यात आली होती. या वित्त आयोगाने केलेल्या शिफारशींच्या आधारे २०२०-२१ ते २०२५-२६ या पाच वर्षांमध्ये केंद्र सरकारच्या कर महसुलाचे वाटप केले जाईल.या वित्त आयोगाने स्थानिक स्वराज्य संस्थांना वित्तीयदृष्टया अधिक बळकटी देण्यासाठी मोठ्या निधीची तरतूद केली आहे. २०२१-२२ ते २०२५-२६ या काळासाठी देशातील सर्व स्थानिक स्वराज्य संस्थांसाठी एकूण ४३६३६१ को.रु. वितरीत करण्याचे उद्दिष्ट ठेवण्यात आले आहे. यापैकी जवळपास ६६ टक्के एवढा निधी ग्रामीण स्थानिक स्वराज्य संस्थांसाठी तर ३३ टक्के निधीची तरतूद नागरी स्थानिक स्वराज्य स्वराज्य संस्थांसाठी केली आहे

प्रस्तावना:

आर्थिक विकासाच्या प्रक्रियेत शासन व्यवस्थांची भूमिका केंद्रिय आहे. आर्थिक विकासाची धोरणे बनविणे त्यांची अंमलबजावणी करणे व त्यासाठी लागणाऱ्या संसाधनांची जुळवाजुळव करुन त्यांचे योग्य वितरण करणे हे शासनव्यवस्थेचे मुलभूत कार्य होय. शासनव्यवस्थेचे हे कार्य वेगवेगळ्या स्तरावर अविरत सुरु असते. भारतामध्ये त्रिस्तरीय शासनव्यवस्था आहे. यामध्ये राष्ट्रीय स्तरावर केंद्र, राज्य स्तरावर राज्य तर स्थानिक स्तरावर स्थानिक स्वराज्य संस्था कार्यरत आहेत. यापैकी वित्तीयदृष्टया केंद्र सरकार प्रबळ राहिलेले आहे. केंद्र सरकारकडे जमा होणाऱ्या कर महसुलाचे प्रमाण मोठे असल्याने वित्तीयदृष्टया ते प्रबळ आहे.असे असले तरी, केंद्र सरकारकडे जमा होणाऱ्या कर महसुलाचे केंद्र –राज्ये आणि केंद्र – स्थानिक स्वराज्य संस्था असे वितरण केले जाते. संविधानातील ७३ व्या आणि ७४ व्या घटना दुरुस्तीनंतर स्थानिक स्वराज्य संस्थांचे आर्थिक विकासातील वाढते महत्व लक्षात घेऊन महत्वपूर्ण वाटा स्थानिक स्वराज्य संस्थाना

वितरीत केला जातो.केंद्र सरकारकडे जमा होणाऱ्या कर महसुलाचे अशा प्रकारचे वितरण करण्यासाठी दर पाच वर्षांनी वित्त आयोगाची स्थापना केली जाते. संविधानातील कलम २८० नुसार वित्त आयोगाची स्थापना करणे आणि त्यांनी केलेल्या शिफारशीनुसार कर महसुलाचे वाटप करणे केंद्र सरकारसाठी बंधन कारक असते. आजपर्यंत देशात १५ वित्त आयोगाची स्थापना झालेली असून त्यांनी केलेल्या शिफारशींनुसार केंद्र सरकारने महसुलाचे वाटप केल्याचे दिसून येते. १९५१ साली देशातील पहिल्या वित्त आयोगाची स्थापना करण्यात आली होती. तेव्हापासून आजपर्यंत १५ वित्त आयोगांनी आपले कार्य पूर्ण केलेले आहे. २७ नोव्हेंबर २०१७ साली देशातील १५ व्या वित्त आयोगाची स्थापना करण्यात आली होती. या वित्त आयोगाने केलेल्या शिफारशींच्या आधारे २०२०-२१ ते २०२५-२६ या पाच वर्षांमध्ये केंद्र सरकारच्या कर महसुलाचे वाटप केले जाईल.

भारतामध्ये आर्थिकदृष्ट्या केंद्र सरकार प्रबळ मानले जाते. याचे कारण म्हणजे देशातील एकूण महसूल संसाधनांपैकी तब्बल ६२.७ टक्के संसाधने केंद्र सरकारकडे आहेत. तर खर्चाच्या बाबतीत राज्ये मोठी जबाबदारी पार पाडताना दिसतात. देशातील एकूण सार्वजनिक खर्चामध्ये राज्यांचा वाटा ६२.४ टक्के इतका आहे. आंतरराष्ट्रीय पातळीवर विविध देशांतील केंद्र – राज्य वित्तीय तफावतीची तुलना केली जाते. जागतिक पातळीवरील केंद्र-राज्य वित्तीय तफावतीचे सरासरी प्रमाण ४३ टक्के आहे. मात्र भारतामध्ये ते ५८.१ टक्के इतके असून जागतिक सरासरीपेक्षा महत्वपुर्णरीत्या अधिक राहिले आहे. थोडक्यात, वित्तीय संसाधनांबाबत केंद्र सरकार प्रबळ असतानाही राज्यांना खर्चाचा मोठा भार उचलावा लागतो हे खरे. राज्यांचा हा खर्चाचा भार कमी करण्यासाठी वित्त आयोगाच्या माध्यमातून केंद्र सरकारकडील महसुलाचे राज्यांना वाटप केले जाते. तर त्रिस्तरीय शासन व्यवस्थेतील तिस-या स्तरातील स्थानिक स्वराज्य संस्थांचे स्वत:चे महसूली स्त्रोत अत्यंत मर्यादीत असल्याने त्यांना निधीसाठी राज्य आणि केंद्राकडील वित्तीय मदतीवर मोठ्या प्रमाणात अवलंबून रहावे लागत असल्याने वित्त आयोगाद्वारे त्यांनाही निधीचे वितरण केले जाते.

देशातील बदलत्या आर्थिक स्थितीचा आणि धोरणांचा प्रभाव वित्त आयोगाच्या कार्यपद्धतीवर होताना दिसतो. १५ व्या वित्त आयोगाची स्थापनादेखील महत्वपूर्ण आर्थिक बदलांच्या पार्श्वभूमीवर करण्यात आली. देशातील योजना आयोग बरखास्ती, अर्थसंकल्पातील योजना आणि योजनाबाह्यखर्चाचे वर्गीकरण आणि स्वतंत्र सादर केला जाणारा रेल्वे अर्थसंकल्प रद्द करण्यात आले आहेत. याबरोबरच, २०१७ पासून देशात वस्तू व सेवा कराची अंमलबजावणी सुरु करण्यात आली आहे. या महत्वपूर्णआर्थिक बदलांच्या पार्श्वभूमीवरकेंद्र – राज्य वित्तीय वितरणामध्ये १५ व्या वित्त आयोगाचीभूमिका महत्वपूर्ण राहिलेली आहे.

१५ व्या वित्त आयोगासमोर केंद्रीय कर महसुलाचे केंद्र आणि राज्य यांच्यात वाटप करताना राज्यांचा सामाजिक-आर्थिक विकास, मत्ता संवर्धन खर्च, समतोल प्रादेशिक विकास, यासारख्या बाबींवरील खर्चासाठी राज्यांकडून निधीसाठी होणा-या मागणीबरोबरच राज्यांवरील कर्जाचा परिणाम व राज्यांच्या सार्वजनिक सेवांची देयता याचा विचार करण्यात आला आहे. याव्यतिरिक्त, २०१७ साली सुरु झालेल्या वस्तू व सेवा कराचा (Goods&ServicesTax) परिणाम आणि त्यामुळे राज्यांच्या महसुली नुकसानीची भरपाई, वेगवेगळ्या अधिभारांची संख्या कमी केल्याने होणारे नुकसान, संरचनात्मक सुधारणा, तसेच केंद्र आणि राज्यांची वित्तीय स्थिती यासारख्या समग्र बाबींचा आढावा १५ व्या वित्त आयोगाने घेतलेला दिसून येतो.

स्थानिक स्वराज्य संस्थांसाठी वित्तीय अनुदाने:

शासन यंत्रणेतील तिसरा आणि तितकाच महत्वाचा असलेला स्तर म्हणजे स्थानिक स्वराज्य संस्था होय. सत्तेच्या विकेंद्रीकरणाच्या प्रक्रियेत या संस्थांची मुलभूत भूमिका राहते. जागतिक पातळीवर विकसनशील देशांच्या तुलनेत विकसीत देशांमध्ये सत्तेचे विकेंद्रीकरण मोठ्या प्रमाणात झालेले असून स्थानिक स्वराज्य

संस्थांना अधिक बळ आणि स्वायत्तता दिली गेल्याने त्या देशांत विकासाची गती वाढल्याचे अनेक अभ्यासांमधून निष्पन्न झाले आहे. तिसऱ्या स्तरातील संस्थांना बळकटी देण्याच्या उद्देशाने भारतातही प्रयत्न केले जातात. मात्र विकेंद्रीकरणाचे प्रमाण अजूनही अपेक्षेपेक्षा अत्यंत कमी असल्याचे दिसून येते. त्यादृष्टीने वित्त आयोगाची भूमिका महत्वाची राहिलेली आहे.१५ व्या वित्त आयोगाने स्थानिक स्वराज्य संस्थांना वित्तीयदृष्टया अधिक बळकटी देण्यासाठी मोठ्या निधीची तरतूद केली आहे. २०२१-२२ ते २०२५-२६ या काळासाठी देशातील सर्व स्थानिक स्वराज्य संस्थांसाठी एकूण ४३६३६१ को.रु. वितरीत करण्याचे उद्दिष्ट ठेवण्यात आले आहे. यापैकी जवळपास ६६ टक्के एवढा निधी ग्रामीण स्थानिक स्वराज्य संस्थांसाठी तर३३ टक्के निधीची तरतूद नागरी स्थानिक स्वराज्य स्वराज्य संस्थांसाठी केली आहे (तक्ता क्र. ०१). तरतूद केलेला हा निधी पाच वर्षात टप्याटप्याने सर्व स्थानिक स्वराज्य संस्थांना वितरीत केला जाईल.

तक्ता क्र. ०१ स्थानिक स्वराज्य संस्थांसाठी अनुदाने (₹कोटी)

अ.क्र.	अनुदाने	२०२१-२२	२०२२-२३	२०२३-२४	२०२४-२५	२०२५-२६	एकूण
१	ग्रामीण	४४९०१	४६५१३	४७०१८	४९८००	४८५७३	२३६८०५
२	नागरी	२२११४	२२९०८	२४२२२	२५६५३	२६१५८	१२१०५५
३	प्राथमिक आरोग्य क्षेत्र	१३१९२	१३१९२	१३८५१	१४५४४	१५२७२	७००५१
४	नव-विकसीत शहरांसाठी	--	२०००	२०००	२०००	२०००	८०००
५	नगरपालिका सेवांसाठी	९०	९०	९०	९०	९०	४५०
६	एकूण	८०२९७	८४७०३	८७१८१	९२०८७	९२०९३	४३६३६१

स्त्रोत: १५ वा वित्त आयोग अहवाल, भारत सरकार, नवी दिल्ली.

स्थानिक स्वराज्य संस्थांना निधी वाटपाचे निकष:

वित्तआयोगाने स्थानिक स्वराज्य संस्थासाठीतरतूद केलेलानिधी केंद्र सरकारकडून प्रत्यक्ष स्थानिक स्वराज्य संस्थांना हस्तांतरित केला जात असला तरी तो राज्यांच्या हस्तांतरणरकमेमध्ये समाविष्ट केला जातो. राज्यांमध्ये या निधीचे वितरण करण्यासाठी १५ व्या वित्त आयोगानेलोकसंख्या आणि क्षेत्रफळ यादोन निकषांचा आधार घेतला आहे. लोकसंख्येच्या आकारानुसार 90 टक्केतर क्षेत्रफळानुसार 10 टक्के निधी वितरित केला जाईल. तर वितरीत केलेल्या एकूण निधीतील 60 टक्के निधी हा राष्ट्रीयप्राथमिकतेच्या बाबी जसे, पिण्याचे पाणी, पाणी पुनर्भरण, साफसफाई व स्वच्छता यासाठी राखीव असेलतर 40 टक्के निधी मुलभूत सेवा पुरविण्यासाठी दिला जाईल.राज्यांमध्ये निधीच्या केल्या जाणाऱ्यावाटपावरून लोकसंख्या आणि क्षेत्रफळ अधिक असणाऱ्या राज्यांना व पर्यायानेराज्यांतील स्थानिक स्वराज्य संस्थांना अधिक निधी मिळेल हेस्पष्ट आहे.

असे असले तरी,स्थानिक स्वराज्य संस्थांना वित्त आयोगाकडून निधी प्राप्त करण्यासाठी पात्रता अट पूर्ण करावी लागणार आहे हे नक्की.ती पात्रता अट म्हणजेसर्वनागरी व ग्रामीण स्थानिक स्वराज्य संस्थांनी आपल्या खात्याचे लेखापरीक्षण करुन ते जनतेसाठीवेबसाइटवर खुले करणे होय. ज्या स्थानिक स्वराज्य संस्था यामध्ये अपयशीहोतील त्यांना निधी मिळणार नसल्याचे १५ व्या वित्त आयोगाने सूचित केले आहे. स्थानिक स्वराज्य संस्थांच्या कामकाजात पारदर्शकता आणण्याच्या उद्देशाने ही अट महत्वपूर्ण असली तरी, देशातील असंख्य ग्रामीण तसेच नागरी स्थानिक स्वराज्य संस्थांचे याबाबतीत असलेले मागासलेपण

पाहता,बहुतांश संस्था निधीपासून वंचित राहतील ही वस्तुस्थिती आहे.कारण केवळ ग्रामीणच नाही तर बहुतेक नागरी स्थानिक स्वराज्य संस्थांच्या खात्यांचे लेखापरीक्षण वेळेवर होत नसून स्वतंत्र वेबसाईट विकसीत नसल्याने ते जनतेसाठी ऑनलाईन खुले करणे कठीण ठरू शकते.

दुसरीकडे, स्थानिक स्वराज्य संस्थांना केले जाणारे निधीचे वाटप हे संबंधीत राज्यातील राज्य वित्तआयोगाने केलेल्या शिफारशींच्या आधारे केले जाते. संविधानातील 73 आणि 74 व्या घटनादुरुस्तीनंतर सर्वराज्यांमध्ये 1992 पासून राज्यपातळीवर दर पाच वर्षांनी राज्य वित्त आयोगाची स्थापना केली जाते.सद्यःस्थितीचा विचार करता,देशातील प्रत्येक राज्याने सातव्या वित्त आयोगाची स्थापना करणे अपेक्षितआहे. मात्र, आजघडीला देशातील एकाही राज्याने सातव्या वित्त आयोगाची स्थापना केलेली नाही. तसेच राज्य वित्त आयोगाच्या स्थापनेमध्ये देशातील राज्यांमध्ये एकसूत्रीपणा दिसून येत नाही. आसाम, बिहार, पंजाब,राजस्थान या राज्यांनी सहाव्या वित्त आयोगाची तर हरियाणा, हिमाचल प्रदेश, केरळ,मध्यप्रदेश, महाराष्ट्र, ओडिशा, सिक्कीम, तामिळनाडू, त्रिपुरा उत्तराखंड, उत्तरप्रदेश या राज्यांनी पाचव्यावित्त आयोगाची स्थापना केलेली आहे. आंध्रप्रदेश, कर्नाटक, पश्चिम बंगाल या राज्यांनी चौथ्या तरछत्तीसगड, गोवा, गुजरात, झारखंड, मणिपूर व अरुणाचालप्रदेश, मिझोराम यांनी अनुक्रमे दुसऱ्या व पहिल्या राज्य वित्त अयोगानंतर पुढील राज्य वित्त आयोगाची स्थापना केलेली नाही (तक्ता क्र. ०२). वास्तविकत: राज्य वित्त आयोगाने राज्यातील स्थानिक स्वराज्य संस्थांच्या राजकोषीय स्थितीचा बारकाईने आढावा घेऊन निधी वाटपाचे निकष निर्धारित करणे आवश्यक असते. राज्य वित्त आयोगाची स्थापना न केल्यामुळे संबंधीत राज्ये आणि स्थानिक स्वराज्य संस्थांना निधीचे अचूक वाटप करणे वित्त आयोगाला जिकीरीचे बनते. या बाबी विचारात घेऊन स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निधीसाठी या सर्व राज्यांनीमार्च २०२४ पर्यंत राज्य वित्त आयोगाच्या स्थापनेच्या औपचारिकता पूर्ण करण्याची अट १५ व्या वित्त आयोगाने घातली आहे.

तक्ता क्र. ०२ राज्य वित्त आयोगांची सद्यस्थिती

अ.क्र.	राज्ये	वित्त आयोग
१	आसाम, बिहार, पंजाब, राजस्थान	सहावा
२	हरियाणा, हिमाचल प्रदेश, केरळ, मध्यप्रदेश,महाराष्ट्र, ओडिशा, सिक्कीम, तामिळनाडू, त्रिपुरा	पाचवा
३	आंध्रप्रदेश, कर्नाटक, पश्चिम बंगाल	चौथा
४	छत्तीसगड, गोवा, गुजरात, झारखंड, मणिपूर	तिसरा
५	अरुणाचल प्रदेश, मिझोरम	दुसरा
६	जम्मू & कश्मीर, तेलंगना (नवीन राज्ये)	पहिला

स्त्रोत: १५ वा वित्त आयोग अहवाल, भारत सरकार, नवी दिल्ली.

देशाच्या आर्थिक विकासाचे व्यापक विकेंद्रीकरण करताना स्थानिक स्वराज्य संस्थांना वित्तीय बळकटी देण्यासाठी ७३ आणि ७४ व्या घटना दुरुस्त्या करण्यात आल्या. त्यादृष्टीने राज्य वित्त आयोगाची स्थापना व त्यांच्या शिफारशी आधारे निधीचे वाटप करण्याचे निश्चित करण्यात आले आहे. मात्र, गेल्या ३० वर्षांमध्ये देशातील स्थानिक स्वराज्य संस्थांच्या कार्यपद्धतीत ज्या सुधारणा होणे अपेक्षित होते त्या अजूनही झाल्या नसल्याचे १५ व्या वित्त आयोगाच्या निदर्शनास आले. या वित्त आयोगाच्या निदर्शनास आलेल्या बाबी पुढीलप्रमाणे आहेत.

१) देशातील केंद्र, राज्य आणि स्थानिक शासन पातळीवर आकडेवारी गोळा करुन ती अहवालाद्वारे प्रसिद्ध करण्यामध्ये एकसूत्रीपणाचा आभाव असून त्यासाठी कोणतेही सामान्य प्रमाणके केले नसल्याचे दिसून येते.

२) त्रिस्तरीय शासन व्यवस्थेतील पत्रे, परिपत्रके, अहवाल, नियतकालिके, यातील भाषा आणि संकल्पनांसाठी सामान्य शब्दकोष उपयोगात आणला जात नाही किंवा उपलब्ध नाही.

३) त्यामुळे अनेक संकल्पना आणि व्याख्यांचा अर्थ लावण्यामध्ये अडथळे निर्माण होतात. तर अनेकदा त्यांचे सोयीप्रमाणे अर्थ लावले जातात.

४) वित्तीय खात्यांचे सहा स्तरीय वर्गीकरण प्रमाणित नाही. तसेच केलेल्या वर्गवारीची देशातील स्थानिक स्वराज्य संस्थांमध्ये एकवाक्यता दिसून येत नाही.

५) कार्यक्रम आणि योजना यामध्ये फरक केला जात नाही. तसेच त्यांचे योग्य प्रमाणिकरण उपलब्ध नाही. दोन्ही संकल्पना सोयीनुसार अदलून-बदलून उपयोगात आणल्या जातात. त्यामुळे त्यासाठी येणारा निधी किती आणि कशा प्रकारे खर्च होतो याचे विश्लेषण करणे कठीण होते.

६) देशातील स्थानिक स्वराज्य संस्थांच्या खर्चातील जवळपास २५ टक्के खर्च हा “इतर खर्च” म्हणून नोंदवला जातो. इतर खर्चाची स्पष्ट व्याख्या नसल्याने एवढा मोठा निधी कोणत्या बाबींवर खर्च होतो हे लक्षात येत नाही.

७) केंद्र, राज्ये आणि स्थानिक स्वराज्य संस्थांच्या खर्चामध्ये आरोग्य किंवा शिक्षण किंवा वेतन किंवा यांवरील खर्चाचे तसेच कर महसूल निर्माण करण्याच्या स्त्रोतांचे एकात्मिक चित्र दिसून येत नाही.

८) आज जगामध्ये तंत्रज्ञानाने मोठी प्रगती साधलेली असताना भारतातील स्थानिक स्वराज्य संस्था यामध्ये पिछाडीवर असल्याचे निदर्शनास येते. कामकाजाचे संगणकीकरण म्हणजे केवळ कागदावरील मजकूर किंवा आकडे संगणकामध्ये भरण्याचे काम केले जात असल्याचे वित्त आयोगाने नमूद केले आहे. तसेच,केलेले वित्तीय व्यवहार, कोणासाठी, कोठे, केव्हा आणि किती प्रमाणात केले याची सविस्तर आणि एकसूत्री माहिती देशातील कोणत्याही राज्यातील स्थानिक स्वराज्य संस्थांच्या कामकाजात दिसून आली नसल्याचे वित्त आयोगाच्या निदर्शनास आले.

अशा प्रकारच्या तथ्यांमुळे देशातील केंद्र, राज्य आणि स्थानिक स्वराज्य संस्थांच्या कामकाजावर मोठा परिणाम होतो याबाबत दुमत नाही. विशेषतः महसुलासाठी केंद्र आणि राज्य सरकारवर अति अवलंबित्व असलेल्या स्थानिक स्वराज्य संस्थांच्या वित्त आणि लेखा परीक्षणात एकसूत्रीपणा नसल्याने संस्थांच्या कार्यक्षेत्रातील तरतूद केल्या गेलेल्या सेवांच्या उपलब्धतेवर मर्यादा येऊन करदात्यांना असंख्य समस्यांचा सामना करावा लागतो. याद्दष्टीने स्थानिक स्वराज्य संस्थांच्या कारभारामध्ये पारदर्शकता आणण्यासाठी या संस्थांनी आपल्या खात्यांचेलेखापरीक्षण करून ते वेबसाइटवर जनतेच्या माहितीसाठी खुले करावे अशी वित्त आयोगाने घातलेली प्रमुख पात्रता अट प्रभावी ठरेल. तसेचया अटीमुळे येणाऱ्या काळात स्थानिक स्वराज्य संस्थांना केंद्राकडून निधी प्राप्त करण्यासाठी स्वतःची वेबसाईट निर्माण करुन आपल्याखात्यांचे लेखापरीक्षण करून ते ऑनलाईन उपलब्ध करून देणे बंधनकारक असल्याने या संस्थांच्या कारभारात पारदर्शकता निर्माण होऊन कार्यक्षेत्रातील तरतूद केलेल्या सेवा सुविधांची उपलब्धता होईल अशी अपेक्षा आहे.

पंचायत राज संस्था आणि लेखापरीक्षण:

स्थानिक स्वराज्य संस्थांच्या लेखापरीक्षण आणि वित्तीय कामकाजामध्ये सुसूत्रता आणि पारदर्शकता आणण्याच्या उद्देशानेतसेच १५ व्या वित्त आयोगाच्या सूचनांच्या पार्श्वभूमीवर स्थानिक स्वराज्य संस्थांच्या सुलभ लेखापरीक्षणासाठी केंद्र सरकारच्या पंचायत राज मंत्रालयाने AuditOnline सारखे खुले स्त्रोत

(opensource) पोर्टल निर्माण केले आहे. त्याद्वारे देशातील स्थानिक स्वराज्य संस्थांच्या लेखापरीक्षण आणि वित्तीय कामकाजास मदत होऊ शकते. मात्र त्यास मिळणारा प्रतिसाद निराशाजनक आहे.आज देशात जिल्हा परिषद, पंचायत समित्या आणि ग्रामपंचायती यांची संख्या अनुक्रमे ६६६, ६६८५ आणि २५५६४२ एवढी आहे (तक्ता क्र. ०१). यापैकी केंद्र सरकारच्या पंचायती राज मंत्रालयाने तयार केलेल्या AuditOnline या online पोर्टलवर नोंदणी केलेल्या जिल्हा परिषद, पंचायत समिती आणि ग्रामपंचायत या संस्थांची संख्याअनुक्रमे ४२३, ३७८७ आणि २५३५१५ एवढी आहे (तक्ता क्र. ०५). नोंदणीकृत पंचायत राज संस्थापैकी २०२१-२२ साली ११८६१ एवढयाच संस्थांचे लेखापरीक्षण अहवाल तयार झाले असल्याचे दिसून येते (तक्ता क्र. ०४).

तक्ता क्र. ०३ भारतातील स्थानिक स्वराज्य संस्थांची संख्या, २०२२

अ.क्र.	स्तर	संख्या
१	जिल्हा परिषद	६६६
२	पंचायत समिती	६६८५
३	ग्रामपंचायत	२५५६४२
	ग्रामीण स्थानिक स्वराज्य संस्था	२६२९९३
४	नागरी स्थानिक स्वराज्य संस्था	४८०४
५	छावणी परिषदा	५९
एकूण		२६७८५६

स्त्रोत: https://lgdirectory.gov.in

तक्ता क्र. ०४ पंचायत राज संस्थांची लेखापरीक्षण स्थिती

अ.क्र.	लेखापरीक्षण स्तर	२०१९-२०	२०२०-२१	२०२१-२२
१	नोंदणीकृत लेखापरीक्षक	८७५०	८७५०	८७५०
२	नोंदणीकृत लेखापरीक्षार्थी	२५९५२५	२५९५२५	२५९५२५
३	निर्मित लेखापरीक्षण अहवाल	११६८२९	१७७४७९	१२०३२

स्त्रोत: https://auditonline.gov.in/#reports

तक्ता क्र. ०५ पंचायत राज संस्थांची लेखापरीक्षण नोंदणी आणि अहवाल

वर्षे	जिल्हा परिषद		पंचायत समिती		ग्रामपंचायत	
	नोंदणीकृत	अहवाल निर्मित	नोंदणीकृत	अहवाल निर्मित	नोंदणीकृत	अहवाल निर्मित
२०१९-२०	४२३	०	३७८७	०२	२५३५१५	११६८२७
२०२०-२१	४२३	१६२	३७८७	२४१९	२५३५१५	१७४९३८
२०२१-२२	४२३	१६	३७८७	२३५	२५३५१५	११८६१

स्त्रोत: https://auditonline.gov.in/#reports

तक्ता क्र. ०६ स्थानिक स्वराज्य संस्थांना प्रत्यक्ष वितरीत झालेला निधी (%)

अ. क्र.	वित्त आयोग	ग्रामीण	नागरी
१	१० वा	८१.६	८३.४
२	११ वा	८२.५	८७.६
३	१२ वा	९४.६	८९.४
४	१३ वा	९०.७	८२.१
५	१४ वा	८९.६	८५.२

स्त्रोतः १५ वा वित्त आयोग अहवाल, भारत सरकार, नवी दिल्ली.

वित्त आयोगामार्फत स्थानिक स्वराज्य संस्थांना निधी वितरीत केला जातो. मात्र, वित्त आयोगांनी शिफारस केलेला संपूर्ण निधी या संस्थांना प्राप्त होत नाही. वित्त आयोगाचे निकष, अटी तसेच कामकाजातील अस्ताव्यस्ततेमुळे एकीकडे स्थानिक स्वराज्य संस्थांना प्राप्त झालेला संपूर्ण निधी खर्च होत नाही. तर दुसरीकडे,हक्काचा निधी मिळण्यामध्ये मर्यादा येतात. १० व्या वित्त आयोगाने शिफारस केलेल्या एकूण निधीपैकी ग्रामीण स्थानिक स्वराज्य संस्थांना ८१.६ टक्के तर नागरी संस्थांना ८३.४ टक्के एवढाच निधी प्राप्त झाला. १४ व्या वित्त आयोगाने शिफारस केलेल्या एकूण निधीपैकी ग्रामीण संस्थांना ८९.६ टक्के तर नागरी संस्थांना ८५.२ टक्के निधीचे वितरण करण्यात आले (तक्ता क्र. ०६). थोडक्यात, केंद्र सरकारकडून वित्त आयोगांनी शिफारस केलेल्या संपूर्ण निधीचे वितरण होऊ शकले नाही ही सत्तेच्या विकेंद्रीकरण प्रक्रियेसाठी निराशाजनक बाब आहे.

सारांशः

देशाच्या आर्थिक विकासाची फळे शेवटच्या व्यक्तीपर्यंत पोहचविण्यामध्ये स्थानिक स्वराज्य संस्थांची भूमिका ही मुलभूत स्वरुपाची आहे. त्यादृष्टीने स्थानिक स्वराज्य संस्थांना वित्तीय बळकटी प्राप्त करुन देण्यासाठी सरकार पातळीवर सातत्याने प्रयत्न केले जातात. मात्र त्यास यश प्राप्त होत नाही. स्थानिक स्वराज्य संस्थांची वित्ताची गरज पूर्ण होण्यासाठी केंद्र सरकारच्या कर महसूलातील काही वाटा राज्यांमार्फत स्थानिक स्वराज्य संस्थांना वितरीत केला जातो. तर वितरीत केलेल्या निधीचे खातेनिहाय वाटप करुन विकासकामे पार पाडली जावीत. तसेच स्थानिक स्वराज्य संस्थांनी आपल्या कामकाजामध्ये पारदर्शकता ठेऊन प्राप्त महसूल व निधीचा योग्य व्यय करणे अपेक्षित असते. असे असले तरी, देशातील स्थानिक स्वराज्य संस्था पातळीवरील वित्तीय लेखापरीक्षण कामकाजाकडे मोठे दुर्लक्ष होत असल्याचे विविध वित्त आयोगांच्या निदर्शनास आले आहे. त्यादृष्टीने वित्त आयोगांनी वेळोवेळी सूचनाही केल्या आहेत. यामध्ये १५ व्या वित्त आयोगाने एक पाऊल पुढे टाकत स्थानिक स्वराज्य संस्थांच्या लेखापरीक्षणासाठी कठोर अटी ठेवल्या आहेत. या अटींचा विचार करता, स्थानिक स्वराज्य संस्थांच्या कामकाजात सुसूत्रता आणि पारदर्शकता निर्माण होईल अशी अपेक्षा व्यक्त केली जात आहे. मात्र अटींची पूर्तता करताना स्थानिक स्वराज्य संस्थांना अनेक अडचणींचा सामना करावा लागेल हे निश्चित. त्यादृष्टीने केंद्र सरकारच्या पंचायत राज मंत्रालयाने घेतलेला पुढाकार महत्वाचा आहे. मात्र त्यास मिळणारा प्रतिसाद अल्प आहे. तो वाढविण्यासाठी स्थानिक स्वराज्य संस्थांमध्ये वित्तीय साक्षरता आणि जागृती निर्माण करणे गरजेचे आहे. तरच आर्थिक विकासाची प्रक्रिया शेवटच्या घटकांपर्यंत वेगाने पोहचू शकेल.

संदर्भः

१) Pierre Jacquet, and Jean Pisani-Ferry (२०१०), Economic Policy Theory and Practice, Oxford Press, New York.

२)Rao, M Govinda (2017) and "Strengthening Indian Center-State Fiscal Frameworks,' IMF Country Report No. 17/55, February 2017

३) Richard Abel Musgrave, Peggy B. Musgrave (1989), Public finance in Theory and Practice, McGraw-Hill Book Company.

४) Sarma, Atul and Debabani Chakravarty(2018), Integrating the Third Tier Government in the Indian Federal System, Palgrave Macmillan, ISBN 978-981-10-5624-6

५)भारताचे आर्थिक सर्वेक्षण (२०२१-२२), वित्त मंत्रालय भारत सरकार, नवी दिल्ली.

६)१५ वा वित्त आयोग (२०२०), कोविड काळातील वित्त आयोग, भारत सरकार, नवी दिल्ली.

७) https://auditonline.gov.in

८) https://lgdirectory.gov.in

सामाजिक योजनामध्ये 15 व्या वित्त आयोगाची भूमिका

संशोधक विद्यार्थी
राजेंद्र महादेवराव सरोदे
मु. यादव ले आऊट जवाहर आश्रम शाळेजवळ,
लोहारा, यवतमाळ-445001
ई मेल – rajendrasarode५९८@gmail.com
भ्रमणध्वनी -9421741845
आजीव सभासद क्रमांक – 1892

गोषवारा –

भारतातील प्रत्येक घटक राज्याची सामाजिक आर्थीक स्थिती सारखी नसल्यामुळे उत्पन्नामध्ये भिन्नता आढळते. त्यामुळे प्रत्येक घटक राज्याचे दरडोई उत्पन्न व विकास दर कमी अधिक आहे. देशाचा एकत्रितपणे संतुलीत विकास करण्याकरिता विविधतेचा विचार करून सर्व घटक राज्यांना व विविध विकास योजनांच्या माध्यमातून करत असते. भारतीय राज्यघटनेत केंद्र व राज्य सरकार याच्यामध्ये उत्पन्नाचे माध्यमासंबंधीची तरतूद केलेली आहे. तसेच केंद्र व राज्य सरकारमध्ये वित्तीय विभागणी करण्यासाठी केंद्राला आर्थिक सल्ला देण्याकरिता दर पाच वर्षासाठी वित्त आयोग गठीत केला जातो.

वित्त आयोग एक स्वतंत्र अर्धन्यायिक संस्था म्हणून कार्य करते. वित्त आयोग नियुक्त करण्याचा अधिकार संघ राज्याच्या अध्यक्षाला म्हणजेच राष्ट्रपतीला आहे. केंद्र सरकारला मिळणाऱ्या उत्पन्नाचा किती वाटा कोणत्या तत्वानुसार घटक राज्यांना वाटप करावा यासंबंधीचे कार्य वित्त आयोगाचे आहे. वित्त आयोग हा अस्थायी स्वरूपाचा असून विविध अहवालाच्या माध्यमातून शिफारशी करतो.

नवीन वित्त आयोगाच्या शिफारशी अंमलात येईपर्यंत आधीची वित्त व्यवस्था चालु असते. प्रस्तूत शोधनिबंधामध्ये सामाजिक योजनांच्या आर्थिक विकासात 15 व्या वित्त आयोगाची भूमिका या विषयीचा अभ्यास करण्यात आला आहे. 15 व्या वित्त आयोगाच्या शिफारशीनुसार राज्यातील ग्रामीण स्थानिक स्वराज्य संस्थांना वितरित करण्यासाठी सन 2021-22 च्या अनुदानाला हस्त्यापोटी रू.1456.75 कोटी इतका निधी वितरीत करण्याचे निश्चित झाले आहे. केंद्र शासनाकडून राज्यशासनास प्राप्त झालेला निधी राज्यातील स्थानिक स्वराज्य संस्थेला वितरीत करण्याचा प्रस्ताव शासनाच्या विचाराधीन आहे.

स्थानिक स्वराज्य संस्थांना निधीचे वाटप किती प्रमाणात व्हावे याची तरतूद आहे. परंतू, निधी वाटपामध्ये फार मोठा प्रादेशिक असमतोल दिसून येतो. 15 व्या केंद्रीय वित्त आयोगामार्फत केंद्र सरकारच्या मार्गदर्शनानुसार स्थानिक स्वराज्य संस्थांना योग्य प्रमाणात निधी वाटप झाला किंवा नाही यासाठी संशोधकाने प्रस्तूत विषयाचा सखोल अभ्यास करण्याचा प्रयत्न केला आहे.

प्रस्तावना –

वित्त आयोग भारताच्या राष्ट्रपतीद्वारे नेमला जाणारा एक आर्थिक नियोजन करणारा आयोग आहे. वित्त आयोग हा दर पाच वर्षांनी नेमला जातो. या आयोगाची सर्वप्रथम स्थापना डॉ.बाबासाहेब आंबडेकरांनी सन 1951 मध्ये केली. वित्त आयोगाची स्थापना कलम 280 अन्वये घटनात्मक संस्था म्हणून करण्यात

आली आहे. ती अर्धन्यायिक कार्य करते आणि तिचा सल्ला अधिकृत कारण असल्याशिवाय स्वीकारण्यास भारत सरकार बाध्य नाही.

सन 9951 पासून 2017 पर्यंत 15 वित्त आयोग नेमण्यात आले. 2017 मध्ये एन.के.सिंग यांच्या अध्यक्षतेखाली नवीनतम वित्ता आयोगाची स्थापना करण्यात आली. 1993 मध्ये भारतातील सर्व राज्यामध्ये राज्य वित्त आयोगाची स्थापना करण्यात आली. आयोगामध्ये एक अध्यक्ष व चार सदस्य असतात. दोन सदस्य पूर्ण वेळ व दोन सदस्य अर्ध वेळ असतात.

भारताने संघराज्य पद्धतीचा स्वीकार केलेला आहे. केंद्र सरकारला विविध प्रकारच्या आर्थिक असमतोलाचा सामना करावा लागत आहे. तसेच केंद्र आणि राज्य सरकारमधील असमतोलाचा परिणाम म्हणजे राज्यांनी त्यांच्या जबाबदाऱ्या पार पाडण्याच्या प्रक्रियेत त्यांच्या महसुल प्राप्तीच्या तुलनेत असामान्य खर्च केलेला असल्याचे दिसून येते. राज्य सरकार त्यांच्या नागरिकांच्या आर्थिक, सामाजिक, शैक्षणिक समस्या सोडविण्यासाठी अधिक सक्षम असतात.

केंद्र व राज्यसरकारमध्ये उत्पन्न कराची विभागणी करण्याची तत्वे -

अ) लोकसंख्या – राज्यातील एकूण किती टक्के लोकसंख्या त्या जिल्ह्यात आहे. त्यानुसार जिल्हा परिषदांना निधीची विभागणी करणे.

ब) कर संकलन – एखाद्या जिल्ह्याने किती कर गोळा केला आहे त्या प्रमाणात त्या जिल्ह्यास एकूण निधीतून वाटा दिला जाते.

एकूण लोकसंख्येचे तत्व सर्व राज्यांना न्याय देणारे आहे. तसेच संकलनाचे तत्व हे प्रोत्साहन देणारे आहे. जर फक्त लोकसंख्येचे तत्व वापरले तर भंडारा, अकोला, वर्धा, गोंदिया व इतर लहान जिल्ह्यावर अन्याय होईल. जर संकलनानुसार निधी वाटायचा असला तर ज्या जिल्ह्यातील लोक कर भरणार नाही, अशा जिल्ह्यावर अन्याय होईल. कारण, सापक्षतेने कमी दरडोई उत्पन्नामुळे तेथील कर संकलन कमी असते. म्हणजेच ज्यांना निधीची अधिक गरज असते त्यांनाच कमी वाटा मिळेल. त्यामुळे निधी वाटपामध्ये दोन्ही तत्वाचा एकाच वेळी वापर करून ही त्रुटी दूर करण्याचे प्रयत्न वित्त आयोगाने करणे आवश्यक आहे.

वित्त आयोगाचे कार्य :-

१) केंद्र आणि राज्यामध्ये करांच्या निव्वळ उत्पन्नाचे वितरण करामध्ये त्याच्या संबंधीत योगदानानुसार विभागले जावे.
२) राज्यांना सहाय्य अनुदान नियंत्रित करणारे घटक आणि त्याचे प्रमाण निश्चित करणे.
३) राज्याच्या वित्त आयोगाने केलेल्या शिफारशीच्या आधारे राज्यातील निधी वाढविण्यासाठी राष्ट्रपतीला शिफारशी करणे.
४) योग्य अर्थाच्या हितासाठी तसेच त्याच्याशी संबंधीत कोणतीही बाबीची शिफारस राष्ट्रपतींनी करणे.
५) वित्त आयोग एक स्वायत्त संस्था आहे. जी भारत सरकारद्वारे नियंत्रीत केली जाते.
६) केंद्र सरकार व राज्य सरकार यांचेमध्ये वित्तीय सामंजस्य निर्माण करण्यासाठी कार्य करणे.

यवतमाळ जिल्हा परिषदेतील (बंधित टाईड ग्रँट)

(रू. हजारात)

अ. क्र.	जिल्हा परिषदेचे नाव	जिल्हा परिषद	पंचायत समिती	ग्रामपंचायत	एकूण रक्कम
1	यवतमाळ	52857	52857	422857	528571

संदर्भ – वितरण आदेश क्र.१क्रमांक:पविआ-2020/प्र.क्र.62/ वित्त-4, दि.27/07/2020 चे विवरण पत्र.

अर्थनिर्वचन व विश्लेषण –

वरील तक्त्याच्या पाहणीनुसार असे दिसून येते की, यवतमाळ जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी यांच्या अर्थसंकल्पीय वितरण प्रणालीद्वारे वितरीत केल्याचे दिसून येते. सदर निधी जिल्हा परिषद, पंचायत समिती व ग्रामपंचायत यांच्यामध्ये अनुक्रमे 10:10:80 या प्रमाणात निधी वितरीत केल्याचे दिसून येते. 15 व्या केंद्रीय वित्त आयोगा अंतर्गत केंद्र शासनाच्या मार्गदर्शक सूचनानुसार प्राप्त संपूर्ण अनुदान जिल्हा परिषद, पंचायत समिती व ग्रामपंचायत या स्थानिक स्वराज्य संस्थांना वितरीत केल्याचे दिसून येते. दि.26 जून 2020 च्या शासन निर्णयानुसार 2020-21 या आर्थिक वर्षापासून 15 व्या वित्त आयोगाच्या वितरीत निधीतून पंचायत राज संस्थांनी ग्रामपंचायत विकास आराखड्यातून कामे व उपक्रमाची प्रभावी अंमलबजावणी करावी असे शासन निर्णयातून आदेशीत केल्याचे दिसून येते. ग्रामसभा व ग्रामपंचायतीला गावाच्या सद्यस्थितीचे परिक्षण करून गावाच्या कोणत्या अडचणी आहेत, त्यावर कोणत्या उपाययोजना करणे अनिवार्य आहे याचे संपूर्ण अधिकार ग्रामपंचायतला असल्याचे दिसून येते.

15 व्या वित्त आयोगाच्या शिफारशीनुसार टाईड ग्रॅडचा वापर परिसर सुंदर करणे तसेच हगणदारी मुक्त गाव, स्थानिक स्वराज्य संस्थेची देखभाल व दुरूस्ती, पेयजल, पाणीपुरवठा, रेन वॉटर हार्वेस्टींग वाटर, रिसायकलींग इत्यादी कामाकरिता गरजेनुसार निधी वाटप केल्याचे दिसून येते. वरील बाबीवर प्राधान्याने खर्च करणे आवश्यक आहे. निधी उरल्यास इतर बाबीवर खर्च करावा.

निष्कर्ष –

अ) यवतमाळ जिल्हा परिषदेला एकूण निधी 528571 (रू. हजारात) उपलब्ध झाल्याचे दिसून येते.

ब) निधी वाटपाच्या तत्वानुसार निधी वाटपामध्ये असमतोल असल्याचे दिसून येते.

क) 15 व्या वित्त आयोगाने 2011 च्या जनगणेचा आधार घेऊन निधी वाटप केल्याचे
दिसून येते. परंतु, 2021 ची जनगणना न झाल्यामुळे लोकसंख्येच्या तुलनेत निधी अपुरा पडत आहे.

ड) प्रत्येक विभाग, जिल्हा आकार, लोकसंख्या, भौगोलिक परिस्थिती, आर्थिक व
सामाजिक प्रश्न हे वेगवेगळे असतात. त्यामुळे, निधी वाटपामध्ये एक समान वाटपाचे तत्व लावता येणार नाही. त्यामुळे, वित्तीय विभाजनाचा प्रश्न अतिशय महत्वाचा ठरतो.

इ) विविध राज्यातील प्रादेशीक असमतोल तसेच केंद्र व राज्यातील अन्य पक्षाचे सरकार सत्तेवर असल्यास निधी वाटपामध्ये असमतोल झाल्याचे दिसून येते.

शिफारशी –

1) सर्व ग्राम पंचायतींनी ग्रामपंचायत विकास आराखड्यात पेयजल आणि स्वच्छता या बाबीवर सर्वात जास्त खर्च करावा.
2) वित्त आयोगाच्या शिफारशीनुसार सर्व पायाभूत सुविधा उपलब्ध करून देणे आवश्यक आहे.
3) दरवर्षी अर्थसंकल्पात किती प्रमाणात खर्च केला गेला या बाबींचा पारदर्शक आढावा सादर करावा.
4) सरकारने जनगणना वेळेवर करून निधी योग्य प्रमाणात उपलब्ध करून द्यावा.

5) जिल्हा परिषद, पंचायत समिती, ग्रामपंचायतींना निधी वाटपामध्ये गैरप्रकार होणार नाही याची दक्षता घ्यावी.
6) वित्त आयोग हा कायमस्वरूपी असावा.
7) राज्यांना निधी वाटपामध्ये निरपेक्ष धोरण ठेवणे आवश्यक आहे.

संदर्भ सूची –

1) बिझनेस स्टँडर्ड, निवी दिल्ली, 27 नोव्हेंबर, 2017.
2) खेर, सी. पं. केंद्र राज्य वित्तीय संस्था, पुणे 1993.
3) शासन निर्णय क्रमांक पंविआ 2020/प्र.क्र.62/वित्त-4.
4) निर्मल भालेराव -भारतीय अर्थव्यवस्था.
5) ओझरकर, सु. रा., राजस्व-सावर्जनिक आय-व्यय, नागपूर, 1969.
6) नवी दिल्ली : द हिंदू, नोव्हेंबर 27,2017, 10 सप्टेंबर, 2022 रोजी प्रथम.
7) दत्त आणि सुंदरम् – भारतीय अर्थव्यवस्था.

Third Session

डॉ. पंजाबराव देशमुख यांचे कृषी क्षेत्रातील आर्थिक विचारातील योगदान

प्रा.डॉ. मनोजकुमार ज्योतिराम गायकवाड
अर्थशास्त्र विभाग प्रमुख
वसंतराव नाईक कला,विज्ञान व वाणिज्य महाविद्यालय शहादा जिल्हा–नंदुरबार
सभासद क्रमांक - १८६४
निलेश रविंद्र कोळी
संशोधक विद्यार्थी
सभासद क्रमांक -१४३५

प्रस्तावनाः -**(Introduction)**

शेतकऱ्यांच्या दारिद्रय निर्मूलनाचे नवीन प्रतिमान शेतकऱ्यांची गरिबी हा भारतीय अर्थव्यवस्थेचा जणू शापच आहे. भारतातील प्रत्येक नागरिकाचे, राहणीमान उच्च स्तरावर जायला हवे होते पण तसे झाले नाही. इंग्रजांच्या गुलामगिरीत गुलाम, सरंजामशाहीत भुदास आणि आजच्या भांडवलशाही युगात शेतमजूर, असंघटित कामगार, भटक्या जमाती, आदिवासी, झोपड पट्टीतील रहिवाशी असे अनेक आर्थिक दृष्टया कमकुवत वर्ग निर्माण झाले आणि ते दारिद्रयाच्या खाईत लोटले गेले परिणामी ते दारिद्र्यातच राहिले आहेत. मानवाच्या जीवनशैलीत क्रांतीकारक बदल घडवून आणण्यासाठी सामाजिक विषमतेवर आधारित समाजरचनेत मूलतः बदल केला पाहिजे असे त्यांचे मत होते. स्वराज्य आणि सुराज्य हया दोन्हीही संकल्पनांचे मूल्य सामाजिक स्वास्थ्य आणि प्रगती हयासाठी आवश्यक आहे . भारताचा विचार करता शेतीमध्ये बदल घडवून येणे आवश्यक आहे अशी गर्जना डॉ. पंजाबराव सातत्याने आपल्या विचारातून करीत होते . बहुव्यापी गरिबी ही देशातील सर्वात मूलभूत आणि गुंतागुंतीची समस्या आहे. यासाठी सरकारने नियोजनाच्या आधारे रचनात्मक बदल केले पाहिजेत. जनतेच्या अन्न, वस्त्र, निवारा, शिक्षण, आरोग्य, पाणी, इत्यादी गरजा पूर्ण केल्या पाहिजेत. गरिबी निवारण हेच वेगवान विकासाचे प्रतिमान आहे. म्हणून डॉ. पंजाबराव इशारा देतात, "प्रत्येक नवप्रवर्तनीय आर्थिक सिध्दांत भारतीय कृषी आणि कृषक समाजाच्या आर्थिक आणि सामाजिक रचनेत अंतर्भूत आहे. भारतीय अर्थव्यवस्थेच्या विकासाची प्रक्रिया कृषी आणि कृषकांच्या कार्यक्षमतेने ठरणारी आहे. म्हणून कृषिक्षेत्रात बदल किंवा नवप्रर्वतन घडून आणल्याशिवाय इतर कोणत्याही क्षेत्राचा आर्थिक विकास होणार नाही. नवप्रवर्तनामुळे गुणात्मक आणि संख्यात्मक अनुकूल परिणाम घडून येतात. देशाच्या अर्थव्यवस्थेला समस्यांच्या गर्तेतून बाहेर काढण्याकरीता नवप्रवर्तन उपयुक्त ठरते. वितरणातील विषमता, विभागीय असमतोलाचे उच्चाटन केले पाहीजे. बाजार यंत्रणेचे यशापयश, भारत सरकारच्या उपक्रमांचे स्त्रोत, शेतमालाच्या किंमतीतील उच्चावचनांचे नियंत्रण, कृषिविकासाची व्यूव्हरचना, देशाच्या विकासाची आधारभूत संरचना आणि समग्र कल्याण हे कृषिक्षेत्रातील नवप्रवर्तनाच्या तंत्रावरच अवलंबून आहे कृषी विकास दराचे लक्ष्य साध्य करण्यासाठी पीकांचे वैविध्य आणि शेतकऱ्यांच्या मनोवृत्तीत बदल करण्याची गरज आहे . त्यासाठी बाजारपेठेतील सुधारणांना प्राधान्य द्यावे आणि राज्यांनी कृषी कायद्यात तातडीने बदल करावेत असे निर्देश त्यांनी आपल्या विचारातून दिले आहेत. उत्पादन क्षेत्रात बदल घडून आणण्यासाठी भारतीय कृषकांना पुरेशा वित्त पुरवठयाची आवश्यकता आहे. कृषकांना पुरेसा वित्त पुरवठा करण्यासाठी वित्तीय संस्थांची स्थापना करायला पाहिजे. त्याशिवाय देशाची अर्थव्यवस्था समृध्द होऊ शकणार नाही विशेष कृती आराखडा तयार करून कृषकांना आर्थिक मदत करणे गरजेचे आहे असे त्यांचे मत होते.

<u>उदिष्टे-(**objective**)</u>

१) पंजाबराव देशमुख यांचे कृषी क्षेत्रातील महत्वपूर्ण योगदान अभ्यासणे.

२) पंजाबराव देशमुख यांचे कृषी क्षेत्रातील व्यापारी दृष्टीकोन अभ्यासणे.

<u>गृहीतके-(**Hypothesis**)</u>

१) पंजाबराव देशमुख यांचे कृषी क्षेत्रातील आर्थिक विचार कृषी क्षेत्राला आजही महत्वपूर्ण आहे .

२) पंजाबराव देशमुख यांचे कृषी क्षेत्रातील आर्थिक विचार कृषी क्षेत्राला व्यापारी दृष्टीकोन निर्माण करतात.

<u>संशोधन पद्धती-(**Methodology of Research**)</u>

सदर संशोधन निबंध मांडणी पूर्णतः दुय्यम साधन सामुग्रीच्या आधारे केलेली आहे,यात प्रामुख्याने शासनाचे विविध,वर्तमानपत्रे, साप्ताहिके ,मासिके,त्रैमासिके,समाज विज्ञानकोश,प्रकाशित ग्रंथे चर्चा सत्रे,इंटरनेट इ.दुय्यम साधन सामुग्रीच्या आधारे संशोधकाने माहिती प्राप्त केलेली आहे.

<u>डॉ. पंजाबराव देशमुख यांच्या शेतीविषयक आर्थिक विचारांचे विश्लेषण:-</u>

जागतिकीकरणाच्या या पार्श्र्वभूमीवर विदर्भ आणि महाराष्ट्रात आत्महत्येचे प्रकार सर्रास सुरु आहेत. अशावेळी कृषीक्रांतीचे जनक भाऊसाहेब डॉ. पंजाबराव देशमुख यांची आठवण होणे अपरिहार्य आहे. कारण शेतक-यांच्या समग्र उत्थानासाठी हिरीरिने किंवा तळमळीने विचार करणा-या समाजक्रांतिकारकांमध्ये म. ज्योतीराव फुले, राजर्षी शाहू महाराज, डॉ.बाबासाहेब आंबेडक र, कर्मवीर भाऊराव पाटील आणि विदर्भरत्न भाऊसाहेब डॉ. पंजाबराव देशमुख यांचा प्रामुख्याने विचार करावा लागतो. भाऊसाहेब डॉ. पंजाबराव देशमुख यांचा प्रामुख्याने विचार करावा लागतो. भाऊसाहेब डॉ. पंजाबराव देशमु, यांनी वेळोवेळी शेतकरी आणि शेती व्यवसायाच्या संदर्भत विचार व्यक्त केले आहेत.

१.कृषी क्षेत्र देशाच्या विकासाचा पाया :-

माणसाप्रमाणेच समाजाच्या आणि राष्ट्राच्याही जीवनात शेतीला महत्वाचे स्थान आहे. त्यातही भारतासारख्या शेती प्रधान देशात तर अधिकच आहे, असे असून देखील शेती विकासाकडे स्वातंत्र्याच्या ७५ वर्षानंतर ही शासन गांभीर्याने लक्ष देताना दिसत नाही. सध्या विदर्भ आणि महाराष्ट्रात घडून येणाऱ्या शेतकऱ्यांच्या आत्महत्येचा आकडा जरी पहिला तरी ते आपल्या सहज लक्षात येते. शेती आणि शेतकऱ्यांची दूरावस्था ही बाब डॉ. पंजाबराव देशमुखांच्या लक्षात आल्यामुळे त्यांनी शेतकरी संघटित करण्याकडे जास्त भर दिला. त्यातूनच 1927 साली भाऊसाहेबांनी शेतकरी संघ स्थापन केला व सर्व प्रथम शेतकऱ्यांना संघटित करण्याचे मौलिक कार्य केले. शेतकऱ्यांना संघटित करुन भाऊसाहेबांनी शेती ही केवळ उदरनिर्वाहाचे साधन नसून तो एक व्यवसाय आहे. राष्ट्राच्या विकासासाठी शेतकऱ्यांनी शेतीला व्यवसाय समजून कष्ट केले पाहिजेत. कारण राष्ट्राच्या एकूण उत्पन्नात 50%टक्के उत्पन्न हे शेती व शेतीसंबधीत व्यवसायातून निर्माण होते. त्यामुळे शेतकऱ्यांच्या मुलांनी शेती राष्ट्राच्या विकासाचा मुख्य आधार आहे असे समजून शेती करावी. कारण शेतकरी सुखी तर देश सुखी असा साधा सरळ विचार भाऊसाहेबांचा होता.

२.शेतकरी वर्ग संघटित करणे :-

शेतकऱ्यांनी स्वत:च्या हितासाठी व राष्ट्रीय विकास घडवून आणण्यासाठी संघटित झाले पाहिजे असे भाऊसाहेबांना नेहमी वाटत असे. शेतकऱ्यांच्या उद्धारासाठी व शेतकरी संघटित होण्यासाठी भाऊसाहेबांनी अनेक योजना राबविल्या. १९९५ साली त्यांनी भारत कृषक समाजाची स्थापना केली आणि त्यातून अनेक उपसंघटना स्थापन केल्या अ)राष्ट्रीय कृषी सहकारी खरेदी विक्री संघ. ब) कृषक सहकारी भारतीय अधिकोष. क)आफ्रो-आशिया ग्रामीण पुर्नरचना संघटना. इ)अखिल भारतीय ताडगूळ महासंघ. ई)कृषी उत्पादकांच्या आंतरराष्ट्रीय संघटनांचा महासंघ इत्यादी संघटना करण्याचा प्रयत्न केला. भाऊसाहेब म्हणत इंग्लडमध्ये

National Farmers Union आणि National Farmers Union of Scotland ह्या संघटना शेतकऱ्यांनी मिळनूच बनविल्या आणि त्या शेतकऱ्यांच्या हितासाठीच राबतात. त्याचप्रमाणे अमेरिका व कॅनडातही अशा संघटना आहेत. त्या संस्था केवळ तेथील शेतकऱ्यांच शेतीहीतच न पाहता आर्थिक, सामाजिक, शैक्षणिक आणि सांस्कृतिक प्रगतीची काळजी घेतात. इंग्लड,अमेरिका व कॅनडाचा आदर्श घेऊन त्यांनी इथल्या शेतकऱ्यांना संघटित करण्याचा प्रयत्न केला. तसेच भारतही शेतकऱ्यांचे हीत जोपासणारी देशव्यापी संघटना असावी असे प्रतिपादन त्यांनी केले होते.

३.आधुनिक आणि तांत्रिक शेती:-

भारतीय शेतकऱ्यांची दैववादी, निराशवादी मानसिकता बदलून त्यांना जागतिकीकरणातील आर्थिक, सामाजिक व सांस्कृतिक प्रश्नांची जाण करुन देणे काळाची गरज झाली आहे. कारण जोपर्यंत शेतीकडे पाहण्याचा सामान्य शेतकऱ्यांचा दृष्टिकोन बदलत नाही तो पर्यंत शेतकऱ्यांचा आर्थिक विकास घडून येणे शक्य नाही. त्यासाठी डॉ. पंजाबराव देशमुख यांनी शेती करताना आधुनिक आणि तांत्रिक शेतीचा वापर करावा असे म्हटले आहे. त्यासाठी भाऊसाहेबांनी कोलंबो प्लॅन प्रमाणे निरनिराळ्या देशात शेतकरी पाठविण्याची योजना आखली, तसे इंटर नॅशनल फार्म यूथ एक्सचेंज कार्यक्रम भरतात सुरु करुन बऱ्याच शेतकऱ्यांना दुसऱ्या देशातील शेतीची लागवड पद्धती पाहण्याची व प्रात्याक्षिक करण्याची संधी मिळवून दिली. (उदा. जपानी भात शेतीचा प्रयोग)आधुनिक आणि तांत्रिक शेती करताना अशा प्रकारच्या योजनांची आज अमंलबजावणी करण्याची नितांत गरज आहे. परिणामतः अशा प्रात्याक्षिकांमधून शेतकरी आधुनिक यंत्रे, उपकरणे यांचा कसा वापर करावा हे शिकतील, व त्यातून शेतीसाठी लागणारे पुढचे नियोजन ते करतील आणि त्यामाध्यामातून त्यांच्या वेळेची व श्रमाची बचत होईल. हा दृष्टिकोन भाऊसाहेबांचा आधुनिक शेतीसंबंधी होता.

४.कृषी क्षेत्राला प्रशिक्षणाची गरज :-

तुम्हला शेती जरी करावयाची असली तरी तुम्ही एम.ए. होऊन करा किंवा ऍग्रीकल्चर होऊन करा जेणे करुन तुम्हाला कुणी फसवणार नाही आणि तुम्ही उत्तम शेती करु शकाल, मला असे वाटते. भाऊसाहेबांच्या या विचारांची आज खरी गरज आहे. कारण आज शेतकऱ्याला शिक्षणाची गरज नाही आणि कोणीही ऐरागैरा योग्य रितीने शेती करु शकतो हा सर्वदूर पसरलेला चुकीचा समज आहे. हा दृष्टिकोन बदलवणे अत्यंत आवश्यक झाले आहे. कारण या चुकीच्या समजुतीमधूनच समाजात नैराश्य आणि वैफल्य पसरते आणि त्यातूनच मग सगळीकडे असफल झालेले लोक निराशेने, उदासिनतेकडे वळताना दिसतात किंवा आजच्या घडीला ते आत्महत्या करताना दिसतात. त्याचे कारण त्यांच्याजवळ ना शारीरिक क्षमता असते ना बौद्धीक कुवत, त्यामुळे इतर व्यावसायिक शिक्षाप्रमाणेच शेती व्यवसायाशी संबधित असणाऱ्या सर्व सोयी, सुविधा नवनवीन पद्धती आणि अवजाराची माहिती असणे आवश्यक आहे. शेती व्यवसाय हा स्थितीशील व्यवसाय आहे. याची जाणीव करुन देण्याची गरज आज मोठ्या प्रमाणात निर्माण झाली आहे. तसेच आजच्या शिक्षणाची गंगा संशोधकाच्या प्रयोगशाळेतून थेट शेतात राबणाऱ्या शेतकऱ्यांच्या पर्यंत पोहचली पाहिजे. तरच तो शेतकरी उत्तम व आधुनिक शेती चांगल्याप्रकारे करु शकतो.

५.शेतकरी वर्गाच्या कल्याण विषयी विचार :-

दि.३ सप्टेंबर १९९३ रोजी शासनाने शेतकऱ्यांकडे केलेल्या दुर्लक्षासंबधी खेद व्यक्त करताना ते म्हणतात, सरकारच शेतकऱ्यांची अक्षम्य उपेक्षा करीत आहे. केवळ संख्या बळामुळे नव्हे तर श्रेष्ठतम कार्यामुळे या भारतभूमीवर शेतकऱ्यांना पूर्वापार प्राधान्य मिळत आले आहे. त्यामुळेच भारत शेतकऱ्यांचा देश म्हणून सर्वत्र प्रसिद्ध आहे व असा नित्य उद्‌घोषही केला जातो. हे शेतकरीच खऱ्या अर्थाने भारताचे स्वामी आहेत.

पण तरी सुद्धा त्यांच्या कल्याणाची कुणालाच आस्था नाही. कामगार वर्ग व शेतकरी वर्ग यांच्या परिस्थितीचे तुलनात्मक दर्शन घडवून डॉ. पंजाबराव देशमुख म्हणतात, ज्या प्रचंड मानव समुहाच्या, कृषकांच्या घामावर आपण जगतो, विकास साधतो त्यांच्याकरिता अजून एकही कल्याणकारी अधिकारी नाही हे आश्चर्याने म्हणावे लागते. व आजची परिस्थिती सुद्धा यापेक्षा वेगळी नाही. आज ज्या शासकीय योजना आहेत. त्या सर्वसामान्य शेतकरी वर्गापर्यंत इथला भ्रष्टाचारी अधिकारी वर्ग (काही सन्माननीय अपवाद वगळता)पोहचू देत नाही हे वास्तव आपण मान्य केले पाहिजे.

६.सहकारी शेती:-

डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्याप्रमाणे डॉ.पंजाबराव देशमुख यांनी सुद्धा सहकारी शेतीवर भर दिला. शेतकऱ्यांनी शेतीशी भावनिक नाते न ठेवता शेतीकडे उत्पादन वाढविण्याच्या दृष्टिकोनातून पाहिले पाहिजे त्यासाठी त्यांनी शेतीचे लहान लहान तुकड्यात होणारे विभाजन टाळून ती एकत्रित कशी करता येईल, याकडे लक्ष दिले पाहिजे, त्यासाठी त्यांनी सहकारी शेती हाच त्यावर योग्य मार्ग आहे असे सांगितले. त्यामुळे शेतकऱ्यांचे दर एकरी उत्पन्न वाढेल तसेच उत्पादन मूल्य कमी होऊन राष्ट्रीय उत्पन्नात वाढ होईल. आज सहकारी शेती करण्याची नितांत गरज आहे. त्यादृष्टिने आपण प्रयत्न करुया.

७.संपत्ती कर विधेयक:-

संपत्ती करावरील विधेयक डॉ. पंजाबराव देशमुख यांनी दि.६ एप्रिल १९४९ रोजी केलेल्या भाषणात शेतकऱ्यांच्या मालाला कमी भाव देण्याचे समर्थन करणाऱ्यांवर सडकून टीका केली ते आपल्या भाषणात म्हणाले, शेतकऱ्यांनी उत्पन्न केलेल्या वस्तूंचे जास्त भाव दिले तर त्यामुळे पैशाची किंमत कमी होते म्हणून शेतकऱ्यांच्या उत्पादनाच्या किंमती कमी होते म्हणून शेतकऱ्यांच्या उत्पादनाच्या किंमती कमी करणे हाच चलनवाढ रोखण्याचा मार्ग आहे, असे बेजबाबदार विधान पण ते योग्य नाही. वास्तविक भारतीय शेतकरी पूर्वी कधीही नव्हता इतका आज दरिद्री झाला आहे. त्यांच्या हाती जो काही पैसा येतो तो सर्व जीवनावश्यक वस्तू खरेदी करण्यावर खर्च होऊन जातो. पुष्कळदा तर त्याला आपल्या कुटुंबाच्या सर्व साधारण गरजादेखील भागवता येत नाहीत. उलट ज्यांची संख्या संपूर्ण देशात दोन हजारापेक्षाही कमी आहे, अशा गर्भश्रीमंत माणसाच्या हातात देशातील शेकडा ७५ टक्कापेक्षा अधिक संपत्ती या मूठभर लोकांच्या हातात जनतेची अधिक पिळवणूक करण्याकरिता राहू न देता, जर देशाच्या औद्यागिक विकासार्थ उपयोगात आणली तर देशाची अधिक प्रगती साधून लोक कल्याण होऊ शकेल. असे अत्यंत अभ्यासपूर्ण प्रतिपादन भाऊसाहेबांनी या विधेयकाबाबत मांडले.

८.शेतकरी संघाची स्थापना:-

विदर्भात शैक्षणिक समस्येबरोबर शेतीची समस्या तीव्र होती. शेतकरी जगला पाहिजे, शेतीचे प्रश्न सुटले पाहिजेत. यासाठी पंजाबरावांनी पुढाकार घेतला. १९२७,च्याच विजयादशमी दिवशी 'शेतकरी संघ' स्थापना केली. शेतकरी संघ हा सर्व जाती-जमातींच्या शेतकऱ्यांसाठी आहे, विशिष्ट जातीपुरता तो मर्यादित नाही, अशी भूमिका त्यांनी मांडली. शेतकरी संघाची स्थापना ही पंजाबरावांच्या दूरदृष्टीचे पाऊल होते.

९.पंचवार्षिक योजनांसंदर्भात त्यांच्या विचारांचे महत्व:-

दोन पंचवार्षिक योजनांसंदर्भात त्यांनी भारताचे अन्नस्वावलंबन साध्य केले, योग्य भाव निर्धारित केले, नगदी पिकांना उत्तेजन दिले. जपानी भातशेतीचा प्रयोग १९५२ पासून भारतात यशस्वीपणे राबविला. त्यामुळे तांदूळ उत्पादनाचे तज्ज्ञ म्हणून ते आंतरराष्ट्रीय स्तरावर ओळखले गेले. त्याबरोबरच शेतकऱ्यांना कर्जे, पतपुरवठा करणाऱ्या विविध राष्ट्रीय यंत्रणा त्यांनी उभारल्या. शेतकऱ्यांच्या सर्वांगीण प्रगतीसाठी अनेक कृषीविषयक संस्था त्यांनी स्थापन केल्या. अनेक लोकोपयोगी कायदे करून त्यांची अंमलबजावणी

केली आणि कृषी विकासाचा पाया घातला. शेतकऱ्यांसाठी त्यांनी १९५५ साली अराजकीय व जातपातविरहित अशी भारत कृषक समाज ही संस्था स्थापन केली. ही भारतातील हरितक्रांतीची उद्गाती राष्ट्रीय संस्था मानली जाते. या समाजामार्फत त्यांनी प्रदर्शने, परिषदा, कृषक मेळावे इत्यादींसारख्या कार्यक्रमांतून अधिक भरीव अशी कामगिरी केली.

१०. विविध योजना-संघटना:-

जपानी भातशेती प्रयोग , तत्कालीन भारताचे अन्नस्वावलंबन, शेतकऱ्यांच्या पिकांची विमा योजना, शेतकऱ्यांच्या विकासासाठी भारत कृषक समाज (१९५५) , युवक कृषक समाज (१९५६), शेतकरी बँक (१९६१) , अखिल भारतीय मधमाशी पालक संघटना (१९५३),अखिल भारतीय अखाद्य तेलबिया संघटना (१९५४), लाखोंकरिता अन्न संघटना (१९५५) , अखिल भारतीय ताडगूळ महासंघ (१९५५), राष्ट्रीय कृषी सहकारी खरेदी - विक्री संघ (१९५८), भारत कृषक सहकारी अधिकोष (१९६०) इत्यादी अनेक संस्थाची उभारणी त्यांनी केली. आंतरराष्ट्रीय शेतकऱ्यांचा आदान - प्रदान कार्यक्रम, कुक्कुट पालन, दुग्धउत्पादन, मत्स्यपालन इ. जोडधंदे, प्रोत्साहन , शेतकऱ्यांचे अभ्यास दौरे आदींना त्यांनी प्रोत्साहन दिले. अमेरिकेतील लँड - ग्रँड कॉलेजच्या धर्तीवर भारतातही प्रत्येक राज्यात एक कृषी विद्यापीठ स्थापन करण्याची योजना अंमलात आणून त्यानुसार भारतातील पहिले कृषी विद्यापीठ उत्तर प्रदेशातील पंतनगर या ठिकाणी सुरू झाले . महाराष्ट्रात सुरुवातीला अकोला व राहुरी अशी दोन कृषी विद्यापीठे सुरू झाली .

निष्कर्ष-(Conclusion)

१) शेतकरी व्यवसायात व्यापारात फार उंचीवर पोहोचला नसला तरी देखील लहान.मोठे व्यापार करण्याची तो हिम्मत करतांना दिसतो आहे.

२) शेतकरी गावाच्या आर्थिक विकासात सहभागी झाला आहे.

३) कृषी महाविद्यालयाचे आणि कृषी विद्यापिठांचे संशोधन गाव खेडयापर्यंत पोहोचते आहे.

४) संशोधनातुन शेतकरी नवनवे प्रयोग करण्यास प्रोत्साहित होत आहे.

५) देशातील शेतकरी उत्पादन वाढीकरिता नवनव्या संकरीत बी-बियाण्यांचा उपयोग करत आहे.

६) जगातील अनेक इतर देश उद्योग धंद्याप्रमाणेच शेती क्षेत्रातही आधुनिकीकरण, विज्ञान तंत्रज्ञान, नवीन सुधारित बियाणे, औषधी व अत्याधुनिक अवजारांचा उपयोग कृषी क्षेत्रात होऊन एकरी उत्पादनात वाढ झालेली आहे.

संदर्भसूची-(References)

१)लोकमहर्षी भाऊसाहेब डॉ.पंजाबराव देशमुख गौरव ग्रंथ महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती. मंडळ मुंबई

२)स्मरणिका- शिक्षण महर्षी डॉ. पंजाबराव देशमुख जन्मशताब्दी महोत्सव १९९७-९८.

३)डॉ पंजाबराव देशमुख यांचे जीवन व कार्य एक ऐतिहासिक अभ्यास-पी.एच.डी. प्रबंध,२०१६ कदम अतिश माधवराव

४) डॉ पंजाबराव देशमुख यांचे कृषिविषयक आर्थिक विचार,नभ प्रकाशन -रविंद्र ढाले

४) https://vishwakosh.marathi.gov.in/18622/

४) https://www.dnyansagar.in/2021/12/Panjabrao-Deshmukh.html

५)https://maharashtratimes.com/editorial/article/prof-prakash-ghavghave-article-on-

६)indias-first-agriculture-minister-dr-panjabrao-deshmukh/articleshow/80732474.cms

७)https://www.evivek.com/Encyc/2017/12/27/Shikshan-Maharshi-Dr-Panjabrao-Deshmukh.amp.html
८)https://www.bytesofindia.com/newsdetails/?NewsId=4866878430371019285&title=Punjabrao%20Deshmukh&SectionId=1002&SectionName=Be%20Positive

डॉ.पंजाबराव देशमुख यांचे शेती आणि शेतकर्यांच्या आर्थिक विकास विषयक विचार

डॉ. कुमुदिनी भाऊराव जोगी
अर्थशास्त्र विभाग प्रमुख
जगदंब महाविद्यालय,अचलपुर
मो.न. – ९४२१३९४१४१
ई-मेल-kumudinijogi@gmail.com
म.अ.परिषद सभासद क्र.-१५५३

प्रस्तावना-

सन १९५१ मधे भारतातील ७० प्रतिशत पेक्षा जास्त लोकसंख्या उपजीवीकेकरीता कृषिक्षेत्रावर निर्भर होती तर एकूण राष्ट्रीय उत्पन्नामधे जवळपास ६० प्रतिशत वाटा कृषिक्षेत्राचा होता आणि एखाद्या राष्ट्राचे कृषिक्षेत्रावरील अवलंबित्व ८० प्रतिशत वरून २० प्रतिशत पर्यत कमी करणे म्हणजे आर्थिक विकास अशी व्याख्या आर्थिक विकासची केली जाते.या अर्थाने तत्कालीन स्थितीमधे भारतीय अर्थव्यवस्था , भारतीय कृषिक्षेत्र आणि शेतकरी अत्यंत मागासलेले होते. दारिद्र्य ,अज्ञान,कर्जबाजारीपणा,शेती कसण्याचे पारंपारीक जुनाट तंत्र परिणामी शेतीची कमी उत्पादकता व शेतकर्यांचे उत्पन्न कमी अशा स्वरूपाच्या दृष्टचक्रात भारतीय शेती आणि शेतकरी अडकला होता. देश नुकताच पारतंत्र्याच्या जोखडातून मुक्त झाला होता त्यामुळे अनेक आव्हाने भारतीय अर्थव्यवस्थेसमोर होती.या पार्श्वभूमीवर स्वतंत्र भारताचे पहिले कृषिमंत्री डॉ.पंजाबराव देशमुख यांचे शेती आणि शेतकर्यांच्या आर्थिक विकासा संदर्भातील विचार आणि भगीरथ प्रयत्नांचा विश्लेषणात्मक अभ्यास करण्याचा प्रयत्न सदर शोधनिबंधात केला आहे.

कौटुंबिक पार्श्वभूमी व शिक्षण-

डॉ.पंजाबराव देशमुखांचा जन्म अमरावती जिल्ह्यातील ‘पापळ ’ या खेड्यात २७ डिसेंबर १८९८ रोजी एका शेतकरी कुटुंबात झाला.इतर शेतकरी कटुंबासारखीच दैन्यावस्था डॉ.पंजाबराव देशमुख यांच्या कुटुंबाची होती.त्यांचे प्राथमिक शिक्षण पापळ येथेच पुर्ण झाले तर माध्यमिक शिक्षण अमरावती येथे पुर्ण झाले. त्यानंतर पदविचे शिक्षण घेण्यासाठी ते फर्ग्यूसन महाविद्यालय ,पुणे येथे दाखल झाले मात्र पदवी पुर्ण होण्याआधीच ते उच्च शिक्षणा करीता सन१९२०मध्ये इंग्लडला गेले.तेथे त्यांनी एम.ए.एंडिबरोविद्यापीठातून,तर डी .फिल. व लॉची पदवी ऑक्सफर्ड विद्यापीठातून प्राप्त केली.इतकेच नव्हे तर ‘ वैदिक वाङःमयातील धर्माचा उद्गगम आणि विकास’ हा प्रबंध लिहून आचार्य पदवी प्राप्त केली. काही काळ ऑक्सफर्ड विद्यापीठात संस्कृतचे संशोधक म्हणून काम केल्या नंतर १९२६ मधे ते भारतात परत आले.येथूनच त्यांच्या भारतातील सामाजिक ,राजकीय तथा कृषि सुधारणा विषयक कार्याला सुरूवात झाली. डॉ.पंजाबराव देशमुख यांच्या शेती आणि शेतकर्यांच्या आर्थिक विकास विषयक विचारांचा परामर्ष पुढील मुख्य मुद्यांच्या आधारे घेण्याचा प्रयत्न केला आहे.

डॉ.पंजाबराव देशमुख यांचे शेती आणि शेतकर्यांच्या आर्थिक विकास विषयक विचार -

डॉ.पंजाबराव देशमुख स्वतंत्र भारताचे पहिले कृषिमंत्री (१९५२- १९६२) होते .ते शेतकरी पुत्र असल्यामुळे त्यांना कृषि विषयक प्रश्नांची प्रकर्षाने जाण होती .जगामधे अनेक लोकचळवळी व जनआंदोलने झालीत ,परंतु या सर्व चळवळी व आंदोलने त्यावेळच्या एखाद्या विशिष्ठ सामाजिक किंवा धार्मिक प्रश्नांशी निगडीत

होत्या. स्वतंत्र्यापूर्वी भारतात झालेल्या चळवळी देखील राजकीय व सामाजिक होत्या.या सर्व चळवळीमधे कुठेही शेती व्यवस्था व शेतकरी केंद्रस्थानी असलेला दिसत नाही . डॉ.पंजाबराव देशमुख यांनी प्रथमच अशी लोकचळवळ भारतात ऊभी केली.त्यांची ही लोकचळवळ कृषि विकास ,शिक्षण व्यवस्था व सामाजिक सुधारणा या त्रिसुत्रीवर अधारीत होती. डॉ.पंजाबराव देशमुख हे कृतीशिल कार्यकर्ते असल्यामुळे त्यांनी कृषिमंत्री असतांना आणि भारत स्वतंत्र होण्यापूर्वी केलेल्या कार्य़ातूनच त्यांचे शेती आणि शेतकर्यांच्या आर्थिक विकास विषयक विचार स्पष्ट होतात.

१) मराठी वृत्तपत्र केसरीची स्थापना-

सन १९२७ मध्ये डॉ.पंजाबराव देशमुखांनी शेतकरी समाजाला चालना मिळावी, कृषि विषयक ज्ञानाचा प्रचार व प्रसार व्हावा या हेतूने 'केसरी' हे मराठी वृत्तपत्र सुरू केले.

२) शिक्षण ,कृषि,सहकार,व लोककर्म खात्याचे मंत्री-

डॉ.पंजाबराव देशमुख यांचे कृषि आणि शिक्षण क्षेत्रातील कार्य पाहून त्यांना १९३० मध्ये सर मॉटेंग्यु बटलर मंत्रिमंडळात शिक्षण ,कृषि,सहकार,व लोककर्म खात्याचे मंत्री बनविण्यात आले होते. त्यामुळे त्यांच्या कृषि विषयक कार्याला गती प्राप्त झाली.

३) भारत कृषक समाजाची स्थापना-

दिनांक ७ फेब्रुवरी १९५५ रोजी डॉ.पंजाबराव देशमुख यांनी ' भारत कृषक समाजाची 'स्थापना केली.ही भारतातील हरीतक्रांतीची उद्गगाती राष्ट्रीय संस्था मानली जाते.या संस्थेमार्फत त्यांनी एकीकडे कृषि प्रदर्शने , कृषि विषयक परिषदा, कृषक मेळावे इत्यादी सारख्या उपक्रमांच्या माध्यमातून भारतीय शेतकर्यानां जगातील इतर देशाच्या शेतीव्यवसायाची ओळख करून दिली. तर त्याचवेळी दुसरीकडे भारतीय शेतीला जगाच्या पटलावर आणण्याचा प्रयत्न केला. तसेच कृषि विकास हा समान उद्देश असणार्या शेतकर्याचे संघटन करून सामुहिक प्रयत्नांना चालनाही त्यांनी दिली.

४) युवक कृषक समाजाची स्थापना-

१९५५ मधे भारतकृषक समाजाचीस्थापना केल्या नंतर लगेच १९५६ मधे डॉ.पंजाबराव देशमुख यांनी'युवक कृषक समाजाची' स्थापना करून देशातील युवक शक्तीला विधायक दिशेने वळविण्याचाव कृषि विकासाला चालना देण्याचा प्रयत्न केला .तसेच त्यांनी अखिल भारतीय ग्रामीण महिला संघाचीही स्थापना केली .यावरून डॉ.पंजाबराव देशमुख यांचे कृषि विकास विषयक विचार सर्वसमावेशक असल्याचे निदर्शनास येते.

५) राष्ट्रीय कृषि सहकारी खरेदी – विक्री संघाची स्थापना-

जोपर्यत शेतक-यांने उत्पादित केलेल्या मालाला योग्य भाव मिळत नाही तोपर्यत शेतक-यांचे उत्पन्न वाढणार नाही आणि त्याला दारिद्र्याच्या गर्तेतून बाहेर काढणे शक्य होणार नाही ही बाब लक्षात घेऊन डॉ.पंजाबराव देशमुख यांनी सन १९५८ मधे राष्ट्रीय कृषि सहकारी खरेदी विक्री संघाची स्थापना केली.

६) जागतीक कृषि प्रदर्शन-

दिनांक ११डिसेंबर १९५९ ते २९ फेब्रुवरी १९६० या दरम्यान दिल्ली येथे डॉ.पंजाबराव देशमुख यांनी भारत कृषक समाजाच्या माध्यमातून जागतीक कृषि प्रदर्शनीचे आयोजन केले होते .यामधे आमेरीका,रशिया,पोलंड,फ्रान्स,ब्रिटन,कोरीया,इराण,सिलोन,मंगोलिया,अफगाणिस्थान,व्हिएतनाम ,ब्रम्हप्रदेश,झेकोस्लोव्हाकिया,जर्मनी इत्यादी राष्ट्रे सहभागी झाली होती.तर हे प्रदर्शन पाहण्याकरीता देश

–विदेशातून लाखो शेतकरी आले होते.९२ दिवस चाललेले हे प्रदर्शन जवळजवळ २ कोटी लोकांनी पाहिले होते.हे प्रदर्शन भरवून डॉ.पंजाबराव देशमुखांनी भारतातील शेतकर्यानांपुढारलेल्या व विज्ञनवादी कृषितंत्रज्ञानाची माहीती करून दिली आणि नवक्रांतीच्या मार्गाने शेतीव्यवसाय करण्यास प्रवृत्त केले. शेतकर्यानां संघटीत करून नवा विचार दिला व त्यांच्या जाणीवा जागृत करण्याचा प्रयत्न या प्रदर्शनीच्या माध्यमातून केल्याचे दिसुन येते.डॉ.पंजाबराव देशमुख यांच्या या प्रयत्नातून त्यांच्या द्रष्ट्येपनाची प्रचीती येते.

७) कृषि विद्यापीठाची स्थापना-

१७ नोव्हेंबर १९६० मधे पंतनगर (उत्तराखंड) येथे भारतातील पहिले कृषि विद्यापीठ डॉ.पंजाबराव देशमुख यांच्या पुढाकाराने स्थापन करण्यात आले.या विद्यापीठाच्या निर्मीती करीतापंतनगरला हरीतक्रांतीचे हर्बिजरअसे वर्णन करणा-या जागतिक हरीतक्रांतीचे जनक डॉ. नॉर्मन बोलॉग यांचे योगदान लाभले होते. पंतनगरचे हे विद्यापीठ

म्हणजे भारत आणि अमेरीका यांच्या यशस्वी भागीदारीचे प्रतिक मानले जाते.यातुनच डॉ.पंजाबराव देशमुख यांनी कृषि क्षेत्रात घेतलेल्या मुत्सद्दी निर्णयांची प्रचीती येते.

८) सहकारी शेतकरी अधिकोषाची स्थापना-

कृषि विकासाच्या संघटीत प्रयत्नाची गरज ओळखून शेतक-यांना वेळेत व योग्य व्याजदराने पुरेसे कर्ज प्राप्त व्हावे या उद्देशाने डॉ.पंजाबराव देशमुख यांनी सन १९६१ मधे कृषिसहकारीशेतकरी अधिकोषाची स्थापना केली.

९) इतर कार्ये-

डॉ.पंजाबराव देशमुख यांचे शेती आणि शेतकर्यांच्या आर्थिकविकास विषयक विचारांची व कार्याची व्याप्ती ऐवढी मोठी आहे की, एका शोधनिबंधामध्ये त्याचा संपुर्ण आढावा घेणे शक्य नाही म्हणून या ठीकाणी वरील कार्याशिवाय त्यांच्या कृषि विकास विषयक इतर कार्याचा उल्लेख केलेला आहे जसे की,अखिल भारतीय मधुमक्षिका पालन संघटनेची स्थापना,१९५३, अध्यक्ष, विश्व वन कॉग्रेसव आंतरराष्ट्रीय धान्य मंडळ,१९५४, आंतरराष्ट्रीय तांदूळ परीषदेचे अध्यक्ष,१९५६, भारतीयकृषि यंत्रसामुग्री संघटनेचे संस्थापक अध्यक्ष,१९५८ , अखिल भारतीय ताडगुळ महासभा संस्थापक अध्यक्ष, १९५८ , भारतीयकृषि शास्त्र संस्थेचे संस्थापकअध्यक्ष, १९५९, भारतीय घटक राज्यातील शेतकी मंडळाचे नेते म्हणून रशियास भेट,१९६०, आंतरराष्ट्रीय ग्रामीण युवक परीषदेचे अध्यक्ष,१९६२, भारत कृषक समाजाच्या कार्यासाठी न्युझीलंडला दौरा, १९६४ इत्यादी.

समारोप-

उपरोक्त विवेचनाच्या आधारे डॉ.पंजाबराव देशमुख यांच्या शेती आणि शेतकर्यांच्या आर्थिक विकास विषयक विचारांचे अवलोकन केले असता काही बाबी ठळकपणे समोर येतात.

द्रष्ट्ये विचारवंत-

डॉ.पंजाबराव देशमुख हे अत्यंत द्रष्ट्ये विचारवंत होते.प्रत्येक कृती आणि प्रयत्न करीत असतांना त्यांनी दुरगामी विचार केल्याचे दिसून येते.काळाची पावले ओळखून त्यांनी शेती आणि शेतकर्यांच्या आर्थिक विकास विषयक धोरण ठरविल्याचे लक्षात येते.

संघटीत प्रयत्नांवर भर-

डॉ.पंजाबराव देशमुख यांनी संघटीत प्रयत्नांवर भर दिला. निरनिराळ्या संघटनांच्या माध्यमातून समाजातील सर्व शेतकरी, तरूण व महिला वर्गाला एकत्रीत आणून सामुहिकपणे शेती आणि शेतकर्यांचा आर्थिकविकास साधण्याचा प्रयत्न केला असल्याचे निदर्शनास येते.

सर्वसमावेशकधोरण-

डॉ.पंजाबराव देशमुख यांनीशेती आणि शेतकर्यांच्या आर्थिक विकास विषयककेलेले प्रयत्न हे सर्वसमावेशक असल्याचेलक्षातयेते.समाजातील कुठलाही घटक सुधारणंपासुन वंचीत राहणार नाही याची त्यांनी प्रकर्षाने काळजी घेतल्याचे दिसुन येते.

शेतीविकासाकासाच्या सर्व घटकांचा विचार-

डॉ.पंजाबराव देशमुख यांनीशेतीविकासाकरीता आवश्यक सर्वच घटकांचा विचार केल्याचे दिसते. राष्ट्रीय कृषि सहकारी खरेदी विक्री संघाची स्थापना ,कृषि सहकारी शेतकरी अधिकोषाचीस्थापना, कृषि यंत्रसामुग्री करीतासंघटनेची स्थापना याचाच अर्थ कृषि विकासाच्या मुलभूत बाबींच्या उपलब्धतेकडे त्यांचा कल होता.

भारतीय शेतीला आंतरराष्ट्रीय स्तरावर नेण्याचा प्रयत्न-

भारतीय शेतीला आंतरराष्ट्रीय स्तरावर नेण्याचा व भारतीय शेतक-याला जगातील विविध देशातील शेती कसण्याच्या पध्दतीची ओळख करून देण्याचा प्रयत्न डॉ.पंजाबराव देशमुख यांनी केला.जागतीक स्तरावरील कृषि प्रदर्शनीचे आयोजन त्यांनी केलेच शिवाय आपल्या प्रत्येक विदेशी दौ-यामधे तेथील कृषि पध्दतीचे निरीक्षण करून त्याच्या नोंदी ठेऊन भारतात आल्यावर भारतीय शेतक-यांशी त्यावर चर्चा करून त्यानां त्याचा अवलंब करण्याबाबत प्रेरीत करण्याचा प्रयत्नही त्यांनी केला.यावरून भारतीयकृषिविकासाच्या त्यांच्या ध्यासाची तीव्रता लक्षात येते.

शेतक-यांच्या दृष्टीकोनात अमुलाग्र बदल आणण्याचा प्रयत्न-

भारतीय शेती पारंपारीक व निर्वाह स्वरूपाची होती त्यामुळे शेती कसण्याकरीता जुनाटतंत्राचा वापर शेतकरी करीत होते तसेच केवळ खाद्यपिके घेण्याकडे शेतक-यांचा कल होता. मात्र डॉ. पंजाबराव देशमुख यांनीविविधप्रयत्नांच्या माध्यमातून शेतक-यांच्या दृष्टीकोनात अमुलाग्र बदल घडवून आणण्याचा सतत प्रयत्न केल्याचे दिसुन येते.

अशा प्रकारचे विविध प्रयत्न डॉ.पंजाबराव देशमुखयांनी केले असले तरी तसेच भारतातील हरीतक्रांतीची सुरूवात ही डॉ. पंजाबराव देशमुख कृषिमंत्री असतांनाच झाली असल्याने त्यांचे हरीतक्रांतील महत्व र्निविवाद आहे असे असले तरी त्याचे पुरेशे श्रेय त्यांना दिले जात असल्याचे दिसत नाही. तसेच त्यांनी शेती व शेतकयांच्या विकासाच्या संघटीत प्रयत्नांची गरज ओळखुन स्थापन केलेल्या संघटना आज कार्यशील दिसत नाहीत.आजही शेतकरी विविध समस्यांनी ग्रस्त आहे. म्हणून त्यांच्या शेती विकासविषयक विचारांना उजाळा देण्याची नितांत गरज प्रतीत होते.

गोषवारा-

सन १९५१ मधे भारतातील ७० प्रतिशत पेक्षा जास्त लोकसंख्या उपजीवीकेकरीतातर एकूण राष्ट्रीय उत्पन्नामधे जवळपास ६० प्रतिशत वाटा कृषिक्षेत्राचा होता..या पार्श्वभूमीवर स्वतंत्र भारताचे पहिले कृषिमंत्री डॉ.पंजाबराव देशमुख यांचे शेती आणि शेतकर्यांच्या आर्थिक विकासा संदर्भातील विचार आणि भगीरथ प्रयत्नांचा विश्लेषणात्मक अभ्यास करण्याचा प्रयत्न सदर शोधनिबंधात केला आहे.डॉ.पंजाबराव देशमुखांचा जन्म अमरावती जिल्ह्यातील ' पापळ ' या खेड्यात २७ डिसेंबर १८९८ रोजी एका शेतकरी कुटुंबात झाला.इतर शेतकरी कटुंबासारखीच दैन्यावस्था डॉ.पंजाबराव देशमुख यांच्या कुटुंबाची होती.डॉ.पंजाबराव

देशमुख यांच्या शेती आणि शेतकर्यांच्या आर्थिक विकास विषयक विचारांचा परामर्ष पुढील मुख्य मुद्यांच्या आधारे घेण्याचा प्रयत्न केला आहे.

डॉ.पंजाबराव देशमुख स्वतंत्र भारताचे पहिले कृषिमंत्री (१९५२- १९६२) होते.त्यांनी प्रथमचशेती व्यवस्था व शेतकरी केंद्रस्थानी असलेली लोकचळवळ भारतात ऊभी केली.त्यांची ही लोकचळवळ कृषि विकास ,शिक्षण व्यवस्था व सामाजिक सुधारणा या त्रिसुत्रीवर अधारीत होती. ते कृतीशिल कार्यकर्ते असल्यामुळे त्यांच्या कार्यातूनच त्यांचे शेती आणि शेतकर्यांच्या आर्थिक विकास विषयक विचार स्पष्ट होतात.

दिनांक ७ फेब्रुवरी १९५५ रोजी डॉ.पंजाबराव देशमुख यांनी ' भारत कृषक समाजाची 'स्थापना केली. सन १९५६ मधे 'युवक कृषक समाजाची' स्थापना केली. सन १९५८ मधे राष्ट्रीय कृषि सहकारी खरेदी विक्री संघाची स्थापना केली.दिनांक ११डिसेंबर १९५९ ते २९ फेब्रुवरी १९६० या दरम्यान दिल्ली येथे भारत कृषक समाजाच्या माध्यमातून जागतीक कृषि प्रदर्शनीचे आयोजन केले होते .१७ नोव्हेंबर १९६० मधे पंतनगर (उत्तराखंड) येथे भारतातील पहिले कृषि विद्यापीठ त्यांच्या पुढाकाराने स्थापन करण्यात आले.सन १९६१ मधे कृषि सहकारी शेतकरी अधिकोषाची स्थापना केली. या कार्याशिवाय त्यांच्या कृषि विकास विषयक इतर अनेककार्ये त्यांनी केली.

उपरोक्त विवेचनाच्या आधारे डॉ.पंजाबराव देशमुख यांच्या शेती आणि शेतकर्यांच्या आर्थिक विकास विषयक विचारांचे अवलोकन केले असता काही बाबी ठळकपणे समोर येतात. डॉ.पंजाबराव देशमुख हे अत्यंत द्रष्ट्ये विचारवंत होते. त्यांनी संघटीत प्रयत्नांवर भर दिला. त्यांचेप्रयत्न सर्वसमावेशक असल्याचे लक्षात येते.त्यांनी शेती विकासाकरीता आवश्यक सर्वच घटकांचा विचार केल्याचे दिसते.भारतीय शेतीला आंतरराष्ट्रीय स्तरावर नेण्याचा व भारतीय शेतक-याला जगातील विविध देशातील शेती कसण्याच्या पध्दतीची ओळख करून देण्याचा प्रयत्न त्यांनी केला.शेतक-यांच्या दृष्टीकोनात अमुलाग्र बदल घडवून आणण्याचा सतत प्रयत्नडॉ.पंजाबराव देशमुख यांनी केल्याचे दिसुन येते. आजही भारतीय शेतकरी विविध समस्यांनी ग्रस्त आहे. म्हणून त्यांच्या शेती विकासविषयक विचारांना उजाळा देण्याची नितांत गरज प्रतीत होते.

संदर्भ सूची-

१) सुदाम सावरकर व/ दा.ब. सुर्यकर- भाऊसाहेब डॉ.पंजाबराव देशमुख जीवन व कार्य, १९६४

२) ना. पा. नागपूरे- डॉ.पंजाबराव ऊर्फ भाऊसाहेबदेशमुख,विविध गुणदर्शन,१९६५

३)नितिन रिढे- लोकनेते डॉ.पंजाबराव देशमुख,२०१०

४) लोकराज्य -डॉ.पंजाबराव देशमुख विशेषांक ,मार्च २००१

डॉ. पंजाबराव देशमुख यांचे आर्थिक विचार

नाव:- डॉ. भोकसे उमेश चिंधु
सभासद नंबर :- 1766
साहेबरावजी बुट्टेपाटील महाविद्यालय, राजगुरुनगर
Mail id :- 2018economy@gmail.com
नाव:- (प्रो.) डॉ. मोहन किसनराव चौधरी
सभासद नंबर :- 702
प्रा.रामकृष्ण मोरे महाविद्यालय,आकुर्डी.

घोषवारा :-

शेतकरी वर्गाच्या सुरक्षित आणि पूरक विकासाभिमुख वाटचालीला धोरणात्मक प्राधान्य द्यावे तसेच भूमी, श्रम, भांडवल व संयोजक या घटकांमध्ये समन्वय घडवून आणण्यासाठी बहुसंख्य शेतकऱ्यांसाठी रचनात्मक प्रणाली अमलात आणणे आवश्यक आहे. ही बाब त्यांनी निदर्शनास आणून देण्याचा वारंवार प्रयत्न केला, त्याकरिता त्यांनी पुस्तकांच्या वर्तमानकालीन आणि भविष्यकालीन हिताकडे आपले लक्ष केंद्रित केले होते व त्या माध्यमातून दीर्घकालीन लाभ मिळवून देण्याचा असफल प्रयत्न केला होता. अशा स्वरुपात समन्वय कोणत्या बाबतीत घडून आणायचा तो अर्थव्यवस्थेतील संपूर्ण वर्गाचे हित कसे साधायचे आणि त्यासाठी महत्त्वपूर्ण निर्णय कसे घ्यायचे. या प्रश्नाच्या संदर्भात डॉ. पंजाबराव देशमुख यांनी महत्त्वपूर्ण कृषिविषयक विचारांचे मंथन केले. आपल्या देशातील संपूर्ण आर्थिक प्रणाली आणि उद्योग व्यवस्था आणि त्या उद्योगप्रधान यंत्रणेचा उपयोग समाजाच्या जवळ असणारी उत्पादनाची संसाधने वापरण्याची पद्धती आणि प्रेरणात्मक व गुणात्मक यातून व्यवस्था निर्माण करायचे असते. या दृष्टीने त्यांनी आपली शासनाची भूमिका पार पाडली होती. त्यांच्या आर्थिक कल्याणाकरिता भारतीय पर्यावरणाला अनुसरून उपक्रमांचे नियोजन करणे काळाची गरज आहे हे आवर्जून शासनाच्या लक्षात आणून देण्याच्या त्यांनी निरंतर प्रयत्न केला. या देशातील मानवी घटक यंत्रणा त्यांची सवयी कृती व उत्पादन कौशल्य यांच्या गुणवैशिष्ट्येवरच साधारणपणे बहुआयामी विकास अवलंबून राहणार आहे. भारताजवळ कृषी मनुष्यबळ भरपूर आहे. म्हणून कृषी अर्थशास्त्र प्रणालीवर आधारित आपले विचार प्रणाली त्यांनी अमलात आणण्याचा प्रयत्न केला होता. अशाप्रकारे सहकारी चळवळीसंबंधी आर्थिक उपाययोजना, कृषी सहकारातील प्रतिमान, कर्जमुक्ती विधेयक (1931), कृषी उत्पादन वाढ, कर चुकविणाऱ्याना शिक्षा किंवा काळाबाजार विषयक विधेयक, ग्रामीण अर्थव्यवस्था आणि शिक्षण, माती परीक्षण आणि शिक्षण व कृषी अर्थव्यवस्था आणि संशोधन प्रणाली अशा प्रकारे वरील मुद्दे यांच्या सहाय्याने आर्थिक विचार स्पष्ट करता येतात.

प्रस्तावना :-

भारत हा कृषिप्रधान देश आहे. 1991 च्या अगोदर म्हणजे अठराव्या व एकोणिसाव्या शतकात 80 टक्के लोकसंख्या शेतीवर अवलंबून होती. या अर्थव्यवस्थेला अनुसरून डॉ. पंजाबराव देशमुख यांनी कृषी विकास हाच भारतीय अर्थव्यवस्थेचा महत्त्वाचा टप्पा ठरविला व शेती क्षेत्राच्या विकासाचे ध्येय डोळ्यासमोर ठेवले. शेतकऱ्यांना दारिद्र्यातून मुक्त केल्याशिवाय शेतीचा विकास होणार नाही, त्यामुळे देश समृद्ध होणार नाही. शेती म्हणजेच शेतकरी व शेतमजूर भारतीय समाजव्यवस्थेचा व प्रामुख्याने अर्थव्यवस्थेचा कणा आहे. देशांमध्ये आर्थिक विकासाच्या नावाखाली अनेक चळवळी व आंदोलने झाली ती

राजकीय व सामाजिक स्वरूपाची होती. परंतु, त्यामध्ये शेतकरी केंद्रस्थानी नव्हता. दुष्काळ, नापीक क्षेत्र, सावकाराकडून होणारी पिळवणूक, अपुरा वित्तपुरवठा, बदलते हवामान अशा समस्यांमधून शेतीक्षेत्राला मुक्त करणे हे आव्हान होते. हे आवाहन दूर करण्यासाठी डॉ. पंजाबराव देशमुख यांनी भारत देशात प्रथमच एक चळवळ उभी केली ती त्रिसूत्रीवर आधारित होती. ती म्हणजे कृषी विकास शिक्षण संस्था व सामाजिक सुधारणा या चळवळीसाठी देशमुख यांनी आपले आयुष्य, आपली जमीन, पैसा, विद्वत्ता, प्रतिष्ठा या चळवळीत झोकून दिली. शेती विकासासाठी शेतकऱ्यांच्या प्रत्यक्ष शेतात जाऊन विकसित तंत्रज्ञानाविषयी माहिती करून दिली. त्यामुळे शेतीचे उत्पादन वाढविण्यास मदत झाली. भारताचे प्रथम कृषीमंत्री होण्याअगोदर व कृषिमंत्री असताना सरकारमध्ये राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय क्षेत्रात अन्न, कृषि, वन, मत्स्योत्पादन, ग्रामीण पुनर्रचना व कृषी उत्पादकाचे संघटन या क्षेत्रात त्यांचे कार्य शेतकऱ्यांच्या हिताचे ठरले आहे. त्यांचा शेतकऱ्यांना कर्जातून मुक्तता करण्यासाठी "कर्ज लवाद कायदा" संमत करण्यात मोठा वाटा होता. त्यामुळे त्यांना हिंदुस्थानच्या कृषक क्रांतीचे जनक म्हणतात.

संशोधन उद्दिष्ट :-

1. डॉ. पंजाबराव देशमुख यांचे कृषी विषयक विचार अभ्यासणे.
2. दारिद्र्य व अज्ञान दूर करण्यासाठी केलेल्या उपाययोजनांचा अभ्यास करणे.
3. ग्रामीण अर्थव्यवस्थेच्या विकासासाठी केलेल्या उपाययोजनांचा आढावा घेणे.
4. शिक्षण व ग्रामीण विकास यामधील सहसंबंध अभ्यासणे.
5. विकसित तंत्रज्ञानामुळे शेती क्षेत्राचा झालेला विकास अभ्यासणे.

संशोधन गृहितके :-

1. डॉ. पंजाबराव देशमुख यांचे कृषी विषयक शिक्षण विकासाकरिता मार्गदर्शक ठरतात.
2. कृषी विकासाच्या माध्यमातून ग्रामीण अर्थव्यवस्था पर्यायाने देशाची अर्थव्यवस्था बळकट होते.

संशोधन पद्धती :-

प्रस्तुत शोधनिबंधाच्या पुर्तते करिता दुय्यम स्रोतांचा अवलंब करून तथ्य संकलन केले आहे. दुय्यम स्रोत म्हणून नियतकालिके, संदर्भग्रंथ, संबंधित विषयाला अनुसरून संकेतस्थळ (इंटरनेट), मासिके, वर्तमानपत्रे, विविध संशोधनपर लेख व संदर्भपुस्तके इत्यादींचा वापर केला आहे.

माहिती विश्लेषण/आर्थिक विचार/उपाय योजना :-

1.सहकारी चळवळीसंबंधी आर्थिक उपाययोजना-

सहकार चळवळीविषयी विचार मांडताना सरकारने प्रयत्न करून सहकारी संस्था निर्माण करून सुव्यवस्थित व्यवस्थापन करावे. सरकारच्या उपाययोजना सहकारी चळवळीला समृद्ध करणारे आणि आर्थिक परिस्थितीत सुधारणा करणारे असावे. सहकारी संस्थांनी आपला आर्थिक लाभ (नफा, उत्पन्न) राजकीय पक्षांना देऊ नये. सरकारने सहकारी संस्थांना कर्ज द्यावे. त्यासाठी वित्तीय केंद्र स्थापन करण्यास परवानगी द्यावी. तसेच भविष्य निर्वाह निधी व सुरक्षित धन योजना निर्माण करावी. सहकार चळवळ ज्या नवीन क्षेत्रांमध्ये हळूहळू प्रवेश करत आहे. त्यामध्ये बियाणे, खते आणि अवजारे यांसारख्या कृषी घटकांचे वितरण सहकारी संस्थांच्या एकात्मिक स्वरूपाची उत्क्रांती अल्प उत्पन्न गटातील शेतकऱ्यांना

वित्तपुरवठा करणे यांचा समावेश आहे. दुसरा प्रकार म्हणजे सहकाराची नवीन तंत्र सरकारी कर्मचाऱ्यांच्या प्रशिक्षणासाठी व्यवस्थेची अग्रेसर व्यवस्था आणि सहकारी शेतीमध्ये मोठ्या प्रमाणावर ती प्रयोग करते.

राष्ट्रीय उत्पन्नात शेतीचे महत्त्वपूर्ण योगदान आहे. म्हणून शेतमाल निर्यात करणारी बाजार व्यवस्था निर्माण करावी. संघटित सहकारी बाजार व्यवस्था ही खरेदीदार आणि उत्पादकांना फायदेशीर असते. अशा व्यवस्थेमध्ये सहकारी संस्थांना खरेदीदाराकडून जास्त किंमत मिळेल आणि दुसरीकडे खरेदीदारांना स्वस्त किमतीत चांगल्या वस्तू मिळतील म्हणून सहकारी बाजार व्यवस्था सर्व गावांमधून सुरू करण्यात यावीत. बाजाराच्या भावासंबंधी पूर्वसूचना दळणवळण इत्यादींची निर्मिती करावी. त्यामुळे कृषी उत्पादन वाढू शकते. सहकारी संस्थांना योग्य स्थान मिळवून देण्यासाठी आणि उत्पादन वाढविण्यासाठी सरकारने त्वरित मदत करायला पाहिजे, यासाठी वेळेवर पुरेसे कर्ज देण्याची व्यवस्था करावी. बियाणे, खते आणि कृषी संबंधी आवश्यक गरजांची व बाजार व्यवस्थेशी संबंधित असणाऱ्या सुविधांची निर्मिती करावी. जलसिंचनाच्या कार्यासाठी सुविधा उपलब्ध करून द्याव्यात विखुरलेले शेतांचे तुकडे हे शेती करण्यासाठी हानिकारक असतात. म्हणून चकबंदी समितीचे मार्गदर्शन घेऊन सहकार तत्त्वावर आधारित शेती करण्यात यावी.

2. कृषी सहकारातील प्रतिमान -

सहकार म्हणजे विविध मार्गाने एकत्रित कार्य करण्याची पद्धती होय. यात तत्त्वाद्वारे जगा आणि जगण्यासाठी मदत करा या तत्त्वाचा पुरस्कार केला जातो. त्यामध्ये अनुभवातून आत्मसात केलेल्या ज्ञानाची क्षमता असते आणि म्हणून अशा ज्ञानाचा परिपूर्ण अभ्यास करून जीवनाचा आर्थिक विकास घडवून आणता येतो. अशा प्रणालीला सहकार असे म्हणतात.

सहकार पूर्णपणे भांडवलशाहीचा किंवा साम्यवादाचा त्याग करीत नाही. तर ती पद्धती एका प्रणालीची चौकट आहे तर दुसऱ्या प्रणालीतील घटक एकत्र करणारा प्रवाह आहे. त्यामुळे एक सुसूत्रता निर्माण करता येते व त्यातून सुनियोजित जग निर्माण करता येते. सहकारामुळे समाजातील प्रत्येक व्यक्तीला आदान-प्रदान, उपभोगाचे, विनिमयाचे व व्यापाराचे कार्य एकत्रित करणे शक्य होते. सहकार्याच्या सेवेतून व्यक्तिगत फायदे मिळतात. शिवाय कृषी समाजाच्या गरजा आणि किंवा साध्या यांची पूर्तता होत असते. देशातील साधनांचा उत्पादन कार्यात या प्रणालीच्या माध्यमातून महत्तम वापर करता येतो. त्यामुळे व्यावसायिक तत्वे, लाभ व्यक्तिगत, व्यक्तिगत आणि सार्वजनिक कल्याण इत्यादी लोककल्याणकारी बाबीमध्ये निर्माण करता येतात आणि आर्थिक विषमतेमध्ये असणारी तफावत दूर करता येते. समाजाच्या सर्वांगीण विकास होण्यासाठी सहकार एक पाया आहे.

केवळ मूठभर लोकांच्याच भरभराटीचा मार्ग सुकर त्यातून सुख होईल. सार्वजनिक हित जोपासण्यासाठी प्रत्येकाला काम, संपत्ती आणि विश्रांती समान प्रमाणात प्राप्त होण्यासाठी सहकार्याची गरज आहे. राजकीय आणि आर्थिक यंत्रणेच्या साधनांचा सामान्य माणसांच्या हितासाठी वापर व्हायला पाहिजे. देशातील साधनांचा उपयोग जमीन कसणारे शेतकरी लहान कुटीर उद्योजक कारखान्यातील मजूर तसेच ग्रामीण भागातील सामान्य स्त्री-पुरुष यांच्याकरिता करण्यात यावा. आजपर्यंत दुर्लक्षित राहिलेल्या भारतीय कृषी समाजाचे आर्थिक हित साध्य करण्यासाठी सहकार हे प्रमुख साधन आहे. समाजातील ज्या घटकांच्या किंवा लोकांचा विकास झालेला नाही त्यांना एकत्रित करून त्यांचे शोषण थांबविले पाहिजे. तसेच त्यांची उत्पादकता आणि व्यवहार वाढविण्यासाठी त्यांच्यामध्ये संघटन निर्माण केले पाहिजे. अशा संघटनावरच भारतीय लोकशाहीचा आधार आणि आर्थिक विकासाचा ढाच्या अवलंबून आहे. भारतातील प्रांतीय संघटनांच्या माध्यमातून त्या प्रांतातील लोकांच्या मागण्या केंद्रीय व्यवस्थेपुढे मांडल्या गेल्यास त्यांना राष्ट्रीय

योजनांमध्ये स्थान मिळू शकते. त्यामुळे प्रांतीय संघटना व योजना अमलात आणू शकतात त्याद्वारे आर्थिक विकासाच्या प्रांतीय समतोल निर्माण होतो लहान लहान स्वयंशासित घटकांना भारताच्या राजकीय आणि आर्थिक संरचनेचा पाया बनविले पाहिजे. कारण, ग्रामीण भारताचा विकास हा लहान-लहान सहकारी संस्थांची निर्मिती करूनच होऊ शकतो. लहान लहान संस्था संपूर्ण भारतामध्ये निर्माण झाल्यास सहकारी उपक्रम कार्यान्वित होऊ शकतात. याद्वारे एकमेकांपासून दुरावलेले लोक संघटनेचे महत्त्व समजू शकतात. सहकारी उपक्रमांतून लोकांना व्यवसायाचे धडे शिकविले जातात. त्यातून लोकांचा विवेक जागृत होतो व ते बचत करायला शिकतात. परिणामतः देशातील दारिद्र्य निर्मूलन होऊ शकते. सहकारामुळे आर्थिकदृष्ट्या दुर्बल बांधवांना सोबत घेऊन परस्पर सहकार्य वाढीस लागते आणि यातून शेतकऱ्यांचा व्यक्तिगत आणि सामाजिक विकास साध्य होऊ शकतो.

3. कर्जमुक्ती विधेयक (1931) -

कर्ज लवाद मसुदा शेतकऱ्यांना कर्जातून मुक्त करण्यासाठी मांडला होता. या कर्ज गावात कायद्याने कर्जबाजारी शेतकऱ्यांना कर्ज मुक्तीचे व सावकाराच्या मगरमिठीतून सुटण्याचे साधन उपलब्ध झाले. त्यानंतर सावकार अवाजवी व्याज लावून कर्जदारांच्या जमिनी हडप करीत होते. या प्रकाराला पायबंद घालण्यासाठी कृषी कर्ज मुक्त विधेयक सन 1933 मध्ये मुंबई कौन्सिलमध्ये मांडले होते.

4. - निरंतर चरितार्थ शेती ही भारतीय कृषीव्यवस्थेचे एक महत्त्वपूर्ण लक्षण आहे. त्यामुळे कृषी विकासाच्या संदर्भात दोन महत्त्वपूर्ण उद्दिष्टे सतत नजरेसमोर ठेवली पाहिजेत.

1. शेती करणाऱ्या शेतकऱ्यांच्या दारिद्र्याचे निर्मूलन किंवा उच्चाटन करणे.
2. शेत जमिनीच्या निकसपणाचे म्हणजेच दारिद्र्याचे निर्मूलन करणे किंवा जमिनीची सुपीकता सुधारण्यासाठी प्रयत्न करणे हे होय. वरील उद्दिष्टे डोळ्यासमोर ठेवल्यास वरील प्रकारचे दारिद्र्य निर्मूलन प्रति एकरी उत्पादन वाढ करण्यासाठी सर्वोत्तम उपाय ठरू शकते. या वरील दोन विचारांना सरकारच्या संदर्भातील नवप्रवर्तन विचार म्हणता येईल.

5. कर चुकविणाऱ्याना शिक्षा किंवा काळाबाजार विषयक विधेयक (25 मार्च 1950)

काळाबाजार आणि भ्रष्टाचार व नफेखोरी आर्थिक विकासाच्या मार्गात अडथळा ठरतो. म्हणून काळाबाजार भ्रष्टाचार आणि नफेखोरी करणाऱ्या लोकांना गुन्हेगार ठरविण्यात यावे व त्यासाठी शिक्षेची तरतूद करण्यात यावी असे विचार त्यांनी विविध रूपाने मांडले होते.

देशात काळाबाजार किंवा नफेखोरी करणाऱ्या लोकांपासून सतर्क राहण्यासाठी डॉ. पंजाबराव देशमुख यांनी रूपाने प्रतिपादन केलेल्या विचारांना गुन्हे आणि शिक्षा यांचा सिद्धांत म्हणता येईल. साधनसामग्रीच्या भूक वादामुळे अतिरिक्त वापरामुळे भ्रष्टाचार व काळा पैसा यांना वाव मिळतो. त्यामुळे देशात भ्रष्टाचार व काळापैसा माध्यमातून बेहिशेबी आणि अवैध व्यवहार कार्यान्वित होतात. परिणामतः या बाबींचा आर्थिक विकासावर परिणाम विपरीत परिणाम घडून येतो असे त्यांचे मत होते. भ्रष्टाचार आणि काळा पैसा ही जुळी भावंडे आहेत. देशात अशा बाबींना वाव मिळाल्यास किती काळा पैसा निर्माण झाला आहे. हे शोधणे कठीण जाईल कारण हा छुपा पैसा असतो आणि हा पैसा संभाव्य काळात समांतर अर्थव्यवस्था निर्माण करू शकतो. भ्रष्टाचार आणि काळा पैसा यांचे राजकारण आणि अर्थकारण यावर गंभीर दुष्परिणाम घडून येण्याची दाट शक्यता असते. भ्रष्टाचारी गुन्हेगार काळ या पैशातून सुटका करून घेण्यासाठी

हा पैसा लाच लुचपतीसाठी वापरतात म्हणून असा पैसा शेतकऱ्यांच्या व गोरगरिबांच्या गरजांसाठी आणि आर्थिक विकासासाठी वापरला पाहिजे.

कर बुडवेगिरी आणि काळा पैसा करणाऱ्या देशद्रोही लोकांना शिक्षा करणे क्रमप्राप्त आहे असे मत डॉ. देशमुखानी मांडले जर अशा लोकांना शिक्षा झाली नाही तर ते देशांमध्ये समांतर अर्थव्यवस्था निर्माण करतील व आर्थिक विकासाला ही बाब घातक ठरेल असे मत त्यांनी विशद केले होते. अलीकडे या त्यांच्या विचारांची सत्यता आर्थिक व्यवहारांमध्ये प्रत्ययास येत आहे. डॉ. पंजाबराव देशमुख यांच्या मते अर्धा काळाबाजार काळा पैसा करणाऱ्या लोकांना शिक्षक करण्याचा प्रयत्न झालेला आहे आणि त्या माध्यमातून त्यावर नियंत्रण ठेवण्याचा प्रयत्न केला आहे. परंतु राजकीय व्यवस्थेमुळे या सर्व लोकांना पाठीशी घातले जाते व त्यांची या काळ्याबाजाराचा शिक्षेतून सुटका होत असते.

6. ग्रामीण अर्थव्यवस्था आणि शिक्षण -

ग्रामीण अर्थव्यवस्थेचे स्वरूप कसे आहे आणि त्याकरिता शिक्षकाने कोणत्या प्रकारचे कार्य करावे या विषयी मत मांडताना असे म्हटले आहे की, खेड्यात राहणाऱ्या लोकांना अन्न, वस्त्र, निवारा मिळवून देणारे शिक्षण प्रामुख्याने देशाला हवे हे शिक्षण म्हणजे मानवी संस्कृतीचा आविष्कार होईल. ग्रामीण शेती सुसंस्कृत झाल्यास देशाच्या ग्रामीण अर्थव्यवस्थेला समृद्ध करू शकतो भारतीय शेती व शेता कर यांचा आर्थिक विकास हा शिक्षणानेच होऊ शकतो. म्हणून शिक्षक प्रशिक्षण ज्ञानप्रसार सुयोग्य स्वास्थ्य व समृद्धी या बाबतीत या देशाची ग्रामीण अर्थव्यवस्था सर्वांगीण येऊ कशी होईल हे ध्येय असले पाहिजे. चिंतनातून तंत्र आत्मक शिक्षण प्रणालीचा उपयोग करणे हे साधन आहे. सामान्य माणसांच्या काही गुणांना वाव मिळून दिला म्हणजे ती मोठी कामे जबाबदारीने ठरू लागतात. म्हणून भारतातील शेतकऱ्यांना सर्व प्रकारचे तांत्रिक, यांत्रिक आणि आद्यवत शिक्षण प्रत्यक्ष त्यांच्या शेतावर जाऊन देण्याची योजना साकार करणारी कृषी महाविद्यालय निर्माण करायची आहेत. नियुक्त झालेल्या शिक्षकांनी स्वतः व विद्यार्थ्यांच्या सोयीनुसार शिकविण्याचे कार्य करावे. सुट्ट्या सामान्यतः आवश्यक प्रमाणात घ्याव्यात त्या सुट्ट्यांचा उपयोग शेती वरील कार्यासाठी करावा. उन्हाळ्यामध्ये जेव्हा फावला वेळ असतो तेव्हा त्यांनी सुट्टी घेऊ नयेत शिक्षकांचे कार्य शालेय वयातील मुलामुलींना शिकविणे एवढेच नसून प्रौढांसाठी सुद्धा त्यांनी नियमित वर्ग घ्यावेत असे मत मांडले आहे.

7. माती परीक्षण आणि शिक्षण -

जमिनीत अनेक पदार्थ असतात. शेतीच्या दृष्टीने पिकांचे अन्न म्हणून नत्र फॉस्फेट व पोटॅश या तीन द्रव्यांचे अस्तित्व जमिनीत असणे आवश्यक आहे. हे अन्नपदार्थ जमिनीत कितपत प्रमाणात उपलब्ध आहेत व कोणत्या द्रव्यांचा त्वरित पुरवठा जमिनीस करणे आवश्यक आहे. याबाबत पिके घेण्याच्या दृष्टीने समजणे आवश्यक आहे. म्हणून कृषी शास्त्राचे शिक्षण देणारी कृषी महाविद्यालय असावी असे डॉ. पंजाबराव देशमुख यांचे मत होते.

8. कृषी अर्थव्यवस्था आणि संशोधन प्रणाली-

ग्रामीण अर्थव्यवस्थेच्या क्षेत्रांमध्ये विविध समस्यांची सोडवणूक करण्यासाठी आणि त्यासंबंधित संशोधनात्मक कार्य करण्यासाठी भारतीय कृषी अर्थव्यवस्था समितीने महत्त्वपूर्ण कार्य केलेले आहे. या समस्यांचे संशोधन करून त्या सोडविण्याच्या कार्याला अतिशय महत्त्व प्राप्त झालेले आहे. भारत सरकार

क्षेत्राच्या आर्थिक व सामाजिक विकास करण्यासाठी सक्रीय स्वरुपात भाग घेत आहे. या समितीने विश्वविद्यालय, अन्य संस्था आणि केंद्रीय खाद्य व कृषी मंत्रालय तसेच योजना आयोगाद्वारे आरंभ केलेल्या संशोधनाच्या कार्याचे संलग्न करून करून त्यांचा विस्तार करावा. भारतीय कृषी संशोधन परिषद समितीने देशातील विविध भागांमधील व्यक्तिगत पातळीवर झालेल्या संशोधनात्मक कार्याचे संकलन करण्याचे कार्य करावे व ते शेतकऱ्यांपर्यंत पोहोचवावी म्हणजे देशातील कृषी उत्पादनामध्ये वाढ घडून येईल असे त्यांनी प्रतिपादन केले आहे.

संदर्भसूची :-

संतोष दास्ताने "विदर्भाचा औद्योगिक विकास" बोके प्रकाशन अमरावती
देशमुख कल्पना "डॉ. पंजाबराव देशमुख यांचे सामाजिक योगदान" प्रदीप मुळे पब्लिशर्स नागपूर-1997
तुकडोजी राष्ट्रसंत "ग्रामगीता गुरुकुंज" पब्लिशर्स मोझरी-1977
संशोधन प्रणाली पब्लिशर्स जयपूर उत्तमराव जागतिक क्रांतीचा विधाता भाग्यरेखा देशमुख पब्लिशर्स अमरावती-1983

डॉ. पंजाबराव देशमुख यांचे कृषी विषयक कार्य

डॉ. विठ्ठल घीन मिने
सहयोगी प्राध्यापक अर्थशास्त्र
श्री. साईबाबा लोक प्रबोधन कला महाविद्यालय
वडनेर ता. हिंगणघाट जि. वर्धा
आजीव सभासद क्रमांक –१५१९
मो.न.९६८९८६४२४४९
Email – vghinmine1980@gmail.com

प्रस्तावना:

डॉ पंजाबराव देशमुख यांचा उल्लेख आधुनिक भारताच्या इतिहासातील २० व्या शतकातील, एक अलौकीक व्यक्तीमत्व म्हणून केला जातो.त्यांचेसामाजिक,शैक्षणिक,राजकीय, व कृषी क्षेत्रातील कार्यअविस्मरणीय आहे. भारताच्या संविधान निर्मितीत अत्यंत हिरीरीने व मोलाचा सहभाग असलेल्या व्यक्तीमध्ये त्यांचा अग्रक्रमाने उल्लेख केला जातो आधुनिक भारताचे शिल्पकार म्हणून त्यांचे कार्य तरुणांना प्रेरणादायी आहे.२६ डिसेंबर १८९८ रोजी विदर्भातील अमरावती जिल्हातील पापळ या गावी श्यामराव व राधाबाई देशमुख या शेतकरी दाम्पत्याच्यापोटी त्यांचा जन्म झाला. ते विदर्भाचे भाग्यविधाते होतेच पण त्या सोबतच भारतीय शेतीचे उज्ज्वल भविष्य घडविण्यास त्यांचा सिंहाचा वाटा होता. अखिल भारतातील एक उतुंग, अष्टपैलू व्यक्तीमत्व व द्रष्टे समाजसुधारक म्हणून त्याचा उल्लेख केला जातो. शिक्षणप्रकार, कृषीसुधार, कृषककल्याण, अस्पृशता निवारण, कृषी, सहकार शिक्षण, लोककार्य इत्यादी करिता त्यांनी कार्य केले. भारताचे पहिले कृषिमंत्री,कृषीविषयक अनेक संस्थ्याचे संस्थापक अध्यक्ष, म्हणून त्यांनी कार्य केले. १९५२ ते १९६२ अशी सलग दहा वर्ष त्यांनी देशाचे कृषिमंत्री म्हणून कार्यभार सांभाळलाभारतीय कृषीविकासाच्या दृष्टीनेत्यांनी अखिल भारतीय स्तरावर न भूतो न भविष्यातील अशा स्वरूपाची त्यांनी कार्य केले.

प्रस्तुत शोधनिबंधामध्ये डॉ. पंजाबराव देशमुख यांच्या कृषिविषयक कार्याचा आढावा घेण्याचा प्रयत्न करण्यात आलेले आहे.

१) शेतकरयासाठीचौदाकलमी कार्यक्रम :

डॉ. पंजाबराव देशमुख यांनी शेतकरी विकास म्हणजेदेशाचा विकास असा त्यांचा विचाराचा आशय होता. त्यांनीकेवळविशिष्ट वर्गाचा,घटकाचाकिंवा व्यक्तीचा विचार केला नव्हता तर देशातील ७०% शेती कर्णाच्या शेतकरी वर्गाच्या कल्याणाचा विचार केला होता. त्यासाठी त्यांनी शेतक-यांसाठी चौदा कलमी कार्यक्रम राबविला तो पुढील प्रमाणे होता.

१) उतपन्नाचीव शिक्षणाची कोणतेही अटनठेवता प्रत्येक प्रौढ व्यक्तीला मतदानाचा अधिकार असावा.

२) शेतकर्यासाठी सहकारी राष्ट्रीय बँकेचीस्थापना करणे.

३) देवस्थानाची मालमत्ता ही शिक्षण, आरोग्य व पेयजलासारख्या लोक प्रयोगी विकासात्मक घटकावर वापरावी.

४) लष्करी शिक्षण हे सर्व तरुण, तरुणीसाठी सक्तीचे करावे.

५) शेतजमिनीवरव शहरी सपंत्तीवर सिलिंग लागू करावे.

६) सहकारी अधिकारी, वकील, डॉक्टर्सअशा व्यक्तीच्या संपत्तीची नियमितपणे मोजमापकरावी.

७) शेतकर्याच्या मुला-मुलीना मोफत शिक्षण आणि शैक्षणिक सोयी सवलती पुरविणे.

८)शेतक-यांच्यामुला-मुलींसाठी सरकारी नोकरी ८०% आरक्षण लागू करावे.

९) भारतीयशेतक-यांनाकर्ज मुक्त करणे आणि भारतव्यापी शेतकरी संघटनेची उभारणी करणे

१०) ग्रामीण समाजाच्या शिक्षणातून व समृद्धीतून जातीप्रथा, अस्पृशता, दारिद्र्य, निरक्षरता व बेकारी दूर करणे.

११) ग्रामीण भागातील बालकांचे, गर्भवती मातेचे, शेतमजुराचे कुपोषण थांबविणे

१२) ग्रामिणभागात पिण्याचे पाणी उपलब्ध करून देणे व सिंचन सोयीचा विकास करणे.

१३) लोककला, लोकसाहित्य विविध खेळ व क्रीडा यांसाठी ग्रामीण योजना अमलात आणणे व त्या राबविणे.

१४) ग्रामीण समृद्धीतून विकसित व शिक्षित भारत निर्माण करणे.

वरील चौदा कलमी कार्यक्रमाच्या माध्यमातून डॉ. पंजाबरावदेशमुख यांच्या व्यापक लोक कल्याणकारी विचारात संपूर्ण भारत देशाच्या आर्थिक विकासाची मुळेरुजलीहोतीअसे दिसून येते.

२) शेतकरी संघाची स्थापना :

डॉ. पंजाबराव देशमुखांनास्वतः शेतकऱ्यांचे दु:ख, दैन आजन्म अनुभवले होते.अज्ञान, दारिद्र्य, व्यसनाधीनता, रूढी व परंपरांचा पगडा, रोगराई, बेकारी, जुलूम व अत्याचार आदींनी ग्रासलेल्या या विराट समाजाच्या मुक्तीची गरज त्यांना तीव्रपणे जाणवत होती. या भूमिपुत्रांच्या दु:खाकडे सामाजिक महत्वाचा आद्यप्रश्न म्हणून कोणीच का लक्ष दिले नाही, ही कल्पना त्यांना असह्य करीत होती. शेतकरी व श्रमिक या एकाच नात्याने सर्वांना सर्वांगीण विकास घडवून आणल्यास जाती धर्म-पंथ हे भेदभाव अपोआप समाप्त होतील. तसेच नवा आदर्श मानव समाज आकार धारण करील हे दिव्य स्वप्न ते पाहत होते. त्याच विधायक मनोभूमिकेतून त्यांच्या मध्यप्रदेश व-हाडशेतकरीसंघाचा उदय झाला होता. शेतकरी संघ हा पक्ष शेतक-यांचाहोता तसेच तो सर्वांचा होता.

शेतकरी संघाचे महत्व व आवश्यकता प्रतिपादन करताना डॉ. पंजाबराव देशमुख म्हणतात,"इतर समस्यांना तोंड देण्यासाठी शेतक-यांची संघटना असणे आवश्यक आहे- कारण अशा संघटनेच्या माध्यमातूनच शेतक-यांनामदत करता येऊ शकते. तसेच मत व विचार मांडण्याचे ते एक प्रभावी व्यासपीठ बनू शकते. फार्मस फोरम म्हणजेशेतकरी संघ हेच कार्य करीत आहे. तो एक राजकीय संघ नसून देशातील शेतक-यांच्याव्यावसायिकविकासाला मदत करणे हाच त्यांचा उद्देश आहे. शेतकरी संघाचा दृष्टीकोन हा सर्वसमावेशक आहे- शेतकरी संघ स्थापण्याचा आमचा मुल उद्देश सर्वशेतक-यांना आपल्या कार्यक्षेत्रात आणणे तसेच ज्यांचा शेतकरी कल्याणावर विश्वाश आहे अशा सर्वांना त्यात समाविष्ट करून घेणे हा आहे.

३)बहुजन संघाचे मुखपत्रः महाराष्ट्र केसरी

बहुजन समाजाच्या सामाजिक चळवळीचा झेंडा फडकविण्यासाठी डॉ. पंजाबराव देशमुखांना स्वत:च्या वृत्तपत्राची आवश्यकता वाटू लागली. शेतकरी संघाच्या प्रचार कार्यासाठी वृत्तापत्राचे समर्थ स्वतः भाऊसाहेब पूर्णपणे ओळखून होते. वृत्तपत्रम्हणजे लोकशिक्षणाचे प्रभावी साधन होय हाविचारविनिमयाचे महत्वपूर्ण मध्यम होय अनुकूल प्रचाराचा वेगवान प्रकाशझोत आणि प्रतिकूल परिस्थितीवर डागली जाणारी दमदार तोफ म्हणजेवृत्तपत्र हेचहोय.तलवारीप्रमाणे आक्रमण व ढालीप्रमाणे संरक्षण या दोन्हीगोष्टी वृत्तपत्राना करता येतात. वृतपत्र हे विचार व्यक्त करण्याचे साधन होय. तसेच लोकमताला योग्य वळण देण्याच्या दृष्टीने अत्यंत उपयुक्त ठरते. अशा या सामर्थ्यशाली साधनाचा आपल्या ध्येय धोरणाच्या प्रचार-प्रसारासाठी उपयोग करून घेणे हे डॉ. पंजाबराव देशमुखाना अत्यावश्यक वाटत होते.

डॉ. पंजाबराव देशमुखांनी इ.स. १९२७ च्या विजयादशमीच्या शुभमुहूर्तावर अमरावतीला महिमतराव कुरकुरे यांच्या विदर्भ प्रेसमध्ये 'महाराष्ट्र केसरी' नावाचे वृतपत्र सुरु केले. महाराष्ट्र केसरीच्या डोक्यावर 'बहुजन सुखाय बहुजन हिताय' असे घोषना वाक्य होते. डॉ.पंजाबराव देशमुखांच्या बहुजन समाजाचा अर्थ कष्ट्करी समाज असा होता. महाराष्ट्र केसरी या नावाखाली छत्रपती शिवरायांचे चित्र होते व त्या चीताखाली समता, स्वतंत्र व बंधुप्रेम छापलेले होते.

४) भारत कृषक समाजाची स्थापना :

शेती व शेतकरी हाच जगाचा मूलाधार आहे. संपूर्णविश्वचकृषकमय आहे.विश्वशांतीआणिविश्वसमृद्धी या ध्येयाचा केंद्राबिंदुहा शेतकरीच आहे. बहुजनांच्यामागण्या म्हणजे जगाच्या मागण्या. म्हणजे एक विश्वएक सरकार शेतकरीच निर्माण करू शकतो हा विश्वास डॉ. पंजाबराव देशमुखाना होता.

कृषी समस्त उद्योगाची जननी आणि औद्योगिकरणाचामूळ. आधार आहे. कोणताही अल्प विकसित देश जोपर्यंत कृषी उद्योगाचा विकास करीत नाही, त्योपर्यंत त्या देशाचा आर्थिक विकास होत नाही. कृषी व उद्योग यांचा एकमेकांशी घनिष्ठ संबंध असतो. तसेच आर्थिक विकासाच्या ह्या दोन प्रेरक व संयुक्त शक्तीही आहेत. म्हणूनच डॉ. पंजाबराव देशमुखांचे असे म्हणणे होते कि, "कृषी ही औद्योगिकरणाचाआधार आणि आर्थिक विकासाचे भांडवल आहे."

भाऊसाहेब संपूर्ण भारत थोर करण्यासाठी कृषकांना थोर करती होते. कृषकांच्या प्रगतीतून डॉ. पंजाबराव देशमूख भारताची प्रगती मोजत होते. भारत अशांत आहे कारण कृषक गरीब आहे. भारत अशांत आहे कारण कृषक निरक्षर आहे. भारत अशांत आहे कारण भारतीय कृषक विघटीत आहेत. त्यामुळे अन्यायाला सामोरे जाण्याची ताकद संघटनेशीवाय निर्माण होऊ शकत नाही हे भाऊसाहेब ओळखून होते. त्यामुळे त्यांनी भारतीय शेतक-याना सल्ला दिला होता. एकदा आपल्या भाषणात डॉ.पंजाबराव देशमुख म्हणाले होते कि, 'भारतातीलशेतक-यानीलोकशाहीच्या युगात आपली श्रेष्ठ संघटना निर्माण करून सांधीक शक्तीने आपले प्रश्नसोडविण्याचा प्रयत्न केला पाहिजे.

इ.स.१९४८ व इ.स.१९५१ मध्ये डॉ. पंजाबराव देशमुखांनी स्वतः अमेरिका, सोयियत रशिया व युरोपातील अन्य देशांच्या दौरा केला असता येथील कृषी संघटना किती प्रभाविणे कार्य करूशकतात हे त्यांच्या लक्षात आले होते. भारतीय शेतक-यांचा अखिल भारतीय संघटनेशिवाय भाग्योदय होणार नाही हे त्यांनी ओळखले होते.५) राष्ट्रीय कृषी सहकारी खरेदी विक्री संघ :

राष्ट्रपिता महात्मा गांधी यांच्या जयंतीच्या दिवशी २ ऑक्टोबर इ.स. १९५८ रोजी राष्ट्रीय कृषी सहकारी खरेदी विक्री संघ ही कृषकांच्यावतीने अत्यंत उपयुक्त अशी संस्था भारत कृषक समाजाचे स्थापन केली होती. ही संस्था करण्यामागचे हेतू हा भारतीय शेतकरी समृद्ध करण्याच्या दृष्टीने पाउल होते.

संपूर्ण भारतात कृषी व्यवसायाकरीता आवश्यक असणा-यासाधनसामुग्रीचीखरेदी-विक्री कृषकांच्या जास्तीत जास्त हिताकडे लक्ष देऊन स्थापन करण्यात आलेल्या या संस्थेमुळे सर्वांना आनंद झाला होता. भारतीय कृषी उत्पादने व इतरही उत्पादने यांचे उत्पादक व विक्रेते यांच्यामध्ये सहकार निर्माण करून या उत्पादनाच्या आंतरराज्यीय व आंतरराष्ट्रीय व्यापारास चालना देण्याचे महत्वाचे कार्य ही संघटना करत असते.

६) भारत कृषक सहकारी पतपेढीः

भारत कृषक सहकारी पतपेढी भारतात कृषक समाजासाठी असावी अशी संकल्पना डॉ.पंजाबराव देशमुखांच्या मनात होती. ती पूर्णतः भारतीय शेतक-यांच्याचमालकीची व शेतक-यांनी चालवलेली एक बँक असावी ही संकल्पना इ.स.१९५४ मध्ये प्रथम श्रीनगरच्या कृषक मेळाव्यात भाऊसाहेबांनी मांडली होती. या

विषयाचानिश्चितठरावत्यांनी इ.स.१९५८ मध्ये 'भारत कृषक समाज' या अखिल भारतीय संघटनेच्या अधिवेशनात मांडला होता. पुढे इ.स.१९६० मध्ये भाऊसाहेब आंतरराष्ट्रीय अन्न वकृषी परिषदेला जपानला गेल्यावर तेथे सुद्धा तो ठराव मांडण्यात आला होता. या महत्वपूर्ण ठरावावर या परिषदेत विचार करून भारत कृषक समाजानेच ही मतपेढ स्थापन करण्याच्या दृष्टीने पुढाकार घ्यावा असे उपस्थित प्रतीनिधीनि डॉ.पंजाबराव देशमुख याना आवाहान केले होते. त्यामुळे भाऊसाहेबांनी जपानहून आल्यावर भारत कृषक सहकारी पतपेढीच्या कार्यालासुरुवात केली होती.

७) भारत युवक समाज :

डॉ. पंजाबराव देशमुखांनी भारतातील कृषकास संघटीत करण्यासाठी ७ फेब्रुवारी इ.स.१९५५ रोजी भारत कृषक समाजाची स्थापना केली होती. या भारत कृषक समाजाच्या स्थापनेला एक वर्ष पूर्ण होत नाही कि, शेतीमध्ये राबणा-याव कृषी कार्यात आवडीने भाग घेणार्या युवक कृषकाची सुद्धा एक संघटना असावी असेकाही उत्साही कृषक तरुणांना वाटू लागले होते. तेव्हा कृषकाच्या उगवत्या नव्या पिढीला, त्यांच्या इच्छा व प्रवृत्तीनुसार त्यांना वेगळे मार्गदर्शन व कार्यक्रम देता येणे शक्य आहे, असे वाटल्यामुळे भाऊसाहेबांनी इ.स.१९५६ मध्ये युवक कृषक समाजाची स्थापना केली होती.

८) डॉ.पंजाबराव देशमुखांचे केंद्रीय कृषिमंत्री कार्य :

स्वतंत्र भारतासमोर अनेकप्रश्न व समस्या आवासून उभ्या राहिल्या होत्या. भारताला मिळालेले स्वतंत्र्य सहजा सहजी मिळाले नव्हते. स्वातंत्र्यसाठी आपण खूप मोठी किंमत मोजली होती कारण धर्माच्या आधारावर अखंड हिंदुस्थानचे विभाजन होऊन भारत व पाकिस्तान या दोन राष्ट्रांचा जन्म झाला होता. भारत-पाक फाळणीमुळे अनेक प्रश्न निर्माण झाले होते. फाळणीचे परिणाम, निर्वासितांचेप्रश्न व समस्या, संस्थानिकांचे विलीनीकरण, जातीयतेडव दंगली या समस्यानिर्माण झाल्या होत्या. परंतु या प्रश्न व समस्यापेक्षा स्वातंत्र्योत्तरभारतासमोर सर्वात गंभीर समस्या वप्रश्न उभा होता तो म्हणजे अन्नधान्याची टंचाई हा होय. एकूण ६५ कोटी भारताच्या लोकसंख्येपैकी ५ टक्के लोक केवळ अन्नधान्या विना उपासमारीमुळे आपले प्राण गमावत होते.

भारत हा कृषिप्रधान देश म्हणून ओळखला जातो. भारतातील एकूण लोकसंख्येपैकी जवळपास ७० टक्के लोक शेती व शेतीशी निगडीत व्यवसाय करतात. या७० टक्के लोकांच्या उदरनिर्वाहाचे एकमेव साधन म्हणजे शेती आहे. इ.स. १८९०-९१ ते इ.स.१९१९-२० पर्यंतच्याकाळात भारत अन्नधान्याच्या बाबतीत आत्मनिर्भर होता. एवढेच नव्हे तर या काळात भारताने जवळपास ७२.८टन अन्नधान्याची निर्यात सुद्धा केली होती. त्यामुळे भारत हा एक निर्यातदार देश म्हणून ओळखला जात होता. स्वतंत्र भारताच्या या परिस्थितीला ब्रिटीश सत्तेची भारतातील निती व धोरणे काही प्रमाणात कारणीभूत होती. तसेच भारताची इ.स. १९२१ पासून लोकसंख्या वेगाने वाढत गेली, परंतु त्या प्रमाणात अन्नधान्याचेउत्पादन वाढले नाही. उलटते कमी झाले होते.त्यामुळे भारत अन्नधान्याच्या गंभीर समस्येला तोंड देत होता आता स्वातंत्रोत्तर भारत हा अन्नधान्याच्या बाबतीत स्वयंपूर्ण ही काळाची गरज होती.

इ.स.१९४८ मध्ये डॉ. पंजाबराव देशमुख सर्वप्रथम अमेरिकीतील वॉशिंगटन येथे जागतिक अन्न परिषदेला गेले होते. भारताचे प्रतिनिधी म्हणून त्यांना पाठविण्यातआले होते. या परिषदेत त्यांनी भारताच्या अन्न समस्येबद्दल व शेतीच्या मुलभूत प्रश्नाबद्दल आपली परखड मते मांडली होती.शेती विषयक अभ्यास करणारा डॉ.पंजाबरावदेशमुखाशिवाय दुसरा माणूस नाही म्हणूनच त्यांना पहिल्या नेहरूनीमंत्रिमंडळात कृषिमंत्री हे पद दिलेहोते. त्यावेळीस्वतंत्र भारतात 'पी एल ४८०' अंतर्गत अमेरिकेतून गहू,जव, आणि मिलोची आयात करण्यान येत होती. परिणामी तेह्वा भारतातील लोकांना खायला मिळू लागले होते. हे

अन्न धान्न घेऊन येणा-या जहाजाची भारतीय वाट पहातअसत. तसेच अमेरिका अन्नधान्यची निर्यात बंद करेल का? ही भीती सुध्दा सतत असे. ही बाब भाऊसाहेबांच्या स्वाभिमानी मनाला रुचत नव्हती.दरवर्षी भारताला केवळ अन्नधान्यासाठी दोन अब्ज रुपये खर्च करावे लागत होते. 'हे दोन अब्ज रुपये मला दिले तर मी अन्न समस्या सोडवून दाखवितो' असे मोठ्या विश्वासाने ते बोलत असत.

इ.स.१९५२ ते इ.स.१९६२ या एकूण १० वर्षाच्या काळात डॉ. पंजाबराव देशमुख भारताचे कृषिमंत्री होते. या काळात त्यांनी भारतीय शेती व शेतकरी हा केंद्रस्थानी ठेवून क्रांतिकारी कार्य केले होते.

आधुनिक तंत्रज्ञान, अत्याधुनिक औषधांचा वापर,सुधारित बि-बियाणे व रासायनिक खते यामुळे गव्हाच्या उत्पादनात उल्लेखनीय वाढ झाली होती. ती पुढील आकडेवारी वरून लक्षात येते.

डॉ.पंजाबरावदेशमुखांनी दिलेल्या प्रोत्साहनामुळे गव्हाच्या उत्पादनात उल्लेखनीय वाढ झाली होती. तसेच इतर पिकांच्या उत्पादन वाढीसाठी सुद्धा प्रयत्नाची पराकाष्टा करण्यात आली होती. स्वतंत्र भारतातील अन्नधान्याच्या टंचाईवर मात करण्यासाठी ४ फेब्रुवारी इ.स.१९४९ सोजी 'अधिक धन्य पिकवा' मोहीम सुरु करण्यात आली होती. या योजनेच्या आधारे अनाधान्याच्या आत्मनिर्भरतेला नवीन जीवन दिले गेले होते. पंचवार्षिक योजनांचामाध्यमातून ही समस्या सोडविण्यासाठी मोठ्या प्रमाणात प्रयत्न करण्यात आले होते. त्यामुळेच डॉ. पंजाबराव देशमुखांच्या अथक प्रयत्नामुळेच पहिल्या पंचवार्षिक योजनेमध्ये कृषीला प्राथमिकता दिली गेली. किंबहुना ती कृषी योजना म्हणूनच ओळखली गेली होती. त्याचा परिणाम असा झाला कि, अन्नधान्याच्या परिस्थितीत सुधारणा होऊ लागली. अन्नधान्याचा पुरवठा वाढू लागला. आपण अन्नधान्याच्या बाबतीत स्वयंपूर्णतेकडे जाऊ लागलो.

भाऊसाहेबांनीभारताचे कृषिमंत्री असताना शेती व शेतकयांच्या उत्थानाच्या अनेक क्रांतिकारी योजना राबविल्या होत्या. 'जपानी भात शेतीचाप्रयोग' या उपक्रमाची संपूर्ण जगाने दाखल घेतली होती. भात शेतीच्या प्रयोगामुळे भारताचे तांदळाच्या उत्पादनात उच्चांक गाठल्याने सा-याजगाचे लक्ष आकर्षित झाले होते. डॉ.पंजाबराव देशमुख तांदूळ उत्पादनाच्या तंत्राचे तज्ज्ञम्हणून ओळखले जाऊ लागले.

गोषवारा:

रासायनिकसेंद्रिय खतांचा, अत्याधुनिक औषधाचा वापर व नवीन सुधारित बि-बियाणे वापरून उत्पादनात वाढ करावी म्हणून त्यांनी अहोरात्र परिश्रम घेतले होते. म्हणून प्रा.ना.ग.पवार म्हणतात "महामानवाभाऊराया कोटी जनाचे प्रणाम, विदर्भ वैभव भारत भूषणा, कृषकाचा आधार"असे म्हटले होते. विदेशातून तंत्रज्ञान व यंत्रे भारतात आणली गेली.मळणीयंत्र, हॉरवेस्टर आणि इतर शेती उपयोगी अवजारे डॉ.पंजाबराव देशमुखानच्याकाळात भारतात आली होती. तसेच मुंग, भुईमुंग, कापूस, ज्वारी, बाजरी, गहूयांच्या संकरीत जाती निर्माण करण्यात आल्या होत्या. शेती व्यवसायाला पूरक व्यवसाय म्हणून कुकुटपालन, दुग्ध व्यवसायाला चालना देण्यात आली होती. दुधाच्या उत्पादन वाढीसाठी डॉ. पंजाबराव देशमुखांनी स्वतः अमेरिका, डेन्मार्क, न्यूझीलंड या परदेशाचा दौरा केला होता. बंगलोर आणि कर्नुलची दुग्धशाळा डॉ. पंजाबराव देशमुखांच्याच परिश्रमाचे फळ आहेत. खानदेशात केळीचे उत्पादन मोठ्या प्रमाणात झालेहोते. त्यामुळे त्याच्यात मोठ्या प्रमाणात वाढ करण्यासाठी जळगाव येथे केळाची पावडर बनविण्याचाकारखाना भाऊसाहेबांच्या अथक प्रयत्नाने व परिश्रमाने सुरु करण्यात आला होता. या शिवाय साग, बांबू, बाभूळ, निंब, खैर, निलगिरी यांच्या वाढीला महत्व दिले गेले होते. तसेच चिकू, आंबा, संत्री, नारळ या फळझाडांनाप्रोत्साहन देऊन भारतीय शेती व शेतकरी यांच्या हितासाठी पाउल उचलण्यात आली होती.

डॉ. पंजाबराव देशमुख यांनी केंद्रीय कृषिमंत्री असतांना केलेली दीर्घकाळपर्यंत सर्वांच्या स्मरणात राहील. रफी अहमद किडवईनंतरभाऊसाहेबांची कृषिमंत्री राजकीय कारकीर्द अनेक दृष्टीने गाजली होती. त्यांनी या काळात केलेल्या दोन महत्वपूर्ण गोष्टी म्हणजे 'भारत कृषक समाजाची स्थापना' व जागतिक कृषी सम्मेलन व प्रदर्शनाचे आयोजन होय. भारत कृषक समाज म्हणजे डॉ. पंजाबराव देशमुखांच्या कृषक विषयक दिल्ली येथे इ.स.१९५९-६० मध्ये आपल्या भारत कृष्ट समाजाच्या वतीने 'जागतिक कृषी सम्मेलन व प्रदर्शन भरविले होते. उद्याचाभावी कृषकविज्ञानवादीकसा बनेल हाच विचार हे कृषी प्रदर्शन आयोजित करण्यामागे होते. जगातील हे पहिले कृषी सम्मेलन व प्रदर्शन होते.

संदर्भः

१) सावकरसुदाम- डॉ.पंजाबराव देशमुख जीवन व कार्य प्रथम खंड प्रकाशकं श्री.श.रा.लोंढे

२) ढाले रवींद्र-डॉ. पंजाबराव देशमुख यांचे कृषी विषयक आर्थिक विचार, प्रकाशक मिलिंद डहाके नभ प्रकाशन अमरावती.

३) कदम अतिश- डॉ. पंजाबराव देशमुख यांचे जीवन कार्य एक ऐतिहासिक अध्यय न अप्रकाशित पीएच. डी. शोध प्रबंध स्वामी रामानंद तीर्थ मराठा विद्यापीठ नांदेड.

डॉ. पंजाबराव देशमुख यांचे आर्थिक विचार – विशेष संदर्भ विदेशी कर्ज

डॉ. विष्णु ब. पवार
अर्थशास्त्र विभाग प्रमुख
मधुकरराव पवार कला महा.मुर्तिजापूर, जि. अकोला. 444107
मो. न. 7798004528
Email – vishnupawar1974@gmail.com

गोषवारा :-

डॉ. पंजाबराव उपाख्य भाऊसाहेब देशमुख हे लोकनेते म्हणून ओळखले जातात. त्यांचा जन्म अमरावती जिल्ह्यातील एका छोट्या आणि गरीब कुटुंबात पापळ येथे 27 डिसेंबर 1898 मध्ये झाला. भाऊसाहेबांच्या व्यक्तीमत्वाचे विविध पैलू अभ्यासता ते हाडाचे शेतकरी होते, शेतकऱ्यांच्या समस्यांची त्यांना जाणीव होती. त्याचबरोबर एक दूरदृष्टीचे राजकीय तत्वेत्ता त्याचबरोबर अर्थशास्त्राची जाणीव असणारे महाराष्ट्रातील अर्थशास्त्रज्ञ होते.

आज जागतिकीकरण, मुक्त अर्थव्यवस्थेचे जे वारे वाहत आहेत. त्यामुळे मोठ्या प्रमाणावर भारत विदेशी कर्जाच्या विळख्यात सापडला आहे. विदेशी कर्जे ही परकीयांची भारतात पुन्हा आपल्या बाजारपेठा काबीज करण्याची खेळी आहे या विचारांचे भाऊसाहेब होते. त्यामुळे तत्कालीन परिस्थितीत मेक इन इंडिया सारख्या भारतातील संकल्पना या भाऊसाहेबांच्या विदेशी कर्ज नाकारण्याच्या भूमिकेला पाठींबा देणाऱ्या ठरतात. विदेशी बाजरपेठा भारतात येणे म्हणजेच भारतीय अर्थव्यवस्थेचा विदेशी कर्जाशी संबंध येतो आणि येणार याची जाणीव भाऊसाहेबांना होती. त्यांनी म्हणूनच कृषीमंत्री असतांना विदेशी कर्जासंबंधी आपली भूमिका स्पष्ट केली आहे. विदेशी कर्जाचा वापर कसा करावा हे सुध्दा त्यांनी सुचविले. त्यांच्या विदेशी कर्जासंबंधी विचारांचा आढावा प्रस्तुत शोधनिबंधात घेतला आहे.

प्रस्तावना :-

डॉ. पंजाबराव देशमुख यांचा जन्म 27 डिसेंबर 1898 मध्ये अमरावती जिल्ह्यातील पापड या गावी एका शेतकरी कुटूंबात झाला. या कृषकपुत्राने स्वतः उच्च विद्याविभुषीत होवुन कर्तव्य भावनेने खेड्यापाड्यातल्या सहस्त्रावधी शेतकऱ्यांच्या मुलांसाठी शिक्षणाची दारे उघडून दिली. शेतकरी कुटूंबात जन्मल्याने भारतीय शेतकऱ्यांच्या जीवनातील सुख दुःख, दारीद्र्य, अडी अडचणी त्यांनी स्वतः अनुभवल्या होत्या 27 डिसेंबर 1898 ते 10 एप्रील 1965 हा त्यांचा उज्वल जीवनकाल म्हणजेच भारतातील कृषक क्रांतीच्या कार्यक्रमाची अंमलबजावनी होय. लोकांचे दारीद्र्य आणि अज्ञान दुर करणे व भारताचा सर्वागीण विकास साधने हे त्यांचे ध्येय होते. भारत हा कृषीप्रधान देश आहे. भारतातील 80% लोक शेतीवर अवंलबून आहेत हे लक्षात घेऊन भाऊसाहेबांनी कृषी विकास हाच भारतीय प्रगतीचा महत्वाचा टप्पा ठरविला आणि आपले सर्व प्रयत्न सर्व जीवन त्याकरिता खर्ची घातले. शेतकऱ्यांना दारीद्र्यातुन मुक्त केल्याशिवाय कृषक समाज व देश समृध्द होणार नाही आणि स्वतंत्र्य बनणार नाही असे त्यांना वाटे, शेतकरी व त्यांच्या उध्दारासाठी कार्य केले. यासाठी त्यांनी आपले सर्व आयुष्य, आपली जमीन, पैसा, विद्वत्ता, प्रतिष्ठा या चळवळीत झोकुन दिली.

पंजाबराव उपाख्य भाऊसाहेबा देशमुख या महान व्यक्तीमत्वाने हिमालयाच्या उंचीचे कार्य करुन ठेवले आहे. आज ते पाहता त्यांची दुरदृष्टी वर्तमानाचा वेध घेणारी आणि भविष्यातील पाऊले ओळखणारी

होती याची आपल्याला जाणीव झाल्याशिवाय राहत नाही. एक ध्येयाने प्रेरीत झालेले ते व्यक्तीमत्व होत भाऊसाहेबांचे उद्दीष्ट, ज्ञान, आणि दुरदृष्टी अचंबित करणारी होती.

शोधनिबंधाची उद्दिष्टे :-

1. विदेशी कर्जासंबंधी भाऊसाहेबांनी मांडलेल्या विचारांचा आढावा घेणे.
2. विदेशी कर्जातून उद्भवणाऱ्या भाऊसाहेबांनी मांडलेल्या समस्यांची तीव्रता अभ्यासणे.

अभ्यास पध्दती :-

प्रस्तुत अध्ययन हे व्दितीय तथ्यांवर आधारीत आहे. सदर शोधनिबंधासाठी डॉ. पंजाबराव देशमुखांच्या कार्याचे विवेचन करणार विविध लेख, प्रकाशित व अप्रकाशित ग्रंथ, त्यांची जीवनी सामुग्रीच्या सहाय्याने तथ्थे गोळा केली आहेत.

विदेशी कर्जासंबंधी भाऊसाहेबांचे विचार :-

भारताला स्वतंत्र्य मिळाल्यानंतर विविध विकास योजनासाठी विदेशी कर्जाची आवश्यकता भासू लागली. तेव्हा विदेशी कर्ज घेतांना कोणती काळजी घ्यावी य संदर्भात भाऊसाहेब देशमुखांनी आपले आर्थिक विचार व्यक्त केले होते. त्यांच्या विचाराचा परामर्श पुढील प्रमाणे.

स्वातंत्र्य प्राप्तीनंतर भारत सरकारजवळ ८९ कोटी रुपयांची शिल्लक जमा होती. २९ नोव्हेंबर १९४९ रोजी भारताचे अंदाजपत्रक संसदेस चर्चेस आले. त्यावेळी डॉ. पंजाबरावांनी आपले विचार मांडलेत. विदेशी कर्ज घेतल्यानंतर ते कसे उपयोगात आणायला पाहिजे. विदेशी कर्जाचा वापर राजकीय धोरणाचे सूत्र लक्षात न घेता केल्यास भारताच्या आर्थिक विकासावर त्याचे कसे परिणाम होतील आणि भारतीय अर्थव्यवस्थेवर भविष्यात कोणती बिकट परिस्थिती ओढावणार आहे. ही बाब त्यांनी स्पष्ट केली त्यांच्या मते,

आपला देश उत्तरेत्तर समृद्ध होत जाईल. या देशात लवकरच दुधाच्या आणि मधाच्या नद्या पुन्हा वाहू लागतील. ही आश्वासने कुठ गेलीत. कुठे गेले ते दिवस, परदेशाकडे पुन्हा कर्ज मागण्याची लाजिरवाणी पाळी अर्थ खात्यावर येईल. अशी कोणतीही अपेक्षा केली होती काय? असे प्रश्न त्यांनी संसदेमध्ये विचारले. बँक ऑफ इंग्लडमध्ये शिल्लक असलेल्या निधीतून काही रक्कम काढून त्याद्वारे सरकारी आय, व्ययाच्या नियंत्रणात्मक धोरणांचा उपाय अमलात आणावा. विदेशी कर्ज घेण्याची पाळीच येऊ देवू नये. आर्थिक विकासाच्या योजना कार्यान्वित करण्यासाठी देशाची शिल्लक रक्कम वापरल्यास मिळणारे उत्पन्न हे भारतीय कोषात जमा करता येईल आणि त्यातून परत खर्चाच्या योजना आखता येतील हे चक्र अखंडीतपणे कार्यान्वीत करण्याची शक्ती अर्थखात्यात निर्माण होईल. त्यामुळे योजनांवर खर्च करण्यासाठी विदेशी कर्ज घेण्याची पाळीच येणार नाही असे मत त्यांनी सभागृहात मांडले.

आपल्या देशाच्या आर्थिक परिस्थितीचा लाभ उठविण्याची संधी विदेशी अर्थव्यवस्थेला देऊ नये असे डॉ. पंजाबरावांचे मत होते. अमेरिकन अर्थव्यवस्था त्यासाठी अर्थातच भारताला कर्ज देण्यासाठी आणि त्याचा लाभ उठविण्यासाठी प्रयत्नात राहील. अमेरिका आपल्याला रोख रक्कमेच्या स्वरुपात कर्ज देणार नाही. त्यामुळे भारताला आपल्या देशाच्या विकासाच्या योजना भौगोलिक परिस्थितीनुरुप अंमलात आणता येणार नाहीत. कारण, अमेरिका कर्ज देतांना वस्तूंच्या स्वरुपात कर्ज देईल असे त्यांचे मत होते. वस्तूच्या त्याच्याच स्वरुपात कर्ज देण्यामध्ये त्यांचे आर्थिकहित साधल्या जाईल. त्यांच्याच उत्पादनाला भारतीय

बाजारपेठ प्राप्त होईल. त्यामुळे आपल्या देशाचा विकास होण्याऐवजी त्यांच्या अर्थव्यवस्थेतील योजना कार्यान्वित होतील. वस्तूंचे उत्पादन करणारे कारखाने कार्यान्वित होतील आणि आपण केवळ आयातीचे उपभोक्ते राहू. त्यामुळेच कर्जाचे ओझे वाढत राहील आणि देशातील रोजगार निर्मितीलाही वाव मिळणार नाही. असे स्पष्ट संकेत त्यांनी आपल्या विचारातून दिले. डॉ. पंजाबराव देशमुख विदेशी कर्जासंबंधी विधान करतांना म्हणतात,

"Not a single doller will be allowed to touched by you. It will all be given to you in the shape of goods, which are no longer required states."

एकाही डॉलरला ते तुम्हाला हात लावू देणार नाहीत. हे सर्व कर्ज तुम्हाला अशा वस्तूंच्या स्वरुपात देतील की, ज्यावस्तूंची आता अमेरिकेला मुळीच आवश्यकता नाही. ही बाब दुरुस्त व्हावी म्हणून त्यांनी संसदेमध्ये असे विचार मांडले की, विदेशा कडून कर्ज घेतांना घेतलेल्या कर्जापैकी एक तृतीयांशी रक्कम फक्त त्या देशातील वस्तू खरेदी करण्यावर खर्च करावी व बाकीच्या रक्कमेतून आवश्यक वस्तू भारतातच तयार करता येतील अशा प्रकारच्या यंत्र सामग्रीवर खर्च करावी असे त्यांनी सुचविले होते. थोडक्यात, उत्पादन कर्जाच्या संदर्भात भारताने गुंतवणूक करून उपभोग्य वस्तूंची निर्मिती करण्याकरिता भांडवली वस्तूची निर्मिती करणारे कारखाने सुरु करावेत असे संकेत त्यांनी आपल्या विचारातून दिले.

थोडक्यात विदेशी कर्जाचा विरोध भाऊसाहेबांनी केला त्यामुळे देशात विविध समस्या निर्माण होतील असे त्यांना वाटत होते या समस्या भारतीय अर्थव्यवस्थेला खिळखिळ्या करणाऱ्या ठरतील असे त्याचे मत होते. या समस्यांमध्ये

- भारत हा केवळ आयातीचा उपभोक्ता होणार आहे.
- देशात बेरोजगारी वाढेल.
- विदेशी कर्जाचा डोंगर वाढता राहील.
- स्पर्धेची परिस्थिती निर्माण होऊन देशी उद्योग डबघाईस येतील.
- विदेश अर्थव्यवस्था अधिक बळकट होईल.

निष्कर्ष :-

एकंदरीत, देशाच्या अर्थव्यवस्थेला सुरक्षित ठेवण्याच्या दृष्टीने आणि परकिय गुलामगिरीतून अथक प्रयत्नाने मुक्त झाल्यानंतर मुक्त अर्थव्यस्थेच्या नावाखाली पुन्हा परकीय विदेशी कर्जातून गुलामगीरी करण्याचा विरोध भाऊसाहेबांनी केला होता. जेणेकरून देशाची अर्थव्यवस्था मोकळा श्वास घेऊ शकेल. विदेशी कर्जे घेणे ही विकासासाठी आवश्यक आहेत याची जाणीव सुद्धा भाऊसाहेबांना होती त्यासाठी त्यांनी कर्जाचा वापर आणि विदेशी वस्तूंची कमी खरेदी हा उपाय सुचविला. जेणेकरुन भारतीय बाजारपेठ भांडवली वस्तू निर्मितीवर भर देऊन स्वयंपूर्ण बनू शकेल. भाऊसाहेबांचे विदेशी कर्जाच्या विनीयोगासंबंधीचे हे विचार अर्थव्यवस्थेच्या विकासासाठी आवश्यक आहेत.

संदर्भ ग्रंथ :-

1) देशमुख कल्पना, डॉ. पंजाबराव देशमुख यांचे सामाजिक योगदान,
ऋचा प्रकाशन, नागपूर, 1997.

2) देशमुख मुरलीधर, समाजक्रांतीचा उद्गाता व प्रवक्ता, लोकमहर्षी भाऊसाहेब डॉ. पंजाबाराव देशमुख गौरवग्रंथ, प्रकाशक, महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती संपादक मंडळ, मुंबई, 1999.

3) अत्रे प्रल्हाद केशव, कर्मवीर पंजाबराव, डॉ. पंजबाराव देशमुख स्मृती विशेष स्मरणीका, 1997-98

डॉ. पंजाबराव देशमुख यांचे कृषी विषयक आर्थिक विचार

प्रा. डॉ. संजय व्ही. भामरे
कला, वाणिज्य व गृहविज्ञान महाविद्यालय, जळगाव
अजीव सदस्य क्रमांक : 1209
मो. 94206388691

गोषवारा:

भारताचे पहिले कृषी मंत्री डॉ. पंजाबराव देशमुख यांनी शेतकऱ्यांचे दारिद्र्य दूर करण्यासाठी प्रयत्न केले. डॉ. पंजाबराव यांनी आपली शेती गहाण ठेवून, सावकारांकडून कर्ज घेऊन, उच्च शिक्षणासाठी परदेशात जावे लागले. स्वत: या परिस्थितीतून जावे लागल्याने त्यांना शेतकऱ्यांच्या समस्यांची जाणीव होती. डॉ. पंजाबराव देशमुख कृषी मंत्री असताना भारत हा कृषीप्रधान देश आहे पण येथील शेतकऱ्यांच्या समस्या कशा दूर करता येतील, भारतीय शेतकरी कसा सधन होईल यासाठी विदेशात जाऊन शेती शिक्षण, तंत्रज्ञान इ. विषयी सखोल अभ्यास केला. शेतकऱ्यांच्या जीवनाची जाणीव असल्यामुळे, भारतात नवीन प्रकल्प, योजना, सरकारने शेतकऱ्यांसाठी घेतलेल्या निर्णयांचा सूक्ष्म अभ्यास केला. भारतातील शेतकऱ्यांची आर्थिक स्थिती सुधारण्यासाठी संसद, राज्यपातळीवर, विधानसभा व घटना समिती इ. व्यासपीठांवर अनेक महत्वाचे ठराव त्यांनी पुढे मांडले. नवनवीन प्रकल्प, शेती विषयक भव्य प्रदर्शन, शेतकऱ्यांचे उद्बोधन करून शेतकऱ्यांमध्ये जनजागृती निर्माण केली. त्यांनी शेतकऱ्यांच्या हितासाठी अनेक संघटना स्थापन केल्या जशा, भारत कृषक समाज, युवक कृषक समाज, शेतकरी बँक, भारतीय मधमाशी पालक संघटना, अखिल भारतीय खाद्य तेलबीया संघटना, राष्ट्रीय कृषी सहकारी खरेदी विक्री संघ, भारत कृषक सहकारी बँक इत्यादी,. त्यांचे प्रयत्न राष्ट्रीय पातळीवर व आंतरराष्ट्रीय पातळीवरचे होते. त्यांचे दौरे व प्रचंड मेहनत यातून भारतात कृषीयुग निर्माण केले. म्हणून ते कृषीक्षेत्राचे युग पुरूष ठरले. त्यांना कृषीमंत्री म्हणून 1952 ते 1962 हा कालावधी मिळाला. शेतीक्षेत्राच्या विकासामध्ये त्यांची कारकीर्द अत्यंत उल्लेखनीय आहे म्हणून आधुनिक भारताच्या इतिहासातील एक परिपूर्ण व्यक्तीमत्व म्हणून त्यांचा उल्लेख केला जातो.

जीवन व कार्य :

भारतातील शेतकरी क्रांतीचे जनक म्हणून ओळखले जाणारे डॉक्टर पंजाबराव देशमुख यांचा जन्म 1898 मध्ये झाला. ते अमरावती येथील पापळ गावात शेतकऱ्यांच्या घरी जन्माला आले. त्यांचे वडील शामरावजी देशमुख यांच्या वाट्याला 27 एकर 5 गुंठे जमीन होती. पंजाबराव यांचे प्राथमिक शिक्षण पापळ येथेच झाले. अमरावतीला हिंदू हायस्कूल मध्ये मॅट्रिक होऊन (1918) ते अत्यंत हुशारीने त्यांनी 14 रूपये शिष्यवृत्ती ही मिळवली. विदेशात जाऊन बॅरिस्टर होण्यासाठी त्यांच्या कुटुंबाची आर्थिक परिस्थिती अत्यंत हालाखीची होती. म्हणून पंजाबरावांनी आपली शेती तारण ठेवून शिक्षणासाठी पैशाची तरतूद करावी असा सल्ला दिला. तो. सर्वांना पटला. कृष्णराव देशमुख यांच्या मध्यस्थीने कारंजा लाड येथील चंदन शेठकडे तारणखत करून ते 21 ऑगस्ट 1920 ला इंग्लंडला रवाना झाले. त्यांनी प्रा. ए. बी. कीथ यांच्या मार्गदर्शनाने इंग्लंडमधील एडिनबरो विद्यापीठातून 1923 मध्ये संस्कृत विषयातून एम.ए.ची पदवी संपादन केली. या पी.जी. कोर्स साठी असलेली एकवर्षाची सवलत त्याचबरोबर 100 पौंडाची "व्हॅन". व्हॅन डनलॉप रिसर्च शिष्यवृत्ती त्यांना मिळाली. वयाच्या 27 व्या वर्षी `वैदिक वा वाङ्मयाचा उद्गम व विकास` ह्या शोधप्रबंधाने त्यांना पीएच.डी. पदवी संपादन केली. त्यांच्या पीएच.डी. चे मार्गदर्शक प्रो. ए. ए. मॅकडॉनल

यांनी त्यांच्या शोधप्रबंधाची स्तूती केली. पुढे ऑक्सफर्ड विद्यापीठातून 'डॉक्टर ऑफ फिलॉसॉफी' व 'बार ॲट लॉ' ह्या परीक्षा त्यांनी उत्तीर्ण केल्या.

शिक्षणासाठी इंग्लंड मध्ये 6 वर्ष होते. त्यावेळी डॉ. पंजाबराव देशमुख यांनी ज्ञानप्राप्तीबरोबरच व्यक्तीच्या स्वभाव व विविध देशाच्या अर्थव्यवस्थेच्या विकासाचा अभ्यास केला. दारिद्र्य शिक्षण व आरोग्य या संबंधी शेतकऱ्यांचा विचार पातळीत वाढ व्हावी व त्यासाठी त्यांनी कृतीशील रहावे असे त्यांच्या विचारांचे उद्दिष्टे होते.

प्रस्तुत निबंधाला डॉ. पंजाबराव देशमुख यांच्या कार्यावर संक्षिप्त प्रकाश टाकण्याचा प्रयत्न केला आहे. 1929 मध्ये त्यांनी `अमरावती जिल्हा मध्यप्रांत वऱ्हाड शेतकरी संघ` ची स्थापना केली. भारतीय शेतीविषयक एक माहिती असलेली व्यक्ती म्हणून त्यांचा वऱ्हाडच्या प्रांतिक विधीमंडळात 14 डिसेंबर 1930 मध्ये प्रवेश झाला. त्याच्याकडे कृषी, सहकार व शिक्षण ही खाती देण्यात आली ते स्वतः कृतीशील असल्याने त्यांनी अनेक बदल घडवून आणले.

स्वातंत्र्यानंतर 1951 मध्ये ते भारताचे पहिले कृषी मंत्री झाले 1948 ते 1951 याकाळात ते कृषीमंत्री असताना त्यांनी विदेश दौरे केले 1955 मध्ये त्यांनी `भारतीय कृषक प्रतिनिधी` यांचा मेळावा घेऊन त्याचे कृषी क्षेत्राविषयक विचार जाणून घेतले.

11 डिसेंबर 1959 ते 29 फेब्रुसारी 1960 पर्यंत नवी दिल्ली येथे `जागतिक कृषी प्रदर्शनाचे` आयोजन केले. त्या प्रदर्शनाचे ते अध्यक्ष होते. ह्या प्रदर्शनामुळे फक्त देशात नव्हे तर विदेशात त्यांच्या नावांची चर्चा झाली. या प्रदर्शनाच्या उद्घाटन अमेरिकन राष्ट्रपती आयसेन हॉवर यांनी भारतीय कृषी विषयी व डॉ. पंजाबराव देशमुख यांच्या कार्याचे कौतुक केले. त्यांनी 1961, 1962, 1966 ला कलकत्ता, मद्रास व अहमदाबार येथे सुद्धा राष्ट्रीय कृषी प्रदर्शनाचे आयोजन केले होते. कृषी विद्यापीठानी शेतीत संशोधन करून व कार्याची व्यापकता वाढवावी. डॉ. पंजाबराव देशमुख यांच्या मार्गदर्शन त्यांचे कार्य सुरू झाले. कृषीक्षेत्र मोठ्या प्रमाणात बदल घडवून आपला. 1963 मध्ये डॉ. पंजाबराव देशमुख यांची `कृषी उत्पादक आंतरराष्ट्रीय संघाच्या` अध्यक्षपदी निवड झाली.

शेती हा लाभदायक उद्योग, शेतमालाला भाव निश्चिती, शेती मालवाहतुकीसाठी रेल्वे व दळणवळणाच्या दर निश्चिती, कमी व्याजदर व वेळेवर कर्जपुरवठा कृषीज्ञानाच्या सोयी, शैक्षणिक संस्था सुरू करण्यासाठी देशातील नागरिक व सरकारला प्रोत्साहन दिले. सरकारी पद्धतीने शेती करण्यास उत्तेजन दिले. देशी-विदेशी शेतकऱ्यांना एकत्र बोलवून त्यांच्यात संवाद घडवून आणणे, कृषीविषयक प्रदर्शन, चर्चासत्रे व मेळावे होऊन शेतकऱ्यांना संघटित करणे शेतकरी व शेजमजूर यांचे जीवनमान उंचावण्यासाठी प्रयत्न केले. देशात शेती क्षेत्रासंबंधित संस्था स्थापन करून विदेशी शेती विषयक संस्था यांच्या संबंध निर्माण करणे ह्या बाबींचा त्यात समावेश होतो. यातूनच `आफ्रो आशियाई आणि ग्रामीण पुनर्रचना संघटना` युवक कृषक समाज, लाखेकरिता अन्नसंघटन, अखिल भारतीय मधुमक्षिका पालन संघटना, अखिल भारतीय ताडगूळ संघ, कृषी सहकारी इ. महत्त्वाच्या संघटना डॉ. पंजाबराव देशमुख यांनी स्थापन करण्यास पुढाकर घेतला. हे कृषी संबंध निर्माण केले. 3 सप्टेंबर 1949 ला ते म्हणाले केवळ संख्यात्मक नव्हेतर गुणात्मक कार्यामुळे या भारत देशातील शेतकऱ्यांना प्राधान्य मिळालेले आहे त्यामुळे भारताची जगात कृषीप्रधान देश म्हणून ओळख निर्माझ झाली आहे. हे शेतकरी भारताची जगात कृषीप्रधान देश म्हणून ओळख निर्माण झाली आहे. हे शेतकरी भारताचे खरेखुरे स्वामी आहेत. तरीसुद्धा त्यांच्या कल्याणाची इच्छा नाही. डॉ. पंजाबराव देशमुख त्यांच्या मनात तळमळ असल्यामुळे त्यांच्या तोंडून हे उद्गार निघाले.

1943 मध्ये बंगालमध्ये भयानक दुष्काळ पडला. भूकमरीमुळे 30 लाख लोकांचा मृत्यू झाला. ही परिस्थिती डॉ. पंजाबराव देशमुख यांनी बघीतली होतील भारतीय प्रसिद्ध अर्थशात्रज्ञ डॉ. अमर्त्य सन हे त्याचे साक्षीदार आहेत. डॉ.पंजाबराव देशमुख यांनी शेतकऱ्यांना सावकारच्या त्रासातून, नैसर्गिक आपत्तीतून आणि सामाजिक असंतुलनातून शेतकऱ्यांना आपल्या कृतीशील विचारांच्या आधारे सक्षम बनविण्याचा प्रयत्न केला.

1953-54 पर्यंत भारतात एकेरी सरासरी उत्पन्न 700 पौंड होते. तुलनेत युरोपीयन देश, जपान, अफ्रिका, कोरिया, चीन, इंडोनेशिया, अमेरिका या देशामध्ये अधिक उत्पन्न होते हे डॉ. पंजाबराव देशमुख यांच्या लक्षात आले. त्यांनी याबाबत नियोजन केले. 1954 मध्ये भारतात सर्वात अधिक 7 दशलक्ष अधिक तांदुळाचे उत्पादन झाले हे नियोजनाचे यश आहे.

भारतात शेती क्षेत्रातील उत्पादकता कमी आहे यावर डॉ. पंजाबराव असे म्हटले. सिंचनाच्या अपूर्ण सोयी, अन्नधान्याची उत्पादकता वाढविण्यासाठी सेंद्रीय व रासायनिक खताचा वापर कमी होतो, पिकांची पुरेशी काळजी घेतली जात नाही या मार्गाची ही तीन कारणे आहेत.

भारतात `अधिक धान्य पिकवा` ही मोहीम 4 फेब्रुवारी 1949 ला सुरू झाली. याबद्दल डॉ. पंजाबराव देशमुख म्हणतात, "ही योजना आपण किती व्यवहारिक आणि आर्थिक काटकसरीने राबवू शकतो यावर या योजनेचे यश अवलंबून आहे. ते अजून पुढे म्हणतात, फक्त एकवर्गाच्या आर्थिक हिताचा विचार करून कोणती योजना देशात यशस्वी होऊ शकत नाही.

भारतातील शेतकऱ्यांनी जपान या देशातील शेतीचे तंत्र स्वीकारावे असे आकाशवाणी केंद्रातून त्यांनी शेतकऱ्यांना आवाहन केले. शेतामध्ये 18881 प्रात्यक्षिक प्लॉट्स निर्माणकेले. पुढे यात वाढ झाली 19987 पर्यंत पोहोचली आणि प्रशिक्षण देण्यासाठी 664 केंद्र सुरू केली. 21548 प्रचारसभा घेण्यात आल्या. अशारितीने या योजनांची अंमलबजावणी करून भारतात ज्यांनी शेतीचा प्रयोग डॉ. पंजाबराव यांनी यशस्वी करून तांदूळाच्या उत्पादनात वाढ झाली. शेतकऱ्यांना शेणखत व उत्तम बी-बीयाणे याबाबत मार्गदर्शन करताना त्यांनी बी-बियाणे चे एकेरी दर समजावून सांगितले.

ही परिषद 1951 झाली युगोस्लाव्हिया येथे भरली तयावेळी आपले विचार आकाशवाणी केंद्र करून मांडले. ऊस, ज्युट यांचे उत्पादनाचे प्रयोग यशस्वी केले. त्यासोबत गहू, ज्वारी, बाजरी, कापूस, काजू, भुईमूग यांचे उत्पादनाचे प्रयोग यशस्वी झाले.

पशुसप्ताहात दि. 21/01/55 ला ते म्हटले "आर्थिक विकासात पशुधनाचा मोलाचा वाटा आहे. कृषी क्षेत्रात यंत्रसामुग्री जरी प्राप्त झाल्यानंतर भारतातील शेतकऱ्यांनी आपल्या पारंपारिक बैलजाडीवर अवलंबून रहावे. बैलजोडी ही शेतकऱ्यासांठी अतिशय स्वस्त आणि उपयोगी साधन आहे. पण गाईचे महत्व त्यापेक्षा जास्त आहे. भारताला पौष्टीक व स्वास्थवर्धक दुधाचा पुरवठा गाईच्या माध्यमातून होतो. शेतीसाठी लागणाऱ्या खतांची निर्मिती पशुच्या मलमूत्रातून करावी, त्यासाठी सेंद्रीय खत बनविण्याच्या पद्धती शोधून काढाव्यात त्यामुळे शेतीची उत्पादन क्षमता वाढेल व सुपीकता टिकून राहील."

1917 साली डॉ. पंजाबराव देशमुखांनी छात्रपती शाहू महाराजाचे शैक्षणिक विचार ऐकले. "भारतातील अखंड परिश्रम करणारा शेतकरी वर्ग आपल्याला बदलावयाचा आहे. भूमीपुत्रांनो हेच माणसाच्या गुलामगिरीचे व दु:खाचे मूळ कारण आहे" असे ते म्हणत. 1926 नंतर इंग्लंडहून परत आल्यावर छत्रपती शाहू महाराजांच्या विचारातून प्रेरणा घेऊन त्यांनी 1932 ला शिक्षणसंस्थेची स्थापना केली. श्री शिवाजी शिक्षण संस्थेच्या वतीने त्यांनी विदर्भातच नव्हे तर देशाविदेशात शेतकऱ्याच्या मुलांना शिक्षण घेण्यासाठी वसतीगृहांची स्थापना केली.

1930 ते 1933 च्या काळात मध्य प्रांत वऱ्हाड बटलर मंत्रीमंडळात तयांनी शिक्षणखात्याचे मंत्रीपद सांभाळले होते. त्यांच्या मते सर्वात पहिले शिक्षणाचा प्रचार व प्रसार केला पाहिजे. आपल्या जीवनाला आर्थिक हातभार लावण्यासाठी विद्यार्थ्यांना शेतीतून `कमवा व शिका` अशी योजना राबविता आली पाहिजे, असे डॉ. पंजाबराव देशमुखांचे मत होते. लोकशिक्षण विषयक, शिक्षणकार्याविषयक, भूसंरक्षणाविषयक, भारतीय कृषी अर्थव्यवसथा संशोधन प्रणाली, सांख्यिकीय माहिती किंवा अधिकृत आकडेवारी या विषयी त्यांनी आपले विचार मांडले. स्त्री शिक्षणाचा प्रसार, युवकांना शिक्षण, ग्रामोद्योग व कुटीरोद्योग यावर त्यांनी प्रकाश टाकला कृषीक्षेत्रासाठी स्थापन झालेले आज महाराष्ट्रात अहमदनगर, परभणी, दापोली, अकोला येथे कृषी विद्यापीठ व नागपूर येथे मत्स्य विद्यापीठ त कृषीक्षेत्रामध्ये मोठ्या प्रमाणात बदल घडवून आणत आहेत. डॉ. पंजाबराव यांचे विचार कृषी क्षेत्रासाठी किती महत्वपूर्ण आहेत याबाबत पंडीत नेहरूंनी त्यावेळेचे नियोजन आयोगाचे सदस्य श्री. गुलजारीलाल नंदा यांना पत्र पाठविले होते.

डॉ. पंजाबराव यांनी `कर्जलवाद बिलाचे` महत्व सर ऑर्थर एडवर्ड नेलसन व सरहाईड गोवेल यांना त्यांनी पटवून दिले. ते म्हणाले, "शेतात दिवस-रात्र कष्ट करणारा वर्ग नष्ट झाला त्या प्रदेशात काय भयानक परिस्थिती निर्माण होईल? असा प्रश्न त्यांनी सर हाईड गोबेल यांच्या समोर मांडला व गोवेल यांनी त्याचे विचार मान्य केले.

डॉ.पंजाबरावाच्या आणि सभागृहाच्या प्रेरणेने प्रस्तुत बिल मी आणले असे उद्गार सर हाईड गोवेल यांनी काढले. पंजाबरावंनी हे बील मांडल्यामुळे तत्कालीन परिस्थितीत या कायद्यांतर्गत 90% शेतकऱ्यांना सावकाराच्या तावडीतून मुक्तता झाली. त्यांनी निर्माण केलेल्या कर्जलवाद समितीने हजारो कर्जाची प्रकरणे निकालात काढली. त्यामुळे शेतकरी वर्ग आत्महत्येपासून माघारी फिरला. कर्जाचे ओझे, पेरण्या उलटणे, पाऊसाची अनिश्चितता, सिंचनाचा अभाव, हमीभावाची घसरण, नैसर्गिक आपत्ती, सावकाराकडून होणारी फसवणूक आणि सरकारी धोरण ह्या सर्व बाबी त्यांच्या आत्महत्येसाठी कारणीभूत ठरत आहे. यासाठी संरकार व लोकप्रतिनिधी यावर उपाययोजना अंमलात आणणे गरजेचे आहे कारण भारतीय अर्थव्यवस्थेत खरेदीशक्ती संपूर्ण शेतकऱ्यांच्या उत्पन्नावर अवलंबून आहे.

भारतीय अर्थव्यवस्थेच्या आर्थिक विकासाचे प्रारूप हे शेतकऱ्यांच्या शोषणविरहीत समाजावर अवलंबून आहे असे डॉ. पंजाबराव यांचे मत होते.

शेतकऱ्याच्या उत्पादनावर या देशातील दलाल, सट्टेबाज आणि अडते हे मोठ्या प्रमाणात नफा मिळवितात आणि शेतकऱ्यांचे शोषणाचे दृष्टचक्र सुरू होते. त्याचा परिणाम खरेदीशक्ती चे केंद्रीकरण, देशातील विशिष्ट वर्गाच्या हातात जाते. त्यातून मंदीची परिस्थिती निर्माण होते. असे होऊ नये यासाठी शेतकऱ्याचे शोषण थांबवले पाहिजे. उद्योजक, व्यापारी, व्यवसायिक अतिरिक्त नफा व अवाजवी किंमत प्राप्त करण्यासाठी साठेबाजी करतात. लाखो रूपयांचा नफा मिळवितात व शेतकऱ्याच्या खरेदीशक्तीचे फार थोड्या लोकांच्या हातात केंद्रीकरण होते. याचा परिणाम शेतकऱ्याच्या कमी भाव उपभोक्त्याची पिळवणूक अशा दृष्टचक्राला सुरूवात होते. त्यामुळे शेतकऱ्याच्या बी-बीयाणाचा, खतांचा, लागवडीचा खर्च वाढत जातो. कारण ही साधने ते व्यापाऱ्यांकडून खरेदी करतात. परिणामी त्यांची आर्थिक पिळवणूक होते. शेतकऱ्यांना पुरेसे उत्पन्न मिळत नाही व तोटा सहन करावा लागतो. त्यामुळे त्यांचे उत्पन्न कमी होते आणि त्यांच्या पदरी निराशाच येते. त्याचा परिणाम म्हणजे तो मन लावून शेतीचे काम करीत नाही. याचा परिणाम शेतकऱ्याला कर्जबाजारी व दारिद्र्य अवस्थेत जीवन जगावे लागते. तसेच देशाच्या राष्ट्रीय उत्पन्नाला शेती क्षेत्राचा वाट कमी होत आहे. म्हणून भांडवल व खरेदीशक्तीचे विकेंद्रीकरण करावे असे डॉ.पंजाबराव यांचे मत होते कारण शेतकरी संपला तर उद्योगपती ही संपेल. याचा परिणाम उत्पादनाचे चार घटक भूमी, श्रम,

भांडवल, संयोजक यांच्यावर विपरीत परिणाम होईल. असे होऊ नये म्हणून सहकारी क्षेत्राच्या आधारे देशातील ग्रामीण विभागात बाजारपेठेचे, बँकांचे जाळे विस्तारले पाहिजे आणि शिक्षणाचा प्रचार व प्रसार करण्यात यावा. शोषण विरहीत राष्ट्रीय पोषण व्यवस्था निर्माण करण्यासाठी ग्रामीण क्षेत्रात आर्थिक योजनांचा प्रसार व प्रचार करावा असे डॉ. पंजाबरावाचे मत होते.

जागतिक पातळीवर ज्यावेळी मंदी निर्माण झाली असताना देशात शेतकरी मोठ्या प्रमाणात आत्महत्या करीत होते. त्या काळात डॉ. पंजाबराव देशमुख यांनी मांडलेल्या विचाराचा सरकाने विचार करणे, गरजेचे होते. त्याचे विचार ही आज काळाची गरज आहे. `शेतकरी सुखी तर देश सुखी` ही नीती त्यांच्या विचारातून प्रकट होते डॉ. पंजाबराव उच्चशिक्षित व शेतकऱ्यांविषयी कळकळ असणारे शेतकरी यूग असल्यामुळे त्यांनी सकारात्मक कार्य केले. भारतातील अनेक नेते व पहिले राष्ट्रपती डॉ. राजेंद्रप्रसाद, डॉ. राधाकृष्णन, पंतप्रधानमंत्री पंडीत जवाहरलाल नेहरू, लोकसभेचे सभापती हुकूमसिंग पंतप्रधान लालबहादूर शास्त्री संरक्षण मंत्री यशवंतरावजी चव्हाण, लोकनायक बापूजी अणे, पाहिले अर्थमंत्री सी. डी. देशमुख, भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर अशा नेत्यांनी डॉ. पंजाबराव देशमुख यांच्या कार्याचे तोंडभरून कौतुक केले.

अमेरिकन राष्ट्रपती आपलेन होअर, रशियाचे अध्यक्ष श्री. बोरोशिलॉव्ह, प्रधानमंत्री ख्रू चेव्हलेडी माऊंटबॅटन, फिल्डमार्शल, मॉटगोमरी इंग्लंडच्या राणी एलिझाबेथ व त्यांचे पती प्रिन्स फिलिप ड्यूक ऑफ एडिनबर्ग, अमेरिकीय सहकारी तज्ञ हावर्ड एकाऊहेन इ. जगविख्यात लोकांनी सुद्धा डॉ. पंजाबराव देशमुखांच्या कार्याने प्रभावित झाले.

ते कृषीमंत्री झाले असताना संत गाडगेबाबा म्हणाले होते, `लोकहो शतकऱ्याचा पोरगा आज राजा झाला.` शेती क्षेत्रातील आर्थिक घसरणीमुळे शेतकरी मोठ्या प्रमाणात आत्महत्या करतील असे भाकीत आज परिस्थिती त्याचे उद्गार खरे ठरत आहेत. डॉ. पंजाबराव देशमुख कृषी मंत्री असताना ज्या जोमात कार्य केले होते. त्या जोमाने ते कार्य पुढे जर सुरू असते तर आज शेती क्षेत्र जे चित्र आहे त्यापेक्षा वेगळे बघायला मिळाले असते.

डॉ. पंजाबराव देशमुख यांनी मांडलेले विचार प्रामाणिकपणे अंमलात आणणे गरजेचे आहे. म्हणून असे म्हणता येईल ज्या दिवशी शेतकरी सधन होईल त्यादिवशी भारत खऱ्या अर्थाने सधन देश होईल.

संदर्भ सूची :

1) डॉ. पंजाबराव देशमुख यांचे कृषी विषयक आर्थिक विचार - डॉ. रविंद्र ढाले.

2) लोकनेते डॉ. पंजबाराव देशमुख- प्रा. नीतीन रेंढे- नोव्हेंबर, 2010

3) महाराष्ट्र टाईम्स, 7 फेब्रुवारी 2021

डॉ. पंजाबराव देशमुख देशमुख यांचे आर्थिक विचार

डॉ. समित माहोरे
सहायक प्राध्यापक
पदव्युत्तर अर्थशास्त्र विभाग,
राष्ट्रसंततुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठ नागपूर
drsamitmahore@gmail.com
आजीव सभासद क्र. १६४१

डॉ. रामदास य. माहोरे
माजी अध्यक्ष, मराठी अर्थशास्त्र परिषद
प्राध्यापक आणि माजी विभागप्रमुख,
पदव्युत्तर अर्थशास्त्र विभाग,
राष्ट्रसंततुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठ नागपूर
drrymahore@yahoo.com
आजीव सभासद क्र. ३२०

भाऊसाहेबांचे कार्य राजकीय, शैक्षणिक, सामाजिक आणि कृषी क्षेत्रात दिसून येते. भाऊसाहेब प्रतिकूल परिस्थितीत घडले. शिक्षण प्राप्त करतांना ज्या अडचणी आल्या त्यामुळे त्यांच्यामध्ये दुर्दम्यइच्छाशक्ती निर्माण झाली होती. भाऊसाहेबांनी अनेक क्षेत्रात कार्य केले होते. यामध्ये शिक्षण, शेतकऱ्यांची प्रगती, त्यांना समाजातील अज्ञान दारिद्रय या समस्या दूर करावयाच्या होत्या. यासाठी शिक्षणाशिवाय दुसरा पर्याय नाही याची त्यांना खात्री पटली होती. त्यांनी विदर्भात अनेक शैक्षणिक संस्था स्थापन केल्या. बहुजन समाजात शिक्षणाची आस्था निर्माण केली होती.

महिलांची प्रगती, स्वातंत्र्याची चळवळ, घटना समितीतील कार्य, सामाजिक सुधारणा इत्यादी विविध क्षेत्रातील त्यांचे योगदान उल्लेखनीय आहे . 'जे का रंजले गांजले' याचे ते पाठीराखे होते. समाज क्रांतीचा उदगाता आणि प्रवक्ता असा त्यांचा गौरव केला जातो. त्यांना 'विदर्भाचे भाग्यविधाते' म्हंटले जाते .

त्यांनी शेतकऱ्यांच्या विकासाकरिता तसेच शैक्षणिक व सांस्कृतिक प्रगतीसाठी आपले आयुष्य खर्ची केले. विदर्भ आणि मध्यप्रांतांतच नव्हे तर संपूर्ण भारतभर त्यांनी कृषी विकासाचे अनेक कार्यक्रम राबविले. पंजाबचे शेतकरी त्यांना 'पंजाब' हमारा आहे म्हणजे भाऊसाहेब आमचे आहेत असे मानत होते.

भाऊसाहेबांची दृष्टी केवळ पारदर्शक नव्हती तर ती भविष्याचा वेध घेणारी होती. त्यांच्या ५८ व्या वाढदिवसाप्रित्यर्थ झालेल्या कार्यक्रमाचे अध्यक्ष प्राचार्य आर. एन. खर्चे होते. याप्रसंगी भाषण देताना प्रमुख वक्ते प्रा. डॉ. श्री. ह. अत्तरदे यांनी भाऊसाहेबांचेदृष्टेपण आणि समाजोन्नतीची तळमळ याविषयी मनोगत व्यक्त केले होते. याचा आधार त्यांना रेवशाचेभाऊसाहेबांचे कार्यकर्ते श्री काशीरावबाकोडे यांनी दिलेला भाऊसाहेबांच्या हातचा कागद होता. त्या कागदावर भाऊसाहेबांनी त्यांना पूर्ण करावयाच्या कार्यक्रमाची नोंद होती. त्यांनी देश, राज्य, समाज यासारख्या अव्यक्त शब्दांचा उल्लेख न करता, आपल्या डोळ्यांपुढे शेतकरी समाज ठेवला होता. या कागदावर शीर्षक होते 'फार्मर्सफोर्टीनपॉईंट्स' यामध्ये शेतकऱ्यांच्या मुलांना

मोफत शिक्षण, शासकीय संस्था आणि नोकरीत ७० टक्के राखीव जागा, शेतकऱ्यांवरील कर्जाचा भार नाहीसा करणे इत्यादी बाबीं व्यतिरिक्त काही क्रांतिकारी मुद्दे होते

यात खालील मुद्यांचा समावेश होता.

१. विशिष्ट उत्पन्नाची अट न ठेवता प्रत्येक प्रौढ व्यक्तीला मतदानाचा अधिकार मिळाला पाहिजे.

२. शेतकऱ्यांसाठी बँकेची स्थापना करून त्या बँकेद्वारे शेतकऱ्यांना कमी व्याजाने दीर्घ मुदततीची कर्जे मिळाली पाहिजेत.

3. देवस्थानच्या मालमत्तेचा उपयोग शिक्षणासाठी आणि रुग्णालय उघडण्यासाठी झाला पाहिजे.

4. लष्करी शिक्षण सक्तीचे केले पाहिजे.

5. जमिनीची समान वाटणी केली पाहिजे.

6. सरकारी अधिकारी आणि वकील वगैरेंच्या संपत्तीची योग्य तऱ्हेने मोजदाद करण्यात यावी इत्यादी.

शेतकरी संघाची स्थापना

शेतकऱ्यांचेदुःख आणि दारिद्रय त्यांनी अनुभवले होते. अज्ञान आणि दारिद्रय आणि व्यसनाधिन समाजाची मुक्तता केली पाहिजे असे त्यांना वाटत होते. भूमी पूत्रांच्यादुःखाकडे सामाजिक आस्था म्हणून कोणीच पाहिले नव्हते. कृषीप्रधान देशात कृषकाची चाललेली अक्षम्य उपेक्षा हीच आपल्या ऱ्हासाची कारणे होत हे त्यांच्या पारदर्शी दृष्टीला समजले होते. शेतकऱ्यांसाठी काहीतरी केले पाहिजे ही कल्पना त्यांना अस्वस्थ करीत होती. या अवस्थेतून 'शेतकरी संघाचा' उदय झाला. हा शेतकऱ्यांचा पक्ष होता. या पक्षाने शेतकऱ्यांसाठी भरीव कार्य केले होते.

१९३३ चा कर्ज लवाद कायदा

१४ डिसेंबर १९३० रोजी मध्य प्रदेश विदर्भाचे मंत्री म्हणून भाऊसाहेबांचा शपथविधी पार पडला. त्यांची मंत्री या नात्याने पावणे तीन वर्षाची कारकीर्द चांगलीच गाजली. त्यांच्या महत्त्वाच्या कामात व्हिलेज पंचायत बिल, सहकारी सोसायट्यांना उत्तेजन, अस्पृश्यता निवारण बिल, रोग प्रतिबंधक कायदा इत्यादींचा समावेश होता. त्यांचे महत्त्वाचे कार्य म्हणजे 'कर्ज लवाद कायदा'.

विदर्भ मध्यप्रदेशचा शेतकरी वर्ग सतत पडणाऱ्या ओल्या आणि कोरड्या दुष्काळामुळे हवालदिल झाला होता. त्यामुळे शेतकऱ्यांवरील कर्जात सारखी वाढ होत होती. कर्जासाठी गहाण ठेवलेली शेती सावकाराच्या ताब्यात जात होती. मुद्दलापेक्ष दहापट जास्त व्याज देऊनही वडिलांचे कर्ज फेडण्यात मुलांचे सर्व आयुष्य खर्ची जावूनही १०० रुपयांच्याकर्जापोटी अनेकांची शेती सावकारांच्या मालकीची झाली होती. त्यावेळी शेतसारा भरणे कठीण होते. त्यामुळे शेतकरी कर्जाचे हप्ते भरू शकत नव्हते. जागतिक मंदीमुळेशेतमालाच्या भावात अभूतपूर्व घसरण झाली. परिणामी कर्जाचा डोंगर वाढत गेला.

कर्ज लवाद कायद्यामुळे वकील आणि सावकारांच्या उत्पन्नात मोठी घट होणार होती. कर्ज लवाद बिलाला या वर्गाकडून मोठ्या प्रमाणात विरोध झाला होता. शेतकऱ्यांच्या अज्ञानामुळे त्यांनीही या बिलाला विरोध केला होता. याप्रसंगीभाऊसाहेबांनी म्हटले होते, "आपला शेतकरी इतका भोळा आहे की पुष्कळदा न कळत आपल्याच कल्याणाच्या विरोधात हात उगारतो".

विरोधकांच्या मते या बिलामुळे समाजातील भावनात्मक ऐक्याला तडे जातील. धनको आणि ऋणको यांचे संबंध बिघडतील. करोडोरुपयांचा प्रश्न असल्यामुळे बिल संमत करण्याची घाई करू नये. शेतकरी संघाने

परिस्थितीची जाणीव ठेवून बिलाचे फायदे समजावून सांगण्याच्या दृष्टीने मोठ्या प्रमाणात प्रचार दौरे केले. एका दिवशी ५०-५० सभा घेऊन मोठा शेतकरीवर्ग विधेयकाच्या बाजूने उभा केला. भाऊसाहेबांनीआपल्या युक्तीसंगत भाषणांनी असेंब्ली हॉल ढवळून काढला होता. त्यांनी विधेयक कायदेमंडळात पास करून घेतले. त्यामुळे विधेयक १९३३ चा कर्ज लवाद कायदा या नावाने रूपांतरित झाले.

या कायद्यानुसार स्थानिक सरकारद्वारे एक वर्षाकरिता लवादाच्या सदस्यांची एक समिती तयार करण्यात आली होती. धनको किंवा ऋणको यापैकी कोणीही आपली तक्रार लवादापुढे मांडणार होते. लवादाला बरेच अधिकार देण्यात आले होते.

एकंदर परिस्थितीचा सूक्ष्म अभ्यास करून विवेकपूर्ण निर्णय देण्याचे कार्य लवादाला करावयाचे होते. हजारो कर्जबाजारी शेतकऱ्यांची90 टक्के पेक्षा जास्त शेती या लवादामुळे वाचविता आली होती. जी शेती गेली होती ती सुद्धा हप्त्याच्या परतफेडी नंतर परत मिळणार होती.

सहकारी बँकेची स्थापना

१९२२ मध्ये अमरावती येथे ‘अमरावती सेंट्रल को-ऑपरेटिव्ह बँक लिमिटेड’ ही सहकारी क्षेत्रातील संस्था काही विचारवंतांनी सुरू केली होती. शेतकऱ्यांना सवलतीच्या दराने कर्ज उपलब्ध करून देणे आणि त्यांची सावकाराच्या जुलमी पाशातून मुक्तता करणे हा या बँकेच्या स्थापनेचा उद्देश होता. परंतु याउलट घडून आले.

जागतिक मंदीच्या लाटेत कापसाचा भाव २५० रु. खंडी वरून ३० रु. खंडी पर्यंत कमी झाला होता. शेतमालाच्या किंमतीत मोठ्या प्रमाणात घट झाली होती. शेतीची किंमत १०० ते २०० रुपयात चार एकर इतकी कमी झाली होती. शेतकऱ्यांना आपल्या जमिनीची बँकेला द्याव्या लागल्या कारण ते आपले कर्ज परत करू शकले नव्हते. बँकेने शेतकऱ्यांना लुटले तर दुसरीकडे अतिहुशारकारभाऱ्यांनी संधीचा फायदा घेतला. हे चित्र पाहिल्यानंतरभाऊसाहेब शांत बसणे शक्य नव्हते. बँकेचे जास्तीत जास्त सभासद शेतकरी होते. या शेतकऱ्यांना मुक्त कसे करावे ही चिंता भाऊसाहेबांना अस्वस्थ करीत होती. त्यांनी ही बँक ताब्यात घेण्याचा निश्चय केला. वार्षिक सभेच्या दिवशी मोठ्या प्रमाणात कार्यकर्त्यांना आणले. संचालक मंडळावर २७ पैकी १८ सभासद निवडून आणले आणि अशक्य गोष्ट शक्य करून दाखविली. अल्पमुदती कर्जाचे दीर्घ मुदती कर्जात परिवर्तन करून शेतकऱ्यांची जप्ती पासून सुटका केली..

जोतीराव फुले यांनी ‘शेतकऱ्यांचा आसूड’ मध्ये शेतकऱ्यांच्या दुरावस्थेची जी मीमांसा केली त्याचे कारण म्हणजे ‘एवढे अनर्थ एका अविद्येने केले’ असे म्हटले आहे. शेतकऱ्यांच्या दुरावस्थेची चिकित्सा करणारे दुसरे डॉक्टर म्हणजे भाऊसाहेब. ज्या शेतकऱ्यांचा राष्ट्रीय उत्पन्नात मोलाचा वाटा आहे तो शेतकरी अडाणी असणे, अज्ञानी असणे, देश विकासाच्या दृष्टीने अनिष्ट आहे असे भाऊसाहेबांचे मत होते. शेतकरी उत्पन्न निर्मितीचे काम करतो. उत्पन्नाची खरी वाढ शेतीतच होते. एका सरकी पासून एक झाड, एका दाण्यापासून ज्वारीचे कणीस अशा रीतीने गुणाकार पद्धतीने उत्पादन शेतकरीच करतो. कारखानी उद्योगात फक्त कच्च्या मालाचे पक्क्या मालात रूपांतर होते . मूळ उत्पादन वाढत नाही. देशाची आर्थिक प्रगती शेती उत्पादनाशी निगडित आहे. विकासाचा वेग शेतीद्वारे ठरतो असे महात्मा गांधीजींनी म्हटले होते.

शेतकऱ्यांचा कैवारी

भाऊसाहेबांनी १९३२ मध्ये मध्यप्रांतवऱ्हाडच्याकायदेमंडळात 'हिंदू देवस्थान संपत्ती विधेयक' (Hindu Endowment Bill) आणले होते. देवस्थानची संपत्ती आरोग्य, शिक्षणासारख्या कार्यावर खर्च करावी असा त्यांचा अट्टाहास होता. परंतु त्यांना ते बिल पास करता आले नाही.
सहकारी बँक शेतकऱ्यांचीपिळवणूक करीत होत्या. शेतकरी या बँकेच्या कर्जाच्या ओझ्याखाली हवालदिल झाला होता. सहकारी बँका कर्जे लवादाच्या कक्षेत येत नव्हत्या. १९३४ साली भाऊसाहेब मंत्री असल्यामुळे त्यांनी बँकेने जप्त केलेल्या शेतीची समस्या सोडविण्यासाठी सरकारला एक चौकशी समिती नेमायला लावून बँका म्हणजे सावकारी पेढ्या नव्हे, ही जाणीव करून दिली. त्यांचे कृषी कर्जासंबंधीचे धोरण आणि दृष्टिकोन आजही मार्गदर्शक ठरतो.

कृषी पूत्र ते कृषीमंत्री

भाऊसाहेबांनी भारताच्या संविधान मसुदा समितीत १९४० ते १९४९ पर्यंत कार्य केले. ग्रामीण जनता, शेतकरी, मागासलेला खेड्यातील नागरिक त्यांच्या हिताचे रक्षण घटनासमितीत त्यांनी केले. समितीचे अध्यक्ष डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी समारोपाच्या भाषणात त्यांच्या भूमिकेचा गौरवपूर्ण उल्लेख केला आहे. १९५२ मध्ये ते कृषिमंत्री झाल्यावर त्यांच्या कर्तृत्वाला नवी दिशा लाभली.
'जपानी पद्धतीने भात शेती' याप्रयोगशीलउपक्रमाद्वारे अधिक उत्पादनाचा विक्रम त्यांनी शेतकऱ्यांकडून करवून घेतला. शेतकऱ्यांच्या कल्याणासाठी त्यांनी आपल्या अधिकारात अनेक प्रयोग राबविले. 'भारत कृषक समाज' आणि 'जागतिक कृषी प्रदर्शनाचे आयोजन' या विधायक उपक्रमाला विशेष महत्त्व प्राप्त झाले होते.
भारत कृषक समाजाची उद्दीष्टे आजही मार्गदर्शक ठरतात. ती खालील प्रमाणे
१. शेतकऱ्यांच्या सामाजिक, आर्थिक आणि सांस्कृतिक प्रश्नांचे अध्ययन करणे
२. सरकार व इतर संस्थांच्या सहकार्याने शेतकऱ्यांना आधुनिक पद्धतीने शेती करण्याचे शिक्षण देणे तसेच कृषी विषयक उपयुक्त अशा नवनवीन प्रयोगांची माहिती करून देणे.
३. शेतकऱ्यांच्याकल्याणार्थ राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय पातळीवर कृषी विषयक धोरण आखणे.
४. कृषीविषयक प्रदर्शने, चर्चासत्रे, संमेलने आणि समारंभ आयोजित करणे.
५. भारतातील विविध राज्यातील तसेच परदेशातील शेतकऱ्यांना परस्पर भेटीची संधी प्राप्त करून देऊन ज्ञानाची देवाणघेवाण करणे
भारत कृषक समाजाच्या विचारमंथनातून अ) राष्ट्रीय कृषी सहकारी खरेदी विक्री संघ, ब) कृषी सहकारी अधिकोष, क) आफ्रो-एशियन ग्रामीण पुनर्रचना संघटना इत्यादी विधायक संस्था आणि संघटना गतिशील करून त्याद्वारे विकास कार्य घडवून आणले.
कृषी सहाय्यक यंत्र संघटना, लाखोंसाठी अन्न संघटना (Meals for Millions) याद्वारे त्यांनी जीवन सत्वयुक्त खाद्यान्नाचे महत्त्व पटवून देण्याचा प्रयत्न केला. भाऊसाहेबांच्या काळात शेती निसर्गावर अवलंबून होती. परंपरागत बियाण्यांचा वापर केला जात असे. ज्वारीवर कान्ही रोग यायचा त्यामुळे ८० टक्के कणसे दाण्यांनी भरत नव्हती. पऱ्हाटीवार भुरी रोग, गव्हावरतांबेरा, चण्यावर घाटे अळी, तुरीवर शेंगा पोखरणारी अळी अशा अनेक कीटकांचा अन्नधान्यावर मारा होत असे. त्यावेळची कीटक नाशके म्हणजे गोमूत्र आणि चुलीतली राख धुरळीत असत.

भाऊसाहेबांनी दिल्लीत जागतिक कृषी प्रदर्शन आयोजित केले होते. जगातील सर्व देशांच्या कृषीची प्रगती भारतातील शेतकऱ्यांना दिल्लीत पाहता आली. शेतकरी खरा प्रभावित झाला तो उन्नत बी-बियाणे पाहून. आपले एक बी २५० किलोग्राम उत्पन्न देते तर परकीय १ बी एक किलो उत्पादन देते, भाऊसाहेबांनाशेतकऱ्यांना उन्नत व स्वस्त बियाणे द्यायची होती. त्यांनी श्री बद्रीप्रसाद बारवाले आणि श्री अन्वीकर यांना परदेशात पाठविले. त्यांना प्रोत्साहित करून बीजोत्पादन कंपनी काढावयास लावले. श्री गनेडीवाल, वलगाव यांनीही बीजोत्पादन कंपनी काढली . त्यानंतर शेकडो बिजोत्पादन कंपन्या निघाल्या. जालना जिल्हा बीजोत्पादनाचेमाहेरघर बनला. महाराष्ट्र सरकारने 'महाबीज' ही बीज उत्पादन करणारी स्वायत्त संस्था काढली. आज मात्र या कंपन्या स्वतःच्या फायद्यासाठी बीजोत्पादन करतात. बरेचदा बी उगवत नाही. भाऊसाहेबांनी ही स्थिती पाहिली असती तर ते अस्वस्थ झाले असते. शेतकऱ्यांच्यापिळवणुकीचे उदाहरण प्राचार्य भाऊ भालेराव यांनी विशद केले होते. खामगावच्या एका गृहस्थाची १०० एकर जमीन ३०० रु. साठी मारवाड्याच्याघशात गेली होती. ३०० रु. चे ३००० रु. कसे झाले ते माहीत नव्हते. परंतु भाऊसाहेबांनी मध्यप्रदेश असेंब्लीत केलेल्या कायद्यामुळे त्या गृहस्थाने कर्जाचा शेवटचा हप्ता १९५० मध्ये भरला आणि तो मारवाड्याच्यापंजातून सुटला. अशा रीतीने अनेक लोकांना शेती परत मिळाली होती. जागतिक महामंदीच्या काळात शेतकऱ्यांना आपल्या जवळचे सोने फार कमी किंमतीत विकून त्या पैशात धोतर जोडी, पातळे खरेदी करावी लागली. लोकांजवळची क्रय शक्ती संपुष्टात आली होती.

भाऊसाहेबांचे शैक्षणिक विचार

बॅ. भाऊसाहेबांनी ज्या दिवशी वकील म्हणून बार रूम मध्ये प्रवेश केला त्याचवेळी त्यांनी शिवाजी मराठा हायस्कूल मध्ये शिक्षक म्हणून पदार्पण केले ते सुद्धा विनावेतन. अज्ञानातून समाजाची मुक्तता करावयाची असेल तर सर्वांना शिक्षणाची दालने खुली करून दिली पाहिजेत. सर्वांना शिक्षणाच्या समान संधी उपलब्ध झाल्या पाहिजेत. विनम्र सेवा वृत्तीने बॅरिस्टर व डॉक्टरेट पदवी प्राप्त केलेल्या व्यक्तीला शिक्षक होण्यास भाग पाडले होते. त्यांच्या मनातील विद्यार्थ्यांविषयी कारुण्यात्मकअनुभूतीउचंबळत होती. त्यांच्या शब्दात, " या विदर्भाच्या मातीचे ऋण मला फेडावयालाच पाहिजे. कष्टातून शिक्षण घेणाऱ्या या बांधवांना सारी शक्ती वेचून सहाय्य न केले तर मी माझ्या कर्तव्यास चुकलो असे होईल".

श्रद्धानंदछात्रालयाची स्थापना

सर्व जाती-धर्माच्या विद्यार्थ्यांना एकत्रित आणून सामाजिक विषमतेची आणि जातीयतेची धार त्यांनी बोथट करून टाकली होती. या छात्रालयाने अनेक हुशार विद्यार्थी घडविले होते. त्यांनी राष्ट्रउभारणीच्या कार्याला हातभार लावला होता.

शिवाजी शिक्षण संस्थेची स्थापना

भाऊसाहेबांनी श्री शिवाजी शिक्षण संस्थेची स्थापना १९३२ मध्ये केली. या संस्थेची स्थापना करून त्यांनी बहुजन समाजाच्या उत्थानाचे कार्य केले. त्यांनी प्राथमिक शिक्षण, माध्यमिक शिक्षण, विद्यापीठीय शिक्षण, स्त्री शिक्षण आणि प्रौढ शिक्षण याबाबत वेळोवेळी प्रसंगानुसार विचार व्यक्त केले. त्यांच्या मते शिक्षण हेच समाजाच्या उन्नतीचे एकमेव महाद्वार होय. अविकसित समाजात शिक्षण प्रवृत्ती निर्माण करून शिक्षणाच्या सोयी उपलब्ध करून देणे हा मूलभूत प्रश्न होता. हा प्रश्न

सोडविण्याचा एकमेव मार्ग म्हणजे सक्तीचे शिक्षण. सक्तीच्या प्राथमिक शिक्षणासाठी जिल्हा कौन्सिलच्या उत्पन्नात वाढ करणे आवश्यक होते. त्यासाठी विरोधकांशी सामना करून करवाढ केली. त्यामुळे जिल्हा कौन्सिलच्या उत्पन्नात ४.५ लाख रुपयांची वाढ झाली. या निधीतून त्यांनी सक्तीच्या शिक्षणाची १०० केंद्रे उघडली. त्यांच्या क्षेत्रातील ११ वर्षाखालील मुला मुलींसाठी शिक्षण अनिवार्य झाले.

खेड्यांमध्ये नवीन शाळा उघडल्या. कालांतराने शिक्षण प्रसारात अमरावती जिल्ह्याच्या ग्रामीण विभागाने संपूर्ण भारतात दुसरा क्रमांक प्राप्त केला आहे. प्राथमिक शाळा उघडल्यानंतर भाऊसाहेबांनी माध्यमिक शाळांच्या विस्ताराचे कार्य केले. स्वातंत्र्यापूर्वीच त्यांनी महाविद्यालयाच्या स्थापनेची श्री शिवाजी शिक्षण संस्थेद्वारे सुरुवात केली होती. त्यांनी शिक्षणामध्ये सहलीला प्राधान्य दिले होते. त्यांनी महिला शिक्षकांना प्रशिक्षणासाठी परदेशात पाठविले होते. त्यांचा संपूर्ण खर्च संस्थेने केला होता. परदेशात महिला शिक्षका ज्या प्रमाणे शिक्षणाचे कार्य करतात तसेच कार्य भारतातील प्रशिक्षित शिक्षिका करतील हा त्यांचा हेतू होता.

अमरावतीला विदर्भ विद्यापीठ व्हावे अशी त्यांची इच्छा होती. त्यासाठी त्यांनी तत्कालीन राष्ट्रपती डॉक्टर राधाकृष्णन यांच्याद्वारे प्रयत्न केले होते. परंतु त्यावेळी त्यांना यश आले नव्हते.

भाऊसाहेबांनी शाळांचा विस्तार करताना चांगल्या इमारतींचा विचार न करता जास्तीत जास्त शाळा कशा स्थापन होतील यावर भर दिला होता. देणगीदारांमुळेच संस्थेचा व्याप वाढला होता. प्रिन्स ऑफ बेरारम्हणवूनघेणाऱ्या हैदराबादच्या निजामाकडून मिळालेल्या देणगीतून वस्तीगृहाची पहिली इमारत बांधण्यात आली होती. नंतर या इमारतीत श्री शिवाजी महाविद्यालयाचे वर्ग सुरू झाले होते. नागपूरचे महाविद्यालय श्रीमंत दादासाहेबधनवटे यांच्या देणगीतून उभे राहिले. पंढरीनाथ पाटील यांनी त्या काळात एक लाख रुपयांची देणगी दिली होती.

विनाअनुदानित शाळा आणि महाविद्यालय चालवितांनाभाऊसाहेब एकमेव स्थायी संपत्ती असलेला बंगला गहाण ठेवून आपली अडचण भागवीत असत. भैय्यासाहेबजवादे यांचे कडून अनेकदा ते शिक्षकांच्या पगारासाठी उसनवार पैसे मागत असत. भाऊसाहेबांना राज्य शासनाकडून त्यावेळी फारशी मदत मिळाली नाही. बरीच मदत केंद्र सरकारकडून मिळत गेली. राष्ट्रसंततुकडोजी महाराजांनी भाऊसाहेबांच्या शैक्षणिक कार्याची प्रशंसा केली होती.

भाऊसाहेबांनी शिक्षणातून विकास कार्य आणि विकासातून शिक्षण हे तत्त्व अंमलात आणण्याचा प्रयत्न केला. शिक्षण संस्था म्हणजे राजकारणाचे माध्यम मानणारे संस्थापक असतात. परंतु भाऊसाहेब त्याला अपवाद होते. मध्यप्रांत आणि वऱ्हाडच्या शासनात मंत्री म्हणून काम करताना योग्य व्यक्तीची निवड झाली नाही हे त्यांच्या लक्षात येताच त्यांनी सर्व कागदपत्रांची स्वतः तपासणी केली होती. डॉक्टर वि. भि. कोलते यांची निवड प्राध्यापक पदी त्यांच्या ठाम भूमिकेमुळे होऊ शकली. नागपूरच्या मॉरिशकॉलेजमध्येकुसुमावती देशपांडे यांना निवड समितीने त्या महिला आहेत म्हणून प्राध्यापक पदी निवड केली नव्हती. सरकारी नियमात बदल करून स्त्रियांना ती संधी उपलब्ध करून दिली पाहिजे अशी स्त्री-पुरुष समानतेची भूमिका त्यांनी घेतली होती. या उदाहरणाद्वारे मंत्री म्हणून काम करताना त्यांची प्रशासकीय क्षमता सिद्ध होते.

नागपूर विद्यापीठाच्या कार्यकारणीचे ते सभासद होते. भाऊसाहेब श्री शिवाजी शिक्षण संस्थेचे आजीव अध्यक्ष होते. जीवनात ज्याला काहीच मिळाले नाही त्याला काहीतरी मिळावे म्हणूनच मी शिक्षण संस्था काढल्या असे ते नेहमी म्हणत. गुणवत्तेचा निकष वापरून प्रवेश देणाऱ्या संस्थांवर ते टीका करीत. त्यांचे शैक्षणिक

कार्य अतुलनीय आहे. संस्थेतील व्यक्तीविषयी त्यांच्या मनात प्रेम असले तरी त्यांच्या कर्तव्यपालनातील बेशिस्त त्यांना आवडत नव्हती.

एकदा त्यांचे चिरंजीव अनंतकुमार म्हणाले होते "माझ्याशी बोलायला पप्पांनाअजूनपर्यंत वेळच मिळाला नाही. माझी भगिनी श्री शिवाजी शिक्षण संस्था, हिला जोपासण्यातच त्यांचा सारा वेळ जातो" हे उद्गगार फारच बोलके होते. भाऊसाहेब आजारी असताना राष्ट्रसंततुकडोजी महाराज त्यांना भेटावयास आले आणि प्रकृतीची आस्थापूर्वक चौकशी केली. भाऊसाहेब म्हणाले होते "प्रकृतीची मला चिंता नाही, चिंता आहे ती बहुजन समाजाची, तसेच श्री शिवाजी शिक्षण संस्थेची."

ज्ञान यज्ञाच्या पूर्ततेसाठी दुसरा कर्मयोगीपंजाबराव होणे नाही. उपेक्षितांनाज्ञानगंगेचा लाभ करून देणाऱ्याभाऊसाहेबांच्या, शैक्षणिक, सामाजिक आणि शेतकरी कल्याण विषयक कार्याची विस्मृती कधीच होणार नाही.

संदर्भ ग्रंथ सूची

१. मोहिते उत्तमराव (१९८३), "जागतिक कृषक क्रांतीचा विधाता लोकनेता डॉ. पंजाबराव देशमुख," मराठा विज्ञान मंदिर, अमरावती.

२. कडवे रघुनाथ (१९८६), "भारत कृषकभूषणभाऊसाहेब डॉ. पंजाबराव देशमुख", संस्कार प्रकाशन, नागपूर.

३. सावरकर सुभाष (१९९९) "संपादक," लोकमहर्षीभाऊसाहेब डॉ. पंजाबराव देशमुख गौरवग्रंथ", महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ, मुंबई-१४.

४. मेघे ज्ञानेश्वर (२००४), "पूत्र सर्वश्रेष्ठ धननिर्मात्याचा डॉ. पंजाबराव देशमुख", स्वयम प्रकाशन, नागपूर.

५. ढालेरवींद्र, (२००९), "डॉ. पंजाबराव देशमुख यांचे कृषी विषयक आर्थिक विचार," नभ प्रकाशन, शामनगर अमरावती.

६. अंधारे रमेश, (२०१६), "डॉ. पंजाबराव देशमुख जीवनकाल पट", ग्रंथाली मुद्रण सुविधा केंद्र, माटुंगा (प) मुंबई-१६.

पंजाबराव देशमुख यांचे आर्थिक विचार

डॉ.जे.एस.इंगळे
प्राध्यापक आणि अर्थशास्त्रविभाग
प्रमुख, सी.एस.एस.कॉलेज,
हुपरी,जि.कोल्हापूर
मो.८९५६१८५४२७
आजीव सदस्य क्र.४२

शोधनिबंधाचा गोषवारा

'पंजाबराव देशमुख यांचे आर्थिक विचार" असेया शोधानिबंधाचे शीर्षक असून या शोधानिबंधातपंजाबराव देशमुख यांनी प्रामुख्यानेभारतीय शेतीव शेतकरी यांच्या प्रगतीसाठी केलेल्या कामाची माहिती दिली आहे. तसेच शेतीशी संबंधितत्यांनी मांडलेल्या आर्थिक विचारांची माहिती दिली आहे. आणि या आर्थिक विचारांची उपयुक्तता किंवा महत्त्व आजही कसे मोलाचे आहे ते स्पष्ट केले आहे. प्रस्तुतचा शोधनिबंध प्रामुख्याने दोन भागात विभागला असून पहिल्या भागात प्रास्ताविक, शोधानिबंधाची उद्दिष्ट्ये, संशोधन पध्दती, संशोधन विषयाचे महत्व या बाबींची माहिती दिली आहे. शोधनिबंधाच्या दुसऱ्या भागातशेतकऱ्यांच्या उन्नतीसाठी केलेल्या कामगिरीची आणि कृषी सहकार, कृषी मालाचे दर यासंबंधीमांडलेल्या आर्थिक विचारांची माहिती दिली आहे. त्यांचे हे आर्थिक विचार आजच्या काळात कितपत लागू पडतात याचीही माहिती या निबंधात दिली आहे.

प्रास्ताविक:

पंजाबरावशामराव देशमुख तथा भाऊसाहेब देशमुख यांचा जन्म दि. २७ डिसेंबर १८९८ रोजी अमरावती जिल्ह्यातील पापळ या छोट्याशा खेड्यातील एका गरीब शेतकरी कुटुंबात झाला. त्यांचा मृत्यू १० एप्रिल १९६५ रोजी दिल्ली येथे झाला . सन १९१८ साली ते दहावीची परीक्षा पास झाले. पुण्याच्या फर्ग्युसन कॉलेजमध्ये ही त्यांनी शिक्षण घेतले. उच्च शिक्षणासाठीसन १९२०मध्ये ते इंग्लंडला गेले.तेथे त्यांनी एम.ए., डी.फिल., Bar actlaw (Barishter) या पदव्या प्राप्त केल्या. त्यांनीपी.एच. डी. पदवी सुद्धा प्राप्त केली होती. त्यांनी विद्यापीठाला सादर केलेल्या 'वैदिक वाड.मयातील धर्माचा उगम आणि विकास' या प्रबंधाला डॉक्टरेट ही पदवी मिळाली होती. ऑक्सफर्ड विद्यापीठात ते संस्कृतचे संशोधक होते. सन १९२६मध्ये ते भारतात परत आले. सन १९२७मधेमुंबईतीलसोनार जातीतील विमल वैद्य नावाच्या मुलीशी त्यांनी विवाह केला. उदरनिर्वाहासाठी त्यांनी सन १९२६पासून अमरावतीमध्ये वकिली व्यवसायास सुरवात केली. पंजाबराव देशमुख हे समाजसुधारक आणिशेतकऱ्यांचे पुढारी होते. तेस्वातंत्र्यसैनिक आणि अस्पृशोधारक होते. त्यांनी शिक्षणाचे महत्त्व ओळखले होते. म्हणून त्यांनी शिवाजी शिक्षण संस्थेची स्थापना केली. १९३२ साली त्यांनी ही संस्था स्थापन केली. त्यापूर्वी सन १९२६मध्ये त्यांनी श्रद्धानंद छात्रालय नावाच्या विध्यार्थी वसतिगृहाची स्थपना केली. १९२८मध्ये ते अमरावती जिल्हा बोर्डाचे अध्यक्ष होते. अध्यक्षपदाच्या काळात त्यांनी अनेक लोकोपयोगी कार्ये केली. सार्वजनिक विहिरी हरिजनांसाठी खुल्या केल्या. प्राथमिक शिक्षण सक्तीचे केले.सन १९३० मध्ये प्रांतिक कायदे मंडळात ते शिक्षण, कृषी, सहकार आणि लोककर्म खात्याचे मंत्री होते. अमरावती बँकेचे ते अध्यक्ष होते. शिक्षकांचे प्रश्न सोडविण्यासाठी त्यांनी भारतीय प्राथमिक शिक्षक संघाची स्थापना केली. १९५६मध्ये अखिल भारतीय दलित महासंघाची स्थापना

केली.स्वातंत्र्यपूर्व काळात सन १९३८मध्ये ते शिक्षण मंत्री होते. स्वतंत्र भारताचे पहिले कृषी मंत्री बनण्याचा बहुमान त्यांना लाभला होता.

शोधानिबंधाची उद्दिष्ट्ये :

प्रस्तुत शोधानिबंधाची प्रमुख उद्दिष्ट्ये खालीलप्रमाणे स्पष्ट केली आहेत.

1) पंजाबराव देशमुख यांच्या आर्थिक विचारांवर प्रकाश टाकणे.
2) आजच्या काळात पंजाबराव देशमुख यांचे विचार कितपत उपयुक्त आहेत त्याचा अभ्यास करणे.

संशोधन पद्धती :

'पंजाबराव देशमुख यांचेआर्थिक विचार' असे या शोधानिबंधाचे शीर्षक असून हा निबंध तयार करण्यासाठी दुय्यम साधनसामग्रीचा आधार घेतला आहे. या विषयावर प्रसिद्ध झालेले ग्रंथ आणि इंटरनेटवर उपलब्ध असलेली माहिती अभ्यासून सदरचा निबंध तयार केला आहे.

संशोधन विषयाचे महत्त्व :

पंजाबराव देशमुख हेस्वातंत्र्यसैनिक, अमरावतीचे खासदार आणि केंद्रीय कृषिमंत्री होते. ते barishter आणि डॉक्टरेट पदवी मिळवलेले उच्च शिक्षित व्यक्ती होते. ते प्रसिद्ध वकील सुद्धा होते. त्यामुळे त्यांचा जन्म होऊन सव्वाशे वर्षे उलटली असली तरी आणि त्यांच्या कामगिरीला ७५-८० वर्षे झाली असली तरी त्यांनी कृषी क्षेत्रासाठी केलेले कार्य आणि त्यासंदर्भातमांडलेले आर्थिक विचार आजही टाकाऊ ठरलेले नाहीत. त्यांनी शेती, शेतकरी यांच्या विकासासाठी केलेले काम आणि मांडलेले विचार आजही किती उपयुक्त व अनुकरणीय आहे, यावर या शोधनिबंधात प्रकाश टाकला आहे. म्हणून हा निबंध सरकारच्या आणि या विषयावरील अभ्यासकांच्या दृष्टीने उपयुक्त आहे. हा शोधनिबंध पंजाबराव देशमुख यांच्या कृषी क्षेत्राच्या संदर्भातील कामगिरीवर आणि आर्थिक विचारांवर प्रकाश टाकतो .

शोधनिबंधाच्या मर्यादा :

या शोधनिबंधात पंजाबराव देशमुख यांच्या केवळ आर्थिक विचारांवर व कामगिरीवर प्रकाश टाकला आहे. त्यांच्या इतर विचारांची आणि इतर क्षेत्रातील कामगिरीची माहिती देण्यात आलेली नाही. तसेच आर्थिक विचार व कामगिरीची माहिती ही केवळ त्यांनी मांडलेल्या कृषीविषयक विचारांशी व त्या क्षेत्रातील कामगिरी पुरतीच सीमित आहे. ही या शोधानिबंधाची प्रमुख मर्यादा आहे.

विभाग 2

पंजाबराव देशमुख यांची कृषी क्षेत्रातील कामगिरी आणि कृषीशी संबंधित त्यांनी मांडलेले विचार

प्रास्ताविक :-

शोधनिबंधाच्यादुसऱ्या भागात पंजाबराव देशमुख यांनीकृषी क्षेत्रात केलेल्या कामगिरीची माहिती दिली आहे. तसेच त्यांनी कृषी क्षेत्राशी संबंधित मांडलेल्या आर्थिक विचारांची माहिती दिली आहे.

पंजाबराव देशमुख यांचा'शेती' हा अत्यंत आवडीचा, आस्थेचा आणि अभ्यासाचा विषय होता. ते स्वतः कृषी तज्ज्ञ होते. कृषी तज्ज्ञ म्हणून ते केवळ भारतातच नव्हे तर संपूर्ण जगात प्रसिद्ध होते. त्यांच्या काळात शेती खूपच मागासलेली होती. बहुसंख्य शेतकरी दारिद्र्याच्या आणि कर्जाच्या विळख्यातवर्षानुवर्षेअडकून पडलेले होते. शेतकर्यांची परिस्थिती सुधारण्यासाठी त्यांनी आपली संपूर्ण हयात घालवली. शेती आणि शेतकरी यांची प्रगती करणे हाच त्यांचा ध्यास होता. पंजाबराव देशमुख केवळ विदर्भापुरतेचकाम करत नव्हते तर देशभरातील शेतकरी बांधवांसाठी झटत होते.त्यांनी राजकारणात , सत्तेत अनेक पदे भूषविली. या पदांचा उपभोग त्यांनी स्वतःचे महत्व अथवा नावलौकिक वाढविण्यासाठी केला नाही तर गोरगरीब, वंचित आणि शेतकरी बांधवांच्या कल्याणासाठी केला. त्यांनी शेती, शेतकरी यांच्या

प्रगतीसाठी केलेल्या कामगिरीचा आढावा थोडक्यातखालीलप्रमाणे घेतला आहे. तसेच कृषी विषयक मांडलेल्या आर्थिक विचारांची माहिती थोडक्यात खालीलप्रमाणे दिली आहे.

कृषी क्षेत्राशी संबंधित कार्य आणि विचार

पंजाबराव देशमुख यांनीभारताच्या कृषी क्षेत्राच्या विकासासाठीभरीव कार्य केले आहे. पंजाबराव देशमुख यांना तत्कालीन पंतप्रधान पंडित नेहरू यांनी आपल्या पहिल्या मंत्रिमंडळात समाविष्ट करून घेतले होते. त्यांनी यापूर्वी शेतीच्या विकाससंबंधी केलेले कार्य विचारात घेऊन पंडित नेहरूंनी सन १९५२मध्ये त्यांना केंद्रीय कृषी मंत्री पदाची जबाबदारी दिली होती. सन १९५२ मध्ये अमरावती मतदार संघातून निवडून आल्यावर पं. नेहरूंनी त्यांच्यावर संपूर्ण देशाच्या विकासाची जबाबदारी सोपवली. १९५२, १९५७ आणि १९६२ यातिन्ही लोकसभा त्यांनी जिंकल्यामुळे १९५२ ते १९६२ या काळात पं. नेहरूंच्या मंत्रिमंडळात केंद्रीय कृषी मंत्री आणि सहकार मंत्री या पदावर काम करण्याची संधी त्यांना मिळाली. सन १९५२ पूर्वी म्हणजे स्वातंत्र्यपूर्व काळातसुद्धा त्यांनासत्तेत राहण्याची आणि कृषी क्षेत्राच्या विकासाचे कार्य करण्याची संधी मिळाली होती.स्वातंत्र्यपूर्व काळात सन १९२०मध्ये पंजाबरावांनी'मध्यप्रांत वऱ्हाड शेतकरी संघ ' ही संस्था स्थापन केली होती. या संघाच्या माध्यमातून शेतीचे उत्पादन व उत्पन्न वाढावे यासाठी विशेष प्रयत्न केले. या संघाच्या माध्यमातून त्यांनी वऱ्हाड प्रांतात कृषी विषयक अनेक सुधारणा घडवून आणल्या. सन १९२८ ते ३० या काळात पंजाबराव देशमुख अमरावती जिल्हा कौन्सिलचे अध्यक्ष होते. आपल्या अध्यक्षपदाच्या काळात त्यांनी शेतकऱ्यांच्या आर्थिक प्रगतीसाठी अनेक योजनांची अंमलबजावणी केली. सन १९३० मध्ये मध्यप्रांत वऱ्हाड मंत्रिमंडळात ते कृषिमंत्री होते. कृषिमंत्री असताना वऱ्हाड प्रांतात कृषी व्यवसायाच्या विकासा साठी नवनवीनपद्धतींचा अवलंब केला. अशा प्रकारे स्वातंत्र्यपूर्व काळात पंजाबराव देशमुखयांनी विदर्भातील वऱ्हाड प्रांतात तेथील शेतकऱ्यांच्या उत्पन्नात वाढ व्हावी यासाठी विविध योजना राबवल्या. त्यामुळे त्यांना विदर्भाचे भाग्यविधाते असे म्हणतात.

स्वातंत्र्यपूर्व काळात पंजाबराव देशमुख यांनी वऱ्हाड प्रांतातील शेतकऱ्यांच्या व शेतीच्या विकासासाठी केलेले कार्य विचारात घेऊन पं. नेहरू यांनी त्यांना अखिल भारतातील शेतकर्यांच्या कल्याणाचे कार्य करण्याची जबाबदारी सोपवली. सन १९५२ साली पंजाबराव देशमुख यांनी केंद्रीय कृषिमंत्री पदाची सूत्रे हातात घेतली. १९६२ पर्यंत ते या पदावर होते. भारताला स्वातंत्र्य मिळाले त्यावेळी भारतीय शेतीची अवस्था अत्यंत दयनीय होती. शेती खूपच मागासलेली होती. बहुसंख्य शेतकरी दरिद्री आणि कर्जबाजारी होते. भारतीय शेतीची उत्पादकता वाढविण्यासाठी, शेतकऱ्यांचे राहणीमान उंचावण्यासाठी पं. नेहरू यांनी सन १९५२ मध्ये आपल्या पहिल्या मंत्रिमंडळात पंजाबराव देशमुख यांना कॅबिनेट मंत्रीपदाचा दर्जा देऊन कृषी मंत्री केले. पंजाबराव देशमुख यांनी १९५२ ते १९६२ या काळात संपूर्ण भारतातील शेतीच्या विकासाकडे लक्ष दिले. शेतीच्याव शेतकऱ्यांच्या विकासाच्या अनेक योजना राबवल्या. त्यांनी कृषी क्षेत्राच्या विकासाच्या माध्यमातूनभारताच्याआर्थिक विकासाला गती देण्याचा प्रयत्नकेला. त्यामुळेपंजाबरावकेवळविदर्भाचे भाग्यविधाते नव्हते तर संपूर्ण देशाचे भाग्यविधाते होते. त्यांनीभारताच्या कृषी विकासाचा, कृषी क्रांतीचा भक्कम आणि व्यापक पाया घातला. त्यांच्यामुळेच भारतात पहिली हरितक्रांती घडून आली. म्हणूनपंजाबराव देशमुख हेच भारतातील पहिल्या हरितक्रांतीचे जनक आहेत.

भारतीय कृषक समाजाची स्थापना :

भारताला स्वातंत्र्य मिळाले तेव्हा देशातील शेतकरी संघटित नव्हते. शेतकऱ्यांची संघटना नव्हती. त्यामुळे त्यांची लुटमार होत होती. म्हणून सन १९५५मध्ये पंजाबराव देशमुख यांनी'भारत कृषक समाज' यासंस्थेची स्थापना केली आणिशेतकऱ्यांना राष्ट्रीय स्तरावर व्यासपीठ निर्माण करून दिले. ही संस्था

अराजकीय व जातपातविरहित होती. या संस्थेने भारतातील शेतीच्या विकासासाठी अनेक प्रयत्न केले. त्यामुळे या संस्थेला भारतातील हरितक्रांतीची उद्गाती संस्था असे म्हणतात. या संस्थेच्या माध्यमातून पंजाबराव यांनी देशभर कृषी प्रदर्शने भरविली. परिपदा आणि कृषी मेळावे घेतले. सन १९५५ मध्ये पंजाबरावांनी राष्ट्रीय कृषी सहकारी खरेदी व विक्री संघाची स्थापना केली.

जागतिक कृषी प्रदर्शनाचे आयोजन :

भारतीयशेतकऱ्यांनाजगातील प्रगत देशातील कृषी यंत्राची व कृषी तंत्रज्ञानाची माहिती व्हावी यासाठी पंजाबराव देशमुख यांनी ११ डिसेंबर १९५९ते २९ फेब्रुवारी १९६० या काळात दिल्ली येथे जागतिक कृषी प्रदर्शन भरविले. जगातील अमेरिका, रशिया, चीन असे अनेक देश या प्रदर्शनात सहभागी झाले होते.सलग९२ दिवस हे प्रदर्शन भरविले होते. देश विदेशातून लाखो शेतकरी या प्रदर्शनात सहभागी झाले होते. भारतातील अनेक शेतकऱ्यांनी या कृषी प्रदर्शनाचा लाभ घेतला. या कृषी प्रदर्शनामुळे शेतकऱ्यांना आधुनिक कृषी तंत्रज्ञानाची, शेती कसण्याच्या आधुनिक पद्धतींची माहिती मिळाली. शेतीची उत्पादकता वाढवण्याच्या दृष्टीने पंजाबरावांनी दिल्लीत भरवलेले जागतिक कृषी प्रदर्शन भारतीय शेतकऱ्यांना खूपच लाभदायक ठरले.

कृषी विद्यापीठांच्या स्थापनेत पुढाकार :

पंजाबराव देशमुख यांनी कृषी क्षेत्राच्या विकासासाठी केलेले आणखी एक महत्वाचे कार्य म्हणजे भारताच्या प्रत्येक राज्यात त्यांनी एका कृषी विद्यापीठाची स्थापना करण्याचा निर्णय घेतला. त्यानुसार भारतातील पहिले कृषी विद्यापीठ उत्तर प्रदेश या राज्यात स्थापन झाले. महाराष्ट्र दोन कृषी विद्यापीठे स्थापन करण्यात आली. अशा प्रकारे देशभर कृषी विद्यापीठे स्थापन करून त्या माध्यमातून त्यांनी कृषी संशोधनाला आणि कृषी विकासाला मोठी चालना दिली.

सहकारी शेतीला प्रोत्साहन

वारसा हक्क कायदा, वाढती लोकसंख्या या कारणांमुळे शेतजमिनीचे अनेक लहान लहान तुकडे पडले होते. त्यामुळे शेती नीट कसता येत नव्हती. शेतीची उत्पादकता वाढत नव्हती. म्हणून पंजाबराव देशमुख यांनी सहकारी शेतीला प्रोत्साहन दिले. शेतजमिनीचे लहान तुकड्यात होणारे विभाजन टाळले पाहिजे असे ते म्हणत असत. सहकारी तत्वावर शेती केली तर शेतजमिनीचा आकार पर्याप्त किंवा मोठा राहून शेती किफायतशीर करता येते. म्हणून पंजाबराव देशमुख यांनी सहकारी शेतीला महत्त्व दिले होते.

शेतीमालाला चांगला भाव मिळण्यासाठी प्रयत्न

पंजाबराव देशमुख यांनी शेतमालाला कमी भाव दिला पाहिजे अशा मताच्या लोकांवर टीका केली होती.'शेतमालाला जास्त भाव दिला तर पैशाचे मूल्य कमी होते.म्हणून शेतमालाच्या किंमती कमी केल्या पाहिजेत हाच चलनवाढ रोखण्याचा मार्गआहे.' असा विचार मांडण्याचा खरपूस समाचार पंजाबरावांनी लोकसभेत संपत्ती कारच्या विधेयकावर बोलताना घेतला होता.

आर्थिक विषमता कमी करण्यासाठी संपत्ती कराचा उपयोग :

संपत्ती करारावरील विधेयकावर संसदेत बोलताना पंजाबरावांनी सांगितले की,मूठभर लोकांच्या हातात देशातील ७५ टक्केपेक्षा अधिक संपत्ती आहे. ती काढून तिचा वापर औद्योगिक विकासासाठी केला तर आर्थिक प्रगती होऊन लोककल्याण होईल. आर्थिक विषमता कमी करण्यासाठी संपत्ती करयोग्य आहे असे पंजाबरावांचे मत होते.

जपानी भातशेतीचे प्रयोग

भारताततांदळाचे उत्पादन वाढावे यासाठी जपानी पद्धतीने भातशेती करावी असे त्यांचे मत होते. जपानी पद्धतीने भातशेती देशभर व्हावी म्हणून त्यांनी देशव्यापी मोहीम उघडली होती. तांदूळ उत्पादनाच्या

बाबतीत त्यांनी विशेष प्रयत्न केले. तांदूळ उत्पादनातील तज्ञ म्हणून जागतिक पातळीवर त्यांना ओळखले जात होते.

निरनिराळ्या देशात शेतकरी पाठविण्याची योजना

भारतीय शेतकऱ्यांना विकसित देशातील शेतीची ओळख व्हावी यासाठी निरनिराळ्या देशात भारतीय शेतकरी पाठविण्याची योजना त्यांनी आखली . त्यानुसार अनेक शेतकरी जगातील विविध देशांना भेटी देऊन आले. त्याचा फायदा कृषी क्षेत्राची उत्पादकता वाढवण्यासाठी झाला.

कृषी विषयक इतर विचार

शेतीकडेभावनिक दृष्टीकोनातून न पाहता उत्पादन वाढीच्या दृष्टीने पाहावे असे पंजाबरावांचे मत होते. शेती केवळ उदरनिर्वाहाचे साधन नसून तो एक व्यवसाय आहे , शेतकरी राष्ट्राच्या विकासाचा मुख्य आधार आहे, शेतकरी सुखी तर देश सुखी, शेतकऱ्यांनी आधुनिक व तांत्रिक शेतीचा वापर करावा, स्वतःच्या हितासाठी व राष्ट्रीय विकास घडून आणण्यासाठीशेतकऱ्यांनी संघटीत झाले पाहिजे असे त्यांचे शेती व शेतकरी समाजाविषयी मत होते.

समारोपः

अशा प्रकारे पंजाबराव देशमुख यांनी स्वातंत्र्यपूर्व काळात आणि स्वातंत्र्योत्तर काळात शेतीच्या प्रगतीसाठी आणि शेतकऱ्यांच्या उन्नतीसाठी अनेकविध कामे केली. ते केवळ विदर्भातील शेतकऱ्यांचे नेते नव्हते तर संपूर्ण भारतातील शेतकऱ्यांचे नेते होते. भारतात हरितक्रांती घडून येण्यासाठी त्यांनी विशेष प्रयत्न केले. त्यांच्यामुळेच भारतात पहिली हरितक्रांती घडून आली.पंजाबरावांनी जुन्या शेती पद्धतीत सुधारणा घडून आणल्या. शेतकऱ्यांनासंघटित केले. कापूस बाजारात सुधारणा केल्या. कृषी विद्यापीठे स्थापन करून शेतीच्या विकासाला गती दिली. म्हणून पंजाबराव देशमुखांना भारतीय शेती क्रांतीचे जनक असे म्हणतात .

संदर्भः

1. लोकमहर्षी भाऊसाहेब डॉ.पंजाबराव देशमुख गौरव ग्रंथ, महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ, मुंबई.
2. नागपुरे ना.पा., कदम के.ब., मोहोड पु.ब., संपा.डॉ. पंजाबराव उर्फभाऊसाहेब देशमुख.....विविध गुणदर्शन, अमरावती, १९६५.
3. सावरकर, सुदाम सूर्यकर, रा.ब. भाऊसाहेब डॉ.पंजाबराव देशमुख- जीवन व कार्य, अमरावती, १९६४.
4. मराठी विश्वकोश .

डॉ. पंजाबराव देशमुख यांचे कृषी विषयक आर्थिक विचार

डॉ.प्रमोदिनी नवले (कदम)
प्रमुख, अर्थशास्त्र विभाग
सहकार महर्षी भाऊसाहेब संतुजी थोरात महाविद्यालय, संगमनेर.
मोबाईल नं : ९८८१११४९७९
ई मेल आय डी :drpamakadam@gmail.com
आजीव सभासद क्र.९००

गोषवारा:

भारतात कृषक क्रांतीची शिक्षा देणारे कृषिरत्न डॉ. पंजाबराव देशमुख यांचे कृषी व लोकशिक्षणाचे कार्य समाजाला दिशा देणारे आहे. शेती भारतीय अर्थव्यवस्थेचा कणा आहे. म्हणून भारताची अर्थव्यवस्था कृषिप्रधान अर्थव्यवस्था म्हणून ओळखली जाते. मात्र आज कृषी क्षेत्राची स्थिती अतिशय चिंताजनक आहे. शेतकऱ्यांच्या आत्महत्या मोठ्या प्रमाणात वाढत आहे. शेतकऱ्यांनी उत्पादित केलेल्या शेतमालाला योग्य भाव मिळत नाही, व्यापाऱ्यांकडून शेतकऱ्यांचे शोषण केले जाते, शेतीचे तुकडीकरण, नापिकी, वाढती महागाई, कर्जाचा बोजा, विज भारनियमन, बेरोजगारी, खते, किटकनाशकांचा वाढता वापर, कौटुंबिक कलह, जागतिकीकरण, खाजगीकरण, उदारीकरण, वाढते शहरीकरण इत्यादी समस्यांमुळे शेतकरी अडचणीत सापडला आहे. शेतकऱ्यांचे दुःख, दारिद्र्य डॉ. पंजाबराव देशमुख जवळून पहिले, अनुभवले म्हणून त्यांनी विविध समस्यांनी ग्रासलेल्या शेतकरी वर्गाला या समस्यांमधून बाहेर काढण्यासाठी विविध मार्ग सुचविले. आज त्या विचारांची व मार्गाची गरज दिसून येते. त्यांचा एकच ध्यास होता तो म्हणजे शेतकरी व शेती विकास. त्यासाठी त्यांनी विकासाचे प्रत्यक्ष कार्यक्रम शेतकऱ्यांना दिले.

भारतातील शेतकऱ्यांसाठी त्यांनी विविध उपक्रम राबविले त्यामध्ये प्रामुख्याने दिल्लीमध्ये मथुरा रोडला शंभर एकरावर जगातील पहिले विश्व कृषि प्रदर्शन भरविले त्यावेळी ते केंद्रीय कृषि राज्यमंत्री होते. एकूण 92 दिवस हे कृषी प्रदर्शन सुरू होते. या ठिकाणी जगभरातील ३५ लाख लोकांनी भेट दिली. या प्रदर्शनाचे उद्घाटन भारताचे प्रथम राष्ट्रपती डॉ. राजेंद्र प्रसाद यांचे हस्ते करण्यात आले होते. शिक्षण, समाजकारण, राजकारण हे समाजाला उन्नत करणारे आणि प्रगतीच्या दिशा दाखविणारी क्षेत्रे आहेत असे त्यांचे मत होते. सन १९३१ मध्ये ते भारतीय राजकारणाच्या प्रवाहात सामील झाले. केंद्रीय मंत्रीमंडळात सर्वात तरुण मंत्री म्हणून ते कार्यरत झाले. भारताच्या मंत्रीमंडळात दहा वर्षे कृषिमंत्री म्हणून कार्यरत होते. या काळात त्यांनी भारत कृषक समाजाची स्थापना करून शेतकऱ्यांसाठी जे मोलाचे कार्य केले ते निश्चितच उल्लेखनीय आहे. त्यांची कृषी क्षेत्रा विषयीची बुद्धिमत्ता आणि प्रतिभा ही चतुरस्र होती. ते उत्तम शिक्षणतज्ज्ञ, राजनीतिज्ञ व अर्थतज्ज्ञ देखील होते.

प्रस्तावना:

भारतात शेती व शेतकरी यांना प्रथम प्राधान्य असावे असे डॉ. देशमुखांनी दिनांक ३ सप्टेंबर १९४९ मध्ये घटना समितीत भाषण करताना नमूद केले होते. भारतीय शेतकरी सर्वश्रेष्ठ धन निर्माता आहे. कारण तो सर्वांचा पोशिंदा आहे. शेतकरी विकासाच्या बाबतीत मागे राहू नये. यादृष्टीने प्रत्येक शेतकरी पुत्राने शेतकऱ्यांचा आर्थिक, शैक्षणिक, बौद्धिक विकास करण्यासाठी तत्पर असले पाहिजे असे त्यांचे मत होते. भारतातील शिक्षण पूर्ण करून लंडन येथे जाऊन केंब्रिज विद्यापीठातून बॅरिस्टर व एडिवर्ग विद्यापीठात एम. ए. ऑनर्स, डी. फिल. पदवी घेऊन ते १५ जुलै १९२६ रोजी मायदेशी परत आले. जगभर भ्रमंती करत

असताना त्यांनी विकसनशील देशांबरोबर विकसित देशांना देखील भेटी दिल्या. या भेटीत त्यांनी स्वतः ऐवजी आपल्या शेतकऱ्यांसाठी आधुनिक शेती तंत्रज्ञान, सुधारित बियाणे, पशु पक्ष्यांच्या जाती भारतात आणल्या.

डॉ.पंजाबराव देशमुख यांनी विजयादशमीच्या मुहूर्तावर सन १९२७ मध्ये वऱ्हाड शेतकरी संपाची स्थापना केली. या माध्यमातून त्यांनी सर्व जाती धर्मांच्या शिक्षित व अशिक्षित तरुणांचा संघ उभा केला. त्यानंतरच्या काळात आजतागायत अशा प्रकारची संघटना कोणीही काढू शकले नाही. शेतकयांच्या कल्याणासाठी सन १९२७ पासुन त्यांनी सुरू केलेले कार्य आयुष्याच्या अंतिम क्षणापर्यंत सुरू राहिले. सन १९२८-२९ मध्ये पंजाबमधील शेतकऱ्यांच्या समस्या सोडविण्यासाठी तेथील शेतीची आणेवारी कमी केली. सन १९३२ मध्ये कर्ज लवाद कायद्याचे सरकारी विधेयक सादर करून आपल्या विद्वत्तेने मंजूर करून ७८ हजार एकर शेती सावकारांच्या कर्जातून मुक्त केली. कापूस खरेदी-विक्री व्यवहारात शेतकऱ्यांची फसगत टाळण्यासाठी त्यांनी शेतकरी, दलाल व व्यापारी यांच्या सहीने एक करार पत्रक तयार करून व्यवहारात पारदर्शकता आणली. सन १९३२ मध्ये कॉटन मार्केट बिल सादर करून कापसाचे अचूक मोजमाप कसे करावे याबाबत स्पष्ट निर्देश दिले. त्यामध्ये शेतकऱ्यांना प्रतिनिधित्व, कापसाला हमी भाव, शेतकन्यांसाठी निवास या सर्व बाबींचा समावेश केला. सन १९३४ मध्ये कॉटन मार्केट अमरावती येथे विदर्भ शेतकरी परिषद आयोजित करून शेतकऱ्यांच्या समस्यांवर चर्चा करून त्या सोडविण्यासाठी तयार केली. सन १९५२ मध्ये प्रथम केंद्रीय कृषिमंत्री म्हणून शपथविधी झाल्यावर त्यांचे कार्य जागतिक स्तरावर सुरु झाले. त्यांनी शेतकरी हितासाठी घेतलेले निर्णय आजही कृषी क्षेत्रासाठी मार्गदर्शक आहेत.

शेतकरी आणि शेती व्यवसायाच्या संदर्भात व्यक्त केलेले विचारः

१) आरे डेअरीची स्थापनाः

डॉ. पंजाबराव देशमुख यांनी भारतातील सर्वात मोठी आरे डेअरीची मुंबई येथे सहकारी तत्वावर स्थापना केली. त्यानंतर भारतातील प्रत्येक राज्यात सहकारी क्षेत्रात दूध डेअरी सुरु करण्याची स्पर्धा सुरु झाली. पुढील पाच वर्षातच भारतात दूधक्रांती पडून आली. शेती क्षेत्र आणि दुध डेअरी हे जोड व्यवसाय शेती क्षेत्राला पूरक बनले त्यातून शेतकऱ्यांना उत्पन्न वाढीचे नवीन तंत्र मिळाले. सन १९६० मध्ये इंग्लंडची महाराणी एलिझाबेथ कलकत्ता येथील भारत कृषक समाजाच्या अधिवेशनासाठी भारतात आल्या होत्या तेव्हा त्यांची राहण्याची व्यवस्था कोठे करावी ही समस्या सरकारपुढे निर्माण झाली. त्यांना निसर्गरम्य परिसरात राहण्याची सवय होती तेंव्हा त्यांची राहण्याची व्यवस्था मुंबईतील आरे डेअरीतील सर्वोत्तम न्युझिलंड होस्टेल या ठिकाणी निसर्गरम्य वातावरणात करण्यात आली होती.

२) शेती राष्ट्राच्या विकासाचा आधार

भारतासारख्या शेतीप्रधान देशात शेतीला महत्त्वाचे स्थान आहे. शेती आणि शेतकन्यांची दुरावस्था ही बाब त्यांच्या लक्षात आल्यामुळे त्यांनी शेतकरी संघटित करण्यावर भर दिला. त्यातूनच त्यांनी सन १९२७ साली शेतकरी संघ स्थापन करून शेतकऱ्यांना संघटित करण्याचे मौलिक कार्य त्यांनी केले. शेती हे केवळ उदरनिर्वाहाचे साधन नसून तो एक व्यवसाय आहे. राष्ट्राच्या विकासासाठी शेतकऱ्यांनी शेती हा व्यवसाय समजून कष्ट केले पाहिजेत. कारण देशाच्या एकूण उत्पन्नात ५० टक्के उत्पन्न हे शेती व शेतीशी संबंधीत व्यवसायातून निर्माण होते. त्यामुळे राष्ट्राच्या विकासाचा मुख्य आधार समजून शेती करावी. शेतकरी सुखी तर देश सुखी असा साधा सरळ विचार त्यांचा होता. ते नेहमी म्हणत असत की, Our culture is Agriculture कारण भारत हा कृषिकांचा देश आहे.

३) आधुनिक आणि तांत्रिक शेती:

भारतीय शेतकऱ्यांची दैववादी, निराशवादी मानसिकता बदलून त्यांना जागतिकीकरणातील विकासाच्या प्रवाहात आणणे गरजेचे आहे. जोपर्यंत शेतकऱ्यांचा शेतीकडे पाहण्याचा दृष्टिकोन बदलत नाही तो पर्यंत शेतकऱ्यांचा सर्वांगीण विकास शक्य नाही. त्यासाठी शेतकऱ्यांनी शेती करताना आधुनिक आणि तांत्रिक पद्धतीने शेती करावी. त्यांनी शेतकऱ्यांना निरनिराळ्या देशात पाठवून त्या देशातील शेतीची लागवड पद्धती अभ्यासण्याची व प्रात्याक्षिक करण्याची संधी मिळवून दिली. (उदा.जपानी भात शेतीचा प्रयोग) आज आधुनिक पद्धतीने शेती करताना अशा प्रकारच्या योजनांची अमंलबजावणी करण्याची नितांत गरज आहे.

४) सहकारी शेती:

डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्याप्रमाणेच डॉ. पंजाबराव देशमुख यांनी सहकारी शेतीवर भर दिला आहे. शेतकऱ्यांनी शेतीशी भावनिक नाते न ठेवता शेतीकडे उत्पादन वाढविण्याच्या दृष्टिकोनातून पाहिले पाहिजे. त्यासाठी शेतीचे लहान-लहान तुकड्यामध्ये होणारे विभाजन टाळून एकत्रित शेती कशी करता येईल याकडे लक्ष दिले पाहिजे. सहकारी शेती हाच त्यावर योग्य मार्ग आहे असे त्यांचे मत होते. सहकारी शेतीमुळे शेतकऱ्यांचे दर एकरी उत्पन्न वाढेल तसेच उत्पादन मूल्य कमी होऊन राष्ट्रीय उत्पन्नात वाढ होईल. त्यामुळेच आज सहकारी शेतीची संकल्पना राबविण्याची नितांत गरज आहे.

५) शेतकऱ्यांना प्रशिक्षण:

डॉ.पंजाबराव देशमुख नेहमी म्हणत असत की, तुम्हाला जर शेती करावयाची असेल तर तुम्ही एम. ए. किंवा कृषी पदवीधर होऊन शेती करा. तुम्हाला कुणीही फसवणार नाही. तुम्ही उत्तम शेती करु शकाल. शेतकऱ्याला शिक्षणाची गरज नाही किंवा कुणीही शेती करु शकतो हा सर्वदूर पसरलेला चुकीचा समज बदलविणे अत्यंत आवश्यक झाले आहे. कारण या चुकीच्या समजुती मधूनच समाजात नैराश्य पसरते. शेती व्यवसायात असफल झालेले शेतकरी निराशा किंवा उदासिनतेकडे वळतात आणि आत्महत्या करतात. त्यामुळे शेतकऱ्यांना इतर व्यावसायिक शिक्षणाप्रमाणेच शेतीशी संबंधित सर्व सोयी-सुविधा, नवीन उत्पादन पद्धती आणि औजारांची माहिती असणे आवश्यक आहे. शेती व्यवसाय स्थितीशील व्यवसाय आहे. याची जाणीव करून देण्याची गरज आज निर्माण झाली आहे. आजचे शिक्षण संशोधकाच्या प्रयोगशाळेतून थेट शेतात कष्ट करणाऱ्या शेतकऱ्यांपर्यंत पोहचले पाहिजे तरच शेतकरी उत्तम व आधुनिक शेती चांगल्या प्रकारे करु शकतो.

६) शेतकऱ्यांच्या हिताचा विचार:

डॉ. पंजाबराव देशमुख यांनी शेतकरी हिताचे विचार मांडले आहेत. भारत हा शेतकऱ्यांचा देश म्हणून सर्वत्र प्रसिद्ध आहे. देशातील शेतकरी खऱ्या अर्थाने भारताचे स्वामी आहेत. पण तरी सुद्धा त्यांच्या कल्याणाची कुणालाही आस्था नाही, कामगार वर्ग व शेतकरी वर्ग यांच्या परिस्थितीचे तुलनात्मक वर्णन करताना डॉ. देशमुख म्हणतात की, ज्या शेतकऱ्यांच्या कष्टावर आपण जगतो, आपला विकास साधतो त्यांच्यासाठी अद्याप एकही कल्याणकारी अधिकारी नाही. आज ज्या शासकीय योजना आहेत त्या सर्वसामान्य शेतकऱ्यांपर्यंत पोहचत नाहीत हे वास्तव आहे.

७) संपत्तीवरील कर विधेयक:

भारतीय शेतकरी पूर्वी कधीही नव्हता इतका आज गरीब झाला आहे. त्याला मिळालेले सर्व उत्पन्न जीवनावश्यक वस्तू खरेदी करण्यावर खर्च होऊन जाते. बहुतेक वेळा त्याला आपल्या कुटुंबाच्या साधारण गरजा देखील भागविता येत नाहीत. भारतात संख्येने कमी असणाऱ्या श्रीमंत माणसाच्या हातात देशातील ७५ टक्क्यापेक्षा अधिक संपत्ती केंद्रित झाली आहे. देशातील अधिकाची संपत्ती देशाच्या औद्यागिक

विकासासाठी उपयोगात आणली तर देशाची अधिक वेगाने प्रगती होईल त्यातून लोककल्याण होऊ साध्य होईल. शेतकऱ्यांवर कर न लावता त्यांच्या विकासासाठी प्रयत्न होणे गरजेचे आहे.

८) शेतकऱ्यांचे संघटन:

शेतकऱ्यांनी स्वतःच्या व राष्ट्राच्या हितासाठी संघटित झाले पाहिजे असे त्यांना नेहमी वाटत असे. शेतकऱ्यांच्या उद्धारासाठी व त्यांना संघटित करण्यासाठी त्यांनी अनेक योजना राबविल्या. सन १९५५ मध्ये भारत कृषक समाजाची स्थापना करून त्या माध्यमातून अनेक उपसंघटना स्थापन केल्या यामध्ये प्रामुख्याने उल्लेख करता येईल तो म्हणजे राष्ट्रीय कृषी सहकारी खरेदी-विक्री संघ, कृषक सहकारी भारतीय अधिकोष, आफ्रो-आशिया ग्रामीण पुर्नरचना संघटना, अखिल भारतीय ताडगूळ महासंघ, कृषी उत्पादकांच्या आंतरराष्ट्रीय संघटनांचा महासंघ इत्यादी. इंग्लडमध्ये National Farmers Union आणि National Farmers Union of Scotland या शेतकऱ्यांनी बनविलेल्या संघटना आहेत. या देशांचा आदर्श घेऊन त्यांनी भारतातील शेतकऱ्यांना संघटित करण्याचा प्रयत्न केला. मात्र दुर्दैवाने शेतकरी संघटित करण्याचे प्रयत्न त्यांच्या मृत्यूनंतरही पूर्ण होऊ शकले नाही, त्यामुळे आजही शेतकरी आणि कृषी व्यवसाय असंघटित आहे, त्यांना संघटित करण्याची गरज आहे.

९) शिक्षणाचा प्रसार:

ग्रामीण भागातील लोकांच्या दारिद्र्याचे मूळ त्यांच्या शिक्षणात आहे हे डॉ.देशमुखांनी ओळखले. ग्रामीण लोकांच्या दारिद्र्याच्या विचारांनी प्रेरित होऊन त्यांनी गावागावात शाळा सुरु करून शिक्षणाचे सार्वत्रिकरण केले. भारतातील शेतकरी वर्ग मोठ्या प्रमाणात गरीब तसेच निरक्षर आहे. त्यामुळे तो पारंपारिक शेती करतो, त्याला आधुनिक शेती-तंत्रज्ञान विषयक ज्ञान मिळावे, पुरक व्यवसायाचे महत्त्व वाटावे यासाठी त्यांना शिक्षण देण्याची नितांत गरज आहे. शिक्षणामुळे शेती व्यवस्थेत आणि शेतकऱ्यांच्या परिस्थितीमध्ये बदल घडून येईल यासाठी त्यांनी शिक्षणाला महत्व दिले. आजही कृषी तंत्रज्ञान, आधुनिक व्यवसाय कौशल्य देणाऱ्या व्यावसायिक शिक्षणाची गरज आहे.

१०) जागतिक कृषी प्रदर्शन:

शेती क्षेत्रातून शेतकऱ्यांना चांगले उत्पन्न मिळाले तर शेतकऱ्यांचा सर्वांगीण विकास होऊ शकते. पारंपारिक शेती व्यवसायात आमुलाग्र बदल होणे गरजेचे आहे. हे शेतकऱ्यांना पटवून देण्यासाठी त्यांनी दिल्ली येथे जागतिक कृषी प्रदर्शन आयोजित करून शेतकऱ्यांना अधिक उत्पन्न देणारी बियाणे, नवीन शेती तंत्रज्ञान व बियाणांचे संकरित वाण यांची ओळख करून दिली. केंद्रीय कृषी मंत्री असताना त्यांनी अनेक शेतकऱ्यांना विदेशात कृषी व तंत्रज्ञानाची माहिती करून घेण्यासाठी पाठविले व त्यांना बिजोत्पादनासाठी प्रोत्साहित केले. त्यामुळे देशात संकरित बियाणे निर्माण होऊ लागले. मात्र विदेशी कंपन्या स्वतःच्या स्वार्थासाठी शेतकऱ्यांची लूट करीत आहेत. हवामानात होणारा बदल, ओला तसेच कोरडा दुष्काळ या कारणांमुळे अनेक कंपन्यांचे संकरित वाण जमिनीत पेरले तर उगवत नाही. शेतकऱ्यांना दोनदा तिनदा पेरणी करावी लागते. त्यातून निर्माण होणारा कर्जबाजारीपणा यामुळे शेतकरी अडचणीत आहे.

११) खाजगी सावकारी व बँक कर्जातून सुटका :

सन १९३२-३३ मध्ये त्यांनी आणलेल्या कर्ज-लवाद कायद्यामुळे शेतकऱ्यांनी खाजगी सावकाराकडून घेतलेल्या कर्जापोटी गहाण ठेवलेल्या जमिनी सावकाराच्या घशात जात होत्या त्या जमिनी या कायद्यामुळे शेतकऱ्यांना परत मिळाल्या आहेत. सन १९१२ मध्ये स्थापन झालेल्या अमरावती सेंट्रल को-ऑपरेटिव्ह बँक लि. या संस्थेत घेतलेल्या अल्प मुदतीच्या कर्जाला दीर्घ मुदतीच्या कर्जात परिवर्तीत करून त्यांनी काही काळ शेतकऱ्यांना बँक जप्तीपासून अभय दिले.

१२) शेतमालाचा उत्पादित मूल्य सिद्धांत:
शेतकऱ्यांनी उत्पादित केलेल्या शेतमालाला योग्य भाव मिळाला पाहिजे अशी त्यांची आग्रही भूमिका होती. ज्याप्रमाणे कारखानदार आपल्या उत्पादनाची किंमत स्वतः ठरवितो. त्याच न्यायाने शेतकऱ्यालाही आपल्या उत्पादनाची किंमत ठरविता आली पाहिजे असे त्यांचे ठाम मत होते.

१३) पूरक व्यवसाय :
शेतीला जोड व्यवसाय म्हणून दुग्धव्यवसाय, कुक्कुटपालन, शेळी व मेंढीपालन, वराहपालन इत्यादी व्यवसाय शेतकऱ्यांनी सुरु करण्यासाठी विदेशातून उत्तम प्रतीचे जनावरे व लेंगहार्न जातीची कोंबडी, जर्सी, होलेस्टीन गायी, मेरीनो मेंढी आयात केली. शेतकऱ्यांसाठी बारावे अखिल भारतीय पशु प्रदर्शन बहादुरगड रोहतक हरियाणा, अखिल भारतीय कुक्कुट प्रदर्शन, राष्ट्रीय कृषि प्रदर्शन कलकत्ता येथे आयोजित करून शेतकऱ्यांना पूरक व्यवसाय करण्यासाठी प्रोत्साहित केले.

समारोप :
डॉ. पंजाबराव देशमुख यांनी भारतीय शेतकरी व शेतीच्या संदर्भात वेळोवेळी जे विचार व्यक्त केले त्यावरून त्यांच्या व्यक्तिमत्त्वाचे पैलू प्रकर्षाने समोर येतात. शेतकऱ्यांसाठी भारत कृषक समाजाची केलेली स्थापना (१९५५), गोसंवर्धनाच्या संदर्भात ३ नोव्हेंबर १९५४ रोजी आकाशवाणीवरून केलेले भाषण, मालमत्ता कराचे समर्थन, गृह उद्योगासंबंधी घेतलेली भूमिका, दि.४ फेब्रुवारी १९४९ रोजी लोकसभेमध्ये अधिक धान्य पिकवा या उपक्रमाच्या संदर्भात केलेले भाषण यातून त्यांच्या दूरदृष्टीचे दर्शन होते. भारतातील आर्थिक स्तरांवरील प्रश्नांचा मागोवा घेताना त्यांच्या डोक्यात गरीब शेतकरी आणि विपन्नावस्थेतील शेती हेच प्रमुख घटक असायचे. त्यांच्या कार्याचा गौरव राष्ट्रपिता महात्मा गांधी यांनी देखील केला. गांधीजी म्हणाले की, शेतकऱ्यांची सेवा करणे सोपे आहे. त्यासाठी सोपे कायदे, साधे शिष्टाचार व सरळ माणसे हवी आहेत. हे तीनही गुण अंगीकारलेला डॉ. पंजाबराव देशमुख हा कदाचित भारतीय युगातील एकमेव असावा ज्याने पद, प्रतिष्ठा व पैसा यांना महत्व न देता आपला जीवनयज्ञ शेती व शेतकऱ्यांसाठी चेतविला आहे. डॉ. पंजाबराव देशमुख यांच्या शेतीविषयक विचारातून त्यांची शेती व शेतकऱ्यांविषयीची आस्था, तळमळ याचे दर्शन घडते त्यामुळेच त्यांना शेतकऱ्यांचे कैवारी म्हटले जाते. त्यांच्या कार्याची आजही जगात व भारतात दखल घेतली जाते.

संदर्भ ग्रंथ:

१. मोहोड सुधाकर, कृषी रत्नाकडून भारत रत्नाकडे
२. डॉ. पंजाबराव देशमुख संघर्षांचा प्रवास, दैनिक महाराष्ट्र टाईम्स.
३. ढाले रवींद्र, डॉ. पंजाबराव देशमुख यांचे कृषिविषयक आर्थिक विचार
४. https://inmarathi.net/dr-panjabrao-deshmukh-information-in-marathi
५. http://bhaoosaheb.blogspot.com/search/label
६. इंगळे अशोक, भाऊसाहेबांचे शेती विषयक विचार
७. अतकरे देवानंद, पुंडकर पंजाब, कृषी पंढरीचे दैवत
८. चिखले नंदकिशोर, राऊत एन.डी., कृषीवलांचा आश्रयदाता.

डॉ.पंजाबराव देशमुख यांचे शेतीविषयक तत्वज्ञान

प्रा. किशोर गजानन सुतार, साहाय्यक प्राध्यापक,
अर्थशास्त्र विभाग, छत्रपती शिवाजी कॉलेज, सातारा (स्वायत्त)
ई- मेल – kishorsutar2021@gmail.com
आजीव सदस्य क्र. -: १८४८
प्रो. (डॉ.) अनिलकुमार कृष्णाराव वावरे
अर्थशास्त्र विभाग प्रमुख
छत्रपती शिवाजी कॉलेज, सातारा (स्वायत्त)
ई- मेल – dranilwavare@ggamil.com
आजीव सदस्य क्र. : ८८०

गोषवारा

शेती आणि शेतकरी यांच्या प्रगतीतुन देशाची प्रगती मोजणारे एक दृष्टे नेतृत्व म्जणजे डॉ. पंजाबराव देशमुख. देशाला विकसित करण्याकरता त्यांनी शेती व शेतकऱ्यांना विकसीत केले. त्यांचे अवघं आयुष्य हे शेतक-यांसाठी होते. नांगराच्या फाळात सतत सुधारणा करत त्यांनी कृषी क्रांतीला नवा आकार आणि नवा आयाम दिला. नांगरटीच्या सरळ रेषेतुन आणि 'बाराखडीच्या' बाळबोध लिपीतुन त्यांच्या कृषी क्रांतीने बाळसे धरले. त्यांना मिळालेले जीवनदर्शन हे ऑक्सफर्ड व केंब्रिज विद्यापीठांपेक्षा स्वतःच्याच जीवन संघर्षातुन जास्त लाभले. त्यांनी कापसातुन क्रांती, गव्हातून तत्वज्ञान, शिक्षणातून संस्कृती, फळातुन चारित्र्य, पैशातुन प्रेरणा आणि समृद्धीतून सभ्यता या पायावर कृषी क्रांती घडविली. समाज काय पिकवतो, काय उपभोगतो, काय शिकतो - वाचतो यावर त्या समाजाचे विचार - आचार ठरतात. लहरी मान्सुनला आणि लहरी बाजार यंत्रणेला कृषी क्रांतीच्या ज्ञान विज्ञाणाने डॉ. पंजाबरावांनी नमविले. काळ्या मातीला, भोळ्या शेतक-याला आणि हिरव्या रानाला स्पर्ष करीत त्यांची ही क्रांती फूलत गेली. पिक बुडाले आणि पिकवीनारेही बुडालेत, गावे बुडालीत आणि भारत दरिद्री बनला. करबुडव्यांच्या मक्तेदारीने शहरी झगमगाटालाच समृध्दी मानले. जाती - जमातींनी जसा भारत पोखरून टाकला तसाच भारतभर राजकीय पक्षांनी आणि त्यांच्या कवटाभर घोषणांनीही? या विघटनकारी प्रक्रियेवर मात करण्यासाठी पंजाबरावांनी कृषी क्रांती घडवीली. या त्यांच्या कृषी क्रांतीमागील त्यांच्या उदात्त, उन्नत अशा तत्वाज्ञानाचा परामर्ष प्रस्तुत शोधनिबंधाद्वारे घेण्याचा हा एक प्रयत्न. भारताच्या राजकीय, आर्थिक, सामाजिक, सांस्कृतीक, शैक्षणिक, धार्मिक क्षेत्रात अनेक महान नेते, द्रष्टे पुरूष होऊन गेले. मात्र विज्ञाननिष्ठ, कायदेपंडित, राजकारण, समाजकारण, शिक्षणप्रसार, शेती सुधारणा अशा विविध आयामांना स्पर्श करणारे बहुवीध व्यक्तीमत्वे फारच विरळ सापडतात. डॉ. पंजाबराव देशमुख हे असेच एक अद्वीतीय व्यक्तीमत्व. त्यांनी शेती, शेतकरी, ग्रामीण विकास, शिक्षण, समता यांबाबत स्वतःच्या कार्यकर्तृत्वातून जे काही मागे ठेवले आहे त्या विचारांची, संस्थांची, कार्याची आजच्या वर्तमानच नव्हे तर भविष्यातील प्रश्नांच्या सोडवणुकीसाठीची उपयुक्तता ही अनंन्यसाधारण अशी आहे.

१. प्रस्तावना -

शेती आणि शेतकरी यांच्या प्रगतीतुन देशाची प्रगती मोजणारे एक दृष्टे नेतृत्व म्जणजे डॉ. पंजाबराव देशमुख. देशाला विकसित करण्याकरता त्यांनी शेती व शेतकऱ्यांना विकसीत केले. त्यांचे अवघं आयुष्य हे शेतक-यांसाठी होते. नांगराच्या फाळात सतत सुधारणा करत त्यांनी कृषी क्रांतीला नवा आकार

आणि नवा आयाम दिला. नांगरटीच्या सरळ रेषेतुन आणि 'बाराखडीच्या' बाळबोध लिपीतुन त्यांच्या कृषी क्रांतीने बाळसे धरले. त्यांना मिळालेले जीवनदर्शन हे ऑक्सफर्ड व केंब्रिज विद्यापीठांपेक्षा स्वतःच्याच जीवन संघर्षातुन जास्त लाभले. त्यांनी कापसातुन क्रांती, गव्हातून तत्वज्ञान, शिक्षणातून संस्कृती, फळातुन चारित्र्य, पैशातुन प्रेरणा आणि समृद्धीतून सभ्यता या पायावर कृषी क्रांती घडविली. समाज काय पिकवतो, काय उपभोगतो, काय शिकतो - वाचतो यावर त्या समाजाचे विचार - आचार ठरतात. लहरी मान्सुनला आणि लहरी बाजार यंत्रणेला कृषी क्रांतीच्या ज्ञान विज्ञाणाने डॉ. पंजाबरावांनी नमविले. काळ्या मातीला, भोळ्या शेतक-याला आणि हिरव्या रानाला स्पर्ष करीत त्यांची ही क्रांती फूलत गेली. पिक बुडाले आणि पिकवीनारेही बुडालेत, गावे बुडालीत आणि भारत दरिद्री बनला. करबुडव्यांच्या मक्तेदारीने शहरी झगमगाटालाच समृध्दी मानले. जाती - जमातींनी जसा भारत पोखरून टाकला तसाच भारतभर राजकीय पक्षांनी आणि त्यांच्या कवटाभर घोषणांनीही? या विघटनकारी प्रक्रियेवर मात करण्यासाठी पंजाबरावांनी कृषी क्रांती घडवीली. या त्यांच्या कृषी क्रांतीमागील त्यांच्या उदात्त, उन्नत अशा तत्वाज्ञानाचा परामर्ष प्रस्तुत शोधनिबंधाद्वारे घेण्याचा हा एक प्रयत्न.

२. परवलीचे शब्द – (Key Words)

कृषक- (Farmers), कास्तकरी- (Farm Workers) मान्सुन, पाऊसकाळ, आडते - मध्यस्त

३. उद्दिष्ट्ये – (Objectives)

प्रस्तुत शोधनिबंध हा खालील प्रमुख उद्देश समोर ठेऊन करण्यात आलेला आहे.

१. डॉ. पंजाबराव देशमुख यांच्या शेतीविषयक तत्त्वज्ञानाचा अभ्यास करणे.

२. डॉ. पंजाबराव देशमूख यांच्या कृषी विषयक तत्त्वज्ञानामागील भूमिकेचा शोध घेणे.

४. अभ्यासपध्दती –

प्रस्तुत शोधनिबंध हा महाराष्ट्र व भारतासंबंधीच्या स्वातंत्र्यपूर्व व स्वातंत्र्योत्तर कालखंडातील सामाजिक, राजकीय आणि विशेषतः आर्थिक गोष्टींशी संबंधीत असल्याने तो पूर्णतः दुय्यम साधन - स्त्रोतांवर आधारीत आहे. यासाठीच्या अभ्यासाकरता पूढील दुय्यम साधन स्त्रोतांचा वापर केला आहे.

१. महाराष्ट्र व केंद्र सरकारचे विविध अहवाल

२. डॉ. पंजाबराव देशमुख यांचे चरित्रग्रंथ

३. संपादकीय अग्रलेख

४. विविध संकेत स्थळांवरील उपलब्ध माहिती

५. पूर्वसंशोधनाचा आढावा -

प्रस्तुत विषयाचा अभ्यास करीत असताना डॉ. पंजाबराव देशमुख यांचे राजकीय, सामाजिक, शैक्षणिक, शेतीविषयक कार्य समजावुन घेत असताना वीर उत्तमराव मोहीते लिखीत, जागतिक कृषीक्रांतीचा विधाता, लोकनेता, डॉ. पंजाबराव देशमुख, विदर्भाचा लोकनेता डॉ. पंजाबराव देशमुख, प्रा. सुधाकर मोहोळ, शेतकरी हिंदुस्तानाचा अतिरीक्त मुल्याचा सिध्दांत या ग्रंथातून मिळालेली माहिती उपयुक्त ठरली. त्या आधारे डॉ. पंजाबराव देशमुख यांच्या शेती विकासविषयक तत्वज्ञानाचा आढावा घेण्याचा प्रयत्न केलेला आहे.

६.अभ्यासविषयाचे महत्व -

स्वातंत्र्यपूर्व आणि स्वातंत्र्योत्तर कालखंडातील शेती व शेतकरी यांच्या मुलभुत व सर्वांगीण विकासामधील डॉ. पंजाबाव देशमुख यांचे कार्य, विचार आणि तत्त्वज्ञान समजावूण घेणे आजच्या समकालीन

शेती व शेतकरी वर्गाच्या प्रश्नांच्या सोडवणुकीसाठी, समस्यांवरील उपायासाठी अत्यंत महत्वाचे आहे. त्यांची या संदर्भातील दुरदृष्टी आजही सरकार, धोरणकर्ते, अयासक व प्रत्यक्ष शेतकरी वर्गास उपयुक्त ठरणारी आहे.

७. डॉ. पंजाबराव देशमुख यांचे शेतीविषयक तत्त्वज्ञान -

डॉ. पंजाबराव देशमुख यांनी आपल्या कार्यकाळात शेतकरी वर्गाच्या प्रश्नाकरता गल्लीपासून दिल्लीपर्यंत जो संघर्ष केला, जी आंदोलने केली, लढा दिला. विविध शेतीविषयक व शैक्षणिक संस्थांची उभारणी केली, जी भाषणे दिली, वेळोवेळी जी धोरण ठरवीली, ज्या भूमिका घेतल्या त्या सर्वातून ध्वनीत होणारे त्यांचे शेतीविषयक तत्वज्ञान पूढीलप्रमाणे -

७.१ व्यवस्थेचे मुलभूत गणित-

पंजाबरावांनी कृषी उत्पादीत वेगवेगळ्या वस्तुंच्या उत्पादनखर्चाची गणिते तर मांडलीच पण त्यांनी आपल्या भारतीय व्यवस्थेचेही मुलभुत गणित समजुन घेवून सोडविले, यातच त्यांच्या कृषी क्रांतीची मुलभूत बैठक होती. या भारतीय घटनेतील संवेदना त्यांना नीट समजली. यातच पंजाबरावांच्या बुध्दिमत्तेची विशालता, आधुनिकता, आणि राष्ट्रीयता होती. डॉ. पंजाबराव जे जीवन जगले, ज्या परिस्थितीत जगलेत, ज्या धैर्याने जगले ते सारे या देशासाठी महत्त्वाचे आहे. पंजाबरावांच्या मोठेपणात या देशाचे मोठेपण आहे. पंजाबरावांच्या विद्यार्जनात पांडित्य व भारताचे शहाणपण सामावलेले आहे. डॉ. पंजाबराव समुजन घेणे आणि समजून सांगणे म्हणजे शेती क्रांतीच्या इतिहासाला समजावुन घेणे-देणे होय.

डॉ. पंजाबराव म्हणजे सनातनी हिंदुस्थानच्या क्रियेची प्रतिक्रीया होती. त्यांना केवळ जूनी गणिते मांडून अथवा मोडून समाधान होणार नव्हते. नव्या भारतासाठी संपूर्ण नवे गणित त्यांनी शोधून काढले. ही क्रियाप्रतिक्रीया घेऊनच विसाव्या शतकातील भारताला जाणून घेता येते. खरे थोर मृत्यूनंतरही थोर होत जातात. आणि राष्ट्राच्या आठवणीत पक्के बनतात. डॉ. पंजाबरावांना हे भाग्य लाभले आहे. याचा एक पुरावा म्हणजे आजची कृषी प्रगती.

७.२ नवप्रवर्तनवादी दृष्टी -

चांगल्या कुटुंबव्यवस्थेतुन, समाजव्यवस्थेतुन आणि राज्यव्यवस्थेतून, अर्थव्यवस्थेतून देश घडतो. समाजाचे अज्ञान आणि दारिद्‌य्र दुर करणे हाच पंजाबरावांच्या दृष्टीने वेदांन्त होता. समाजाच्या विचारशक्तीवर विश्वास ठेऊनच ते कृषी क्रांतीच्या कार्यात मग्न झाले. अज्ञान आणि दारिद्‌य्रातच अपार हिंसा असते, भटशाही आणि भांडवलशाहीचे लोभ आणि मोह शेती क्रांतीद्वारे त्यांना नष्ट करायचे होते. भारतीय हरित क्रांतीला त्यांनी शंभर वर्षे आधीच प्रारंभ केला. यासाठी श्री. शिवाजी शिक्षण संस्था हे त्यांचे शैक्षणिक नवप्रवर्तन होते. तर भारत कृषक समाज हे त्यांचे संघटनात्मक नवप्रवर्तन होते. जागतिक कृषी प्रदर्शने आणि शेतकरी बँक ही त्यांची राजकीय आणि आर्थिक नवप्रर्तने होती. शेतकरी क्रांतीसाठी काम करणे म्हणजे शेतक-यांपेक्षाही जास्त कष्ट करणे, जास्त यातना भोगने आणि जास्त सहनशील होणे होते. डॉ. पंजाबरावांनी जीवनात हे दिव्य केले. ते भारताचे अर्थकारण, राजकारण, समाजकारण, धर्मकारण म्हणजे शेतीकारणच समजत होते. भारताच्या भिन्न भिन्न क्षेत्रांतील धुरीणांना आणि दिग्गजांना भारत कृषक समाजाच्या कार्यात डॉ. पंजाबरावांनी सहभागी करून घेतले. कृषीमंत्री असताना त्यांनी दिल्ली येथे भारतातील पहिले ‘जागतीक कृषी प्रदर्शन’ भरविले. त्यांनी ‘देवस्थान बील’ आणि ‘कर्जलवाद बील’ आणले. व-हाड शेतकरी संघ, १८ पै वरून २७ पै पर्यंत शिक्षण कर, अखील भारतीय शेतकरी सहकारी बँक, लोक विद्यापीठ ही त्यांच्या शेती क्रांतीची साधने होती.

७.३ - सहकारवाद -

दलालांना आणि मध्यस्तांना हटविणे आणि भांडवली साठा शेतक-यांच्या मालकीचा करणे यासाठी त्यांनी सहकारी क्षेत्राचा पर्याय निवडला. कालांतराने भारतातील सर्व खाजगी क्षेत्र सहकारी क्षेत्रात विलीन करण्याची त्यांची कल्पना होती. शेतकरी वर्गाला आर्थिक न्याय देण्यासाठी खाजगी क्षेत्राचे उच्चाटन करून सहकारी क्षेत्राला भारतातील प्रधान क्षेत्र बनविणे हाच एकमेव उपाय होता. खाजगी क्षेत्र कायम ठेवणे म्हणजे खाजगी भांडवल उत्पादक शक्ती आणि खाजगी नफा कायम ठेवणे असे सूत्र आहे. विशिष्ट काळात भारतात केवळ सार्वजनिक क्षेत्र आणि सहकारी क्षेत्र अशी दोनच क्षेत्रे राहावीत असा ढाचा त्यांनी नियोजनपूर्वक राबविण्यास प्रारंभ केला. त्यामुळे १९५७-५८ यावर्षासाठी भारताचे सहकार मंत्री म्हणून ते कार्य करीत असताना त्यांचे सहकार खाते काढून त्यांना कृषीमंत्री केले. आज ना उद्या भारतात कृषी क्रांतीचा कार्यक्रम राबवावाच लागेल. जोपर्यंत शेतकरी दारिद्र्यात, अज्ञानात, शोषणात, कर्जबाजारीपणात अडकलेला आहे तोवर त्यांला उर्जीतावस्था लाभणार नाही. आधुनिक व प्रगत अशा शेतीशिवाय औद्योगिकीकरण, व्यापार आणि आधुनिकीकरण शक्य होणार नाही. विकसित विनीमय प्रक्रियेमध्ये आधुनिक संपन्न कृषक वर्गच आधुनिक औद्योगिकीकरणाला व व्यापाराला तोलुन धरणारा प्रमुख घटक आहे. त्यामुळे शेतक-यांची समृध्दी म्हणजे शेतीची वाढती उत्पादकता, वेगाने वाढणारे औद्योगिकीकरण आणि व्यापार संवर्धन - समृध्दी अशी सलग विकासाची प्रक्रिया होय. Everything affects everything' हे आजच्या विकासाचे मुळसूत्र आहे.

७.४ समांतर अर्थव्यवस्थेतील विषमता -

भारत हे कल्याणकारी राज्य आहे. असे घटनेने घोषीत केले आहे. तरीही येथे किंमत, उत्पन्न, जीवनमान आणि संपत्ती यात कमालीची विषमता आढळते. ही सर्वकष व अभद्र विषमता नियोजीत भारतात वेगाने वाढतही आहे. या तफावतीमुळे खेडी आणि शहरे, शेतकरी - शेतमजूर, व्यापारी, उद्योगपती, व्यावसायीक व नोकरदार यांच्या जीवनमानातील तफावत सतत वाढतच चालली. प्रत्येक स्तरावरील जीवनमान निश्चित करून त्यातील विषमता घटविने हा आर्थिक समतेचा पहिला टप्पा ठरतो. शेतक-यांच्या उत्पादनाच्या किंमतीशी हा राष्ट्रीय प्रश्न निगडीत आहे.

भारतात दारिद्र्यरेषेखालील आणि दारिद्र्य रेषेच्या आसपास ७०% म्हणजे ५० कोटी लोक राहतात. त्यांना स्वतःची कोणतीही प्रगती करून घेण्याचे जीवनमान या देशाने दिलेले नाही. भारतातील सुमारे ३५% लोक नोकरीतून मिळणा-या पगाराशी बांधलेले असून त्यांना एक बांधीव जीवनमान दिले गेले आहे. त्यांच्याही जीवनाची एक प्रकारे कोंडी झाली आहे. २५% लोक हे निरनिराळ्या छोट्या मोठ्या व्यावसायांशी संबंधीत असून कशीबशी गुजरान करत आहेत व सर्वात वरच्या स्तरावरचा ५% वर्ग हा समांतर अर्थव्यवस्थेशी संबंधीत असून त्यांच्या विलासी वृत्तीला मर्यादा नाही. मुठभर धनीकानी सर्व समाजाची वेठबीगारी केली आहे. हे सारे प्रतिष्ठीत शोषक आहेत अशी डॉ. पंजाबरावांची दृढ धारणा होती.

७.५ शेती क्रांती आणि पायाभूत उद्योग -

शेती क्रांती ही केवळ मुल्यनीती आणि अर्थनीती नसून ती एक समग्र अशी समाजनीती आहे. डॉ. पंजाबराव याकडे अवजड व पायाभूत उद्योग म्हणूनच पाहात. डॉ. पंजाबरावांनी या प्रक्रियेच्या आड येणा-यांवर प्रहार केले. शेतीसाठी लागणारे पाणी, खते, बी-बीयाणे, जंतु व किटकनाशके, यंत्रे, अवजारे, वीज, साठवणगृहे, पीक कर्जे, बाजारपेठा, वाहतुकीच्या सोयी यांसारख्या पायाभूत सुविधानिर्मीती शिवाय शेती हा या देशाचा पायाभुत उद्योग होऊ शकणार नाही. डॉ. पंजाबरावांनी त्याकरता सातत्याने पाठपूरावा केला. त्यांनी रस्त्यावरच नव्हे तर कायदेशीर लढेही दिले. त्याकरता राजकीय आखाडे गाजवीले शाश्वत व चिरंजीवी कृषी विकासासाठीची पायाभुत संरचना किती गरजेची आहे. याचे त्यांना पूरेपूर ज्ञान होते.

७.६ दशवर्षीय उत्पादन - वितरण योजना -

कृषीक्रांतीचीही एक आखीव रेखीव बुध्दीतंत्र व वैज्ञानिकता असते. भारतीय शेतक-यांना, शेतमजुरांना, ग्रामीण कारागिरांना, शहरातील कामगारांना आणि झोपडपट्टीवासीयांना जर दारिद्य्र रेषेच्या वर उचलायचे असेल तर भारताला १९८२-९२ अशी एक दशवार्षीक उत्पादन - वितरण योजणा आखावी लागेल. उत्पादनवाढीसोबतच वितरणातही समानता प्रस्थापित करावी लागेल. सहकारी क्षेत्राला सुधारित व विस्तारीत बनवावे लागेल, भूमीप्रमाणेच उत्पन्न आणि संपत्तीवर सिलींग आणावे लागेल. राष्ट्रीय वेतनमान निश्चित करावे लागेल. एका गावाला एक ग्रामोद्योग, एक ट्रॅक्टर, एक प्रयोगशाळा, एक विद्यालय, एक दवाखाना, एक ग्रंथालय, एक क्रिंडांगण, एक गोडाऊन, एक दुरदर्शन, एक टेलीफोन, एक ग्रामसेवक अशी रचना स्वीकारून गावागावाच्या उत्पादनाच्या आणि वितरणाच्या योजणाना आखाव्या लागतील. प्रत्येक गाव कृषी विद्यापीठाशी संगग्लीत असले पाहिजे. पाणी, रस्ते, वीज, गावागावापर्यंत न्यावी लागेल. कज्जे दलालीचे निकाल ग्रामपंचायतीद्वारे तिथल्या तिथेच देऊन कायदेशीर कटकटीतून शेतक-यांना मुक्त करावे लागेल अशा कितीतरी स्पृहणीय बाबी डॉ. पंजाबरावांनी आपल्या या योजनेद्वारे मांडल्या.

७.७ शेतकरी सर्वात मोठा उत्पादक, उपभोक्ता व मतदाता -

डॉ. पंजाबरावांची अशी ठाम धारणा होती की, भारतीय शेतकरी हा सर्वात मोठा उत्पादक, सर्वात मोठा उपभोक्ता आणि सर्वात मोठा मतदाता आहे. मात्र या तिन्ही स्तरावर त्यांचे शोषण सुरू आहे. सर्वात मोठा उत्पादक शेतकरी दरिद्री आहे. सर्वात मोठा उपभोक्ता दारिद्य्र रेषेखाली आहे. आणि सर्वात मोठा मतदाता निरक्षर आहे. म्हणून आपला देश मागे आहे. लोकशाही, समाजवाद, धर्मनिरपेक्षता, राष्ट्रीय एकात्मता यातुन कशी साध्य होणार? पंजाबरावांनी राष्ट्रीय आणि आंतरराष्ट्रीय स्तरावर भारतीय शेतीची चिकित्सा केली. शेतक-यांना संघटीत केले. त्यांच्यासाठी विविध संस्थांची स्थापना केली. त्यांच्यासाठी बहुमुखी प्रकल्पांची उभारणी केली.

७.८ उत्पादन खर्च - किंमत

या आर्थिक क्रांतीसूत्राची अंमलबजावणी करणे हेच आमच्या राज्यकर्त्यांचे आद्य कर्तव्य आहे. प्रधानमंत्री, सर्व मुख्यमंत्री, विधानसभा, लोकसभा, राज्यसभा, विधानपरिषदा, कॅबीनेट, रिझर्व बँक यांनी शेक-यांच्या समृध्दीला अग्रक्रम द्यावा. सर्व भांडवलदारांचे भांडवल निधान जरी शेतक-यांच्या मालकीचे केले तरी शेतकरी वर्गाच्या उत्पन्नाची थकबाकी शासन भरून देऊ शकत नाही. शेतक-यांची ही नुकसानभरपाईची फिर्याद न्याय्य आहे. म्हणूनच सरकारने किंमतीचा हा देशव्यापी प्रश्न प्रामाणिकपणे व वेळ न दवडता सोडवावा आणि आपल्या राष्ट्रद्रोहाची ढोबळ चूक दुरूस्त करावी. शेतक-यांना उत्पादन खर्चाइतकी किंमत देणे हाच सहाव्या पंचवार्षीक योजणेचा अग्रक्रम ठरवावा. जे नियोजन व जे शासन शेतक-यांना उत्पादन खर्चापेक्षाही कमी किंमत देते ते कसले नियोजन आणि ते कसले शासन? 'गरीबी हटाओ' चे आर्थिक समीकरण म्हणजे उत्पादन खर्चाऐवजी किमत देणे याचा डॉ. पंजाबरावांनी हिरिरीने पुरस्कार केला.

७.९ ग्रामीण औद्योगिकीकरण -

उत्पादन खर्चावरून ठरणा-या किंमतीनूसार शेतकरी राष्ट्रीय उत्पन्नात ८०% वाटा देतो. मात्र त्याच्या वाट्याला यातील ४०% उत्पन्न येते. शेतमजुरांच्या कमी रोजगारीचे आणि मजुरीचे हेच मुख्य कारण आहे. शेतक-यांना आपली ही मजुरी देखील योग्य प्रमाणात प्राप्त होत नाही. पैसा हिशेबासाठी वापरला जातो. उत्पादन, समृध्दीचे मोजमाप असते. मुद्रेचे योग्य हिशेब म्हणजेच उत्पादनाची बरकत. पण भांडवलशाही हिशेब उलटे असतात.

खेड्यांना आर्थिक न्याय दिला तर कृषी आणि प्रक्रिया उद्योगांद्वारे ग्रामीण औद्योगिकीकरणाला वेग येईल. वाया जाणा-या उत्पादनातून सतत नवनवे रूपांतरीत उत्पादन काढता येईल. शेतीचे जोडधंदे विस्तृत व सखोल प्रगती करतील. शेती उत्पादनात वाढ घडवीताच ग्रामीण औद्योगिकीकरणातही वाढ होईल.

खरी उत्पादनवाढ फक्त शेतीतच होते. त्यामुळे शेती उत्पादन वाढविल्याशिवाय औद्योगिकीकरणाचा वेग वाढणार नाही. शेती - शेतकरी समृध्दीशी यामुळेच विकासाचा वेग संबंधीत आहे/ याबाबतचे लोकजागरण डॉ. पंजारावांनी सातत्याने केले.

७.१० अन्नधांन्याच्या किंमती -

ज्या दिवशी भारतीय शेतक-यांचे आंदोलन सर्व अन्नधाण्यासाठी आणि कडधान्यासाठी उत्पादनेखर्चाएवढ्या किंमतीची मागणी करेल त्या दिवशी शेतक-यांचे आंदोलन सर्वात उंचीवर पोहोचलेले असेल. महागाईच्या युगात अन्नधान्य स्वस्त असावे हा एक दरीद्री विचार आहे. यामुळे अन्नधांन्य पिकवीणारेच अन्न अन्न दशेला येऊन उपासमारीत व अर्धपोटी राहण्याच्या संकटात अडकुन पडलेले आहेत.

इतर नगदी पिकासोबतच अन्नधांन्याच्या किंमती देखील उत्पादन खर्चाएवढ्या केल्या म्हणजेच भारतातील उपासमार दुर होणार आहे. त्यातुन अन्नधान्याचे उत्पादन वाढून भारताची उपासमार थांबेल. नफ्यासाठी पिकविणे हाच उत्पादकाचा धर्म असतो. जिथे नफा तिथे उत्पादन आणि जिथे तोटा तिथे दारिद्य्र.

आज अन्नधान्य व कापड याबाबतीत भारताने आत्मनिर्भरता साध्य केली म्हणून आत्मप्रौढी मिरवीली जात आहे. पण हा खोटारडेपणा आहे. ५०% लोक दारिद्य्ररेषेखाली जीवन जगत असताना हे स्वावलंबन कसे असु शकते? अन्न व कपडे विकत घ्यायला समाजाजवळ पैसे नसल्यामुळे ही आभासात्मक आत्मनिर्भरतेची स्थिती निर्माण झालेली आहे. ज्या दिवशी कुणीही दारिद्य्र रेषेखाली राहणार नाही त्या दिवशी अन्न व कापड यांचे मोठ्या प्रमाणावर उत्पादन वाढवूनच याबाबतीत भारताला आत्मनिर्भरता मिळवता येईल.

७.११ शेतक-यांचा अवमुल्यन निधी -

उत्पादन उपक्रमात भारतीय शेतक-यांच्या भांडवलाची जी झीज होते. ती अवमुल्यन निधी किंवा घसारा निधी वेगळी काढण्याचे सामर्थ्य भारताच्या सर्वश्रेष्ठ उत्पादकाकडे नाही. भारतीय शेतक-यांजवळ भांडवलाची पुनःर्स्थापना करण्यासाठी अवमुल्यन निधीच नाही. शेतक-यांना सतत नवी कर्जे घेऊनच आपल्या भांडवलाची झीज भरून काढावी लागते. ज्या अर्थव्यवस्थेत सर्वात मोठ्या व महत्वाच्या उत्पादक वर्गाला अवमुल्यन निधीविरहीत ठेवले जाते. तो देश समृध्द कसा होणार ? समृध्दी नसल्याने समताही नाही. शेतक-यांना योग्य किंमत, योग्य जीवनमान, योग्य आर्थिक न्याय देऊनच सर्व राष्ट्रीय समस्या सुटतील.

७.१२ शेतीवरील अतिरीक्त भार -

लोकसंख्या, भाकड पशुधन, कर्जबाजारीपणा, निरक्षरता, अल्पसंतुष्टता, रूढीप्रीयता व दैववादीपणा या सर्वाचाच ग्रामीण भागावर अतिरीक्त भार आहे. हा भार कमी करण्यासाठी शेतक-यांचा एक मूलगा शेतीत, दुसरा मुलगा नोकरीत व तीसरा मुलगा उद्योग व्यावसायात वळवीला पाहिजे. प्रक्रिया उद्योग, डेअरी उद्योग, पोल्ट्री उद्योग, फिशरी उद्योग, बांधकाम उद्योग, कृषी उद्योग इत्यादीद्वारे ग्रामीण औद्योगिकीकरण घडविले पाहीजे. खेड्यापाड्यातील लोकसंख्या शहरात आणण्यापेक्षा शहरांतील उद्योग खेड्यांत नेणे, समृध्दीतुन खेड्यांची टूमदार शहरे निर्माण करता येतील. शेतीवरच्या लोकसंख्येचा अतिरीक्त भार ग्रामीण

नोक-या, उद्योग, व्यापार आणि सेवा उद्योगांत वळवीता येतील. ग्रामीण बाजारपेठा विकसीत होतील. श्रम व बुध्दीचे एकत्रीकरण घडेल.

७.१३ शेतक-यांचे जीवनमान - मुल्य निकष ठरवा -

शेतकरी, शिपाई, शिक्षक, शास्त्रज्ञ आणि शासक म्हणजे राष्ट्रोन्नतीच्या पंचधारा. त्यांच्या श्रमावर, शौर्यावर, बुध्दीवर आणि सेवेवर राष्ट्र अग्रेसर होते. भांडवलदार, सावकार, उद्योगपती आणि व्यापारी समाजपोषणाच्या धंद्यात तन-मन-धनाने एकजीव बनतात तेंव्हा देशाची शतमुखी प्रगती घडत जाते. पण जेंव्हा हे चार वर्ग समाजषोशणातून सत्ता व संपत्ती प्राप्त करण्याचे ध्येर्य बाळगतात तेंव्हा समाजालाच आवकळा येते.

सध्याची भारताची शेतीची स्थिती पाहता केंद्र सरकारने तात्काळ कोरडवाहु शेतीउद्योग हा राष्ट्राचा 'बालोद्योग' म्हणून घोषीत करावा व त्यास संरक्षण द्यावे. भारतातील खाजगी क्षेत्राला आवर घालून सहकारी क्षेत्राला विस्तृत बनवावे. देशाचे अंदाजपत्रक बनवीताना आधी शेतक-यांचे जीवनमान ठरवावे आणि या जीवन मूल्याला मध्यवर्ती मानून राष्ट्रीय उत्पन्नाचे वितरण घडावे. उत्पादन व उपभोग, गुंतवणूक व नफा, कर व कर्ज इत्यादी निती धोरणे ठरवीताना शेतक-यांच्या जीवनमानाच्या आर्थिक मूल्यावर सारे निर्णय घ्यावेत. अर्थशास्त्रातील प्रत्येक मापन मुद्रेत होते. परंतू मुद्रा भास टाळण्यासाठी वस्तुगत मुल्याचा आधार घ्यावा.

अशाप्रकारे डॉ. पंजाबराव देशमुख यांची भारतीय शेती, शेतकरी यांची उन्नती घडवून आणन्या संदर्भातील तात्वीक दृष्टी वरील विविध पैलुंद्वारे स्पष्ट होते.

८. समारोप -

भारताच्या राजकीय, आर्थिक, सामाजिक, सांस्कृतीक, शैक्षणिक, धार्मिक क्षेत्रात अनेक महान नेते, द्रष्टे पुरूष होऊन गेले. मात्र विज्ञाननिष्ठ, कायदेपंडित, राजकारण, समाजकारण, शिक्षणप्रसार, शेती सुधारणा अशा विविध आयामांना स्पर्श करणारे बहुवीध व्यक्तीमत्वे फारच विरळ सापडतात. डॉ. पंजाबराव देशमुख हे असेच एक अद्वीतीय व्यक्तीमत्व. त्यांनी शेती, शेतकरी, ग्रामीण विकास, शिक्षण, समता यांबाबत स्वतःच्या कार्यकर्तृत्वातून जे काही मागे ठेवले आहे त्या विचारांची, संस्थांची, कार्याची आजच्या वर्तमानच नव्हे तर भविष्यातील प्रश्नांच्या सोडवणुकीसाठीची उपयुक्तता ही अनंन्यसाधारण अशी आहे.

९. संदर्भ -

१. लोकमहर्षी भाउसाहेब - डॉ. पंजाबराव देशमुख गौरवग्रंथ महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ डिसेंबर 1999

२. जागतिक कृषी क्रांतीचा विधाता - लोकनेता डॉ. पंजाबराव देशमुख - वीर उत्तमराव मोहीते - 1983

३. विदर्भाचा लोकनेता - डॉ. पंजाबराव देशमुख - वीर उततमराव मोहीते

४. 'शेतकरी हिंदुस्तानचा अतिरीक्त मुल्याचा सिध्दांत' - सुधाकर मोहोळ

५. भाउसाहेब डॉ. पंजाबराव देशमुख - जीवन व कार्य - शं.रा. लोंढे, एम.ए. साहित्य रत, सचिव श्री. शिवाजी शिक्षण संस्था अमरावती.

६. 'सातपुड्याचा कडा' काव्यसंग्रह - डॉ. पंजाबराव देशमुख प्रकाशन समिती, आकोट

७. रूतलेल्या पारंब्या - डॉ. पंजाबराव देशमुख - आठवणींचा संग्रह, डॉ. पंजाबराव देशमुख प्रकाशन, समिती, आकोट

८. डॉ. पंजाबराव उर्फ भाउसाहेब देशमुख - विविध दर्शन, प्रथम पुष्प, अं.पां. पडोळे, अमरावती

९. डॉ. पंजाबराव देशमुख - जयंत्युत्सव - स्मरणिका, शिवपत्रिका, विशेषांक - 1974 -75
१०. अखिल भारतीय मराठा शिक्षण परिषद - 32 व्या बैठकीचा अहवाल.
11. "Dr.P.S. Deshmukha's Circular Letters " – Ministry of Agricultural, New Delhi- 1955-56
12. Bharat Krishak Samaj – Silver Jubilee Comman ration Volume – April 1980 by Silver Jubilee Publication committee.
13. Shri Shivaji Education Society, Amrawati silver Jubilee Souvenir Volume- 1958
14. Dr.P.S. Deshmukha's selected speeches Published by Dr. Panjabrao Deshmukh Diamond Jubilee Celebration Committee, Amrawati
15. World Agriculture Fair Souvenir, New Delhi 1960.

डॉ. पंजाबराव देशमुख यांचे आर्थिक विचार

ग्रंथपाल
प्रा. डॉ. गादेकर पी. सी.
स्वा. रा. ती. म. अंबाजोगाई
E-Mail ID – gadekarpandurang5@gmail.com

प्रस्तावना :-

भारताचे प्रथम कृषिमंत्री, कृषिरत्न, शिक्षण महर्षी डॉ. पंजाबराव ऊर्फ भाऊसाहेब देशमुख यांनी 7 फेब्रुवारी 1955, रोजी भारत कृषक समाजाची स्थापना करुन संपूर्ण शेतकरी समाजाला कृषक समाजाच्या स्थापनेनंतर दरम्यानच्या काळात अनेक संघटना आल्या व नेस्तनाबूत झाल्या. डॉ. पंजाबरावांनी भारत कृषक समाज या संस्थेला जाणीव पूर्वक संघटन न म्हणता समाज म्हटले आहे. यातच भाऊ साहेबांची दिव्यदृष्टी – दूरदृष्टी लक्षात येते. कृषक समाजात वैचारिक बैठक असल्यामुळेच व राजकारण तथा गट वजातपात या पासून पंजाबरावांनी ही संस्था पूर्णपणे अलिप्त ठेवल्यामुळेच शासनाचे कुठलेही आर्थिक पाठबळ नसताना 66 वर्षानंतरही या संस्थेची घोडदौड सुरुच असून आजही आपले अस्तित्व कायम ठेवून आहे.

संघटनेच्या बळावर कामगारांपासून कर्मचाऱ्यांपर्यंत सर्वजण फायदे पदरात पाडून घेतात मात्र शतकरी वर्ग असंघटीत असल्यामुळे तो सर्वच बाबतीच लुबाडला जातो. संपूर्ण जगाला अन्न धान्याचे बाबतीत स्वयंपूर्ण करण्याची प्रचंड ताकद या बळीराजात असताना स्वतः तो आणि त्याचे कुटूंब अर्धपोटी अर्धनग्न असावे हे कटू सत्य डॉ. पंजाबरावांनी ओळखून भारतात एकूण लोकसंख्येच्या 75 टक्के शेती करणाऱ्या भारतीय किसाना करिता भारत कृषक समाज या राष्ट्रव्यापी संघटनेची स्थापना करुन शेतकऱ्यांना एक स्वतंत्र व्यासपीठ निर्माण करुन दिले. डॉ. पंजाबरावांनी भारत कृषक समाज ही संपूर्ण शेतकरी समाजाला उपलब्ध करुन दिलेली फार मोठी देणगी आहे.

डॉ. पंजाबराव देशमुख यांचे कृषिविषयक आर्थिक विचार :-

पंजाबरावाचे वडील शामरावजी देशमुख यांच्या वाट्याला 27 एकर 5 गुंठे जमीन आली होती. पंजाबरावांनी ॲकेडमीक हायस्कूल, अमरावती येथून 1918 साली प्राविण्यासह मॅट्रीकची परीक्षा उत्तीर्ण केली. त्यांच्या कुशाग्र बुध्दीने त्यांनी 14 रुपये शिष्यवृत्तीही मिळविली. विलायतला जाऊन बॅरिस्टर होण्यासाठी त्यांच्या कुटूंबाकडे पैसा नव्हता. सर्व मार्गाने प्रयत्न करुन आवश्यक ती तरतूद होईना, म्हणून पंजाबरावांनी शेती गहाण टाकून शिक्षणासाठी पैसा उभा करण्याचा सल्ला दिला. तो सर्वांना पटला. कृष्णराव देशमुख यांच्या मध्यस्थीने कारंजा लाड येथील चंदनशेठ कडे गहाणखत करुन ते 21 ऑगस्ट 1920 ला इंग्लंडच्या बोटीवर चढले.

इंग्लंडमधील 6 वर्षाच्या वास्तव्यात डॉ. पंजाबराव देशमुख यांनी ज्ञानप्राप्ती बरोबरच, मनुष्य स्वभावाचा व पाश्चिमात्य जगातील अर्थव्यवस्थेच्या विकासाचा अभ्यासही केला, असे लेखक म्हणतात. दारिद्रय, शिक्षण आणि आरोग्य या संदर्भात शेतकऱ्याची वैचारिक पातळी वृध्दीगत करणे व त्यासाठी त्यांना कृतिशील बनविणे हे त्यांच्या विचारांचे ध्येय होते. त्यांनी 1961, 62, 63 ला कलकत्ता, मद्रास व अहमदाबाद येथे राष्ट्रीय कृषी प्रदर्शनी आयोजित केली. कृषि विद्यापीठद्वारे संशोधन व विस्तार कार्य यांच्या मार्गदर्शनाखाली अखंड सुरु झाले. कृषी क्षेत्राचा नेत्रदिपक कायापालट डॉ. पंजाबराव देशमुख

यांनी घडवून आणला. 1963 मध्ये डॉ. पंजाबराव देशमुख यांची कृषी उत्पादक आंतरराष्ट्रीय संघाच्या अध्यक्षपदी निवड करण्यात आली.

कृषी हा लाभदायक उद्योग, शेतमालाच्या भावाची निश्चिती, माल वाहतूकीसाठी रेल्वे व दळणवळणाच्या दरांची निश्चिती, कृषी ज्ञानासाठी सोयी, शैक्षणिक संस्था सुरु करण्यासाठी जनता व सरकारला प्रोत्साहीत केले. सरकारी पध्दतीने शेती करणाराला उत्तेजन देवून परदेशीय शेतकरी बोलावून त्यांच्याशी संवाद घडवून आणणे, कृषी विषयक प्रदर्शन, चर्चासत्रे व मेळावे घेवून शेतकऱ्यांना संघटीत करणे, शेतकरी व शेतमजूर यांचे जीवनमान उंचावण्यासाठी जाणीवपूर्वक प्रयत्न करणे, राष्ट्रव्यापी संस्था निर्माण करुन, त्यातून आंतरराष्ट्रीय संबंध प्रस्थापित करुन देणे इ. बाबींचा त्यात समावेश हातो.

1943 साली बंगालमध्ये भयानक दुष्काळ पडला. अन्न अन्न करुन भूकेने 30 लक्ष लोक मृत्यूमुखी पडले. हे डॉ. पंजाबराव यांनी पाहिले. अमर्त्यसेन त्याचे साक्षीदार आहेत. डॉ. पंजाबराव देशमुख यांनी सावकाराच्या जाचातून, नैसर्गिक आपत्तीतून आणि सामाजिक असंतूलनातून कृषकांना आपलया कृतीशील विचारांच्या आधारे सक्षम बनविण्याचा प्रयत्न केला.

कमवा आणि शिका ही मोहिम राबविता आली पाहिजे, असे डॉ. पंजाबराव म्हणतात. लोक शिक्षण विषयक, शिक्षण खर्च विषकय, भूसंरक्षण विषयक भारतीय कृषी अर्थव्यवस्था, संशोधन प्रणाली, सांख्यिकीय माहिती, विश्वसनीय आकडेवारी या विषयी मूलभूत व महत्वपूर्ण विचार मांडले. शेतकरी सुखी तर देश सुखी ही डॉ. पंजाबरावांची मूलगामी नीती यातून प्रकट होते. डॉ. पंजाबराव हे उच्चविद्याविभूषित व शेतकऱ्यांची तळमळ असणारे भूमिपुत्र असल्यामुळे त्यांनी सकारात्मक कार्य केले. या आभाळ उंचीच्या, जगव्यापी महामानवाच्या अफाट कतृत्वाचा शोध घेऊन ते योग्य शब्दात मांडणे. तसे हे अत्यंत जिकिरीचे काम, पण ते डॉ. रविंद्र ढाले यांनी अत्यंत परिश्रमपूर्वक केले. त्यांचे संशोधन लक्षवेधी आहे.

सारांश :- भारताचे पहिले कृषीमंत्री म्हणून 1952 ते 1962 पर्यंत त्यांनी शेती व शेतकऱ्यांसाठी क्रांतीकारी कार्य केले. त्यांच्या या महान कार्यामुळे कृषी क्षेत्रात महत्वपूर्ण परिवर्तन घडून आले. शिक्षण क्षेत्रात श्री. शिवाजी शिक्षण संस्थेच्या रुपात त्यांनी खरेखुरे लोकविद्यापीठ साकार केले. शेतकऱ्यांसाठी कामे करित त्यांचे आयुष्य गेले आणि शेतकऱ्यांच्या प्रश्नांचा विचार करितच त्यांनी दि. 10 एप्रिल 1965 रोजी देह ठेवला. डॉ. पंजाबराव देशमुख यांच्या नि:स्वार्थ कार्याचा गौरव म्हणून भारत सरकारने 1986 मध्ये त्यांना कृषीरत्न या पदवीने मरनोत्तर विभूषीत केले.

1) दैनिक महाराष्ट्र टाईम्स 7 फेब्रुवारी 2021
2) www.Bookganga.com
3) पंजाबराव देशमुख विकिपीडिया
4) लोकमहर्षी भाऊसाहेब डॉ. पंजाबराव देशमुख गौरव ग्रंथ – महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ https://archive.org

डॉ.पंजाबराव देशमुख यांचे आर्थिक विचार.

प्रा. डॉ.ए जी सोनवणे
सभासद क्रमांक 869
अर्थशास्त्र विभाग प्रमुख,
आर सी पटेल आर्ट्स कॉमर्स अँड सायन्स कॉलेज, शिरपूर,जि. धुळे
भ्रमणध्वनी 94239 18036 ई-मेल agsonawane1965@gmail.com

गोषवारा :

भारताचे प्रथम कृषिमंत्री,शिक्षण महर्षी,तळमळीचे सामाजिक कार्यकर्ते डॉ. पंजाबराव देशमुख यांचा उल्लेख आधुनिक भारताच्या इतिहासातील विसाव्या शतकातील एक लोकोत्तर व्यक्तिमत्व म्हणून केला जातो.त्यांचे कार्यक्षेत्र मूलतः विदर्भ असले तरी त्यांची दृष्टी केवळ राष्ट्रव्यापी नव्हे तर वैश्विक होती. त्यांचे सामाजिक,शैक्षणिक, राजकीय व कृषी क्षेत्रातील कार्य अविस्मरणीय आहे. भारताच्या संविधान निर्मितीत अत्यंत हिरीरीने व मोलाचा सहभाग असलेल्या व्यक्तींमध्ये त्यांचा अग्रक्रमाने उल्लेख केला जातो. आधुनिक भारताचा शिल्पकार म्हणून डॉ.पंजाबराव देशमुख यांचे विचार अभ्यासनीय आहेत. कृषिमंत्री असताना त्यांनी शेतकऱ्यांचे दैन्य कसे दूर करता येईल ? यासाठी सखोल अभ्यास केला. शेतकऱ्यांना दारिद्र्यातून मुक्त केल्याशिवाय कृषक समाज व देश समृद्ध होणार नाही आणि स्वतंत्र बनणार नाही असे त्यांना वाटे. त्यासाठी त्यांनी देश-विदेश दौरे केले. स्वातंत्र्यानंतर १९५१ साली ते भारताचे कृषिमंत्री झाले. कृषी मंत्री असताना त्यांनी युरोप अमेरिकेचा अभ्यास दौरा केला.त्यांनी 1955 साली भारत कृषक समाज या संघटनेची स्थापना केली. या संस्थे मार्फत दिल्ली येथे 1959-60 साली जागतिक कृषी प्रदर्शन भरवले. शेतकरी संघाची स्थापना केली.शेतीच्या विकासात जोडधंद्याचे महत्व ओळखून दुग्ध उत्पादन, मत्स्यपालन, कुक्कुट पालन इ.ना प्रोत्साहन दिले. शेतकऱ्यांची कर्जातून मुक्त करणारा कर्ज लवाद कायदा पारित करण्यात त्यांचा मोठा वाटा आहे.शेतीत संशोधन व्हावे यासाठी देशातील प्रत्येक राज्यात एक कृषी विद्यापीठ स्थापन करण्याची योजना अमलात आणली. थोडक्यात शेतकरी या एका आसाभोवती भाऊसाहेबांचे जिवन चक्र फिरत राहीले.डॉ.पंजाबराव देशमुख यांच्या कृषीविषयक विचारांचा व धोरणाचा आदर्श घेऊन व अवलंब करून आजच्या शेतीच्या समस्यांवर बदलत्या काळानुसार उपाययोजना करून कृषी क्षेत्रात परिवर्तन करणे गरजेचे आहे.

सुचनक शब्द :

शेती,शेतकरी,कृषी मंत्री, कृषी विकास, कृषी प्रदर्शन, कृषी तंत्रज्ञान, भारत कृषक समाज, योजना, ,आर्थिक विकास, शेतीतील प्रयोग,पतपुरवठा इ.

प्रस्तावना :

शेती हा भारतातील सर्वात जुना आणि परंपरागत व्यवसाय आहे.ती उद्योगांची जननी आहे शेती क्षेत्रात जो माल उत्पादित होतो, तो औद्योगिक क्षेत्रात कच्चामाल म्हणून वापरला जातो.. देशातील 55 टक्के लोकसंख्या प्रत्यक्ष किंवा अप्रत्यक्षरीत्या शेतीवरच अवलंबून आहे.वाढत्या लोकसंख्येला पर्याप्त अन्न धान्याच्या पुरवठा करण्याचे योगदान कृषी क्षेत्र तर करतेच पण कृषी उत्पादित वस्तूंची निर्यात करून परकीय चलन मिळवून देण्याचे कार्य कृषीक्षेत्र करीत आहे. तात्पर्य, शेतीच्या विकासातूनच देशाचा आर्थिक विकास प्रतिबिंबित होतो.

आज भारतीय कृषी क्षेत्रात अनेक समस्या आहेत.अवर्षण,अतिवृष्टी, कृषीची कमी उत्पादकता, कृषी मालाचे भाव, भांडवलाच्या अभावाने शेतीत कायमस्वरूपी सुधारणा करण्यात येणाऱ्या अडचणी, अवेळी पडणारा पाऊस, पिकांवर कीटकांमुळे पडणारे रोग, यासारख्या नैसर्गिक आपत्ती व या सर्वातून नैराश्याने ग्रस्त असलेल्या शेतकऱ्यांच्या होणाऱ्या आत्महत्या यामुळे शेती क्षेत्र चिंतेचा विषय ठरतो हे लक्षात घेऊन भारताचे पहिले कृषिमंत्री डॉ. पंजाबराव देशमुख यांचे आर्थिक विचार समजून घेणे संशोधकाला महत्वाचे वाटते, ज्यांनी आपले संपूर्ण जीवन कृषी विकास हा मंत्र घेऊन जगले.' शेतकरी सुखी तर जग सुखी ' ह्या विचारावर अभिजात कार्य केले.त्यांनी नवीन तंत्रज्ञानाचा वापर करून आधुनिक शेतीला चालना दिली

संशोधनाची उद्दिष्टे :

प्रस्तुत संशोधनासाठी पुढील उद्दिष्टे ठरविण्यात आली आहे.

1) डॉ.पंजाबराव देशमुख यांनी कृषी क्षेत्रासाठी केलेल्या कार्याचे अध्ययन करणे.

2) डॉ. पंजाबराव देशमुख यांचे आर्थिक विचार अभ्यासणे.

3) डॉ. पंजाबराव देशमुख यांच्या काळातील भारतीय कृषी क्षेत्राची स्थिती समजून घेणे.

संशोधन पद्धती :

प्रस्तुत संशोधनासाठी संशोधकाने दुय्यम साधनसामग्रीचा वापर केला असून डॉ. पंजाबराव देशमुख यांचे विचार व कार्य जाणून घेण्यासाठी संशोधकाने विविध पुस्तके,जर्नल्स, मासिके,वृत्तपत्र,लेख,इंटरनेट इ. साधनांचे संकलन करून संबंधित विषयावर लिखाण केले आहे.

विषयविवेचन :

कृषकांचे कैवारी कृषीरत्न, डॉ.पंजाबराव देशमुख यांचा जन्म अमरावती जिल्ह्यातील पापड या गावी 17 डिसेंबर 1898 रोजी एका शेतकरी कुटुंबात झाला.पापड सारख्या लहानशा खेड्यातील सामान्य शेतकऱ्यांच्या घरात जन्मलेल्या या कृषक पुत्राने स्वतः उच्च विद्याविभूषित होऊन कर्तव्य भावनेने खेड्यापाड्यातल्या हजारो शेतकऱ्यांच्या मुलांसाठी शिक्षणाची दार उघडून दिली.शेतकरी कुटुंबात जन्मल्याने भारतीय शेतकऱ्यांच्या जीवनातील सुख दुःख, दारिद्र्य अडचणी त्यांनी स्वतः अनुभवल्या होत्या त्यातूनच त्यांचे कृषी विकासाचे ध्येय साकाराला आले होते.27 डिसेंबर 1898 ते 10 एप्रिल 1965 हा त्यांचा उज्वल जीवन काल म्हणजे भारतातील कृषी क्रांतीच्या कार्यक्रमाची अंमलबजावणी होय. लोकांचे दारिद्र्य आणि अज्ञान दूर करणे व भारताचा सर्वांगीण विकास साधने हे त्यांचे ध्येय होते. भारत हा कृषीप्रधान देश आहे भारतातील 80 टक्के लोक शेतीवर अवलंबून आहेत हे लक्षात घेऊन पंजाबराव देशमुख यांनी कृषी विकास हाच भारताच्या प्रगतीच्या महत्त्वाच्या टप्पा ठरविला आणि आपले सर्व प्रयत्न सर्व जीवन त्याकरिता खर्ची घातले. शेतकऱ्यांना कर्जातून मुक्त केल्याशिवाय कृषक समाज व देश समृद्ध होणार नाही आणि स्वतंत्र बनणार नाही असे त्यांना वाटे.शेतकरी व शेतमजूर भारतीय समाज अर्थव्यवस्थेचा कणा आहे हे जाणूनच त्यांनी त्यांच्या उद्धारासाठी कार्य केले. जिथे उत्पादकांचे दारिद्र्य आहे तेथे समाजाचा नाश आहे,अधोगती आहे म्हणून राष्ट्रीय दारिद्र्य नष्ट करण्यासाठी कृषक क्रांतीचा मार्ग डॉ.पंजाबराव देशमुख यांनी अनुसरला होता. भारतात स्वातंत्र्यापूर्वी अनेक चळवळी झाल्या परंतु शेती व्यवस्था व अन्नदाता शेतकरी केंद्रस्थानी असलेला दिसत नाही. शेतकऱ्यांची दुष्काळ,नापिकी व शेतीसाठी घेतलेल्या कर्जापायी सावकार वर्गाकडून होत असलेली पिळवणूक त्याद्वारे होणारे हाल अपेष्टा दूर करणे व त्यांना त्यातून मुक्त करण्याची व्यवस्था उभी करणे याकडे स्वातंत्र्य मिळण्यापूर्वी कोणीही लक्ष दिले नव्हते.डॉ.पंजाबराव देशमुख यांनी अशी चळवळ भारतात प्रथमच उभी केली. त्यांची ही लोक चळवळ कृषी विकास, शिक्षण व्यवस्था व सामाजिक सुधारणा

या त्रिसूत्रीवर आधारित होती.याकरिता त्यांनी आपले सर्व आयुष्य,आपली जमीन, पैसा,विद्वत्ता, प्रतिष्ठा या चळवळीत झोकून दिले.

उच्च विद्या विभूषित होऊन इंग्लंड हून 1926 ला भारतात परत आल्यानंतर त्यांनी शेतकऱ्यांच्या अडचणींना तोंड देण्यासाठी 'मध्य प्रांत वराड शेतकरी संघ 'स्थापन करून शेतकरी वर्गाला राजकीय व सामाजिक क्षेत्रात महत्वाचे स्थान मिळवून दिले व या संस्थेमार्फत कृषी विषयक अनेक सुधारणा घडवून आणले 1930 मध्ये मध्य प्रांत वराड मंत्रिमंडळात कृषिमंत्री म्हणून कृषी क्षेत्रात नवनवीन पद्धतींच्या अवलंब त्यांनी केला

भारत कृषक समाज :

शेतकऱ्यांसाठी त्यांनी 1955 मध्ये अराजकीय व जातपात विरहित अशी भारत कृषक समाज ही संस्था स्थापन केली. ही भारतातील हरितक्रांतीची उद्गाती राष्ट्रीय संस्था मानली जाते. या समाजामार्फत त्यांनी प्रदर्शने,परिषदा, कृषक मेळावे, इत्यादींसारख्या कार्यक्रमातून अधिक भरीव कामगिरी केली. दिल्ली येथे 1959 ते 60 साली जागतिक कृषी प्रदर्शन भरवुन विदेशी शेतकरी आपल्यापेक्षा किती पुढारलेले आहेत हे दाखवून देताना विज्ञानवादी व उद्योगशीलतेची जाणीव भारतीय शेतकऱ्यांना करून दिली.

कृषिमंत्री असताना परदेशात त्यांनी भारताचे नेतृत्व केले होते. त्यावेळी त्यांनी भारतीय शेती व युरोपियन शेती यांचा तुलनात्मक अभ्यास केला, त्यावर अनेक ठिकाणी विद्वत्ता पूर्ण भाषणे दिली होती.त्यांनी व्यक्त केलेले विचार मौलिक आहेत.

जपानी भातशेतीचा प्रयोग, तत्कालीन भारताचे अन्न स्वावलंबन शेतकऱ्यांच्या पिकांची वीमा योजना शेतकऱ्यांच्या विकासासाठी भारत कृषक समाज (1955) युवक कृषक समाज (1956)शेतकरी बँक (1961)अखिल भारतीय मधमाशी पालक संघटना (1953) अखिल भारतीय अखाद्य तेलबिया संघटना (1954)अन्न संघटना (1955) अखिल भारतीय ताडगूळ महासंघ (1955) राष्ट्रीय कृषी सहकारी खरेदी विक्री संघ(1958), भारत कृषक सहकारी अधिकोष(1960) इत्यादी अनेक संस्थांची उभारणी त्यांनी केली. आंतरराष्ट्रीय शेतकऱ्यांचा आदान-प्रदान कार्यक्रम, कुक्कुटपालन, दुग्ध उत्पादन,मत्स्य उत्पादन इत्यादी जोडधंदे, शेतकऱ्यांचे अभ्यास दौरे इत्यादींना त्यांनी प्रोत्साहन दिले.

अमेरिकेतील लेड ग्रँड कॉलेजच्या धरतीवर भारतातही प्रत्येक राज्यात एक कृषी विद्यापीठ स्थापन करण्याची योजना अमलात आणून त्यानुसार भारतातील पहिले कृषी विद्यापीठ उत्तर प्रदेशातील पंतनगर या ठिकाणी सुरू झाले महाराष्ट्रात सुरुवातीला अकोला व राहुरी अशी दोन कृषी विद्यापीठ सुरू झाली. नंतरच्या काळात अहमदनगर, परभणी,नागपूर, दापोली, येथे ही कृषी विद्यापीठे उभारली.

जागतिक कृषी प्रदर्शनाचे आयोजन:

केंद्रीय कृषिमंत्री असताना डॉ. पंजाबरावांनी भव्य दिव्य अशा जागतिक कृषी प्रदर्शनाचे नवी दिल्ली येथे 11 डिसेंबर 1959 ते फेब्रुवारी 1960 यादरम्यान आयोजन केले होते. हे कृषी प्रदर्शन भारताच्या कृषी क्रांती च्या इतिहासातील मैलाचा दगड ठरले. देशाच्या कानाकोपऱ्यातून शेतकऱ्यांचे लोंढेच्या लोंढे हे प्रदर्शन पाहण्यास व ज्ञानग्रहण करण्यास उपस्थित राहू लागले. एक नवक्रांती चा विचार घेऊनच शेतकरी परतत होते. जवळपास दोन कोटी शेतकऱ्यांनी ही कृषी ज्ञानगंगा प्रत्यक्ष डोळ्यांनी अनुभवली. सर्वसामान्यच नव्हे तर अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष आय सेन हॉवर ,इंग्लंडची महाराणी एलिझाबेथ, रशियाचे पंतप्रधान बुलजानीन, कम्युनिस्ट पक्षाच्या सर्वेसर्वा निकिता कुशबेव आदि देश विदेशातील गणसामान्य मंडळी व भारताचे पंतप्रधान पंडित जवाहरलाल नेहरू,राष्ट्रपती डॉ.राजेंद्र प्रसाद यांनी या ऐतिहासिक कृषी प्रदर्शनाची मुक्त कंठाने प्रशंसा केली. कृषी क्रांतीचा उषःकाल निश्चित होणार असा विश्वास त्यावेळी संपूर्ण शेतकरी बांधवांमध्ये

निर्माण झाला. पंजाबपासून तर कन्याकुमारी पर्यंत शेतकऱ्यांचे जबरदस्त संघटन उभे झाले, त्यावेळेस खऱ्या अर्थाने हरित क्रांतीची मुहूर्तमेढ रोवली गेली. एकंदरीत डॉ. पंजाबराव यांनी प्रदर्शनाच्या माध्यमातून भारतीय शेतकऱ्याला जागतिक दर्जा मिळून दिला. जगात मानाचे स्थान मिळवून दिले. माझा शेतकरी अथवा शेतमजूर हा भारताचा राजा झाला पाहिजे हे त्यांचे स्वप्न होते.

यामध्ये अमेरिका, रशिया, चीन पोलंड,फ्रान्स ब्रिटन,कोरिया, इराण, श्रीलंका,मंगोलिया अफगाणिस्तान व्हिएतनाम,ब्रह्मदेश, झेकोसलावीकिया,जर्मनी इ. राष्ट्र सहभागी झाले होते. या प्रदर्शनाचे स्वरूप विराट होते. हे प्रदर्शन 92 दिवस चालले. हे प्रदर्शन भरवून डॉ. पंजाबराव यांनी भारतातील शेतकऱ्यांना पुढारलेल्या व विज्ञानवादी कृषी तंत्रज्ञानाची माहिती करून दिली. नवक्रांतीच्या मार्गाने व्यवसाय करण्यास प्रवृत्त केले.शेतकऱ्यांना संघटित केले .नवा विचार दिला जागृत केले म्हणूनच स्वातंत्र्योत्तर भारताच्या कृषी क्रांतीचे पंजाबराव देशमुख जनक ठरतात.

कर्ज लवाद कायदा :

शेतकऱ्यांची कर्जातून मुक्त करणारा कर्ज लवाद कायदा पारित करण्यात त्यांच्या मोठा वाटा आहे .त्यामुळेच त्यांना हिंदुस्तानच्या कृषक क्रांतीचे जनक म्हणतात .डॉ. पंजाबरावांनी कर्ज लवाद बिलाचे महत्त्व सर हाइड गोवेल यांना पटवून दिले ते म्हणाले, "शेतात राबणारा शेतकरी वर्गच नष्ट झाला तर या प्रदेशाची काय भयानक अवस्था होईल ?असा सवाल मांडला. त्याचे रूपांतर बिल मध्ये झाले. त्यांनी हे बिल मांडल्यामुळे तत्कालीन परिस्थितीत या कायद्यांतर्गत 90% शेतकऱ्यांची शेती सावकारांच्या तावडीतून मुक्त झाली. त्यांनी निर्माण केलेल्या कर्ज लवाद समितीने हजारो कर्जाची प्रकरणे निकालात काढली त्यामुळे शेतकरी वर्ग आत्महत्येपासून माघारी फिरला.

भांडवल शक्तीचे विकेंद्रीकरण :

शेतकऱ्यांच्या उत्पादनावरच या देशातील दलाल ,सट्टेबाज आणि अडते हे अतिरिक्त नफा मिळवितात. शेतकऱ्यांच्या शोषणाचे दृष्टचक्र निर्माण होते.परिणामी क्रयशक्तीचे केंद्रीकरण देशातील विशिष्ट वर्गाच्या हातात जाते. भांडवल शक्तीचे व क्रयशक्तीचे विकेंद्रीकरण करावे असे डॉ. पंजाबरावांचे मत होते , कारण शेतकरी संपला तर उद्योगपतीही संपेल आणि त्यामुळे भूमी,श्रम, भांडवल,आणि संघटन या घटकावर विपरीत परिणाम होईल.असे होऊ नये म्हणून सहकारी क्षेत्राच्या आधारे देशातील ग्रामीण स्तरावर बाजारपेठेचे ,बँकांचे आणि शिक्षणाचे संप्रेषण करण्यात यावे. ग्रामीण स्तरापर्यंत झिरपणाच्या आर्थिक योजना संप्रेषित केल्या पाहिजेत.

शेती विकासासाठीचे इतर प्रयत्न:

भारतीय शेतकऱ्यांनी जपानी भातशेतीचे तंत्र स्वीकारावे यासंदर्भात त्यांनी आकाशवाणी वरून भाषणे दिले.त्यांनी शेतांमध्ये प्लॉट्स निर्माण करून प्रशिक्षण केंद्र सुरू केले. हजारो प्रचार सभा घेण्यात आल्या.अशातऱ्हेने त्यांनी प्रत्यक्ष कार्याची अंमलबजावणी करून जपानी भातशेतीचा प्रयोग यशस्वी करून तांदुळाचे उत्पादन वृद्धिंगत केले.

1943 साली बंगालमध्ये भयानक दुष्काळ पडला अन्नावाचून भुकेने 30 लाख लोक मृत्युमुखी पडले, हे डॉ.पंजाबराव यांनी पाहिले.त्यांनी सावकारांच्या जाचातून आणि नैसर्गिक आपत्तीतून कृषकांना आपल्या कृतिशील विचारांच्या आधारे सक्षम बनविण्याचा प्रयत्न केला.

गोवर्धन सप्ताहात 1955 ला ते म्हणाले "आर्थिक विकासात पशुधनाचा सिंहाचा वाटा आहे. वैज्ञानिक प्रगतीच्या माध्यमातून कृषीक्षेत्राला सुधारित यंत्रे प्राप्त झाल्यानंतरही भारतीय शेतकऱ्यांनी आपल्या बैल जोडीवर निर्भर रहावे. बैलजोडी ही शेतकऱ्यांसाठी अतिशय स्वस्त आणि उपयोगी साधन आहे पण गाईचे

महत्व त्याहून अधिक आहे. भारताला पौष्टिक व स्वास्थ्य रक्षक दुधाचा पुरवठा गायीच्या माध्यमातून होतो.शेतीसाठी लागणाऱ्या खताची निर्मिती पशुंच्या मलमूत्रापासून करावी. त्यासाठी कंपोस्ट खत बनविण्याच्या पद्धती शोधून काढावे त्यामुळे शेतीचे उत्पादन शेतीची उत्पादन क्षमता वाढेल व जमिनीची सुपीकता काय राहील. अधिक धान्य पुरवा ही मोहीम 4 फेब्रुवारी 1949 ला सुरू झाली डॉ. पंजाबराव म्हणतात "ही योजना आपण किती व्यवहार्य आणि आर्थिक काटकसरीने राबवू शकतो यावर या योजनेचे यश अवलंबून आहे. केवळ एका वर्गाच्या आर्थिक हिताचा विचार करून कोणतीही योजना देशपातळीवर यशस्वी होणार नाही." वर्ष 1949ला संविधान समितीत शेतकऱ्यांच्या आंतरिक तळमळीतून त्यांनी म्हटले की, "देशातील कृषकांनी केलेल्या श्रेष्ठतम कार्यामुळेच भारत हा कृषकांचा देश म्हणुन प्रसिद्ध आहे, हे कृषक देशाचे खरे स्वामी आहेत तथापि त्यांच्या कल्याणाची आस्था नाही." शेतकरी संघटीत असावा असे त्यांना वाटे इतर समस्यांना तोड देण्यासाठी शेतकऱ्यां ची संघटना असणे आवश्यक आहे.संघटनेच्या माधमातून शेतकऱ्यांना मदत करता येऊ शकते, त्यांचे विचार मांडण्याचे एक प्रभावी व्यासपीठ बनू शकते. ते कृषिमंत्री झाले असताना आनंदून गाडगेबाबा म्हणाले होते "लोकहो,शेतकऱ्याचा पोरगा आज राजा झाला मात्र आज आपण त्यांच्या अर्थशास्त्राला विसरलो आर्थिक घसरणीमुळे शेतकऱ्यांच्या आत्महत्या सुरू होतील" हे त्यांचे पूर्वभाकित आज सत्यसृष्टीत आले आहे.

निष्कर्ष:

पंजाबराव देशमुख यांनी आपल्या जीवनात शिक्षण, कृषी,समाजसेवा, संसदीय कामकाज , ग्रामविकास या क्षेत्रात केलेले कार्य खूप महत्वपूर्ण आहे, पण त्यांच्या कार्याचा अत्यंत महत्त्वाचा पैलू म्हणजे शेतकऱ्यांच्या विकासाचा त्यांनी घेतलेला ध्यास होय.त्यांचे जीवन म्हणजे कृषकांसाठी केलेल्या क्रांतीचे महापर्व होय.त्यांच्या निस्वार्थ कार्याचा गौरव म्हणून भारत सरकारने 1986 मध्ये त्यांना कृषिरत्न या पदवीने मरणोत्तर विभूषित केले. डॉ. पंजाबराव देशमुख यांच्या कृषीविषयक विचारांचा व धोरणांचा आदर्श घेऊन अवलंब करून आजच्या शेतकऱ्यांच्या व शेतीच्या समस्यांवर बदलत्या काळानुसार उपाययोजना करून शेतकरी हिताच्या दृष्टीने कृषी क्षेत्रात विकास व परिवर्तन करणे गरजेचे आहे. त्यातून शेती व शेतकऱ्यांचा सर्वांगीण विकास साधता येईल व शेतीप्रधान भारत देशाला बळकट करता येईल.त्यांच्या प्रत्येक कृतीमध्ये सर्वसमावेशक तत्त्वांचा विचार होता.

*संदर्भसूची :

1. रविंद्र ढाले, डॉ. पंजाबराव देशमुख यांचे कृषी विषयक आर्थिक विचार, नभ प्रकाशन,
2. लोकमहर्षी भाऊसाहेब डॉ. पंजाबराव देशमुख गौरव ग्रंथ, महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ
3. प्रा डॉ सौ.कल्पना संजीव मोहिते, डॉ. पंजाबराव देशमुख यांचे जीवन व कार्य (1818-1965), मुक्ता पब्लिशिंग हाऊस
4. बाळकृष्ण द महात्मे, सूर्यावर वादळे उठतात
5. https://mr.Wikipedia.org/s/eby
6. https://amravati.gov.in
7. https://vishwakosh.marathi.gov.in
8. evivek.com/encyc/2017/12/27
9. laibhari.com/dr.panjabravdeshmukh
10. प्रा. प्रकाश धबधबे , ' डॉ. पंजाबराव देशमुख: संघर्षाचा प्रवास,'
11. www.maharashtratimes.com

डॉ. पंजाबराव देशमुख यांचे आर्थिक विचार

प्रा. विशाल मोकाशे, सहाय्यक प्राध्यापक
अर्थशास्त्र विभाग,
आदर्श महाविद्यालय, धामणगाव रेल्वे

प्रा. डॉ. दीपक शृंगारे, प्राध्यापक
अर्थशास्त्र विभाग प्रमुख
आदर्श महाविद्यालय, धामणगाव रेल्वे
सभासद क्रं: १०७७

सारांश
डॉ. पंजाबराव उपाख्य भाऊसाहेब देशमुख यांनी मांडलेले तत्कालीन परिस्थितीलआर्थिककृषिविषयक विचार आजही तेवढेच महत्त्वाचे ठरतात. शेती हा भारतातील अर्थव्यवस्थेचाआत्मा असल्याने शेतकरी वर्गाच्या उत्थानकरीता डॉ. पंजाबराव देशमुखयांचे कार्य अत्यंत महत्वाचे ठरते. डॉ. पंजाबराव उपाख्य भाऊसाहेब देशमुख यांनी सामाजिक, धार्मिक, राजकीय अशा क्षेत्रातमोठ्या प्रमाणात कार्य व आपल्या विचारांचा अनमोल क्षेत्रात ठेवा दिलेला आहे. मात्र या संशोधन पेपर मध्ये आपण डॉ. पंजाबराव देशमुख यांच्या आर्थिककृषिविषयक सहकार क्षेत्रातील विचारांचा अभ्यास करणार आहोत.

संशोधन पद्धती
प्रस्तुत शोधनिबंधाच्या पूर्ततेकिरता अनेक स्त्रोताचा अवलंब करून तथ्य संकलन केले आहे. याकरिता मासिके, वर्तमानपत्रे, विविध संशोधनपर लेख, व संदर्भ पुस्तके इत्यादीचा वापर केला आहे.
गृहीतके
प्रस्तुत शोध बंधाची मांडणी करताना खालील गृहीतकांचा आधार घेण्यात आलेला आहे.
१) डॉ. पंजाबराव देशमुख यांचे विचार आजहीलागू होतात.
२) डॉ. पंजाबराव उपाख्य भाऊसाहेब देशमुख यांच्या आर्थीक व कृषीविषयक विचारांमुळे शेतकऱ्यांच्या श्रमाला प्रतिष्टा प्राप्त झाली.

डॉ. पंजाबराव देशमुख यांचा जन्म एका शेतकरी कुटुंबात झाला. वडील शामराव देशमुख हे हाडाचे शेतकरी होते. आई राधाबाई अत्यंत सहज, सध्या स्वभावाच्या 'पापळ' या छोट्याशा खेड्यामध्ये पंजाबरावांचा जन्म या दि. २७ डिसेंबर १८९८ ला झाला. पंजाबराव लहानपणा पासूनच चाणक्ष्यअत्यंतहुशार व कर्तबगार होते. पंजाबरावानी आपले शिक्षण अमरावती वरून पूर्ण केले. १९१८ साली मैट्रिकची परीक्षा उत्तीर्ण केली. त्यांना कुशाग्रबुद्धीमुळे १४ रुपये शिष्यवृत्तीमिळाली. बॅरीस्टर होण्यासाठी पैशाची तरतूद कोठूनही होत नसल्याने त्यांना त्यांची शेती गहान ठेऊन आपले पुढील शिक्षण पूर्ण करावे लागले.

त्यांनी प्रा.ए.बी. किध यांच्या सल्ल्याप्रमाणे इंग्लंड मधील 'एडीनबसरो' विद्यापीठातून १९२३ साली संस्कृत मधून एम. ए. केले या साठी त्यांना १०० पाउंडव्हॅन डनलॉप रिसर्च स्कॉलरशिप मिळाली. २७ या वर्षी वैदिक वाङमयाचा उदगम व विकास या प्रबंधाने त्यांना आचार्य पदवी मिळाली.ऑक्सफर्डविद्यापीठातून "डॉक्टर ऑफ फिलोसॉफी व बार अॅट लॉ" या परीक्षेत उत्तीर्ण झाले.

स्वतः एका शेतकरी कुटुंबात जन्म झलेला असल्याने व शेतकऱ्यांचीदयनीय अशी अवस्था. कर्जबाजारीपणा, मागासलेपणा आर्थिक विषमता,निरक्षरता या सर्व बाबी पंजाबरावाना अत्यंत जवळून माहित होत्या. यावर त्यांनी विचार सुरु केले व शेतकऱ्यांच्यास्थितीत बदल घडून यावे असे त्यांनी मनाशी

निश्चित केले.“भारतीय अर्थव्यवस्थेच्या आर्थिक विकासाचे प्रारूप हे कृषकांच्याशोषण विरहित संप्रेषणावर अवलंबून आहे. असे डॉ. पंजाबराव यांचे मत होते.

डॉ. पंजाबराव देशमुख यांचे कृषिविषयक आर्थिक विचार

कर्जाच्या ओझ्याखाली दबलेला शेतकरी. पेरणी करूनही दुबार पेरणीची निर्माण होणारी परिस्थिती सिंचनाचा असलेला अभाव, अनेकदा निर्माण होणारी नैसर्गिक आपत्तिची परिस्थिती. आणि सरकारचे शेतकऱ्यांसाठी असलेल्या धोरणाची अयोग्य अमलबजावणी यामुळे शेतकऱ्यांची होणारी आत्महत्या, इंग्रजी सत्तेमुळे हवाल दिल झालेला शेतकरी, कृषक आणि त्यांचे होणारे सावकारी प्रवृत्तीतून शोषण आणि शेतकऱ्यांची झालेली दयनीय अवस्था. यामुळे शेती व शेतकरी यांच्या उत्थानासाठी डॉ. पंजाबराव उपाख्य भाऊसाहेब देशमुख यांनी प्रयत्न केले. शेतकऱ्यांच्या उत्पादनावर शेतकऱ्यांचा कमी लाभ होतो तर उत्पादनाच्या भरोश्यावर या देशातील दलाल आणि आडते हे अमाप संपत्ती जमा करतात. शेतकऱ्यांच्या शोषणाचे हे चक्र निर्माण होते.

शेतकऱ्यांचा उत्पादित झालेल्या मालाला कमी हमी भाव कृषिविषयक उत्पादने घेण्यासाठी लागणारी संसाधने व बि-बियाणे, खते लागवडीसाठी लागणारा खर्च वाढत जात असतो कारण ही साधने व्यापारी वर्गा कडून खरेदी केली जात असते. यामुळे शेतकऱ्यांची मोठ्या प्रमाणात पिळवणूक व शोषण होत असते.शेतकरी दरिद्री व कर्जबाजारी होत जातो आहे. राष्ट्रीयउत्पन्नातील योगदान कमी होत आहे.

"भांडवल शक्तीचे व क्रयशक्तीचेविकेंद्रीकरण करावे” असे पंजाबराव यांचे विचार होते. कारण शेतकरीच संपला तर शेतकऱ्यांच्या अवती भोवती चालणारी सर्व उद्योगधंदे पूरक व्यवसाय जोड व्यवसाय हे सुद्धा नष्ट व्हायला लागतील.

यामुळे शेती, शेतकरी आणि त्यांचाविकासहे ध्येय पंजाबरावानी घेऊन कृषिविषयक मोलाची भर घातली. १९२८ साली त्यांनी वऱ्हाड शेतकरी संघाची स्थापना केली. १४ डि. १९३० ला वऱ्हाड प्रांतिक विधिमंडळ मध्ये ते गेले तेथे त्यांच्या कडे कृषी सरकार व शिक्षण ही खाती आली. या बाबतीत त्यांनी अनेक सुधारणा घडून आणल्या.

कृषी प्रदर्शनाचे आयोजन

“आपली भूमी सर्वश्रेष्ठ संपत्ती आहे. आपण तिला वाचवले पाहिजे. तिची निगा राखली पाहिजे, ती सुपीक बनवली पाहिजे आणि भूमी ही राष्ट्राचारक्तप्रवाह आहे. तिला सुदृढ करण्याकरिता शिक्षणाची गरज आहे. असे डॉ. पंजाबराव यांचे मत होते. स्वातंत्र्यानंतर १९५४ साली पंजाबराव स्वतंत्र भारताचे पहिले भारताचे पहिले कृषिमंत्री झाले. जुलै १९५४ साली त्यांनी श्रीनगर येथे भारताच्या निरनिराळ्या भागातील राज्यातील कृषिमंत्री, कृषीतज्ञ व कृषक यांचा मेळावा बोलविला. १९५९ व १९६० पर्यंत दिल्ली येथे जागतिककृषी प्रदर्शनी चे आयोजन केले तसेच १९६१, १९६२, १९६३ या वर्षी त्यांनी अहमदाबाद, मद्रास इ ठिकाणी कृषी प्रदर्शनाच्या माध्यमातून नवनवीन तंत्रज्ञान शेतकऱ्याला कसे मिळेल व याचा उपयोग शेतकऱ्यांच्या शेतीला त्याच्या उत्पादनात व उत्पन्नात वाढ होऊन देशाच्या आर्थिक विकासातशेतकऱ्यांची भागीदारी कशी वाढेल? या संदर्भात त्यांचे कृषी प्रदर्शनांच्यामाध्यमातून केलेले कार्य उल्लेखनीय ठरते.

शिक्षण सामाजिक बदलाचे साधन

छत्रपती शाहू महाराजाकडून प्रेरणा घेऊन इसवी सन १९१७ साली मत व्यक्त केले कि “हिंदुस्थानातील अखंड परिश्रम करणारा शेतकरी वर्ग आपल्याला बदलवायचा आहे भूमिपुत्रानो अज्ञान हेच माणसाच्या गुलामगिरीच व दुःखाचे मूळ कारण आहे त्यामुळे शिक्षण हे महत्त्वाचे आहे याच दृष्टीक्षेपातून

व छत्रपती शाहू महाराजांच्या प्रेरणेतून १९३२ साली श्री शिवाजी शिक्षण संस्थेची स्थापना केली. हजारो लाखो समाजातील सर्व, शेतकरी व मजूर वर्गाच्या मुलांकरिता शिक्षणाची गंगासुरू केली. कारण ते म्हणायचे कि शिक्षणाचा आधी विस्तार व्हायला पाहिजे.

त्यांच्या याच धोरणातून पुढे अहमदनगर, परभणी, नागपूर, दापोली, अकोला येथे कृषी विद्यापीठ उभी राहले आणिकृषिक्षेत्रात अभूतपूर्व क्रांती घडवून आणली व आजही अनेक शेतकरी व शेती यांच्यातील महत्त्वाचा दुवा म्हणूनहे विद्यापीठ कार्य करीत आहे.

डॉ. पंजाबराव देशमुखांच्या या शैक्षणिक दृष्टीकोनातून हजारो शेतकरी आज ही लाभ घेत आहे. त्यांच्या या कार्यामुळे रोजगार, शिक्षणाची धाराप्रवाह गंगा, शेती व शेतकरी यांच्या जीवनामध्ये बदल घडून आलेला आहे.

भारताच्या घनघोर अंधारातील अज्ञान, दारिद्र्य आणि दुःखातून उपयुक्त देशभक्त स्त्री-पुरुषांना बाहेर काढण्यासाठी प्रयत्न केला. शिक्षणाच्या माध्यमातून ग्रामीणजनतेला मागासलेपणाच्या गडद अंधारातून बाहेर काढणे हे डॉ. पंजाबरावांचे ध्येय होते डॉ. पंजाबराव देशमुख यांचा दृष्टीकोन सर्वसमावेशक विकासाचा आणि व्यावहारिक होता. पंजाबराव देशमुख हे व्यावहारिकतत्वज्ञ होते. त्यांनी जात, पंथ, धर्म, लिंग आणि इतर कोणत्याही गोष्टीचा विचार न करता लोकांच्या कल्याणासाठी शिक्षणाचे व्यासपीठ उपलब्ध करून दिले.

सहकारविषयक

डॉ. पंजाबराव देशमुख यांनी शेतकऱ्यांची आर्थिक उन्नती व्हावी यासाठी भरीव कामगिरी केली या साठी सहकार विषयक त्यांच्या विचारांनी मोठी क्रांती घडून आली आहे.

डॉ. पंजाबराव देशमुखांचे मत असे होते की "केवळ एका वर्गाच्या आर्थिक हिताचा विचार करून कोणतीही योजना देशपातळीवर यशस्वी होणार नाही" त्यामुळे सहकारी तत्वाचा विचार व वापर मोठ्या प्रमाणात शेतकरी वर्गाने अमलात आणावा. सहकार क्षेत्राचेअर्थव्यवस्थेत व शेतकऱ्यांचेजीवनसुलभ होण्यासाठीचे महत्व लक्षात येते. डॉ. पंजाबराव देशमुख यांनी विविध सहकारी संस्था संघटनाची स्थापना केली. ज्यामध्ये प्रामुख्याने "कृषक सहकारी अधिकोष" अखिल भारतीय ताडगुळसंघ, युवक कृषक समाज इ. अनेक संघटनाची सहकारी तत्वावर सुरवात केली व शेतकरी बांधण्याच्याच नव्हे तर देशाच्या आर्थिक प्रगतीच्या पायाभरणीसाठी आपले योगदान दिलेले आहे. शेतकऱ्यांच्या समस्यांच्या विचार करण्यासाठी आणि त्यांना निरनिराळ्या बाबतीत योग्य मार्गदर्शन करण्यासाठी भाऊसाहेबांनी १९५५मध्ये भारत कृषक समाजाची स्थापना केली त्यांच्या विद्यमाने 'राष्ट्रीय कृषी सहकारी' खरेदी-विक्री संघाची स्थापना करण्यात आली.महाराष्टातील एकूण सहकारी चळवळीच्या विकासातील व त्यातही शेती क्षेत्रातील सहकारी च्या विकासातील पंजाबराव चे योगदान मोलाचे आहे.

डॉ. पंजाबराव देशमुख यांचे आर्थिक विचार आजच्या दृष्टीक्षेपात

डॉ. पंजाबराव देशमुख यांचे आर्थिक विचार हे सर्वव्यापी आणि सर्वस्पर्शी आहे. सोबतच त्याची उद्दिष्टे, व्यापकता आजच्या काळातील अर्थव्यवस्थेतीलमहत्त्वाची बाजू असणाऱ्याकृषकांच्या जीवनाशी समरस होणारी आहे. डॉ. पंजाबराव देशमुखांनीज्या बाबी स्वतःच्या बाबतीत अनुभवल्या त्यांनाशेतकऱ्यांचा मुलगा म्हणून ज्या समस्यांचा सामना करावा लागला त्या बाबी इतर शेतकरी वर्ग व शेतकरी कुटुंबांना होऊ नये. हा विचार घेऊन डॉ. पंजाबराव देशमुख यांनी कृषी, शिक्षण आणि सहकार याक्षेत्रातभरीव कामगिरी केली.

शेतकऱ्यांच्या मालाला योग्य हमीभाव मिळावा त्याकरिता शिवाय शेतकऱ्यांचे उत्पादन मोठ्या प्रमाणात वाढले पाहिजे शेतकऱ्यांच्या आर्थिक उत्पादनात वाढ झाली पाहिजे व त्या करिता कृषि क्षेत्रातील

शिक्षण, तंत्रज्ञान भारतातील प्रामुख्याने विदर्भातील शेतकऱ्यांची मुले शिकली पाहिजे अशी इच्छा शक्ती डॉ. पंजाबराव देशमुख यांच्या व्यक्तिमत्वाची होती. शेतकऱ्यांची आर्थिक परिस्थितीसुदृढ व्हावी या उद्देशाने शेतकऱ्यांसाठी अनेक मोठ-मोठाली कृषी प्रदर्शने भरवली. ज्यांच्या माध्यमातून नवीन शेती विषयक तंत्रज्ञान, नवीन खते, कृषिविषयक माहिती शेतकर्यांना मिळाली व हजारो लाखो शेतकऱ्यांच्या जीवनामध्ये परिवर्तन घडून आणण्याचे कार्य डॉ. पंजाबरावांच्या आर्थिक व संपन्न विचारांतून झाल्याचे दिसते. ओ. बी. सी. समाजाला सुद्धा आरक्षणाच्या माध्यमातून त्यांच्या आर्थिक, सामाजिक, शैक्षणीक जीवनात बदल व्हावे हा विचारही डॉ. पंजाबरावानी तत्कालीन स्थितीमध्ये मांडला होता.

आजच्या दृष्टीक्षेपात जर आपण पहिले तर, डॉ. पंजाबराव देशमुख यांचे आर्थिक (कृषिविषयक, शैक्षणीक, सहकारविषयक) विचार तंतोतंत लागु होतात. त्यांची या विषयांतर्गत असणारी दूरदृष्टी आणि सर्जनशीलता शेतकरी तथा आजच्या अर्थव्यवस्थेला पोषक तसेच अर्थव्यवस्थेच्या गतीसाठी, शेतीसाठी, शेतकऱ्यांच्याआर्थिक जीवनामध्ये त्यांच्या मुलाच्या शिक्षणामध्ये परिवर्तन घडून आण्यासाठी आवश्यक आहे.

परंतु पंजाबरावांचे विचार पाहिजे तितक्या व्यापक क्षमतेने व सरकारचे डॉ. पंजाबराव देशमुख यांच्या आर्थिक क्षत्रातील विचारांकडे झालेले दुर्लक्ष, त्यांच्या विचारांची व कार्यांची अयोग्य अंमलबजावणी यामुळे शेतकऱ्यांच्याजीवनात शेतीच्या कृषीच्याक्षेत्रातव्यापक असे परिवर्तन झाल्याचे दिसून येत नाही.

आजच्या परिस्थितीमध्ये मध्ये सुद्धाशेतकऱ्यांचा मालाला योग्य हमीभाव,सिंचनाच्या पद्धतीचा असलेला तुटवडा, मोठ्या प्रमाणात महागलेले शेती व तत्संबंधी साधने व साहित्य रासायनिक खतांच्या गगनाला भिडलेल्या किमती व महत्त्वाचे आणे प्रामुख्याने मांडायचे झाल्यास शेतीविषयक त्या त्या वेळी असलेल्या सरकारचे अयोग्य धोरण आणि ठरवलेल्या धोरणाची शेतकरी वर्गापर्यंत होत नसलेली अंमलबजावनी यामुळे शेतकरी वर्ग हा समस्यांच्या विळख्यात अडकलेला आजच्याही स्थितीतहीआढळतो.

डॉ. पंजाबराव देशमुख यांच्या आर्थिक विचारांची योग्य व नियोजन पूर्वकअंमलबजावणी व डॉ. पंजाबरावांच्या विचारांचा प्रचार- प्रसार झाल्यास आजच्या स्थीतीतही शेतकऱ्यांच्या आर्थिक उत्पन्नात वाढ होऊन त्यांचे आर्थिक जीवनमान उंचावले जाऊ शकते. सद्यस्थितीत प्रामुख्याने शेतकऱ्यांच्या मालाला योग्य हमीभाव व शेती संबंधित साधनाची तसेच तंत्रज्ञानाच्या वाढत जाणाऱ्या किमती या कमी झाल्यास सिंचनाच्या योग्य व पूरक सोयी शेतकऱ्यांना आवश्यक पायाभूत सुविधा मिळाल्या तर निश्चितच शेतकऱ्यांना, कृषकांना त्यांचे आर्थिक जीवनमान वाढण्यात मदत होईल.

समारोप

डॉ. पंजाबराव देशमुख यांनी जी दृष्टी ठेऊन समाजातील महत्त्वाच्या व अर्थव्यवस्थेला चालना देणाऱ्या कृषी क्षेत्राचात्यांच्या संपूर्ण आयुष्यभर विचार केला. कृषी विद्यापीठाची निर्मिती करून कृषकांना कृषी क्षेत्रातील नवनवीन व निरनिराळ्या तंत्रज्ञानाची माहिती अवगत करून दिली. त्यांच्या या दृष्टीकोनामुळे आजही लाखो शेतकरी व शेतकऱ्यांचीमुले याचा उपयोग करीत आहे.

प्रस्तुत शोधनिबंधात डॉ. पंजाबराव देशमुख यांच्याआर्थिक विचारांची देशाला आजही मोठ्या प्रमाणात आवश्यकता आहे. डॉ. पंजाबरावांचे कृषी, सहकार व शैक्षणिक विषयक जी धोरण होती त्यांची अंमलबजावणी आजही होण्याची आवश्यकता आहे. पंजाबरावाचे आर्थिक विचार देशाला नवीन दिशा देऊ शकतात. त्यांच्या विचारांच्या माध्यमातून देशातील हतबल व निराश झालेले शेतकरी पुन्हा नव्या उमेदीने व उत्साहाने कृषी क्षेत्रात कार्य करू शकतो.

डॉ.पंजाबराव देशमुख यांचे कृषी व्यवसायातील योगदान

संशोधक
प्रा.डॉ. एम. जी. हिंगे
जे. ई. एस.महविद्यालय, जालना.

प्रस्तावना:-

आज आपल्या देशाच्या कृषी क्षेत्रातील भरारीचा भक्कम पाया डॉ. पंजाबराव देशमुख यांच्या कृषी धोरण आणि विचारामुळे घातला गेला आहे. स्वातंत्र्योत्तर काळात भारतीय शेती आणि कृषी क्षेत्राला नवा आकार देणाऱ्या डॉ. पंजाबराव देशमुख यांचे कृषी क्षेत्र बरोबर शैक्षणिक क्षेत्रात मोठे योगदान आहे त्यातूनच राज्यातील महत्वपूर्ण समजल्या जाणाऱ्या अमरावती येथील श्री शिवाजी शिक्षण संस्थेचा पाया त्यांनी घातला देशाच्या आणि राज्याच्या कृषी आणि शिक्षण क्षेत्राला नवी ओळख निर्माण करून दिली. देशाच्या सध्याच्या कृषी क्षेत्राच्या प्रगतीत देशाचे प्रथम कृषिमंत्री पंजाबराव देशमुख यांचा सिंहाचा वाटा आणि मोलाचे स्थान आहे डॉ. पंजाबराव देशमुख हे सहकार कृषी शैक्षणिक अशा विविध क्षेत्रात ज्ञान व योगदान असणारे गतिशील अशी व्यक्तिमत्व होय यांचा जन्म 27 डिसेंबर 1898 अमरावती जिल्ह्यातील नांदगाव खंडेश्वर तालुक्यातील पापळ खेडेगावात एका शेतकरी कुटुंबात झाला त्यांच्या पित्याचे नाव श्यामराव व आईचे नाव राधाबाई होते दहावी चांगल्या गुणांनी उत्तीर्ण झाल्यानंतर उच्च शिक्षणासाठी त्यांनी पुणे येथील फर्ग्युसन कॉलेजमध्ये प्रवेश घेतला आणि आपले महाविद्यालयीन शिक्षण पुणे येथे विशेष प्राविन्य संपादन करून पूर्ण केले 1920 मध्ये ते उच्च शिक्षणासाठी इंग्लंडला गेले तेथे त्यांनी एम ए ऑनर संस्कृत ही अत्यंत मानाची पदवी संपादन केली 1925 मध्ये त्यांनी ऑक्सफर्ड युनिव्हर्सिटीतून बोर्ड आणि डीफेल ह्या पदव्या संपादन केल्या वैदिक साहित्यातील धर्माचा उगम विकास हा त्यांच्या प्रबंधाचा विषय होता डॉ. पंजाबराव देशमुख या महान व्यक्तिमत्वाने हिमालयाच्या उंचीचे कार्य करून ठेवले आहे. आज ते पाहाता त्यांची दुरदृष्टी वर्तमानाचा वेध घेणारी आणि भविष्यातील पाऊले ओळखणारी होती याची आपल्याला जाणीव झाल्याशिवाय राहात नाही. एका ध्येयाने प्रेरीत झालेले ते व्यक्तिमत्व होते. भाऊसाहेबांचे उद्दीष्ट, ज्ञान आणि दुरदृष्टी अचंबित करणारी होती.भाऊसाहेबांनी त्यांच्या संस्थेची उभारणीच शेतक.याचे हित लक्षात घेउन केली. त्यांचे स्वप्नं होते की कास्तकार शिकला पाहिजे.शिक्षण खेडयापर्यंत पोहोचले पाहिजे व शेतकऱ्याची मुले उच्चशिक्षीत झाली पाहिजे. शेतकरी व्यवसायात व्यापारात फार उंचीवर पोहोचला नसला तरी देखील लहान, मोठे व्यापार करण्याची हिम्मत त्याने केली पाहिजे तसेच शेतकऱ्याने गावाच्या आर्थिक विकासात सहभागी व्हावे कृषी महाविद्यालयाचे आणि कृषी विद्यापिठांचे संशोधन गाव खेडयापर्यंत पोहोचले तर त्या संशोधनातुन शेतकरी नवनवे प्रयोग करण्यास पुढाकार घेतील अधिक उत्पादनाकरता शेतकरी बांधव नवनव्या तंत्रज्ञानाचा आणि बियाण्यांचा उपयोग करेल त्यातून शेती उत्पादनात वाढ घडून येईल

उद्दिष्ट्ये :

1) डॉ. पंजाबराव देशमुख यांच्या कार्याचा अभ्यास करणे
2) डॉ.पंजाबराव देशमुख यांचे कृषी व्यवसायातील योगदान अभ्यासणे

डॉ.पंजाबराव देशमुख यांचे कृषी व्यवसायातील योगदान

जागतिकीकरणाच्या या पार्श्वभूमीवर विदर्भ आणि महाराष्ट्रात आत्महत्येचे प्रकार सर्रास सुरु आहेत. अशावेळी कृषीक्रांतीचे जनक डॉ. पंजाबराव देशमुख यांची आठवण होणे अपरिहार्य आहे. कारण शेतक-यांच्या समग्र उत्थानासाठी हिरारिने किंवा तळमळीने विचार करणा-या समाजक्रांतिकारकांमध्ये म. ज्योतीराव फुले, राजर्षी शाहू महाराज, डॉ.बाबासाहेब आंबेडकर, कर्मवीर भाऊराव पाटील आणि विदर्भरत्न भाऊसाहेब डॉ. पंजाबराव देशमुख यांचा प्रामुख्याने विचार करावा लागतो. वेळोवेळी शेतकरी आणि शेती व्यवसायाच्या संदर्भात विचार व्यक्त केले आहेत. . गेल्या दीड दशकांपासून विदर्भ, मराठवाडयात शेतकऱ्यांच्या आत्महत्यांनी उच्चांक गाठला. अस्मानी आणि सुलतानी कारभारामुळे शेती आणि शेतकरी देशोधडीला मिळाला आणि त्यात भर पडली जागतिकीकरणाची. देशाचे पहिले कृषिमंत्री पंजाबराव देशमुख यांच्या विचारातून शेती समस्यांबाबत बरीच उत्तरे मिळू शकतात. त्यासाठी प्रयत्न करणे गरजेचे आहे.कृषिप्रधान भारतात शेती व शेतकरी यांना प्रथम प्राधान्य द्यावे, असे भाऊसाहेबांनी 3 सप्टेंबर 1949 ला घटना समितीत भाषण करताना सांगितले. भारतीय कृषी व कृषक याबद्दल मला नितांत आदर वाटतो. मी शेतकऱ्याला सर्वश्रेष्ठ धननिर्माता समजतो, तो सर्वांचा पोशिंदा आहे, म्हणून हा शेतकरी समाज मागे राहू नये व त्याचे कोणी शोषण करू नये या दृष्टीने प्रत्येक शेतकरीपुत्राने शेतकऱ्यांचा आर्थिक, शैक्षणिक, बौद्धिक विकास करण्यासाठी सतर्क असले पाहिजे, असे विधान फक्त भाऊसाहेबांचेच होते.उदाहरण भारत कृषक समाजाचे देता येईल. भारत कृषक समाजनिर्मितीमागील उद्देश असा होता की, शेतकऱ्यांना आधुनिक पद्धतीने शेती करण्याचे प्रशिक्षण देणे, शेतीच्या नवनवीन प्रयोगांची माहिती देणे, कृषी प्रदर्शनी, चर्चासत्रे, संमेलने, समारंभ आयोजित करणे, राज्यातील तसेच परदेशातील शेतकऱ्यांना परस्पर भेटीगाठीद्वारे एकमेकांना कृषिज्ञानाची देवाणघेवाण करता यावी. शेतकऱ्यांच्या उद्धारासाठी अनेक योजना राबविल्या. उदा. राष्ट्रीय कृषी सहकारी खरेदी विक्री संघ, कृषक सहकारी अधिकोष, आफ्रो आशिया ग्रामीण पुनर्रचना संघटना, कृषी सहाय्यक संघटना, अखिल भारतीय ताडगूळ महासंघ, कृषी उत्पादकांच्या माध्यमातून त्यांनी कृषी व्यवसायाच्या उन्नतीसाठी केलेले कार्य अलौकिक स्वरूपाचे आहे.भारतातील सर्वात मोठी आणि सर्वोत्तम आरे डेअरी मुंबईच्या निसर्गरम्य क्षेत्रात सहकारी तत्त्वावर सुरू केली. जागतिक दर्जाची आरे डेअरी जगात आणि भारतात गाजली. भारताच्या प्रत्येक राज्यात सहकारी क्षेत्रात दूध डेअरींची स्पर्धा लागली आणि पाच वर्षांतच भारतातील दूधक्रांती सेतु हिमाचल प्रदेशात पोचली. दुधाचे विविध पदार्थ भारतीयांना मिळू लागले. धवलक्रांती खेडयापाडयांत पोहोचली.आंतरराष्ट्रीय कृषी धोरण आखणे, कृषी प्रदर्शन, संमेलने आयोजित करणे, देश-परदेशातील शेतकऱ्यांच्या भेटी घेणे, असा उद्देश होता. 1957 मध्ये पंजाबराव दुसऱ्यांदा कृषिमंत्री झाले. 1959-60 साली भारत कृषक समाजाच्या वतीने दिल्लीत जागतिक कृषी प्रदर्शन भरविण्यात आले. अमेरिका, रशिया, जर्मनी, पोलंड, इराक, अफगाणिस्तान, श्रीलंका, ब्रह्मदेश, चीन, मंगोलिया, इराण आणि व्हिएतनाम अशा देशांनी सहभाग नोंदविला.शेती व शिक्षणाला वाहिलेली कलमे अ) शेतकऱ्यांच्या मुलांना मोफत शिक्षण देणे, सरकारी नोकरीत 70 टक्के जागा राखून ठेवणे. ब) शेतकऱ्यांसाठी शेतकरी बँक स्थापना करणे, जमिनीची समान वाटणी करणे, लष्करी शिक्षण सक्तीचे करणे, अशा उपयुक्त विचारांतून पंजाबरावांचे जीवनध्येय लक्षात येते.भारतातील गरीब, पीडित, शेतमजूर व शेतकरी यांच्या उत्थानाकरिता सहकार हा प्रभावी उपाय ठरू शकतो, असे ठाम मत स्व. पंजाबराव उपाख्य भाऊसाहेब देशमुख यांचे होते. सर्व प्रगतीच्या क्षेत्रांमध्ये सहकाराची व्याप्ती नियोजनपूर्वक वाढविली पाहिजे, अशी आग्रही भूमिका स्व. पंजाबरावांची होती.त्यांच्या जीवनकार्याचे कृषी, शिक्षण आणि सहकार हे तीन पैलू होते. या तीनही पैलूंत

ग्रामीण शेतकरी, कष्टकऱ्यांचा विकास दडलेला आहे. त्याचबरोबर स्वतंत्र भारताच्या संविधाननिर्मितीत दिलेल्या महत्त्वपूर्ण आणि अमूल्य योगदानाची साक्ष पटते.

शेती राष्ट्राच्या विकासाचा आधार :

माणसाप्रमाणेच समाजाच्या आणि राष्ट्राच्याही जीवनात शेतीला महत्त्वाचे स्थान आहे. त्यातही भारतासारख्या शेती प्रधान देशात तर अधिकच आहे, असे असून देखील शेती विकासाकडे स्वातंत्र्याच्या 65 वर्षानंतरही शासन गांभीर्याने लक्ष दिलेले नसून आजही विदर्भ आणि महाराष्ट्रात घडून येणाऱ्या शेतकऱ्यांच्या आत्महत्येचा आकडा जरी पहिला तरी ते आपल्या सहज लक्षात येते. शेती आणि शेतकऱ्यांची दूरावस्था ही बाब भाऊसाहेब डॉ. पंजाबराव देशमुखांच्या लक्षात आल्यामुळे त्यांनी शेतकरी संघटित करण्याकडे जास्त भर दिलेला होता. त्यातूनच 1927 साली भाऊसाहेबांनी शेतकरी संघ स्थापन केला व सर्व प्रथम शेतकऱ्यांना संघटित करण्याचे मौलिक कार्य केले. शेतकऱ्यांना संघटित करुन भाऊसाहेबांनी शेती ही केवळ उदरनिर्वाहाचे साधन नसून तो एक व्यवसाय आहे. राष्ट्राच्या विकासासाठी शेतकऱ्यांनी शेतीला व्यवसाय समजून कष्ट केले पाहिजेत. कारण राष्ट्राच्या एकूण उत्पन्नात 50%टक्के उत्पन्न हे शेती व शेतीसंबधीत व्यवसायातून निर्माण होते. त्यामुळे शेतकऱ्यांच्या मुलांनी शेती राष्ट्राच्या विकासाचा मुख्य आधार आहे असे समजून शेती करावी. कारण शेतकरी सुखी तर देश सुखी असा साधा सरळ विचार भाऊसाहेबांचा होता ते म्हणत Our culture is Agriculture कारण भारत हा कृषकांचा देश आहे. त्यांच्या घामावर शहरी माणसाचे जिणे आणि वैभव आधारित आहे. जागतिकीकरणामध्ये शेतकऱ्यांचे प्रश्न निष्ठेने समजून घेणे आवश्यक आहे

आधुनिक आणि तांत्रिक शेती:

भारतीय शेतकऱ्यांची दैववादी, निरशावादी मानसिकता बदलून त्यांना जागतिकीकरणातील आर्थिक, सामाजिक व सांस्कृतिक प्रश्नांची जाण करुन देणे काळाची गरज आहे. कारण जोपर्यंत शेतीकडे पाहण्याचा सामान्य शेतकऱ्यांचा दृष्टिकोन बदलत नाही तो पर्यंत शेतकऱ्यांचा आर्थिक विकास घडून येणे शक्य नाही. त्यासाठी भाऊसाहेबा डॉ. पंजाबराव देशमुख यांनी शेती करताना आधुनिक आणि तांत्रिक शेतीचा वापर करावा असे म्हटले आहे. त्यासाठी भाऊसाहेबांनी कोलंबो प्लॅन प्रमाणे निरनिराळ्या देशात शेतकरी पाठविण्याची योजना आखली होती तसेच इंटर नॅशनल फार्म यूथ एक्सचेंज कार्यक्रम भारतात सुरु करुन बऱ्याच शेतकऱ्यांना दुसऱ्या देशातील शेतीची लागवड पद्धती पाहण्याची व प्रात्याक्षिक करण्याची संधी मिळवून दिली. (उदा. जपानी भात शेतीचा प्रयोग)आधुनिक आणि तांत्रिक शेती करताना अशा प्रकारच्या योजनांची आज अमंलबजावणी करण्याची नितांत गरज आहे. परिणामत: अशा प्रात्याक्षिकांमधून शेतकरी आधुनिक यंत्रे, उपकरणे यांचा कसा वापर करावा हे शिकतील, व त्यातून शेतीसाठी लागणारे पुढचे नियोजन ते करतील आणि त्यामाध्यामातून त्यांच्या वेळेची व श्रमाची बचत होईल. हा दृष्टिकोन भाऊसाहेबांचा आधुनिक शेतीसंबंधी होता.

सहकारी शेती:

डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्याप्रमाणे डॉ.पंजाबराव देशमुख यांनी सुद्धा सहकारी शेतीवर भर दिला. शेतकऱ्यांनी शेतीशी भावनिक नाते न ठेवता शेतीकडे उत्पादन वाढविण्याच्या दृष्टिकोनातून पाहिले पाहिजे त्यासाठी त्यांनी शेतीचे लहान लहान तुकड्यात होणारे विभाजन टाळून ती एकत्रित कशी करता येईल, याकडे लक्ष दिले पाहिजे, त्यासाठी त्यांनी सहकारी शेती हाच त्यावर योग्य मार्ग आहे असे सांगितले. त्यामुळे शेतकऱ्यांचे दर एकरी उत्पन्न वाढेल तसेच उत्पादन मूल्य कमी होऊन राष्ट्रीय उत्पन्नात वाढ होईल. आज सहकारी शेती करण्याची नितांत गरज असल्याचे दिसून येते

शेती व्यवसायाला प्रशिक्षणाची गरज :

भाऊसाहेब नेहमी म्हणत तुम्हला शेती जरी करावयाची असली तरी तुम्ही एम.ए. होऊन करा किंवा ऍग्रीकल्चर होऊन करा जेणे करुन तुम्हाला कुणी फसवणार नाही आणि तुम्ही उत्तम शेती करु शकाल, भाऊसाहेबांच्या या विचारांची खरी गरज आहे. कारण आज शेतकऱ्याला शिक्षणाची गरज नाही आणि कोणीही ऐरागैरा योग्य रितीने शेती करु शकतो हा सर्वदूर पसरलेला चुकीचा समज आहे. हा दृष्टिकोन बदलवणे अत्यंत आवश्यक झाले आहे. कारण या चुकीच्या समजुतीमधूनच समाजात नैराश्य आणि वैफल्य पसरते आणि त्यातूनच मग सगळीकडे असफल झालेले लोक निराशेने, उदासिनतेकडे वळताना दिसतात किंवा आजच्या घडीला ते आत्महत्या करताना दिसतात. त्याचे कारण त्यांच्याजवळ ना शारीरिक क्षमता असते ना बौधिक कुवत, त्यामुळे इतर व्यावसायिक शिक्षणाप्रमाणेच शेती व्यवसायाशी संबधित असणाऱ्या सर्व सोयी, सुविधा नवनवीन पध्दती आणि तंत्रज्ञानाची माहिती असणे आवश्यक आहे. शेती व्यवसाय हा स्थितीशील व्यवसाय आहे. याची जाणीव करुन देण्याची गरज मोठ्या प्रमाणात निर्माण झाली आहे. तसेच आजच्या शिक्षणाची गंगा संशोधकाच्या प्रयोगशाळेतून थेट शेतात राबणाऱ्या शेतकऱ्यांच्या पर्यंत पोहचली पाहिजे. तरच तो शेतकरी उत्तम व आधुनिक शेती चांगल्याप्रकारे करु शकतो. अशी महत्वपूर्ण भूमिका मांडली

संदर्भ ग्रंथ-

1) लोकमहर्षी भाऊसाहेब डॉ.पंजाबराव देशमुख गौरव ग्रंथ महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती. मंडळ मुंबई

2) स्मरणिका- शिक्षण महर्षी डॉ. पंजाबराव देशमुख जन्मशताब्दी महोत्सव 1997-98

3) प्रा. अशोक रा. इंगळे, डॉ. एच.एन. सिन्हा महाविद्यालय, पातूर

4) सावरकर सुदाम /रा.ब.सूर्यकार 'भाऊसाहेब उर्फ डॉ. पंजाबराव देशमुख यांचे जीवन व कार्य श्री भा.रा.लोंढे पब्लिशर्स अमरावती. 1964

5) देशमुख कल्पना 'डॉ. पंजाबराव देशमुख यांचे सामाजिक योगदान' प्रदीप मुळे पब्लिशर्स नागपूर -1997

6) पवार ना.ग.महामानव डॉ. पंजाबराव देशमुख भारती प्रकाशन पुणे 1993

7) रवींद्र ढाले 'डॉ. पंजाबराव देशमुख यांचे कृषी विषयक आर्थिक विचार' नभ प्रकाशन अमरावती-

संदर्भ

१. डॉ. पंजाबराव देशमुख संघर्षाचा प्रवास, प्रो.. प्रकाश घवघवे, महाराष्ट्र टाइम्स आर्टिकल

२. डॉ. पंजाबराव देशमुख यांचे कृषी विषयक आर्थिक विचार, प्रा, डॉ. रवींद्रढाले, नभ प्रकाशन, अमरावती

३. डॉ. पंजाबराव देशमुख - लोकसभा सचिवालय, नवी दिल्ली.

४. "कृषी अर्थशास्त्र" वसुधा पुरोहित – विद्या बुक्स पब्लिशर्स

५. कृषी व ग्रामीण अर्थशास्त्र – डॉ. विजय कवीमंडन – प्रशांत प्रकाशन

६. भारतीय अर्थव्यवस्था – रंजन कोळंबे – भगीरथ प्रकाशन पुणे

७. शिक्षण महर्षि,कृषी-रत्न डॉ. पंजाबराव देशमुख – नितीनगो.धोरण.अकोट, "प्रबोधन" वृत्तपत्रातील संपादकीय लेख, दि. २७ डिसेंबर२०१४

डॉ. पंजाबराव देशमुखांचे आर्थिक विचार

प्रा.डॉ.नागोराव के सोरे
अर्थशास्त्र विभाग प्रमुख
श्री.बा.दे.पारवेकर महाविदयालय पांढरकवडा जि. यवतमाळ

इंद्रधनुष्यासारखे चरित्र असणा-या तसेच हिमालयासारखे उत्तुंग कार्य करणा-या डॉ. पंजाबराव देशमुख यांचा जन्म २७ डिसेंबर १८९८ मध्ये अमरावती जिल्हयातील "पापळ" या लहानश्या गावी एका शेतकरी परीवारात झाला. त्यांच्या वडिलांचे नाव शामराव व आईचे नाव राधाबाई असे होते. व-हाडच्या या रत्नाने आपले शिक्षण मूळगावी पापळ येथून केले. त्यांनतर १९१८ साली ॲकेडमीक हायस्कुल, अमरातवी येथून त्यांनी मॅट्रीकची परीक्षा उत्तीर्ण केली. बुध्दीने अतिशय तल्लख असलेल्या पंजाबरावजवळ विलायतला जावून बॅरिस्टर होण्यासाठी पैसा नव्हता. म्हणून शेती गहाण टाकून त्यांच्या वडिलांनी शिक्षणासाठी शिक्षणासाठी पैसा उभा केला. १९२३ साली त्यांनी इंग्लंडमधील एडीनबरो विदयापीठातून संस्कृत विषयात एम.ए.केले. "धर्माचा वैदिक वाड.मयातील उदय व विकास" या विषयावर त्यांना आचार्य पदवी मिळाली. ऑक्सफर्ड विदयापीठातून त्यांनी बार ॲट लॉ व डी. फिल हया परीक्षा उत्तीर्ण केल्या. शिक्षणक्षेत्रात थोर कामगिरी करणा-या पंजाबरावांना शेतक-यांविषयी अतिशय कळवळा होता. म्हणून त्यांनी १९२७ मध्ये शेतकरी संघाची स्थापना केली. भारतीय कृषीविषयक एक जाणकार व्यक्ती म्हणून त्यांचा व-हाडच्या प्रांतिक विधीमंडळात १९३० साली प्रवेश झाला. त्यांच्याकडे कृषी, सहकार व शिक्षण ही खाती देण्यात आली.

डॉ. पंजाबराव देशमुख यांचे जीवन व कार्य प्रत्येक भारतीयाला सादर अभियान वाटावा असेच आहे. त्यांनी समाजात अनेक परिवर्तन घडवून आणण्याचा प्रयत्न केला. पंजाबरावा यांच्या आधी भारतीय समाज परिवर्तनाचे आदय प्रवर्तक म्हणून राजा राममोहनराय ओळखले जातात. राजर्षी शाहू महाराज, महात्मा ज्योतिराव फुले ही याच परंपरेतील नावे आहेत. हीच परंपरा कर्मयोगी संत गाडगेबाबा, वंदनीय राष्ट्रसंत तुकडोजी महाराज व डॉ. पंजाबराव देशमुख यांनी पुढे चालविली. या तिघांमधील साधर्म्य म्हणजे सर्वसामान्य लोकांविषयी त्यांना असलेला कळवळा होय. सामान्याची जी दैनावस्था होती. त्यातून सामान्य लोकांना बाहेर काढून सामाजिक परिवर्तनाचा मार्ग या त्रिमुर्तीना दाखविला. अर्थातच, प्रत्येकाची सामाजिक परिवर्तनाची साधने ही वेगवेगळी होती. गाडगेबाबांनी किर्तनाचा आधार घेवून समाजातील अज्ञान दूर करण्याचा प्रयत्न केला. राष्ट्रसंत तुकडोजी महाराजांनी भजनाच्या माध्यमातून समाजजागृती केली. पण पंजाबरावांनी समाज परिवर्तनासाठी शिक्षण, कायदा, कृषकांसाठी कार्य करणा-या पंजाबरावांनी समाजात एक नवचैतन्य निर्माण केले. म्हणूनच त्यांना समाज प्रर्वतक असे म्हटल्या जाते.

नैसर्गिक परिवर्तन हे निसर्ग निसर्ग नियमांनी सुरू असते, तर समाजपरिवर्तन हे समाज रचनेत घडून आलेले परिवर्तन होय. समाजपरिवर्तन करतांना यात समाज रचना, मूल्ये, वर्तनाचे नियम व सामाजिक प्रतिके अशा अनेक घटकांमध्ये बदल अपेक्षित असतो. डॉ पंजाबराव देशमुख यांना समाजात ज्या परंपरागत चालत आलेल्या काही गोष्टी होत्या त्यात परिवर्तन व्हावे अशी त्यांची विचारधारणा होती. त्यांनी समाजपरिवर्तन होण्यासाठी ज्या क्षेत्रामध्ये कार्य केले ते असे-

1. कृषकांसाठी केले कार्य :

भारतीय समाजातील सर्वात महत्वपूर्ण असा उत्पादक गट म्हणजे शेतकरी. त्याच्या श्रमातून निर्माण झालेल्या वस्तुंच्या आधारे समाजाचे सर्व व्यवहार चालतात. पण समाजाचे पोषण करणारा हा वर्ग

अत्यंत दारिद्र्यात जीवन जगत आहे, ही बाब सामाजिक वास्तवतेचा अचूक वेध घेणा-या डॉ. पंजाबराव देशमुख यांच्या नजरेतून सुटली नाही. कारण त्यांचा जन्म एका शेतकरी कुटूंबात झाला होता. शेतक-यांची आर्थिक स्थिती त्यांनी अनुभवली होती. त्या परिस्थितीचे चटके सहन करीतच त्यांनी शिक्षण घेतले होते. म्हणून शेतक-यांसाठी काहीतरी केले पाहिजे. त्यांच्या जीवनातील दैन्य, उपासमार, कष्ट नाहीसे झाले पाहिजे असे पंजाबरावांना हृदयातून वाटत होते. त्यासाठी त्यांनी पुढाकार घेवून विदेशातून शिक्षण घेवून आल्यावर शेतकरी संघाची स्थापना केली. शेतकरी सुखी तर देश सुखी अशी विशाल दृष्टी असणा-या भाउसाहेबांनी शेतक-यासाठी अनेक योजना राबविल्या त्या अशा-

1. कर्ज लवाद कायदा
2. शेतक-यांच्या मुलांसाठी महाविदयालयात राखीव जागा
3. शेतकी महाविदयालयात प्रवेश देतांना शेतक-यांच्या मुलांना अग्रक्रम
4. शेतक-यांच्या मुलांना शिक्षणात फी सवलत

शेतक-यांविषयी जिव्हाळा असणा-या पंजाबरावांनी शेतक-यांसाठी भारत कृषक समाजाची स्थापना केली. भारतीय कृषकांची उन्न्ती व्हावी, कृषी क्षेत्रात त्यांना चांगले दिवस यावे यासाठी त्यांनी ११ डिसेंबर १९५९ ते २६ फेब्रुवारी १९६० पर्यंत " जागतिक कृषी प्रदर्शन" दिल्ली येथे आयोजित केले. या प्रदर्शनात जगातील अनेक राष्ट्रांनी भाग घेतला. भारताच्या कानाकोप-यातून अनेक शेतकरी या जागतिक कृषी प्रदर्शनाला उपस्थित होते. हे जागतिक कृषी प्रदर्शन म्हणजे शेती क्षेत्रातील प्रगतीचे भव्य दर्शनच होते. या कृषी प्रदर्शनाला विदेशातील अनेक थोर मंडळी उपस्थित झाल्या होत्या. अशाच प्रकारची प्रदर्शने भाउसाहेबांनी राष्ट्रीय स्तरावर कलकत्ता, मद्रास, अहमदाबाद येथे १९६१-१९६२ साली आयोजित केली होती. ही प्रदर्शने आयोजित करण्यामागे त्यांचा प्रमुख उद्देश हो होता की, शेतक-यांना आधुनिक कृषी ज्ञानाची ओळख व्हावी व त्यांनी त्याचे प्रात्यक्षिके आपल्या शेतीत करावे हा होता.

भारतीय शेतक-यांसाठी सतत झटणारे डॉ. पंजाबराव देशमुख हे कृषितज्ज्ञ होते. त्यांनी शेतक-यांसाठी अनेक संघटना उभ्या केल्या. या संघटनांच्या माध्यमातून कृषकांचे कृषी जीवन समृध्द केले. पंजाबरावांनी शेतक-यांसाठी ज्या संघटना उभारल्या त्या अशा-

1. राष्ट्रीय कृषी सहकारी खरेदी-विक्री संघ
2. भारत कृषक सहकारी पतपेढी
3. युवक कृषक समाज
4. कृषी सहायक यंत्र संघटना
5. लाखोंकरीता अन्न संघटना
6. श्री शिवाजी कृषी महाविदयालय
7. श्री शिवाजी कृषी महाविदयालय
8. ग्रामसेवक ट्रेनिंग सेंटर
9. सरल इन्स्टिटयुट
10. अखिल भारतीय मधमाशी पालक संघटना
11. अखिल भारतीय ताडगुळ महासंघ
12. खादी ग्रामादयोग मंदिर
13. अखिल भारतीय अखादय तेलबिया उदयोग संघटना
14. आफ्रो-एशियन ग्रामीण युवक संघटना

15. आंतरराष्ट्रीय ग्रामीण युवक संघटना
16. कृषक महिला संघटना
17. कृषक उत्पादकांचा आंतरराष्ट्रीय संघ

2. शैक्षणिक कार्य :

भारतीय समाजात महात्मा ज्यातिबा फुले, न्या.रानडे, ना. गोखले, लोकहितवादी चिपळूणकर, आगरकर, लोकमान्य टिळक यांनी शिक्षण प्रसाराला चालना दिली. पुढे डॉ. पंजाबराव देशमुख यांनी शिक्षण क्षेत्रात ज्ञानाचा वटवृक्ष निर्माण केला. त्यांनी शिक्षणाची सोय निर्माण करण्यासाठी १९६१ मध्ये शिवाजी शिक्षण संस्थेची स्थापना केली. या शिवाजी शिक्षण संस्थमुळे विदर्भात शिक्षणाचा झपाटयाने प्रसार झाला. आज या शैक्षणिक संस्थेमधून असंख्य विदयार्थी शिक्षण घेत आहेत. डॉ. पंजाबराव देशमुख यांनी निर्माण केलेल्या शिवाजी शिक्षण संस्थेमुळे समाजातील अनेक लोकांचे जीवन उज्वल झाले. त्यांच्या प्रगातीच्या वाटा शिगेला पोहोचल्या.

भाउसाहेबांनी शिक्षण क्षेत्रात केलेले कार्य हे अत्यंत प्रशंसनीय आहे. त्यांनी शिक्षणाचा विस्तार होण्यासाठी जे बहुमोल कार्य केले ते असे-

१. श्री शिवाजी लोकविदयापीठ १९५०
२. जनता कॉलेज १९५१
३. रूरल इन्स्टिटयूट १९५६
४. कस्तुरबा कन्या शाळा १९५२
५. जिजामाता कला महाविदयालय १९५६
६. श्री. शिवाजी व्यायाम शाळा १९२०
७. शारिरीक शिक्षण महाविदयालय १९६०
८. शिवाजी मराठा हायस्कूल १९४३

३. नवमूल्यविषयक कार्य:

डॉ. पंजाबराव देशमुख हे समाजात असलेल्या प्रश्नांच्या खोलात जावून विचार करणारे व कारणांचा शोध घेणारे मुलगामी विचारवंत होते. तसेच समाजाला समतेच्या मार्गावर आणून त्याला गती देणारे गतिशील व्यक्तीमत्व होते. भारतीय समाजाच्या दाहक वास्तवातून पंजाबरावांच्या सामाजिक परिवर्तनाच्या दिशा तयार झालेल्या होत्या. त्यांच्या विचाराला अंत:करणातील ओलाव्याचा स्पर्श होता. त्यांचे कार्य हे क्रांतीकारी होते. एक सामाजिक विचारवंत व कार्यशूर कार्यकर्ता म्हणून त्यांच्याकडे बघितल्यास ते समाज परिवर्तनाच्या कार्यातील विराट वटवृक्षच ठरतात.

भारतीय समाजात परंपरावादी आणि कर्मकांडावर भर देणा-या अनेक गोष्टी होत्या. त्यामूळे मानवी नीतीमूल्ये पायदळी तुडविल्या जात होती. यामुळे अनेक लोकांच्या जीवनात काळोख पसरला होता. हा भयान अंधार दूर करण्यासाठी भाउसाहेबांनी अनेक कृतीशील कार्य हाती घेवून सामाजिक विचारांचा लोकांवर प्रकाश टाकला. पददलीतांवर होत असलेला अन्याय, स्त्रियांवर होणारे अन्याय, अस्पृश्यांवर होणारे अन्याय, हुंडापध्दती इत्यादी. सामाजिक शंत्रूवर डॉ. पंजाबराव देशमुख यांनी प्रहार करून समाजात परिवर्तन घडवून आणण्याचा प्रयत्न केला. त्यांच्या अंत:करणातून उठलेला मानवी मूल्यांचा सूर सामान्य माणसाला मोठा दिलासा देत होता. त्यांचा सामाजिक विचार हा फक्त बौध्दिक पोपटपंची करणारा नव्हता, तर झोपडपटटीतील

माणसाचे अज्ञान व दैन्य दूर करणारा होता. परंपरेने चालत आलेले अनेक अमानवीय घटक त्यांनी समतेच्या तत्वाने नाहीसे करून समाजाला नवमूल्यांची देणगी दिली.

सामाजिक परिवर्तनाचा मुख्य आधार म्हणजे शिक्षण. या शिक्षणाच्या अभावामूळे बहूजन समाजाची घसरण झाली. हे पंजाबरावांनी समाजाला तसेच शासनाला पटवून दिले. शिक्षणाशिवाय बहूजन समाज हा आपल्या मूलभूत मानवी अधिकार पदासाठी लढू शकणार नाही व पर्यायाने मनुष्य पदाची प्राप्ती ते करू शकणार नाही अशी त्यांची धारणा होती. म्हणून त्यांनी सर्वांसाठी शिक्षणासाठी दारे खुली केली. विस्थापित जीवनाचे वाटेकरी असलेल्या कनिष्ठ वर्गातील लोकांना आपल्या अधिकारांची जाणिव त्यांनी करून दिली. हे समाजहित कार्य पंजाबरावांनी आयुष्याच्या शेवटच्या क्षणापर्यंत केले.

समारोप :

बहुजनांच्या जीवनाविषयी कळवळा असणा-या भाऊसाहेबांनी अनेक समाजहितकारी कार्य केले. त्यांनी शैक्षणिक संस्थेच्या माध्यमातून शैक्षणिक विकास घडवून आणला. ते कृषकांचे पुढारी होते. त्यांनी कृषकांसाठी दिल्ली येथे जे जागतिक कृषी प्रदर्शन भरविले त्याला इतिहासात तोड नाही. जगातील शेतक-यांनो संघटित व्हा हा मंत्र देणा-या भाऊसाहेबांनी भारत कृषक समाजाची स्थापना करून असंख्य शेतक-याच्या जीवनात आनंद निर्माण केला. म्हणूनच ते भारतातील कृषी क्रांतीचे अग्रदूत ठरतात. त्यांनी स्त्रि यांच्या शिक्षणाला सुध्दा महत्व देवून अनेक सुधारणा केल्या. अस्पृश्यांचे होणारे हाल त्यांनी सत्याग्रह करून नाहीसे केले. अस्पृश्यता निवारण्यासाठी त्यांनी खेडयापाडयातील विहिरी खुल्या केल्यात. समाजामध्ये मानवतेचे सुंदर दर्शन घडावे हा विचार उरी बाळगणा-या भाऊसाहेबांनी बहूजनांनी दैनावस्था दूर करण्याचा प्रयत्न केला. तसेच त्यांनी अनेक कायदे करून समाजहित जोपासले. भाऊसाहेब म्हणजे दीन, दलीत, दुःखी आणि दडपलेल्यांचा आभार होते. त्यांच्या जीवनाचा उध्दार हेच पंजाबरावांनी आपले जिवीतकार्य मानले. भारतीय समाजात जे अनेक समाजसुधारक होवून गेलेत, त्यापैकी समाजसुधारणेची दिशा देणारे डॉ.पंजाबराव देशमुख हे एक उत्तम उदाहरण होय. त्यांनी केलेल्या कार्यावर आज जर समाजातील लोकांनी वागण्याचा प्रयत्न केला तर समाजात अनेक लोक आपआपसातील मतभेद विसरून बंधुभावाने नांदतील आणि एकमेकांच्या सुख-दुःखात सहभागी होतील. असे झाल्यास, त्यातून "राष्ट्रीय एकात्मता" निर्माण होईल.

संदर्भग्रंथ सूची :

1. किन्हीकर, डॉ.पुष्पा गुणवंतराव-"समाजप्रवर्तक डॉ. पंजाबराव देशमुख",विसा बुक्स, नागपूर, आवृत्ती पहिली: 31 मार्च 2008
2. कडवे, प्रा. रघुनाथ-"भारत कृषक भूषण भाऊसाहेब डॉ. पंजाबराव देशमुख" संस्कार प्रकाशन, नागपूर, प्रथम आवृत्ती.
3. देशपांडे, डॉ.य.खु-"पापळचे डॉ.पंजाबराव विविध दर्शन, प्रथम आवृत्ती.
4. जामकर, डॉ. सुनंदा-डॉ.पंजाबराव देशमुखांचे शिक्षण विचार, नभ प्रकाशन, अमरावती, प्रथम आवृत्ती : 27 डिसेंबर 1998.
5. ढाले, प्रा.डॉ.रविंद्र-"डॉ.पंजाबराव यांचे कृषी विषयक आर्थिक विचार", नभ प्रकाशन, अमरावती.

बदलती भारतीय अर्थव्यवस्था आणि डॉ.पंजाबराव देशमुख यांचे आर्थिक विचार

प्रा.संजय दादासाहेब ठिगळे
अर्थशास्त्र विभाग प्रमुख, भारती विद्यापीठाचे,मातोश्री बयाबाई श्रीपतराव कदम कन्या महाविद्यालय, कडेगाव, सांगली. आजीव सदस्य क्रमांक; ५९८ ई-मेल: thigalesanjay@gmail.com
मोबाईल: ९४२२०४१९२९

विदर्भातील एका सामान्य शेतकरी कुटुंबात जन्माला आलेला मुलगा प्रतिकूल परिस्थितीत शिक्षण घेतो. मोठया जिद्दने उच्च शिक्षणासाठी विदेशात जातो.एवढेच नव्हेतर उच्च शिक्षण घेऊन विदेशातच न राहता देश प्रेमापोटी भारतात येतो. आपल्या देशातील लोकांच्या समस्या जाणून घेतो. अन आयुष्यभर लोकांच्या सेवेत राहतो. असा माणसातला माणूस म्हणजे डॉ.पंजाबराव देशमुख. आपण ज्या समाजातून आलो त्या समाजाचे आपण काहीतरी देणे लागतो याची जाण आणि भान असणाऱ्या डॉ.पंजाबराव देशमुख यांनी भारतीय अर्थव्यवस्थेच्या सर्वांगीण विकासातील अडसर ओळखले. दारिद्र्य आणि अज्ञान हेच खरे दोन अडसर ओळखून अग्रक्रमाने कृषी व्यवस्था सुधारण्यावर अधिक भर दिला. भारतासारख्या कृषिप्रधान राष्ट्राचा विकास करायचा असेल तर कृषक लोकांचे अज्ञान प्राधान्याने दूर केले पाहिजे म्हणून त्यांनी आर्थिक प्रगतीबरोबरच शैक्षणिक प्रगतीवर भर दिला. त्यासाठी त्यांनी विदर्भात शैक्षणिक संस्थाचे जाळे तयार केले. त्यांनी कृषी विकास साधने हाच प्रगतीचा महत्वाचा टप्पा ठरविला. खेड्यांचा विकास झाल्याशिवाय खऱ्या अर्थाने भारताची प्रगती होणार नाही याचे ज्ञान त्यांना अवगत असल्यामुळेच त्यांनी ग्रामीण विकासावर अधिक भर दिला. विशेषतः शेती हा भारतीय अर्थव्यवस्थेचा कणा आहे हे लक्षात घेऊन त्यांनी कृषी विकासासाठी त्यांनी आपले जीवन खर्ची घातले.

कोणत्याही देशाच्या विकास प्रक्रियेत भूतकाळ,वर्तमानकाळ आणि भविष्यकाळ (२) महत्वाचा असतो.हे जरी खरे असले तरी डॉ. पंजाबराव देशमुख यांचा विचार त्याच्यापलीकडचा होता. त्यांच्या मते काही गोष्टी कालानुरूप विसरता आल्या पाहिजेत.तर काही गोष्टींचा आपण त्याग केला पाहिजे.एवढेच नव्हे तर काही गोष्टी गाढता आल्या पाहिजेत आणि समाजाच्या हितासाठी काही गोष्टींचा अंगीकार केला पाहिजे. त्यातूनच त्यांची एक नवीन विचारधारा दिसून येते. 'भूतकाळ विसरा, तलवार विसरा, जातिभेद पुरा, सेवाभाव धरा' हे त्यांनी त्यांचं ब्रीदवाक्य ठरविले. भारताला शाश्वत विकास करायचा असेल तर या ब्रीदवाक्याची नव्याने पेरणी करण्याची गरज आहे. एवढेच नव्हे तर भारताचे पहिले कृषी मंत्री म्हणून त्यांनी दिलेल्या योगदानाचा आणि आर्थिक विचारसारणीचा नव्याने अभ्यास करण्याची गरज आहे. त्यांचा कृषक क्रांतीचा प्रयोग हा आजही उपयोगी असा आहे. शेतीतील नापिकी आणि सावकाराकडून होणारी पिळवणूक आणि त्यातून होणाऱ्या हाल अपेष्टा कमी होण्यासही जन आंदोलनाचा मार्ग त्यांनी स्वीकारला कृषी विकास,शिक्षण व्यवस्था आणि आणि सामाजिक सुधारणा या त्रिसूत्रीचा अंगीकार केला. आजची भारतीय अर्थव्यवस्था आणि अर्थव्यवस्थेसमोरील आव्हाने विचारात घेता त्यांनी मांडलेल्या आणि अंगिकारलेल्या वैश्विक आर्थिक विचारसरणीचा नक्कीच उपयोग होईल.फक्त गरज आहे ती प्रबळ इच्छाशक्तीची आणि काटेकोर अंमलबजावणीची.

कळीचे मुद्दे: भारतीय कृषी व्यवस्था –बदलते स्वरूप-डॉ.पंजाबराव देशमुख यांची आर्थिक विचारसरणी

प्रस्तावना:

आज पर्यंतचा इतिहास पाहिला तर एक गोष्ट लक्षात येते कि अनेक क्षेत्रात ज्या चळवळी झाल्या त्या चळवळीना जाणकार नेतृत्व मिळत गेले. त्यामुळेच विकासाची प्रक्रिया गतिमान झाली. विशेषतः ग्रामीण विकासाच्या चळवळीला मा.वर्गीस कुरीअन यांच्यापासून ते मा. डॉ.वसंतदादा पाटील यांच्यापर्यंत आणि मा. डॉ.पंजाबराव देशमुख यांच्यापासून ते मा.यशवंतराव चव्हाण यांच्यापर्यंत असे एक ना अनेक दूरदृष्टी असणारी जाणकार नेते मंडळी भेटली म्हणूनच खऱ्या अर्थाने विकासाला चालना मिळाली असे म्हटले तर फारसे वावगे होणार नाही.विशेषतः डॉ.पंजाबराव देशमुख यांनी आपल्या जीवनात शिक्षण,कृषी,समाजसेवा आणि ग्रामविकास या क्षेत्रात केलेले काय महत्वपूर्ण आहे. कृषक क्रांतीचा एक आगळा वेगळा प्रयोग त्यांनी केला. कृषक क्रांतीचा प्रयोग हा आजही उपयोगी असा आहे.

अभ्यासाचे हेतू :

सध्याचे युग हे माहिती तंत्रज्ञानाच्या अश्वावर आरूढ झालेल्या लोकांचे युग आहे.एवढेच नव्हे तर खाजगीकरण,उदारीकरण,आणि जागतिकीकरणाचे वारे येऊन जवळपास दोन दशकाचा काळ लोटून गेला आहे.त्या पार्श्वभूमीवर डॉ.पंजाबराव देशमुख यांच्या विचारसरणीचा चिकित्सकपणे अभ्यास करणे व बदलत्या परिस्थितीत ते विचार कितपत लागू होतात ते पाहणे

डॉ.पंजाबराव देशमुख यांचे आर्थिक विचार यांची आर्थिक विचारसरणी:

शेती हाच खरा ग्रामीण अर्थव्यवस्थेचा कणा :

शेती हाच भारतीय अर्थव्यवस्थेचा कणा आहे याची जाण आणि भान असणाऱ्या डॉ.पंजाबराव देशुमुख यांनी कृषिविषयक अनेक दूरगामी विचार मांडले त्यांचा प्राधान्याने विचार करणे आणि त्याची प्रभावीपणे अंमलबजावणी करणे अपेक्षित आहे. शेतकरी वर्ग असंघटित असल्यामुळे तो सर्वच बाबतीत लुबाडला जातो. संपूर्ण जगाला अन्नधान्याचे बाबतीत स्वयंपूर्ण करण्याची प्रचंड ताकद या बळीराजात असताना स्वतः तो आणि त्याचे कुटुंब अर्धपोटी-अर्धनग्न असावे हे कटुसत्य डॉ. पंजाबरावांनी ओळखून भारतात एकूण लोकसंख्येच्या ७५ टक्के शेती करणाऱ्या भारतीय किसानाकरिता भारत कृषक समाज या राष्ट्रव्यापी संघटनेची स्थापना करून शेतकऱ्यांना एक स्वतंत्र व्यासपीठ निर्माण करून दिले. डॉ. पंजाबरावांनी भारत कृषक समाज ही संपूर्ण शेतकरी समाजाला उपलब्ध करून दिलेली फार मोठी देणगी आहे.

शेती,शेतकरी आणि शेतमजूर हा वर्ग महत्वाचा:

डॉ.पंजाबराव देशुमुख यांना शेती,शेतकरी आणि शेतमजूर यांच्याविषयी खूप कळवळा होता.शेतकरी जागरूक राहिला पाहिजे.म्हणून त्यांनी १९२७ रोजी शेतकरी संघाच्या प्रचारासाठी महाराष्ट्र केसरी नावाचे वृत्तपत्र चालविले.त्यामुळे शेतकरी वर्गात जाणीव जागृती होणे शक्य झाले. आज शेतकरी वर्गासाठी अग्रोवन पासून ते शेतकरी अशी अनेक मासिके कार्यरत आहेत त्याचा पाया खऱ्या अर्थाने महाराष्ट्र केसरीच्या माध्यमातून डॉ.पंजाबराव देशमुख यांनी घातला.आज अजूनही शेकऱ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी शेतीला पूर्णपणे वाहून घेतलेल्या मासिकांची गरज आहे. भारतातील सावकारांचा प्रभाव त्यांच्या लक्षात आला होता त्यामुळेच त्यांनी शेतकऱ्यांची कर्जातून मुक्तता व्हावी या व्यापक उद्देशाने १९३३ मध्ये कर्ज लवाद कायदा करण्यासाठी पुढाकार घेतला.आज कर्ज माफीविषयी शेतकरी सातत्याने आक्रोश करीत आहे.त्याची जाण त्यांना नऊ दशकापुर्वीच झाली होती. शेतीतील नापिकी आणि सावकाराकडून होणारी पिळवणूक आणि त्यातून होणाऱ्या हाल अपेष्टा कमी होण्यासाठी त्यांनी जन आंदोलनाचा मार्ग स्वीकारला.आज जनआंदोलन चिरडून टाकण्याकडे अधिक कल वाढलेला दिसून येतो.

शेतकऱ्यांचा मुलगा शिकला पाहिजे त्याशिवाय खेडी सुधारणार नाहीत:

शिक्षणापासून वंचित राहणारा माणूस काहीच करू शकणार नाही हे त्यांनी ओळखून १९२६ मध्ये होतकरू विद्यार्थ्यांसाठी १९२६ मध्ये आनंद छात्रालय काढले. शेतकऱ्यांच्या अधोगतीचे मूळ असंघटीतपणात आहे हे लक्षात आल्यामुळेच त्यांनी १९२७ मध्ये शेतकरी महासंघाची स्थापना केली. एवढेच नव्हेतर १०३२ मध्ये भारत कुषक समाजाची स्थापना केली. शेतकरी एकसंघ नसेल तर पुढच्या किमान १०० वर्षाचा विचार करून डॉ.पंजाबराव देशमुख यांनी आपले आर्थिक विचार मांडले .भारताचे पहिले कृषिमंत्री म्हणून त्यांनी केलेले कार्य मोठे होते.म्हणूनच तर त्यांना हिंदुस्थानच्या कृषी क्रांतीचे जनक असे म्हणतात.

माझा शेतकरी हा भारताचा राजा झाला पाहिजे:

केंद्रीय कृषिमंत्री असताना डॉ. पंजाबरावांनी भव्य दिव्य अशा जागतिक कृषी प्रदर्शनाचे नवी दिल्ली येथे ११ डिसेंबर १९५९ ते फेब्रुवारी १९६० या दरम्यान आयोजन केले होते. अंदाजे १०० एकर जागेत हे प्रदर्शन आयोजित करण्यात आले होते. हे कृषी प्रदर्शन भारताच्या कृषी क्रांतीच्या इतिहासातील मैलाचा दगड ठरले. देशाच्या कानाकोपऱ्यातून शेतकऱ्यांचे लोढेंच्या लोंढे हे प्रदर्शन पाहण्यास व ज्ञान ग्रहण करण्यास उपस्थित राहू लागले. एक नवा क्रांतीचा विचार घेऊनच शेतकरी परतत होते. पंजाबपासून तर कन्याकुमारीपर्यंत शेतकऱ्यांचे जबरदस्त संघटन उभे झाले. पंजाबचे शेतकरी तर 'हमारा पंजाबराव पंजाबदा' असे संबोधू लागले.डॉ. पंजाबरावांनी या प्रदर्शनाच्या माध्यमातून भारतीय शेतकऱ्याला जागतिक दर्जा मिळवून दिला. जगात मानाचे स्थान प्राप्त करून दिले. माझा शेतकरी हा भारताचा राजा झाला पाहिजे हे भाऊसाहेबांचे स्वप्न होते.त्यांनी त्यांचे कार्य फक्त शेतकरी समाजापुरते मर्यादित ठेवले नाही तर त्यांनी १९५६ मध्ये अखिल भारतीय दलित संघाची स्थापना केली. एवढेच नव्हे तर १८ ऑगस्ट १९२८ मध्ये अमरावती येथे अंबाबाई मंदिर अस्पृश्यासाठी खुले व्हावे म्हणून सत्याग्रह केला. देवस्थानची संपत्ती सरकारने ताब्यात घेऊन विधायक कार्य करावे या उद्देशाने १९३२ मध्ये हिंदू देवस्थान संपत्ती बिल मांडले.शिक्षक हा शिक्षण व्यवस्थेचा खरा आधारस्तंभ आहे हे ओळखून त्यांनी प्राथमिक शिक्षकांच्या समस्या सोडवण्यासाठी प्राथमिक शिक्षक संघाची स्थापना केली.प्राथमिक शिक्षकांच्या समस्या सोडविण्याकरिता 'भारतीय प्राथमिक शिक्षक संघ' स्थापन केला. कृषी विकास,शिक्षण व्यवस्था आणि आणि सामाजिक सुधारणा या त्रिसूत्रीचा अंगीकार केला. शिक्षण व्यवस्थेत वाढलेला बाजार आणि त्यातून शिक्षकांची होणारी ससेहोलपट विचारात घेता डॉ.पंजाबराव देशमुख यांच्यासारखा शिक्षण सुधारक निर्माण होणे काळाची गरज आहे. देश विकासाच्या चळवळीत स्वतःचे आयुष्य स्वतःची विद्वत्ता,प्रतिष्टा वैज्ञानिक दृष्टी ठेवून पणाला लावले. ग्रामीण बहुजनाला आत्मनिर्भर होण्याची प्रेरणा डॉ.पंजाबराव देशमुख यांनी दिली.

डॉ.पंजाबराव देशमुख यांचे जीवन म्हणजे पुढच्या पिढीला आदर्शवत असाच आहे. त्यांच्या अव्याहतपणे कार्यरत असण्याचा स्वभामुळे आणि अति श्रमांमुळे अखेरीस त्यांना पक्षाघाताचा झटका आला आणि दिल्ली येथे त्यांचे हृदयविकाराने निधन झाले. त्यांच्या स्मरणार्थ अकोल्यास पंजाबराव कृषी विद्यापीठ स्थापन करण्यात आले आहे. मात्र खऱ्या अर्थाने डॉ.पंजाबराव देशमुख यांचे विचार पुढे घेऊन जावयाचे असतील तर फक्त विद्यापीठे स्थापून चालणार नाहीत तर अशी विद्यापीठे समाजोपयोगी कशी होतील यावर अधिक भर देण्याची गरज आहे.

'भूतकाळ विसरा, तलवार विसरा, जातिभेद पुरा, सेवाभाव धरा' :

माणसाच्या अधोगतीची जी अनेक कारणे आहेत.त्यामध्ये वाढता कर्जबाजारीपणा, असंघटितपणा आणि अज्ञाना हेच आहे म्हणून शेतकरी वर्गाने एका वेगळ्या भ्रमातून बाहेर पडले पाहिजे त्यासाठी त्यांनी सर्व भारतीय लोकांना एवढेच नव्हे तर तमाम मानव जातीला एक महत्वाचा संदेश दिला.तो म्हणजे 'भूतकाळ

विसरा, तलवार विसरा, जातिभेद पुरा, सेवाभाव धरा' एवढेच नव्हे तर त्यांनी त्यांचा जगण्याचे ब्रीद वाक्य ठरविले.

भूतकाळ विसरा: भारताचा भूतकाळ म्हणजे इंग्रजांनी चालवलेली जुलमी राजवट,त्यातून संपत्तीचे झालेले वहन.त्यातून निर्माण झालेली भारताची बिकट परिस्थिती,सावकार आणि सराफी पेढीवाल्यांच्या कचाट्यात अडकलेली ग्रामीण अर्थव्यवस्था,शेतकरी आणि शेतमजुरांची झालेली वाताहत अशा एक ना अनेक गोष्टी भूतकाळात घडून गेल्या त्यातून आपण बरेच काही शिकलो.वरील सर्व दुष्टचक्रातून बाहेर पडण्यासाठी आपण मोठ्या प्रमाणावर लढा दिला. स्वातंत्र मिळाले हे जरी खरे असले तरी आता भूतकाळ विसरून वर्तमानात जगण्याचे दिवस आलेत आणि भविष्यकाळ उज्वल आहे.हाच धागा डॉ.पंजाबराव देशमुख यांच्या विचारतून पुढे आलेला दिसून येतो.

तलवार विसरा:

जगाचा इतिहास हा युद्धखोरीचा,भांडवलशाहीला खतपाणी घालणारा आहे.एवढेच नव्हे तर त्यातून अनेकवेळा सर्व जगच युद्धाच्या खाईत लोटले गेले त्याच्यातून दोन महायुद्धे झाली.जग विनाशाच्या उंबरठ्यावर येऊन बसले आहे कि काय अशी भीती निर्माण होऊ लागली. भारताचा इतिहास राजे राजवाड्यांचा आहे.एकमेकांवर स्वाऱ्या करणे आणि त्यांचा प्रदेश काबीज करून सत्ता संघर्ष करणे हे नेहमीचेच होऊन बसले होते.यातून साध्या काहीच झाले नाही.याउलट यातून अशांतता निर्माण होण्यापलीकडे काहीच झाले नाही त्यादृष्टीने विचार केला तर तलवार विसरा हा विचार शांतीचा संदेश देणारा असून तो महात्मा गांधीच्या विचारधारेशी मिळता जुळता आहे असे म्हटले तर फारसे वावगे होणार नाही.

जातीभेद पुरा:

जातीपातीच्या भिंती नेहमीच विकासाच्या अडसर ठरल्या.मानवता आणि माणुसकीला काळिमा फासणारी सर्वात वाईट गोष्ट कोणती असेल तर ती म्हणजे जातीपातीचे राजकारण आणि अर्थकारण. डॉ.पंजाबराव देशमुख हे जाती धर्माच्या पलीकडे जाऊन विचार करणारे थोर समाजशास्त्रज्ञ होते.एवढेच नव्हे तर ते काळाच्या पलीकडे जाऊन विचार करणारा आणि दूरदृष्टी असणारा भला माणूस होता. डॉ.पंजाबराव देशमुख यांचे एकूणच जीवनकार्य पाहिले तर एक गोष्ट लक्षात येते कि त्यांनी जातीपातीचे समूळ उच्चाटनासाठी करण्यासाठी आयुष्यभर कार्य केले.

सेवाभाव धरा:

डॉ.पंजाबराव देशमुख यांनी सेवा भाव विकसित करण्यावर अधिक भर दिलेला दिसून येतो. त्यापाठीमागे सहकार चळवळ आणि तिचा व्यापक दृष्टीकोन लपलेला दिसून येतो. अलीकडच्या काळात मोठ्या प्रमाणावर वाढत चाललेली स्पर्धा, भांडवलशाहीने मांडलेला उन्माद,चंगळवादी प्रवृतीने गाठलेला कळस विचारात घेता सेवा भाव या गोष्टीला अन्यन्यसाधारण महत्व आहे. सेवाभाव हाच खरा भाव हि विचारधारा त्यांनी टोकाच्या नफेखोरीला आळा घालण्यास उपयुक्त ठरणारी आहे. विशेषतः अलीकडच्या काळात सहकारी चळवळीला लागलेली घरघर आणि खाजगीकरणाच्या प्रक्रियेने घेतलेली गती विचारात घेता डॉ.पंजाबराव देशमुख यांची सेवा भावाची कल्पना भारताच्या एवढेच नव्हे तर तमाम जागतिक अर्थव्यवस्थेला शाश्वत विकासाकडे घेऊन जाणारी आहे.

निष्कर्ष :

१) शेतात राबणारा शेतकरीच नष्ट झाला तर काय अवस्था होईल असा सवाल त्यांनी हावर्ड गोएल यांच्यासमोर मांडला होता. आज सरकारला सरकारला परखडपणे सवाल विचारणाऱ्या माणसांची गरज आहे.

२) कृषक हेच देशाचे खरेखुरे विकासधारक आहेत असा शेतकऱ्याविषयी कळवला असणारा जनता राजा निर्माण झाला पाहिजे.

३) शेती गहाण टाकून विदेशात शिक्षणासाठी जाणाऱ्या आणि मातृभूमीची ओढ असणाऱ्या भूमिपुत्रांची संख्या घटू लागली आहे.

४) दारिद्र्य आणि शिक्षणाचा वाढत चाललेला बाजार आणि शेतकरी संघटनेचा कमी होत चाललेला दबदबा विचारात घेता परिस्थितीत खूपच बिकट आणि घातक आहे. त्यासाठी शेतकऱ्यांचा दबावगट तयार करण्याची गरज आहे.

५) शिक्षण,शेती याचा सुरेख संगम डॉ.पंजाबराव देशमुख घातला. शेती आणि शिक्षण या दोन घटकांची नाळ अलीकडे तुटत चालली आहे. खेड्यापाड्यातल्या लाखो मुलांना शिक्षणाची दारे उघडून देणारी आणि विद्यार्थी हाच केंद्रबिंदू मानून कार्यरत राहणारी यंत्रणा विकसित करावी लागणार आहे.

६) 'भूतकाळ विसरा, तलवार विसरा, जातिभेद पुरा, सेवाभाव धरा' हे त्यांनी त्यांचं ब्रीदवाक्य ठरविले. भारताला शाश्वत विकास करायचा असेल तर या ब्रीदवाक्याची नव्याने पेरणी करावी लागेल.त्यांचे विचार शांततेचा पुरस्कार करणारे,जातीयवादाच्या विरुद्ध बंद करून उठणारे आणि सेवा भावाचा अंगीकार करणारे आहेत.

७) डॉ.पंजाबराव देशमुख यांनी मांडलेली विचारसरणी हि काळाची गरज होती.

८) डॉ.पंजाबराव देशमुख यांचे विचार २१ व्या शतकातसुद्धा उपयोगी पडणारी आहेत.

९) डॉ.पंजाबराव देशमुख आर्थिक विचारसरणी कृषी क्षेत्राला नवसंजीवनी देणारे आहेत.

डॉ. पंजाबराव देशमुख यांचे कृषी विकासाबाबतचेविचार

राहुल मोरेश्वर लभाने
सहाय्यक प्राध्यापक व अर्थशास्त्र विभाग प्रमुख, डॉ. आंबेडकर कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय, चंद्रपूर
आजीव सभासद क्रमांक 1495, भ्रमणध्वनी 7020207858,
ई मेल 33rahullabhane@gmail.com
डॉ. नितिन बी. कावडकर
सहयोगी प्राध्यापक व अर्थशास्त्र विभाग प्रमुख,
चिंतामणी महाविद्यालय, घुग्घूस
आजीव सभासद क्रमांक 1637, भ्रमणध्वनी 9404118639
ई मेल nbkawdkar13@gmail.com

प्रस्तावना:

डॉ. पंजाबराव ऊर्फ भाऊसाहेब हे भारतातील एक महान व्यिक्तमत्व होय ते स्वतंत्र भारताचे पहिले कृषिमंत्री होते. अमरावती जिल्ह्यातील पापळ या छोट्याशा खेड्यात 27 डिसेंबर 1898 रोजी भाऊसाहेब पंजाबरावांचा जन्म झाला. पापळच्या शामराव बापू देशमुखांच्या कृषिकुळात जन्मलेले भाऊसाहेब खरे भुमिपुत्र! मातीची वेदना त्यांना कळली, मातीतील माणसांची वेदना त्यांना आढळली. ती दुर करण्याच्या दिशेनेच त्यांनी राजकारणात व समाजराकरणात पाऊल टाकले. जिल्हा बोर्डापासुन भारत सरकारच्या कृषिमंत्री पदापर्यंतचे सर्व अधिकार वापरलेत. भारतातील शेती, तिच्यात राबणारे शेतकरी, त्यांची मुलेबाळे इत्यादिकांचे जीवन सुखसमृध्द करण्यासाठी, त्यांच्या अडीअडचणी दुर करण्यासाठी आणि त्यांच्या व्दारा भारताचे जीवन उंचावण्यासाठी अखिल भारतीय पातळीवर त्यांनी शेतक-यांची संघटना उभी केली आहे. या संघटनेची पाळेमुळे भारतातील सर्व राज्यात दुरवर पसरलेली आहेत. त्यांनी उभ्या केलेल्या आणि जोपासलेल्या भारतीय शेतक-यांचे विराटदर्शन त्यांच्या अखिल भारतीय कृषका समाजाव्दारे घडते. त्यावेळी 50 टक्के लोकसंख्या अन्नाअभावी उपाशी राहत होती.एवढ्या जनसंख्येची भुक कशी भागविणार याचा सातत्याने विचार भाऊसाहेब करीत होते. कारण केवळ अन्नधान्य पिकवुन चालणार नाही तर हे अन्नधान्य पिकविणारा शेतकरीसुध्दा जगला पाहिजे. त्यासाठी त्याच्या कृषी मालाला योग्य किंमत मिळाली पाहिजे हा विचार डॉ. पंजाबराव देशमुख यांना सतत भेडसावत होता. म्हणुन त्यांनी अन्नधान्य उत्पादनाबाबत व सुरक्षेबाबत शेतक-यांच्या हिताचे अनेक आर्थिक विचार मंत्री असतांना किंवा ज्या ज्या ठिकाणी संधी मिळेल त्या त्या योग्य मंचावर आपले विचार मांडले व तसे कार्य केले.

भारतीय शेतक-यांच्या समस्या, अनेक सामाजिक, आर्थिक प्रश्न सोडविण्यासाठी त्यांनी अविश्रांत परिश्रम घेतले. त्यांच्या उन्नतीसाठी आजन्म लढा दिला. शेतक-यांच्या घरात जन्मल्यामुळे सतत शेतकरी लोकांचा सहवास त्यांचे दु:ख अत्यंत जवळुन अनुभवले. शेतक-यांविषयी त्यांच्या मनात कळवळा होती. शेती व्यवसायाचा विकास म्हणजेच पर्यायाने देशाचा विकास ही त्यांची विचारसरणी होती. सन 1928 साली शेतक-यांच्या हक्कासाठी व न्याय मागण्यासाठी भाऊसाहेबांनी 'शेतकरी संघ' स्थापन केला. ज्यामुळे संपुर्ण शेतकरी संघटीत झाला. कृषकांच्या विविध समस्या सोडविणे हा यामागचा उद्देश होता. भाऊसाहेब जीवनभर शेतक-यांच्या हितासाठी लढले. शेतक-यांसाठी आधुनिक तंत्रज्ञानाची कास धरली. स्वतंत्र भारताचे पहिले कृषीमंत्री असतांना त्यांनी शेतीच्या आधुनिक जपानी पध्दतीचा प्रचार व प्रसार केला. जपानातुन

भात शेतीचे नवे तंत्र मंत्र आणुन या देशात प्रयोग केले. पंजाबात गव्हाच्या विक्रमी उत्पादनातुन हरितक्रांतीची ध्वजा फडकविली. कास्तकारांना शेतीचे अद्ययावत ज्ञान मिळावे म्हणुन 1960 साली दिल्ली येथे 'जागतिक कृषिप्रदर्शनीचे' भव्य आयोजन केले. 'भारत कृषक समाज', 'भारतीय कृषिशास्त्र संशोधनसंस्था', 'भारतीय कृषक सहकारी अधिकोष' हे त्या कृषिरत्नाच्या कतृत्वाचेच दैदिप्यमान पैलु आहेत. ज्योतीराव फुल्यानंतर डोळसपणे बळीराजाच्या जीवनात 'कृषि क्रांती' घडविणारा म्हणजे भाऊ साहेबच.

डॉ. पंजाबरावांचे शेतक-यांविषयी आर्थिक विचार

डॉ. पंजाबराव देशमुख हे स्वतः हाडाचे शेतकरी आहेत. भारतीय शेतक-यांच्याजीवनातील दु:ख-दारिद्रयत्यांनी भोगलेले आहेत. भोवतालच्या शेतक-यांचे दैन्य, अज्ञान, उपासमार, कष्ट, अवहेलना, पिळवणुक त्यांनी पाहिली आहे. अशा या विशाल कृषक समाजाची वैचारिक पातळी बदलवणे आवश्यक आहे असे त्यांना वाटत होते. या भुमीपुत्राच्या समाजातील आर्थिक मागासलेपणाचे किंवा दु:खाचे प्रमुख कारण शेतीसुधारणांकडे होणारे दुर्लक्ष होय असे त्यांना वाटत होते. त्यांच्या मते आर्थिक स्थितीच्या -हासाला कारणीभुत कारण म्हणजे कृषीप्रधान देशात कृषकांची चाललेली ही अक्षम्भ्य उपेक्षा हीच आहे. शेतक-यांचे दु:ख दारिद्रय नाहिसे होण्यासाठी प्रथम तो शिक्षित झाला पाहिजे, स्वत:चे आणि भोवतालच्या विश्वाचे त्याला ज्ञान झाले पाहिजे, स्वत:च्या परिस्थितीची आणि सामर्थ्याची त्याला जाणीव झाली पाहिजे, त्याचा आत्मा जागृत झाला पाहिजे, हे त्यांनी ओळखले. यासाठी शेतक-यांनी शिक्षण घेतले पाहिजे, तिकडे त्यांची प्रवृत्ती नसेल तर ती निर्माण केली पाहिजे, सोयी नसतील तर त्या करुन दिल्या पाहिजेत हेही त्यांच्या लक्षात आले आणि याच दृष्टीने त्यांनी आरंभीची पावले टाकली. यासाठी त्यांनी शिक्षण सक्तीचे करणे, शिक्षणाच्या सोयी उपलब्ध करुन देता याव्या म्हणुन शिक्षण कर वाढविला. त्यापूर्वी खेड्यापाड्यातुन दौरे काढुनशेतक-यांना शिक्षणाचे महत्व पटवून दिले, त्यांची मने वळविली, शेतक-यांची संघटना करण्यासाठी 'शेतकरी संघ' स्थापन केला आणि त्याला पोषक अशा अनेक चळवळी उभ्या केल्या.

डॉ. पंजाबरावांनी 3 सप्टेंबर 1949 ला घटना समितीत भाषण करतांना सांगितले की, सरकारच शेतक-यांची अक्षम्भ्य उपेक्षा करीत आहे असा आरोप करतांना ते म्हणतात की,"केवळ संख्याबळामुळे नव्हे तर श्रेष्ठतम कार्यामुळे या भारतवर्षात कृषकांना पुर्वापार प्राधान्य मिळत आले आहे. त्यामुळेच भारत कृषकांचा देश म्हणुन सर्वत्र प्रसिध्द आहे व असा नित्य उद्घोषही केला जातो. हे कृषकच भारतवर्षाचे खरेखुरे औरस स्वामी आहेत. परंतु तरीसुध्दा त्यांच्या कल्याणाची कोणालाच आस्था नाही" कामगारवर्ग व शेतकरीवर्ग यांच्या परिस्थीतीचे तुलनात्मक दर्शन घडवुन डॉ. पंजाबराव म्हणतात, "ज्या प्रचंड मानवसमुहाच्या कृषकांच्या निढळाच्या घामावर आपण जगतो, उन्नती साधतो, त्यांच्या करिता अजुनसुध्दा एकही कल्याण अधिकारी नेमला नाही ही केवढी आश्चर्याची गोष्ट आहे? संख्येच्या मानाने कामगारांपेक्षा कृषकांचा समाज किती तरी मोठा असतांना ज्या सोयी व सवलती स्वतंत्र मंत्रालय व कल्याण अधिकारी नियुक्त केल्यामुळे कामगार वर्गाला लाभल्या आहेत त्यापैकी एकही कृषकांच्या वाट्याला आली नाही. याबद्दल डॉ. पंजाबरावांनी खेद व्यक्त केला व शेतक-यांच्या हिताकडे सभागृहाने अगत्यपूर्वक कर्तव्यभावनेने लक्ष द्यावे असे कळकळीचे आवाहन केले.

भारतीय कृषीविषयक प्रश्नांचा सखोल व सशास्त्र अभ्यास करुन ते प्रश्न चांगल्या त-हेने कसे हाताळता येतील;भारतीय कृषकांच्या हितावर सदोदित दृष्टी ठेवून कोणकोणत्या नविन योजना आखता येतील; कृषी विषयक संशोधन कार्य कोठे कोठे चालु आहे, कषीविषयक प्रश्नांचा सुक्ष्म अभ्यास केलेले तज्ज्ञ

कोठे कोठे आहेत या संबंधी भाऊसाहेबांनी प्रथम जागरुकतेने विचार केला आणि नंतर त्या दृष्टीने अनेक अनेक उपक्रम हाती घ्यावयास सुरुवात केली.

अन्नधान्याबाबत डॉ. पंजाबराव देशमुख यांचे विचारः

भारताला अन्नदृष्ट्या स्वयंपुर्ण बनवावयाचे महत्वाचे कार्य कृषी मंत्रालयाला करावयाचे होते. म्हणुन डॉ. पंजाबरावांनी आपले लक्ष्य प्रथमतः प्रमुख पिकांवर केंद्रित केले. भारतातील बहुसंख्य जनतेचे तांदुळ प्रमुख खाद्यान्न असल्यामुळे त्याचे उत्पादन वाढविण्यासंबंधी स्वतः अभ्यास केला. त्याचप्रमाणे चर्चासत्रे व संमेलने याव्दारा देशातील तज्ज्ञांना एकत्रितपणे विचार विनिमय करण्याची संधी अनेक वेळा प्राप्त करुन दिली. या पिकासंबंधी संशोधन करीत असलेल्या संशोधन केंद्रांशी सतत संपर्क साधुन त्यांचाही शक्य तेथे उपयोग करुन घेतला. त्यांनी तत्कालीन भारतीय शेतीचा आढावा घेतला आणि देशातील लोकांची अन्नधान्याची गरज पुर्ण करु शकेल अशा जपानी पध्दतीने लागवड करुन अधिक उत्पादन देणा-या भात शेतीचा यशस्वी प्रयोग भारतात केला. त्यामुळे आज अन्नधान्याच्या बाबतीत भारत स्वयंपूर्ण होऊन निर्यात करु शकतो. यांचे श्रेय डॉ. पंजाबराव देशमुखांच्या कृविषयक धोरणांस द्यावे लागेल. देशातील जनतेला पुरेसे अन्नधान्य पुरविणे, उद्योगांना पुरेसा कच्चा माल पुरविणे ही शेती व्यवसायाची प्रथम जबाबदारी होय. त्याशिवाय भारतीय अर्थव्यवस्थेचा विकास घडवुन येणे शक्य नाही, असे डॉ. पंजाबराव देशमुखांना वाटत होते. म्हणुन त्यांनी अन्नधान्याच्या संदर्भात भारताला स्वयंपूर्ण करण्याच्या दृष्टीकोनातुन पाऊल उचलले. त्यासाठी त्यांनी धरणे, कालवे, तळे बांधणे, उत्तम प्रतीची बी-बीयाणे, अद्ययावत तंत्रज्ञान इत्यादींचा वापर करुन सृधारित शेती करण्याचा विचार शेतक-यांमध्ये रुजविण्याचा प्रामाणिक व अथक प्रयत्न केला म्हणुनच भारत अन्नधानाच्या बाबतीत स्वयंपूर्ण झालेला आहे.

कृषी उत्पादन व कृषी उद्योग :

भारतातील दर दहा लोकांमधील सात लोक आपल्या उपजिविकेसाठी पुर्णपणे शेतीवरच अवलंबुन आहे. आपल्या राष्ट्रीय उत्पन्नाचा अंदाजे अर्धा हिस्सा हा कृषी व कृषीशी संबंधीत व्यवसायातुनच मिळतो. एवढे असुनही कृषी हा व्यवसाय अत्यंत असंघटित आहे. तसेच हा व्यवसाय शेतक-यांच्या श्रमावर अवलंबुन असुनही निसर्गाच्या लहरीवर लादलेला आहे. ह्याच महत्वाच्या घटकांनी भारतीय शेती आर्थिक दृष्ट्या परवडणारी न बनता केवळ एक जीवनक्रम बनला आणि आमचा शेतकरी पिढ्यानपिढ्या कर्जात जन्मतो, कर्जातच वाढतो आणि कर्ज मागे ठेवुनच ह्या जगाचा निरोप घेतो.घ्या आणि इतर अशाच परिस्थितीचा भारतीय कृषी अर्थव्यवस्थेवर अनिष्ट परिणाम होवुन एकंदरीत देशाच्या आर्थिक रचनेवर वाईट घाला घालल्या जातो. असे विचार प्रतिपादन करुन पुढे डॉ. पंजाबराव देशमुख म्हणतात की, देशाचा सर्वांगिण विकास घडवुन आणयचा असेल तर शेती व्यवसायाकडे त्रयस्थतेने बघु शकत नाही. करिता आज आमचे प्रथम कर्तव्य आहे की, आम्ही आमच्या शेती व्यवसायाला तोट्याचा उद्योग न ठेवता एक फायद्याचा उद्योग बनविण्यासाठी काय करता येईल, ह्याचा साकल्याने एकत्र बसुन विचार करुन उपाय शोधायला हवा.

डॉ. देशमुख कृषी उत्पादनाच्या बाबतीत विचार मांडताना सांगतात की, कृषी उत्पादनाच्या किंमतीत घसरण झाली आणि उत्पादन मुल्य मात्र वाढले. परंतु अकृषी वस्तुंच्या किंमतीत ही घट दिसुन आलीनाही. परिणामी शेतक-यांची स्थिती बिघडली. शेतक-यांचे आर्थिक उत्पन्न ब-याच प्रमाणात घटुन त्याला बाजारातील इतर वस्तुंसाठी बराच पैसा मोजावा लागतो. ही गंभीर समस्या असुन, ही समस्या सोडविण्यासाठी त्वरीत प्रयत्न केला नाही तर शेतक-यांचे उत्पादन वाढविण्याचे लक्ष पुर्ण करु शकणार नाही आणि आमच्या वाढत्या गरजा पुर्ण करु शकणार नाही. मुल्य घसरणीच्या अनिष्ट परिणांमापासुन शेतकरी बाधवांना वाचविण्यासाठी आम्हाला सर्वतोपरी शक्य त्या प्रयत्नांची पराकाष्ठा करुन एका विशिष्ट पातळीवर

मुल्यस्थिरता आणावी लागेल; जेणेकरुन ते मुल्य ग्राहकाला परवडेल.तसेचशेतक-यालाही किफायतशिरराहील. शेतक-यांच्या सक्रिय सहकार्याचीअत्यंतआवश्यकताअसुनमुल्यपातळी स्थिरतेसाठीशेतकरी आणि सहकार त्यांच्यात सुसंवाद आवश्यक आहे.शेतक-याला त्याच्या उत्पादनाचे योग्य मुल्य मिळविण्यासाठी कृषी उत्पादनाचीसहकारी बाजारपेठ अत्यंत आवश्यक आहे. उत्पादन मुल्य कमी करुन शेतक-यांचे उत्पन्न वाढविण्यासाठी एक मार्ग म्हणुन लहान लहान शेतांना एकत्र करुन संयुक्तरित्या शेतीची लागवड करावी. दर एकरी उत्पन्न वाढविण्यासाठी तसेच प्रत्येकाचे उत्पन्न वाढविण्यासाठी शेतीचा आकार मोठ्यात मोठा असणे आणि तो कसा ठेवता येईल. ह्यावर मार्ग शोधावाच लागेल. ह्याच दिशेने सहकारी शेती हाच योग्य मार्ग असुन ह्यातुन दर एकरी उत्पन्न वाढेल तसेच उत्पादन मुल्य कमी होवुन उत्पन्नात वाढ होईल. तसेच सुधारित खतांचा वापर करुन तसेच नवीन नवीन पध्दतींचा वापर करुन उत्पादन बरेच वाढविता येईल. भातशेतीमध्ये काही नवीन बदल केल्यामुळे उत्पादनात महत्वपूर्ण बदल घडुन आणता येईल.

भारतीय शेती बारामाही नसुन विशिष्ट काळासाठीच असुन वर्षातील बराच कालावधी शेतकरी रिकामाच असतो. ह्या रिकामेपणाचा योग्य उपयोग करुन उत्पन्न कसे वाढवता येईल. ही एक समस्याच आहे. ही समस्या शेतमालावर आधारित उद्योग शेती शेजारीच सुरु केल्यास ब-याच प्रमाणात सोडवता येईल. शेती आधारित उद्योगाचा फायदा शेतक-यांना त्यांचे उत्पन्न वाढविण्यात निश्चितच होईल. हे तत्व एकदा मान्य केल्यास ह्याची सविस्तर मांडणी आखणी सरकार किंवा ह्या व्यवसायाशी संबंधीत इतर साधनांकडुन सहज करुन घेता येईल.

शेतक-यांच्या हिताचे कर्ज लवाद बिल:

भारतातील अर्ध्यापेक्षा जास्त शेतकरी कर्जबाजारी होता. त्यांच्या जमिनी सावकारांकडे गहाण होत्या व काही जमिनी सावकारांनी पचवल्यासुध्दा होत्या. अशा स्थितीत संसदेमध्ये कर्जलवादबील मांडुन शेतक-यांना कर्जमुक्त करण्याचा विचार सर्वप्रथम डॉ. पंजाबराव देशमुख यांनी मांडला. कर्ज लवाद बील शेतक-यांना कर्जातुन मुक्त करण्यासाठी मांडले होते. कारण त्यांना माहित होते की, शेतकरी बुडाला तर देश बुडेल असा ठाम विश्वास भाऊसाहेबांचा होता. देशातील शेतकरी कर्ज बाजारी झाला आहे. त्याला यातुन मुक्तता कशी करुन देता येईल. यासाठी म्हणुन भाऊसाहेबांनी कर्ज लवाद बील आणले. शेतक-यांच्या समस्या आणि तक्रारी निवारण्यासाठी कर्ज लवाद मंडळाची निर्मिती करण्याबाबतचे विधेयक मांडले. या बिलाच्या संदर्भात मार्मिक विवेचन करीत असतांना त्यांनी शेतकरी वर्ग ऋणग्रस्ततेमुळे कसा विवंचनेत आहे आणि त्यामुळे त्याचे संभाव्य काय परिणाम होतील या संदर्भात त्यांनी सदर बील मांडले होते. त्यांनी खात्री करुन दिलि होती की,'शेतात राबणारा या देशाचा पोशिंदा कृषक वर्गच नष्ट झाला तर ह्या देशाची काय भयानक अवस्था होईल'. असा प्रश्न त्यांनी सभागृहासमोर उपस्थित केला होता. म्हणून शेतक-यांचे आर्थिक परिस्थितीमध्ये सुधारणा घडवून आणण्यासाठी आपले वैचारिक मत प्रखरपणे मांडणारे डॉ. पंजाबराव देशमुख हे भारताचे पहिले प्रतिनिधी होत. कर्ज लवाद बील म्हणजे कृषक वर्गाच्या भविष्यकालीन संकटावरील तो एक उपाय होता. शेतक-यांना कर्ज देणे त्यातुन त्यांची उत्पादकता वाढविणे व त्या वाढीतून कर्जफेड करुन आपली आर्थिक परिस्थिती विकसीत करणे, हा विकासाचा साधा मार्ग डॉ. पंजाबदाव देशमुख यांचा कर्ज लवाद बिल मांडण्याचा विचार होता परंतु पुढे राज्यकर्त्यांमध्ये या कृषक वर्गाचे पोटतिडकीने व प्रामाणिकपणे काम करण्याचा अभाव दिसुन आला. त्याचा परिणाम म्हणुन शेतकरी आज विपन्नावस्थेत सापडलेला आहे.

इतर पिकांच्या उत्पादन वृध्दीसंबंधीचे प्रयत्न :

डॉ. पंजाबरावांनी तांदुळाच्या उत्पादनवृध्दीकरिता जितक्या तत्परतेने प्रयत्न केले, तितक्याच तत्परतेने त्यांनी गहु, ज्वारी, कापुस, ज्युट, काजु, भुईमूग इ. पिकांचेही उत्पादन कसे वाढेल याकडे लक्ष दिले. या प्रत्येक पिकासंबंधी सर्वांगौण, प्रगतिकारक व परिणामकारक विचार, संशोधन, प्रयोग व प्रचार करण्याकरिता त्यांनी तज्ज्ञांच्या समित्या नेमल्या. त्यांनी चर्चा व अधिवेशन यांचे आयोजन केले. पिकांचे उत्पादन करणारे शेतकरी व त्या विषयातील तज्ज्ञ यांना एकत्र आणून त्यांना विचार व अनुभव यांचा विनिमय करण्याची संधी प्राप्त करुन देण्याकरिता प्रत्येक पिकाकरिता एक राष्ट्रीय संशोधन संस्था निर्माण करुन या संस्थातील संशोधने प्रत्यक्ष शेतावर, राबणा-या शेतक-यांपर्यंत जाऊन पोहचतील अशी यंत्रणा डॉ. पंजाबरावांनी उभारली.

समारोप:

डॉ. पंजाबराव देशमुख हे विदर्भातील बहुजन समाजाचे एक प्रमुख नेते होते. त्यांनी बहुजन समाजाच्या व शेतकरीवर्गाच्या उन्नतीसाठी अतिशय महत्वपूर्ण असे कार्य केले. बहुजन समाजाला जागृत करण्यासाठी त्यांनी आयुष्यभर खटपट केली. शेतक-यांच्या समस्यांचा विचार करण्यासाठी आणि त्यांना निरनिराळ्या बाबतीत योग्य मार्गदर्शन करण्यासाठी त्यांनी भारत कृषक समाजाची स्थापना केली. त्याच्या विद्यमाने राष्ट्रीय कृषी सहकारी खरेदी-विक्री संघाची स्थापना झाली. याशिवाय भारत कृषक समाजाने आणखीही काही संस्था स्थापन करुन येथील शेती व्यवसायाला आधुनिक स्वरुप प्राप्त करुन देण्याचे व शेतक-यांच्या अडीअडचणींचे निवारण करण्याचे महत्वपूर्ण कार्य केले. महाराष्ट्रातील एकुण सहकारी चळवळीच्या विकासातील व त्यातही शेतीक्षेत्रातील सहकारी चळवळीच्या विकासातील पंजाबरावांचे योगदान अतिशय मोलाचे आहे. 1960 मध्ये दिल्ली येथे जागतिक कृषी प्रदर्शन भरविले. विविध देशांतील यंत्रसामग्री या प्रदर्शनात आणण्यात आली. जी भारतीय शेतक-यांनी कधी बघितलीसुध्दा नव्हती. अमेरिकेचे अध्यक्ष, रशियाच्या अध्यक्षांनी दिलेली भेट या प्रदर्शनाचे महत्त्व प्रतिपादित करते. कृषी अवजारे वाटप योजना, शेतकरी कर्जमुक्ती, शेतक-यांच्या मुलांना मोफत शिक्षण, शेतमालाला योग्य भाव अशा कितीतरी योजना भाऊसाहेबांनी शेतक-यांसाठी त्या काळात राबविल्या.

डॉ. पंजाबराव देशमुख म्हणजे एक विचार आहे. भाऊसाहेबांनी आपल्या तारुण्याच्या काळात 'कर्जलवाद विधेयक' व 'देवस्थान संपत्ती विधेयक'कौन्सीलसमोर मांडले. कर्ज- लवाद विधेयकामुळे शेतक-यांच्या कर्जमुक्तीचा मार्ग खुला झाला व कर्जात बुडालेल्या शेतक-यांना जीवनदान मिळाले. देवस्थान संपत्ती विधेयकानुसार देवस्थानाच्या प्रचंड संपत्तीचा उपयोग शिक्षणासाठी व्हावा, असा हेतु होता. परंतु दुर्दैवाने हे विधेयक पारित होऊ शकले नाही. भारताचे कृषीमंत्री असतांना अधिक धान्य पिकविण्याच्या उद्देशाने जपानी भातशेतीचा त्यांनी केलेला प्रयोग व त्यासाठी केलेले देशव्यापी आंदोलन यांचा कुणालाही विसर पडणे शक्य नाही. त्यांच्या प्रयोगाचे पडसाद रोम येथे भरलेल्या 'आंतरराष्ट्रीय अन्न व कृषी परिषदेत' उमटून सर्व जगाचे लक्ष तिकडे वेधले गेले. दिल्ली येथे भरलेल्या 'जागतिक कृषी प्रदर्शनी ने नेत्रदीपक यश मिळविले त्यामुळे तर डॉ. पंजाबरावांना जागतिक महत्व प्राप्त होऊन भारतात त्यांचे नाव सर्वतोमुखी झाले. 'कृषी सहाय्यक संघटना', 'अखिल भारतीय मधमाशी पालक संघटना', 'अखिल भारतीय ताडगुळ महासंघ' या भारतव्यापी संघटनाप्रमाणेच 'कृषी उत्पादकांच्या आंतरराष्ट्रीय संघटनांचा संघ' ही त्यांनी निर्माण केला. डॉ. पंजाबराव देशमुख यांनी उभ्या केलेल्या या बहुविध संघटनांकडे नुसता दृष्टीक्षेप केला तरी मनुष्य आश्चर्य मुग्ध झाल्याशिवाय राहत नाही. ही सर्व कामे करण्यासाठी आणि ती व्यवस्थित व पध्दतशीर करण्यासाठी त्यांना कितीतरी कष्ट उपसावे लागत असतील, किती व्यवथाने सांभाळावी लागत असतील याची कल्पनाच

करणे बरे. शेतकीविषयक आणि शिक्षण विषयक कार्य करित असतांनासुध्दा राष्ट्रीय कार्याकडे डॉ. पंजाबराव यांचे पुर्ण लक्ष होते.

संदर्भसूची :

1) सुदाम सावरकर व रा. ब. सुर्यकर (2016), 'भाऊसाहेब डॉ. पंजाबराव देशमुख जीवन व कार्य', श्री. शं. रा. लोंढे, एम. ए. साहित्यरत्न सचिव, श्री. शिवाजी शिक्षण संस्था अमरावती, पृ. 9 ते 17, 45, 77
2) प्रा. ज्ञानेश्वर मेघे व प्रा. कुलभूषण मेघे (2004), 'पुत्र, सर्वश्रेष्ठ धन निर्मात्याचा डॉ. पंजाबराव देशमुख', स्वयंम प्रकाशन, नागपुर
3) स्मरणिका, शिक्षण महर्षि डॉ. पंजाबराव देशमुख जन्मशताब्दी महोत्सव 1997 ते 98, पृ. 18 ते 20
4) लोकमर्षी भाऊसाहेब डॉ. पंजाबराव देशमुख गौरव ग्रंथ (1999), महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ, मुंबई
5) अर्थसंवाद, जानेवारी-मार्च 2013, खंड 36, अंक 4, पृ. 339 ते 341
6) महाराष्ट्रातील समाजसुधारक, साहित्यिक, भारतीय विचारवंत व अन्य महनीय व्यक्ती, के. सागर पब्लिकेशन्स, पुणे
7) प्रा. डॉ. रविंद्र ढाले, 'डॉ. पंजाबराव देशमुख यांचे कृषी विषयक आर्थिक विचार', नभ प्रकाशन, अमरावती.

अन्नधान्य उत्पादनात वाढ करून शेती - शेतकरी व राष्ट्र समृद्धीसाठी डॉ. पंजाबराव देशमुख यांचे कार्य व विचार

डॉ. राहुल. शं. म्होपरे

प्रमुख संपादक, अर्थसंवाद, अध्यक्ष - शिवाजी युनिव्हर्सिटी इकॉनॉमिक्स असोसिएशन, कोल्हापूर तथा सहयोगी प्राध्यापक, अर्थशास्त्र विभाग, (पदवी व पदव्युत्तर), देवचंद कॉलेज, अर्जुननगर (व्हाया निपाणी),ता. कागल, जि.कोल्हापूर

मो.9923879020,ई-मेल - rahulmhopare@rediffmail.com, आजीव सदस्य क्रमांक – 1194.

गोषवारा:

सदर शोधनिबंध हा दुय्यम साधनसामग्रीवर आधारित असून यामध्ये डॉ पंजाबराव देशमुखांच्या शेती, शेतकरी, व राष्ट्र विकासाबाबतच्या कार्याचा व विचारांचा प्राथमिक अभ्यास करण्यात आलेला आहे.

डॉ. पंजाबराव देशमुखांचे कृषिविषयक कार्य व विचार हे उल्लेखनीय आहेत. त्यांचे संपूर्ण जीवन म्हणजे भारतातील कृषक क्रांतीच्या कार्यक्रमांची अंमलबजावणी होय. कृषकांचे अज्ञान व दारिद्र्य दूर करणे, भारताचा सर्वंकष विकास करणे हेच त्यांचे ध्येय होते. ते स्वतः शेतकरी कुटुंबात जन्मले व वाढल्याने त्यांना शेतकऱ्यांचे अज्ञान, दारिद्र्य, उपासमार, शिक्षणाची अनास्था व हालाखीच्या स्थितीचा जवळून अनुभव आला होता. शैक्षणिक संस्था उभारून शेतकऱ्यांच्या मुलांना शिक्षण देण्यास त्यांनी भर दिला. भारतीय शेती - शेतकरी यांच्या विकासातून उद्योग-व्यापार-सेवा क्षेत्राचाही विकास होईल, अशी डॉ. देशमुखांची विचारधारा होती. डॉ. देशमुखांनी शेतकऱ्याच्या व देशसमृद्धीसाठी तीन तत्त्वांचा विचार व अवलंब केला. 1) शिक्षण प्रसार (2) कृषी विकास 3) सहकारी चळवळीचा प्रचार-प्रसार. यातूनच प्रगती, विकास व समृद्धी अवलंबून आहे, असा त्यांचा ठाम विश्वास होता. 'भारत कृषक समाज' हे त्यांच्या जीवनातील महत्त्वाचे शिखर होते. असंघटित शेतकऱ्यांना, संघटित करून 1955 मध्ये 'भारत कृषक समाजाची' स्थापना केली.

राष्ट्रीय, आंतरराष्ट्रीय स्तरावर अनेक संस्था स्थापन केल्या. डॉ. देशमुखांनी आपल्या अधिकाराचा वापर शेतकरी-शेती व देश समृद्धीसाठी केला. राष्ट्रपिता महात्मा गांधी डॉ. देशमुखांबद्दल उद्गारताना म्हणाले होते की, ''शेतकऱ्यांची सेवा करणे सोपे आहे; पण त्याकरिता सोपे कायदे, साधे शिष्टाचार, सरळ माणसे हवी आहेत. हे तीनही गुण एकवटलेला डॉ. पंजाबराव देशमुख हा कदाचित भारतात या युगातला एकमेव माणूस असावा.''

थोडक्यात, अन्नधान्य उत्पादन वाढ, शेती - शेतकरी व देश समृद्धीसाठी डॉ. पंजाबरावांचे कार्य व विचार हा सखोल चिंतनाचा विषय आहे. शासनाने त्यांच्या विचारांची अंमलबजावणी शेतकऱ्यांचे जीवन व देश समृद्ध करण्यासाठी करावी. यातूनच खरा कृषी विकास साधला जाईल.

(टीप : सदर शोधनिबंध तयार करण्यासाठी श्री गणेश टेकले, संशोधक विद्यार्थी, अर्थशास्त्र विभाग, शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर याची मौलिक मदत झाली आहे. याबद्दल लेखक त्यांचा ऋणी आहे.)

प्रास्ताविक

अर्थशास्त्राचा इतिहास पाहाता, वैदिक काळापासून कृषिप्रधान व्यवस्थेचा प्रारंभ झाला आहे. भारतीय अर्थव्यवस्था व तीचे संपूर्ण व्यवहार हे आर्थिक प्रश्नांशी आणि सामान्यपणे भारतातील व्यवस्थेशी जवळच्या संबंधांचे आहेत. प्रस्तुत विचारांना ग्राह्य धरून देशाच्या समृद्धीसाठी व शेतकऱ्यांच्या कल्याणासाठी कृषी अर्थशास्त्राचे विचारवंत म्हणून डॉ. पंजाबराव देशमुख यांना महत्त्वाचे स्थान आहे. त्यांचे कार्य व विचार आजच्या स्थितीतही भारतीय शेती व शेतकऱ्यांच्या आर्थिक कल्याणाकरिता महत्त्वाचे आहे. निसर्गवादाचे प्रणेते डॉ. क्वेत्स्ने यांच्या 1756 मध्ये प्रसिद्ध झालेल्या शेतीविषयक लेखाबरोबर निसर्गवादाची सुरुवात झाली. निसर्गवाद्यांप्रमाणेच डॉ. देशमुखांचा शेतीविषयक कृतिशील विचारांवर विश्वास होता. औद्योगिक अर्थव्यवस्था असणाऱ्या युरोपीय देशांमध्ये अडम स्मिथ, रिकार्डो, कार्ल मार्क्स व केन्स यांसारख्या अर्थशास्त्रज्ञांनी आपले आर्थिक विचार त्यांच्या देशांच्या भौगोलिक परिस्थितीच्या अनुषंगाने मांडले व त्याठिकाणी आर्थिक विकास घडवून आणला. भारतासारख्या कृषिप्रधान देशास समृद्ध करावयाचे असल्यास, इथल्या भौगोलिक परिस्थितीनुसार नवप्रवर्तनाची गरज आहे, असे डॉ. देशमुखांना वाटत होते. भारतीय कृषक क्रांतीच्या साहाय्याने डॉ. देशमुखांनी आर्थिक विचार व प्रत्यक्षकृती यांतून भारतीय दारिद्र्य दूर करण्यासाठी प्रयत्न केले. डॉ. देशमुख हे भारतीय शेती व शेतकऱ्यांच्या कल्याणकारी अर्थशास्त्रीय योजनांचे मॉडेल प्रत्यक्ष कृतीत आणणारे विचारवंत होते. कृषी अर्थशास्त्रातील विविध विचार व त्याचे उपयोजन डॉ. देशमुखांनी कशापद्धतीने अंमलात आणले व याचा सर्वसामान्य अर्थशास्त्राला आणि कृषीचा अभ्यास करणाऱ्या विद्यार्थ्याला कसा फायदा होईल, याचे प्रयोजन प्रस्तुत लेखामध्ये करण्याचा प्रयत्न लेखकाने केला आहे.

कृषीकार्याचा आरंभ :

इ.स. 1926 साली डॉ. देशमुख इंग्लंडवरून जेव्हा भारतात आले, तेव्हा शेतकऱ्यांच्या सामाजिक-आर्थिक स्थितीत काहीच बदल झालेला नव्हता. अशिक्षितपणा, दारिद्र्य व अंधश्रद्धा जसे सहा वर्षांपूर्वी होते, ते तसेच होते. मानवी जीवनात कृषी हीच आद्य व सर्वात श्रेष्ठ संस्कृती असल्याचे डॉ. देशमुख म्हणत. डॉ. देशमुखांचे जुने कार्यकर्ते रेवशाचे काशीराम बापू वाकोडे यांच्याकडे भाऊसाहेबांचा (डॉ. देशमुख) हातचा कागद (1925) मिळाला, त्याचे शीर्षक 'फार्मर्स फोर्टीन पॉईंटस' असे होते. यातील मुद्दे पुढीलप्रमाणे होते. 1) शेतकरी-शेतमजुरांच्या मुलांना मोफत शिक्षण. (2) शेतकऱ्यांच्या मुलांसाठी नोकऱ्यांत 80% जागा राखीव. (3) शेतकऱ्यांवरील कर्जमाफी. 4) उत्पन्नाची अट न ठेवता प्रौढ व्यक्तीला मतदानाचा मूलभूत अधिकार बहाल करणे. 5) अखिल भारतीय शेतकरी अधिकोष स्थापन करणे. 6) देवस्थानच्या संपत्तीचा शिक्षण व आरोग्यासाठी उपयोग करणे. (7) सर्वांना लष्करी शिक्षण सक्तीचे करणे. 8) सरकारी अधिकारी, वकील वगैरेंच्या संपत्तीची मोजदाद करणे. 9) जमिनीची आणि शहरी संपत्तीची न्यायपूर्ण वाटणी करणे. 10) जातीप्रथा, अस्पृश्यता निर्मूलनासाठी कार्य करणे.

11) बालपिढी आणि युवापिढीच्या शैक्षणिक प्रगतीसाठी वसतिगृहांची राष्ट्रीय स्तरावर सोय करणे. 12) शेतकऱ्यांच्या उत्पादनाला नफाप्रद भाव देणे.

13) प्रक्रिया उद्योगात शेतकरी समाजाला यशस्वी करण्यासाठी त्यांना प्रशिक्षण देणे, संशोधनात सहभागी करणे. 14) सहकारी क्षेत्राला भारतीय अर्थव्यवस्थेतील सर्व प्रमुख क्षेत्र म्हणून ग्रामीण भारताचे पुनर्निर्माण घडविणे. या सुरुवातीच्या चौदा कलमी विचारांतूनच डॉ. देशमुखांचा शेतकऱ्यांच्या उन्नतीचा व विकासाचा कल स्पष्ट होतो.

शेतकरी संघटना :

'शेतकऱ्यांच्या उद्धारासाठी शेतकऱ्यांनीच एकत्र यायला पाहिजे' या विचाराने 1927 मध्ये शेतकरी संघटनेची स्थापना झाली. शेतकरी संघटनेत सर्व धर्माच्या, जातीच्या लोकांना सामाविष्ट करून घेण्याची खबरदारी डॉ. देशमुखांनी घेतली. विलायतमधील राजपुत्रासमोर 'शेतकऱ्यांची कैफियत' मांडणाऱ्या जोतिबांचा वारसा डॉ. देशमुख चालवत आहेत, असे लोकांना वाटत होते. शेतकऱ्यांच्या मुलांनी अधिकृतपणे स्थापन केलेली ही पहिलीच शेतकरी संघटना होती. 1930 साली महात्मा गांधींनी सविनय कायदेभंगाचे आंदोलन सुरू केले, तेव्हा शेतकऱ्यांनी या राष्ट्रव्यापी आंदोलनात यावे यासाठी डॉ. देशमुखांनी शेतकरी संघाच्या घटनेत एक तरतूद केली, ''शेतकरी संघाच्या सदस्याला आपले सदस्यत्व न सोडताही राजकीय संस्थांपैकी फक्त काँग्रेसच्या कार्यक्रमात भाग घेता येईल,'' नियतकालिक म्हणजे लोकशिक्षणाचे व विचारविनिमयाचे प्रभावी साधन आहे, अशी असणारी जाणीवच शेतकऱ्यांचे अज्ञान दूर करण्यासाठी कार्य करते. ज्या दिवशी शेतकरी संघाची स्थापना झाली त्याचवेळी महाराष्ट्र केसरी, या वृत्तपत्राचीही घोषणा केली.

घटनासमिती सदस्य व शेतकरी हितसंबंधरक्षण:

घटनासमितीची पहिली बैठक 9 डिसेंबर, 1946 रोजी झाली. यासाठी 207 सदस्य उपस्थित होते. ही बैठक डॉ. सचिदानंद सिन्हा यांच्या अध्यक्षतेखाली पार पडली. दि. 9 डिसेंबर 1946 ते 24 जानेवारी 1950 पर्यंत घटनासमितीचे सक्रिय सदस्य म्हणून डॉ. देशमुखांनी कार्य केले. घटना प्रारूप समितीचे अध्यक्ष डॉ. बी.आर. आंबेडकर यांनी समारोपीय भाषणात म्हटले आहे की, ''हरिजनवादि पददलित, मागास अशा जातिव्यतिरिक्त देशात बऱ्याच काही अत्यंत मागास व दुर्लक्षित जाती-जमाती आहेत याची जाणीव घटनासमितीतील बहुसंख्य सदस्यांना डॉ. पंजाबराव देशमुख यांच्यामुळे झाली. डॉ. पंजाबराव, एच.व्ही. कामत, सोमनाथ लाहिरी, डॉ.के.टी. शाह यांसारखे जागृत, अभ्यासू, मेहनती, खोलात शिरून सत्य शोधणारे सभासद घटनासमितीत नसते तर ही घटनासमिती केवळ देखावाच राहिली असती. संविधान सभेचे कामकाज खूपच निरस झाले असते.''

सरकारी कागदपत्रातून जातीवाचक उल्लेख काढून टाकण्यासंबंधीचे विधेयकाला (17 फेब्रुवारी व 11 ऑगस्ट 1948) डॉ. देशमुख यांनी प्रखर विरोध दर्शविला. शेतकऱ्यांचे हितसंबंध आणि कल्याण (3 सप्टेंबर 1949) च्या दुरुस्तीसाठी सर्व प्रकारच्या जमिनीवर राबणाऱ्या (Peasnat), जमीन असणाऱ्या (Farmers) व जमीन कसणाऱ्या (Agriculturists) ग्रामीण शेतकऱ्यांचे कल्याण अशी दुरुस्ती सुचविली. यासोबतच डॉ. देशमुखांनी सरकारने शेतकऱ्यांकडे केलेल्या दुर्लक्षाबाबत दुःख व्यक्त केले. सरकारच शेतकऱ्यांची उपेक्षा करीत आहे, अशी टीका केली. दिनांक 26 जानेवारी, 1950 ला स्वतंत्र भारताची घटना लागू होईपर्यंत घटनासमितीचे व संसद सदस्य म्हणून भाऊसाहेब (डॉ. पंजाबराव देशमुख) कार्यरत होते. भारतीय घटना निर्मितीची प्रक्रिया पूर्ण झाल्यावर दिनांक 26 नोव्हेंबर, 1949 ला भारतीय घटना कायदा अस्तित्वात आला. त्यावर सर्व सन्माननीय सदस्यांच्या स्वाक्षऱ्या आहेत, त्यापैकी एक डॉ. पंजाबराव देशमुखांची आहे.

संसद सदस्य आणि कार्ये :

इ.स. 1952 पर्यंत घटनासमितीच संसद म्हणून कार्य करीत होती. त्यामुळे घटनासमिती सदस्य व संसद सदस्य म्हणून डॉ.देशमुखांनी शेतकऱ्यांच्या विकासाला प्राधान्य दिले. दिनांक 6 एप्रिल 1948 ला अर्थमंत्री, शन्मूखम् चेट्टी यांनी 'संपत्ती कर विधेयक' निवड समितीकडे पाठविण्याची तयारी केली. भारत सरकारच्या कायद्यात शेतीव्यतिरिक्त अन्य संपत्तीवर कर लावण्याची तरतूद आहे. सदर विधेयकावर डॉ. पंजाबराव देशमुख यांनी सकारात्मक मते मांडली. देशात चलनवाढ मोठ्या प्रमाणात झाली आहे, असे

म्हणणाऱ्यांचा त्यांनी समाचार घेतला. शेतकऱ्यांच्या मालाला कमी भाव देण्याचे समर्थन करणाऱ्यांवर त्यांनी प्रखर टीका केली. ''लोक काळ्या बाजारातून साखर विकत घेतात, म्हणजे सामान्य व्यक्ती श्रीमंत झाली असे म्हणणे किंवा शेतकऱ्यांच्या हाती पूर्वीपेक्षा अधिक पैसा खेळू लागला आहे असे म्हणणे हास्यास्पद होय. श्रीमंत नवकोट नारायणांच्या हाती देशातील शेकडा 75% पेक्षा अधिक संपत्ती आहे, त्यांच्यामुळेच देशात चलनवाढ होत आहे. ही संपूर्ण अतिरिक्त 90% संपत्ती मूठभर लोकांच्या हातात जनतेची पिळवणूक करण्याकरिता राहू न देता देशाच्या औद्योगिक विकासाकरिता, राष्ट्रनिर्माणासाठी उपयोगात आणली असती तर देशाचा आर्थिक विकास झपाट्याने झाला असता. लोककल्याणाच्या दृष्टीने पावले उचलता आली असती.'' असे अभ्यासपूर्ण प्रतिपादन डॉ. देशमुख यांनी केले.

ब्रिटिश सरकारने युद्धोत्तर अन्नधान्य तुटवडा भरून काढण्यासाठी व लोकांना सहजरीत्या अन्नपुरवठा हेतूने 'अधिक धान्य पिकवा' मोहीम राबविली. 1947 मध्ये या मोहिमेवर 390 कोटी रुपये खर्च आला, पण प्रत्यक्ष उत्पादनात फक्त 30 ते 80 लक्ष टनांची वाढ झाली. यामुळे दरवर्षी अंदाजे 2 अब्ज रुपयांचे धान्य आयात होत होते. संसदेमध्येही या मोहिमेवर चर्चा झाल्या. यामध्ये डॉ. देशमुख यांनी, शेतकरी व शेतमजुरांची दयनीय अवस्था दूर व्हावी, त्यांनाही सामाजिक समतेचा लाभ व्हावा, आर्थिक स्थिती सुधारावी असे विचार मांडले.

यासोबतच डॉ. देशमुख यांनी विकास योजनांसाठी परदेशी कर्ज प्रस्ताव, साखर स्थितीबाबत विधेयक, कर चुकविणाऱ्यांना व काळाबाजार करणाऱ्यांना शिक्षा करण्यासंबंधीचे विधेयक, गो-संवर्धन विधेयक अशा सभांत अमूल्य विचार मांडले, दुरुस्त्या सुचविल्या. अशा अनेक बाबींमुळे ते अखिल भारतीय नेते म्हणून ओळखीचे झाले.

भारताचे कृषिमंत्री व कृषी उत्पादन वाढ :

इ.स 1952 च्या पहिल्या सार्वत्रिक निवडणुकीतून डॉ. देशमुखांनी लोकसभेत गेल्यावर प्रांतीय राजकारणातून अखिल भारतीय राजकारणात प्रवेश केला. पंडित नेहरूंनी 29 जुलै, 1952 ला डॉ. देशमुखांना दिल्लीला बोलावून मंत्रिमंडळात सामील केले व 12 ऑगस्ट, 1952 ला राष्ट्रपती भवनात स्वतंत्र भारताचे पहिले कृषिमंत्री म्हणून डॉ. देशमुखांचा शपथविधी झाला. भारताचे क्षेत्रफळ जवळजवळ 12,59,983 चौरस मैल आहे. सन 1951 च्या जनगणनेप्रमाणे लोकसंख्या 35,68,79,485 होती. (जम्मू-काश्मिरची 44 लाख व आसामच्या वन विभागातील 5.6 लाख लोकसंख्या वगळून) लोकसंख्या वाढीचा दर 1.5 टक्के लक्षात घेतल्यास 1958 साली 40 कोटी लोकसंख्या अपेक्षित होती. लोकांची वाढ भौमीतीय पद्धतीने होते, यानुसार 1961-62 पर्यंत ही 43 कोटीपर्यंत पोहचेल असा अंदाज होता. एवढ्या मोठ्या लोकसंख्येच्या भरणपोषणाची जबाबदारी कृषिमंत्री म्हणून डॉ. देशमुख यांच्यावर होती.

प्रथम व द्वितीय पंचवार्षिक योजना :

प्रथम पंचवार्षिक योजना सुरू होण्याअगोदर भारतीय अर्थव्यवस्था निद्रीत व निष्क्रिय अवस्थेत होती. 1951 मध्ये 217 कोटी रुपयांचे परकीय चलन देऊन 4.7 दशलक्ष टन अन्नधान्याची आयात करावी लागली होती. शेतीचा विकास व समूह विकास योजनेकरिता 357 कोटी रु. म्हणजेच 15.1 टक्के निधीची तरतूद करण्यात आली होती.

तक्ता - अ

घटक	1950-51	1955-56	1960-61	1955-56च्या तुलनेत 1960-61 मधील वाढ
अन्नधान्य (लाख टन)	540	650	805	23.8
कापूस (लाख बेल)	29	42	65	54.8
ऊस (लाख टन)	56	58	78	34.5
तेलबिया (लाख टन)	51	55	76	38.2
ज्यूट (लाख बेल)	33	40	55	37.5
चहा (लाख पौंड)	6130	6440	7000	9

स्त्रोत : चापले एस. आर. : "कृषक क्रांतीचे प्रणेते : डॉ. भाऊसाहेब उपाख्य पंजाबराव देशमुख : ऐतिहासिक विश्लेषण,' संत गाडगेबाबा अमरावती विद्यापीठ, अमरावती, पीएच. डी. शोधप्रबंध 2006, पृ. 251.

अन्नधान्य उत्पादन लक्ष्य व फलित . (प्रथम व द्वितीय पंचवार्षिक योजना) :

प्रथम पंचवार्षिक योजनेमध्ये ठरविण्यात आलेली उद्दिष्टे शेवटी थोड्याफार प्रमाणात पूर्ण झाली. उत्पादन वाढले होते व किंमतीही योजनेच्या समाप्तीवेळी 15% कमी झाल्या होत्या. शेतीचे उत्पादन 20% वाढले होते. राष्ट्रीय उत्पन्नात 18.4% टक्क्यांनी वाढ झाली होती. द्वितीय पंचवार्षिक योजनेमध्ये शेतीक्षेत्रावर 568 कोटी म्हणजेच 11.8% निधी वितरीत केला. या योजनेत राष्ट्रीय उत्पन्नात प्रतिवर्षी 5% (पाच टक्के) वाढ झाली. अन्नधान्याचे उत्पादन 1955-57 च्या तुलनेत 23.8 टक्क्याने वाढले. कापूस, तेलबिया, ज्यूट, चहा इ. पदार्थांचे उत्पादन 30 ते 50 टक्क्याने वाढले. एकंदरीत द्वितीय योजनेची फलश्रृती अपेक्षा पूर्ण करणारी होती, असे वरील तक्ता (अ) मधून स्पष्ट होते.

भात उत्पादनातील बदल :

डॉ. देशमुखांनी, जपानी भातशेतीच्या प्रयोगांना प्रोत्साहन दिले. संपूर्ण भारतात त्यांनी 18839 प्रात्यक्षिक प्रयोग क्षेत्र, 216 सरकारी प्रयोग क्षेत्र, 634 प्रशिक्षण केंद्र निर्माण केले आणि 21548 प्रचार सभा भरवल्या. जपानी पद्धतीने भातशेती करणाऱ्यांना सर्वप्रकारे मदत केली. या भात क्रांतीमुळे खालील तक्ता (ब) मध्ये दर्शवल्याप्रमाणे भात उत्पादनाची वाढ पाहावयास मिळते

तक्ता ब

वर्ष	पौंड	मण
1950-51	596	7.24
1951-52	637	7.74
1952-53	600	7.29
1953-54	791	9.61

स्त्रोत : चापले एस. आर. – उपरोक्त प्रमाणे, पृ. 258

गहू उत्पादन वाढीचे प्रयत्न:

गहू उत्पादनात पंजाब सरस राज्य होते. तिथल्या लोकांनी डॉ. देशमुखांना 'पंजाब पंजाबदा' असे गौरविले. नवीन तंत्र व सुधारित बी-बियाणे, रासायनिक खते यामुळे गव्हाच्या उत्पादनात पुढील तक्ता (क) नुसार वाढ दिसून येते.

तक्ता - (क)

वर्ष	उत्पादन वाढ (दशलक्ष टन)
1950-51	6.83
1955-56	8.87
1960-61	11.00
1961-62	12.08

स्रोत : चापले एस. आर. – उपरोक्त प्रमाणे, पृ. 264

अन्नधान्यविषयक विचार :

भविष्यात अन्नधान्याचे संकट निर्माण होऊ शकते, यासाठी नियोजित पावले उचलणे आवश्यक आहे, असे डॉ. देशमुखांनी आपल्या विचारातून भारत सरकारला सूचित केले होते. भारतीय कृषीची उत्पादकता कमी होण्याची त्यांनी तीन कारणे सांगितली - ''1) पाणी पुरवठ्याची अपूर्ण साधने व अपूर्ण पाणीपुरवठा. 2) सेंद्रिय व रासायनिक खतांचा अल्प वापर. 3) पीक वाढीच्या विविध टप्प्यांत पुरेशी काळजी न घेणे.

उपरोक्त कारणांना शेतकऱ्यांनी नशिबाचा भाग समजू नये. कमी उत्पादकतेची कारणे शोधून शेतीत तंत्रात्मक सुधारणा अंमलात आणाव्या. संसाधनाचा महत्तम वापर व्हावा. दुर्दैव, दुर्गुण यांसारख्या बाबींना महत्त्व देऊ नये. तसेच नैसर्गिक संकटांकडे भारतीय शेतकऱ्यांनी दुर्लक्ष करू नये'', असे मार्गदर्शन त्यांनी शेतकऱ्यांना केले.

डॉ. देशमुखांनी तत्कालीन भारतीय अर्थव्यवस्था आणि पाश्चिमात्य अर्थव्यवस्थेचे संदर्भ लक्षात घेऊन विचार प्रकट केले. पहिल्या महायुद्धापूर्वी हिंदुस्थान हा अन्नधान्य निर्यात करणारा देश होता. 1935 ला ब्रह्मदेश हा हिंदुस्थानपासून वेगळा झाला. तेव्हापासून अन्नधान्याची टंचाई निर्माण झाली. या टंचाईला शह देण्यासाठी 1943 ला अन्नधान्य चौकशी समिती स्थापन केली. या समितीने भारतात शिधावाटप पद्धती सुरू केली. 54 दशलक्ष लोक नियंत्रित शिधावाटप प्रणालीअंतर्गत जीवन निर्वाह करत होते. 10 दशलक्ष लोक सार्वजनिक अन्नधान्य वितरणाच्या माध्यमातून अन्नाची गरज भागवत होते. अशावेळी डॉ. देशमुख यांनी अन्नधान्यविषयक समस्या सोडविण्यासाठी जपानी भातशेतीचा अभ्यास करून, त्याचे प्रयोग प्रत्यक्षात भारतात राबवले.

भातशेतीच्या जपानी पद्धतीच्या आयोजनानंतर मध्य कालावधीत उसाचे पीक शेतकऱ्यांनी घ्यावे, असे शेतकऱ्यांना सुचविले. सोबतच ज्वारी पिकाची उत्कृष्ट शेती करण्यासाठी डिबलिंग पद्धती (हाताने जमिनीत रोप लावणे) अधिक उत्तम असे प्रतिपादन केले. शेतीमधील अन्नधान्याचा विकास शेतकऱ्यांच्या उत्पन्नावर चांगला परिणाम घडवून आणतो. त्यांच्या मते, ''लोकसंख्या वाढीवर नियंत्रण ठेवण्यासाठी कठोर उपाय करावे लागतील. राष्ट्रीय स्तरावर कृषी तंत्रज्ञान, कृषीसाठी जलसिंचन सुविधा कराव्या लागतील. सहकारी

तत्त्वाचा अवलंब करून कृषी उत्पादन खर्च व कृषी उत्पादन किंमत यात समन्वय साधावा लागेल.'' यातूनच त्यांनी अन्नधान्य उत्पादन वाढविण्यासाठी अनेक योजना पंचवार्षिक योजनांच्या माध्यमातून राबविल्या.

जोडधंद्यांचा विकास :

इ.स. 1953 मध्ये आर. एस. मुट्टो, डॉ. देशमुखांना भेटले. कृषी उत्पादनाचा जोडधंदा म्हणून कृषीमध्ये मधमाशांचे महत्त्व डॉ. देशमुखांनी जाणले. नवीन तंत्रे व यंत्रे वापरून मधमाशांचे संवर्धन व विकास होण्यासाठी डॉ. देशमुखांनी या धंद्यास मदत करण्याचे ठरविले. मधमाशांच्या ङकधाला आरोग्याच्या दृष्टीने महत्त्व देऊन योजना आयोगाने दुसऱ्या पंचवार्षिक योजनेत 130 मधमाशी पालन केंद्र सुरू करण्याचे मंजूर केले.

मासे हे पूरक जीवनसत्व पुरविणारे अन्न असल्याने मासेमारी व्यवसायाचे संवर्धन करणे डॉ. देशमुखांना आवश्यक वाटत होते. पहिल्या पंचवार्षिक योजनेत केंद्रीय सरकार मत्स्योद्योग विकासाकरिता एक कोटी रुपये तर राज्य सरकार चार कोटी रुपये खर्च करेल असे ठरविले. इ.स. 1947 मध्ये 7 लाख टन मासे पकडण्यात आले होते. इ.स. 1978 मध्ये 23.7 लाख टन मासे पकडण्यात आले.

भाकड गाई-म्हशींचे प्रमाण भारतात मोठ्या प्रमाणात आहे. या पशुधन दुरावस्थेचे अनेक कारणे आहेत. जनावरांचे पालनपोषण रोगप्रतिबंधन व उपज यांच्याकडील दुर्लक्ष ही प्रमुख कारणे आहेत. डॉ. देशमुखांनी नेमके याच प्राथमिक कारणांच्या निवारणाकडे लक्ष दिले. डेन्मार्कमधून डॅनिश गायी, अमेरिकेतून जर्सी गायी, जर्मनीतून होस्टन गायी तसेच तंत्रज्ञान आयात केले.

तक्ता (ड)

	1951 (दशलक्ष)	1956 (दशलक्ष)
गुरेढोरे	155	159
म्हशी	43	44.8
ङकेंढरे	38	56.6
बकऱ्या	47	56.6
घोडे	1.5	1.5
उंट	0.6	0.5
डुकरे	4.4	4.6
कोंबड्या	43.4	97.4

स्त्रोत : चापले एस. आर. – उपरोक्त प्रमाणे, पृ. 319

समारोप :

डॉ. पंजाबराव देशमुखांचे कृषिविषयक कार्य व विचार हे उल्लेखनीय आहेत. त्यांचे संपूर्ण जीवन म्हणजे भारतातील कृषक क्रांतीच्या कार्यक्रमांची अंमलबजावणी होय. कृषकांचे अज्ञान व दारिद्र्य दूर करणे, भारताचा सर्वंकष विकास करणे हेच त्यांचे ध्येय होते. ते स्वतः शेतकरी कुटुंबात जन्मले व वाढल्याने त्यांना शेतकऱ्यांचे अज्ञान, दारिद्र्य, उपासमार, शिक्षणाची अनास्था व हालाखीच्या स्थितीचा जवळून अनुभव आला होता. शैक्षणिक संस्था उभारून शेतकऱ्यांच्या मुलांना शिक्षण देण्यास त्यांनी भर दिला.

भारतीय शेती - शेतकरी यांच्या विकासातून उद्योग-व्यापार-सेवा क्षेत्राचाही विकास होईल, अशी डॉ. देशमुखांची विचारधारा होती. डॉ. देशमुखांनी शेतकऱ्याच्या व देशसमृद्धीसाठी तीन तत्त्वांचा विचार व अवलंब केला. 1) शिक्षण प्रसार (2) कृषी विकास 3) सहकारी चळवळीचा प्रचार-प्रसार. यातूनच प्रगती, विकास व समृद्धी अवलंबून आहे, असा त्यांचा ठाम विश्वास होता. 'भारत कृषक समाज' हे त्यांच्या जीवनातील महत्त्वाचे शिखर होते. असंघटित शेतकऱ्यांना, संघटित करून 1955 मध्ये 'भारत कृषक समाजाची' स्थापना केली.

राष्ट्रीय, आंतरराष्ट्रीय स्तरावर अनेक संस्था स्थापन केल्या. डॉ. देशमुखांनी आपल्या अधिकाराचा वापर शेतकरी-शेती व देश समृद्धीसाठी केला. राष्ट्रपिता महात्मा गांधी डॉ. देशमुखांबद्दल उद्गारताना म्हणाले होते की, ''शेतकऱ्यांची सेवा करणे सोपे आहे; पण त्याकरिता सोपे कायदे, साधे शिष्टाचार, सरळ माणसे हवी आहेत. हे तीनही गुण एकवटलेला डॉ. पंजाबराव देशमुख हा कदाचित भारतात या युगातला एकमेव माणूस असावा.''

थोडक्यात, अन्नधान्य उत्पादन वाढ, शेती - शेतकरी व देश समृद्धीसाठी डॉ. पंजाबरावांचे कार्य व विचार हा सखोल चिंतनाचा विषय आहे. शासनाने त्यांच्या विचारांची अंमलबजावणी शेतकऱ्यांचे जीवन व देश समृद्ध करण्यासाठी करावी. यातूनच खरा कृषी विकास साधला जाईल.

(टीप : सदर शोधनिबंध तयार करण्यासाठी श्री गणेश टेकले, संशोधक विद्यार्थी, अर्थशास्त्र विभाग, शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर याची मौलिक मदत झाली आहे. याबद्दल लेखक त्यांचा ऋणी आहे.)

संदर्भ ग्रंथ यादी :

1. ढाले र. वा., 'डॉ. पंजाबराव उपाख्य भाऊसाहेब देशमुख यांचे कृषिविषयक आर्थिक विचार', संत गाडगेबाबा अमरावती विद्यापीठ, अमरावती, पीएच.डी. शोधप्रबंध, ऑक्टो. 2006.
2. चापले शीला आर., 'कृषक क्रांतीचे प्रणेते : डॉ. भाऊसाहेब उपाख्य पंजाबराव देशमुख : ऐतिहासिक विश्लेषण,' संत गाडगेबाबा अमरावती विद्यापीठ, अमरावती, पीएच. डी. शोधप्रबंध 2006.
3. कदम सतीश माधवराव, 'डॉ. पंजाबराव देशमुख यांचे जीवन व कार्य : एक ऐतिहासिक अभ्भ्यास इ.स. 1898 - 1965' स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड, 2016.
4. मोहिते कल्पना राजीव, 'डॉ. पंजाबराव देशमुख यांचे जीवनकार्य 1898 तें 1965', शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर, पीएच.डी. शोधप्रबंध, डिसें. 2003.

15 वा वित्त आयोग : केंद्र राज्य वितीय संबधाची चिकित्सा

जयदीप लिंबराज गायकवाड व डॉ.डी.व्ही. शिंदे

1) प्रस्थावना :-

भारत हे संघराज्य असुन संघराज्या पदधतीत वितीय तोल राखण्यासाठी एक व्यवस्था म्हणून भारतीय संविधानाच्या 280 कलमानुसार वित्त आयोगाची स्थापना 15 मार्च 1950 रोजी करण्यात आली. हा दर पाच वर्षांनी वित्त आयोग नेमला जावा अशी घटनेत तरतुद आहे परंतू राष्ट्रपती आवश्यकता वाटल्यास पाच वर्षापुर्वीही वित्त आयोग नेमू शकतात. पहिला वित्त आयोग 1951 रोजी नेमण्यात आला आजतागायत असे 14 वित्त आयोग नेमले असुन सध्या 15 वा वित्त आयोग व त्याच्या शिफारशी चालु आहेत. या घटकातून 15 वा वित्त आयोग यावर प्रकाश टाकण्यात आला आहे.

2) 15 वा वित्त आयोग :-

15 व्या (पंधराव्या) वित्त आयोगाने 2020 ते 2025 या कालावधीसाठी आपला अहवाल "फायनान्स कमिशन इन कोविड टाइम्स" या शीर्षकाखाली आपला अहवाल राष्ट्रपतींना सादर केला.

भारत सरकारने 15 वा वित्त आयोगाची स्थापना 27 नोव्हेंबर 2017 मध्ये केली होती या आयोगाचे अध्यक्ष – नंदकिशोर (एन के) सिंग हे आहेत. तर सदस्य - अजय नारायण झा, अशोक लाहिरी, अनुप सिंग, रमेश चंद हे आहेत. सचिव - अरविंद मेहता

15 वा वित्त आयोगाच्या पहिल्या एक वर्षासाठी शक्तीकांत दास हे सदस्य होते. नंतर ते RBI 25 वे गव्हर्नर झाल्यानंतर त्यांच्या जागी अजय नारायण झा हे सदस्य झाले.

2020 - 2021 या आर्थिक वर्षासाठीच्या समावेश असलेला पहिला अहवाल फ्रेब्रुवारी 2020 मध्ये मांडण्यात आला. 2021-2026 कालावधी साठीच्या शिफारशीसह अंतिम अहवाल

1 फेब्रुवारी 2021 रोजी संसदेत मांडण्यात आला. यामधील महत्वाच्या शिफारशींचा आढावा पुढील प्रमाणे घेता येईल. (कोविड मुळे 2020 ते 2025 ऐवजी 2021 ते 2026 असा कालावधी घेण्यात आला.)

3) 15 व्या वित्त आयोगाच्या शिफारशी:-

- या शिफारशी 2021 ते 2026 या कालावधीसाठी असतील.
- राज्य आणि केंद्र सरकार यांच्यात कर उत्पन्नाचे वितरण करणे.
- वस्तू व सेवा कर (GST) चा अर्थव्यवस्थेवर होणारा परिणाम अभ्यासणे.
- राज्य सरकारसाठी कामगिरीवर आधारित प्रोत्साहने प्रदान करणे वाढत्या लोकसंख्येवर नियंत्रण ठेवण्यासाठी प्रोत्साहित केले पाहिजे.
- महसुली तुट अनुदान , स्थानिक स्वराज्य संस्थाना अनुदान आणि आपत्ती व्यवस्थापन राज्यांना दिले जाईल.

❖ 15 व्या वित्त आयोगात **Vertical Devolation** (अनुलंब विकास)

संघराज्याचे कर विविध राज्यांना हस्तांतरित करण्याच्या प्रकियेस Vertical Devolation असे म्हणतात.

- 15 व्या वित्त आयोगाने Vertical Devolation 41% (एक्केचाळीस) शिफारस केली आहे.
- 14 व्या वित्त आयोगानुसार ते ४२% होते.

- 15 व्या वित्त आयोगातील 1% बदल जम्मु आणि काश्मीरच्या बदललेल्या स्थिती च्या आवश्यक समायोजनामुळे आहे जे आता जम्मु काश्मीर आणि लडाखचे केंद्रशासित प्रदेश बनले आहेत.

❖ 15 व्या वित्त आयोगातील **Horizontal Devolution** (क्षितिज विकास)

विविध राज्यांतील करांचे हस्तांतरण करण्याची प्रक्रिया म्हणजे Horizontal Devolution होय.



- महसूल वाटणी (१४ वा व १५ वा आयोग)

15 व्या वित्त आयोगामध्ये

- कर व वित्तीय प्रयत्न 2.5%
- लोकसंख्या शास्त्रीय कामगिरी 12.5%
- उत्पन्न अंतर 45%
- वन व पर्यावरणशास्त्र 10%
- क्षेत्रफळ 15%
- लोकसंख्या 15%

4) केंद्र राज्य वितीय संबंधं :-

संविधानातील कलम 268 ते 293 हे केंद्र राज्य वित्तीय संबंध यांच्याशी संबंधित आहे. कलम 265 नुसार कायदयाने प्राधिकार दिल्याशिवाय कोणतेही कर आकारला किंवा वसूल केला जाणार नाही.

संघ राज्य व राज्ये यांच्यातील महसूल वाटप :-

1) कलम 268 – केंद्राने आकारणी केलेली पण राज्यांनी वसूल केलेली आणि विनियोजन केलेली शुल्के. उदा. चेक ,वचनचिठ्ठी, विमा पॉलिसी, शेअर्सवरील मुद्रांक शुल्क औषधे व सौंदर्यावरील उत्पादन शुल्क.
2) कलम 268 क – केंद्राने आकारणी केलेला व केंद्र आणि राज्यांनी वसूल व वापर केलेला सेवा कर सेवाकरांवरील आकारणी भारत सरकारकडुन केली जाईल अशा करांची वसूली व विनियोजन भारत सरकार व राज्ये करतील.
3) कलम 269 - संघराज्याने आकारणी व वसूल केलेले मात्र राज्यांना विभागून दिलेला कर.

अ) वृत्तपत्राखेरीज अन्य मालाची विक्री किंवा खरेदी जेथे आंतरराज्यीय व्यापार किंवा वाणिज्य व्यवहार याच्यांत घडते अशा खरेदी विक्रीवरील कर.

ब) आंतरराज्यीय व्यापार किंवा वाणिज्य व्यवहार यांच्यात जेंव्हा मालाची पाठवणी केली असेल तेंव्हा अशा मालावरील कर.

4) कलम 270 - संघराज्याने आकारणी व वसूल केलेले आणि संघराज्य यांच्यात वितरीत होणारे कर.

यामध्ये खालील कर वगळता केंद्र सूचीमध्ये निर्देशित केलेल्या सर्व करांचा समावेश होतो.

अ) कलम 268,268 क, 269 मधील शुल्क व कर.

ब) कलम 271 मध्ये नमूद केलेला शुल्क व करांवरील अधिभार.

क) विशिष्ट कारंणासाठी लावलेला उपकर.

5) कलम 271 – संघराज्याच्या प्रयोजनासाठी विविक्षित शुल्क व करांवरील आधिभार.

अनुच्छेद (कलम) 269 व 270 मध्ये काहीही असले तरी संसदेला कोणत्याही वेळी त्या कलमांमध्ये असलेला कोणताही शुल्क व कर अधिभार आकारुन वाढवता येईल आणि अशा आधिभारांचे संपूर्ण उत्पन्न भारताच्या एकत्रित निधीचा भाग होईल.

80 व्या व 88 व्या घटनादुरूस्तीने करमहसूलाच्या वाटपामध्ये महत्वाचे बदल केले गेले.

अ) 80 वी घटना दुरूस्ती (2000 साली) - ही घटनादुरूस्ती 10 व्या वित्त आयोगाच्या शिफारशी लागु करण्यासाठी केली गेली होती 10 व्या वित्त आयोगाने एकुण कर उत्पन्नाच्या 29% वाटा राज्यांना देण्यात यावा अशी शिफारस केली ही 1 एप्रिल 1996 पासून लागु झाली. या घटना दुरुस्तीने महामंडळ कर व सीमा शुल्क हे कर आयकरासोबत राज्ये व केंद्र यांच्यात वितरीत केली जाऊ लागली.

ब) 88 वी घटनादुरूस्ती (2003) -

यामुळे 268 क हे सेवाकराविषयीचे नवीन कलम संविधानामध्ये समाविष्ट केला गेला. या घटनादुरुस्तीने केंद्रसुचीमध्ये 92 क हा नवीन विषय समाविष्ट केला गेला.

- केंद्र-राज्य संबंध यातील कलमांची माहिती :-

कलम	तरतूद
264	अर्थ लावणे
265	कायदयाने आदेश दिल्याशिवाय कर न लावणे
266	भारताचे (केंद्र) व राज्यांचे संचितनिधी व लोकलेखे
267	आकस्मिक निधी
268	संघराज्याने आकारणी केलेली पण राज्यांनी वसूली व वापरलेले शुल्क
268क	संघराज्याने आकारणी केलेला आणि संघराज्य व राज्यांनी वसूल व वापर केलेला सेवा कर
269	संघराज्याने आकारणी केलेला आणि वसूल केलेला पण राज्यांना नेमून दिलेला कर
270	केंद्र व राज्यांनी आकारणी केलेले व केंद्र व राज्यामध्ये वितरीत केलेला कर
271	केंद्राच्या प्रयोजनासाठी विविक्षित शुल्के व कर यावरील अधिभार
272	80 व्या घटना दुरूस्तीने निरसित
273	ताग व तागोत्पादित वस्तू यावरील निर्यात शुल्का ऐवजी अनूदाने

274	ज्यामध्ये राज्याचे हितसंबधित आहेत अशा कर आकारणीवर परिणाम करणाऱ्या विधेयकांना राष्ट्रपतीची पुर्वशिफारस आवश्यक
275	विविक्षित राज्यांना केंद्राकडुन अनुदाने
276	व्यवसाय, आजिविका आणि नौकऱ्यावरील कर
277	व्यावृत्ती
278	सातव्या घटनादुरूस्तीने निरसित
279	निव्वळ उत्पन्नाची परिगणना
280	वित्त आयोग
281	वित्त आयोगाच्या शिफारसी
282	केंद्र किंवा राज्यांने आपल्या महसुलातुन भागवायचा खर्च
283	संचित निधी, आकस्मिक निधी, लोकलेखांच्या खाती जमा केलेले पैसे यावरील अभिरक्षा
284	लोकसेवक आणि न्यायालये यांना मिळालेल्या वादपक्षकारांच्या ठेवी व इतर पैसे यांची अभिरक्षा
285	संघराज्याच्या किंवा केंद्राच्या मालमत्तेस राज्याच्या करआकारणीतून सूट
286	मालाची विक्री किंवा खरेदी यांवर कर बसविण्यासंबधी निर्बंध
287	विजेवरील करापासून सूट
288	पाणी किंवा वीज यांच्या बाबत राज्यांनी केलेल्या कर आकारणीतून विविक्षित बाबतीत सूट
289	राज्यांची मालमत्ता व प्राप्ती यांना केंद्रीय कर आकारणीतून सूट
290	विविक्षित खर्च व पेन्शने यांच्याबाबत समायोजन
291	26 व्या घटनादुरुस्तीने निरसित
292	केंद्र सरकारने कर्ज काढणे
293	राज्यांनी कर्ज काढणे

अशाप्रकारे वरीलप्रमाणे '15 वा वित्त आयोग : केंद्र राज्य वितीय संबधाची चिकित्सा' हा घटक स्पष्ट करता येतो.

पंधरावा वित्त आयोग व केंद्र राज्य वित्तीय संबंधांचा चिकित्सात्मक अभ्यास

प्रा.डॉ.एस.एम.भोसले
लाइफ मेम्बर नं.512
विभागप्रमुख-अर्थशास्त्र विभाग, सावित्रीबाई फुले महिलामहाविद्यालय, सातारा
९४२१२१९७४५
श्री. अर्जुन जगताप
संशोधन विद्यार्थी
अर्थशास्त्र विभाग, सावित्रीबाई फुले महिला महाविद्यालय, सातारा
९५४५२४२५९१

गोषवारा:
आपल्या भारत देशात नैसर्गिक, मानवीय व भांडवली संसाधनांची असमानता आहे. आपल्याकडे काही राज्यात हिमालयाची रांग असून याठिकाणी बर्फवृष्टी होते. येथील बराचसा भागडोंगररांगांनी व्यापला आहे. तर राजस्थान, गुजरात राज्यातील बराचसा भाग वाळवंटाने व्यापला आहे. उत्तरप्रदेश, पंजाब, बिहार, पश्चिम बंगाल येथे सुपीक गाळाची मैदाने आढळतात. तर महाराष्ट्र व दक्षिणेकडील अनेक राज्याना समुद्रकिनारपट्टी लाभली आहे. हीच विविधता भाषा, आहार, वेशभूषा, हवामान, पर्जन्यमान इ. अनेक बाबतीत दिसून येते. यामुळेचकि काय आपल्या राज्यघटनेने आर्थिक, भौगोलिक, सामाजिक असमतोलाची हीच समस्या ओळखून तिच्या निराकरणासाठी दर पाच वर्षांनी भारताच्या राष्ट्रपतींद्वारे कलम 280 नुसार, वित्त आयोगाची नियुक्ती करण्याची तरतूद केली आहे. या अंतर्गत केंद्र आणि राज्यांमधील करांच्या निव्वळ उत्पन्नाचे वितरण, अनुदान व आपत्ती व्यवस्थापनासाठी मदत इ. तरतूद करण्यात आली आहे. पहिला वित्त आयोग 1951 साली के.सी. नियोगी यांच्या अध्यक्षतेखाली नेमण्यात आला. जो 1952 ते 1957 पर्यंत कार्यरत होता. सध्या 15 व्या वित्त आयोग नंदकिशोर सिंग यांच्या अध्यक्षतेखाली स्थापन झाला असून त्याची अंमलबजावणी 2020-26 पर्यंत चालू राहील. या वित्त आयोगाने लोकसंख्या वाढ नियंत्रणासाठी लोकसंख्याविषयक कामगिरी, कर व उत्पन्नवाढीसाठी प्रोत्साहनपर वित्तीय निधी व पर्यावरणशास्त्राचा समावेश निव्वळ उत्पन्न वाटपातील निकषात केला आहे. या शिवाय स्थानिक स्वराज्य संस्था बळकटीकरणासाठी, शिक्षण, आरोग्य आणि रस्ते या पायाभूत सुविधासाठी मोठ्या प्रमाणात अनुदान दिले आहे. मात्र आजही भारतात स्वातंत्र्याचा अमृत महोत्सवी वर्ष जल्लोषात साजरे करण्यात आले. मात्र या स्वातंत्र्याच्या 75 वर्षानंतरही प्रादेशिक असमतोल दूर करण्यात म्हणाव अस यश आलेले नाही.

महत्त्वाचे शब्द : 15 वा वित्त आयोग, अनुदान, कर देवाण घेवाण / संसाधनांचे हस्तांतरण, क्षैतिज असंतुलन, केंद्र राज्य वित्तीय संबंध.

प्रस्तावना:

नुकताच मोठ्या उत्साहात आपल्या भारत देशात स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव साजरा करण्यात आला. आज आपण जीडीपीनुसार जगातील सर्वाधिक उत्पन्न असणाऱ्या देशात आपल्या देशावर दीडशे वर्ष राज्य केलेल्या ब्रिटनला पाठीमागे टाकून पाचव्या क्रमांकावर पोहोचलो. ही बाब आपल्या देशाच्या दृष्टीने अभिमान

वाढवणारी असली तरी ही आजही आर्थिक, सामाजिक, शैक्षणिकदृष्ट्या भारतात हाच विकास सर्वदूर पोहोचलेला नाही. सर्व राज्यात आर्थिक, सामाजिक, शैक्षणिकदृष्ट्या असमानता, विषमता जास्त आहे. काही राज्य ही प्रगतीपथावर, विकसित आहेत तर काही राज्य आर्थिक सामाजिक शैक्षणिकदृष्ट्या अजूनही मागासलेली पिछाडीवर आहेत. उदा. बिहार, झारखंड, अरुणाचलप्रदेश या सारखी राज्ये आजही प्रगतीपासून खूप दूर आहेत. यांचे मुख्य कारण म्हणजे प्रत्येक राज्याकडे उपलब्ध असणारी संसाधने कमी जास्त प्रमाणात आहेत. तीन प्रकारची संसाधन साधने असतात. यामध्ये १) नैसर्गिक संसाधने या भूतलावर उपलब्ध असणारे पाणी, हवा, जंगल, भूगर्भातील खनिजे उदा. आयर्न, बॉक्साइड, गोल्ड, माती, खडक, कच्चेतेल इ. २) मानवसंसाधन - कुशल व अकुशल मानव संसाधनाद्वारे इतर सर्व संसाधनांचा योग्य वापर केला जातो. म्हणूनच मानव हा स्वतः देखील एक मौल्यवान संसाधन आहे. नैसर्गिक संसाधनांचा कार्यक्षम वापर मानव संसाधनाशिवाय शक्य नाही. मानवी संसाधन शिक्षित, कौशल्ययुक्त असेल तरच खऱ्या अर्थाने त्या प्रदेशाचा भागाचा जास्त वेगाने विकास होतो. ३) भांडवल- ज्या राज्याकडे तुलनेने भांडवलाचे प्रमाण जास्त आहे. त्या भागाचा इतर सर्वांपेक्षा वेगाने विकास होतो. भारतात ज्या राज्यात संसाधनांचा अजूनही कार्यक्षमपणे वापर झालेला नाही. व तुलनात्मकदृष्ट्या इतर राज्यांपेक्षा जी राज्ये मागासलेली आहेत. त्यांच्यातील मागासलेपणा दूर करण्यासाठी वित्तीय राज्यघटनेतील कलम 280 नुसार वित्त आयोगाची स्थापना करण्यात आली आहे. नुकताच पंधरावा वित्त आयोग एन.के. सिंग यांच्या अध्यक्षतेखाली स्थापन करण्यात आला. यामध्ये इतर सदस्य शक्तिकांत दास सध्याचे आरबीआय गव्हर्नर, अजय नारायण झा, अशोक लाहिरी आणि अनूप सिंग, रमेशचंद हे आहेत. त्यांच्या शिफारसी 2021 ते 2026 या काळापर्यंत राहतील. या समितीने "फायनान्स कमिशन इन कोविड टाइम्स" या शीर्षकाखाली आपला अहवाल सादर केला. या अहवालाचाच चिकित्सात्मक अभ्यास या संशोधनात करण्यात आला आहे.

II- समस्येचे विधान-

भारतामध्ये सर्वाधिक कर वसुली व कर भरणा करण्यात महाराष्ट्र राज्याचा प्रथम क्रमांक लागतो. मात्र ज्यावेळी वित्त आयोगाकडून उत्पन्नाचे विभाजन केले जाते. यामध्ये महाराष्ट्राचा भारतात उत्तर प्रदेश, बिहार, पश्चिम बंगाल, मध्यप्रदेश यानंतर पाचवा क्रमांक लागतो. केंद्र आणि राज्यांमध्ये करांच्या 'निव्वळ उत्पन्नाचे' वितरण करांमध्ये त्यांच्या संबंधित योगदानानुसार विभागले जावे अशी अपेक्षा होती. मात्र विविध निकषानुसार असे विभाजन होत नाही. यामुळेच हा अभ्यास केंद्र व राज्यांमध्ये निव्वळ उत्पन्नाचे विभाजन कशापद्धतीने होते हे जाणून घेण्यासाठी महत्त्वाचा ठरतो.

III-उद्दिष्टे:

1. नंदकिशोर सिंगयांच्या अध्यक्षतेखालील पंधराव्या वित्त आयोगाच्या शिफारशींचा अभ्यास करणे.
2. केंद्रीय उत्पन्नाचे विभाजन कोणत्या निकषानुसार केले जाते. त्या निकषांचा अभ्यास करणे.
3. केंद्र राज्य वित्तीय हस्तांतरणातील राज्यानुसार वाटा अभ्यासणे
4. पंधराव्या वित्त आयोगानुसार सर्वाधिक कर भरणा करण्यात योगदान असणाऱ्या महाराष्ट्र राज्याला निव्वळ उत्पन्नाच्या किती प्रमाणात वाटा मिळतो हे अभ्यासणे.
5. केंद्र राज्य वित्तीय संबंध सुधारण्यासाठी धोरणात्मक सूचना करणे.

IV-गृहीतके:-

H_0- केंद्र आणि राज्यांमध्ये करांच्या 'निव्वळ उत्पन्नाचे' वितरण करांमध्ये त्यांच्या संबंधित योगदानानुसार विभागले जात नाही.

H_1- केंद्र आणि राज्यांमध्ये करांच्या 'निव्वळठ त्पन्नाचे' वितरण करांमध्ये त्यांच्या संबंधित योगदानानुसार विभागले जाते.

V. चर्चा व परिणाम :

आपल्या देशामध्ये प्रत्येक राज्याची भौगोलिक, सामाजिक, शैक्षणिक, आर्थिक परिस्थिती भिन्न स्वरूपाची आहे. यामुळे उत्पन्नाचे स्त्रोत, दरडोई उत्पन्न यामध्ये विविधता दिसून येते. महाराष्ट्र, गुजरात, गोवा, पंजाब यासारखी राज्ये आर्थिकदृष्ट्या सक्षम, प्रगत व विकसित आहेत. तर बिहार, झारखंड, आसाम, नागालँड, मणिपूर, मेघालय यासारखी राज्ये प्रगतीच्या बाबतीत आजही मागासलेली व पिछाडीवर आहेत. देशाचा एकत्रितरित्या सामूहिकपणे विकास साधायचा असेल तर या असमतोलाचा विचार करून सर्व राज्यांना आवश्यक ती मदत केंद्र सरकारने करावी अशी अपेक्षा असते. यासाठी आर्थिक स्त्रोतांच्या बाबतीत साधर्म्य निर्माण होणे आवश्यक असते. या दृष्टीने केंद्र सरकार व राज्य सरकारांमध्ये वित्तीय सामंजस्य निर्माण करण्यासाठी, केंद्राला अर्थविषयक सल्ला देण्यासाठी वित्त आयोगाची निर्मिती केली जाते.

केंद्र सरकारने महसुलातील वाटा, अनुदाने राज्यांना किती द्यावेत, राज्या-राज्यांना कशी वितरित करावी हे सुचवण्यासाठी दर पाचवर्षासाठी वित्तआयोग विविध निकष सुचवत असते.

राज्यघटनेच्या कलम 280 नुसार भारताचे राष्ट्रपती पाचवर्षांसाठी वित्त आयोगाची स्थापना करतात. पहिला वित्त आयोग 1951 रोजी के.सी.नियोगी यांच्या अध्यक्षतेखाली 1952 ते 1957 या कालावधीसाठी स्थापन करण्यात आला.कलम 280 (3) नुसार आयोग खालील बाबीविषयक सल्ला राष्ट्रपतींना देण्याचे कार्य पार पडते.

1) केंद्रीय कर उत्पन्नापैकी ज्या करांची विभागणी होऊ शकते ती विभागणी सुचवणे.

2)भारताच्या संचित निधीतून राज्यांना दिल्या जाणाऱ्या अनुदानाची तत्वे/ निकष ठरवणे.

3) केंद्र व राज्यांमधील वित्तविषयक बाबीसंबंधित मार्गदर्शन करणे.

4) राज्यांच्या संचित निधीमध्ये वाढ करण्यासाठी उपाययोजना सुचविणे.

5) राष्ट्रपतींनी सुचविलेल्या इतर कोणत्याही वित्तविषयक बाबीसंबंधी सल्ला देणे.

6) पंचायत राजव्यवस्थेकडे स्त्रोत उपलब्ध करण्यासाठी राज्यांच्या संचित निधीत वाढ करण्याच्या उपाययोजना सुचवणे.

7) नागरी पंचायत राजव्यवस्थेकडे स्त्रोत उपलब्ध करण्यासाठी राज्यांच्या संचित निधीत वाढ करण्याच्या उपाययोजना सुचविणे.

15 वा वित्तआयोग हा नंदकिशोरसिंग यांच्या अध्यक्षतेखाली नोव्हेंबर 2017 मध्ये स्थापन झालेली एक घटनात्मक समिती आहे. या समितीच्या शिफारशी लागू करण्याचा कालावधी 2020 ते 2025 असा होता. मात्र कोरोनाच्या पार्श्वभूमीवर 2020-21 या एका वर्षाच्या कालावधीसाठी शिफारशींचा समावेश असलेला पहिला अहवाल फेब्रुवारी 2020 मध्ये संसदेत मांडण्यात आला.यानंतर फेब्रुवारी 2021 मध्ये 2021 ते 2026 पर्यंत पाच वर्षासाठी 15 व्या वित्त आयोगाच्या शिफारशीचा अहवाल संसदेत मांडण्यात आला व तो पास झाला.कर आणि इतर आर्थिक बाबींच्या हस्तांतरणासाठी पुढील महत्वपूर्ण शिफारसी आयोगाने केल्या.

15 व्यावित्तआयोगाच्याशिफारशी:

- 2021-26 कालावधीसाठी केंद्रीय करांमध्ये राज्यांचा हिस्सा 41% असेल.(14 वावित्तआयोग- 42 टक्के)1% चे समायोजन जम्मू-काश्मीर आणि लडाख या नव्याने स्थापन झालेल्या केंद्रशासित प्रदेशांना केंद्राच्या संसाधनांमधून प्रदान करण्यात येईल.

- राज्य सरकारसाठी लोकसंख्या नियंत्रण कामगिरीवर आधारित प्रोत्साहनपर 12.5% वित्तीय सहाय्य प्रदान करणे.
- महसुली तूट कमी करण्यासाठी कार्यकरणाऱ्या राज्यांना प्रोत्साहनपर अनुदान दिले जाईल.
- ग्रामीण भागाच्या विकासासाठी स्थानिक स्वराज्य संस्थांना अनुदान देण्यात येईल.
- आपत्ती व्यवस्थापनासाठी राज्यांना अनुदान दिले जाईल.
- वस्तू व सेवाकराचा अर्थव्यवस्थेवरील परिणाम अभ्यासणे.

पंधराव्यावित्तआयोगानुसारकेंद्र-राज्यउत्पन्नवाटपाचेनिकष:

खालील तक्ता 1 केंद्रीय करांमधील प्रत्येक राज्याचा वाटा निश्चित करण्यासाठी आयोगाने वापरलेले निकषआणि प्रत्येक निकषाला नेमून दिलेले वजन दाखवते.
तक्ताक्रमांक.(1)- 15 व्या वित्त आयोगाच्या केंद्रीयकरांचे राज्यांमध्ये वितरणाचे निकष चौदाव्या वित्तआयोगाच्या तुलनात्मक संदर्भासह

निकष	14वा वित्त आयोग	15 वा वित्त आयोग
उत्पन्न दुरावा	50	45
क्षेत्रफळ	15	15
लोकसंख्या - 1971	17.5	-
लोकसंख्या - 2011	10	15
लोकसंख्याशास्त्रीय कामगिरी	-	12.5
वन आच्छादन	7.5	-
वन आणि पर्यावरणशास्त्र	-	10
कर आणि वित्तीय प्रयत्न	-	2.5
एकूण	100%	100%

माहितीचा स्त्रोत:15 वा वित्त आयोग अहवाल

वरील तक्त्यात दर्शवल्याप्रमाणे केंद्र-राज्य यामध्ये उत्पन्नाचे विभाजन पुढील स्तंभाद्वारे अधिक स्पष्ट करण्यात आले आहे.



वरील स्तंभ आकृती द्वारे दर्शवलेले केंद्र-राज्य वित्तीय निधीचे विभाजन पुढील निकषावर आधारित आहे.

अ) उत्पन्न दुरावा:

चौदाव्या व पंधराव्या वित्त आयोगात अनुक्रमे 50 व 45 टक्के उत्पन दुराव्यासाठी/ उत्पन्नातील अंतरासाठी दिले जाते.उत्पन्नाचे अंतर दरडोई उत्पन्नानुसार मोजले जाते. हे सर्वाधिक उत्पन्न असलेल्या राज्यांपासून कमी उत्पन्न असणाऱ्या राज्यांच्या उत्पन्नाचे अंतर आहे. 2016-19 या तीन वर्षांच्या कालावधीत राज्यांच्या उत्पन्नाची सरासरी दरडोई GSDP प्रमाणे गणना करण्यात आली आहे. कमी दरडोई उत्पन्न असलेल्या राज्यांना आर्थिक समानता राखण्यासाठी जास्त वाटा दिला जातो.

ब)क्षेत्रफळ:

क्षेत्रफळानुसार राज्यांना पंधराव्या वित्तआयोगानुसार 15 टक्केनिधीमिळतो. याचा सर्वाधिक फायदा देशात सर्वाधिक क्षेत्रफळ असणाऱ्या राजस्थान, मध्यप्रदेश व महाराष्ट्र या राज्यांना होतो. तर गोवा, सिक्कीम या राज्यांना या निकषानुसार सर्वात कमी निधीमिळतो.

क) लोकसंख्या:

13 व्या व 14 व्यावित्त आयोगामध्ये 1971 च्या लोकसंख्या आकडेवारीनुसार 'लोकसंख्या' यानिकषावर आधारित 17.5% इतके निधीचे वाटप करण्यात येत. पंधराव्या वित्त आयोगात नवीन बदल करण्यात आला. 2011 च्या जनगणनेच्या आकडेवारीचा वापर करून सर्वाधिक लोकसंख्या असणाऱ्या राज्यांना जास्त

प्रमाणात निधी दिला जात आहे.याचा फायदा देशातील सर्वाधिक लोकसंख्या असणाऱ्या उत्तरप्रदेश (20 कोटी), महाराष्ट्र (11.2 कोटी) आणि बिहार (10.4 कोटी) या राज्यांना होत आहे.

ड)लोकसंख्याशास्त्रीय कामगिरी:

सर्वाधिक लोकसंख्या असणाऱ्या राज्यांना 'लोकसंख्या' या निकषानुसार सर्वाधिक निधी मिळतो.मात्र तुलनेने कमी लोकसंख्या असणाऱ्या,कमी प्रजननदर असणाऱ्या राज्यांना मात्र या निकषाचा तोटा होतो.यामुळे या राज्यावर होणारा अन्याय दूर करण्यासाठी लोकसंख्या वाढीवर नियंत्रण ठेवणाऱ्या व कमी प्रजननदर असणाऱ्या राज्यांना प्रोत्साहनपर 12.5 % निधी देण्यात येणार आहे. पहिल्यांदाच अशाप्रकारचा नवीन निकष तयार करून लोकसंख्या नियंत्रणासाठी प्रयत्न करण्यात आल्याचे दिसते.

इ) वन आणि पर्यावरणशास्त्र:

इंडिया स्टेट ऑफ फॉरेस्ट रिपोर्ट 2021 नुसार भारतातील एकूण वन आणि वृक्षाच्छादित क्षेत्र 80.9 दशलक्ष हेक्टर आह. जे देशाच्या भौगोलिक क्षेत्राच्या 24.62% आहे.

पर्यावरणाचा समतोल राहण्यासाठी एकूण क्षेत्रफळापैकी 33% भूभाग वनाच्छादित असावा असा नियम आहे. या अनुषंगाने सर्व राज्यांच्या एकूण घनदाट जंगलात प्रत्येक राज्याच्या घनदाट जंगलाचा वाटा मोजून निधी दिला जातो.या निकषाला 10% वेटेज देण्यात आले आहे.सध्या एकूण भौगोलिक क्षेत्राच्या टक्केवारीनुसार वनाच्छादनाच्या बाबतीत, मिझोराम (84.53%), अरुणाचल प्रदेश (79.33%), मेघालय (76.00%), मणिपूर (74.34%) आणि नागालँड (73.90%) ही शीर्ष पाच राज्ये आहेत. या राज्यांना या निकषाचा सर्वाधिक फायदा होतो.15 व्या वित्त आयोगामध्ये वनक्षेत्राबरोबर पर्यावरणशास्त्राचा ही समावेश करण्यात आला आहे.पर्यावरण शास्त्रही व्यापक संकल्पना असून यामध्ये विविध आंतरविद्याशाखा भौतिकशास्त्र, पर्यावरणशास्त्र, रसायनशास्त्र, जीवशास्त्र, अभियांत्रिकी, भूगोल ,तंत्रज्ञान , अर्थशास्त्र, समाजशास्त्र, नीतिशास्त्र, इतिहास, कला यांसारख्या अनेक विषयांचा समावेश होतो.

फ) कर आणि वित्तीय प्रयत्न:

कर संकलन व कर भरणा वाढीसाठी प्रयत्न करणाऱ्या राज्यांना प्रोत्साहनपर वित्तीय निधी 2.5% देण्यासाठी नवीन निकष लागू करण्यात आला आहे.हा निकष उच्च कर संकलन कार्यक्षमतेसह राज्यांना पुरस्कृत करण्यासाठी वापरला गेला आहे. यासाठी 2016-17 ते 2018-19 या तीन वर्षांतील सरासरी दरडोई कर महसूल आणि सरासरी दरडोई राज्य GDP यांचे गुणोत्तर मोजून तयार केला जातो.

14 व 15 व्या वित्त आयोगातील वरील निकषानुसार केंद्र-राज्य उत्पन्न विभाजन या नुसार सर्वाधिक निधी मिळविणारी राज्ये व सर्वात कमी निधी मिळणारी राज्ये खालीलप्रमाणे दर्शवता येतील.

तक्ता क्रमांक-२ केंद्राद्वारे वाटप केलेल्या करांमध्ये सर्वाधिक वाटा असणारी राज्ये (100 % पैकी)

अ.न	राज्य	14 वा वित्त आयोग	15 व्या वित्त आयोग
1	उत्तर प्रदेश	17.95	17.93
2	बिहार	9.66	10.05
3	मध्य प्रदेश	7.54	7.85
4	पश्चिम बंगाल	7.32	7.52

5	महाराष्ट्र	5.52	6.31

माहितीचा स्त्रोत:14 व 15 वित्त आयोग

तक्ता क्रमांक-३ केंद्राद्वारे वाटप केलेल्या करांमध्ये सर्वात कमी वाटा असणारी राज्ये (100% पैकी)

अ.न	राज्य	14 वा वित्त आयोग	15 वा वित्त आयोग
1	गोवा	0.378	0.386
2	सिक्कीम	0.367	0.388
3	मिझोराम	0.460	0.500
4	नागालँड	0.498	0.569
5	मणिपूर	0.617	0.716

माहितीचा स्त्रोत:14 व 15 वित्त आयोग

वरील तक्ता क्रमांक २ व ३ वरून आपणास असे लक्षात येते की देशातील सर्वात मोठ्या लोकसंख्या व क्षेत्रफळानुसार असणाऱ्या उत्तरप्रदेश,बिहार मध्यप्रदेश या राज्यांना इतर राज्याच्या तुलनेने सर्वाधिक केंद्रीय उत्पन्नातील वाटा मिळतो. तर सर्वात लहान असणाऱ्या गोवा, सिक्कीम व मिझोराम या राज्यांना केंद्रीय उत्पन्नातील वाटा सर्वात कमी मिळतो. ही आर्थिक विषमता दूर करण्यासाठी बऱ्याचदा या राज्यांना अनुदान व आपत्ती व्यवस्थापना अंतर्गत मदत दिली जाते.

अनुदाने:

प्रादेशिक, भौगोलिक, आर्थिक, सामाजिक, शैक्षणिक व आरोग्यविषयक असमानता दूर करण्यासाठी केंद्र सरकार राज्य सरकाराना अनुदान देत असते. पंधराव्या वित्त आयोगा नुसार 2021-26 कालावधीत केंद्राच्या संसाधनांमधून खालील अनुदान दिले जातील.

१.महसुली तूट अनुदान: भारतात महसुली उत्पन्नापेक्षा महसुली खर्च सर्वाधिक आहे. महसुली तूट भरून काढण्यासाठी मोठ्या प्रमाणात सरकार कर्ज घेत असते.अर्थसंकल्पीय अंदाजानुसार, FY22 मध्ये सर्वाधिक कर्ज-GSDP गुणोत्तर असलेली राज्ये पंजाब (53.3%), राजस्थान (39.8%), पश्चिम बंगाल (38.8%), केरळ (38.3%) आणि आंध्रप्रदेश (37.6%) आहेत. या सर्व राज्यांना केंद्राकडून महसूल तुट भरून काढण्यासाठी अनुदान मिळते. पंधराव्या वित्तआयोगानुसार महसुली तूट दूर करण्यासाठी 17 राज्यांना 2.9 लाख कोटी रुपयांचे अनुदान मिळणार आहे.

२.क्षेत्र-विशिष्ट अनुदान:राज्यांना आठ क्षेत्रांसाठी 1.3 लाख कोटी रुपयांचे क्षेत्र-विशिष्ट अनुदान दिलेजाईल: (i) आरोग्य, (ii) शालेयशिक्षण, (iii) उच्चशिक्षण, (iv) कृषी सुधारणांची अंमलबजावणी, (v)) PMGSY रस्त्यांची देखभाल, (vi) न्याय व्यवस्था, (vii) आकडेवारी आणि (viii) महत्त्वाकांक्षी जिल्हे आणि ब्लॉक. या अनुदानांचा एक भाग कार्यप्रदर्शनाशी जोडलेला असेल.

३.राज्य-विशिष्ट अनुदान :आयोगाने 49,599 कोटी रुपयांच्या राज्य-विशिष्ट अनुदानाची शिफारस केली. हे खालील क्षेत्रांमध्ये दिले जाईलः (i) सामाजिक गरजा, (ii) प्रशासकीय प्रशासन आणि पायाभूत सुविधा, (iii) पाणी आणि स्वच्छता, (iv) संस्कृती आणि ऐतिहासिक वास्तूंचे जतन, (v) उच्च किमतीच्या भौतिक पायाभूत सुविधा आणि (vi) पर्यटन. आयोगाने राज्य-विशिष्ट आणि क्षेत्र-विशिष्ट अनुदानांच्या वापराचे पुनरावलोकन आणि निरीक्षण करण्यासाठी राज्य-स्तरावर उच्च-स्तरीय समितीची शिफारस केली.

४.स्थानिक स्वराज्य संस्थांना अनुदानः स्थानिक स्वराज्य संस्थांना एकूण अनुदान 4.36 लाख कोटी रुपये असेल (अनुदानाचा एकभाग कामगिरीशी निगडीत असेल) यासहः (i) ग्रामीण स्थानिक स्वराज्य संस्थांसाठी 2.4 लाख कोटी रुपये, (ii) 1.2 लाख कोटी रुपये शहरी स्थानिक संस्था, आणि (iii) स्थानिक स्वराज्य संस्थांमार्फत आरोग्य अनुदानासाठी रु. 70,051 कोटी. स्थानिक स्वराज्य संस्थांना दिले जाणारे अनुदान गाव, पंचायत समिती गट आणि जिल्हा परिषद या पंचायतीच्या तिन्ही स्तरांना उपलब्ध करून दिले जाईल. आरोग्य अनुदान यासाठी प्रदान केले जाईलः (i) ग्रामीण उपकेंद्रे आणि प्राथमिक आरोग्य केंद्रांचे (PHC) आरोग्य आणि निरोगीपणा केंद्रांमध्ये Ayushman Bharat- Health and Wellness Centre (HWCs) रूपांतर करणे, (ii) प्राथमिक आरोग्य सेवा उपक्रमांसाठी निदान पायाभूत सुविधांसाठी समर्थन आणि (iii) शहरी HWC, उपकेंद्र, PHC आणि ब्लॉक स्तरावरील सार्वजनिक आरोग्य युनिट्स साठी. स्थानिक स्वराज्य संस्थांना (आरोग्य अनुदाना व्यतिरिक्त) अनुदाने राज्यांमध्ये लोकसंख्या आणि क्षेत्रफळाच्या आधारावर वितरीत केली जातील, अनुक्रमे 90% आणि 10% वेटेज.

❖ आपत्ती जोखीम व्यवस्थापनः

आयोगाने आपत्ती व्यवस्थापन निधीसाठी केंद्र आणि राज्यांमध्ये विद्यमान खर्च-वाटप पद्धती कायम ठेवण्याची शिफारस केली आहे. केंद्र आणि राज्यांमधील खर्च-वाटपाचा नमुना आहेः (i) उत्तर-पूर्व आणि हिमालयीन राज्यांसाठी 90:10 आणि (ii) इतर सर्व राज्यांसाठी 75:25. राज्य आपत्ती व्यवस्थापन निधी मध्ये रु. 1.6 लाख कोटी (केंद्राचा वाटा रु. 1.2 लाख कोटी) असेल.

निष्कर्षः

- पंधराव्या वित्त आयोगाने लोकसंख्या वाढ नियंत्रण, कर व उत्पन्न वाढीसाठी प्रयत्न करणाऱ्या राज्यांना प्रोत्साहनपर वित्तीय निधी व वन या निकषा मध्ये पर्यावरणशास्त्राचा केलेला समावेश या तिन्ही बाबी उल्लेखनीय आहेत.
- सर्वाधिक लोकसंख्या असणाऱ्या राज्यांना लोकसंख्या निकषानुसार वाढीवनिधी मिळतो.तर लोकसंख्या नियंत्रणासाठी अनेक दशकांपासून कार्य करणाऱ्या,कमी लोकसंख्या व कमी प्रजननदर असणाऱ्या दक्षिणेकडील अनेक राज्यावर या निकषामुळे अन्याय होतो. लोकसंख्याविषयक कामगिरीनुसार 12.5% वित्तीय निधी दिल्यामुळे कमी लोकसंख्या असणाऱ्या राज्यावर होणारा अन्याय दूर करण्याचा प्रयत्न 15 व्या वित्त आयोगात करण्यात आला आहे.लोकसंख्या नियंत्रणाचा प्रमुख उद्देशही या निकषाद्वारे पूर्ण होण्यास मदत होईल.
- कोरोनाच्या महामारीमुळे आरोग्य सुविधांची दिसून आलेली कमतरता भरून काढण्यासाठी प्राथमिक आरोग्य केंद्राचे स्वरूप बदलत आरोग्य आणि निरोगीपणा केंद्र असे करण्यासाठी अनुदान देण्यात आले.आजारी पडल्यानंतर लागणाऱ्या चांगल्या आरोग्याविषयक सुविधा उपलब्ध करून देण्याबरोबरच आजारी पडू नये. यासाठी प्रत्येक आरोग्य केंद्रात वेलनेस केंद्र सुरू करण्यात येणार आहे.

- आरोग्य,शिक्षण आणि रस्ते यासारख्या पायाभूत सुविधा उपलब्ध करून देण्यासाठी व स्थानिक स्वराज्य संस्था बळकटी करणासाठी 15 व्या वित्त आयोगात मोठ्या प्रमाणात अनुदान देण्याची शिफारस करण्यात आली आहे.
- महसुली उत्पन्नापेक्षा महसुली खर्च जास्त यामुळे महसुली तूट वाढते. ती भरून काढण्यासाठी कर्ज घेतले जाते.हे कर्ज कमी करण्यासाठी व वित्तीय शिस्त लावण्यासाठी महसुली अनुदान देशातील सतरा राज्यांना देण्यात येते.पण या धोरणामुळे इतरराज्यांवर अन्याय होतो.
- वित्त आयोगाचा प्रमुख उद्देश म्हणजे करवसुली व करभरणा यामध्ये राज्यांचे असणारे योगदान ज्या प्रमाणात आहे. त्या प्रमाणात एकूण उत्पन्नाचे विभाजन असावे. पण वास्तविक पाहता काही राज्यांनाच उत्पन्नातील जास्त वाटा मिळतो.
- वित्त आयोगाने अनेक कामगिरी-आधारित प्रोत्साहने आणली ज्यामुळे अप्रत्यक्षकराचा विस्तार आणि सखोलता वाढण्यास मदत झाली. गेल्या काही वर्षांत जीएसटीमधून मिळणारा महसूल प्रचंड वाढत आहे.
- 15 व्या वित्त आयोगाने आपत्ती निवारणासाठी विशेष आर्थिक तरतूद केली आहे.या अंतर्गत महाराष्ट्र (महापूरसंकट- २०२०-२२), मध्यप्रदेश व उत्तरप्रदेश या राज्यांना विशेष मदत मिळाली आहे.

संदर्भ ग्रंथसूची:

1. Finance Commission (2017). Reports of the15th Finance commission, Government of India.

2. CAG (2021-22). Union Government Accounts, Govt. of India.

3. Shah Anwar (2016). State Fiscal Transfers to Local Governments: Principles and Lessons from the International Practice (Workshop on Fiscal Decentralization and the RoleofState Finance Commissions New Delhi, India, 18-19 January 2016

4. Panda Manoj et. al (2019). A Study prepared for 15th Finance commission: Resource Sharing between Centre and States and Allocation across States: Some Issues in Balancing Equity and Efficiency (Institute of Economic Growth, Delhi, Draft Report July, 2019)

5. Pradhan Basanta K (2019). Cyclically Adjusted Primary Balance for Centre andStates in India (Development Planning Centre, Institute of Economic Growth, Delhi)

6. PhadkeManasi (2018), Political Economy of Fiscal Federalism in India, Gokhale Institute of Politics and Economics.

Website:

https://m.rbi.org.in//scripts/BS_ViewBulletin.aspx?Id=5979

https://accountabilityindia.in/blog/15th-finance-commission-report-devolution-formula-accountability-initiative/

https://www.epw.in/tags/tax-devolution

https://prsindia.org/policy/report-summaries/report-15th-finance-commission-2021-26

पंधरावा वित्त आयोग केंद्र राज्य संबंधाची चिकित्सा

प्रा .डॉ.दीपक एम .भारती
कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय,किल्ले धारूर .
गोविंद रामराव काळे ,
संशोधक विद्यार्थी ,डॉ .बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ औरंगाबाद

Abstract (गोषवारा) :

भारतीय संघराज्यामध्ये प्रत्येक राज्याची भौगोलिक, सामाजिक, आर्थिक परिस्थिती वेगवेगळी आहे. यामुळे त्यांच्या उत्पन्नाचे स्त्रोतही भिन्न आहेत प्रत्येक राज्यांचे दरडोई उत्पन्न विकासाचा दर हा वेगवेगळा आहे. देशाचा सामूहिकपणे विकास घडवून आणण्याचा असेल तर या भिन्नतेचा विचार करून तसेच सर्व राज्यांना समान विकास घडवून आणण्यासाठी केंद्र सरकार वित्त आयोगाच्या माध्यमातून प्रयत्न करत असते. त्यासाठी त्यांना अनुदान व वित्तीय योजना अमलात आणण्याचा प्रयत्न केंद्र सरकार करते. आर्थिक स्वतःच्या बाबतीत एक वाक्यता निर्माण व्हावी या दृष्टीने केंद्र सरकार व राज्य सरकार यामध्ये वित्तीय सामंजस्य निर्माण करण्यासाठी केंद्राला अर्थविषयक सल्ला देण्यासाठी वित्त आयोगाची निर्मिती केली आहे. प्रस्तुत शोधनिबंधात पंधरावा वित्त आयोग आणि केंद्र राज्य चिकित्सा केली आहे.

Key words (के - वर्ड्स) :
पंधरावा वित्त आयोग , केंद्र राज्य वित्तीय संबंध

प्रस्तावना :

केंद्र सरकारने महसुलातील वाटा अनुदाने राज्यांना किती द्यावेत, राज्य राज्यांना कसे वितरित करावे. हे सुचवण्यासाठी भारतीय राज्यघटनेतील कलम 280 मधील तरतुदीनुसार वित्त आयोगाची स्वतंत्र स्थापना केली आहे. या कलमांमध्ये असे म्हटले आहे की,राष्ट्रपती दोन वर्षाच्या आत मध्ये आणि पाचव्या वर्षाच्या समाप्तीपर्यंत जी वेळ राष्ट्रपतींना योग्य वाटते तेव्हा वित्त आयोग गठीत केला जातो. वित्त आयोग ही अर्धन्यायिक संस्था आहे. वित्त आयोगामध्ये एक अध्यक्ष व किमान चार इतर सदस्य असतात वित्त आयोगाच्या सदस्यांची अरहता आणि त्यांच्या निवडीची प्रक्रिया ठरवण्याचे अधिकार राज्यघटनेने संसदेस दिले आहेत. केंद्र आणि राज्य सरकार यांच्यामध्ये वित्तीय संबंध निर्माण करण्यासाठी त्यांच्यात उत्पन्नातील घटकांचे वाटप समान होण्यासाठी वित्त आयोगाची निर्मिती करण्यात येते. वित्त आयोगाचा कार्यकाळ हा पाच वर्षाचा असतो वित्त आयोगाची स्थापना वित्त आयोग अधिनियम 1951 नुसार झाली आहे 1993 मध्ये भारतातील सर्वच राज्यांमध्ये राज्य वित्त आयोग स्थापन करण्यात आला वित्त आयोगामध्ये एक अध्यक्ष आणि चार सदस्य असतात यातील दोन सदस्य पूर्णवेळ सदस्य तर दोन सदस्य अंशकालीन सदस्य असतात. .

शोधनिबंधाचे उद्दिष्टे : -

1 .वित्त आयोगाची पार्श्वभूमी अभ्यासणे.

2.पंधराव्या वित्त आयोगातील शिफारशी अभ्यासणे.

3 .पंधराव्या वित्त आयोगाच्या अनुषंगाने केंद्र राज्य वित्तीय संबंधाचे मिमांसा करणे.

संशोधन पद्धती : -

सदरील विषयावरील संशोधनासाठी द्वितीयक साधनांचा वापर करण्यात आला आहे त्यात प्रकाशित ग्रंथ मासिके वर्तमानपत्रे व संबंधित विषयाशी निगडित साहित्याचा वापर करून माहितीचे संकलन केले आहे.

पंधरावा वित्त आयोग : -

पंधराव्या वित्त आयोगाची स्थापना नोव्हेंबर 2017 मध्ये राष्ट्रपती रामनाथ कोविंद यांनी एन के सिंग यांच्या अध्यक्षतेखाली केली एप्रिल 2020 ते मार्च 2025 पर्यंतच्या कालावधी निश्चित करण्यात आला .राजस्व विभागणीसाठी एक सूत्र निश्चित करण्यासाठी पंधराव्या वित्त आयोगाची स्थापना करण्यात आली 2020 ते 2025 या कालावधीचा अहवाल 'फायनान्स कमिशन इन कोविड टाइम्स ' या शीर्षकाखाली राष्ट्रपतींना सादर करण्यात आला.

पंधराव्या वित्त आयोगाच्या शिफारशी : -

१. चौदाव्या वित्त आयोगाच्या शिफारशीनुसार राज्यांच्या वाट्यातील 42 टक्के करा मध्ये कपात करून 41 टक्के करण्याची शिफारस या आयोगाने केली .
२. नवनिर्मित केंद्रशासित प्रदेश जम्मू कश्मीर आणि लढा यांची सुरक्षा व इतर गरजांच्या पूर्ततेसाठी केंद्र शासनाच्या हिश्यात एक टक्का वाढ करण्यात आली आहे .
३. सार्वजनिक वित्तीय लेखापरीक्षण व्यवस्था निर्माण करण्यासाठी वैधानिक संरचना निर्मिती करण्यासाठी कायद्याची गरज असून असा कायदा तयार करण्यासाठी कार्य गटाची निर्मिती करण्याची शिफारस पंधरावा वित्त आयोगाने केली आहे .
४. कर प्रशासनाची कार्यक्षमता वाढवण्यासाठी शिफारस केली आहे .
५. ग्रामीण स्थानिक स्वराज्य संस्थांच्या बळकटीकरणासाठी केंद्र शासनाकडून राज्यांना बेसिक ग्रँड वाईट ग्रँड अशा दोन प्रकारच्या ग्रंड च्या स्वरूपात 50 टक्के 50 टक्के निधी प्राप्त करून द्यावी अशी शिफारस केली आहे

कर प्रणाली मध्ये राज्यांचा हिस्सा निर्धारित करण्यासाठी फक्त 2011 च्या जनगणनेचा आधार घेण्यात आला आहे यापूर्वी चौदाव्या वित्त आयोगाने 1971 व 2011 या जनगणनेचा आधार घेऊन शिफारशी केल्या होत्या .

वरील आकृतीवरून असे निदर्शनास येते की अकराव्या वित्त आयोगाने राज्यांच्या करारातील वाटा 29.5% होता .बारावी वित्त आयोगाने त्यात 1 टक्का वाढ केली तर तेराव्या वित्त आयोगाने बाराव्या वित्त आयोगाच्या तुलनेत 1. 5 टक्के वाढ केली.चौदाव्या वित्त आयोगाने तो 32 टक्के वरून 42 टक्के केला .एकंदरीत दहा टक्के वाढ केली .पंधराव्या वित्त आयोगाने बेचाळीस टक्के वरून 41 टक्के इतके केले म्हणजेच 1 टक्के ने घट केली आहे .

पंधराव्या वित्त आयोगाने करातील वाटा निर्धारित करण्यासाठी खालील आधार निश्चित केल्या आहेत

States share in Divisible pool (%)



राज्यांच्या वाट्यातील करांचा वाटा

1.लोकसंख्या - 15 %

2 .क्षेत्रफळ - 15 %

3 .वने आणि पर्यावरण - 10 %

4 .उत्पन्न तफावत - 45 %

5 .लोकसंख्या कामगिरी -12.5

6.कर प्रयत्न - 2.5

पंधरावा वित्त आयोग केंद्र राज्य वित्तीय संबंध चिकित्सा

पंधराव्या वित्त आयोगाने राज्यांना लोकसंख्येच्या आधारे करातील वाटा निर्धारित करण्यासाठी 2011 च्या जनगणनेचा आधार घेतला आहे त्यामुळे अनेक राज्यांनी यावर आक्षेप घेतला आहे कारण यामुळे उत्तर प्रदेश आणि बिहार यासारख्या जास्त लोकसंख्या असलेल्या राज्यांना याचा फायदा होणार आहे दक्षिण भारतातील राज्यांनी यांचा विरोध केला आहे या राज्यांचे म्हणणे आहे की सुरुवातीस केंद्र सरकारने लोकसंख्या नियंत्रणासाठी प्रोत्साहित केले आणि आता लोकसंख्येत आधार मानले आहे त्यामुळे जास्त लोकसंख्या असलेल्या राज्यांना फायदा आणि कमी लोकसंख्या असणाऱ्या राज्यांना याचा फटका बसणार आहे यासाठीआपण 1971 आणि 2011 या दोन्ही जनगणनांचा विचार करावा पण पंधराव्या वित्त आयोगाने केवळ 2011 च्या जनगणनेचा आधार घेतला आहे

पंधराव्या वित्त आयोगाने सर्वाधिक कर्जमाफी करणाऱ्या राज्यांना पुरस्कार देऊन त्यांना जास्त वाटा देण्याचाही निर्णय घेतला आहे याशिवाय 2026 पर्यंत 3 ट्रिलियन राजस्व घाटा राज्यांना देण्याची शिफारस केली आहे त्यात त्यांनी 2026 पर्यंत राजस्व घाटा देण्याची राज्यांची संख्या 17 वरून 2026 पर्यंत केवळ सहा राहील असे म्हटले आहे याशिवाय राज्यांना परफॉर्म बेस अनुदान या बाबीचा ही विचार केला आहे या त्यांनी प्रामुख्याने आठ घटकांचा समावेश केला आहे त्यात प्रामुख्याने आरोग्य शालेय

शिक्षण उच्च शिक्षण कृषी सुधारणा रस्ते विकास न्याय आणि सांख्यिकीय जिल्हा आणि गट यावर राज्यांनी किती प्रमाणात कार्य केले आहे या आठ घटकांसाठी राज्यांना 130000 करोड रुपये इतक्या अनुदानाची शिफारस केली आहे .

स्टेट स्पेसिफिक अनुदानाची शिफारशी या आयोगाने केली आहे यामध्ये प्रामुख्याने सामाजिक गरजा प्रशासन आणि पायाभूत गरजा पाणीपुरवठा आणि स्वच्छ सूर्यप्रकाश सांस्कृतिक आणि ऐतिहासिक वास्तूंचे संरक्षण आणि पर्यटन या सर्व घटकांसाठी 39000करोड रुपये अनुदानाची शिफारस केली आहे

2025 26 मध्ये केंद्र सरकारने राजकोषीय तूट जीडीपीच्या चार टक्के करावी अशी सूचना या अहवालात दिली आहे .राज यांनीही राजकोषीय तुटीची सीमा 2021 22 मध्ये चार टक्के,2022 23 मध्ये 3.5% आणि 2023 26 मध्ये तीन टक्के करण्याची सूचना दिली आहे .आरोग्य क्षेत्रावर भर देऊन त्यावर अधिक खर्च करण्याचे निर्देश दिले आहेत .

निष्कर्ष

पंधराव्या वित्त आयोगामध्ये अनेक बाबींचा विचार करण्यात आलेला आहे त्यातील प्रमुख बाबींचा विचार केल्यानंतर असे निदर्शनास येते की,सर्व राज्यांचा समान विकास घडवून यावा .कोणतेही राज्य इतर राज्यांच्या तुलनेत विकासाच्या बाबतीत इतर राज्यापेक्षा मागे राहू नये. सर्वसमावेशक सम विकास घडवून आणण्याचा प्रयत्न करण्यात आलेला दिसून येतो लोकसंख्या आणि क्षेत्रफळाने मोठे असलेल्या राज्यांना अधिक नीतीचे वाटप करण्याची शिफारस यात करण्यात आल्यामुळे दक्षिणेकडील बहुतांश राज्यांनी यावर नाराजी व्यक्त केली आहे त्यामुळे सर्वच राज्यांना यातून न्याय मिळालेला नाही ही एक महत्वपूर्ण त्रुटी या पंधराव्या वित्त आयोगातील आहे .

संदर्भसूची : -

1 .15th Finance Commission Report

2.वित्त आयोग विकिपीडिया

ऋत प्रकाशन, जालना

978-93-84663-34-6